# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य

**प्रा.देवडे सतिश मारोतिराव**
सहायक प्राध्यापक(राज्यशास्त्र)
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ
ईमेल : satishdebde2011@gmail.com

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यामधील कवनाने या गावा मध्ये ११ मार्च १८६३ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे मूळ नाव गोपाळराव काशीनाथ गायकवाड होते. बडोदा संस्थांनचे अधिपति खंडेराव गायकवाड यांना वारस नसल्यामुळे गोपाळराव यांना बडोदा संस्थानाने पुढील वारसदार म्हणून दत्तक घेतले. आणि हेच गोपाळराव पुढे बडोदा संस्थांनचे महाराजा सयाजीराव खंडेराव गायकवाड बनले. सयाजीराव गायकवाड हयानि बडोदा संस्थांनचे महाराजा बनल्यानंतर त्यांनी सर्वच क्षेत्रात चिरकालीन ठरतील असे अनेक अमुलाग्र कार्य त्यांनी केले. भारतात ब्रिटिश राजवटि आधी समाजातील विविध घटका मध्ये शैक्षणिक दृष्ट्या प्रचंड विषमता होती. ही विषमता दूर करून सर्व सामान्य जनतेत शिक्षण प्रसारासाठी झटणाऱ्या समाज सुधारकाना राजाश्रय देण्याचे काम ब्रिटिश भारतातिल ५६५ संस्थानापैकी मोजक्याच राज्य कर्त्यांनी केले. या राज्य कर्त्या मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने येते .

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) बडोदा संस्थानातील शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासने
२) बडोदा संस्थानातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास करणे
३) बडोदा संस्थानातील व्यावसायीक शिक्षणाचा अभ्यास करणे
४) बडोदा संस्थानातील शेतकी शिक्षणाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी संशोधन पध्दती म्हणुन ऐतिहासिक लेखनपध्दती वापरलेली आहे. तसेच सदर शोध निबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. शोधनिबंधाचा विषय व्यक्तीविषयक असल्यामुळे यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आत्मचरित्रात्मक ग्रंथ,तसेच त्यांच्याविषय लेखन केलेल्या संदर्भग्रंथाचा वापर केलेला आहे.

**संशोधनाची मांडणी :**

सयाजीराव यांनी शैक्षणिक कार्य करत असताना सर्वप्रथम त्यांनी संपूर्ण बडोदा संस्थानात सर्व जाती धर्माच्या मुला मुलीसाठी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला.हा कायदा लागू करणारे बडोदा संस्थान हे भारतातिल पहिले संस्थान होते. सयाजीरावांनी जनतेच्या माध्यमिक शिक्षणाकरिता बडोदा हायस्कूल १८७१, द पाटण अँग्लो व्हर्नक्युलर स्कूल १८७९, फतेहसिंग इंग्लिश इंस्टीट्यूट १८९५, गंगाधर मिक्सड स्कूल १९२३, या सह संस्थानातील विविध ठिकाणी गुणवत्ता पूर्ण शाळांची स्थापना केली. प्राथमिक माध्यमिक शिक्षणाने साक्षर झालेल्या जनतेला उच्च शिक्षनासाठी १८८१ साली बडोदा कॉलेजची स्थापना केली. कृषिप्रधान सर्व सामान्य विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानबरोबरच शेतीचे अत्याधुनिक ज्ञान मिळावे या उद्देश्याने १८८९ मध्ये बडोदा कॉलेज मध्ये स्वतंत्र शेतकी विभागाची स्थापना केली. या विभागाशी संलग्न शेतजमिनीत विविध पिकांचे प्रयोगशील उत्पादन घेतले जात होते. याच बरोबर विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्र शिक्षण देण्यासाठी सयाजीरावानि १८९० मेड कला भवन ची स्थापना केली. कला भवन मध्ये सहा विद्या शाखांचे सैद्धांतिक आणि प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण दिले जात होते. संस्थानातील प्रतेक विद्यार्थाला बडोद्यात येउन कला भवन मध्ये शिक्षण घेणे शक्य नव्हते. त्यामुळे संस्थानच्या औद्योगिक प्रगतीसाठी आवश्यक कुशल मनुष्य बळ निर्माण करण्याच्या सयाजीरावानि जिल्हा औद्योगिक शाळांची स्थापना केली.[1]

स्त्रिया साठी शिक्षणाची दारे खुली करून सयाजीरावांनी स्त्री उद्धारच्या कार्यास सुरुवात केली. बडोदा संस्थानात १८७५ ला दोन तर १९२६ पर्यन्त ३७५ मुलींच्या शाळा होत्या. महिलाना औद्योगिक शिक्षण देण्याच्या उद्देशयाने संपूर्ण संस्थानात तिन औद्योगिक शाळा उभारल्या त्याच बरोबर पडदा पद्धत पाळनाऱ्या स्त्रीयांच्या शिक्षणसाठी झनाना वर्गाची स्थपणा केली.

समाजातील दलित वर्गासाठी ज्याना आजपर्यंत शिक्षणाचा अधिकार देण्यात आला नव्हता अश्या वर्गासाठी सयाजीरावानि



Scanned with OKEN Scanner

ISSN No. 2394-5990

१८८२ साली सोनगड येथे पहिली प्रत्येकी एक मोफत निवासी शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करत असतानाच महाराजानि दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत केली. १८८२ च्या कायद्यानुसार महाराजानि आदिवासीसाठी प्राथमिक शाळा सुरू करून शैक्षणिक साहित्य आणि निवासाची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली. आदिवासी विद्यार्थ्यांना शेतीचे आधुनिक प्रशिक्षण देण्यासाठी या शाळा संस्थानातील प्रायोगिक शेतीशी संलग्न केल्या. १८९६ ला सोनगड येथे आदिवासी मुलीसाठी पहिली स्वतंत्र निवासी शाळा स्थापना केली. या समाजातील मूल मुलीना बडोद्यातील १८८२ मध्ये सुरू झालेल्या ट्रेनिंग कॉलेज मध्ये शिक्षकी पेक्षाचे प्रशिक्षण दिले जात होते.[२]

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व शाळामद्धे मुला मुली साठी शारीरिक शिक्षण हा विषय सक्तीचा करण्यात आला. १८९३ मध्ये नेटिव्ह गेम्स इलयुस्ट्रेटेड या स्थानिक खेळांचे विस्तृत वर्णन असणाऱ्या इंग्रजी पुस्तकाचे महाराजानि गुजराती भाषांतर प्रसिद्ध केले. महाराजा नि १९२० साली सर्व हायस्कूल आणि उच्च प्राथमिक शाळामद्धे शिक्षकांची नियुक्ती केली. १९३१ पासून बडोदा कॉलेज मध्ये शारीरिक शिक्षण हे प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करण्यात आले. राज्यातील शारीरिक शिक्षण विभागाला स्काउट चळवळ जोडून महाराजानि व्यक्तिमत्व विकास प्रक्रियेला चालना दिली. उत्तम दर्जाच्या शैक्षणिक संस्था उभारताना या संस्थांनची प्रशिक्षित शिक्षकांची गरज भागवण्यासाठी सयाजीरावानि १८८२ मध्ये फीमेल ट्रेनिंग कॉलेज आणि १८८५ मध्ये पुरुष प्रशिक्षण महाविद्यालयसुरू केले. १९३० मध्ये महाराजानी फिमेल ट्रेनिंग कॉलेजला ३०००० रु, व मेल ट्रेनिंग कॉलेज ला २६००० रु निधी मंजूर केला. पारंपरिक पुरोहितांची मक्तेदारी नष्ट करण्याच्या हेतूने मराठा जातीतील पुरोहित तयार करण्यासाठी १८९६ मध्ये पुरोहित शाळा सुरू केली. अत्यंज मुलाना धार्मिक शिक्षण देण्याच्या उद्देशयाने १९९३ साली बडोद्यात गरोडा पाठशाळा करण्यात आली. ब्राम्हणेतरानाही धार्मिक शिक्षण देऊन पुरोहिताचा व्यवसाय करण्यास पत्र बनविले. आणि पुरोहितासाठी परवाना पद्धत सुरू केली.[३]

महाराजानी शिक्षणशास्त्र,संशोधन, सेनीटरि इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, धातुशास्त्र, आणि खाणी, शिल्पकला, तालिम, औषधी, व्यापार, अर्थशास्त्र, राजकीय तंत्र, ई विशयांचे उच्च शिक्षण घेण्यासाठी तरुणांना परदेश्यात पाठवले. परदेशातिल ज्ञान, अनुभव, आणि त्याद्वारे बडोद्याचा विकास हे त्रीसूत्र सयाजिरावांच्या विचारांची सखोलता आणि व्यापकता स्पष्ट करणारे आहे. सयाजीरावांच्या एक लाख पुस्तके असणारे आशिया खंडातील सर्वात मोठे ग्रंथालय उभारले. याच बरोबर गाव तेथे ग्रंथालय , शिशु ग्रंथालय , यांच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळीचे मॉडेल उभारले.[४]

सयाजीरावांनी शेतकी वर्ग, चिट्रकला वर्ग, मुलासाठी पाककला विद्यालय, संस्कृत विद्यालय, बूक डेपो, जेल स्कूल, कींडर गार्डन शिक्षण पद्धती, ग्रामशाला, हस्तकला वर्ग, कारागिरासाठी संध्याकाळची शाळा, आयुर्वेदिक महाविद्यालय, बडोदा सुधागृह, मुकबाधिर विद्यालय, बडोदा सेवा मंडल, लेखक विद्वांनाची परिषद, पुरातत्व विभाग, राज्य स्तरीय, शिक्षण परिषद , शिक्षण आयोग , संगीत विद्यालय , प्राच्यविद्या मंदिर , असे अनेक नवनवीन शिक्षण संदर्भातील उपक्रम सयाजिरावानी यशस्वीरीत्या राबविले.[५] सयाजिरावांच्या कारकिर्दीत उभ्या राहिलेल्या बडोद्यातील विविध शिक्षण संस्थाचा लेखाजोखा हा सायाजी रावांच्या शैक्षणिक क्रांतीचा आरसा आहे.

**निष्कर्ष :**

प्रजेचे हित शिक्षणातून साधता येते,हे ओळखून शिक्षणक्षेत्रात मूलभूत कार्य महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केले.सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा, आदिवासी व अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शाळा, वसतिगृहे, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती,शिक्षक प्रशिक्षण, खेडयांसाठी पेटी वाचनालय, जाती-भेद ,धर्मभेद न मानता सर्वच प्रजेच्या शिक्षणाच्या उन्नतीचे कार्य त्यांनी केले तसेच केवळ पारंपारिक शिक्षण न देता व्यावसायिक शिक्षणावर ही त्यांनी भर दिला. ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन व शेवटी प्रजेसाठी या शिक्षणांचा उपयोग ही महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक कार्याची त्रिसूत्री असल्यचे दिसते. त्यांनी संस्थानामध्ये नवे शैक्षणिक धोरण सुस्थापित केले.

**संदर्भ :**


१) बाबा भांड , सयाजीराव गायकवाड , म फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर, साकेत प्रकाशन .

२) डॉ. विशाल तायडे, महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा, शिक्षण ,भाग ०१

३) दांडेकर वि.पा., (१९३६), श्रीमंत सयाजीराव गायकवाड, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे पृ.क्र. ४२

४) सरदेसाई गो.स. (१९५६) 'श्री सयाजीराव यांचे सहवासात' एस. जगन्नाथ अँन्ड कंपनी पुणे,पृ.क्र. ३६

५) उपरोक्त पृ. क्र. ५३


■■■



Scanned with OKEN Scanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विव्दत्प्रमाणित त्रैमासिक

शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष तेरावे: अंक सदतीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२४

# मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन संकल्पना आणि स्वरूप




गांधी एज्यूकेशन सोसायटी, कुंडलचे

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विव्दत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष तेरावे: अंक सदतीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२४

# मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन संकल्पना आणि स्वरूप

संपादक

प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे

संपादक मंडळ

प्रा. (डॉ.) जयवंत दळवी
डॉ. सुभाष पाटील
डॉ. देवानंद सोनटक्के
डॉ. बळवंत मगदूम

अतिथी संपादक

प्रा. (डॉ.) धनंजय होनमाने
डॉ. नवनाथ गुंड
प्रा. (डॉ.) सुरेश शिंदे
प्रा. (डॉ.) संभाजी कदम
डॉ. संपत पार्लेकर

प्रकाशक

डॉ. भरत जाधव

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
द्वारकाधीश,साईनगरी, नागठाणे, ता. जि. सातारा- ४१५ ५१९

मुद्रक

लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, कुंडल
ता. पलूस, जि. सांगली- ४१६३०९

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, कुंडल येथे छापून द्वारकाधीश, साईनगरी, नागठाणे, ता. जि. सातारा ४१५ ५१९ येथे प्रकाशित केली, या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| वाङ्मयेतिहास: स्वरूप व संकल्पना | प्रा. डॉ. मीनाक्षी देव (निमकर) | १ |
| मराठी वाङ्.मयेतिहास लेखनाचे स्वरूप व मर्यादा | प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर | ६ |
| वाङ्ःमयेतिहास संकल्पना आणि पुनर्लेखनाची प्रस्तुतता | प्रा. गुंडोपंत पाटील | १४ |
| वाङ्मयेतिहास: सातत्यपूर्ण पुनर्संशोधन आणि पुनर्लेखनाची आवश्यकता | डॉ. युवराज देवाळे | २७ |
| मराठी साहित्य समीक्षेचा इतिहास | शिल्पा संजय कुंभार | ३३ |
| साहित्येतिहासावरील प्रभाव व प्रेरणा | डॉ. बाळासो आण्णा सुतार | ४० |
| वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन : गरज आणि मर्यादा | डॉ. भरत जाधव | ५० |
| वाङ्मयेतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज | डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम | ५७ |
| लोकसाहित्य विषयक लेखनाचा इतिहास | डॉ. अशोक नामदेव शिंदे | ६३ |
| आदिवासी साहित्याचा इतिहास एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. कृष्णा महादू भवारी | ७३ |
| मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहास पुनर्लेखनाची गरज व मर्यादा | मोहिते सुदर्शना मानसिंग | ८० |
| वाङ्मयेतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज | प्रा. वृषाली सोपान उगले | ९० |
| इतिहास पुनर्लेखनाची संकल्पना | प्रा. (डॉ.) प्रशांत गायकवाड | ९८ |
| बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य आणि मराठी वाङ्मयाचा इतिहास | प्रा. डॉ. उज्ज्वला भोर | १०७ |
| मराठी इतिहासाचे पुनर्लेखन: काही प्रश्न | डॉ. शहाजी ज. पाटील | ११३ |
| मध्ययुगीन कालखंडातील वाङ्मय इतिहासाची सामाजिक प्रेरणा/पार्श्वभूमी | प्रा.डॉ.रमेश पांडुरंग पोळ | ११८ |
| महानुभाव पंथ: सांप्रदायिक दृष्टिकोन आणि वाङ्.मयीन कार्य | डॉ. गवराम नाना पोटे | १२२ |
| मराठीतील आद्य नाटककार : शाहराज भोसले | प्रा.डॉ.धनंजय होनमाने | १२६ |
| तंजावरमधील मराठी नाटकांची परंपरा | डॉ. विनायक शरदचंद्र राऊत | १३३ |

# मराठी वाङ्‌मयेतिहास लेखनाचे स्वरूप व मर्यादा

प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर
प्रोफेसर व मराठी विभागप्रमुख
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ

उद्देश -

१) वाङ्मय इतिहास लेखन ही संकल्पना समजावून घेणे.

२) वाङ्मय इतिहास लेखनाचे कालखंड कसे पडतात? तसेच त्यामागील युगप्रवृत्ती समजावून घेणे.

३) वाङ्मय इतिहास लेखनाचे स्वरूप कसे असते? ते अभ्यासणे.

४) वाङ्मय इतिहास लेखन करताना वस्तुनिष्ठ व विवेकवादी दृष्टिकोनाचे महत्व लक्षात घेणे.

५) वाङ्मय इतिहास लेखनात वाङ्मयतत्त्वशोधनाचे महत्त्व अधोरेखित करणे.

**संशोधन पद्धती** - भाषिक संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती, तुलनात्मक संशोधन पद्धती, समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती.

**प्रास्तविक** :- मानवाने आपल्या विविध विचारांना, कल्पनांना आविष्कृत करण्यासाठी वेगवेगळ्या कलांची निर्मिती केली. उदा. नृत्य, गायन, वादन, शिल्पकला, चित्रकला, साहित्य इत्यादी. कला मानवनिर्मित आहेत पण इतर कला व साहित्य कला यात थोडा मूलभूत फरक आहे. कलात्मक मूल्य व जीवनमूल्य या दृष्टीने साहित्य कलेचे वेगळेपण लक्षात घ्यावे लागते. वाङ्मयाचा अभ्यास करताना प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन असे तीन टप्पे पाडले जातात. काही अभ्यासक प्राचीन व अर्वाचीन अशी विभागणी करतात. खरे तर वाङ्मय इतिहासाचा अभ्यास करणे, त्याचे लेखन करणे हे विद्वत्तेचे व व्यासंगाचे परिक्षेत्र आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकाचे महत्त्व अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. याच कालखंडात समाज जीवनात मोठ्या प्रमाणात स्थित्यंतरे झाली. याच शतकात आधुनिक दृष्टीने साहित्याची निर्मिती होऊ लागली. निर्मित साहित्याची व्यवस्था लावण्याची गरजही याच कालखंडात भासू लागली.

**मराठी वाङ्मय इतिहास लेखनाचे स्वरूप :-**

काही अभ्यासक अर्वाचीन तर काही आधुनिक हा शब्दप्रयोग वापरतात.



वास्तविकता अर्वाचीन व आधुनिक या दोन्हींचा अर्थ समान आहे. मॉडर्न म्हणजेच आधुनिक. आधुनिक व अर्वाचीन या दोघांचाही अर्थ 'आधुनिक नवीन पद्धतीचा, आधुनिक अभिरुचीची व्यक्ती' असा घेतला जातो. 'आधुनिक( मॉडर्न) या सदरात येणारे कलापंथ आणि उपपंथ इतके विविध व विभिन्न प्रकृतीचे आहेत की त्याची एकच एक व्याख्या करणे अशक्य ठरते. आज जे नवे वाटते, ते उद्या परंपरेमध्ये पडते, प्राचीन ठरते.' १. साहित्य ही इतर कलांप्रमाणेच एक कला आहे. कलेचा खरा गुणदृष्ट्या विचार करताना नवता व प्राचीनता अशी वर्गवारी बाजूला ठेवणे आवश्यक असते. तरी आपण प्राचीन मराठी वाङ्मय व अर्वाचीन मराठी वाङ्मय अशी वर्गवारी करतो. कशाच्या आधारे आपण असे वर्गीकरण करतो? अर्वाचीन म्हणजे आधुनिक होय. या आधुनिक साहित्यात नवविचार, परिवर्तनवादी वृत्ती दिसून येते. तशी वृत्ती संतसाहित्यात नाही का? संतसाहित्यात नवता, परिवर्तनवादी विचार नाही का? संतसाहित्यास आधुनिक साहित्य म्हणायचे नाही का? अशा अनेक प्रश्नांची निर्मिती त्यातून होते. दोन कालखंडाची तुलना करताना प्रागतिक विचारसरणी, प्रचंड स्थित्यंतरे, परिवर्तनीय समाजजीवन ,शैक्षणिक क्रांती इत्यादी घटक विचारात घ्यावे लागतात. 'तथापि ऐतिहासिकदृष्ट्या स्पष्टपणे आधुनिक ठरलेला व भूतकाळाशी नाते तोडू पाहणारा एक कालखंड म्हणून त्याचा स्वतंत्र विचार अपरिहार्य ठरतो.' २. इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा म्हणजे मराठेशाहीचा शेवट झाला. एक नवे पर्व सुरू झाले. यशवंत मनोहर यांच्या मते आधुनिक म्हणजे आत्ताचा. 'अधुना' पासून हा शब्द सिद्ध झाला.आधुनिक म्हणजे विद्यमान स्थितीतला. 'आधुनिकता म्हणजे इहवाद, बुद्धिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य ही मूल्ये. या मूल्यांमध्ये नवता, परिवर्तन आणि प्रगती यांचा अंतर्भाव असतो. परंपरावादी जीवनाला ही मूल्ये उद्ध्वस्त करीत असतात'. ३ अशी वैशिष्ट्ये धारण करून जीवन जगण्याची पद्धती म्हणजे अर्वाचीन किंवा आधुनिक होय. महत्त्वाचे म्हणजे इ. स. १८०० नंतर महाराष्ट्राच्या विज्ञान, शिक्षण, धर्म, समाज, संस्कृती आदी जीवनात विविध स्थित्यंतरे झाली. त्यांचे प्रतिबिंब तत्कालीन लेखकांच्या लेखणीतून आविष्कृत झाले. हे परिवर्तनवादी, अनिष्ट- प्रथा -परंपरा व मूल्यांचा निषेध करणारे साहित्य निर्माण होणे सुरू झाले. तत्कालीन सामाजिक, धार्मिक रूढी परंपरांना, अंधश्रद्धांना हादरे या कालखंडात बसू लागले म्हणूनच या कालखंडाला अर्वाचीन अथवा आधुनिक कालखंड हा शब्द वापरला जातो. याच काळात पाश्चात्य साहित्याचाही प्रभाव विचारवंतांवर, लेखकांवर पडला व त्यातून आधुनिक विचार देणारे साहित्य निर्माण झाले. साहित्य निर्मिती झाल्यानंतर ह्याच शतकात

साहित्याची व्यवस्था लावावी, त्याचा इतिहास लिहावा असेही काही अभ्यासकांना वाटू लागले. पुरे म्हणजे वाङ्मयाचा इतिहास हे वाङ्मयीन विद्येचे अत्यंत महत्वाचे परिक्षेत्र आहे. कोणत्याही ज्ञानशास्त्राच्या उच्च अभ्यासक्रमात त्या शास्त्राच्या इतिहासाला महत्त्वाचे स्थान असणे स्वाभाविक आहे. कारण इतिहासाच्या अभ्यासानेच त्या क्षेत्राच्या समकालीन परिस्थितीचा व वैशिष्ट्यांचा उलगडा होत असतो. त्या दृष्टीने इतिहासाला प्राप्त होणारे महत्त्व हे केवळ स्वाभाविक आहे १. वाङ्मय हे खऱ्या अर्थाने इतिहासरूपास प्राप्त होते का? याचे उत्तर नाही असे आहे. कारण वाङ्मयातील काही भाग हा सार्वकालिक असतो वाङ्मयाला इतिहास आहे परंतु तो नुसता इतिहास नसून ते सार्वकालिक आहे म्हणूनच साहित्याला अक्षर वाङ्मय म्हणतात. डब्ल्यू. पी. केर या टीकाकारांच्या मते. We do not need literary history, as it's objects are always present,are "eternal" and thus have no proper history at all. २. वाङ्मय इतिहासच नसतो कारण वाङ्मय हे कधीही इतिहास जमा होत नाही आणि कालबाह्यही होत नाही. वाङ्मयाला एक प्रकारचे समकालीनत्व, चिरंतनपण व चैतन्य लाभलेले असते. प्रसिद्ध विचारवंत तेन यांनी म्हटलेले आहे की वंश, सामाजिक परिस्थिती व विशिष्ट कालविचार यांनी वाङ्मयाचे स्वरूप ठरते किंवा स्पष्ट होते. हे तीन घटक एखाद्या समाजाचे, भौगोलिक प्रदेशाचे किंवा राष्ट्राचे आपणास माहीत असतील तर त्याद्वारे तेथील वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास आपल्याला करून इतिहास लेखन करता येईल का? हाही प्रश्न त्या ठिकाणी निर्माण होतो. कोणत्याही राष्ट्रातील साहित्य मग ते कोणत्याही भाषेतील असो त्याला जीवनाचे कोणतेच अंग वर्ज्य नाही. त्या विविध अंगाने वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन करता येते. सामाजिक, राजकीय, धार्मिक जीवनातील विविध घटना, विचार चळवळी यांचा प्रभाव वाङ्मयनिर्मितीवर व लेखकावर होत असतो. अशा परिणामांचा एकत्रित साम्यदर्शक विचार करून त्या आधारे वाङ्मयइतिहासाचे लेखन करता येईल. एखाद्या कलाकृतीची निर्मिती केव्हा? कशी? कोठे झाली? कोणत्या लेखकाने निर्मिती केली? त्या कलाकृतीवर कोणत्या सामाजिक, धार्मिक, राजकीय घटनांचा परिणाम पडलेला आहे? याचे स्वरूप माहीत झाले तर कलाकृतीचे कलात्मक मूल्य, त्यातील वाङ्मय मूल्य, जीवनमूल्य उलगडून दाखवावी लागतील. वाङ्मयीन कालखंड कसे पाडायचे? हा एक प्रश्न आहे. सामान्यत: राजकीय दृष्टिकोनातून कालखंड पाडले जातात. इंग्लंड या देशात वाङ्मयीन कालखंड हे राणी एलिझाबेथ व राणी व्हिक्टोरिया यांच्या कालखंडाप्रमाणे पाडले गेलेले आहेत. मराठी वाङ्मयात सुद्धा प्राचीन, मध्ययुगीन,



आधुनिक- अर्वाचीन वाङ्मय अशी वर्गवारी केली, अर्थात ही वर्गवारी कालवाचक नसून प्रवृत्तिवाचक आहे हे आपण समजून घेतले पाहिजे, काही अभ्यासकांनी साहित्याचे कालखंड हे राजसत्तेनुसार यादवकालीन मराठी साहित्य, बहामनीकालीन मराठी साहित्य, शिवकालीन मराठी साहित्य, पेशवेकालीन मराठी साहित्य, आंग्लकालीन मराठी साहित्य, स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य असेही कालखंड पाडलेले आहेत. काही वेळा कालखंडांची ही कालगणना त्या त्या देशाच्या सामाजिक परिवर्तनावरही अवलंबून असते. युरोपीय व व्यापक जगताच्या दृष्टिकोनातून इतिहासाचा आधुनिक कालखंड हा पंधराव्या शतकाच्या मध्यात सुरु झालेला आहे. मात्र आपल्याकडे आधुनिक कालखंड एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये सुरु झाला. त्यामुळे आधुनिक कालखंड ही संकल्पना समजून घेताना दक्षता घ्यावी लागते. या अर्थाने शब्दांचे काटेकोर उपयोजन वाङ्मय इतिहासाच्या लेखनामध्ये चुकीचे ठरते. काही ठिकाणी मान्यवर लेखकांच्या नावे युग मानून साहित्याचा कालखंड मोजला जातो. लेखकांची नावे त्या युगाला दिली जातात. उदा. शेक्सपियर,चौसर युग तर मराठीमध्ये केशवसुत ,मर्ढेकर, फडके, खांडेकर युग असेही मानण्याकडे अभ्यासकांचा कल आहे. रेन वेलेक यांच्या मते वाङ्मयइतिहास, वाङ्मयतत्वशोधन व वाङ्मयमूल्यमापन या तीनही अभिक्रिया एकमेकांच्या हातात हात घालून वाङ्मयइतिहास लेखनात वावरत असतात. आपण यातील एकाच घटकाकडे लक्ष देऊन इतिहासाचे लेखन करून चालणार नाही. कारण कलाकृती ही जशी ऐतिहासिक असते तशी ती सार्वकालिकही असते.

## मराठी वाङ्मय इतिहास लेखनाच्या मर्यादा : -

१) मराठीच्या अनेक बोली आहेत. या सर्व बोलीमध्ये लिहिल्या जाणाऱ्या साहित्याच्या इतिहासाचे लेखन केले पाहिजे. कारण विशिष्ट भाषेचे साहित्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानणे हे चुकीचे आहे. हीच गोष्ट आपल्याला विविध साहित्यप्रवाहांच्या बाबतीतही म्हणता येईल. त्याचबरोबर भारतात विविध भाषा बोलल्या जातात. त्या भाषेतील साहित्यामध्येही आपल्याला श्रेष्ठ- कनिष्ठत्व असे करता येणार नाही. वाङ्मयइतिहास लेखन करताना ही काळजी घेतली पाहिजे.

२) आम्ही सांगतो व लिहितो तोच इतिहास खरा मानायचा.असा अट्टाहास कोणालाही धरून चालणार नाही. त्याची खातर जमा करणे, त्याची संदर्भ साधने - पुरावे शोधणे व त्याचा आधार घेऊनच लेखन झाले पाहिजे.

३) इतिहास लेखन करत असताना एक परंपरा अशी आहे की बहुसंख्यांकांचाच इतिहास लिहिला गेला आहे. त्यामुळे अल्पसंख्यांकांच्या इतिहासाकडे जाणीवपूर्वक

दुर्लक्ष झालेले आहे.

४) ज्याच्या हाती लेखणी त्याने त्याच्या समाजाच्या इतिहासाचे फायद्याचा विचार करून गौरवपर लेखन केलेले आहे व इतर समाजातील मोठ्या व्यक्ती, संत, साहित्यिक व समाजसुधारक यांच्या कार्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे.

५) बखरकारांनी ज्यांचा राजाश्रय त्यांना होता त्यांच्या बाजूनेच लेखन करण्यास पसंती दिलेली आहे. अर्थात त्याला काही अपवाद असतील.

६) अभ्यासकही अभ्यास लेखनाचे स्वरूप समजून घेताना जातीय दृष्टिकोन ठेवतात. साहित्यिकांचा व संतांचा जातीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे व त्याची मांडणी करणे हे सुद्धा अनुचित आहे. तसेच श्रेष्ठ- कनिष्ठ हा भाव ठेवतात. उदाहरणार्थ संत ज्ञानेश्वर नामदेवांपेक्षा श्रेष्ठ असा उल्लेख करणे, संत ज्ञानेश्वर तुकोबांपेक्षा श्रेष्ठ, नामदेव – तुकाराम हे खरे परिवर्तनवादी आणि त्यामानाने ज्ञानदेव फारच प्रतिगामी, वर्ण व्यवस्थेचे पुरस्कर्ते अशी मांडणी कोणत्या ऐतिहासिक साधनांच्या आधारे केली जाते?. संत वाङ्मयाचा अभ्यास करत असताना ब्राह्मण व ब्राह्मणेतर संत अशी विभागणी करून आपल्याच जातीच्या संताची महती अधोरेखित करणे व इतर संतांना दुय्यम लेखणे, हे मात्र सर्वस्वी चुकीचे आहे. आज जातिव्यवस्था टिकवण्याचा नव्याने जोरदार प्रयत्न चालू आहे कारण त्यात राजकीय, सामाजिक, आर्थिक स्वार्थ आहे. राजकीय व इतर लाभासाठी, क्षुल्लक स्वार्थासाठी परिवर्तनवादी विचाराला मूठमाती देऊन तडजोड करणारे पुरोगामी लोकही आपल्याला समाजात दिसतात. म्हणूनच संतसाहित्याचा अभ्यास आधुनिक दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे.

७) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडी सुद्धा आजही वादग्रस्तच आहेत. याचा इतिहास लिहिला गेला तर वेगवेगळे निष्कर्ष काढता येतील. अनेक साहित्यिकांना पात्रता असूनही अध्यक्षपद भूषविता आले नाही तर अनेक श्रेष्ठ साहित्यिकांना प्रचार करताना जीव गमवावा लागला. त्यातील जातीय राजकारण, गटबाजी, झालेले वाद हे आपणास माहीत आहेत. महाबळेश्वर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्षाविना पार पडले. मराठी साहित्य संमेलनाचा इतिहास लिहिताना साहित्य संमेलने का उधळली गेली? त्यातील जातीय राजकारण याचाही इतिहास लिहिला गेला पाहिजे. त्याचबरोबर आत्ता जी निवड पद्धती आहे त्याच्याही मर्यादा इतिहास लेखकांनी स्पष्टपणे मांडल्या पाहिजेत.

८) वाङ्मय इतिहासलेखन करत असताना शास्त्रीय दृष्टिकोन व सामाजिक दृष्टिकोन



यांचेही उपयोजन झाले पाहिजे. त्याचे उपयोजन न झाल्यामुळे काही प्रश्न वाङ्मयाच्या इतिहासात अनुत्तरीत व संभ्रमावस्थेत सापडलेले दिसतात. तुकोबांचे वैकुंठ गमन, चक्रधर स्वामींचे उत्तरपंथे झालेले गमन, संत चोखोबांचा मृत्यू याबाबतीत इतिहास मूक राहतो.

९) पराक्रमी असणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांची मराठी लेखकांनी बदनामी करून त्यांच्या पराक्रमाचा इतिहास झाकून टाकला होता.असे होऊ नये.

१०)वाङ्मयेतिहासामध्ये समकालीन साहित्यकृतींचे, लेखकाचे मूल्यमापन करताना वैचारिक मतभेद होऊ शकतात. जुन्या-नव्यांचा कायमचा संघर्ष आपल्याला दिसतो. जुन्यांचे पुनरुज्जीवन आणि नव्याचे अवमूल्यनही केले जाऊ शकते. त्याचबरोबर वाय्य इतिहास लेखन करत असताना मोठ्या लेखकांची पुस्तके किंवा त्यांचे लिखाण म्हणजेच उत्कृष्ट वाय्याचा नमुना मानून त्या लेखकांची इतरांशी तुलना करून त्यांना श्रेष्ठ – कनिष्ठ ठरविणे हे सुद्धा चुकीचे आहे.

११) मराठी साहित्यक्षेत्रात अनेकदा लेखकांची गटबाजी आपणास दिसून येते. त्याच्यातूनच पुरस्कार देणाऱ्या संस्थांचे व लेखकांचे हितसंबंधही आता लपून राहिलेले नाही. पुरस्कार निवडीचे निकष कोणते असतात? हेही कळत नाहीत. अर्थात काही संस्था अपवाद आहेत.याचाही परिणाम वाय्य इतिहास लेखनावर होत असतो.

१२) वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन करताना अनेक ग्रंथकार, साहित्यप्रवाह ,संप्रदाय व प्रदेश अपरिचित राहिलेले आहेत. साहित्याकडे बघण्याची दृष्टी, लेखकाकडे बघण्याची दृष्टी ही कशी आहे? याच्यावरही इतिहास लेखन अवलंबून असते. त्यामुळे अनेक महत्त्वाचे लेखक हे दुय्यम व दुर्लक्षित झालेले आहेत.

मराठी वाङ्मय इतिहास लेखन काही निरीक्षणे :-

१) मध्ययुगीन साहित्याच्या बाबतीत असे म्हणता येते की त्यावेळेस छपाईची सोय नसल्यामुळे अनेक ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध होत होते. त्यातही पाठभेद आढळले. त्यावेळी तेथील वाङ्मयीन परंपरा कोणत्या होत्या? त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

२) मध्ययुगीन कालखंडात अनेक पोथ्यांचा प्रवास एका मठातून दुसऱ्या मठात किंवा महाराष्ट्राच्या बाहेरही झाल्याचे दिसून येते. मग तेथील वाङ्मयीन अभ्यासाची परंपरा कोणती होती? व तेथे तो अभ्यास का केला जात होता? याचाही इतिहास लेखनात विचार व्हावा.

३) धर्मसंस्थेने, जातसंस्थेने प्रभावित झालेल्या समाजात वाङ्मयाचा अभ्यास

करण्यासाठी व त्याच्या इतिहास लेखनासाठी विवेकवादी दृष्टिकोनाची गरज आहे. सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा शोध कोपर्निकसने लावला. त्याचा हा शोध बायबलविरोधी असल्याचे धर्म मार्तंडांनी सांगून त्याचा छळ केला. कारण बायबलमध्ये पृथ्वी स्थिर असून सूर्य फिरतो असा उल्लेख आहे. परंतु मराठी साहित्यामध्ये त्यापूर्वीच संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये सूर्याचे भ्रमण हा भास आहे हे वैज्ञानिक सत्य मांडले होते.

३९: उदय अस्ताचे प्रमाणे । जैसे न चालता सूर्याचे चालणे ।
तैसे निष्कर्म्यत्व जाणे। कर्माची असता।'

या दृष्टिकोनातून सुद्धा नव्याने संतसाहित्याचा अभ्यास करून त्याचे इतिहास लेखन होणे गरजेचे आहे. वाययाच्या इतिहासाचे लेखन करणे ही तशी सोपी गोष्ट नाही. ती अभ्यासपूर्ण अशी बाब आहे. 'केवळ तथ्यांचा शोध घेणे, त्यांचे गणन-वर्गीकरण करणे याने वाययेतिहासकाराचे आव्हान संपुष्टात येत नाही. शोध, मांडणी इत्यादी पूर्ण झाल्यावर त्या तथ्यांची स्वमनात पूर्वनिश्चित केलेल्या एखाद्या सूत्राच्या आधारे किंवा एखाद्या दृष्टिकोनातून संगती- विसंगती तपासून व्यवस्था लावणे, हे वाययेतिहासकाराचे खरे कार्य असते.' ६ या अर्थाने वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन करणे हे कष्टसाध्य, प्रयत्नपूर्वक सातत्याने करावयाचे कार्य आहे.

**निष्कर्ष :-**

१) मराठी वाङ्मयनिर्मिती व मराठी वायय इतिहास लेखनाच्या दृष्टीने एकोणीसावे शतक महत्त्वाचे आहे.

२) साहित्याचा अभ्यास करत असताना नवता, प्राचीनता व आधुनिकता ही तत्वे लक्षात घ्यावी लागतात.

३) वाङ्मयावर प्रभाव पाडणारे नवविचार, परिवर्तनवादी विचार, समकालीन घटना यांचेही महत्त्व समजावून घ्यावे लागते.

४) वाङ्मय इतिहास लेखन करताना सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व अन्य घटनांचा तसेच अन्य क्षेत्रांचाही अभ्यास आवश्यक आहे.

५) वाङ्मय इतिहास लेखन ही आव्हानात्मक व अभ्यासपूर्ण अशी बाब आहे.

६) वाङ्मय इतिहास लेखन हे वायर्यीन विद्वत्तेचे अत्यंत महत्त्वाचे परिक्षेत्र आहे.

७) वाङ्मय हे कधीही इतिहासजमा व कालबाह्य होत नाही. म्हणून ते अक्षरवायय असते.

**समारोप :-** मानवी जीवन अर्थातच समाज जीवन हे परिवर्तनीय असते. साहित्याची निर्मिती ही त्या त्या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व अन्य घटनांच्या परिणामातून होत असते. त्या त्या काळात झालेल्या विविध



स्थित्यंतरामुळे समाजजीवनावर त्याचा परिणाम होतो. उदाहरणार्थ एकोणिसाव्या शतकात शिक्षणाचा झालेला प्रसार, आधुनिक मूल्यांचा झालेला स्वीकार, समाजसुधारकांचे कार्य, मुद्रण कला यामुळे वैचारिक जागृती होण्यास मोठी मदत झाली. ज्ञानार्जन व ज्ञानप्रसार याला महत्त्व प्राप्त झाले व त्यामुळे मराठी वाङ्मयाच्या इतिहास लेखनास एक गती प्राप्त झाली. वाङ्मयइतिहास लेखन करत असताना अभ्यासकांनी पूर्व इतिहास लेखनाचेही अवलोकन करून, नव्याने संशोधन करून पुनर्मांडणी करण्याची आज आवश्यकता आहे.

**संदर्भ टिपा :-**

१. मराठी विश्वकोश खंड दोन, 'प्रमुख संपादक- तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक-महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ.,१९७६,पृ.५०.

२. तत्रैव,पृ.५०.

३.डॉ.यशवंत मनोहर, 'समाज आणि साहित्य - समीक्षा',सुगावा प्रकाशन,पुणे, प्र. आ.,१९९२, पृ.१०.

४.डॉ.दु.का.संत, 'वाङ्मयीन विद्वत्ता', पुणे विद्यापीठ प्रकाशन,पुणे, प्र.आ.,१९७६, पृ.३३.

५. तत्रैव, पृ.३४.

६. संपा.डॉ.दत्तात्रेय पुंडे, 'प्रस्तावना, वाङ्मयेतिहासाची संकल्पना',प्रतिमा प्रकाशन, पुणे, सुधारित.तृ.आ.,२००५, पृ.१३.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष बारावे : अंक पस्तीसावा । जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२३

## भारत आणि मॉरिशस आंतरसांस्कृतिक संबंध विशेषांक भाग-१



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आणि देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज, चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्र - 'मराठीचे अध्यापन आणि संशोधन', दि. २७ ऑगस्ट २०२३



चर्चासत्राचे उद्घाटन करताना
मा. बाबासाहेब पवारसो आणि मान्यवर



चर्चासत्राचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत करताना मा.प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील



चर्चासत्राचे बीजभाषक डॉ. सुशीला ओडेयर व इतर मान्यवरांचे स्वागत करताना मा. प्राचार्य एस. आर. पाटील



शिविमची भूमिका मांडताना
शिविमचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) प्रकाश दुकळे



उद्घाटन सत्रातील अध्यक्षीय भाषण करताना
शिक्षण संस्थेचे सचिव मा.बाबासाहेब पवारसो



चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात मान्यवरांचे आभार मानताना समन्वयक प्रा.(डॉ.) मंतेश हिरे


शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष बारावे : अंक पस्तीसावा

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२३


## भारत आणि मॉरिशस आंतरसांस्कृतिक संबंध

### विशेषांक - भाग १


• संपादक •

नंदकुमार मोरे

• अतिथी संपादक •

प्रकाश दुकळे । भरत जाधव । मंतेश हिरेमठ

• संपादक मंडळ •

जयवंत दळवी । देवानंद सोनटक्के । सुभाष पाटील । बळवंत मगदूम

• प्रकाशक •

भरत जाधव

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,

ता. जि. सातारा ४१५५१९

• मुद्रक •

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर.

फोन नं.: ०२३१-२६५४३२९

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,ता. जि. सातारा ४१५५१९येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय...

महात्मा गांधी इन्स्टिट्यूट, (मोका) मॉरिशस येथे दिनांक २३ व २४ नोव्हेंबर २०२३ रोजी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आणि आर्ट्स, कॉमर्स कॉलेज, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारत – मॉरिशस आंतरसांस्कृतिक आणि राजनैतिक संबंध : कला, साहित्य आणि संस्कृती यावरील प्रभाव' या विषयावर आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय चर्चासत्र आयोजित केले होते.

जगामध्ये अनेक प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. यातील विविध भाषांचा, साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. एका राष्ट्राच्या नागरिकाच्या भावना दुसऱ्या राष्ट्रातील नागरिकांच्या हृदयाला जाऊन भिडतात. देशातील सभ्यता, विचार, देवाण-घेवाण सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार होतो. आपला ज्ञानव्यवहार आणि वाङ्मयीन जाणीव समृद्ध होण्यासाठी बहुभाषिक असणे गरजेचे आहे; परंतु अनेक कारणांमुळे त्याला मर्यादा पडते. जग आता ग्लोबल खेडे बनत चालले आहे. या दृष्टीने छोटा हिंदुस्तान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मॉरिशस या देशाची सामाजिक, संस्कृती, राजकीय, आर्थिक, कृषि, साहित्यक्षेत्रातील वाटचाल जाणून घेण्यासाठी आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वश्रेष्ठ व सर्वाहून अधिक जुनी संस्कृती आहे, असे समजले जाते. जगातील कोणत्याही कोपऱ्यात जेथे जेथे भारतीय लोक आहेत, तेथे भारतीय संस्कृतीचे निशाण मोठ्या जोमाने फडकत आहे. भारतापासून सुमारे पाच हजार मैल दूर असलेला मॉरिशस म्हणून एक लहानसा देश आहे, जेथे भारतीय संस्कृतीने आपल्या तेजोमय ज्योतीने त्या देशाला इतके प्रकाशमान केले आहे की, आज त्याला प्रेमाने 'छोटा हिंदुस्थान' अशी उपमा देऊन त्याचे कौतुक केले जाते. त्या निर्जन देशात भारतीय संस्कृती कशी पोहोचली व फ्रेंच आणि इंग्रजांच्या अत्याचारापासून कशी सुटका झाली? त्यामागे असलेल्या इतिहासाचा अभ्यास करणे. त्याचबरोबर या सर्वांचा संस्कृतीवर पडलेल्या प्रभावाचा शोध घेणे, मॉरिशस या देशाची सामाजिक परिस्थिती, भाषिक स्थिती जाणून घेणे आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून भाषेचा अभ्यास करणे. त्याचबरोबर मॉरिशसमधील साहित्यक्षेत्रातील वाटचाल जाणून घेणे, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि पर्यावरण व त्याचा साहित्यावर पडलेला प्रभाव याचा अभ्यास भारतीय साहित्याच्या परिप्रेक्ष्यात करणे या उद्देशाने सदर चर्चासत्र आयोजन करण्यात आले होते. तेथे विचारांची देवाणघेवाण करण्यात आली. अनेक विद्वत्तापूर्ण शोधनिबंध सादर करण्यात आले. तौलनिक साहित्याभ्यास आणि संस्कृती अभ्यासामध्ये अशा प्रकारचे अभ्यासपूर्ण शोधनिबंध महत्त्वाचे ठरतील, यात शंका नाही. विविध विषयांवर अभ्यासकांनी लिहिलेले शोधनिबंध हे उल्लेखनीय स्वरूपाचे आहेत. ते निबंध या अंकामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. त्याचे स्वागत वाचक करतील, अशी आम्हास आशा आहे.

– संपादक



ISSN No. 2319-6025

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | मॉरिशस, शेतमजूर आणि महात्मा गांधी : प्राचार्य डॉ. संजय पाटील | ०४ |
| २. | महात्मा गांधीजींचे वर्धा शिक्षण योजनेतील योगदान : डॉ. राजश्री निकम | १४ |
| ३. | गांधीविचार : प्रभाव आणि सद्यस्थिती : डॉ. विजयश्री गवळी | १८ |
| ४. | मॉरिशसमधील मराठी भाषिक संघाचे मराठी भाषेच्या वृद्धीसाठीचे कार्य : डॉ. लक्ष्मण शिंदे | २४ |
| ५. | विपश्यना आणि मॉरिशस : प्राचार्य डॉ. अशोक दौंड | ३१ |
| ६. | संत तुकारामांचा अभंग व गांधीजींच्या तीन माकडांची कथा : प्रा. (डॉ.) सुभाष आहेर | ३४ |
| ७. | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील पर्यावरणाची विविध रूपे : प्रा. विपिन वैराट | ३९ |
| ८. | निराला के काव्य में प्रकृति चित्रण : डॉ. लक्ष्मी झमन | ४६ |
| ९. | मॉरिशस में हस्तलिखित 'दुर्गा पत्रिका' (१९३५) के सामाजिक सांस्कृतिक पहलू : डॉ. अलका धनपत | ५२ |
| १०. | वैश्विकरण के परिप्रेक्ष्य में हिंदी उपन्यास : प्रा. (डॉ.) संजय चिंदगे | ५८ |
| ११. | मॉरिशस में बसता है मिनी भारत! : डॉ. चंदा सोनकर | ६४ |
| 12. | Equivalence of Festivals in India and Mauritius With Special Reference to Maha Shivratri, Ganesh Festival and Dipawali : Prof. Dr. Savita Vhatkar | 69 |
| 13. | A Socio Cultural Study of India and Mauritius : Dr. Hemangini Mane | 75 |
| 14. | Interpreting Gandhi's Ideal Polity in Hind Swaraj : Dr. Ankush Belwatkar | 79 |
| 15. | Foursite of Mahatma Gandhi in Bringing Women in India's freedom struggle : Dr. Sunanda Shelke | 85 |
| 16. | Indo-Mauritian Cast System Reflection in Nagaraj Manjule's Sairat : Dr. Mangal Londhe | 91 |
| 17. | Sinking Borders Expanding Identities Intercultural Narratives from Mauritius : Mrs. Vedika Hurdoyal | 95 |
| 18. | A Study of Mahatma Gandhi's Autobiography: My Experiments with Truth : Dr. Neeta Jokhe | 101 |
| 19. | A comparative Analysis of Indian Stock Market With Mauritius Stock Market : Dr. RajeshKumar Chetiwal | 105 |
| 20. | Bridging Continents: Comparative Insights Into Indo-Mauritian Dalit Literary Discourse Mr. Mansing Vitthal Thombare | 111 |
| २१. | राज्यस्तरीय चर्चासत्राचा अहवाल | ११६ |

ISSN No. 2319-6025

# संत तुकारामांचा अभंग व गांधीजींच्या तीन माकडांची कथा

डॉ. सुभाष दिनकर आहेर

उद्देश

१) संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करणे.

२) संत तुकारामांच्या अभंगांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्व अभ्यासणे.

३) संत तुकारामांचा अभंग व गांधीजींच्या तीन माकडांची कथा यांचा अनुबंध अभ्यासणे.

४) संत तुकारामांचा अभंग व गांधीजींच्या विचारातील मानवतेचे मूल्य अभ्यासणे.

**संशोधन पद्धती** – समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती, तुलनात्मक संशोधन पद्धती, भाषिक संशोधन पद्धती.

**संत तुकारामांचे संतपरंपरेतील स्थान**

महाराष्ट्र भूमी ही संतभूमी म्हणून ओळखली जाते. संतांच्या साहित्यातून मानवतेचा व विश्वात्मकतेचा नेहमीच पुरस्कार केलेला आहे. समाजातील विसंगतीवर प्रकाश टाकून समाजाला सन्मार्गावर आणण्याचे महत्कार्य संतांनी केले. संतांच्या वाङ्मयाची निर्मिती भक्ती, ज्ञान, वैराग्य, समाजप्रबोधन व नीतीची शिकवण या अनेक हेतूने झालेली आहे. मराठी साहित्य व संस्कृतीला संतसहित्याचा वारसा लाभलेला आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' ही उक्ती यथार्थ आहे. संत तुकारामांचे पूर्णनाव तुकाराम बोल्होबा आंबिले. तुकोबांचे अभंग महाराष्ट्रातील अनेकांच्या अंत:करणात स्थिरावलेले आहेत. संत तुकारामांचे अभंग हे महाराष्ट्रातील अमूल्य असे वैचारिक धन आहे. तुकारामांचे अभंग व त्यांचे लौकिक जीवन अलग करता येत नाही. त्यांच्या प्रत्येक अभंगातून त्यांचा जीवनविषयक विचार व दृष्टिकोन व्यक्त होतो. जीवन जगताना सामान्य माणसाला येणारे सगळे अनुभव त्यांनी अनुभवले, जनजीवन न्याहाळले व त्या अनुभवांची मांडणी अभंगाद्वारे केली.लोकांच्या भाषेत बोलणारा संतकवी म्हणून संत तुकारामांची ओळख आहे. ''मराठी सारस्वतात तुकोबांच्या अभंगवाणीचे स्थान सर्वात वरती असून, ती सामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडलेली आहे.''[१] संत तुकारामांच्या अभंगातून जीवनमूल्यावर भाष्य केलेले आहे, 'बुडती हे जन न देखवे डोळा, म्हणूनिया येतो कळवळा' या आर्तभावनेतून जीवनमूल्यांचा उद्घोष करणारा एक महाकवी म्हणून संत तुकारामांचा उल्लेख मला करावासा वाटतो. महाराष्ट्राला सामाजिक नीतिमूल्यांची व आधुनिक जीवनमूल्यांची खऱ्या अर्थाने परखडपणे स्पष्ट शब्दात शिकवण देणारे लोकशिक्षक म्हणून संतपरंपरेत त्यांचे स्थान सर्वोच्च असे आहे. महाराष्ट्राच्या भागवत धर्माच्या मंदिराचा कळस म्हणून संत तुकारामांचा उल्लेख केला जातो. तुकाराम हे प्राचीन मराठी साहित्यातील जवळजवळ अखेरचे प्रमुख वारकरी संत. त्यांची कविता म्हणजे संतसाहित्याचा कळसाध्यायच म्हटला पाहिजे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांच्या सांस्कृतिक कार्याचा वीणा त्यांनी खांद्यावर घेतला. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने तर तुकारामांचे कार्य फार मोलाचे आहे. वंशपरंपरेने चालत आलेली विठ्ठलभक्तीची मिरास त्यांनी वाढवली. स्त्री-शूद्रांपर्यंत पोचविली. नाममहिम्याने मोक्षाची पायवाट सोपी केली. आषाढी, कार्तिकी पंढरीची वारी करणाऱ्या भागवतांचा अभिमान वाहिला.''[२]

**महात्मा गांधी यांच्या तीन माकडांची कथा – वैचारिक अनुबंध**

महात्मा गांधी यांच्या तीन माकडांची कथा आपणास माहीत आहे. वाईट पाहू नये, वाईट ऐकू नये आणि वाईट बोलू नये या विचारांशी संबंधित ही तीन माकडांची कथा परिचित आहे. परंतु वरील प्रकारचा संदेश हा संत तुकारामांच्या एका अभंगातही आपणास दिसून येतो. त्याचबरोबर महात्मा बसवेश्वर यांच्याही वचनात वरील संदेश दिसतो. बौद्ध धर्मामध्येही गौतम बुद्धांच्या विचारातही हा संदेश आपणास दिसतो. बौद्ध धर्मातील अनेक शिल्पांमध्ये तीन माकडांच्या प्रतिमा दिसतात. विशेषत: जपानमध्ये अशी शिल्पे आहेत. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व महात्मा गांधी यांचे अद्वैताचे नाते होते. महात्मा गांधी यांनी पुणे येथील येरवडा कारागृहातील १४ दिवसांच्या कालावधीत तुकोबांचे १६ अभंग हे इंग्रजीत अनुवादित केलेले आहेत. तो कालावधी १५ ते २८ ऑक्टोबर १९३० असा होता. गांधीजींच्या प्रार्थनेत तुकोबांच्या अभंगांचा समावेश होता. एकंदरीत संत तुकारामांच्या अभंगांचा मोठा प्रभाव महात्मा गांधी यांच्या विचारावर आपणास दिसून येतो. 'श्री संत तुकारामांची राष्ट्रगाथा' या १९४५ मध्ये प्रकाशित ग्रंथास स्वत: गांधीजींनीच प्रस्तावना लिहिली. या प्रस्तावनेत 'तुकाराम मुझे बहुत प्रिय आहे' असे त्यांनी नमूद केले. तुकोबांच्या अभंगातून व्यक्त झालेल्या वैश्विकतेच्या विचारांनी बापू भारावून गेले. तुकोबांचा विचार गांधी साक्षात जगले.'[३] वाईट पाहू नका, वाईट ऐकू नका आणि वाईट बोलू नका, असा संदेश देणारी माकडे गांधीजींची म्हणून प्रसिद्ध झाली. मात्र ही माकडे गांधी यांच्याकडे तुकोबांच्या अभंगातून आलेली आहेत. गांधीजींनी अनुवादित केलेल्या १६ अभंगांच्या क्रमवारीत हा अभंग दुसऱ्या क्रमांकावर



ISSN No. 2319-6025 

आहे. कदाचित संत तुकारामांकडे हा विचार बसवेश्वरांच्या वचनाद्वारे वैचारिक वारसा म्हणून मौखिक परंपरेने चालत आलेला असावा. कारण तीन माकडांचे रूपक म्हणून व्यक्त झालेला आशय मांडताना महात्मा बसवण्णा आपले आराध्य दैवत कुडलसंगम देवाला विनंती करताना म्हणतात,

'इकडे तिकडे जाऊ नये यासाठी पांगळा कर देवा,
वळून वळून पाहू नये यासाठी आंधळा कर देवा,
दुसरे काही ऐकू नये यासाठी बहिरा कर देवा,
तुमच्या शरणांच्या चरणांनाव्यतिरिक्त
अन्य कोणत्याही विषयापासून दूर ठेवा
कुंडलसंगम देवा'

तुकोबारायांप्रमाणेच महात्मा गांधी यांना बसवण्णांची ओळख होती. त्यांच्याही विचारांचा प्रभाव महात्मा गांधींवर होता. त्यांच्यासाठी खास हिंदी पुस्तक मंजप्पा हर्डेकर यांनी लिहिलेले होते. मंजप्पा यांना कर्नाटकचे गांधी असे म्हणतात.

त्याच्याहीपूर्वी या तीन माकडांची कथा व शिल्प जपानी संस्कृतीशी जोडले गेलेले आहे. जपानमध्ये आढळणारे कोशीन म्हणजे अशी तीन वानरांचे शिल्प आहेत. 'डोळे, तोंड आणि कान झाकून घेणारी तीन माकडे ही काशीन विश्वासाची सर्वात चांगली प्रतीक आहेत. जपानी भाषेत मिझारू म्हणजे दोन्ही हाताने डोळे बंद असणारे माकड, इवाजारू म्हणजे दोन्ही हाताने तोंड बंद असणारे माकड आणि किकझारू म्हणजे दोन्ही हाताने कान बंद असणारे माकड असा अर्थ आहे. असे मानले जाते की, जपानमध्ये अजूनही हजारपेक्षा जास्त कोशीन-टू दगड सापडतील. डोळे, तोंड आणि कान झाकून घेणारी तीन माकडे काशीन विश्वासाची सर्वात चांगली प्रतीक आहेत.'[४] एका चिनी प्रतिनिधी मंडळाने तीन माकडांचा एक संच गांधींना भेट दिला. गांधीजींना हा संच फार आवडला. त्यांनी तो कायम जवळ ठेवला. त्यामुळे ती माकडे बापूंची म्हणून प्रसिद्ध झाली. परंतु या तीन माकडांची कथा, त्यातील संदेश हा चिनी दार्शनिक कन्फ्युजियस यांच्या विचाराशी संबंधित आहे, असेही म्हटले जाते.

**संत तुकारामांचा अभंग व महात्मा गांधींची तीन माकडांची कथा**

महात्मा गांधीजी येरवडा तुरुंगात असताना त्यांनी तुकारामांच्या सोळा अभंगांचा अनुवाद इंग्रजी भाषेत केला होता. त्यातील पुढील अभंगाचा त्यादृष्टीने विचार महत्त्वाचा वाटतो. आधुनिक जीवनमूल्यांचा सहसंबंध या अभंगाशी आहे. महात्मा गांधींच्या तीन माकडांची कथा आपणास माहीतच आहे. 'बुरा देखो मत, बुरा सुनो मत, बुरा बोलो मत' याचा अन्वयार्थ संत तुकारामांच्या अभंगाशी आहे.

पापाची वासना नको दावू डोळा । त्याहूनि आंधळा बराच मी ।।१।।
निंदेचे श्रवण नको माझे कानी । बधिर करोनि ठेवी देवा ।।२।।
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याहूनी मुका बराच मी ।।३।।
नको मज कधी परस्त्रीसंगती । जनांतून माती उठता भली ।।४।।
तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा । तू एक गोपाळा आवडसी ।।५।।

वरील अभंगातून आदर्श जीवनपद्धतीचा वस्तुपाठ दिला आहे. यातील विचार आधुनिक व नित्यनूतन आहेत. आजच्या काळातही संत तुकारामांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. ते कधीही कालबाह्य होऊ शकत नाहीत. त्याचा इंग्रजी अनुवाद पुढीलप्रमाणे–

O God Let me not be witness to desire for sin
better make me blind
Let me not hear ill of anyone
better make me deaf
let not a sinful escape my lips
better me dumb
let me not lust after another's life
better that I disappear from this earth
Tuka says, I am tired of everything wordly
Thee alone, I like Gopal

वरील अभंगातून उच्च जीवनमूल्यांचे दर्शन तुकोबांनी घडविले आहे. लोकांनी चांगले जीवन जगावे, चांगल्या जीवनमूल्यांची कास धरावी, अंधश्रद्धा व भोंदूगिरी यापासून दूर राहून कार्यकारणभाव जाणून घ्यावा अशी कळकळीची तळमळ व्यक्त करणारा पहिला विवेकवादी व विज्ञानवादी संत म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करावा लागेल. आदर्श जीवनमूल्यांची पखरण सोप्या शब्दात संत तुकारामांनी अभंगाद्वारे केलेली आहे.

**समारोप**

'ज्याच्या मुखी तुकारामांची वाणी, कमतरता नाही तयाच्या जीवनी'. संत तुकारामांचे विचार आचरणात आणून त्यांच्या अभंगातील जीवनमूल्ये जोपासली पाहिजेत. संत तुकारामांना 'जगद्गुरू संतश्रेष्ठ' म्हटले जाते. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या मते, 'तुकोबांची वाणी हे महाराष्ट्राचे अमूल्य असे वैचारिक धन आहे.' हे धन जपले पाहिजे. भारतीय तसेच जागतिक लोकसाहित्याचा अभ्यास करताना अनेक लोककथा, बोधकथा या मौखिक परंपरेनेही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येत

असतात. त्यातूनच कलाकृतींचाही जन्म होतो तशीच काही बाब या तीन माकडांच्या कथेबाबत सांगता येईल. मौखिक परंपरेने समृद्ध असणारा हा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येतो, तशाच पद्धतीने ही कथा आपल्यापर्यंत आलेली आहे. परंतु महात्मा गांधीजींनी संत तुकारामांच्या अभंगाचा केलेला अनुवाद आणि तीन माकडांची कथा याचा अनुबंध आपण लक्षात घेतला तर महात्मा गांधीर्जींच्या या तीन माकडांची कथा ही तुकारामांच्या अभंगातच स्पष्टपणे दिसते आणि अलीकडील संदर्भ लक्षात घेता महात्मा गांधीजींनी ही तीन माकडांची संकल्पना तुकोबांच्या अभंगाचा अनुवाद करताना घेतलेली दिसते.

संदर्भ


१. ल. रा नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी व संस्कारित आवृत्ती, २००६, पृ. १५१.

२. तत्रैव, नसिराबादकर, पृ. १५८.

३. https://divyamarathi.bhaskar.com/opinion/news/mahatma-gandhi-and-the-three-monkeys-article-by-channawir-bhadreshar-130451922.html

४. https://inmarathi.com/81289/origin-of-gandhijis-three-wise-monkeys/


●●

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक ७ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)

- शके १९४५
- वर्ष : ९१
- पुरवणी अंक : ७

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्रा. डॉ. केशव पवार
- प्रा. डॉ. सुभाष वाघमारे
- प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with ACE Scanner

19. **Calvinism : A Literary Peace Attempt in the Novels of Marilynne Robinson**

- Dr. Abhay M. Patil ---------- 87

20. **Exploration of Psychoanalytical Elements in the selected Novels of Sarah Dessen**

- Dr. Gurudatta S. Mhangore & Smt. Anita Madhav Bhosale ---------- 94

21. **Background of Japan in Teruo**

- Dr. Sonali Rahul Pawar ---------- 100

22. **Conclect Between A Father and A Son in Chinuaachebe's Marriage Is A Private Affair**

- Prof. Deepak Bhagat ---------- 104

23. **Temporal Dystopia and Technological Speculation in Gregory Benford's 'Furious Gulf': A Literary Exploration**

- Gund Nitin Prabhakar & Dr. Sanjay Baliram Karande ---------- 107

24. **Sexual Dysfunction, Past Trauma and Broken elationships: A Study of Saadat Hasan Manto's 'Colder than Ice'**

- Dr. Satish Govind Saykar ---------- 110

25. **English literature through ages: Renaissance, Victorian, Modern & Post Modern: A reflection of Contemporary Society**

- Dr Prachi Sinha ---------- 114

26. **The Study ofThe Hungry Tide from the Perspective of Ecocriticism**

- Shaikh Shaphik Kasam ---------- 118



Scanned with ACE Scanner

# BACKGROUND OF JAPAN IN *TERUO*

**Dr. Sonali Rahul Pawar**
Assistant Professor in English,
Shripatrao Kadam Mahavidyalaya,
Shirwal MS

**ABSTRACT :**

Gauri Deshpande is a renowned bilingual writer, writing in both Marathi and English. She is the granddaughter of Maharshi Karve, the great social reformer. She also writes to bring reforms in the life of women. She has written in all 12 Marathi novellas as Teruo, Kahi Durparyant, Ekek Pan Galawaya and so on.

The story of Gauri Deshpande's novella *Teruo* takes place during one and a half year. Diary, memories and letters record the time from December month of one year to the next December and further up to June. The setting is Japan who suffers during the Second World War bomb attack, who once again develops itself with discipline, hard work and industrialization, but is losing its own spontaneous, natural humanity. Japan becomes the representative of the world that thinks that technological development is the progress. (Panchdhara 82)

***Teruo*** is an extraordinary novella written in very compact and exact words, sentences and paragraphs. It does not become one-sided love story because of its various layers nor does it gain a flat, boring, common form of fantasy. In contrast it metaphorically presents a new mentality of an attempt to live splendidly avoiding all agonies and ugliness of life. This novella tries to make the life grand with the feeling of love which is covered with the helplessness of death fear. The protagonist of ***Teruo*** is a lively, enthusiastic, sensitive, thoughtful, loving and intellectual woman. She has a sense of humour and enriches our sensitivity. The mingling of three layers, lively and minute descriptions of Japanese life, the skill of the writer to keep the ambiguity in between the boundary of fact and fantasy, delicate humour and the lyricism required for a fantasy are the characteristic features of this novella. (***Milun Saryajani***, June 91: 26)

**Key Terms:** Social reformer, Teruo, Japan, Second World War, etc.

Gauri Deshpande is a renowned bilingual writer, writing in both Marathi and English. She is the granddaughter of Maharshi Karve, the great social reformer. She also writes to bring reforms in the life of women. She has written in all 12 Marathi novellas as Teruo, Kahi Durparyant, Ekek Pan Galawaya and so on.

The story of ***Teruo*** takes place during one and a half year. Diary, memories and letters record the time from December month of one year to the next December and further up to June. The setting is Japan who suffers during the Second World War bomb attack, who once again develops itself with discipline, hard work and industrialization, but is losing its own spontaneous, natural humanity. Japan becomes the representative of the world that thinks that technological development is the progress. (Panchdhara 82)

The protagonist of ***Teruo*** has passed forty. The real characters here are only four - the lady protagonist, Teruo, Jee and Janak. Amongst them, Janak is a modern life partner of the protagonist. Ten years have passed to their marriage. But they both love each other



Scanned with ACE Scanner

ISSN No. 2394-5990

Hiroshima. The experience of love with Teruo is the attempt of the protagonist to live with all physical and psychological intensities. Awareness and fear of death, struggle to escape from it and the intense love for life are interlinked to each other. So Teruo is the celebration of life, living on the level of imagination and Good bye, farewell to Teruo is inevitable farewell to life. (***Milun Saryajani***, June 91 : 25)

***Teruo*** is an extraordinary novella written in very compact and exact words, sentences and paragraphs. It does not become one-sided love story because of its various layers nor does it gain a flat, boring, common form of fantasy. In contrast it metaphorically presents a new mentality of an attempt to live splendidly avoiding all agonies and ugliness of life. This novella tries to make the life grand with the feeling of love which is covered with the helplessness of death fear. The protagonist of ***Teruo*** is a lively, enthusiastic, sensitive, thoughtful, loving and intellectual woman. She has a sense of humour and enriches our sensitivity. The mingling of three layers, lively and minute descriptions of Japanese life, the skill of the writer to keep the ambiguity in between the boundary of fact and fantasy, delicate humour and the lyricism required for a fantasy are the characteristic features of this novella. (***Milun Saryajani***, June 91: 26)

## REFERENCES


1. Bal, Vidya, ed. *Milun Saryajani*. June 91. Print.
2. Beauvoir, Simone de. *The Second Sex*. ed. and trans.. H. M. Parshley. New York: Modern Library, 1968. Print.
3. Deshpande, Gauri. *Teruo ani Kaahi Durparyant*. Mumbai: Mauz, 1985. Print.
4. Panchdhara , October 1993. March 1994


■■■



Scanned with ACE Scanner

गीर्वाणज्योति प्रकाशन

# साठवणी

कवयित्री डॉ. सोनाली मिलारे - पवार



या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।

Scanned with ACE Scanner

## साठवणी

==================================

कवयित्री : डॉ. सोनाली मिलारे - पवार

ISBN : 978-93-92319-35-8

आवृत्ति : प्रथम आवृत्ती

प्रकाशनदिनांक : १५ ऑक्टोबर २०२३, अश्विन-शु.१; घटस्थापना; शके १९४५

प्रकाशिका : सौ. सुमित्रा जाधव

गीर्वाणज्योति प्रकाशन

सातारा शाखा :

कारंजकर नगर, पारशी विहिरीजवळ, विलासपूर, सातारा, ४१५००१

पुणे शाखा :

एच.१०३, भास्करा सोसायटी, डीसके विश्व, धायरी, पोस्ट नांदेड, पुणे, ४११६८

मुंबई शाखा :

४/४७, उदय को-हौ. सोसायटी, आरे रोड, गोरेगांव (प.), मुंबई, ४००१०४

संपर्क : Mobile: +919822097507

Email : geerwanajyotipublication@gmail.com

Website : www.geerwanjyoti.in

© All rights of eBook reserved by Publisher.

No part of this book may be reproduced, or stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording, or otherwise, without express written permission of the publisher.

Scanned with ACE Scanner

A Research Paper

On

# Hellenism in John Keats Literary Works – A Brief Analysis

Presented by

Dr. Fulchand Sugriv Shirsat

Associate Prof., of English

Rayat Shikshan Sanstha's

Shripatrao Kadam Mahavidyalaya, Shirwal, Satara (MS)

Submitted to

One-Day International Seminar

on

Contribution of Languages, Literature and Culture for World Peace Progress

(held on Thursday 26th October, 2023)

Organized by

Rayat Shikshan Sanstha's

Chhatrapati Shivaji College, Satara (Autonomous)

A Constituent College of Karmaveer Bhaurao Patil University, Satara (MS)

2023-2024

## Introduction

This research paper introduces Hellenism, a literary term that is reflected in John Keats's literary work, especially in his ode, ballad, and poem. Hence, the researcher refers to John Keats's selected ode, ballad, and poem in this research paper. Here, the researcher has selected literary works like 'Ode on a Grecian Urn', 'Ode to Psyche', 'La Bella Dam Sans Merci', and 'To Chapman's Homer' for the research perspective. In the said literary work John Keats exposes the concept of Hellenism a term of Art in literature, which effectively is the core aim of this research paper.

## John Keats (1795 to 1821) – A Brief Introduction

A continuous and gradual rise is seen in the figures of HDI since the year 1990 till 2022. The value of HDI in 1990 was 0.434 which increased substantially by 48% to 0.644. During the entire period the minimum value of HDI was 0.434 and the maximum value was 0.644. It shows that right from 1990, there was continuous increase and there was no fall in the value of HDI in-between. The average value of HDI during the period comes to 0.54 which ranges the country in medium development category even during the entire period. The standard deviation from mean of HDI value comes to be 0.072 showing very little deviation of HDI values from its mean value. Considering the various components of HDI, the value of life expectancy in 1990 was 58.652 which increased by 15.50% to 67.744. During the entire period its minimum value was 58.652 and the maximum value was 70.91 showing ups and downs in its value during the entire period. Its average value during the period comes to 65.08, standard deviation from mean comes to be 3.83 showing relatively high deviation of values from its mean value. The value of expected years of schooling in 1990 was 8.017 which increased substantially by 56.97% to 12.584. During the entire period its minimum value was 8.017 and the maximum value was 12.584. It shows that right from 1990, there was continuous increase and there was no fall in its value in-between. Its average value during the period comes to 9.852 and the standard deviation from mean value comes to be 1.62 showing relatively lesser deviation of its values from its mean value. The value of mean years of schooling in 1990 was 2.782 which increased very drastically by 136.19% to 6.571. During the entire period its minimum value was 2.782 and the maximum value was 6.571 showing a continuous increase in its values from 1990. Its average value during the period comes to 4.691 and its value of standard deviation from mean comes to be 1.159 showing relatively lesser deviation from its mean value. The value of GNI in 1990 was 1795.94 which increased hugely by 287% to 6950.53. During the entire period its minimum value was 1773.798 and the maximum value was 6950.53 showing right from 1990, the highest GNI value to be in the year 2022 with little ups and downs in-between. Its average value

during the period comes to 3771.923 and its value of standard deviation from mean comes to be 1659.066 showing very huge deviation from its mean value.

**Inferential statistics**

Ho1: There is no significant impact of life expectancy on the HDI value

H02: There is no significant impact of expected years of schooling on the HDI value

H03: There is no significant impact of mean years of schooling on the HDI value

H04:There is no significant impact of gross national income on the HDI value

**Model Summary**

| Model | R | R Square | Adjusted R Square | Std. Error of the Estimate |
|---|---|---|---|---|
| 1 | 1.000[a] | 1.000 | 1.000 | .000234 |

a. Predictors: (Constant), GNI index, Life expec, expected yr, mean yr

**ANOVA[a]**

| Model | | Sum of Squares | df | Mean Square | F | Sig. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Regression | .166 | 4 | .042 | 760636.506 | .000[b] |
| | Residual | .000 | 28 | .000 | | |
| | Total | .166 | 32 | | | |

a. Dependent Variable: hdi

b. Predictors: (Constant), GNI index, Life expec, expected yr, mean yr

**Coefficients[a]**

| Model | | Unstandardized Coefficients | | Standardized Coefficients | t | Sig. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | B | Std. Error | Beta | | |
| 1 | (Constant) | -.011 | .002 | | -5.844 | .000 |
| | Life expec | .294 | .003 | .240 | 101.370 | .000 |
| | expected yr | .204 | .002 | .254 | 87.836 | .000 |
| | mean yr | .201 | .006 | .216 | 35.328 | .000 |
| | GNI index | .326 | .009 | .304 | 34.551 | .000 |

a. Dependent Variable: hdi

Above table shows the result of ANOVA. It is found that F-value is 760636.506 and is significant at 5% level of significance. It shows the variation in HDI as explained by independent variables like life expectancy, expected years of school, mean years of schooling and GNI is significant.

The above table shows the value of coefficients i.e. beta value & t-value of each independent variable and its significance.

Since p-values (Sig. column) for all 4 independent variables is less than the significance level (alpha = 0.05), we have enough evidence to reject the null hypotheses (H01, H02, H03 & H04) for all 4 independent variables. So, all 4 variables are statistically significant. Thus all the 4 variables have significant impact on HDI.

**Regression Coefficients:**

From the above summary table, it could be found that the standardized beta (coefficient) value of Life Expectancy in Years is 0.240 while that of Expected Years of Schooling is 0.254. Whereas the beta value of mean years of schooling is 0.216 and that of GNI is 0.304. This indicates that the variable which has highest impact on HDI is Gross National Income having the highest beta value which is followed by expected years of schooling. These 2 variables have larger impact on dependent variable (HDI) as compared to other two variables having comparatively lesser beta values as seen from the table.

**Findings & Conclusions :**

During the entire period the minimum value of HDI was 0.434 and the maximum value was 0.644. It shows that right from 1990, there was continuous increase and there was no fall in the value of HDI in-between. All the components/ indicators of HDI like life expectancy, expected years of schooling mean years of schooling and gross national income have found to have significant impact on the value of HDI. But the component that has been found to have highest impact on the value of HDI is Gross National Income which is followed by expected years of schooling. The indicators like Life expectancy and mean years of schooling are found to have relatively lesser impact. During the entire period from 1990-2022, the rise in the values of life expectancy is just 15.5% as compared to the values of Gross National income showing a rise of 287% and also a huge standard deviation during the period from its mean value contributing to be highest influencer to the value of HDI. India being highly populated country, with the increase in national income of the country, the resources become available to be channelized for various requirements of the citizens in a way helping to enhance their quality of life in terms of life expectancy, schooling, education etc. which contributes to augmenting the demographic dividend of the country also reflected in terms of improved HDI values.

**Suggestions :**

HDI, being the comprehensive value of life expectancy indicating health, expected and mean years of schooling indicating education and gross national income can be improved largely by focusing on providing improved and inclusive health and educational facilities to the citizens which may go a long way in enhancing the values of all the components of HDI apart from gross national income. The focus should be on upgrading the knowledge and skill-sets of the citizens contributing to the increased productive capacity, employment generation and value addition in the country. The education should be applicability oriented meeting the industry requirements. These initiatives may lead to more progressive human capital. The corresponding dimensions relating to the developed economies should be monitored very closely and the standards set and the policies formulated and

implemented there for the health and education may be duly considered in order to bring about improvement in these dimensions. The practices for the qualitative enhancement should be oriented towards sustainable development. Both these two dimensions health and education if knitted qualitatively will definitely contribute to the value chain of the country further augmenting the value of HDI along with gross national income.

**References :**


- https://www.researchgate.net/publication/222651597_The_Human_Development_Index_and_Sustainability-A_constructive_proposal
- https://papers.ssrn.com/sol3/papers. cfm?abstract_id=3560804
- http://hdr.undp.org/en/indicators/137506# https://www.sustainabledevelopmentindex.org/time-series
- https://link.springer.com/article/10.1007%2Fs10888-011-9178-z
- https://core.ac.uk/download/pdf/33897925.pdf
- https://papers.ssrn.com/sol3/papers.cfm?abstract_id=2134923&rec=1&srcabs=1999372&pos=1
- https://papers.ssrn.com/sol3/papers.cfm?abstract_id=1999372
- https://www.semanticscholar.org/paper/HDI-as-a-Measure-of-Human-Development%3A-A-Better-the-Al-Hilani/df7c3db27d3c7c6f3d9da56a5f9edbf58549c74d#paper-header
- https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/S0921800997001687 https://www.researchgate.net/publication/234057638_India's_human_development_Gaps_and_prospects
- https://www.researchgate.net/publication/271546697_Human_Development_Index_-_Measurements_changes_and_evolution
- https://www.researchgate.net/publication/248389729_Human_Development_Indices_Old_and_New


■■■

ISSN No. 2394-5990

# सयाजीराव गायकवाड यांचा समाजसुधारणेचा ऐतिहासिक वारसा

**प्रा.डॉ. धनंजय मोगले**
इतिहास विभाग, वसुंधरा कला महाविद्यालय,
जुळे सोलापूर.९९६०२५५५८८

**प्रस्तावना :**

भारतीय समाजसुधारकांमध्ये सयाजीराव गायकवाड यांचे नाव विशेष अर्थाने घ्यावे लागेल, ते म्हणजे यासाठी कि, सयाजीराव गायकवाड यांनी महाराष्ट्रातील अनेक समाज सुधारकांना मदत करण्याचे व घडविण्याचे मोठे कार्य केले आहे. सयाजीराव खंडेराव गायकवाड यांचे खरे नाव गोपाळराव काशीराव गायकवाड होते. इ.स.१८७५ ते१९३९ या काळात बडोदा संस्थानात ते राजे होते. ते अत्यंत पुरोगामी विचारवंत आणि कुशल संस्थानिक होते. बडोदा संस्थानातील लोकांच्या कल्याणासाठी सामाजिक कार्याला प्राधान्य देण्यासाठी म्हणून त्यांना ओळखले जाते. सयाजीराव यांचे योगदान आधुनिक भारताच्या जडण घडणीत अधिक महत्त्वाचे राहिले आहे. त्यांचा सामाजिक सुधारणेचा ऐतिहासिक वारसा असल्यामुळेच भारतीय समाजाला सामाजिक सुधारणेचे बळ मिळाले.

त्यांची दूरदृष्टी भारतीय समाजाला भरारी देण्याचे कार्य केले आहे. सयाजीरावांना दिवाण सर टी. माधवराव यांनी राज्यकारभार शिकवला. २८ डिसेंबर१८८१ रोजी सयाजीरावांनी गादीवर आल्यानंतर राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना केल्या. राज्यकारभारात प्रशासकीय जबाबदारीच्या विभाजनाचे तत्त्व लागू करून त्यांनी राज्यव्यवस्थेत सुरळीतपणा निर्माण केला, सल्लागार नेमले आणि कल्याणकारी योजना राबवल्या न्यायव्यवस्थेत सुधारणा केली. ग्रामपंचायतींचे पुनरुज्जीवन त्यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना आणली आणि अल्पावधीतच ती राज्यभर लागू केली.

संपूर्ण देशात मोफत आणि सक्तीचे शिक्षण सुरू करणारे बडोदा राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणाची सोय केली. औद्योगिक कला शिक्षणासाठी 'कलाभुवन' ही संस्था स्थापन केली. 'प्रच्य विद्यामंदिर' या संस्थेच्या वतीने त्यांनी प्राचीन संस्कृत ग्रंथांचे संशोधन व प्रकाशनास प्रोत्साहन दिले.

**फिरते ग्रंथालय :**

त्यांनी आपल्या राज्यात गावोगावी ग्रंथालये स्थापन केली. फिरते ग्रंथालय सुध्दा त्यांनीच विकसित केले. या काळात त्यांनी इंग्लंड, अमेरिका आदी देशांना भेटी दिल्या. तेथील शिक्षण व्यवस्था आणि ग्रंथालय पाहून ते प्रभावित झाले. तशाच प्रकारची शिक्षण व्यवस्था आणि ग्रंथालये आपल्या देशात निर्माण झाली पाहिजेत. याबाबत त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी बोर्डन या ग्रंथपालाला भारतात बोलावले. ते दहा वर्षे बडोदा संस्थानात मुख्य ग्रंथपाल म्हणून कार्यरत होते. बोर्डेंच्या मार्गदर्शनाखाली बडोदा संस्थेत ग्रंथालयांचे जाळे निर्माण झाले. संस्थांमध्ये अनेक ग्रंथालये स्थापन झाली.

फिरती ग्रंथालये, ग्राम वाचनालये सुरू झाली. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी स्वतः ग्रंथपालपदाचे शिक्षण घेतले. खऱ्या अर्थाने ते भारतीय ग्रंथालयाचे जनक आहेत.

**अनिष्ठ सामाजिक प्रथावर प्रहार :**

सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक क्षेत्रातील कामगिरीही त्यांच्या समाजसुधारणेची साक्ष देणारी आहे. बुरखाबंदी, बालविवाहावर बंदी, मुलींच्या विक्रीवर बंदी, आंतरविवाह, स्त्रियांना वारसा हक्क देणे, अस्पृश्यता प्रतिबंध, विधवाविवाह इत्यादी सुधारणा प्रत्यक्षात अंमलात आणल्या गेल्या. त्यांनी भारतात पहिल्यांदा घटस्फोट कायदा लागू केला. हरिजनांसाठी अठरा शाळा उघडल्या.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात आली आणि संस्थेत उच्च पदावर नियुक्तीही करण्यात आली. सुधारणांच्या थेट समर्थनामुळे त्यांना मनॅशनल सोशल कौन्सिलफ्चे अध्यक्षपद मिळाले.त्यांनी बांधलेल्या सुंदर वास्तूंमुळे बडोदे हे कलात्मक प्रेक्षणीय स्थळ बनले आहे. लक्ष्मीविलास पॅलेस, संग्रहालय, कलावेठी, श्री सयाजी हॉस्पिटल, नजरबाग पॅलेस, कॉलेज बिल्डिंग आदींनी बडोद्याचे सौंदर्य वाढवले गेले.

सयाजीराव गायकवाड परोपकारासाठी सदैव तत्पर असत. सत्पात्री दान करण्यात ते नेहमीच अग्रेसर असत. त्यांनी भारतातीलच नव्हे तर जगातील अनेक गरजूंना उदार मनाने मदत केली. जेव्हा त्यांची प्रजा संकटात असते तेव्हा त्यांचे परोपकारी दान आणि कार्य अमूल्य सिद्ध होते. सयाजीरावांनी प्रत्येक गोष्ट नियोजनबद्ध पद्धतीने करताना नेहमीच दृष्टी ठेवली. त्यांचे नियोजन आणि व्यवस्थापन नेहमीच उत्कृष्ट होते. महाराज अशी मदत देत असताना प्रजेवर अवलंबून न राहता स्वावलंबनाकडे त्यांचा अधिक कल होता.

**परिस्थितीजन्य काळातील नियोजन :**

शंभर वर्षांपूर्वी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा आणि आजूबाजूच्या जिल्ह्यांतील भीषण पूर संकटाचे व्यवस्थापन करून लोकांना दिलासा दिला. या संकटात महाराजांनी संस्थानची सर्व यंत्रणा कामाला लावली. लोकांना मदत केली. तो लोकप्रिय राजा होता. लोककल्याण हाच माझ्या जीवनाचा ध्यास आहे, असे ते म्हणत. या विचारांनुसार त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य प्रजेसाठी घालवले. या विद्वान राजाला शिक्षणाचे महत्त्व माहीत होते. अनेक सुधारणा करताना त्यांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. दुष्काळ आणि अतिवृष्टीच्या काळात त्यांनी शेतकऱ्यांना मदत केली.

जुलै १९२७ मध्ये बडोद्यात भीषण पूर आला. यावेळी चार दिवसांत नेहमीपेक्षा जास्त पाऊस झाला. मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आला होता हे सर्व अचानक घडले. लोकांना आपला जीव वाचवण्यासाठी आपली घरे, प्राणी आणि संसाधने सोडून पळून जावे लागले. यापूर्वी अशा आपत्तींची पूर्वसूचना देणारी यंत्रणा नव्हती. नुकसान मोठे होते. या काळात छोटी असलेली दळणवळण व्यवस्था कोलमडली. कोणत्या भागात किती नुकसान झाले हे समजण्यास थोडा वेळ लागला. मात्र पुराचा भीषण आणि जीवित व वित्तहानी पाहून बडोदा प्रशासनाने तातडीने कारवाई केली. प्रशासनाने प्रथम विविध भागात अडकलेल्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवले आणि कमीत कमी नुकसान होण्याची काळजी घेतली. त्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या.

**शेतकऱ्याविषयी आस्था :**

लोकांसोबतच शेतकऱ्यांच्या जनावरांनाही सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. या सर्व मदतकार्यात संस्थानातील अधिकारी आणि बिगर अधिकारी सहभागी झाले होते. शहरात सर्वांनी मिळून काम केले. सर्व उपलब्ध साधनांचा वापर करून परिस्थिती पूर्ववत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. निराधार आणि बेघर लोकांना तात्काळ मदत दिली. बडोदा शहर आणि इतर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक इमारती आणि धर्मशाळा नागरिकांसाठी खुल्या करण्यात आल्या. लोकांच्या मदतीसाठी सरकारने तातडीने पन्नास हजार रुपये मंजूर केले. प्रशासनाच्या या सहकार्यामुळे भीषण पुराच्या काळातही नागरिकांना दिलासा मिळाला.

**समाजसुधारकांना मदत :**

सयाजीरावांना प्रवासाची खूप आवड होती आणि त्यांनी जगभर प्रवास केला. जिथे चांगले होते तिथे ते मनापासून स्वीकारले आणि आपल्या संस्थेची सर्वांगीण भरभराट करण्याचा प्रयत्न केला. लंडन येथे झालेल्या पहिल्या दोन गोलमेज परिषदांनाही ते उपस्थित राहिले. टिळक, बाबू अरविंद घोष यांसारख्या दिग्गज नेत्यांशी त्यांचे जवळचे संबंध होते. त्यांनी राष्ट्रीय चळवळीला अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिल्याचे बोलले जाते. शिक्षण, समाजसुधारणा आणि शिस्तप्रिय प्रशासन या सर्वच बाबतीत ते यशस्वी ठरले. पंडित मदनमोहन मालवीय यांनी 'हिंदुस्थानचा शेवटचा आदर्श राजा' असे त्यांचे समर्पक वर्णन केले आहे.

प्रजेच्या सोईसाठी सयाजीराव महाराज बडोदा प्रशासनात नवनवीन कामे करत होते. त्यासोबतच त्यांनी सामाजिक सुधारणांवरही बारीक लक्ष दिले. राणीसाहेबांना शिकवून त्यांनी स्त्री शिक्षण सुरू केले. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण हा कायदा करण्यात आलेला भारतातील पहिला क्रांतिकारी निर्णय होता. असाच कायदा अस्पृश्य-आदिवासींच्या शिक्षणासाठी करण्यात आला. विधवा पुनर्विवाह, बालविवाहास बंदी, घटस्फोट, धार्मिक कृत्ये कमी करणे, पुरोहितांचा परवाना, विधवा व मुलींचा मालमत्तेतील अधिकार, धार्मिक प्रथांसंबंधी कायदा, हिंदू संहिता कायदा, बारा वर्षांखालील मुलांच्या तंबाखूच्या विक्रीवर बंदी, कपड्यांवर बंदी, बालकामगारांचे शोषण, कैद्यांसाठी तुरुंगातील शाळा आणि मराठीत ब्राह्मणेतर शाळा. या गोष्टी हळूहळू बडोद्यात घडत गेल्या.

ज्या वेळी कोल्हापुरात वेदोक्ताचा मुद्दा गाजत होता, त्या वेळी सयाजीरावांनी बडोद्यात समंजस आणि संयत मागण्यांसह हा मुद्दा समर्थपणे हाताळला. त्यांना पुरोहित म्हणून व्यवसाय करायचा असेल तर त्यांना त्या शास्त्राचे ज्ञान हवे. त्यासाठी त्यांनी परीक्षा द्यावी. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर शासनाकडून परवाना घ्यावा व त्यानंतर पुरोहिताचा व्यवसाय करावा.

अपंग, गरीब लोकांना सामाजिक समता निर्माण व्हावी म्हणून मदत सुरू केली. गावोगावी धर्मशाळा उभारून धर्मादाय

ISSN No. 2394-5990

दवाखाने उभारले. बालगुन्हेगारांचे पुनर्वसन कायदा अमलात आला, शेतातील जनावरांवरील अत्याचार थांबले. यापूर्वी ग्रहणाच्या दिवशी राज्यभरात सुट्टी देण्यात आली होती. ही सुट्टी बंद करून वैज्ञानिक वृत्ती वाढविण्यासाठी प्रयत्न केले.

पूर्वी राजवाड्यात ब्राह्मण, शाकाहारी, मांसाहारी आणि मागासवर्गीय अशा चार वेगवेगळ्या पंक्ती बसायच्या. महाराजांनी हळुहळू आणि हुशारीने हे अंतर पार केले. महाराजांनी स्वतः अस्पृश्यांच्या रांगेत सामील होण्याचे धाडस केले आणि भोजनाच्या पंक्तीतील भेद कमी केला. पहिल्या परदेश प्रवासानंतर महाराजांना कर्मठ ब्राह्मणांनी काळ्या पाण्यावर प्रवास करण्यासाठी तपश्चर्या करण्यास भाग पाडले, परंतु नंतर महाराजांनी कायदा करून हे थांबवले. धार्मिक सलोखा असावा यामतावर सयाजीराव ठाम भूमिका मांडत असे. धर्म आणि राजकारण याबाबतची चर्चा महाराजांनी केलेली आहे.

**समतावादी विचारांची पार्श्वभूमी :**

सयाजीराव गायकवाड यांचे जातीधर्माचे तत्वज्ञान समजून घेण्यासाठी तत्कालीन सुधारणावादी चर्चाविश्वाची पार्श्वभूमी आणि समाजप्रबोधनाच्या क्रांतिकारी चळवळी लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराजांवर स्वामी दयानंद सरस्वती यांच्या विचारांचा प्रभाव होता या दरम्यान दयानंद सरस्वती बडोद्यात आले, त्यावेळी त्यांनी महाराजांना त्यांच्या प्रवचनात इशारा दिला की अस्पृश्यता दूर केली नाही तर हिंदू धर्माला मोठी किंमत मोजावी लागेल. पोकळ जातीचा अभिमान नसावा. जातीभेदाचा विचार योग्य नाही. व्यक्तीचा विचार जातीच्या आधारावर न करता गुणवत्ता आणि कौशल्यांच्या आधारावर केला पाहिजे. माणसाला कमी लेखू नका. सर्वांना समान वागणूक द्या असे ते म्हणत.

जातीमुळे व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य मिळत नाही. कोणालाही हवे तसे शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे व्यावसायिक कौशल्ये आणि ज्ञान मर्यादित राहते. युरोपात असे कोणतेही बंधन नसल्याने लोहार आणि पिसादी हे संशोधक म्हणून पुढे आले आणि त्यांनी जातीपेक्षा फरकाच्या निकषाला प्राधान्य द्यावे असे सुचवले.

शूद्र आणि अतिशुद्रांना ज्ञान आणि मूलभूत मानवी हक्कांपासून दूर ठेवणाऱ्या व्यवस्थेवर सातत्याने ते टीका करीत असे. याबाबतीत महाराजांची कामगिरी असाधारण आहे, यात शंका नाही, त्यांनी या बाबतीत ब्रिटिश सरकारसमोर एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे. समाजसुधारणेची आणि शिक्षणाची बाब मूळ समजून तीचे बीज समाजात पेरावे लागेल यामताचे सयाजीराव होते. शिक्षणात सुधारणा करून तिला अमलात आणले पाहिजे असे ते म्हणत.

समाज सुधारणेचा दुसरा टप्पा म्हणजे समाजात प्रचलित असलेल्या वाईट प्रथा मोडून काढणे आणि इष्ट रूढी मोडून काढणे अधिक कठीण आणि नाजूक काम होते. येथे महाराजांना कुशल सुताराचे काम करावे लागले. कारण हिंदू समाजाची पूर्वीची सुंदर बाग आता जीर्ण होत आली होती या जुन्या बागेतील काही अनिष्ठ प्रथा नष्ट केल्यातर हिदू समाजाची झालेली अवनती भरून येईल आणिपुन्हा बाग फुलली जाईल असे ते म्हणत.

महाराजांनी वृक्षारोपण,वाचन,लिखाण, शिक्षण, समाजसुधारकांना मदत याकामाला अधिक प्राधान्य दिले होते. महाराजांचे समाजसुधारणेचे कार्यही असेच होते आणि ते त्यांनी आपल्या पन्नास वर्षांच्या कारकिर्दीत अत्यंत कौशल्याने यशस्वीपणे पार पाडले.

**निष्कर्ष :**

अर्थात त्यांचा जाती, अस्पृश्यता, धर्म व कर्मकांड, अनिष्ट सामाजिक प्रथावर विश्वास नव्हता, सामाजिक सुधारणा करून सामाजिक प्रथांना समतावादी तत्वावर रुजविण्याचे कार्य महाराजांना करायचे होते. तशा पद्धतीने त्यांनी प्रयत्नही केले आहेत. नवीन सामाजिक व राजकीय योजना अंमलात आणल्या पाहिजेत, असे महाराजांचे मत होते.

समाज सुंदर करायचा असेल तर हिंदू धर्माचे स्वरूप बदलून नवीन समतावादी धोरणाचा स्वीकार केला पाहिजे असे त्यांना वाटते. हिंदूचे नूतनीकरण करण्याचे काम किती कठीण आहे परंतु याशिवाय पर्याय नाही हे पण त्यांनी स्पष्ट केले आहे. जुनाट प्रथावर,जातीव्यवस्थेवर मुळाशी घाव घालावे लागतील. शिक्षण सर्वाना मोफत आणि सक्तीचे करावे लागेल. ज्यामुळे समाजात चांगले विचार पेरले जातील आणि व्यवस्थासुध्दा सुद्रुढ होईल.

**संदर्भ :**


१. फडके य.दि.-एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र

२. बाबा भांड - युगदृष्टा सयाजीराव गायकवाड

३. पी.के.कुलकर्णी - भारतातील समाज

४. जयसिंगराव पवार - राजर्षी शाहू महाराज

५. साहेबराव गाठाळ - भारतीय विचारवंत


■■■

# Educational Reformer Maharaj Sayajirao Gaikwad
# शैक्षणिक सुधारक महाराज सयाजीराव गायकवाड

**श्री. अतुल शहाजी देशमुख**
संशोधक
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर, जि. सोलापूर.



**शोध सारांश :**

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचे स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये अतिशय भरीव असे कार्य राहिलेले आहे. आपल्या कार्यकर्तुत्वाच्या बळावर त्यांनी बडोदा संस्थांन तसेच भारतभर सर्व क्षेत्रात प्रगती करून आपला ठसा उमटवण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला. त्यांचा कालखंड १८६३ ते १९३९ एवढा होता या कालखंडामध्ये त्यांनी सर्व समाज घटकांना शक्तीचे प्राथमिक शिक्षण, शिक्षणाचा प्रसार, बालविवाह बंदी, अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह, हिंदू कायदा, घटस्फोट संबंधित कायदा अशा प्रकारच्या सुधारणा घडवून आणल्या.

**प्रस्तावना :**

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यातील कवळाने या गावी झाला. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी शैक्षणिक कार्यामध्ये अमूलाग्र स्वरूपाच्या सुधारणा घडवून आणल्या १८९२ च्या कायद्यानुसार त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासाठी ब्रिटिशांना प्रत्युत्त केले. आज आपला देश शिक्षण क्षेत्रामध्ये तोडीस तोड कामगिरी करीत आहे. त्याचा पाया महाराज सयाजीराव गायकवाड यांनी घातला घटनेचे शिल्पकार बी. आर. आंबेडकर यांना स्कॉलरशिप देऊन त्यांनीच लंडनला शिकवण्यास पाठवले. इंग्रजी शिक्षणाला त्यांनी महत्त्व दिले. स्त्रियांना ते शिक्षण मिळावे आणि त्यांची चूल व मूल यांपासून सुटका व्हावी अशी त्यांची इच्छा होती.

**उद्दिष्टे :**

१. बडोदा संस्थानातील शैक्षणिक परिस्थितीची माहिती घेणे.
२. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत.
३. स्त्री शिक्षणा विषयी माहिती घेणे.
४. इंग्रजी विषयाचे महत्त्व जाणून घेणे.
५. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करणे.

**महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य :**

**बडोदेतील शैक्षणिक योजना :**

बडोदे संस्थानात नवीन पद्धतीने शिक्षण आणि त्याबद्दलची योजना १८७१ वर्षी अस्तित्वात आली असे म्हणण्यास हरकत नाही. कारण त्यावर्षी सरकारी खर्चाने शिक्षण देण्याचं तत्व अमलात आले होते. यापूर्वी जुन्या पद्धतीच्या पाच शाळांतून शिक्षण देण्यात येत असे. परंतु १८७१ वर्षी एक सरकारी हायस्कूल व चार प्राथमिक शाळा उघडण्यात आल्या. या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ६६६ असून एकंदर खर्च १३ हजार रुपये इतका होत असे. १८७५ यावर्षी शाळा खाते स्वतंत्र करण्यात आले व पुढील वर्षी एक शाळा तपासणी अथवा इन्स्पेक्टर ची जागा ही नवीन काढण्यात आली. १८८० वर्षी शाळांची संख्या १८० असून विद्यार्थ्यांची संख्या १७४६५ होती. १८८१ वर्षी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी संपूर्ण अधिकारासह राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती. घेतली यावेळेस त्यांचे वय फक्त १८ वर्षे होते. परंतु या वेळेपासूनच आपल्या प्रजेस सार्वत्रिक शिक्षण देण्याचे उच्च ध्येय त्यांनी निश्चित केले होते या ध्येयानुसार शिक्षणाची प्रगती पुढील वर्षात झपाट्याने होत गेली. सण १८८९ ते ९० मध्ये शाळांची संख्या ४४४ असून त्यापैकी ३५ शाळा खास मुलींकरिता होत्या. या शाळांत ४०,६२९ मुले व ३१४५ मुली शिक्षण घेत होते या शाळा खात्यांचा एकंदर खर्च चार लाख ३४ हजार ६१३ होता.

१८९१ यावर्षी महाराजांच्या कामावरून ग्रामीण शाळा उघडण्यास आल्या. या शाळा ग्रामव्यवस्थेतील एक मुख्य अंग

ISSN No. 2394-5990

समजल्या जात असत व या शाळेतील शिक्षक हा खेडेगावातील सरकारी नोकरांपैकी एक कायमचा घटक मानला जात असे. खेडेगावातील शिक्षणाची आवड उत्पन्न करणे व अत्यंत गरीब अशा लोकांमध्ये देखील शिक्षणाचा प्रसार करणे ही शिक्षकाची कर्तव्य समजली जात असत. शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या संख्येच्या प्रमाणात शिक्षकास दरमहा रुपये तीन पासून पाच पर्यंत पगार मुलगी खात्याकडून मिळत असेल. त्याचप्रमाणे मुलांच्या पालकांकडून फी किंवा अन्य रीतीने मोबदला स्वीकारण्याची त्याला मुभा असे. याशिवाय परीक्षेत पास होणाऱ्या संख्येनुसार शिक्षण खात्याकडून मदत दिली जात असे.

**खाजगी शाळांचे वाढलेले महत्त्व :**

जुन्या पद्धतीच्या खाजगी शाळा पुष्कळ खेडेगावातून अजून चालू होत्या. शिक्षण पद्धती व अभ्यासक्रम शाळातून सारखी असणे ईस्ट होत व म्हणून खाजगी शाळा शिक्षण खात्याच्या देखरेखे खाली घेणे शक्य होते. याकरिता खाजगी शाळांतील शिक्षकास नवीन ग्राम्य शाळातील शिक्षकांच्या जागा देण्यात आल्या. अशा बहुतेक जुन्या खाजगी शाळांचे नवीन ग्राम्य शाळेत रूपांतर झाले. एक वर्षात शाळांची संख्या २२८८ वाढली व त्यावरील देखरेख नीट राहावे. या हेतूने या शाळा १८९२ यावर्षी देशी शाळा खात्याच्या ताब्यात देण्यात आल्या. या धोरणानुसार शाळा व शिक्षण यांची संख्या वाढत गेली. या ठिकाणी निदान १६ मुले जमले शक्य असेल, त्या ठिकाणी शाळा काढण्याची महाराजांची इच्छा दर्शवली व १८९२ च्या अखेरीस शाळांची संख्या ५७२ व १८९३ यावर्षी ६४१ वर जाऊन मुलांची संख्या २०००० पर्यंत वाढली. याच सुमारास शिक्षकांच्या पगारातही थोडीशी सुधारणा करण्यात आली.

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत :**

पुढे दिनांक १६ मार्च १८९३ रोजी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याबद्दल चा कायदा महाराजांच्या हुकमाने अमलात आला. हा कायदा प्रथम अमरेली प्रांतात फक्त अमरेली शहर व तालुक्यातील गावातच लागू करण्यात आला. या कायद्याचा अंमल कसा होतो हे पाहून नंतर अमरेली तालुक्याच्या राहिलेल्या गावातही हा कायदा लागू करण्यात आला. हिंदुस्थानात शिक्षणाबद्दल इतका महत्त्वाचा प्रश्न हाती घेण्यात बडोदे संस्थानाचा पहिला नंबर होता. हा प्रयत्न कितपत यशस्वी होतो हे पाहण्याकरिता सर्व  हिंदुस्थानचे डोळे बडोद्याकडे लागले होते. अंमल कसा होतो लोकांची सहकार्य किती मिळते वगैरे गोष्टीकडे श्रीमंत महाराजा साहेबांचे ही लक्ष लागले होते शिक्षणासंबंधी एकेक ठिकाणी महाराजांनी खालील विचार प्रदर्शित केले होते. ते म्हणायचे कोणत्याही राज्यपद्धतीचा चांगलेपणा अगर यशस्वी पणा राज्यकारभारातील निरनिराळ्या बारीक-सारीक गोष्टीवर अवलंबून नसतो. परंतु त्या राज्य पद्धतीमुळे लोकांची सर्व दृष्टीने प्रगती होण्यास अवसर मिळतो किंवा नाही हे बघावे लागते. अवसर मिळाल्यानंतर प्रगतीनुसार मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्यासाठी पूर्ण संधी लोकांस मिळते की नाही या गोष्टींवर तो यशस्वीपणा अवलंबून असतो. यामुळे सर्वत्रिक शिक्षणाची व्यवस्था करणे हे राज्य पद्धतीमध्ये पहिले कर्तव्य समजले जाणे स्वाभाविक आहे. जुन्या काळे ज्यावेळेस लोकांनी फक्त शेती करणे व कायदे पाळणे इतकीच गोष्ट करावयाची असे त्यावेळेस शिक्षणाची विशेष जरूरत वाटत नसेल. आधुनिक तकाळी सामान्य लोकमाताला अधिकाधिक जबाबदारी पडत आहे. यामुळे स्वतःची कर्तव्य व जबाबदारी पार पाडण्याकरिता लोकमत तर्कनिष्ठ व समतोल होणे अशक्य आहे तव याकरिता शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. अज्ञानावर अधिष्ठित असलेले लोकमत कधीही स्थिर असणे शक्य नाही. भावनेचा अथवा विकाराचा थोडासाही वास लागल्याबरोबर ते हेलकावे खाऊ लागून एखादे वेळेस समाजाच्या अध: कारण होऊ शकते. राष्ट्राची सर्वांगीण प्रगती होण्यास समाज योग्य रीतीने नियंत्रित असला पाहिजे व ही गोष्ट समाजातील घटकास शिक्षण मिळवल्याशिवाय शक्य नाही. शिक्षणाची सोय लोकास करून देणे व त्यावर देखरेख ठेवणे ही राज्यव्यवस्था यावयाची नाही. हल्लीच्या यांत्रिक युगात व चला आजच्या काळात तर शिक्षणाचे महत्त्व अधिकच वाढते जे राष्ट्र आपल्या नागरिकांना कोणताही भेद अथवा निर्बंध न ठेवता शिक्षणाचा फायदा मिळवण्याची संधी देते ते राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांना मागे टाकून खात्रीने पुढे जाणार प्रत्येक व्यक्तीला ज्ञानाच्या उच्च कोटीला पोहोचणे शक्य नाही. परंतु सर्वसाधारण ज्ञानाची मर्यादा जितकी अधिक तितके ते राष्ट्र अधिक समर्थ ठरेल. यामुळेच उच्च किंवा नीच जातीचा आगर वर्णाचा भेद न ठेवता सर्वांना ज्ञान मिळवण्याची संधी दिली पाहिजे.

अमरेली तालुक्यात फक्त काही ठिकाणी प्राथमिक शिक्षणाचा कायदा प्रथम लागू करण्यात आला परंतु काही दिवसांनी सर्व तालुक्यात तो कायदा लागू करण्यात आला. त्याचप्रमाणे राज्यातील दुसऱ्या प्रांतातही काही ठिकाणी या कायद्याचा अंमल करण्यात आला. अशा रीतीने हळूहळू सुरुवात होऊन योग्य अनुभवास सह १९०३ च्या मे महिन्यामध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा सर्व राज्यास लागू करण्यात आला तेव्हापासून आतापर्यंतची प्रगती पाहता मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रयोग यशस्वी झाला असे म्हणता येईल.

### सदगुणी महाराज सयाजीराव गायकवाड :

श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या अनेक सदगुणांमध्ये त्यांची विद्यापभि रूची हा सदुण त्यांच्या यशो मंदिराच्या कळसाप्रमाणे शोभतो तो सुवर्णमय तेजस्वी असून दुरूनही दिसतो सयाजीराव स्वतः विद्यासंपन्न होते इतकेच नव्हे. तर आपली सर्व प्रजा विद्या संपन्न व्हावी अशी त्यांची कळकळीची इच्छा होती. सर्व महाराष्ट्रातील व गुजरातीतील जनतेस विद्यासंपन्न करण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयांवर मराठीत व गुजरातीत ग्रंथ प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करून ठेवली होती. त्याप्रमाणे ते स्वतः विद्यासंपन्न विद्याव्यासंगी होते. स्वतःच्या उत्तर वयापर्यंत त्यांनी अविश्रांत विद्यार्जन केलेह विद्वान लोकांची ही ओळख करून घेऊन त्यास द्रव्यसहाय्य केले ग्रंथ संपादनास प्रोत्साहन देत राहिले. अनेक रीतीने प्रजेस साक्षर करण्याची खटपट केली. अशा त्यांच्या उज्वल चरित्राकडे पाहिले म्हणजे मध्ययुगीन काळातील धारच्या परमार वंशी मुंज व भोज त्याचप्रमाणे कनोजच्या प्रतीक हारवंशी भोज व महेंद्र पाल अशा विद्वान व विद्याप्रेमी कीर्तिमान राजांची आठवण झाल्या वाचून राहत नाही भोजाच्या दरबारात अनेक विद्वानाची संभावना होत असे. बडोदे येथील केवळ विद्वानांच्या संभावनेसाठी त्यांनी भरवलेल्या दरबाराची आठवत म्हणूनच झाल्याशिवाय राहत नाही. श्रीमंत सयाजीराव महाराज स्वतः विद्वान होते व विद्यार्थ्यांसाठी परिश्रम करणारे होते म्हणूनच त्यांना विद्वानांची चाह होती.

### विद्यापीपासू सयाजीराव महाराज

श्रीमंत सयाजीराव स्वतः विद्वान होते शिवाय आयुष्यभर विद्याजनाचा व्यासंग करणारे होते हा त्यांचा सदुण केवळ ईश्वर दत्त आहे हे सांगितले पाहिजे ज्या कुळात त्यांचा जन्म झाला त्या कुळात विद्येची परंपरा नव्हती हे प्रसिद्ध आहे तसेच लहान वयात बडोद्याच्या गादीवर आल्यावर एकंदर परिस्थिति विशेष अनुकूल होते असेही म्हणता येत नाही राजकुलांमध्ये शिक्षण देणारे उत्तम गुरुजी अनेक ठिकाणी मिळतात आणि राजपुत्रास विद्यासंपन्न करण्याचा प्रयत्न सर्वच ठिकाणी होतं परंतु राजे लोकांत सयाजी महाराजांच्या विद्वत्तेप्रमाणे व विद्यप्रेयतेप्रमाणे विद्वत्ता किंवा विद्याप्रियता सापडणे फारच कठीण आहे श्रीमंत सयाजीराव राजांस लहानपणी चांगले गुरु लाभले ही गोष्ट निर्विवाद आहे राजकारणात सर टी माधवराव सारखे व इंग्रजी विद्या शिक्षणात इलियट सारखे त्यास नामांकित शिक्षक मिळाले हे खरे पण गुरु कितीही चांगला असला शिष्याचे निसर्गदत्त बुद्धी वैभव हेच त्याच्या विद्ववतेचे साधन असते वितरती गुरु प्राज्ञ:विद्यान या श्लोकात सांगितल्याप्रमाणे विद्यार्थ्यांची नैसर्गिक बुद्धी संपत्ती हीच मुख्य आहे. आरशात जसे तेजाचे प्रतिबिंब त्याचप्रमाणे बुद्धीवाद विद्यार्थ्यांतच गुरुची विद्या प्रतिबिंबित होऊन उज्वल दिसते. पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे कॉलेज आतील शिक्षण संपल्यावर बहुतेक विद्यार्थी अधिगत विद्या विसरतात. वाडीची गोष्ट नको शिक्षण काल संपल्यानंतर आज जन्म विद्या व्यसन चालविणे हे केवळ ईश्वर दत्त स्वभावावर अवलंबून आहे .विद्या भेरूची खरी कळकळीची नैसर्गिक असल्याशिवाय विद्या व्यसन राहत नाही. हे आपण सर्व प्रकारच्या लोकांत पाहतो. त्यातच राज्याधिकार आणि राज्यलक्ष्मी प्राप्त झाल्यावर व्यासंग चालविणे हे अत्यंत दुरापास्त आहे .असे उदाहरण त्या काळात केवळ श्रीमंत सयाजीराव महाराजांचेच होते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

### ग्रामीण शिक्षणासाठी केलेले कार्य :

श्रीमंत सयाजीराव महाराज यांना ग्रामीण शिक्षणाची आवश्यकता किती वाटायची हे त्यांनी एका महत्त्वाच्या भाषणात बोलून दाखवलेले आहे. ते म्हणाले होते,आपल्यासमोर असलेल्या राष्ट्र उद्धाराच्या प्रश्नाचा अंतिम निर्गम जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत प्रत्येक खेड्यात शाळा स्थापली जाणार नाही आणि लोकांच्या घरांच्या उंबरठ्यापर्यंत शिक्षण नेले जाणार नाही. निरनिराळ्या राष्ट्राच्या इतिहासाचे खोल अध्ययन महाराजांनी केले होते आणि त्या यावरून काढलेला सिद्धांत तरी खरा आहे हे विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. जोपर्यंत प्रत्येक खेड्यातील प्रत्येक घरंदाज मनुष्य तरुण व वृद्ध शिक्षण घेत नाही त्याला लिहिता वाचता येऊन जगात काय चालले आहे .हे तो वाचू शकणार नाही तोपर्यंत राष्ट्राच्या उद्धारास व प्रगतीस त्यांची मदत मिळणे शक्य नाही. प्राचीन काळात भारतीय आर्यास सर्वांच्या शिक्षणाची किती गरज भासत होती हे त्यांनी विजांच्या उपनयन संस्कारात व्यक्त केले आहे. शिक्षण घेतलेच पाहिजे असा त्यांनी धार्मिक नियमच केला. हल्लीच्या काळात अमेरिकेतील संयुक्त राष्ट्र सर्व जगात अधिक संपन्न व सुव्यवस्थित आहे. याचे कारण हेच आहे की तिकडच्या खेडेगावातील प्रत्येक शेतकरी सुशिक्षित आणि वाचणारा आहे. याचा विचार करून श्रीमंत सयाजी महाराजांनी ग्रामीण शिक्षणाचा प्रयत्न केला व आपल्या राज्यव्यवस्थेची प्रगती हे चीरस्थानी लक्ष बनवले.

अमेरिकेतील फिरत्या वाचनालयाच्या पद्धतीवरून बडोदे राज्यात त्यांनी ग्रामीण फिरती वाचनालय सुरू केली. शेतकऱ्यास उपयोगी पडतील व धंद्याच्या दृष्टीने त्यांची प्रगती होईल अशी पुस्तके इतर पुस्तकांबरोबर ठेवली जात. पण दुर्दैवाने मराठी किंवा गुजराती भाषेत सोप्या शिक्षणाची पुस्तके फार थोडी

होती, याची जाणीव महाराजांना होती व त्यासाठी ही त्यांनी प्रयत्न केले.

**स्त्री शिक्षणाचा केलेला पुरस्कार**

श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या काळात सुरुवातीला शिक्षण संस्थांचा उगमही नव्हता. स्त्री शिक्षण हा आपल्या लोकांच्या रिकाम्या चर्चेचा व बराचसा तिरस्कार याचा विषय होता. स्त्रियांचे व्यवहार क्षेत्र म्हणजे घर आणि त्या क्षेत्रातील त्यांच्या कर्तबगारिला उपयुक्त व आवश्यक ज्ञान तेवढेच शिक्षण या व्यतिरिक्त शिक्षणाची त्यांना गरजही नाही .असल्या संकुचित व घातक विचारांचा पगडा जन समूहाच्या मनावर पूर्ण बसलेला अशा संकुचित वृत्तीच्या लोकांची दृष्टी निवडून ती शिक्षणासारख्या थोर व उपयुक्त विषयाकडे वळविणे मोठे दुर्घट होते. पण या कार्याची अपरिहार्यता श्रीमंत महाराजांना पटली होती. विद्या व संस्कृती याकरिता एकेकाळी जगाला आदर्श असणाऱ्या या भारत वर्षात अज्ञानाने कसा अनर्थ मानला आहे हे महाराजांच्या धनी आहे. भारताला व विशेषता आपल्या प्रजेला पूर्वकालीन उज्वलता प्राप्त करून देणे यासारखे अन्य साधन नाही. हे त्यांच्या कुशाग्र बुद्धीला जाणले व एतदर्थ प्रयत्नास लोकमतची अनुकूलता नसताना सुरुवात करण्याचा महाराजांनी निश्चय केला. स्त्री शिक्षणाविषयी महाराजांचे विचार कसे थोर आहेत हे पुढील उदाहरण वरून लक्षात येईल.

१८८५ या वर्षाच्या ऑगस्ट २० च्या आपल्या एका हुकूमत महाराज म्हणतात, भावी पिढीच्या सर्वतोपरी संवर्धनाची जबाबदारी स्त्रियांवर किती आहे. त्या सुविधा असल्या तर उत्तम नागरिक निर्माण करण्याचे काम त्या करू शकतात निर्बुद्ध स्त्रियांमुळे संसार निरस होण्याचा संभव असतो. गृहिणी सुविधा व सुसंस्कृत असली तर पुरुषाशी सहकार्य करणे तिला जमते. पुरुष अशी सहकार्य करून त्यांच्याशी असलेले आपले सहज रीचे नाते यथार्थ करून दाखविणे हाच विवाहाचा हेतू असायला हवा आणि हे सर्व साधण्यासाठी शिक्षण हेच एकमेव साधन आहे. म्हणूनच स्त्री शिक्षणाचा पुरस्कार महाराजांनी केला व आज सर्वत्र स्त्रियांनी सर्व क्षेत्रात आपले कर्तव्य सिद्ध केले आहे. त्याचे श्रेय श्रीमंत सयाजीराव महाराजांनाही द्यायला हवे कारण कन्या शाळांची स्थापना वृद्धि करण्याचे अथक काम त्यांनी केले आहे. एवढेच नव्हे तर अभ्यासक्रमात वाचन लेखन, इतिहास, भूगोल, गणित, स्वयंपाक, शिवणकाम गायन चित्रकला व सामान्य ज्ञान इत्यादीचा अंतर्भाव ही केला.

**सक्तीचे प्राथमिक शिक्षण**

शिक्षणाच्या इतिहासात सन १९०६-०७ हे साल अत्यंत महत्त्वाचे व क्रांतिकारक आहे. या यावर्षी श्रीमंतांनी सर्व राज्यात प्राथमिक शिक्षण तिसरी इयत्तेपर्यंत सक्तीचे व मोफत केले. त्याप्रसंगी श्रीमंत आपल्या एका भाषणात म्हणाले होते, सक्तीच्या शिक्षणाचे धोरण मी दाखल केले आहे. ते यशस्वी होण्यासाठी व त्या प्रित्यर्थ जो खर्च करण्याचे मी धारिले आहे त्याचा मोबदला मला दुसऱ्या कोणत्याही कामात मिळाला नाही तरी चालेल परंतु या खर्चाचा मोबदला मला पूर्ण मिळण्यास प्रजेने मदत केली पाहिजे. ती मदत अशी की प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुलांना गरज पडल्याप्रमाणे फक्त तिसऱ्या इयत्तेपर्यंतच न शिकविता निदान पाचव्या इयत्तेपर्यंत त्यांचा अभ्यास करावा. जर याप्रमाणे शिक्षण दिले तर मला माझ्या मेहनतीचे फळ मिळाले तरच योग्य नाही तर ते व्यर्थ जाण्याचे संभव आहे. तरी माझ्या यातील किंवा पश्चात हे महान कार्य सुधारून घेण्याचे प्रजेचे स्वाधीन आहे. तसेच त्यात प्रसंगी मुलांना उद्देशून म्हणाले होते, मुलींना देखील तितकाच अभ्यास करणे जरुरी आहे. संसारिक रीतीरीवाजामुळे वाटेल त्या अडचणी येत असल्या तरी त्या दूर करून प्रत्येक मुलीकडून निदान पाचव्या इयत्तेपर्यंत अभ्यास पूर्ण करविण्याची जाहीर हिम्मत दाखवावी.

सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा हिंदू मुलींच्या बाबतीत वर्षे १३ धरली गेली तर फारशी मुलींची १५ धरली या पथ्यकर सक्तीचा स्वाभाविक परिणाम असा झाला की, जे परिवर्तन सहज होणे शक्य नव्हते ते पाच २५ वर्षात सहज दिसू लागले श्रीमंतांच्या इच्छेला गोड मधुर फळे आली. आस्वाद घेण्याइतकी तत्परता व क्षमता  शिक्षणे इच्छु विद्यार्थिनींनी ही मोठ्या अग त्याने दर्शवली. साक्षरतेचा प्रसाद करण्याचे श्रीमंतांचे प्रयत्न फलदरूप होऊ लागले.

**इंग्रजी शाळा :**

विद्यार्थिनींची संख्या वाढू लागली, तस तशी प्राथमिक शाळांची ही गरज भासू लागली. इसवी सन १९०७ यावर्षी पेटलाद पाटण विमल नगर येथे इंग्रजी वर्ग उघडण्यात आले. अनुभवी शिक्षण वर्ग या कामी नेमला तथापिसामान्यता लोकांनी जेवढी आस्था व कळकळ या कार्यात दाखविणे इष्ट जरूर होते तेवढी प्रथम त्यांनी दाखवली नाही .इंग्रजी विषयी प्रेम अध्याप नव्हते. पालकांना आपल्या मुली इंग्रजी शिक्षण घेण्यात पाठविण्याची उपयुक्तता लवकर पटेना साहजिकच शिक्षणाची मुलींची संख्या प्रारंभिक अगदीच होते. सन १९०८ यावर्षी पेटलादच्या शाळेत २१ मुली होत्या पटनाला ४१ तर विमल नगरला अवघ्या २३. सन १९०५ यावर्षी प्रथम बडोद्यात फीमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये इंग्रजीचा प्रारंभ झाला मराठी बाहेर पडलेल्या काही दक्षिणी व गुजराती विद्यार्थिनी त्या वर्गात

दाखल झाल्या लवकरच त्याचे हायस्कूलमध्ये रूपांतर झाले सन १९१० -११ यावर्षी सदर शाळेला मुंबई विश्वविद्यालयाने आपली मान्यता दिली. त्या वर्षी शाळेत विद्यार्थिनींची संख्या १७१ होती व त्यापैकी एक विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेत उत्तीर्णही झाली. आज ही संख्या किती वर पोहोचली आहे हे सर्वश्रुत आहेत पण यामागे श्रीमंत सयाजीराव महाराजांचेच योगदान आहे.

**उपसंहार :**

प्रजेचे कल्याण हेच माझे कर्तव्य आणि तोच माझा मोक्ष ही श्रीमंत महाराजांची प्रतिज्ञा! प्रजेचे कल्याण शिक्षणाशिवाय व विशेषतः स्त्री शिक्षणाशिवाय होणे नाही हे त्यांना निसंग:धिग्ध पटले त्याच्या अनुरोधाने एक निष्ठेने त्यांनी प्रयत्न सुरू केले महाराजांच्या प्रयत्नांना गोडफळे आली. शिक्षणाचा प्रसार व्हावा साक्षरता वाढावी. इतकेच नव्हे तर इंग्रजी शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या वाढवावी स्त्रियांच्या स्वतंत्र संस्था काढण्याचा सुयोगही यावा इत्यादी श्रीमंतांची सुख स्वप्ने आज प्रत्यक्ष व्यवहारात उत्तीर्ण झालेली दिसत आहेत. साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे विद्यार्थिनी शेकडोनी शिक्षण घेत आहेत फिमेल ट्रेनिंग कॉलेज मधली शिक्षकांची उणीव दूर झाली. आहे महिला अनेकविध विषयांचा उच्च दर्जाचा अभ्यास करीत आहेत. यामुळे आज प्रत्येक जान शिक्षण क्षेत्रातील विशेषतः स्त्री शिक्षणाच्या या महनीय कामगिरीबद्दल श्रीमंत महाराजांना प्रणाम केल्याशिवाय राहणार नाही.

**निष्कर्ष :**

अशाप्रकारे सयाजीराव गायकवाड यांनी स्वातंत्र्यपूर्वक काळात शिक्षणाचे महत्त्व ओळखून एकंदरीत संपूर्ण बडोदा संस्थान तसेच भारतभर शिक्षणाचा प्रसार केला. शिक्षक जय महत्त्व ओळखणारे सयाजीराव गायकवाड हे पहिलेच महाराज होते. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून पुढील शिक्षणाचा पाया घट्ट केला. अशा प्रकारे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक कार्य अवलौकिक असे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. बाबा भांड, युगदृष्टा महाराजा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ३०

२. एकनाथ पगार, महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ क्र. ७५.

३. सौ. मंदा हिंगुराव, अनु सुषमा करोगाल, महाराज सयाजीराव आणि स्त्री शिक्षण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ ३४

४. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि महाराष्ट्र शैक्षणिक संबंध, आंतरजाल.


■■■

ISSN No. 2394-5990

# महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड

**डॉ. प्रतिभा रंगराव बिरादार**
समाजशास्त्र विभाग
माऊली महाविद्यालय वडाळा
ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर
मो.नंबर ९०११९७७३६७०

**गोषवारा :**

महाराष्ट्राच्या राजकीय शैक्षणिक प्रबोधनात्मक आणि सुधारणावादी चळवळीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान मोलाचे आहे. पंडित मदन मोहन मालवीय यांनी 'हिंदुस्थानचा शेवटचा आदर्श राजा' या शब्दात त्यांचे वर्णन केले आहे. अशा सुधारकांचे दिनांक ६ फेब्रुवारी १९३९ रोजी मुंबई येथे निधन झाले. राष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे विचार आणि त्यांचे कृती ही दिशा देणारी आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाराज सयाजीराव गायकवाड हे अत्यंत बुद्धिमान चिकित्सक दृष्टीचे होते. त्यांनी जगभर प्रवास केला. जिथे जिथे चांगले जाणवले अनुभवले त्याचा त्यांनी स्वीकार केला आणि आपल्या संस्थानाच्या विकासासाठी त्यांनी ते कृतीत आणले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदे संस्थानाचा विकास अत्यंत कलापूर्ण दृष्टिकोनातून केला होता त्यामुळे बडोदे ही कलापूर्ण व प्रेक्षणीय नगरी ठरली. एक सामाजिक जाणीव प्रगल्भ असलेला आणि सामाजिक भान असलेला राजा माणूस असे त्यांचे वैशिष्ट्य आणि वेगळेपण सांगता येईल. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल आयुष्य प्रत्यक्ष समाज उद्धारासाठी वापरल. शेतकरी, महिला, विद्यार्थी, साहित्य, कलावंत, समाजसेवक, संशोधक ,धर्म संस्था, अनेकांशी त्यांनी आपल्या व्याख्यानातून संवाद साधला. लंडनचे मानव विद्या परिषद,शिकागोचे धर्म परिषद, जपान मधला सत्कार समारंभ, संगीत परिषद, ग्रंथ संपादक मंडळ, बुद्धिस्ट असोसिएशन,भगवान बुद्ध आणि शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांचे उद्घाटन अशा सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी आपले योगदान दिले.

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म १७ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यातील काळवणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गोपाळराव काशिनाथ गायकवाड हे होते. खंडेराव गायकवाड हे बडोदे संस्थानाचे संस्थानिक होते. त्यांनी बडोदे संस्थानावर चौदा वर्षे राज्य केले. खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी जमनाबाई यांनी गोपाळराव काशीराव गायकवाड यांना दिनांक २७ मे १८७५ रोजी दत्तक घेतले व त्यांचे नाव सयाजीराव गायकवाड (तिसरे) असे ठेवले. महाराष्ट्रातील एक विभूती सामाजिक सुधारणांचा पुढारी, अस्पृश्यांचा एकमेव कैवारी संस्थानिकातील दृष्ट्या असे सयाजीरावांचे प्रतिमा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी उभारले आहे. इतिहासाचार्य विकास राजवाडे म्हणतात की, 'भारतातील शंभर वर्षातील कर्तुत्वान व्यक्तीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख पहिल्यांदा करावा लागेल'. स्वातंत्र्यपूर्व काळात ६४ वर्षे राज्य करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक विचारवंत राजा आहे. ते बारा वर्षापर्यंत निरक्षर होते. राज्यपद स्वीकारल्यानंतर त्यांना अंक आणि अक्षरांची ओळख झाली. महाराजा सयाजीराव गायकवाड हे स्वातंत्र्यपूर्व काळातील बडोदे संस्थानाचे संस्थानिक होते. नर्मदा व मही नद्यांच्या दरम्यान बडोदे संस्थानाची व्याप्ती होते. महाराजा सयाजीराव गायकवाड हे उदारमतवादी दृष्टिकोन, व्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्करते होते. समाजातील सर्व घटकांची प्रगती झाल्याशिवाय राज्याची प्रगती होत नाही, म्हणून आपल्या संस्थानातील अस्पृश्य व मागास समजल्या जाणाऱ्या लोकांचे महाराजांनी प्रबोधन केले. त्यांच्या पारंपारिक साहित्याचे जतन केले, त्यांच्यासाठी मोफत शिक्षण, वस्तीग्रह, आरोग्य, राजकीय सहभाग, सामाजिक समता याविषयीची कायदे केले. त्यांच्या पारंपारिक व्यवसायांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन अस्पृश्यांना स्वालंबी बनविले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'सयाजीराव महाराजा इतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही काम केलं नाही'. शिक्षणामुळे मानवाच्या सर्व शक्तीचा विकास होतो. राजवाड्यातच नव्हे तर तळागाळातल्या जनतेपर्यंत शिक्षण पोहोचवून त्यांना विकसित करण्याचं कार्य सयाजीराव गायकवाड यांनी केला.

**तथ्य संकलन :**

संशोधन पेपर तयार करत असताना दुय्यम साधनांचा आधार घेऊन तथ्य संकलन करण्यात आले. उदा. ग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादीचा आधार घेण्यात आला.

**संशोधनाचा उद्देश :**

संशोधन पेपर तयार करताना खालील उद्देश मांडण्यात आले.

१. साहित्याचा आढावा घेणे

२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा आढावा घेणे.

३. मिळालेल्या तथ्याच्या आधारे निष्कर्ष मांडणे.

**ग्रहितकृत्य :**

संशोधन पेपर तयार करताना मांडलेले गृहीतकृत्ये हे पुढील प्रमाणे

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये अत्यंत उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण कार्य केले.

२. सयाजीराव गायकवाड यांनी स्त्री– पुरुष समानतेचे तत्व स्वीकारले होते.

३. राष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे विचार आणि त्यांचे कृती ही दिशा देणारी आहे.

४. महाराष्ट्राच्या राजकीय शैक्षणिक प्रबोधनात्मक आणि सुधारणावादी चळवळीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान मोलाचे आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा आढावा पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करण्यात आला.

**सामाजिक कार्य :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये अत्यंत उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी समाजातल्या वाईट प्रथा परंपरेला विरोध केला समाजामधील पडदा पद्धती, बालविवाह, कन्या विक्री, स्त्रियांचा वारसा हक्क, विधवा विवाह, अस्पृश्यता निर्मूलन इत्यादी संदर्भात प्रत्यक्षात सुधारणा घडवून आणल्या. घटस्फोटासंबंधीचा कायदा संपूर्ण भारतात सर्वप्रथम सयाजीराव गायकवाड यांनी लागू केला. केवळ कायद्याच्या माध्यमातून समाजातील अस्पृश्यता दूर होऊ शकत नाही तर लोकांचे मतपरिवर्तन झाल्यानंतर समाजातील अस्पृश्यता ही भावना नष्ट होऊ शकते याची त्यांना जाणीव होती. सामाजिक सुधारणा तत्पर होत नसून सामाजिक सुधारणा या हळूहळू घडून येतात. जातीसंस्थेमुळे सामाजिक समता मानवी हक्क याच्यावर आघात होते. एक माणूस दुसऱ्या माणसापासून दुरावतो. एक माणूस दुसऱ्याला गुलामगिरीच्या गर्दीत ढकलून देतो. हे वाईट असून अस्पृश्यता निवारण करण्यासाठी सयाजीराव गायकवाड यांनी अतोनात प्रयत्न केले. त्यांच्यामध्ये जातीयता वर्णभेद हे सारे मनुष्याने निर्माण केल्या असून भौतिक सामाजिक परिस्थिती अशा वाईट प्रथांना जन्म देते. असे त्यांचे स्पष्ट मत होते. मनुस्मृतीमधील अस्पृश्येच्या संदर्भात जे नियम सांगितले गेले. त्याला त्यांनी प्रखर विरोध केला धर्माच्या नावाखाली अज्ञानाचा आणि वाईट बुद्धींचा प्रसार केला जातो. जन्मावरून जात वर्ण ठरविणे आणि माणसाच्या गुणाकडे दुर्लक्ष करणे हे त्यांना मुळीच आवडत नसे. अस्पृश्यांचा उद्धार करण्यासाठी जातिभेद नष्ट करण्यासाठी समतेचे विचार मांडण्यासाठी १८८२ साली त्याने १८ शाळा अस्पृश्यांसाठी काढल्या. सयाजीराव गायकवाड यांची भूमिका करते सुधारका सारखी होती. अस्पृश्यांसाठी शाळा काढणे विद्यार्थी जमा करणे, सर्वांना समजून सांगणे, शिक्षक मिळवणे, अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या निर्वाहाची सोय करणे ही कामे करताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीग्रह काढले. सयाजीरावाने स्थापन केलेल्या सहकारी पतपेढ्या मध्ये ३६० अस्पृश्य सभासदांना लाभ दिला होता. दवाखाने, कोर्ट ,सरकारी कचऱ्या, ग्रंथालय अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले होते. सयाजीरावांनी त्यांचे खंडेरावाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केल. सार्वजनिक वापरायचे रस्ते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक उपयोगाच्या किंवा सरकारी निधीवर चालणाऱ्या निधर्मी संस्थांमध्ये अस्पृश्यांना वापर करण्याचा अधिकार देण्यामागे समता हे तत्व स्वीकारलेले होते.

**स्त्रीउद्धार संदर्भातील कार्य :**

सयाजीराव गायकवाड यांनी स्त्री पुरुष समानतेचे तत्व स्वीकारले. शाळा ,व्यवसाय, शिक्षण संस्था, नोकरी येथे स्त्रियांना हक्काने सहभाग मिळवण्यासाठी त्यांचा आग्रह होता. मुलींना शाळेत पाठवण्याचा आग्रह त्यांनी आयुष्यभर केला. बालविवाह प्रतिबंधक कायदा त्यांनी केला. प्रजेसाठी स्वीकारलेले धोरण राजघराण्यातील स्त्रियांसाठी देखील होते. पडदा पद्धतीला त्यांनी विरोध केला. राजवाड्यातील स्त्रियांना देखील पडदा पद्धती अमान्य केले. युरोपमधील स्त्री जीवन आणि भारतामध्ये स्त्रियांवरील बंधने याचा तुलनात्मक अभ्यास ते करत असे. स्त्रियांच्या सामाजिक प्रतिष्ठेसाठी त्यांनी कायद्यांची निर्मिती केली. सयाजीरावाने हिंदू विवाह विच्छेदक कायदा करून ब्रिटिश प्रदेशातील लोकांनाही आश्चर्याचा धक्का दिला. सयाजीराव यांच्या मते अनिश्चेने संस्कार म्हणत एकत्र राहण्याने व्यक्तीचे आणि समाजाची शांती, सुव्यवस्था ढासळते. राष्ट्राची हानी होते. घटस्फोटाच्या कायदेशीर अधिकारामुळे स्त्रियांना सुरक्षितता आणि दिलासा मिळाला. वारसा हक्काच्या तरतुदीमुळे स्त्रियांच्या वडिलोपार्जित आणि पतीकडील संपत्तीत वारसा हक्क

पक्का झाला. बडोदे राज्यातील स्त्रियांना कायदे आणि सुधारणा योजना यांचा चांगला लाभ झाला. स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचे बळकटीकरण होण्यास मदत झाली. हिंदू विधवांच्या स्थिती सुधारणा व्हावे म्हणून त्यांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी अधिकार सुरक्षित केले. समता, व्यक्ती स्वातंत्र्य, मालमत्ता संपादन हक्क अशा बाबी सयाजीरावांनी स्त्री विषयक सुधारणां लक्षात घेतल्या अप्रत्यक्षपणे त्यांना अंतर्भूत करून घेतले. स्त्रियांसाठी पारंपारिक अभ्यासक्रमाबरोबरच भरतकाम. चित्रकला, पाकशास्त्र, गृह अर्थशास्त्र, संस्कृत, विणकाम यांचाही समावेश शिक्षणामध्ये केला.

**आर्थिक कार्य :**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी १८८१ रोजी गादीवर बसून प्रशासकीय जबाबदारी सांभाळण्यास सुरुवात केली. त्यांनी राज्याच्या आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टिकोनातून विविध प्रकारच्या उपाययोजना राबवल्या राष्ट्र विकासाचे मूळ हे आर्थिक विकासात आहे. हे जाणून राज्याचा आर्थिक विकास करण्यावर त्यांनी भर दिला. महाराजांनी आपल्या राज्यात रेल्वे आणि सडकांचे जाळे उभारले, सहकारी बँका स्थापन केल्या ,कारखाने काढले, शेती विकासासाठी जलसंधारण नालाबल्डींग ,शेतीसाठी आधुनिक अवजारांचा वापर करून कृषी शिक्षणाला चालना दिली. सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानातील कृषी सहकार आणि औद्योगिक विकासाला आधारभूत असे बडोदा बँक उभारली. या बँकेच्या माध्यमातून अनेक लोक उपयोगी योजना राबवल्या. कमी व्याजदरात कर्जपुरवठा मिळाल्याने नवीन उद्योजकांना उद्योग स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. बँकेच्या माध्यमातून लोकांच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानामध्ये रेल्वे मार्ग विकसित करून सर्व संस्था रेल्वेने जोडले. संस्थांच्या मालकीची जलविद्युत निर्मिती संस्था स्थापन केली. ओखा बंदरासारखे बंदर विकसित करून व्यापार उद्योगाला चालना दिले. कापड गिरण्या, रासायनिक उद्योग, साखर उद्योग यासारख्या मोठ्या उद्योगाबरोबरच त्या ठिकाणच्या पारंपारिक उद्योगाला देखील त्यांनी प्रोत्साहन दिले. सयाजीराव गायकवाड यांनी राबवलेले औद्योगिक धोरण, कृषी औद्योगिक विकासाची केलेली पाय भरणे व उद्योगधंद्याचे कुशल व्यवस्थापन आणि बडोदातील औद्योगिक शिक्षणाची व प्रशिक्षणाची केलेली सोय या सर्वातून भारताच्या औद्योगिक विकासाचे एक सयाजी मॉडेल आकाराला आलेले दिसून येते.

**शैक्षणिक कार्य :**

खेड्यापाड्यापर्यंत शिक्षण पोहोचल्याशिवाय जनतेचे व राष्ट्राचे कल्याण होणार नाही हे ओळखून प्राथमिक शिक्षणाचा कायदा राज्यभर लागू करण्यात आला. शाळा, विद्यालय, शिक्षक, प्रशिक्षण विद्यालय, उच्च शिक्षण संस्था यांची स्थापना सयाजीराव गायकवाड यांनी केले. इंग्रजी, गणित, भाषा ,शास्त्रीय अशा विषयांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला. मुलांच्या शिक्षणाइतकेच मुलींच्या शिक्षणाला महत्त्व दिले गेले. पुढे बडोदा कॉलेजची स्थापना होऊन उच्च शिक्षणात आधुनिक सिद्धांतिक आणि प्रात्यक्षिकावर आधारलेले शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले.महाराज सयाजीराव गायकवाड यांचा शैक्षणिक दृष्टिकोन अत्यंत दुर्गामि होता.अद्यावत तंत्रशिक्षण, वैद्यकीय सेवांचे प्रशिक्षण, स्त्रियांसाठी व्यायामशाळा, सकस आहार निर्मितीचे शिक्षण अशा कितीतरी प्रागतीक शिक्षणाचा पाया त्यांनी घालून दिला. त्यांनी औद्योगिक व कला शिक्षणाकरिता 'कलाभुवन' ही संस्था स्थापन केले ङ्गराज्य विद्यामंदिरफ्या संस्थेच्या माध्यमातून प्राचीन संस्कृत ग्रंथाचे संशोधन व प्रकाशन करण्यास प्रेरणा दिले.महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ज्ञानाच्या प्रसार आणि प्रचारासाठी 'श्री सयाजी साहित्य माला' व 'श्री सयाजी बाल ज्ञानमाला' या दोन मालांमधून उत्तम ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध केले. समाज मनात वाचनाची आवड निर्माण व्हावी वाचनातून ज्ञान प्राप्ती व्हावी आणि ज्ञानप्राप्ती म्हणून जीवनदृष्टी विकसित व्हावी यासाठी त्यांनी गावोगावी वाचनालय स्थापन केले एवढ्यावरच ते थांबले नाही तर त्यांनी फिरत्या वाचनालयाची देखील सोय केली. आज आपण फिरत्या शाळा, फिरत्या प्रयोगशाळा, फिरते वाचनालय या संकल्पना आधुनिक म्हणून स्वीकारल्या असल्या तरी हा प्रयोग महाराष्ट्र सयाजीराव गायकवाड यांनी फार पूर्वीच केलेला आहे.

**राजकीय कार्य :**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी इसवी सन १८७५ ते १९३९ या कालावधीमध्ये सामंतशाहीच्या राजवटीच्या परंपरेला छेद देऊन लोकशाही शासन पद्धतीचा अनोखा प्रयोग राबवीला. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या जीवन मूल्यांची आपल्या राज्यकारभारात आणि लोक व्यवहारात अंमलबजावणी केले. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी राज्यकारभार कसा असावा याचे शिक्षण सर.टी.माधवराव यांच्याकडून घेतले. १८८१ रोजी सयाजीराव गायकवाड गादीवर बसले. प्रशासकीय जबाबदारीचे विभागणी हे तत्व राज्यकारभारत लागू करून राज्य यंत्रणेत सुरळीतपणा निर्माण केला. आपल्या राज्यामध्ये त्यांनी सल्लागार नेमून कल्याणकारी योजना अमलात आणल्या. ग्रामपंचायतीचे पुनर्जीवन केले. न्यायव्यवस्थेत सुधारणा केल्या. भारताच्या इतिहासात बडोदा संस्थान हे आधुनिक भारताच्या लोकशाहीची प्रयोगशाळा म्हणून ओळखली जाते. स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणारा पहिला महाराजा असे सयाजीरावांची ओळख करून दिली

जाते. राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग असावा असे त्यांचे धोरण होते. लोकल बोर्ड, नगरपालिका, कौन्सिल यांच्यात स्त्रियांना कायदेशीर सदस्यत्व त्यांनी दिले. स्त्रियांच्या सामाजिक स्थानाची प्रतिष्ठा त्यांना महत्त्वाचे वाटत होते. त्यांचा राजकीय प्रक्रिया, निर्णय प्रक्रिया यातला सहभाग व्यक्तिस्वातंत्र्य, समता प्रस्थापन करणारा ठरेल याची शाश्वती त्यांना होती.

**निष्कर्ष :**

१) अस्पृश्यता निवारण करण्यासाठी सयाजीराव गायकवाड यांनी अतोनात प्रयत्न केले. त्यांच्यामते जातीयता, वर्णभेद हे सारे मनुष्याने निर्माण केल्या असून भौतिक सामाजिक परिस्थिती अशा वाईट प्रथांना जन्म देते, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

२) स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणारा पहिला महाराजा असे सयाजीरावांची ओळख करून दिली जाते राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग असावा असे त्यांचे धोरण होते.

३) ज्ञान निर्मिती, ज्ञान संवर्धन आणि ज्ञानाचे प्रजेच्या कल्याणासाठी उपयोजन ही सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक कार्य चित्रे आहेत. विद्या व्यासंगातून त्यांनी आपल्या राज्यात शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या.

४) जुन्या सामाजिक चालीरीती, प्रथा, परंपरा याचा चिकित्सक अभ्यास करून ते सुधारण्यावर भर दिला. त्यांनी कृतीतून कार्य केले. प्रजेच्या कल्याणासाठी सुधारणात्मक कायद्याची तरतूद सयाजीराव गायकवाड यांनी केले

५) पारंपरिक शिक्षणाबरोबर सयाजीराव गायकवाड यांनी कलाशिक्षण, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण अशा रोजगारभिमुख शिक्षणाच्या सोयी आपल्या राज्यात निर्माण केल्या.

६) समाज मनात वाचनाची आवड निर्माण व्हावी वाचनातून ज्ञान प्राप्ती व्हावी आणि ज्ञानप्राप्ती म्हणून जीवनदृष्टी विकसित व्हावी यासाठी त्यांनी गावोगावी वाचनालय स्थापन केले एवढ्यावरच ते थांबले नाही तर त्यांनी फिरत्या वाचनालयाची देखील सोय केली. आज आपण फिरत्या शाळा फिरत्या प्रयोगशाळा फिरते वाचनालय या संकल्पना आधुनिक म्हणून स्वीकारल्या असल्या तरी हा प्रयोग महाराष्ट्र सयाजीराव गायकवाड यांनी फार पूर्वीच केलेला आहे.

७) महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये अत्यंत उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण कार्य केले त्यांनी समाजातल्या वाईट प्रथा परंपरेला विरोध केला समाजामधील पडदा पद्धती, बालविवाह ,कन्या विक्री, मिश्र विवाह, स्त्रियांचा वारसा हक्क, विधवा विवाह, अस्पृश्यता निर्मूलन इत्यादी संदर्भात प्रत्यक्षात सुधारणा घडवून आणल्या. घटस्फोटासंबंधीचा कायदा संपूर्ण भारतात सर्वप्रथम सयाजीराव गायकवाड यांनी लागू केला.

८) राष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे विचार आणि त्यांचे कृती ही दिशा देणारी आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाराज सयाजीराव गायकवाड हे अत्यंत बुद्धिमान, चिकित्सक दृष्टीचे होते. त्यांनी जगभर प्रवास केला. जिथे जिथे चांगले जाणवले अनुभवले त्याचा त्यांनी स्वीकार केला आणि आपल्या संस्थानाच्या विकासासाठी त्यांनी ते कृतीत आणले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदे संस्थानाचा विकास अत्यंत कलापूर्ण दृष्टिकोनातून केला होता. त्यामुळे बडोदे ही कलापूर्ण व प्रेक्षणीय नगरी ठरली.

९) सयाजीराव गायकवाड यांनी राजेशाही चे लोकशाहीत रुपांतर करण्याचा धाडसी प्रयोग करून भारताच्या जडणघडणीचा पाया रचला.

**संदर्भ ग्रंथ :**

१. भांड बाबा ,आधुनिक भारताचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन औरंगाबाद. (२०१९)

२. गायकवाड फत्तेसिंहराव, सयाजीराव ऑफ बडोदा, पॉप्युलर प्रकाशन बॉम्बे. (१९८९)

३. नेने दा.वी. श्रीमंत सयाजीराव गायकवाड, श्री गंधर्व वेद प्रकाशन पुणे. (२०१०)

४. वरखेडे रमेश, (संपादक) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह- भाग एक, औरंगाबाद महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती.( २०१७)

५. जोशी लक्ष्मण शास्त्री, मराठी विश्वकोश खंड- चार, मुंबई महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ (१९७६)

६) पगार ओकनाथ, महाराष्ट्राचे शिल्पकार सयाजीराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ मुंबई (२०१८)

७) https://sahitya.marathi.gov.in

■■■

ISSN No. 2394-5990

# उपेक्षितांच्या शिक्षणाचे अग्रगण्य प्रणेते राजर्षी सयाजीराव गायकवाड

**प्रा.कल्याण राजेंद्र वटाणे**
(इतिहास विभाग)
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर (स्वायत्त)
Email ID: kallyanwatane@gmail.com
मो.९८६०११६१७६

**प्रस्तावना:**

मनुष्य हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. तो निसर्गातील निरंतर माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे विश्वाचे अनेक पैलू उज्याडात येतात. या अंगांचा अभ्यास वेगवेगळ्या विद्याशाखांमधून केला जातो. तसेच इतिहास या शाखेच्या अंतर्गत इतिहास लेखन शास्त्रातून तिची मांडणी केली जाते,व यातून आपल्याला निरंतर माहिती मिळते. या माहितीच्या साह्याने मानव अखंडपणे विकासासाठी धडपडतो. इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोन्हींचा अवाका आहे.यामुळे अनेक वेळा दुर्लक्षित किंबहुना उपेक्षित राहणारे विशिष्टतेचे विविध पैलू प्रादेशिक इतिहासाने प्रकाशात येत असतात.[१] इतिहास अभ्यासाची चौकट विस्तारली असून संशोधक मनुष्य जीवनाच्या विविध आयामांचा अभ्यास वेगवेगळ्या पातळीवर करू लागले आहेत. शिक्षण हा एक महत्त्वाचा पैलू मानवी जीवनात मानला जातो. व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि नैतिक विकास करून मनुष्याला समाजाच्या उन्नती करण्यायोग्य बनविण्याचे काम शिक्षण करत असते,म्हणून शिक्षण फार महत्वाचे आहे. विज्ञानाच्या पायावर आधारलेल्या आजच्या जगातील प्रत्येक देशाचा विकास, सामाजिक प्रगती, लोककल्याण व सुरक्षितता या गोष्टी शिक्षण आणि संशोधनावर अवलंबून आहेत.[२] आपले अधिकार व सत्तेचा वापर सामान्य जनतेच्या कल्याणासाठी करणारे काही हाताच्या बोटावर मोजता येणारे संस्थानिक या देशात होऊन गेले.ज्यामध्ये राजर्षी सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. आपल्या लोककल्याणकारी भूमिकेमुळे त्यांनी शैक्षणिक सुधारणा चळवळीला मोठ्या प्रमाणात चालना दिली आहे,म्हणून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

**शैक्षणिक कार्य:**

राज्य कारभार करणे हे एक शास्त्र आहे. याकरिता राजा ज्ञानसंपन्न व परिपक्व असणे अधिक गरजेचे असते. या भावनेतून स्वतः ज्ञान मिळवले. आणि शिक्षण व विज्ञानाला परिवर्तनाचे साधन मानले. आधुनिक काळामध्ये केवळ भौतिकच प्रगती झाली असे नाही,तर वैचारिक व मूल्यात्मक प्रगती सुद्धा झाली आहे.[४] बडोदा संस्थानातील एक दूरदर्शी विद्वान राज्यकर्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या शासन कालखंडामध्ये अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या त्यातीलच एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे त्यांचे शैक्षणिक कार्य होय शिक्षण हे परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे,म्हणून महाराजांनी सन १८८२ सली हुकूम काढला.[५] व सरकारी खर्चाने आदिवासी अस्पृश्य लोकांसाठी सेनगड भागात शाळा सुरू करण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना (कायदा१८९३) लागू करून क्रांतिकारी पाऊल उचलले. खेड्यापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचल्याशिवाय लोक व राष्ट्राचे कल्याण होणार नाही हे ओळखून प्रबोधनाच्या भूमिकेतून प्राथमिक शिक्षणाचा कायदा(१९०६) संपूर्ण राज्यात लागू केला,शिवाय गुणग्राहक कृतीने चांगले आचार अन उपचार स्नेही मार्गदर्शक शिक्षण विचारवंत व तज्ञ यांच्याशी चर्चा, संवाद, सहविचार, सहमती सारख्या मार्गाने शिक्षणाचा विस्तार केला. यातूनच अनेक शाळा, विद्यालये,शिक्षण प्रशिक्षण विद्यालये, उच्च शिक्षण संस्थांची स्थापना केली.अल्पावधीतच ही योजना सर्व राज्यभर लागू केली संपूर्ण भारतामध्ये मोफत आणि सक्तीचे शिक्षण लागू करणारे बडोदा संस्थान हे देशातील पहिले राज्य ठरले.[६] (१९०६) तसेच गरीब गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय केली,हे उल्लेखनीय आहे.

औद्योगिक कलाशिक्षणासाठी कला भुवन ही संस्था स्थापन केली.त्यांनी प्राच्यविद्यामंदिर या संस्थेच्या वतीने प्राचीन संस्कृत ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन करण्यास उत्तेजन दिले ‘श्रीसयाजी साहित्यमाला’ व ‘श्रीसयाजी बाल ज्ञानमाला’ यासारख्या माला मधून उत्कृष्ट ग्रंथ ग्रंथांची भाषांतरे केली. ग्रंथालय शास्त्राचे स्वतः शिक्षण घेतलेल्या सयाजीरावांनी वाचनाचे महत्त्व लोकांना पटवून देऊन संस्थानातील गावागावी वाचनालये तर निर्माण केलीच शिवाय फिरत्या वाचनालयाची ही सोय केली. यातून

वाचनाचे महत्त्व लोकांना पटवून देणे किती महत्त्वाचे आहे. हे त्यांनी अधोरेखित केले. शिवाय इंग्लंड व अमेरिकेसारख्या देशातील शिक्षण व्यवस्था व ग्रंथालय यांनी प्रभावित होऊन ग्रंथालय तज्ञ बॉर्डन यांना भारतात बोलावून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण संस्थानांमध्ये ग्रंथालयांचे जाळे निर्माण केले.[७] फिरती व ग्राम ग्रंथालय सुरू करणारे राजर्षी सयाजीराव गायकवाड खऱ्या अर्थाने भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक मानले तर वावगे ठरू नये.

अस्पृश्यतेची निवारण आणि हरिजन विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरू केल्या अर्थात ज्यावेळी भारतातील समाजसुधारक अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे मार्ग शोधत होते.त्यावेळी सयाजीरावांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा उघड्या केल्या होते, हे अर्थपूर्ण आहे.खेडेगावांत ग्रामीण शाळा काढून ग्राम व्यवस्थेत शाळा आणि शिक्षकांना महत्त्व देण्यात आले. ग्रामीण भागातील लोकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून प्रसार करणे हे त्यांचे उद्दिष्ट असलेले आपणास दिसते. त्यांची दूरदृष्टी व उदारता मोठ्या प्रमाणात शिक्षणामध्ये ठळकपणे दिसते.

राज्याच्या एकूण महसुलाच्या ६.८% शेकडा प्रमाण खर्च शिक्षणावर केला जात असे. यातून त्यांची शिक्षणाची तळमळ दिसून आल्याशिवाय राहत नाही. प्रख्यात अर्थतज्ञ सयाजीरावांचे मंत्री रमेशचंद्र दत्त यांच्या मते, मशिक्षणावर करावयाचा खर्च हा खर्च नसून सुसंस्कृत माणूस घडविण्यासाठीची गुंतवणूक असते. हेच सयाजीरावांनी ओळखले होते.[८] शिक्षकांना बडोदा संस्थानाचे नोकर व ज्ञान संवर्धक म्हणून प्रतिष्ठेचे मानले होते. महाराजांनी त्यांना इंग्रज सरकारपेक्षा चांगले वेतनही दिले होते. किंबहुना इतर राज्यांच्या तुलनेत ही शिक्षणाबाबत बडोदे अग्रभागी राहिले. हेच सयाजीरावजी कर्तुत्व होय. युरोप अमेरिकेचे शिक्षण पद्धती आणि ज्ञान निर्मिती आपल्या लोकांना समृद्ध करेल, या धारणेतून परंपरागत देशी शिक्षणाला उच्च व आधुनिक ज्ञान शाखांचे बळ मिळवून दिले. हे महत्वपूर्ण आहे. धर्म व जातीच्या आधारे भेदभाव न करता शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सारख्या योजनांनी उच्च व परदेशी शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला तसेच कलावंत, उद्योजक व व्यवसाय तज्ञ निर्माण करणारे भारतातील पहिले आधुनिक प्रशिक्षण केंद्र म्हणून बडोदा संस्थान पुढे आलेले दिसते.

स्त्रीशिक्षण: सयाजीराव गायकवाड यांनी स्त्री स्वातंत्र्यवादी भूमिकेतून स्त्री शिक्षणाची विशेष काळजी घेतली.त्यांच्या शिक्षणाचा हक्क मान्य करून मुलाइतकेच मुलींच्या शिक्षणास महत्त्व दिले.स्त्री क्षमता विकासासाठी सन १८८२ च्या जाहीरनाम्यानुसार त्यांनी आपले शैक्षणिक धोरण निश्चित केले, जे महत्त्वपूर्ण आहे सन १९०६ सारख्या कायद्याने इस १९१५ च्या स्वतंत्र मुलींच्या शाळा काढल्याने मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढण्यास मदत झाली. सामाजिक जीवनात मुलींना आपली जबाबदारी पार पाडता यावी म्हणून त्यांनी विशेष प्रयत्न केले. आणि स्त्री शिक्षण विषयक कृती कार्यक्रम हाती घेतला. स्त्री पुरुष समतेचा विचार शिक्षणातून मिळावा म्हणून स्त्री शिक्षण प्रसाराला अग्रक्रम दिला.[९] हे उल्लेखनीय आहे. जन्मदात्री स्त्री रूप ज्ञानशक्तीचे रूप व्हावे. याकरिता स्त्री शिक्षणाचा आग्रही आणि पुरोगामी विचार व उपक्रम त्यांनी तदहयात राबविलेला दिसतो. पूजेच्या संदर्भातील दायित्व कसोशीने राबविणारे राजर्षी सयाजीराव हे स्त्री शिक्षणाच्या अग्रगण्य प्रनेते ठरतात. स्त्रीच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन स्त्री शिक्षण संस्था, कायदा, निधी, सुविधा निर्माण केल्या. महाराणी चिमणाबाई समवेत स्त्री-पुरुष क्षमतेचा वस्तूपाठ निर्माण केला,हे उल्लेखनीय आहे.

**समारोप :**

शिक्षणाच्या सहाय्याने प्रजा व राज्याचे हित साधण्यासाठी सयाजीराव गायकवाड यांनी मूलभूत कार्य केले.सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणासारखा कायदा केला. शिवाय आदिवासी व अस्पृश्य मुलाकरिता शिष्यवृत्ती,शिक्षक प्रशिक्षण स्त्रियांसाठी प्रौढ शिक्षण वर्ग महिला मंडळ तज्ञ शिक्षकांची नियुक्ती व एतदेशिय तज्ञांची निर्मिती केली. कलाभवना सारख्या संस्था, ग्रामीण वाचनालय उभे केले. जात,धर्म, भाषेच्या भेदापलीकडे जाऊन लोकांच्या शिक्षणाच्या उत्थाणाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी भारतामध्ये नवनवीन अभ्यास क्षेत्रे अभ्यास विषय व शैक्षणिक तत्त्वज्ञान महाराजांनी निर्माण करून नवे शिक्षण भारतामध्ये रुजवले. राज्य व देशांमध्ये आधुनिक व प्रगत शिक्षण व्यवस्था निर्माण करावयाची झाल्यास सयाजीराव यांचा आदर्श शैक्षणिक कार्यक्रमांना अग्रस्थान द्यावे लागते. ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन, आणि ज्ञानउपयोजन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून आपल्या राज्यात शैक्षणिक सुधारणा व समाज परिवर्तन घडवून आणले.

**तळ टीपा :**

१. राजा दीक्षित, मआधुनिक भारताचा व चीनचा इतिहास, प्रगती प्रकाशन, पुणे. आवृत्ती १०,२००५, पृ. क्र.८९
२. बाबा भांड, युगदृष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती१०वी २०१७. पृ. क्र.८५.
३. मंदा हिंगुराव, महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.२००५.पृ.क्र.१३.

ISSN No. 2394-5990


४. डॉ. स्नेहल तावरे व इतर जीवनवेध (संपा) लीलावती प्रकाशन सावेडी अहमदनगर प्रथम आवृत्ती २०१४. पृ. क्र. ७२.
५. डॉ.जी. बी. शहा, विसाव्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. २०२३. पृ. क्र. १५६.
६. सयाजीराव गायकवाड यांची भाषण खंडे ३ साकेत प्रकाशन औरंगाबाद २०१३. पृ. क्र.८७.
७. उपरोक्त, भाषण पृ. क्र.९१.
८. उपरोक्त बाबा भांड पृक्र.८३.
९. उपरोक्त,डॉ.जी. बी. शहा,पृ. क्र.१६३.


■■■

# समाज परिवर्तन चळवळीचा दीपस्तंभ - महाराज सयाजीराव गायकवाड

**१) प्रो.डॉ.शिवाजी मारुती वाघमोडे**
प्रोफेसर व इतिहास विभाग प्रमुख
भारत महाविद्यालय, जेऊर.
Email - Dr.wshivajigmail.com
Mobile - 9420544470

**२) सहा.प्रा.श्री.अजित कालिदास चव्हाण**
जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे.
Email : Achavanajit71gmail.com
Mobile- 9527874471

**Abstract :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजरात मधील बडोदा या संस्थानाचे राजे होते. तथापि आपले अधिकार व सत्ता यांचा वापर राज्यातील सामान्य जनतेच्या कल्याणासाठी करणारे जे काही मोजके संस्थानिक या देशात होऊन गेले. अशा संस्थानिकामध्ये सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. आपल्या लोककल्याणकारी भूमिकेद्वारे त्यांनी समाज सुधारणेच्या चळवळीलाही मोठीच चालना दिली. त्यांच्या एकंदर कार्याचा महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या चळवळीलाही बराच लाभ झाला. महाराष्ट्रात समाज सुधारण्याचे कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना सयाजीराव गायकवाड यांनी सक्रिय मदत केली होती. महाराजांनी आपल्या संस्थानात ज्या काही क्रांतिकारक सुधारणा केल्या. या त्यांच्या कर्तुत्वामुळे त्यांची ख्याती देशातच नव्हे. तर जगभर झाली होती. महाराजांनी आपल्या प्रजेला सुखी करण्यासाठी ज्या सुधारणा केल्या यातून महाराजांची प्रजेविषयीची तळमळ समजते.

**Keywords** : महाराजा सयाजीराव गायकवाड, प्रशासन सुधारणा, न्यायव्यवस्था, सामाजिक सुधारणा, शेती सुधारणा, शैक्षणिक सुधारणा व औद्योगिक सुधारणा.

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे कृतिशील समाज सुधारक होते. महान राज्यकर्ते आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी आपल्या प्रजेच्या हितासाठी आपल्या राज सत्तेचा उपयोग केला. त्यांनी शिक्षणाचे औद्योगीकरणाचे महत्त्व वेळीच ओळखले होते. आधुनिक विचाराची कास धरल्याखेरीज भारतीय समाजाचा विकास होणे शक्य नाही. हे त्यांना आधीच उमजले होते. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानातील प्रजेला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. या एकाच गोष्टीवरून सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचे महत्त्व व त्यांचा दृष्टेपणा स्पष्ट होतो .स्त्रिया व मागासवर्गीय यांच्या शिक्षणाकडेही सयाजीरावांनी विशेष लक्ष पुरवले. आणि त्यासाठी स्वतंत्र सोयी उपलब्ध करून दिल्या. मागासवर्गीयांसाठी त्यांनी शाळा सुरू केल्या . सन१८९० मध्ये त्यांनी कलाभुवन ही संस्था स्थापन करून तंत्रशिक्षणाला चालना दिली. शैक्षणिक संस्था स्थापन करण्याबरोबरच लोकांमध्ये इतर मार्गांनीही ज्ञानाचा प्रसार व्हावा. याची काळजी सयाजीरावांनी घेतली होती. त्याकरिता संस्थानात त्यांनी गावोगावी वाचनालय उघडली गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था त्यांनी केली. त्यांच्या या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनी घेतला होता. त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या मान्यवर व्यक्तींचा समावेश होता. राज्यकर्त्याच्या ठिकाणी आवश्यक असणारा दूरदर्शीपणा त्यांच्याकडे पुरेपूर होता. अनेक सुधारणा देशात प्रथम अमलात आणण्याचा मान बडोदा संस्थानाने मिळविला होता. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान देण्यात आला. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या समग्र सुधारणांचा आढावा केवळ एका शोधनिबंधाच्या मर्यादा कक्षेत येणे अशक्य आहे .त्यामुळे प्रस्तुत ठिकाणी सयाजीराव गायकवाड यांच्या प्रमुख सुधारणांचा व दूरदर्शी विचारांचा आढावा या शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांची समाजसुधारणा विषयक भूमिका समजून घेणे.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या विविध क्षेत्रातील कार्याचा अभ्यास करणे.
३. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या सुधारणांचे व कार्याचे महत्त्व विशद करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक परिवर्तन चळवळीतील योगदान यावर केंद्रित असला. तरी त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय, न्यायव्यवस्था व

ISSN No. 2394-5990

औद्योगिक सुधारणेतील कार्याचा व विचारांचा अभ्यास केल्याखेरीज. या शोधनिबंधाचे महत्त्व स्पष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याशी संबंधित संदर्भ साधनाचा अभ्यास करून. प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती, विश्लेषण व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे

**प्रशासन सुधारणा :**

महाराजांनी आपल्या राज्यात अनेक सुधारणा केल्या. त्या सर्व करण्याआधी त्यांनी आपला राज्यकारभार सुधारला. अधिकाऱ्यांना शिस्त लावली प्रत्येक खात्याचे वेगळे नियम केले. नियम निर्मितीसाठी त्यांनी 'लॉकमिटी' नेमली. महाराजांनी आपल्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यासाठी 'धारासभा' नेमली. महाराजांनी आपले अधिकारी नेमताना गुणवत्तेला प्राधान्य दिले. योग्य अधिकारी निवडण्याकडेही महाराजांनी त्यावेळी लक्ष पुरविले.जात, धर्म, पंथ, देश वगैरे कोणत्याही प्रकारच्या भेदभावाचा विचार न करता. केवळ योग्यतेच्या धोरणानेच अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. पदवीधर लोकांनाच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागा दिल्या. न्याय खात्यात शक्यतोपर्यंत कायद्याची अखेरची पदवी मिळविलेल्या लोकांचीच नेमणूक करावयाची.विशिष्ट शिक्षण आवश्यक असलेल्या जागा शक्यतोवर परदेशात शिक्षण संपादन करून आलेल्या लोकांना आज द्यावयाच्या. व राज्यातील कनिष्ठ व मध्यम दर्जाच्या सर्व नोकराकडून सर्वसाधारण माहितीचे विषय ठेवलेल्या परीक्षा पास करावयाच्या असा प्रयत्न केला. सरकारने केलेले नियम लोकांना कळावेत त्यासंबंधी गैरसमज पसरू नयेत. म्हणून महाराजांनी ङ्गआज्ञापत्रिकाफ नावाचे साप्ताहिक सुरू केले. ते दर गुरुवारी प्रकाशित होत होते. सयाजीराव महाराजांनी राज्य प्रशासन सुधारावे यासाठी आधुनिक विचार केल्याची दिसते.

**न्यायव्यवस्था :**

महाराजांनी न्यायव्यवस्थेत अमुलाग्र बदल केला. त्यांनी संपूर्ण न्यायव्यवस्थाच बदलून टाकली. त्याकरिता त्यांनी अनुभवी माणसांची निवड केली. योग्य न्याय निवडण्यासाठी त्यांनी ङ्गलॉ कमिटीफ नेमली. त्यानंतरही महाराजांनी या कमिटीतील न्यायाधीशांना आपले न्यायदानाचे काम सांभाळून कमिटीचे काम करता येईना. म्हणून महाराजांनी १८९२ रोजी रिटायर्ड जज गाडगीळ यांना ब्रिटिश कायद्याप्रमाणे ङ्गसिस्टीक प्रोसिजर कोडफ बनवण्यास सांगितले. यानंतरची न्याय खात्यातील दुसरी सुधारणा म्हणजे महाराजांनी न्याय व अंमलबजावणी खात्याची विभागणी केली. महाराजांनी ही सुधारणा फार हळूहळू व सावधगिरीने अमलात आणली. या सुधारणेमुळे न्यायदानात सुटसुटीत पणा आला. तयार केलेले कायदे सर्वसामान्य जनतेला समजावेत. यासाठी महाराजांनी सर्व कायदे देशी भाषेत तयार केले.हा पण न्यायदानातील महत्त्वपूर्ण बदल होय. बडोदा राज्यातील जनतेची भाषा गुजराती असल्याने त्या भाषेत कायद्याचे भाषांतर केले.

**सामाजिक सुधारणा :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक क्षेत्रात काही क्रांतिकारक सुधारणा केल्या होत्या. ते समाज सुधारण्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. आपल्या संस्थानात त्यांनी घटस्फोटाचा कायदा लागू केला. असा कायदा करणारे व तो अमलात आणणारे बडोदा संस्थान हे भारतातील पहिलेच राज्य ठरले. अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह, मिश्र विवाह यासंबंधीच्या कायद्यांची त्यांनी आपल्या संस्थानात अंमलबजावणी केली होती. तसेच पडदा पद्धती बंदी, बालविवाह बंदी, कन्या विक्रीय बंदी इत्यादी सुधारणा त्यांनी प्रत्यक्ष अमलात आणल्या होत्या, सयाजीराव महाराजांनी सामाजिक सुधारणे संबंधित केलेले कायदे पाहिल्यावर त्या काळात देखील त्यांचा दृष्टिकोन किती पुरोगामी स्वरूपाचा होता. याची कल्पना येऊ शकते. यासंदर्भात ने आचार्य अत्रे यांनी लिहिले आहे की, सुधारणेच्या शिखरावर अरुढ झालेल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना ज्या गोष्टी भारतात इतरत्र करता आल्या नाहीत, त्या सर्व सुधारणा एकट्या सयाजीरावांनी आपल्या राज्यात केल्या.

**शेती सुधारणा :**

बडोदा संस्थानात शेती हे उपजीविकेचे मुख्य साधन होते. सहाजिक राज्याच्या उत्पन्नही मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून होते. म्हणून महाराजांनी शेती सुधारणेला महत्त्व दिले. शेतीत आधुनिकता आणली. महाराजांनी नवीन कर पद्धती, विहिरी खोदणे व सहकारी पतपेढ्या सुरू केल्या. जमिनीचे लहान तुकडे करण्यास अटकाव केला. सूतगिरणी, साखर कारखाना, नाला बंडिंगची कामे, शेतीसाठी प्रयोगशाळा, शेती प्रदर्शने दुष्काळाच्या वेळी कर्ज, कर्जफेड तहकूब, शेतकी बँक स्थापना याविषयी केलेले कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. तसेच महाराजांनी खासेराव जाधवांना शेती अभ्यासासाठी परदेशात पाठवले. रेशीम उद्योगाच्या अभ्यासासाठी रावजी भाई पटेल यांना काश्मीरला पाठवले. तर बंगालचे शेतकी खात्याचे मुख्य अधिकारी सिल्क तज्ञ मुखर्जी यांना बडोद्यात बोलून घेतले. जनावरांसाठी त्यांनी दवाखाने स्थापन केले. शेती सुधारणेवर दरवर्षी शासनाकडून साडेसात लाख रुपये खर्च होत असे. गुरेढोरे मोकाट सोडून शेतातील उभ्या पिकांचे नुकसान करणाऱ्या. कारणीभूत होणाऱ्या लोकांना शिक्षा करण्याची तरतूद असणारा

कायदा ही करण्यात आला. सयाजीराव महाराज मुळात शेतकऱ्याचा मुलगा असल्याने शेतकऱ्या विषयी त्यांना अधिक आस्था असणार हे उघड आहे.

**शैक्षणिक सुधारणा :**

सयाजीराव महाराजांचे दत्तक विधान होईपर्यंत त्यांचे कोणतेही औपचारिक शिक्षण झाले नव्हते. दत्तक विधानानंतर मात्र त्यांना नियोजनबद्ध शिक्षण देण्यात आले. या शिक्षणामुळे सयाजीरावांना वेगळी दृष्टी मिळाली. त्याचा फायदा संस्थानाचा कारभार सुधारण्यासाठी झाला. स्वतःला जसे शिक्षण मिळाले तसे जनतेला मिळावे. या दृष्टीने महाराजांनी आयुष्यभर प्रयत्न केला. महाराजांनी सक्तीचे आणि मोफत शिक्षण बडोदा संस्थानात सुरू केले. १८९२ रोजी प्रथम अमरेली भागात आणि १९६० रोजी सर्व राज्यभर या कायद्याची अंमलबजावणी झाली. प्राथमिक शिक्षणानंतर महाराजांनी स्त्री जातीच्या मुक्ततेसाठी स्त्री शिक्षण मोठ्या प्रमाणात आपल्या संस्थानात सुरू केले. स्त्री शिक्षणात कमालीची प्रगती झाली. बडोदा राज्यातील शिक्षणाच्या नव्या धोरणाने स्त्री शिक्षणाच्या प्रसाराला प्रचंड वेग मिळाला. त्यातूनच अनेक शिक्षण संस्थाचा जन्म झाला. कन्या शाळेतील इंग्रजी वर्ग, फीमेल ट्रेनिंग कॉलेज ,महाराणी चिमणाबाई महिला पाठशाला, चिमणाबाई स्त्री उद्योगालाही या आणि अशाच अन्य संस्था तसेच विद्यार्थिनी साठी अनेक शिष्यवृत्ती सुरू केल्या. प्राथमिक आणि उच्च शिक्षण यांना जोडणारा माध्यमिक शिक्षण हा महत्त्वाचा दुवा आहे. हे ओळखून माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी मोठ्या प्रमाणात महाराजांनी प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, स्त्री शिक्षणानंतर महाराजांनी उच्च शिक्षणाची व्यवस्था राज्यात केली. १८८२ रोजी कॉलेजची स्थापना केली. या कॉलेजमध्ये अरविंद घोष यांनी अध्यापन केले होते. यावरून कॉलेजची उंची समजते. अस्पृश्य, आदिवासी लोकांच्या शिक्षणासाठी महाराजांनी प्रयत्न केले. सर्वप्रजा शिक्षणाने सज्ञान व्हावी हा महाराजांचा मुख्य हेतू होता. ड्ढकलाभवनफ संस्था बडोदा संस्थानाच्या शिक्षणातील मानबिंदू ठरली होती. भारतामध्ये कलकत्त्यानंतरचा तो एकमेव प्रयोग होता. यामध्ये विविध कलेबरोबर अभियांत्रिकी विभागातील विविध शाखा सुरू केल्या होत्या.

**औद्योगिक सुधारणा :**

सयाजीराव महाराजांचे व्यक्तिमत्व हे आधुनिकतेचा ध्यास घेणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी विविध क्षेत्रात सुधारणा केल्या. फक्त शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सुधारणा करून चालणार नाही. हे महाराज जाणून होते . राज्याचा आर्थिक पाया भक्कम करण्यासाठी औद्योगिक सुधारणा करणे महत्त्वाचे होते. यासाठी उद्योग उभारले पाहिजेत. महाराजांनी व्यापारस उत्तेजन देण्यासाठी बऱ्याच कारखान्यांना, सूतगिरण्यांना मदत दिली. आयात निर्यात मालावर जकात कमी केला. पाणीपुरवठा जमिनी इत्यादी सोयीसुविधा उद्योग धंद्यांना पुरवल्या. संस्थानातील कापड गिरणी साखर कारखाना शेतीपूर्वक उद्योगांना त्यांनी प्रोत्साहन दिले. उद्योग उभारणीसाठी भांडवल पाहिजे असे त्यांचे मत होते. या भांडवल पुरवण्यासाठी त्यांनी १९०८ रोजी बँक ऑफ बडोदा या बँकेची स्थापना केली होती. महाराजांच्या या दूरदृष्टीमुळेच आजही गुजरात हे राज्य औद्योगिकीकरणाच्या बाबतीत आघाडीवर आहे.

**निष्कर्ष :**

सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात केलेल्या विविध कार्याचा आढावा घेतल्या असता. असे समजून येते की सयाजीरावांचे कार्य वेगळे अतुलनीय आहे. सुधारणा करताना आपल्या संस्थानाची तुलना इतर संस्थानातील सुधारणे बरोबर न करता. पुढारलेल्या देशाशी ते करत, व त्याप्रमाणे सुधारणा करत. महाराजांच्या सुधारणा आधुनिक वादी सुधारणा होत्या. सर्व सुधारणा समाज कल्याणच्या होत्या. अंधश्रद्धा नष्ट करणारे होत्या .पण पाश्चात्य संस्कृतीचे अंध अनुकरण करणाऱ्या नव्हत्या. तर देशी संस्कृतीला आधुनिक करणारे होत्या.शास्त्रीय आधारावर तयार झालेले मत महाराज कधीही बदलत नसत. महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात पाश्चिमात्य लोकांची विज्ञाननिष्ठा त्याचबरोबर देशी लोकांची सहिष्णुता होती. त्यांचा बुद्धीचा विकास गुरुच्या शिक्षणाने इतिहासाच्या अभ्यासाने व तज्ञ व्यक्तींच्या संपर्कामुळे झाला होता. महाराजांचे व्यक्तिमत्व मूर्तीमंत आदर्श राजा असेच होते.

**संदर्भ :**


- आपटे दा.ना.- श्री. महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र खंड - १,२,३.
- भांड बाबा - 'लोकपाल राजा सयाजीराव' साकेत प्रकाशन, औरंगाबाद- २०१३
- फाटक ब. न.- 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड' चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे -१९६३
- पवार निंबाजीराव - 'जेव्हा गुराखी राजा होतो' राजहंस प्रकाशन, पुणे-२०११


■■■

ISSN No. 2394-5990

# कैकाडी समाजातील लोकजीवन व लोकसंस्कृती

**प्रा.डॉ. सोनवले राजकुमार रंगनाथ**
सहयोगी प्राध्यापक
देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय,
मोहोळ, ता. मोहोळ.जि सोलापूर.
मो. नं. ९०११००४७००
e-mail - rajkumars.rs28@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतामध्ये हजारो वर्ष अंधकाराच्या खायेत खितपत पडलेल्या अनेक जाती जमाती आहेत. डोळे असून आंधळा आहे. कान नसून बहिरा आहे व तोंड असून मुका आहे, अशी एकूण त्यांची स्थिती आहे. स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी वारा पाठीवर घेऊन भटकंती करणाऱ्या जाती-जमातीच्या जीवन जगण्याची पद्धतीवरून व साधनावरून त्यांच्या जमातीचा अंदाज लावला जातो. परंतु त्याची माहिती नसलेले लोक मात्र त्यांना भिकारी, चोर समजून हीनत्त्वाची वागणूक देताना दिसतात. महाराष्ट्रातील व महाराष्ट्रबाहेरून भटकंती करीत आलेल्या अनेक जाती-जमाती खेडेगावात गावकुसाबाहेर वस्ती करून राहत आहेत. त्यांच्या पाचवीला भटकंती ही पुजलेली आहे. सुखाचे, आनंदाचे क्षण व दिवस त्यांच्या वाट्याला कधी आलेच नाहीत. वा त्यांना कोणतेच हक्क अधिकार ही मिळाले नाहीत. आपण मात्र स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत असा टेंबा मिरवीत असतो. अशावेळी पद्मश्री नामदेव ढसाळांची '१५ ऑगस्ट महाकाय भोगष्ट स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचे नाव आहे' कविता नजरेसमोर तरळते. तर कवी नागनाथ गायकवाड 'जीवन भस्म' या कवितेत भटक्या विमुक्तांना गाव कुसाबाहेरील व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही कशा परिस्थितीचे जीवन वाट्याला येत आहे याचे वास्तव चित्रण करतात की, 'गाव कुसाच्या पलीकडे जगणे दिनरात! जनावरांच्या पलीकडे हागणदारी वनात! विमुक्त भटक्यांचे जीवन भस्म स्वातंत्र्यात! समतेच्या वाटा गुंडाळल्या बंद बासनात!' पशुत्वाची झूल, विमुक्तांच्या अंगावरील हे चित्रण काळजाचा छेद घेते.

महाराष्ट्रात आढळणाऱ्या विमुक्त-भटक्या जमाती ह्या महाराष्ट्रातील आहेत. तर काही जमाती ह्या भटकंती करत पोट भरण्यासाठी राज्यात स्थिरावल्या आहेत. त्यामध्ये, लमानी, वडार, डोंबारी, गोसावी इत्यादी जमाती व पोटजाती आहेत. त्यापैकी कैकाडी जमात जंगल, दऱ्या, डोंगर भागात राहत होती. तिचे मूळचे वस्तीस्थान तामिळनाडू आहे. त्यानंतर कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार व महाराष्ट्र या राज्यांमध्ये ही जमात आढळते. तामिळनाडू मध्ये या जमातीला 'गुरव', 'कोरवा', आंध्रप्रदेशामध्ये 'येरकुला', कर्नाटकामध्ये 'कोरवी' तर महाराष्ट्रामध्ये 'कैकाडी' या नावाने ओळखली जाते. कैकाडी समाज उदरनिर्वासासाठी गाढवे व डुक्कर पाळण्याचा व्यवसाय करीत आलेली आहे. गाढवांचा उपयोग माती व दगडाची वाहतूक करण्यासाठी केली जाते. अशी ही जमात स्थलांतरित असली तरी आपली रुढी-परंपरा, श्रद्धा, संकेत, सांस्कृतिक वारसा, संस्कृतिक लोककला जतन करीत असताना दिसते. सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहमदनगर, पुणे, मुंबई या भागात स्थायिक झालेली ही जमात आहे. जमातीचे लोकजीवन, त्यांची बोली, संस्कृती, धार्मिक व सामाजिक परंपरा श्रद्धा संकेत सांस्कृतिक इत्यादीचा शोध या शोधनिबंधात घेतला आहे.

**कैकाडी समाजाची पार्श्वभूमी :**

कैकाडी ही भारतातील एक आदिम जमात असून दक्षिण भारतातील तामिळनाडूमध्ये ङ्कुरुचीफया डोंगरी प्रदेशात 'कुरव', 'कोरवा' या नावाने ओळखली जाते. डोंगराच्या उतारावर पट्ट्या पद्धतीने शेती केली जाते, त्यास 'कुंभर' पद्धतीची शेती असे म्हणतात.

कैकाडी जमातीत अनेक पोटजाती असून माकडाचा खेळ करणारी 'कुंची कोरवा' ही जात कैकाडी समाजाची एक मुख्य पोटजात होय. पण कैकाडी व कुंची कोरवा जमात एकमेकांना श्रेष्ठ-कनिष्ठ मानत आहेत. कुंची कोरवासह कोरवी, कोरवा, धोंसाले, पालमोर हे पोटजातीचे भेद कैकाडी समाजात आढळून येतात. त्याचप्रमाणे त्यांच्यामध्ये प्रथा, रूढी, परंपरा व आचार यामध्ये भिन्नता दिसून येते. त्याचबरोबर त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होताना दिसत नाहीत. चव्हाण रामनाथ म्हणतात की, 'कैकाडी समाजात कुळांचा उच्च-नीच दर्जा हा पारंपारिक मानला

जातो. त्यांच्या व्यवसायाच्या वेगळेपणानुसार कुळांना मानपान, सन्मान दिला जातो. जसे की माकडे खेळविणारे, जादूचे खेळ करणारे, भिक्षा मागणारे, गाव गाड्यांचा व्यवसाय करणारे इत्यादी भेद आहेत. तसेच पोट भरण्याच्या पद्धतीनुसार श्रेष्ठ-कनिष्ठ असे स्तर आहेत.

कैकाडी ही जमात कष्टाळू असून स्वतःची अशी वेगळी संस्कृती, परंपरा जपताना व संवर्धन, संरक्षण करताना दिसते. त्यांची तेलगू, कन्नड व हिंदी मिश्रित अशी कैकाडी बोली आहे. झाडांच्या फोकापासून टोपल्या, कनग्या, झाप, चट्‌ट्यापट्या इत्यादी वस्तू तयार करून गावगाड्यात राहणाऱ्या कुळवाड्यांना देऊन त्यांच्या मोबदल्यात धान्य, पैसे घेऊन आपली उपजीविका करतात. तर काही लोक चोऱ्या करून जीवन जगतात. पण ही जमात भीक मागत नाही हे विशेष आहे. अशा या जमातीचे पुढील काही पोटजाती-जमाती भेद दिसतात जसे की,

१. चोर कैकाडी उर्फ फिरते वा डोंटलमोर,

२. गाव कैकाडी - जे गावात राहून टोपल्या, कणग्या, बुट्टी, झाप करून गावोगाव भटकतात. पावसाळ्यामध्ये स्थायिक गावी परततात. तर सुगीच्या दिवसात भटकंती करतात.

३. सण उत्सव लग्न समारंभ यामध्ये वाद्य वाजवून जी जमात उदरनिर्वाह करते तिला 'वाजंत्री', 'बजंत्री', वा 'सनादी' म्हणून ओळखले जाते.

४. माकडाचा खेळ करून उपजीविका करणारे ते माकडवाले तथा गणसुर लाल बाजारवाले.

५. सापांचा खेळ करून दाखविणारे, पमलोर (कर्नाटकात-पामलोर) ह्या वेगवेगळ्या पोट जाती आहेत.

**कैकाडी समाजाची रूढी परंपरा :**

भारतामधील व महाराष्ट्रातील अनेक जाती-जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार-प्रचार ज्या प्रमाणात झालेला आहे तसा प्रसार-प्रचार कैकाडी जमातीत झालेला नाही. या समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे हा समाज अंधश्रद्धा रुढी परंपरा यांच्या गर्तेत खूपच गुंतलेला आहे असे दिसून येते. या जमातीत 'शडीदेवी' तथा 'वृक्षदेवी' हीस बोललेले नवस फेडणे यास अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. जंगली लाकडाच्या फोकापासून कमानीच्या आकाराचे लहानसे देऊळ तयार केले जाते. त्या देवळावर पांढरे कापड टाकून चार गारेचे दगड आणि तीन साधे दगड घेऊन ते दगड चोळीच्या खणावर देव्हाऱ्याप्रमाणे केलेल्या पालामध्ये मांडतात (ठेवतात). देवीला संपूर्ण काळा रंग असलेला बोकडच कापला जातो. नवसाचे बोकड देवीसमोर केल्यावर त्या बोकडाने आपली स्वतःची मान झटकली (हलवली) तरच ते बोकड देवीला मान्य आहे असे मानले जाते. जर का तसे घडले नाही तर देवीची क्षमायाचना (माफी) मागण्याची परंपरा कैकाडी समाजात आहे. त्या बोकडाचा कोणताही भाग वा कोरड्यास (कालवण) घरी आणले जात नाही. तेथेच संपविले जाते. अनिष्ट रूढी-परंपरांच्या श्रृंखलेतून बाहेर पडण्यासाठी नवी पिढी इतरांशी लढा संघर्ष करता करता आपल्याच बांधवांशी दोन हात करीत आहे. त्या संघर्षात नव्या पिढीचा वेळ व शक्ती खर्ची पडत आहे. याचे चित्रण त्यांच्या साहित्यात प्रलयकारी स्वरूपात आले आहे.

**इळणमाळ :**

उदा. पवार अशोकाच्या ङ्गइळणमाळफ या कादंबरीतील नायक मारोती आपला समाज, आपली संस्कृती विकसित झाली पाहिजे हे स्वप्न पाहतो आहे. ते स्वप्न साकारण्यासाठी जीकीरीचा संघर्ष, लढा उभा करतो पण त्यामध्ये त्याला यश येत नाही तर तो त्यात संपूर्णपणे उध्वस्त होतो. तर 'कुंची कोरवा' समाजामध्ये प्रेतावर पैशाची उधळण करीत व प्रेत वाजत गाजत नेऊन स्मशानात पुरतात. तर तिसरा, दहावा व तेरावा दिवस घालतात. त्यावेळी आप्तजणांना मांसाहाराचे जेवण देतात अशा पद्धतीने भटक्याविमुक्तांच्या अनिष्ट अघोरी परंपरा दृष्टीस पडतात.

**धार्मिक संकेत :**

भारतीय संस्कृतीत स्त्रीला यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवत: असा सन्मान दिलेला आहे. तसाच सन्मान कैकाडी जमातीत दिलेला दिसतो. स्त्रीला 'आदिमायेचे' स्वरूप मानले जाते. त्यामुळेच मरीआई, दुर्गम्मा, दुर्गामाता या मातृदेवतांची विशेष अशी भक्ती ही जमात करताना दिसते. तर 'खंडोबा' या देवास आपला जावई समजतात. तर पूर्वा कैकाडी जमातीचा कुलदैवत दक्षिणेकडील 'वेंकटाचल' व 'तिरूवेंगडम' येथील 'मुरुग' देव आहे. त्यास वेगळ्या नावाने संबोधले जाते. जसे खंडोबा, कुमार, स्कंद, सुब्रमण्य इत्यादी तर कैकाडी जमातीचे पालनपोषण 'साती आसरा' या स्त्रीदेवीने केले आहे, असा दाखला पुराण कथात मिळतो. ही जमात 'खंडोबा' देवतास बोकडाचे नैवेद्य देताना दिसते. एकूणच या जमातीत धार्मिक संकेताबाबत वेगळेपण दिसून येते.

**विवाह प्रथा :**

कैकाडी जमातीमध्ये बालविवाह प्रथा अधिक प्रचलित

 ISSN No. 2394-5990

असल्याचे दिसते. सध्या कायद्याने बंदी असल्याने ही प्रथा काही अंशी बंद झालेली असून 'विवाह' व 'काडीमोड' या दोन्ही पद्धतीमध्ये 'जातपंचायती'ला अधिक मानाचे स्थान आहे. विवाह हा एकाच गोत्रात वा आडनाव असलेला कुटुंबात जमविला जात नाही. तसे झालेच तर त्या कुटुंबाला जात बहिष्कृत (वाळीत) केले जाते. आत्याचा 'मुलगा' वा मामाची 'मुलगी' यांच्याशी विवाह निषेध मानला आहे. एक बाब विशेषत्वाने नजरेत भरते ती म्हणजे या जमातीत विधवा विवाहाला समाज मान्यता आहे. सोयरीक जमवण्याच्या पद्धतीमध्ये नवऱ्या मुलाचा बाप पाच पाने, सुपारी आणि सव्वा दोन रुपये नवरी मुलीच्या बापाच्या हातात ठेवतो. त्यानंतरच नवऱ्याकडील मंडळी त्या नवरी मुलीवर आपला हक्क सांगतात. या रीवाजाला कैकाडी जमा 'फारदूट' या नावाने संबोधते. तर 'सुल्ला' या रिवाजामध्ये मामास मान सन्मान म्हणून 'मावळखंड' दिला जातो. तसेच नवऱ्या मंडळीकडून नवरीच्या आजा-आजीस नवे कपडे घेतले जातात. तर नवरीच्या आईस पोट झाकण म्हणून आहेर केला जातो. या सर्व बाबी सन्मानपूर्वक केल्या जातात.

कैकाडी जमातीतील ङ्गउरसांडफ ही प्रथा अत्यंत मौलिक अशी आहे. या प्रथेने समाजात चांगला आदर्श घातलेला दिसून येतो. या प्रत्येक जमातीतील निराधार मुली, संसार मोडलेल्या स्त्रिया व जमातीने बहिष्कृत केलेल्या स्त्रिया यांना दत्तक घेऊन त्यांचे जीवन सुखी केले जाते. त्यामुळे त्या स्त्रियांना जमातीत चांगले, आनंदाचे जीवन जगण्यास संधी प्राप्त झालेली दिसते. ही प्रथा सामाजिक बांधिलकी म्हणून मोठ्या निष्ठेने केली जाते.

**श्रद्धा व आहार :**

कुटुंबात लहान मूल जन्माला आले की पाचवी करून 'सटवाई' देवीची पूजा केली जाते. पाचवीला संध्याकाळी वसाहतीपासून लांब जाऊन काळया रंगाचा बोकड, कणकीचे दिवे, पाच नारळ, पान-सुपारी, गहू लिंबू, हिरव्या रंगाच्या बांगड्या, कुंकू, हिरव्या रंगाचा चोळीचा खण, गोडेतेल इत्यादी साहित्याने पूजा केली जाते. त्यावेळी सटवाईची प्रतिमा दगडावर ठेवून पूजा होते. त्याप्रसंगी महिलांचा सहभाग नसतो. ज्यांच्या कुटुंबात लहान मूल जन्माला आले आहे ते 'सटवाई' देवीसमोर बोकड कापून त्यांच्या रक्ताची पहिली धार तिच्यावर शिंपडून मुंडी व खूर (पाय) देवीसमोर ठेवले जाते. पंगत उठल्यावर अंघोळ करून घरी परतात.

कैकाडी जमाती मिश्रहारी असल्याचे दिसून येते. कारण देवी-देवतांचे नवस फेडताना सर्वसाधारणपणे बोकड, कोंबडा यांचा बळी दिला जातो. तर साखरपुडा प्रसंगी पुरणपोळीचे गोड जेवण दिले जाते.

**जातपंचायत :**

भटक्या-विमुक्तांच्या विविध जमातीत जातपंचायतीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. त्यास कैकाडी जमात वेगळी नाही. ही जातपंचायत प्रत्येक जमातीची न्यायव्यवस्था आहे. तिचे नियम, कायदे लिखित स्वरूपाचे नसले तरीही ते सर्वांसाठी मात्र बंधनकारक आहेत. नियम, अटी न मानणाऱ्या व्यक्तीला कधीकधी जातीतूनही बहिष्कृत केले जाते. जेजुरी, मढी व मालेगाव या ठिकाणी कैकाडी जमातीची जातपंचायत भरताना दिसते. पंचायतीमध्ये विवाह जमवणे, सोडचिठ्ठी देणे वा वाद-विवाद मिटवणे इत्यादींचा न्यायनिवाडा केला जातो. पंचायतीच्या नियमासंबंधी रामनाथ चव्हाण म्हणतात की, एखाद्या व्यक्तीने एखाद्या महिलेशी विवाहबाह्य संबंध ठेवल्यास पंचायतीकडून १२० रुपये पर्यंत दंड केला जातो. तर विधवा स्त्री पोटूशी (गरोदर) राहिली तर तिच्या वडिलांकडून दंड वसूल केला जातो. त्याशिवाय तो गर्भ पाडण्यास सांगितले जाते. अशा चारित्र्याची स्त्री जातीला व कुटुंबाला कायमची मेली असे समजून तिचा त्याग केला जातो व त्या स्त्रीच्या कपाळी पैशाचा काळा डाग दिला जातो. याशिवाय विवाहबाह्य संबंधातून गरोदर (पोटूशी) राहिलेल्या विधवेस जिवंत जाळण्याची कधीकधी शिक्षा दिली जाते. तर कधी वाळीत टाकले जाते वा ती व्यक्ती मेली अशी समजून त्या व्यक्तीच्या नावे पिंड देखील घातले जाते. अशा अनेक अनिष्ट प्रथा-परंपरा व समजूत ही जमात आजही जोपासताना दिसत आहे. परंतु नव्याने शिकून शहाणा झालेला तरुण वर्ग यातून बाहेर पडताना नजरेस पडतो आहे हे नाकारता येत नाही.

**निष्कर्ष :**

- कैकाडी जमातीची तेलगू, कन्नड, हिंदी मिश्रित बोली आहे.
- कैकाडी जमातीच्या बोलीवर मराठी भाषेचा परिणाम झाल्याचे स्पष्टपणे जाणवते.
- कैकाडी जमात अंधश्रद्धा जपणारी आहे.
- कैकाडी जमातीतील नव्या पिढीचा जुन्या अनिष्ट प्रथा व इतर समाज यांच्यात परिवर्तनासाठी लढा, संघर्ष सुरू आहे.
- कैकाडी जमात देवी-देवतांचे नवस फेडताना बोकड, कोंबडा यांचा बळी दिला जातो.

- कैकाडी जमात मिश्रहारी आहे.
- कैकाडी जमातीत जात पंचायतीचे अस्तित्व आजही जाणवते.

**समारोप :**

आयुष्यभर पोटाची खळगी भरण्यासाठी टोपल्या, झाप, कणगी बनवणारी ही जमात गावगाड्यांच्या आश्रयाने थोडी विसावली. परंतु स्वतःचा गाव वा घर त्यांना नाही. अशा स्थितीतही आपली स्वतःची परंपरा, प्रथा, संस्कृती, बोली जतन करताना दिसते.

**संदर्भसूची :**


- नागनाथ गायकवाड - वेदना विमुक्तांच्या, मुक्तरंग प्रकाशन, लातूर २०११.
- लक्ष्मण माने - विमुक्तायन, या.च.प्र. मुंबई, १९९७.
- रामनाथ चव्हाण - भटक्या-विमुक्तांचे अंतरंग, मनोविकास प्रकाशन मुंबई, २००३.
- निरंजन घाटे - आदिवासींचे अनोखे विश्व, मनोविकास प्रकाशन, पुणे, २००९.


■■■

ISSN No. 2394-5990

# संगीत व कलेचा आश्रयदाता- श्रीमंत सयाजीराव गायकवाड (तिसरे)

**प्रा. डॉ. थोरे किशोर धोंडीबा**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग
सी. बी. खेडगीज बी. सायन्सं, आर.व्ही. कॉमर्स
ॲन्ड आर. जे आर्टस् कॉलज अक्कलकोट जि. सोलापूर
भ्रमणध्वनी क्रमांक- ९४२२४२५०४२
ईमेल - kishorda.thore@gmail.com

**प्रस्तावना :**

भारताच्या समाजसुधारणांच्या इतिहासात एक नाव अग्रक्रमाने घेतले जाते ते म्हणजे बडोद्याचे नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड होय. भारतातील अनेक राजे होते पण काही बोटावर मोजण्याइतके राजे हे लोकांच्या मनावर राज्यं करणारी होती. मराठ्यांच्या इतिहासात महाराष्ट्राबाहेरही अनेक मराठी घराण्यांनी आपले अधिराज्यं गाजविले. त्यामध्ये गुजरातमधील बडोद्याचे गायकवाड घराणे यांचा समावेश होतो. मराठ्याचा झेंडा अटकेपार घेऊन जाण्यामध्ये महाराष्ट्राबाहेरील या घराण्याचा खुप मोठा वाटा आहे. याच घराण्यामध्ये श्रीमंत सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांनी बडोद्याच्या इतिहासामध्ये आपला वेगळा ठसा उमठविला. या शोधनिंबधामध्ये श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या संगीत व कला या क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल अभ्यास करणार आहोत.

**बडोद्याच्या गायकवाड घराण्याचा इतिहास :**

ब्रहन्महाराष्ट्रामध्ये आपला प्रभाव निर्माण करणारे गायकवाड घराण्याची स्थापना पिलाजीराव गायकवाड यांनी केली. इ.स. १७२१ मध्ये मराठा सेनानी पिलाजीराव यांनी मुघल साम्राज्याबरोबर लढत असताना बडोदा हे शहर जिंकून घेतले. त्यांच्या पराक्रमाची कदर करुन छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांना बडोद्याची जहागीर दिली. सुरुवातीच्या काळात गुजरातचे नेतृत्वं दाभाडे घराण्याकडे होते. त्यांच्या अधिपत्यांखाली गायकवाड घराणे काम करीत होते. पण पहिले बाजीराव व दाभाडे यांच्यात संघर्ष होवून बाजीरावाने त्रिंबकराव दाभाडे यांचा पराभव केला व दाभाडे घराण्याचा अंमल संपुष्टात येवून पिलाजीचा मुलगा दमाजी गायकवाड यांची प्रभाव गुजरातवर सुरू झाला. गायकवाड घराण्याच्या अनेक पिढ्यांनी गुजरातमध्ये आपला अंमल बसविला. पण इंग्रजाचा प्रभाव भारतामध्ये वाढल्यानंतर त्यांनी संस्थानामध्ये हस्तक्षेव करायला सुरूवात केली.

**सयाजीराव (तिसरे) यांचे जीवनचरित्र :**

सयाजीराव गायकवाड यांचा जन्मं ११ मार्च १८६३ रोजी गायकवाड घराण्यातील काशीराव व उमाबाई गायकवाड यांच्या पोटी झाला. काशीराव गायकवाडाचे मूळ गाव नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील कौळाणे होय. त्यांचे मुळ नाव गोपाळराव होते. बडोदा संस्थानचे श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांच्यानंतर इंग्रजांनी उत्तराधिकारी म्हणून गोपाळराव यांची निवड केली व महाराणी जमनाबाई यांनी दि. २७ मे १८७५ रोजी गोपाळरावांना दत्तंक घेतले व त्यांचे नाव सयाजीराव तिसरे असे ठेवण्यात आले. त्यांनी गुजरातच्या भारताच्या इतिहासात आपला वेगळा ठसा निर्माण केला. त्यांचा मृत्यू ०६ फेब्रुवारी १९३९ रोजी मुंबई याठिकाणी झाला.

**सयाजीरावाचे संगीत प्रेम :**

कलेला राजाश्रय देणाऱ्या राजांच्या यादीमध्ये सयाजीराव गायकवाडाचे नाव अग्रकमाने घ्यावे लागेल. संगीताच्या बाबतीत सयाजीराव गायकवाड एका ठिकाणी म्हणतात की, एखाद्या देशाची संस्कृती काय तोलामोलाची आहे, हे तुम्हाला ठरवायचे असेल तर त्या देशाच्या ललितकला विचारात घ्या. संगीत म्हणजे जीवनाला माधुरी आणि रमणियता देणारी वल्ली आहे. मनाला मेणाहून मऊ करण्याची किंवा कठिण करण्याची जादू संगीताच्या अंगी असते. दयेचा पाझर फोडण्याचे, आनंदाचे किंवा दु:खाचे अश्रू झिरपायला लावायचे आणि वीरश्रीचा संचार करण्याचे सामर्थ्य संगीताच्या ठायी असते.[१] मनाला ताजेतवाने करण्याच्या अनेक साधनांपैकी संगीत हे एक साधन आहे. अशा उपयुक्त कलेला उत्तेजन द्यावे व प्रजेला कलेची गोडी लावावी म्हणून माझ्या राज्यांमध्ये संगीत विद्यालयाची स्थापना केली आहे. त्याच्या माध्यमातून कलेचा प्रसार करण्यासाठी चांगले सत्पात्र शिक्षकाची नेमणूक केली आहे. यावरून त्यांच्या कलेच्या प्रेमाची जाणीव होते. ते फक्त बोलते सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते यांचे

प्रत्यंतर आपणास त्यांचा अभ्यास केल्यानंतर होते. त्यांच्या संगीत विभागामध्ये त्यांनी जवळपास ४८ प्रसिध्द संगीतक्षेत्रातील दिग्गजांना आश्रय दिलेला होता.[२] त्यांनी निर्माण केलेला हिंदुस्थानी संगीताचा वाद्यवृंद संपुर्ण भारतात प्रसिध्द होता.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी राजाश्रय दिलेल्या काही कलाप्रेमी कलाकारांची व संस्थांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**१) उस्ताद मौलाबक्ष :**

महाराजांनी गायनशाळेचे पहिले प्राचार्य म्हणून भिवानीच्या उस्ताद मौलाबक्ष यांची नेमणूक केली. त्यांच्या संगीतातील अभ्यास पाहूण श्रीमंत सयाजीराव यांनी त्यांना बडोद्यात आणले. उस्ताद मौलाबक्ष यांचे कर्नाटक संगीत तसेच शास्त्रीय हिंदुस्थानी संगीतावर त्यांचा प्रभाव होता. त्यांनी अनेक गीतांची स्वरलिपी तयार करुन संगीतासाठी पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. त्यांच्या संगीतावर महाराज अतिशय प्रेम करीत त्यामुळेच उस्ताद मौलाबक्ष यांच्या मुलाला संगीत शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात मदत केली.[३]

**२) अल्लाउद्दीन :**

उस्ताद मौलाबक्ष यांचा हा मुलगा ज्याला महाराजांनी मदत केली. त्याला संगीत शिकण्यासाठी मोठ्याप्रमाणात मदत केली. इतकेच नाही तर त्याला पाश्चिमात्यं संगीत शिक्षणासाठी आणि पौरात्यं व पाश्चिमात्यं संगीतामध्ये समन्वयं साधता आला तर तो प्रयोग करुन बघण्यासाठी त्याला युरोपलाही पाठविले. त्याचबरोबर संगीत एकत्रीकरणाच्या नादामध्ये तो बेकार राहू नये म्हणून त्याला दरबारात गायकाची नोकरी सुध्दा दिली. अशाप्रकारे फक्त रशिक म्हणून कोरडे कौतूक करण्यापेक्षा कलेला राजाश्रय देण्याची भुमिका सयाजीराव महाराजांनी ठेवली.

**३) फैय्याज खान साहेब :**

सयाजीराव गायकवाड यांचा राजाश्रय आसणारे फैय्याज खान संगीत क्षेत्रातील दिग्गज म्हणून ओळखले जात होते. त्यांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील आग्रा घराण्याचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या संगीत व ज्ञानाला प्रोत्साहान देण्यासाठी महाराजांनी त्यांना 'ज्ञानरत्नं' पुरस्कारांनी सन्मान केला होता.[४] फैय्याज खान साहेब ध्रुपद व ख्याल या गायकीसाठी प्रसिध्द होते. गायनाच्या क्षेत्रात अनेक प्रयोग करण्यासाठी महाराजांनी आपल्या दरबारात त्यांना प्रोत्साहान दिले होते. त्यांनी त्यांच्याकडे गायन ऐकण्यासाठी आलेल्या तेलंगणातील ११ ब्राह्मणाचा यथोचित सन्मान केला व ब्राह्मणांनी तो स्विकारला यावरुन अप्रत्यक्षपणे हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक असल्याचे दिसून येते.[५] या अशा घटनांमुळेच समाजसुधारणा याविषयी अभ्यास करीत असताना महाराज सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

**४) सौ. लक्ष्मीबाई जाधव :**

अल्लादिया खाँ साहेबांच्या शिष्या असणाऱ्या लक्ष्मीबाई यांना अनेक वर्ष राजदरबारात राजगायिका म्हणून आपली संगीत सेवा केली. श्रीमंत चिमणाबाईसाहेब गायकवाड व लक्ष्मीबाई यांची फार घनिष्ट मैत्री होती. लक्ष्मीबाईचे गायन व आवाज त्यांना खुप आवडत होता. लक्ष्मीबाई जाधव यांनी राजकवी असणारे चंद्रशेखर यांच्या 'हृदयी गुलाब फुलला' या कवितेचे एच.एम.व्ही या रेकॉर्ड कंपनीसाठी गायन केले.[६] या गीतामुळे राजकवी चंद्रशेखर आजरामर झाले. अशाप्रकारे राजदरबारात अनेक कलाकारांना आजरामर करण्याची किमया श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी केली.

**५) हिराबाई बडोदेकर :**

ज्या कलाकारांच्या कलेचा सन्मान करण्यासाठी सयाजीराव महाराजांनी मदत केली त्यामध्ये महाराष्ट्रातील प्रसिध्द गायिका हिराबाई बडोदेकरांचाही समावेश होतो. हिराबाईचे वडील उस्ताद अब्दूल करीम खान बडोदा दरबारचे राजगायक होते. तर हिराबाईच्या मातोश्री ताराबाई माने या बडोदा संस्थानच्या राजमाता यांचे बंधू सरदार मारुतीराव माने यांच्या कन्या होत्या. त्यामुळे हिराबाईचे बालपण राजदरबारामध्येच गेले. किराणा घराणे नावारुपाला आणणाऱ्या हिराबाईना लहानपणापासून बडोदा संस्थानचा आश्रय होता.[७] सरोजनी नायडू यांनी हिराबाईना गानकोकीळा असा सन्मान केला यावरुन हिराबाईची थोरवी आपणास दिसून येते.

**६) विष्णू नारायण भातखंडे :**

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे अभ्यासक म्हणून भातखंडे यांचे नाव आजरामर आहे. त्यांच्या संगीतसेवेचे कार्य प्रभावी व्हावे यासाठी बडोदा संस्थानाचे महाराजा श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. भातखंडे यांना रागाच्या चिजा संग्रह करावयाचा होता. त्यासाठी ते संपुर्ण भारतभर फिरत असत. सयाजीराव महाराज व भातखंडे या दोघांनाही स्वरलिपीचा आग्रह असे. महाराजांना भातखंडेचे संगीताविषयी असणारी आस्था ओळखली व त्यांना भारतातील रागांचा चांगला अभ्यास करता यावा व ते स्वत: संगीताचे शौकीन असल्यामुळे त्यांनी बडोद्याच्या दरबार हॉलमध्ये अखिल भारतीय संगीत सभेचे आयोजन केले. ही संगीत सभा २० ते २५ मार्च १९१६

ISSN No. 2394-5990

या काळात आयोजित केली. या संगीत सभेमध्ये भारतातील अनेक नामवंत संगीत अभ्यासक, संगीतकार व गायक सहभागी झाले होते. या सभेचे अध्यक्षस्थान अकबरपूरचे ठाकुर नबाबअली यांनी भुषविले. या संगीत सभेमध्ये उदयेपूरचे झकरुद्दिन खाँ, अलवरचे मुश्रफ खाँ, टोंकचे गुलाम हुसेन खाँ, जयपूरचे कलल्नखाँ आणि अली हुसेन खाँ, इंदुरचे इमादखाँ अशा अनेक नामवंत व दिग्गज कलाकारांचा समावेश होता.[८] या संगीत सभेच्या मदतीने भातखंडे यांनी संगीतामध्ये खुप मोठे कार्य केले. सयाजीराव महाराजांनी भातखंडे यांना संगीत विषयावर अनेक पुस्तके लिहण्यासाठी प्रोत्साहान व आर्थिक मदत केली. महाराजांच्या मदतीने भातखंडे यांनी हिंदुस्थानी संगीत क्रमिक पुस्तकमाला या पुस्तकाचे चार भाग प्रकाशित केले. त्याचबरोबर संस्कृत लक्ष संगीत व संस्कृत अभिनव राग मंजिरी या पुस्तकासाठीही महाराजांनी आर्थिक मदत केली. श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या या मदतीमुळे संगीज क्षेत्रासाठी खुप मोठी मदत झाली.

**७) बालगंधर्व :**

संगीताबरोबरच नाटक व नाटयसंगीत यांचीही आवड महाराजांना होती. त्यांनी बालगंधर्व अर्थात नारायणराव राजहंस यांनाही त्यांच्या कलेच्या क्षेत्रातील योगदानाची कृतज्ञता म्हणून सहाय्यं केल्याचे दिसून येते. लोकमान्यं टिळकांनी नारायणराव राजहंस यांना बालगंधर्व पदवी दिल्याचे सर्वश्रूत आहे पण याच बालगंधर्वला श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी इ.स. १९१३ पासून ५०००/- रुपयाचे वर्षासन देत असल्याचे आपल्याला माहित नाही.[९] बालगंधर्व यांनी देखील आपल्या जाहिरातीच्या पत्रकावर आणि फलकावर बडोद्याच्या राजाश्रयाचा कृतज्ञतापूर्वक खास उल्लेख करीत असत. इ.स. १९१९ मध्ये राजमहालाच्या छोटया नाट्यगृहामध्ये एकच प्याला या नाटकाचे खास आयोजन करण्यात आले होते. या नाटकात गणपतरावांनी सुधाकराचे तर बालगंधर्व यांनी सिंधूची भुमिका केली होती. या नाटकातील बालगंधर्वाचे काम महाराजांना इतके आवडले की त्यांनी वर्षासनाखेरीज १००० रु. अधिक देण्याचा हुकूम दिला.[१०] आशाप्रकारे बालगंधर्वला मदत करुन मराठी संस्कृतीमध्ये मोलाची भर टाकल्याचे दिसून येते.

**८) संगीत क्षेत्रातील इतर कार्य :**

संगीत क्षेत्राची आवड असल्यामुळे महाराजांचा बडोद्यामध्ये संगीत महाविद्यालय सुरू करण्याची इच्छा होती. संगीत एक शास्त्र आहे आणि ते शास्त्रीय पध्दतीनेच शिकविले गेले पाहिजे त्यांचे मत होते. हे संगीत महाविद्यालय सुरु करण्यामध्ये त्यांना भातखंडे यांची खुप मदत झाली. परदेशातील संगीत महाविदयालयात जावून अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा करण्याचा महाराजांचा विचार होता. पण ते शक्य झाले नाही.

सामान्यं माणसांच्या कानावर चांगले संगीत ऐकू जावे यासाठी महाराजांनी अनेक संगीत सभा भरविण्याचे कार्य महाराजांनी केले. त्यासाठी त्यांनी बडोद्यामध्ये विविध ठिकाणी नियमित संगीत सभा भरवित असत. त्यामध्ये ज्युबिली बागेमध्ये दर सोमवारी व सुर्यनारायण बागेमध्ये दर मंगळवारी सायंकाळी दोन तास खास संगीत सभा भरविल्या जात.[११] दर रविवारी कामाठी बागेमध्ये तर बसस्टँडवर पाश्चिमात्यं संगीत अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन रसिकांना संगीताची मेजवानी देत असत.

**९) चित्रकला क्षेत्रातील योगदान :**

विविध कलेला राजाश्रय देणारे श्रीमंत सयाजीराव गायकवाड चित्रकलेसाठी कसे मागे राहतील. त्यांनी चित्रकलेलाही खुप मोलाची मदत केली. इ.स. १८८७ मध्ये महाराज युरोपच्या दौऱ्यावर गेले असता त्याठिकाणी केले जाणारे चित्रांचे जतन पाहता आपल्याही देशामध्ये अशी भव्य् चित्र असावित असा मानस केला व परत आल्यांनंतर त्यासाठी प्रयत्न करावयास सुरूवारत केली. यामुळेच बडोदा संस्थान कलेचे माहेरघर बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्नं केले. त्यातील काही निवडक कार्य पुढीलप्रमाणे आहे.

अ) **राजा रविवर्मा :** युरोपसारखी भव्यं चित्रे आपल्याकडेही असावित असा मानस बनवून महाराजांनी त्रावणकोर राजाचा चुलत भाऊ राजा रवीवर्मा यांना दरबारामध्ये दरबारी चित्रकार म्हणून नेमणूक केली.[१२] त्यांना खूप मोठी बिदागी देऊन आपल्या भारताच्या पौराणिक प्रसंगावर आधारित मोठमोठी चित्र काढून घेतली. त्यामध्ये श्रीरामाचा विवाह सोहळा, नलदमयंती, द्रोपती वस्त्रहरण अशा अनेक चित्रांचा समावेश करुन घेतले.

आ) **बुधवारकर :** आपल्या भारतातील चित्रकलेला मदत करीत असतानाच युरोपमधील चित्रकलेचा अभ्यास करता यावा याचाही प्रयत्नं महाराज करीत होते. त्यांच्याच साठी बुधवारकर या चित्रकारास महाराजांनी चित्रकलेतील पाश्चात्यं शिक्षण घेण्यासाठी युरोपला पाठवून दिले.[१३] परतल्यानंतर त्यांना कलाभवनाचे प्रमुख म्हणून नेमणूक केली.

इ) **फैजी रहमान :** इ.स. १९११ ते १९१५ या काळात दरबारामध्ये यांची नेमणूक करुन फैजी रहमान कडून अनेक अजरामर चित्र काढायला सांगितले. त्यामध्ये

राजघराण्यातील अनेक व्यकती त्याचबरोबर भुलभुलावन, स्वामी नारायण मंदिर, विश्वामित्री नदीवरील कामनाथ मंदिर अशा अने कलाकृतीचा समावेश होता.[१४]

**समारोप व निष्कंर्ष :**

भारतातील अनेक राजघराणी होती पण जनताभिमूख्, संस्कृती रक्षक अशी खुप कमी आहेत. त्यामध्ये श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहेत. महाराज स्वंत: कलेचे रसिक असल्यामुळे त्यांनी अनेक कलाकारांना राजाश्रय दिला व त्यांच्या आजरामर ठेवा संपूर्ण भारतासाठी त्यांनी निर्माण करुन ठेवला. त्यांनी आपल्या पदाचा व संपत्तीचा वापर करुन कला जिवंत ठेवण्याचा प्रयत्नं केला त्यांमुळे खुप मोठ्या प्रमाणात भारतातील संगीत व कला प्रसार होण्यास सुरुवात झाली. हिराबाई बडोदेकरापासून ते बुधवारकर यांच्यापर्यंत अनेक कलाकार फक्त अणि फक्त महाराजांच्या राजाश्रयामुळे आपल्या कला जोपासण्याचा प्रयत्नं केला. कलाकारांच्या कलेला प्रोत्साहान देत असताना त्यांना चांगले व दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून युरोपच्या दॉऱ्यावर पाठवून दिले. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहानामुळे व मदतीमुळे अनेक कलांना व कलाकारांना आपले कार्य आजरामर करता आले. भारताच्या कला क्षेत्रातील महाराजांच्या कार्यामुळेच यांचा विकास झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**


१. नेने वि. पा., सयाजीराव यांची भाषणे भाग दोन,सावळाराम, १९३७, पृष्ठं क्रमांक १७७-१७८
२. कित्ता पृ. क्रं. ५७
३. डॉ. गोवंडे ग. कृ., स्मृतीविहार, १९७५, पृ. क्रं. २८
४. उपरोक्तं नेने, पृ. क्रं. ९२
५. कित्ता पृ. क्रं. ५७
६. घाटे विठ्ठलराव, दिवस असे होते, मौज प्रकाशन, १९९८, पृ. १६२
७. कित्ता पृ. क्रं. १६५
८. कित्ता पृ. क्रं. १६५
९. सरदेसाई गो. स., सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात, १९५६
१०. मराठी चरित्र ग्रंथमाला, श्रीमंत सयाजीराव गायकवाड दादूमिया, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २०१०
११. कित्ता, पृ. क्रं. १६८
१२. कित्ता, पृ. क्रं. १६९
१३. कित्ता, पृ. क्रं. १७१
१४. कित्ता, क्रं. १७२


■■■

ISSN No. 2394-5990

# आधुनिक भारतातील सामाजिक व आर्थिक क्रांतीचे प्रणेते : महाराजा सयाजीराव गायकवाड

**डॉ.विकास विलासराव शिंदे**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग
माऊली महाविद्यालय, वडाळा.
मो : ९८८१२५६११५, E-mail shindevikas450@gmail.com

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राच्या विचारांची दिशा ठरवण्याचं काम महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलं. या तीन महापुरुषांप्रमाणेच बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचं देखील कार्य राहिलं आहे.

भारतात ब्रिटीश राजवटीआधी समाजातील विविध घटकांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या प्रचंड विषमता होती. ही विषमता दूर करून सर्वसामान्य जनतेत शिक्षण प्रसारासाठी झटणाऱ्या समाजसुधारकांना राजाश्रय देण्याचे काम ब्रिटीश भारतातील ५६५ संस्थानांपैकी मोजक्याच राज्यकर्त्यांनी केले. या राज्यकर्त्यांमध्ये बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव आपल्याला अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

महाराजा सयाजीराव गायकवाड हे भारतातील प्रगत विचारसरणीचे व सामाजिक सुधारणांसाठी नवोपक्रम राबविणारे राजे होते. १८६३ साली महाराष्ट्रातील कवळाणे येथील मराठा शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या या मुलाला बडोद्याच्या महाराणी जमनाबाई यांनी दत्तक घेतले. १८७५ साली त्यांना बडोद्याचे राजेपद प्रदान केले. प्रोफेसर इलियट यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर १८८१ साली वयाच्या १८ व्या वर्षी राज्याभिषेक सोहळा झाल्यानंतर त्यांनी बडोद्याचे महाराजा म्हणून राजकीय कारकिर्दीला प्रारंभ केला.१८८१ ते १८३९ या ५८ वर्षाच्या कालावधीत त्यांनी बडोदे संस्थानचा कायापालट करून आधुनिक सुधारणावादी राज्य म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

महाराष्ट्राच्या एका खेड्यातील १२ वर्षाचा शिक्षणाचा गंध नसलेला शेतकऱ्याचा मुलगा दत्तक पुत्र म्हणून बडोदा संस्थानाचा राजा बनतो आणि राजा बनल्यानंतर पुढील सहा वर्षात शिक्षण व प्रशासनाचा अनुभव घेत सर्वसामान्य जनतेच्या प्रगती आणि परिवर्तनासाठी धर्म आणि शिक्षण ह्या दोन महत्वाच्या घटकांची सांगड घालण्याची खुणगाठ बांधत जे कार्य सयाजीराजानी केले त्याला भारतीय इतिहासात तोड नाही.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कृषी आणि औद्योगिक धोरणाची माहिती जाणून घेणे.

३) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कला आणि साहित्यिक दृष्टीकोनावर प्रकाश टाकणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक, राजकीय, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे. प्रस्तुत विषयाच्या संदर्भात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या विचार चिंतनाच्या संबंधित , नियतकालिके, मासिके आणि वर्तमानपत्रे यांमधील लेख इत्यादी साधनांची मदत घेतली आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

१) वर्तमान भारतातील शोषित,वंचित आणि उपेक्षित समूहाचा जो विकास झाला आहे त्याची पायाभरणी महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केली आहे.

२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान आहे.

३) महाराजा सयाजीराव यांचे कार्य हे भारतातील मानवमुक्तीच्या चळवळींसाठी प्रेरणादायी आहे.

**१) सामाजिक कार्य :**

सयाजीराव महाराजंनी बडोदा संस्थाना अनेक सुधारणा केल्या. सामाजिक सुधारणा सहजासहजी होत नसतील तर कायदे बनवले. हे कायदे करताना त्यांनी जनमत देखील आजमवलं होतं.पडदापद्धती बंदी, बालविवाह बंदी, कन्याविक्रय

बंदी . बालविवाहबंदी, घटस्फोट कायदा, दत्तक घेण्याविषयीचा कायदा, मुलींना वडिलांच्या मिळकतीतील संपत्ती वर हक्क कायदा, बालसंरक्षक कायदा, सोळा वर्षाखालील मुलांना व्यसन बंदी, बारा वर्षाखालील मुलांना गिरणीत आणि कारखान्यात नोकरीला न ठेवणे, कायदा असे अनेक कायदे सयाजीराव गायकवाड यांनी केले होते.

वरील सर्व सुधारणा त्यांनी प्रत्यक्ष अंमलात आणल्या. घटस्फोटासंबंधीचा कायदा सर्व भारतात पहिल्यांदाच त्यांनी जारी केला. हरिजनांसाठी अठरा शाळा काढल्या (१८८२). डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली आणि त्यांची संस्थानात उच्च पदावर नेमणूकही केली. सुधारणांच्या प्रत्यक्ष पुरस्कारामुळे त्यांना ङ्गराष्ट्रीय सामाजिक परिषदेफ्च्या अध्यक्षपदाचा मान मिळाला (१९०४). सयाजीराव महाराजांनी सामाजिक सुधारणेसंबंधी केलेले कायदे पाहिल्यावर त्या काळातदेखील त्यांचा दृष्टिकोन किती पुरोगामी स्वरूपाचा होता याची कल्पना येऊ शकते. या संदर्भात आचार्य अत्रे यांनी लिहिले आहे की, ‘सुधारणेच्या शिखरावर आरूढ झालेल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना ज्या गोष्टी भारतात इतरत्र करता आल्या नाहीत,’ त्या सर्व सुधारणा एकट्या सयाजीरावांनी आपल्या राज्यात करून त्यांना माना खाली घालावयाला लावल्या.

**२) शैक्षणिक कार्य :**

सयाजीराव महाराजांनी स्वतः आपल्या बडोदा संस्थानात केलेल्या शैक्षणिक कार्याचा दैदिप्यमान इतिहास आजवर दुर्लक्षित राहिला. सयाजीरावांनी १८९३ मध्ये अमरेली तालुक्यातील १० गावांमध्ये सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना प्रायोगिक तत्त्वावर लागू केली.पुढे १९०६ मध्ये महाराजांनी संपूर्ण बडोदा संस्थानात सर्व जाती-धर्माच्या मुलामुलींसाठी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला.हा कायदा लागू करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान होते.सयाजीरावांनी जनतेच्या माध्यमिक शिक्षणासाठी बडोदा हायस्कुल(१८७१), ‘द पाटण अँग्लो व्हर्नाक्युलर स्कुल’ (१८७९), ‘फतेहसिंग इंग्लिश इन्स्टिट्यूट’ (१८९५), ‘गंगाधर मिक्स्ड स्कुल’ (१९२३-२४) यांसह संस्थानातील विविध ठिकाणी गुणवत्तापूर्ण शाळांची स्थापना केली. प्राथमिक-माध्यमिक शिक्षणाने साक्षर झालेल्या जनतेला उच्चविद्याविभूषित करण्यासाठी सयाजीरावांनी राज्याधिकार प्राप्त झालेल्या वर्षीच (१८८१) बडोदा कॉलेजची स्थापना केली. कृषिप्रधान सर्वसामान्य विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच शेतीचे अत्याधुनिक ज्ञान मिळावे या उद्देशाने सयाजीरावांनी १८८९ मध्ये बडोदा कॉलेजमध्ये स्वतंत्र शेतकी विभागाची स्थापना केली.या विभागाशी संलग्न शेतजमिनीत विविध पिकांचे प्रयोगशील उत्पादन घेतले जात होते.

याचबरोबर विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्र शिक्षण देण्यासाठी सयाजीरावांनी १८९० मध्ये कलाभवनची स्थापना केली.कलाभवनमध्ये ६ विद्याशाखांचे सैद्धांतिक आणि प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण दिले जात होते. संस्थानातील प्रत्येक विद्यार्थ्याला बडोद्यात येऊन कला भवनमध्ये तंत्र शिक्षण घेणे शक्य नव्हते. त्यामुळे संस्थानाच्या औद्योगिक प्रगतीसाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या उद्दशाने सयाजीरावांनी जिल्हा औद्योगिक शाळांची स्थापना केली. तंत्र शिक्षणाचे विकेंद्रीकरण केले.

१८८२ साली महाराजांनी सोनगढ येथे आदिवासी व अस्पृश्यांसाठी पहिली प्रत्येकी एक मोफत निवासी शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करतानाच महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्यांच्या माध्यमातून आर्थिक मदत केली. १८८२ च्या कायद्यानुसार महाराजांनी आदिवासींसाठी प्राथमिक शाळा सुरू करून शैक्षणिक साहित्य आणि निवासाची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली.

आदिवासी विद्यार्थ्यांना शेतीचे आधुनिक प्रशिक्षण देण्यासाठी या शाळा संस्थानातील प्रायोगिक शेतीशी संलग्न केल्या. १८९६ ला सोनगड येथे आदिवासी मुलींसाठीची पहिली स्वतंत्र निवासी शाळा स्थापन केली.या समाजातील मुला-मुलींना बडोद्यातील १८८२ मध्ये सुरु झालेल्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षकी पेशाचे प्रशिक्षण दिले जाई.

महाराजांनी शिक्षणशास्त्र, संशोधन, सॅनिटरी इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, धातुशास्त्र आणि खाणी, शिल्पकला, तालीम, औषधी, व्यापार, बागकाम, अर्थशास्त्र, आर्थिक आणि राजकीय तंत्र, नाणे आणि समाजशास्त्र, छापकाम आणि स्टेशनरी, पुस्तकालय, शेती, किंडरगार्टन, हॉटेल व्यवसाय, पोलीस कवायत, कायदा इ. विषयांचे उच्च शिक्षण घेण्यासाठी तरुणांना परदेशामध्ये पाठविले होते.अस्पृश्य आणि आदिवासींसारख्या समाजातील वंचित घटकांच्या साक्षरतेसाठी सयाजीरावांनी राबवलेले शैक्षणिक धोरण आजही आदर्शवत ठरते.

**३ स्त्री शिक्षण :**

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार पहायला सुरूवात हुकूम काढला. हा हुकूम स्त्रीयांच्या शिक्षणासंबंधीचा कायदाच आहे. यामध्ये महाराज म्हणतात, मभावी पिढीच्या सर्वोतपरी संवर्धनाची जबाबदारी स्त्रियांवरच आहे. स्त्रिया सुविद्य असल्या तरच त्या उत्तम नागरिक निर्माण करू शकतील. निरक्षर, निर्बुद्ध स्त्रियांमुळे संसार नीरस होण्याचा संभव असतो. गृहिणी शिकलेली आणि

ISSN No. 2394-5990

सुसंस्कृत असली तर ती पुरुषास चांगल्याप्रकारे मदत करू शकते. पुरूषांशी सहकार्य करून त्यांच्याशी असलेले सहचारिणीचे नाते यथार्थ करून दाखविणे हाच विवाहाचा श्रेष्ठ हेतू मानला जातो. हे सर्व साधण्यासाठी स्त्रियांस योग्य शिक्षण देणे, हाच एकमेव मार्ग आहे. यावरून स्त्री शिक्षणाविषयी दूरदृष्टीकोन दिसून येतो. स्त्रियांनी शिक्षणाबरोबरच भावी पिढीच्या संगोपनाची जबाबदारी योग्य पध्दतीने घेतल्यास देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. प्रायोगिक तत्त्वावर प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. ७ ते १० वर्षे वयाच्या मुलींना शिक्षण सक्तीचे करण्यात आले.ज्या ठिकाणी मुलींसाठी स्वतंत्र शाळा नव्हत्या तिथे मुला मुलींना एकत्र शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. १० पेक्षा जास्त वय असणाऱ्या मुलींसाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना चालू केली.समाजातील मागासलेल्या जाती-जमातीतील स्त्रियांच्या शिक्षणाकडे सयाजीराव महाराजांनी विशेष लक्ष दिले होते. इ.स. १८९७-९८ साली सोनगड मधल्या धानका येथे मुलींसाठी निवासी शाळा सुरू करण्यात आली. ही शाळा इयत्ता सातवीपर्यंत होती. १९११ साली या निवासी शाळेतल्या मुलींची एकंदर संख्या ५० इतकी होती, ती १९४१-४२ मध्ये वाढून ६२ इतकी झाली.

**४) प्रगत कृषी धोरण :**

सयाजीराव गायकवाड हे शेतकऱ्याचा मुलगा असल्यानं त्यांच्या मना शेतकऱ्यांविषयी आपुलकीची भावना होती. विहिरी खोदणे, जलसिंचनाची सोय करणे, शेतीतील संशोधनासाठी शिष्यवृत्ती देणे, लोकोपयोगी कामं सयाजीराव गायकवाड यांनी केली.पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांकडून मिळणारा शेतसारा हेच राज्याचे मुख्य उत्पन्न होते. शेतसारा हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत असल्याने वसुलीसाठी अधिकाऱ्यांकडून जबरदस्ती होत असे. वसुलीचे ठरावीक आणि पारदर्शी धोरण नसल्यानेही बऱ्याच वेळा शेतकऱ्यांची फसगत होत असे. सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्याच्या दुसऱ्याच वर्षी शेती सुधारणेसाठी मसर्व्हे-सेटलमेंटफ नावाचे नवीन खाते निर्माण केले. त्यामार्फत त्यांनी शेतीसंबंधित सुधारणांचा धडाका सुरू केला. पूर्वीच्या शेतसारा पद्धतीत आमूलाग्र बदल केले. एका शेतातून मागील वर्षी किती उत्पन्न आले ते प्रथम पाहिले, नंतर मागील अनेक वर्षांत त्या शेतामधून किती उत्पन्न आले हेही ठरवले. तसेच पुढील अनेक वर्षांत किती उत्पन्न येईल हेही अंदाजे ठरवले. जमिनीच्या उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारचा कर वाढवायचा नाही, हा नियम घालून दिला. महाराजांनी शेतीचे उत्पन्न ठरवताना शेतकऱ्याची मजुरी, ते पीक काढण्यापर्यंत अवजारांसाठी लागणारा खर्च आणि याची जमवाजमव करताना शेतकऱ्यांनी कर्ज घेतले तर त्याचे व्याजही खर्चात घ्यावे आणि त्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहील त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक रक्कम कर रूपात घ्यावयाची नाही, असा नियम केला. याचा अर्थ शेतसारा देताना शेतकऱ्यांचे पीक तयार होईपर्यंतचा खर्च विचारात घेतला. अशा प्रकारे शेतसारा ठरवण्याची सोपी आणि सर्वसमावेशक पद्धत सुरू केली.

शेतकरी सावकारांच्या कचाट्यात सापडू नये त्यासाठी त्यांनी शेतीच्या उत्पन्नावर कर्ज देण्यासाठी मसरकारी शेतकी पेढ्यांफ्ची स्थापना कायदा करून केली. काही कालावधीत त्यांनी जमीन तारणावर कर्ज देण्यासाठी मडरपव चेंींसरसश इरपज्ञफ स्थापन केली. तर नवसारी प्रांतात सन १९०५ साली मअॅग्रिकल्चर बँकेफ्ची स्थापना केली. शेतकरी कर्जबाजारी होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली. राज्यकारभार हाती आल्यानंतर कमी कालावधीत मस्वतंत्र शेतकी खातेफ निर्माण केले. त्यामाध्यमातून निरनिराळ्या पद्धतीने शेतकऱ्यांना मदत केली.

शेतकऱ्यांनी आधुनिक बी-बियाणे वापरावे यासाठी खेडोपाडी, गावोगावी कार्यशाळा घेतल्या. प्रयोग, प्रदर्शने, भाषणे या माध्यमांतून आधुनिक शेतीचे महत्त्व पटवून दिले. शेतात लागणारी आधुनिक साधने पुरवली. त्यामध्ये लोखंडी नांगर, ट्रॅक्टर यांचा समावेश होता. शेतीचे नवीन तंत्र शेतकऱ्यांनी स्वीकारावे यासाठी आधुनिक शेतीचे नमुने जगुदन, नवसारी आणि बडोदे येथे तयार करून घेतले.कृषीक्षेत्राचा विस्तार करताना प्रथम शेतीच्या परंपरागत पद्धतीत व साधनांमध्ये सुधारणा करून प्रगत प्रशिक्षणाची जोड देत उत्तम हित साधले.

**५) उद्योगधंद्याच्या विकासासंदर्भात विविध कायदे :**

बडोद्यातील औद्योगिक विकासाचा शोध दुसऱ्या प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे. १८८१मध्ये राज्याधिकार प्राप्तीनंतर लगेचच उद्योगधंद्यांच्या विकासाच्या दृष्टीने महाराजांनी प्रयत्न सुरू केले. उद्योगधंद्याच्या विकासासंदर्भात विविध कायदे करून सर्व उद्योगधंद्यांना कायदेशीर पाठबळ दिले. कंपनी क्ट (१८९७), सालचा बॉयलर क्ट (१८९८), कस्टम क्ट (१९०४), रूल्स फॉर ओपनिंग फॅक्टरीज अँड ॲक्विजिशन ऑफ लँड (१९०४), वेट अँड मेजर्स क्ट (१९०४), मायनिंग क्ट (१९०८), फॅक्टरीज क्ट (१९१३) आणि रूल्स ऑफ डेव्हपमेंट ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (१९१५) इ. प्रकारचे कायदे सयाजीरावांनी केले. बडोदा संस्थानात महाराजांच्या प्रयत्नाने ओखा मीठ कारखाना, सयाजी स्टील वर्क्स, अश्विनी उद्योग, टाटा केमिकल्स, महाराणी वूलन मिल, फिशरी उद्योग, डिंक उद्योग, पेटलाद येथील पेन्सिल निर्मितीचा कारखाना, मातीची निर्मितीचा कारखाना इ. महत्त्वाचे उद्योग बहरले.

**६) कला आणि साहित्याचे आश्रयदाते :**

राजा हा देवाचा अवतार असतो व चैन करणे हा त्याचा जन्मसिद्ध अधिकार असतो, असे मानण्याच्या काळात सयाजीराव ठसठशीत अपवाद होते. राज्यकोश माझा नसून जनतेचा आहे, मी त्याचा विश्वस्त आहे, असे ते मानत होते. कुटुंबातील खर्चात काटकसर करणारे महाराज गरजूंना, राज दरबारातील कलावंत, साहित्यिक व नाट्यकर्मींना मात्र,सढळ हाताने मदत करत. महाराजांना माणसाची पारख होती, योग्य माणसाला योग्य कामासाठी निवडण्याची कला होती. हिंदुस्थानातूनच नाही, तर विदेशातूनही तज्ज्ञांची ( उदा.अमेरिकेतील येल विद्यापीठातील डॉ. डब्ल्यू. ए. बोर्डेन यांना त्यांनी ग्रंथालय संचालक म्हणून नेमले. स्कॉटिश अभयंता अँडरसन यांच्या मदतीने रेल्वेलाइन उभारली. हार्वर्ड पदवीधर आर. सी. विटनेक एक्साइज कमिशनर बनले. केंब्रिजचे स्कॉलर बडोद्याचे शिक्षण मंत्री व कॉलेजचे प्राचार्य होते.) निवड करून त्यांना बडोद्यात आदराने बोलवून त्यांच्या कौशल्याचा उपयोग राज्यासाठी, रयतेसाठी ते करून घेत. ज्या होतकरू मुलां-मुलींना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जात, त्याची परतफेड म्हणून आयुष्याची काही वर्षे राज्याच्या सेवेसाठी देण्याची अट घालत. इटलीतील प्रसिद्ध शिल्पकार फेलीचीला बोलवून त्यांच्याकडून अनेक सुंदर शिल्प व चित्रकलेच्या कलाकृती त्यांनी बनवून घेतल्या.महाराणी चिमणाबाई प्रथम यांची इटालियन संगमरवरातून बनवलेली मूर्ती हा मूर्तिकलेचा एक अप्रतिम सुंदर नमुना आहे.चित्रकार राजा रवी वर्मांना बडोद्यात बोलवून भारतीय चित्रपरंपरेचा अमोल ठेवा बनवून घेतला.मौलाबक्ष यांना बडोद्याचा गायन शाळेचे प्रथम प्राचार्य बनवले.अल्लाउद्दीन यांना शिष्यवृत्ती देऊन पाश्चिमात्य संगीत शास्त्र शिकवण्यास विलायतेस पाठवले. तंजावुरच्या नृत्यांगनेला, गंधर्व नाटक मंडळींना त्यांनी राजाश्रय दिला आणि बडोदे साहित्य आणि कलांचे माहेरघर म्हणून नावास आले

**सारांश:**

महाराजा सयाजीराव हे केवळ तत्त्वचिंतक नव्हते तर कृतिशील समाजसुधारक होते. सामाजिक जीवनातील प्रत्येक क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. सामाजिक न्याय आणि समानतेचा नेहमी आग्रह धरला.

महाराज सयाजीराव गायकवाड यांची थोरवी सांगताना विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात मी महाराजांकडून उपकृत झालेला मनुष्य आहे. आजकाल भरत खंडात अस्पृश्यता निवारणार्थ चळवळ देशभर फोफावली आहे, तीची पाळंमुळं आणि धुरा महाराजांच्याच खांद्यावर आहे. अस्पृश्य उध्दाराची हिंदुस्थानातील मुहूर्तमेढ ह्या खंबीर पुरुषाने धडक्यासरशी जी रोवली तिचा पुढे विस्तार होत गेला. तर महात्मा गांधी म्हणतात महाराज सयाजीराव गायकवाडांनी बडोदा संस्थानात हरिजनांसाठी शिक्षणाची दारे उघडली आणि अस्पृश्यतेचा कलंक भारतात प्रथमच कायद्याने पुसून अंमलबजावणी केली. या लोकोत्तर कामासाठीच ते सर्वांहून अधिक अभिनंदनास पात्र आहेत. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात श्री. सयाजीराव महाराजांचे निधन ही माझी वैयक्तिक फार मोठी हानी झाली आहे. त्यांचे उपकार मी केव्हाही विसरणार नाही. मला त्यांनी जे शिक्षण दिले त्यामुळे आजची योग्यता मला प्राप्त झाली. अस्पृश्य जातीवर त्यांचे फार मोठे उपकार झाले आहेत. त्यांच्याइतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही कार्य केले नाही. ते मोठे समाजसुधारक होते व बडोदे संस्थानात सामाजिक सुधारणांविषयी जे कायदे करण्यात आले ते युरोप व अमेरिकेतील कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राच्या तदविषयक कायद्यापेक्षा पुढारलेले आहेत. त्यांनी सर्व सामाजिक घाणेरडया चालींचा अभ्यास करुन त्यातील दोष काढून टाकण्यात पुढाकार घेतला. स्वतःच्या प्रजेच्या कल्याणासाठी इतके सतत प्रयत्न दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकांनी केले नाही.

बडोद्याचे संस्थानिक महाराजा सयाजीराव गायकवाड हे विलक्षण व्यक्तिमत्व होते. असा क्रांतदर्शी, उमदा, नवविचारांचा, प्रयोगशील, स्वाभिमानी, उदार, सुसंस्कृत राजा विरळा.

**संदर्भ :**

१) भांड बाबा (संपा) महाराजा सयाजीराव गायकवाड गौरवगाथा युगपुरूषाची खंड -१२ महाराष्ट्र शासन - २०१७

२) पगार कनाथ , महाराष्ट्राचे शिल्पकार महाराज सयाजीराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथम आवृत्ती ,२०१८

३) मालकर यमाजी (संपा.) डॉ.राजेंद्र मगर,महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह भाग एक,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,प्रथम आवृत्ती ,२०१८

४) काळे वामण, बडोदा राज्याची सांपत्तिकस्थिती श्री सयाजी गौरवग्रंथ -१

५) तळवटकर गोविंद, सत्तांतर १९४७ खंड १, मौज प्रकाशन, मुंबई १९९७

६) आपटे दा.ना, श्री महाराजा सयाजीराव गायकवाड, चरित्र खंड १

७) भांड बाबा, आधुनिक भारताचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१७

ISSN No. 2394-5990

८) गायकवाड फत्तेसिंहराव, सयाजीराव ऑफ बरोडा, पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे, १९८९
९) पवार निंबाजीराव, जेव्हा गुराखी राजा होतो , सयाजी प्रकाशन, नाशिक, १९८८
१०) हिंगुरराव मंदा, महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण, साकेत प्रकाशन,औरंगाबाद,२०१५
१२) भांड बाबा, लोकपाठ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन,औरंगाबाद,२०१२
१३) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, फेब्रुवारी, २०१८

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक धोरण आणि त्यांचे मागास जाती-जमातीच्या शिक्षणातील योगदान

**अमोल राम डायरे**
(एम.ए.,बी.एड.,डी.एड.,नेट,सेट) पीएच.डी. संशोधक विद्यार्थी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
मो.क्र. ७९७२८६२०९९, Email - amoldayre@gmail.com

**प्रस्तावना:**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे भारतातील सर्वाधिक काळ सत्तेवर राहिलेले संस्थानिक आहेत.त्यांनी आपल्या संस्थानात वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय आणि मूलगामी असे कार्य केलेले आहे.भारतीय शैक्षणिक वाटचालीचा इतिहास पाहिला तर त्यांनी अनेक अभिनव धोरणांची आखणी आपल्या संस्थानात केल्याचे लक्षात येते. शिक्षणामुळेच प्रजेच्या परिस्थितीत बदल होऊ शकतो. शिक्षण हेच प्रजा सुधारण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे हे त्यांनी आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच जाणले होते. आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी शैक्षणिक धोरणे तर राबविलीच पण त्यांची अंमबजावणी ही काटेकोर केली.

मागास जाती आणि जमातीच्या शिक्षणातील योगदानही त्यांचे दूरगामी परिणाम करणारे आहे. अस्पृश्यता निवारण हा महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय राहिलेला आहे. कोणताही माणूस जन्मतः श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसतो हा विचार त्यांनी वारंवार मांडलेला आहे. मागास जाती-जमातींच्या परिस्थितीत बदल करायचा असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे. त्यासाठी नुसते धोरण तयार करून चालणार नाही तर त्याची अंमलबजावणी व्यवस्थित कशी होईल याची पुरेपूर काळजी घ्यावी लागेल हे जाणून त्यांनी तशी व्यवस्था केली.मागास जाती-जमातीच्या शिक्षणाचा विचार केवळ आपल्या संस्थनापूरताच न करता त्यांनी संस्थनाबहेरील होतकरू विद्यार्थ्यांना ही भरघोस शैक्षणिक मदत केल्याचे लक्षात येते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक धोरणाचा आणि मागास जाती जमातींच्या शिक्षणातील योगदानाचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे.

**विषयाचे महत्त्व :**

अलीकडील काळात शिक्षणात अनेक बदल होत आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आलेले आहे.या पार्श्वभूमीवर महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिक्षणात केलेले प्रयोग, उपक्रम आणि धोरण याचा विचार करणे ही काळाची गरज बनलेली आहे.त्यांनी मागास जाती-जमातींच्या शिक्षणासाठी केलेल कार्य हे निश्चित दिशादर्शक आहे. त्यांच्या व्यापक शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक धोरण अभ्यासणे.
२. शिक्षणातील अभिनव प्रयोगाचा अभ्यास करणे.
३. मागास जाती-जमातींच्या शिक्षणासाठी राबविलेल्या धोरणांचा अभ्यास करणे.
४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक धोरणामुळे मागास जाती-जमातींच्या शिक्षणातील प्रगतीचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात शैक्षणिक धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी केली.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राबविलेल्या धोरणांमुळे मागास जाती आणि जमातींच्या शिक्षणात प्रगती झाली.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. त्याचबरोबर अन्वेषण,विश्लेषण पद्धतीचा वापर केला आहे. सदर शोधनिबंध प्राथमिक,दुय्यम साधनावर आधारित आहे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणविषयक विचार:**

प्रजेचे कल्याण हेच माझे कर्तव्य व तोच माझा मोक्ष असे महाराजा सयाजीराव गायकवाड यांना वाटत होते. प्रजेचे कल्याण

ISSN No. 2394-5990

करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हा महत्त्वाचा मुद्दा त्यांच्या खूप लवकर लक्षात आलेला होता. ११ जून १९०४ साली त्यांनी न्यू इंग्लिश स्कूल,पुणे येथे केलेले शिक्षणविषयक विचार खूप महत्वपूर्ण आहेत.त्यातून त्यांची शिक्षणविषयक दृष्टी लक्षात येते.

विद्या ही एकाच व्यक्तीला किंवा वर्गाला किंवा फारतर एकाच समाजाला मिळून फायदा नाही ती सार्वत्रिक असली पाहिजे. शिक्षण महारापोरांपासून ते वरच्या पातळीपर्यंतच्या सर्व लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे.

शिक्षण सर्वांना देण्याची आणि पोहचविण्याची त्यांची तळमळ होती.

माणसाच्या आयुष्यात शिक्षणाचे खूप महत्त्व आहे महाराजांनी जाणलेले होते त्यामुळेच त्यांनी शिक्षणप्रसार करण्यावर भर दिलेला होता. त्यांना शिक्षणाविषयी किती तळमळ होती ही त्यांच्या अनेक भाषणा वरून आणि व्यक्त केलेल्या विचारावरून लक्षात येते.शिक्षणविषयक व्यक्त केलेले विचार हे त्यांच्या भविष्यातील लक्ष्याचे दर्शन घडवितात.

शिक्षणासंबंधी एका ठिकाणी ते आपले विचार व्यक्त करतात की, हल्लीच्या यांत्रिक युगात व चढाओढीच्या काळात तर शिक्षणाचे महत्व अधिकच वाढते.जे राष्ट्र आपल्या सर्व नागरिकांना कोणताही भेदभाव अधवा निर्बंध न ठेवता शिक्षणाचा फायदा मिळविण्याची संधी देते ते राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांना मागे टाकून खात्रीने पुढे जाणार.प्रत्येक व्यक्तीला ज्ञानाच्या उच्च कोटीला पोहोचणे शक्य नाही,परंतु सर्वसाधारण ज्ञानाची मर्यादा जितकी अधिक तितकी ते राष्ट्र अधिक समर्थ ठरेल.यामुळेच उच्च किंवा निच अशा जातीचा अगर वर्णाचा भेद न ठेवता सर्वांनाच ज्ञान मिळविण्याची संधी दिली पाहिजे. (लेले, भालचंद्र, बडोदे राज्यातील प्राथमिक शिक्षण, संपा.,भांड बाबा,महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२,पृ.७२)

राष्ट्राला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी महाराजांना शिक्षण हे महत्त्वाचे साधन वाटते आहे.वरील विचार हे व्यक्तीला नवीन येणाऱ्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तसेच स्वतः चा उत्कर्ष घडविण्यासाठी शिक्षण राजाने देणे त्यांना महत्त्वाचे वाटते आहे.सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्ञान किंवा शिक्षण देताना कोणताही भेदभाव न ठेवता शिक्षणाचा प्रसार त्यांना करायचा होता हे लक्षात येते.

दहाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या प्रसंगी महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केलेले भाषण त्यांच्या शिक्षणाविषयी चा दृष्टिकोन व्यक्त करतो, निरनिराळ्या उपयुक्त विषयावर पुस्तके तयार झाल्याशिवाय शिक्षणाचे कार्य सिद्धीस जाणार नाही. भाषेत जर चांगले ग्रंथ निपजले नाहीत तर लोकशिक्षणाचे सर्व प्रयत्न लंगडे पडतात. इतकेच नव्हे तर चांगली पुस्तके समाजास न मिळाल्याने लोकांची प्रवृत्ती सदोष पुस्तके वाचण्याकडे होते.मनुष्यामध्ये तृष्णा उत्पन्न करावी आणि ती भागविण्याची साधने देऊ नयेत, तशातला हा प्रकार आहे. अर्थात उपयुक्त ग्रंथ उत्पन्न करण्याची निकड केवढी आहे हे आपल्या निदर्शनास येईल.देशी भाषांत चांगले ग्रंथ तयार करण्या संबंधाने माझे प्रयत्न फार वर्षापासून चालू आहेत.

शिक्षण केवळ देऊन न थांबता त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या इतर महत्त्वाच्या गोष्टींची तरतुदीही महाराजांनी लक्षपूर्वक केलेली होती.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणविषयक धोरणे:**

**मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण:**

१८९३ साली बडोदा संस्थानात अमरेली शहर व तालुक्यातील ९ गावाला हा कायदा लागू करण्यात आला. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या खर्चासाठी ३१,७९० रुपये इतकी तरतूद करण्यात आली. हळूहळू ह्या कायद्याची व्याप्ती वाढविण्यात आली व १९०६ मध्ये हा कायदा संपूर्ण संस्थानात लागू करण्यात आला.त्यामुळे शिक्षणातील लोकांचे प्रमाण खूपच वाढले. या कायद्यानुसार ७ वर्षाच्या बालकास शाळेत दाखल करणे व वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत अथवा ४ थी पास होईपर्यंत शिक्षण घेणे अनिवार्य होते.ज्या मुलांना आई वडील शाळेत पाठविणार नाहीत त्यांना दोन आणे दंड सुरू केलेला होता. या धोरणाचा खूप सकारात्मक परिणाम झाला. अडीज हजार मुले प्राथमिक शाळेत शिकण्यास येऊ लागली.

बडोदा संस्थानात शिक्षणावर प्रतिव्यक्ती सात आणा इतकी रक्कम खर्च केली जात असे.ही रक्कम इंग्रजी सरकारपेक्षा अधिक स्वरूपाची होती. या शैक्षणिक धोरणामुळे इतर कोणत्याही संस्थांना पेक्षा बडोदा संस्थानातील शाळेत जाणाऱ्या बालकांचे प्रमाण अधिक होते.

**शिष्यवृत्ती योजना:**

संस्थानातील आणि संस्थानाबहेरील होतकरू आणि गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची व त्यांना पुढील शिक्षणासाठी उत्तेजन देण्याची अभिनव कल्पना महाराजांनी आपल्या कार्यकाळात राबविली.त्यांच्या या योजनेचा अनेक विद्वान मंडळींना फायदा झाला.

**फिरते वाचनालय :**

सक्तीचे शिक्षण दिल्यानंतर वाचन लेखन येणाऱ्या गावातील,शेतकरी मंडळींचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून

गावोगाव फिरती वाचनालये महाराजांनी सुरू केलेली होती.या वाचनालयात शेतकी,उद्योग,व्यापार यावरील माहिती ची पुस्तके ठेवण्यावर महाराजांचा कटाक्ष होता.शाळेत घेतलेले ज्ञान विसरू नये यासाठी वाचनालय हा अत्यंत अभिनव उपक्रम महाराजांनी राबविला.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अनेक धोरणे राबविली यामध्ये त्यांनी स्त्रीशिक्षण, औद्योगिक शिक्षण, शेतकीशाळा यांचाही समावेश होता. अशा शाळेतील ज्ञानामुळे संस्थानातील लोकांची शैक्षणिक प्रगती झाल्याचे लक्षात येते.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे मागास जाती जमातींच्या शिक्षणातील योगदान:

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या अनेक भाषणामध्ये अस्पृश्यता निवारण आणि अस्पृश्यांची शैक्षणिक प्रगती हे माझ्या अत्यंत जिव्हाळ्याचे विषय असल्याचे नमूद केलेले आहे. समाजातील सर्व स्तरातील लोक शिकले तरच राज्य पुढे जाईल अशी त्यांची धारणा होती. अस्पृश्य आणि आदिवासी यांचे जीवन त्यांनी जवळून पाहिल्याने त्यांच्या दुःखाची आणि प्रगती न होण्यामागची करणे त्यांना ठावूक होती. मागास जाती आणि जमातींच्या शिक्षणाचा अंतर्भाव आपल्या धोरणात करणे हे महाराजांचे अत्यंत लक्षणीय कार्य आहे.

मागास जाती जमातींच्या साठी महाराजांनी अगदी आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच १८८२-८३ सालीच बडोदा राज्यातील निरनिराळ्या भागात जवळपास १८ शाळा सुरू केलेल्या होत्या. पुढे चालून १८९६ साली ही संख्या २० पर्यंत पोहोचली.

१८९१-९२ साली अस्पृश्य समाजासाठी महाराजांनी बडोदा, अमरोली, नवसरी, पाटण इ.ठिकाणी वसतिगृहाची निर्मिती केलेली होती. ते वसतिगृह निर्माण करून थांबले नाहीत तर विद्यार्थ्यांच्या जेवणाचाही प्रश्न त्यांनी मिटविला होता. यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना कपडे,पुस्तके व लेखन साहित्यही मोफत पुरविले होते.

अस्पृश्यांच्या साठी केलेल्या शैक्षणिक कामाची माहिती व विश्लेषण खालील तक्त्यावरून लक्षात येते.

| वर्ष | मुलांच्या शाळा. | मुलींच्या शाळा | एकूण शाळा | विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १८८३ | - | - | ०२ | - |
| १८८४ | - | - | ०९ | - |
| १८९१ | - | - | १० | ७८४ |
| १९०० | - | - | २२ | १७२३ |
| १९१०-११ | - | ०४ | २८८ | १५५४१ |
| १९२०-२१ | २२२ | २५ | २२६ | १२०९५ |
| १९२५-२६ | २२० | ५ | २२५ | १५४०३ |
| १९३०-३१ | १९९ | २ | २०१ | १८३८८ |
| १९३१-३२ | ९० | ०१ | ९१ | २०९०३ |

(शिंदे वि.रा.,श्री महाराजांचे अस्पृश्योधारक कार्य, संपा.,बाबा भांड,महाराजा सयाजीराव गौरवगाथा,खंड १२, २०१७,पृ.३०६)

वरील कोष्टकाचा विचार केला असता लक्षात येते की महाराजांनी अस्पृश्यांसाठी सुरू केलेल्या शाळांमध्ये अस्पृश्य विद्यार्थी शिकण्याचे प्रमाण वाढत गेलेले लक्षात येते. मागास जाती-जमातींच्या शिक्षणाचा विचार केल्याने त्यांच्यात शैक्षणिक सुधारणा झालेल्या लक्षात येतात.याचा अर्थ असा की महाराजांचे मागास जाती जमातींच्या शिक्षणात महत्त्वाचे योगदान होते.

१९३१-३२ दरम्यान बडोदा राज्यातील अस्पृश्यांची लोकसंख्या जवळपास २,०२,७७७ इतकी होती त्यापैकी २०,९०३ विद्यार्थी प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेत होते. अस्पृश्यांच्या शाळांची संख्या जरी कमी झाली असली तरी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढलेले होते.

मागास जाती जमातींच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना महाराजांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले होते. कितीही पगार देऊ केला तरी अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी महाराजांना हिंदू शिक्षकच मिळत नव्हते. त्यासाठी महाराजांनी मुस्लिम,ख्रिश्चन आणि आर्य समाजाची मदत घेतली होती. पुढे महाराजांनी शिक्षक तयार करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करून त्यातून शिक्षक तयार करण्याचे काम

केले. ट्रेनिंग कॉलेज मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी विद्यावेतन सुरू केले होते.

बडोदा संस्थानातील सर्व शिक्षण संस्थांमध्ये मागासलेल्या वर्गासाठी सवलती ठेवलेल्या होत्या. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ५००० रुपयांची तरतूद त्यांनी बजेट मध्ये केलेली होती तर अस्पृश्य मुलामुलींसाठी १७२८ रुपये विद्यावेतनासाठी राखून ठेवलेले होते.

मागास जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे व त्यांना पुढील शिक्षणासाठी मदत करणे याबाबतीतील त्यांचे योगदान तर सर्वश्रुत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांनी तब्बल चार वेळेस शिष्यवृत्ती देऊन परदेशी शिकविण्यासाठी पाठविलेले होते.त्यांच्या मदतीच्या बळावरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर एम.ए. आणि पीएच.डी.सारख्या पदव्या संपादन करू शकले. त्याचप्रमाणे भटकर नावाचा महार जातीतील विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्यावर त्याला कॉलेजातील शिक्षणासाठी प्रतिमाह २५ रुपये शिष्यवृत्ती सुरू केलेली होती.अस्पृश्य विद्यार्थी शिकल्याचे त्यांना फार कौतुक होते.याबतीत त्यांनी शिवतरकर यांचेही कौतुक केलेले होते.

अस्पृश्य समाजा सोबतच आदिवासी लोकांच्या शिक्षणाकडे ही त्यांनी लक्ष दिले.त्यासाठी त्यांनी

१. द्वारका येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले.
२. वाघेर या आदिवासी भागात शाळा सुरू केली.
३. प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण वर्ग सुरू केले.
४. द्वारका येथे आदिवासी साठी उपविभागीय कार्याला सुरू केलेले होते.

आदिवासी शिक्षणकडेही त्यांचे लक्ष होते हे यावरून दिसून येते.

अस्पृश्यांच्या शिक्षणाविषयीचा त्यांचा व्यापक दृष्टिकोन त्यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी बोललेल्या वाक्यावरून लक्षात येतो.

शिक्षण संपादन केल्यावर तुम्ही आपल्या जातींच्या व विद्येत मागे राहिलेल्या लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्याची कामगिरी हाती घेतली पाहिजे. ( भांड बाबा,डॉ.भीमराव आंबेडकरांना शिष्यवृत्ती, पृ.३१३)

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा मागास जाती जमातींच्या शिक्षणाविषयीचा दूरदृष्टीपणा लक्षात येतो. महाराजांच्या एकूण कार्याबद्दल जे बोलले जाते ते खूप यथोचित वाटते की, What Baroda does today, India does tomorrow.

आजच्या काळातही महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक धोरण आणि मागास जाती जमातींच्या शिक्षणा विषयीचे विचार दिशादर्शक आहेत.

**निष्कर्ष :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचे प्रमाण वाढले.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अनेक सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या.
३. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मागास जाती जमातींच्या शिक्षणासाठी त्यांनी अनेक योजना राबविल्या.
४. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक धोरणामुळे मागास जाती जमातींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले.

**संदर्भ :**

१. भांड बाबा,डॉ.भीमराव आंबेडकरांना शिष्यवृत्ती, संपा.भांड बाबामहाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची,खंड १२.
२. शिंदे वि.रा.,श्री महाराजांचे अस्पृश्योधारक कार्य,संपा., बाबा भांड,महाराजा सयाजीराव गौरवगाथा, खंड १२, २०१७,पृ.३०६.
३. लेले,भालचंद्र,बडोदे राज्यातील प्राथमिक शिक्षण, संपा.,भांड बाबा,महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२,पृ.७२.
४. तायडे विशाल, महाराज सयाजीराव यांच्या सुधारणा, शिक्षण, खंड २५, २०२०.
५. खैरमोडे चांगदेव,डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,खंड १,एप्रिल २०१३.

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे धर्मविषयक कार्य व सुधारणा

**श्री. ब्रह्मदेव विठ्ठल शिंदे**
संशोधक विद्यार्थी, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
एम. ए. इतिहास सेट, नेट, एम. ए. राज्यशास्त्र सेट, एम. ए. अर्थशास्त्र सेट, डि.एड.
मो. नं. ९६२३७९५३७३ ई मेल - bvshinde1990@gmail.com

**सारांश :**

आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी भारताचे इतिहासामध्ये अग्रगण्य असणारे बडोद्याचे संस्थानिक महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे कार्य महान व क्रांतिकारक आहे. सयाजीरावांनी आपल्या कार्यकाळामध्ये धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवला. तसेच आयुष्यभर इतिहास, धर्म, समाजशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान अशा विविध ज्ञान शाखांचा अभ्यास केला, विविध प्रदेशातील प्रवास यामुळे सयाजीरावांचे धर्मविषयक विचार प्रगल्भ व पुरोगामी होत गेले. केवळ हिंदू धर्माचाच अभ्यास न करता बौद्ध, जैन, ख्रिश्चन झोराष्ट्रीयन, इस्लाम इत्यादी धर्मांचा सयाजीराजांनी तुलनात्मक पद्धतीने अभ्यास व चिंतन करून त्यातील अंतर्विरोध समाजापुढे मांडून सर्व धर्मांचे मूलतत्त्व मानव कल्याण हेच आहे असे त्यांनी आपल्या अभ्यासातून स्पष्ट केले. सयाजीरावांची धर्मचिकित्सा व धर्मविषयक विचार त्यातून त्यांनी मांडलेले तुलनात्मक धर्मचिंतन, धर्म सुधारण्यासाठी उचललेले अनेक कार्य त्यातीलच हिंदू कोड बिल, हिंदू पुरोहित कायदा, जागतिक सर्वधर्म परिषद, स्वतंत्र धर्म खाते इ. विविध घटना व बाबींची माहिती आपणास याद्वारे मिळण्यास मदत होईल.

**प्रस्तावना:**

भारताच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहासामध्ये ज्या राज्यकर्त्यांनी धर्म सकारात्मक व यशस्वीपणे पद्धतीने हाताळला, तसेच त्यासंबंधी ज्यांचे योगदान कालातीत असे आहे, असे आदर्श शासनकर्ता म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे नाव इतिहासात नोंदवले गेले आहे. सयाजीरावांचे चौफेर वाचन, सर्वसंग्रहकता, बुद्धीची परिपक्वता, निरनिराळ्या धर्माचा तुलनात्मक अभ्यास केल्यामुळे त्यांचे विचार प्रगतशील होत गेले. त्यांचा व्यासंग त्यांच्या लिखाणातून, भाषणातून, पत्रव्यवहारातून आपणाला स्पष्टपणे दिसून येतो. संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांसारख्या संतांची शिकवणी प्रमाणेच सयाजीरावांनी बडोदा संस्थानामध्ये पर्यायाने भारतामध्ये अनेक प्रकारची धार्मिक कार्य करून समाजाला एक नवी दिशा देण्याचे कार्य केले. सदर संशोधनामध्ये सयाजीरावांचे धार्मिक विचार प्रगल्भ होण्यासाठी अनेक बाबींची, घटनांची नोंद घेतली जाणार असून, सयाजीरावांनी आपल्या कालखंडात जे धर्मविषयक कार्य व सुधारणा केल्या त्यांचा उहापोह करणार आहोत.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधनासाठी गुणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला असून महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांच्या संदर्भातील अनेक संदर्भ ग्रंथांचा व साधनांचा गुणात्मक अभ्यास करून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे धर्मविषयक कार्य व सुधारणा:

**१) अनिष्ट रूढी- परंपरांबाबत सुधारणा व भूमिका:**

**अ) परदेशगमन :**

तात्कालिक समाजात परदेशगमन निषिद्ध मानले जात होते, परंतू सयाजीरावांनी १८८४ मध्ये आपले बंधू संपतराव गायकवाड व खासेराव जाधव यांना शिक्षणासाठी प्रदेशात पाठवले होते. त्याचबरोबर संपतराव यांचे सासरे बापूसाहेब घाडगे यांनाही पाठवले होते. त्यादरम्यान परदेशातच बापूसाहेब घाडगे यांचा मृत्यू झाल्याने महाराजांच्या निर्णयावर कुटुंबातून, धर्माशात्री, पंडितांकडून प्रचंड टीका झाली. परंतू सयाजीरावांनी याकडे दुर्लक्ष करून शांतपणे आपल्या सुधारणांची अंमलबजावणी सुरू ठेवली. त्यानंतर त्यांनी १८८७ मध्ये युरोपचा पहिला दौरा केला. या परदेशयात्रेस जाण्यासाठी नातेवाईक व नौकर-चाकर यांचे मन वळवण्यासाठी सयाजीरावांना खूप प्रयत्न करावे लागले. ज्यावेळी महाराज परदेशातून परत आले तेव्हा त्यांना प्रायश्चित्त घ्यावे लागले, त्यानंतर मात्र महाराजांनी भिकाचार्य ऐनापुरे यांच्याकडून १९०३ च्या हुकुमाद्वारे ङ्गप्रायश्चितमयूखफहा संस्कृत ग्रंथ मराठी भाषेत प्रकाशित केला.

 ISSN No. 2394-5990

**ब)** बडोद्याच्या महाराजांचे कापलेले केस नर्मदा नदीमध्ये सोडण्याची प्रथा पूर्वापार चालली होती, त्यासाठी सन१८८७ मध्ये खानगी कारखाना कारभाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात ८८ रुपये १२ आणे मंजूर केले, परंतु या संदर्भात इतर खर्च करण्यास राजांनी मंजूर दिली नाही. त्यातून सयाजीरावांनी धार्मिक खर्चाला लावलेला शिस्तीचे दर्शन होते.

**क) दृष्ट काढणे– प्रथेवर पायबंद :**

त्याकाळी राजघराण्यातील धर्मभोळ्या व्यक्तींचा फायदा घेत ब्राह्मण मंडळीकडून विविध प्रकारची धार्मिक कार्य करून घेतली जात असे. अर्थहीन धार्मिक विधी होत असत. त्यामध्ये राजघराण्यातील व्यक्तींची विनाकारण दृष्ट काढणे हे प्रकार सुरु होते. सुरुवातीच्या काळात राजघराण्यातील व्यक्तींचा या विधींना असणारा पाठिंबा व प्रशासनातील अनागोंदी लक्षात घेऊन सयाजीरावांनी हा प्रकार शांतपणे सहन केला, परंतू त्यांनी हळूहळू लोकांचे मतपरिवर्तन करण्यावर भर दिला. राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याची पद्धत १९ मे १९०१ नंतर बंद केली.

**ड) ग्रहणकालीन सार्वजनिक सुट्टी बंद :**

ग्रहणाच्या दिवशी सरकारी कार्यालयांना देण्यात येणारी सुट्टी हा सुद्धा अंधश्रद्धेचाच भाग असल्याने सयाजीराजांनी आदर्श हुकूम काढून ग्रहणाची सुट्टी बंद केली. सदर आदेश काढतेवेळी राजे म्हणतात 'पृथ्वीची छाया चंद्रावर पडते' त्यास ग्रहण म्हणतात, हे सर्व सुशिक्षित लोकांना माहित आहे, परंतु भोळे लोक या दिवशी राहू-केतू हे पापगृह चंद्र व सूर्य यांचा अस्त करतात, अशा समजुतीने तो दिवस धार्मिक कृती किंवा बहुतेक निरुद्योगात घालवतात, ही त्यांची अज्ञानी समजून दूर व्हावी व त्यांच्या उद्योगाचे महत्त्व कळावे, म्हणून बडोद्यातील सरकारी कार्यालयांना ग्रहणाच्या दिवशी दिली जाणारी रजा बंद करण्यात आली.

**२) हिंदू पुरोहित कायदा: १९१५**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी ३० डिसेंबर १९१५ रोजी हिंदू पुरोहित कायदा लागू केला. अशा प्रकारचा हा जगातील पहिला व एकमेव द्वितीय कायदा ठरला. सन १९११ मध्येच पुरोहित व पुराणिक यांचे धार्मिक ज्ञान तपासण्यासाठी परीक्षा घेण्याच्या आदेश दिले होते. त्यानुसार १९१२ मध्ये बडोद्यात पुरोहित यांची पहिली परीक्षा घेण्यात आली. कोणतीही सुधारणा करत असताना सर्व सामाजिक घटकांना समाविष्ट करून घेण्याच्या उद्देश्याने सयाजीरावांनी १९१३ रोजी हिंदू पुरोहित बिल प्रसिद्ध करून त्यावर विविध घटकांच्या सूचना मागवल्यानंतर सदर कायदा ३० डिसेंबर १९१५ रोजी लागू केला. त्यायोगे धार्मिक विधी करण्यासाठी योग्य धार्मिक शिक्षणात घेतलेला पुरोहित वर्ग तयार करणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश नमूद करण्यात आला. हाच कायदा १४ सप्टेंबर १९३४ मध्ये संपूर्ण संस्थानात लागू करण्यात आला.

**३) स्वतंत्र धर्म खाते: १९१७**

सयाजीरावांनी एप्रिल १९१७ मध्ये स्वतंत्र धर्म खात्याची स्थापना केली. या खात्याकडे देवस्थान विभाग, संस्कृत पाठशाला, पुरोहित पाठशाला, धार्मिक शिक्षण याविषयी जबाबदारी देण्यात आली होती. स्वतंत्र धर्म खाते स्थापन करून समाजात धर्मपरिवर्तन घडवून आणणारे सयाजीराव हे आधुनिक भारताच्या इतिहासातील पहिले प्रशासक ठरतात.

**४) संन्यास दीक्षा प्रतिबंधक कायदा: १९३३**

पुण्यप्राप्तीसाठी संन्यास दीक्षा स्वीकारण्याच्या जैन धर्मातील गैरसमजुतीचा लहान मुलांबाबत दुरुपयोग करून त्यांना जबरदस्तीने दीक्षा देण्याचे प्रकार बडोद्यातील जैनधर्मियांत वाढत होते. या प्रकाराबद्दल काही जैन धर्मियांच्या तक्रारींवरून लहान मुलांना दीक्षा देण्याबाबत जैन धर्मग्रंथातील आधार शोधण्यासाठी एक कमिटीची नेमणूक करण्यात आली होती. या कमिटीने याबाबत धर्मग्रंथात कोणताही आधार सापडत नाही, असा अहावाल दिल्यानंतर जैन धर्मातील अन्यायी संन्यासी दीक्षा प्रथा बंद करण्यासाठी १९३३ मध्ये बडोद्यामध्ये संन्यास दीक्षा प्रतिबंधक कायदा करण्यात आला व त्याद्वारे या अनिष्ट प्रकारावर आळा बसविण्यात आला.

**५) हिंदू कोड बिल: १९०५–१९३३**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या हिंदू कोड बिलातील सर्व सहा कायदे सयाजीरावांनी १९०५ ते १९३३ या दरम्यान बडोद्यात लागू केले होते. हिंदू धर्मातील विवाह, दत्तक, पालक व मुले, वारसा हक्क, कौटुंबिक संबंध व कौटुंबिक संपत्ती याविषयी सविस्तर कायदे करून पुरोगामी समाज निर्माण करण्याचे मोलाचे कार्य केले.

**६) धर्मग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास:**

बडोद्याच्या कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान आणि तुलानात्मक धर्म अभ्यासाचे जगातील पहिले अध्यासन सयाजीराव यांनी १ ऑगस्ट १९१६ रोजी सुरू केले. याच अध्यासनाच्या वतीने १९१८ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'गायकवाड स्टडीज इन रिलीजन अंड फिलॉसॉफी' या ग्रंथमालेल बौद्ध, हिंदू, ख्रिश्चन, इस्लाम इत्यादी धर्मावरील ग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास व नीतीशास्त्र

या विषयावर एकूण १७ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. आजवरच्या जगाच्या इतिहासातील अशा प्रकारची एकमेव ग्रंथमाला आहे.

**७) धर्मविषयक प्रबोधन :**

सयाजीराजांनी 'डिप्रेस्ड क्लासेस' हा इंग्रजी निबंध १९०९ मध्ये लिहिला होता, त्याद्वारे धर्मसाक्षरतेचे व प्रबोधनाचे महाभियान सुरू केले होते. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्यता हा राष्ट्रीय प्रश्न आहे ही ऐतिहासिक मांडणी सयाजीरावांनी भारतात सर्वप्रथम केली होती. यामध्ये त्यांनी अस्पृश्यता युक्त भारत म्हणजे राष्ट्रीय आत्महत्या आहे असे मांडले.

**८) धार्मिक विधींचे अर्थासहित विवरण :**

राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक विधींचे अर्थ सर्वांना समजावून सांगण्यासाठी विधींचे मंत्र अर्थासहित प्रकाशित करण्याचा विचार करून २३ नोव्हेंबर १८८६ रोजी राजवाड्यात होणाऱ्या सर्व धार्मिक विधींचे, धार्मिक कृत्ये, शास्त्रासह तपशीलवार लिहून काढण्याचा आदेश दिला. त्यामध्ये शंकर मोरे रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ भाऊ मस्त यांच्यावर ही जबाबदारी दिली होती. या त्रयींनी धर्मविधींचा तपशीलवार शास्त्र विशद करणारा ङ्गऐनेराजमेहेलफ हा ग्रंथ तयार केला. या ग्रंथाविषयीची सयाजीरावांची आपुलकी व आदर विशद करताना इतिहासकार सरदेसाई लिहतात, 'त्यातील प्रकरणे पुन्हा पुन्हा चर्चा व विचार करून संपूर्ण करण्यासाठी महाराजांनी इतके परिश्रम घेतले की, बहुधा दुसऱ्या कोणत्याही विषयावरती केले नसतील'. सर्वसामान्य जनतेसाठी धर्म शिक्षणाच्या प्रचारासाठीची सयाजीरावांची धडपड यातून आपणास दिसून येते. धार्मिक विधी, मंत्र यजमानाच्या भाषेमध्ये समजावून सांगणे बंधनकारक असल्यामुळे आजवर बहुजन समाजासाठी गूढ राहिलेल्या धार्मिक विधी, प्रक्रिया आणि मंत्राविषयीची भीती कमी होण्यास मदत झाली. सध्या प्रचलित असलेली सत्यनारायण पूजा, शांतीचे विधी, वास्तुशांती इत्यादी धार्मिक विधींचा आजचा येणारा अनुभव डोळ्यांसमोर आणला तर या क्रांतिकारक दूरदृष्टीची व कार्याची कल्पना येते.

**९) धर्मदानाचे नियमन :**

सयाजीरावांचे दत्तक वडील खंडेराव महाराजांची विशेष श्रद्धा असल्यामुळे १८५८ मध्ये मुसलमान लोकांना भोजन देण्यासाठी गैरमीचा कारखाना सुरू करण्यात आला होता. त्याद्वारे दररोज येतील तितक्या मुसलमान लोकांना भोजन देण्यात येई. ग्यारमी म्हणजे मुसलमान महिन्याचा अकरावा दिवस व एकीसमी म्हणजे मुसलमान महिन्याचा एकविसावा दिवस या दिवशी मुसलमानांना पुलाव व रोकड चिराखी म्हणजे दक्षिणा देण्यात येत असे. हे दान करताना व्यक्तीची गरज व उदरनिर्वाहाची निकड लक्षात घेतली जात नसल्यामुळे हे महापुण्य सत्पात्री होत नव्हते. त्याच बरोबर खिचडी व ग्यारमीयावर १८८७ मध्ये ३७१६५२ रुपये इतका खर्च करण्यात आला होता. या बाबीची दखल घेऊन सयाजीरावांनी श्रीमंत व्यक्तीएवजी केवळ गरजू व्यक्तींनाच खिचडी वगैरे याचा लाभ मिळावा, यासाठी १६ जून १८९३ रोजी हुकुम काढला व सर्व जाती धर्मातील निरश्रीत, अपंग, विधवा स्त्रिया, लहान मुले, गरजू व्यक्तींना पास देण्यात यावेत व पासधारक व्यक्तीलाच खिचडी देण्यात यावी. त्यामुळे ब्राह्मण व मुसलमान व्यक्ती बरोबरच इतर जातीं-धर्मातील लोकांनासुद्धा याचा लाभ मिळू लागला. त्याचबरोबर श्रावण महिन्यात विद्वान ब्राह्मण व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या श्रावण मास दक्षिणेवर होणाऱ्या प्रचंड खर्चाबाबत तात्कालीक दिवाण सर टी. माधवराव यांनी महाराजांकडे चिंता व्यक्त केली. सयाजीरावांनी या खर्चाचा आढावा घेण्यासाठी १८९२ मध्ये समिती नेमली. या समितीच्या शिफारशीवरूनच दरवर्षी श्रावण महिण्यात विविध विषयांवर आधारित परीक्षा घेऊन ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारालाच दक्षिणा देण्याचा नियम १८९४-९५ मध्ये घेतला. या आदेशाच्या अंमलबजावणीनंतर श्रावण मास दक्षिणेवर होत असलेला एक लाख रुपयांपेक्षा अधिकचा खर्च पाच हजार रुपयापर्यंत आला. या बचतीपैकी प्रतिवर्ष रु. ५५०० ची तरतूद नवीन ग्रंथांच्या लेखनासाठी करण्यात आली. यातूनच धर्मशास्त्रावरील उत्तम पुस्तके मराठीतून प्रसिद्ध करण्याचा आदेश देण्यात आला. महाराजांनी राजवाड्यातील धार्मिक बाबींवर होणाऱ्या खर्चाचा लेखाजोखा बजेट स्वरूपात प्रसिद्ध केला. स्वतःच्या राजवाड्यातील खाजगी धार्मिक विधींचा आर्थिक लेखाजोखा जनतेसमोर पुस्तक रूपाने मांडणारे सयाजीराव कदाचित एकमेव प्रशासित असावेत.

**१०) वेदोक्त प्रकरण- धार्मिक सुधारण्याचा कार्यक्रम:**

कोल्हापूर संस्थानाच्या अगोदर चार वर्षे म्हणजे सन १८९६ मध्ये बडोद्यामध्ये वेदोक्त प्रकरण घडले, परंतु सयाजीरावांनी हे प्रकरण खुबीने हाताळल्याने कोल्हापूर इतके हे प्रकरण गाजले नाही. पहिल्या महाराणी चिमणाबाई यांच्या भगिनी नेपाळमध्ये दिल्या होत्या. नेपाळमधील मंडळी आणि महाराजांचे एकत्र सहभोजनाच्या एका प्रसंगी त्या मंडळीणी महाराजांना आपल्या पंक्तीत घेण्यास नकार दिला, ही घटना महाराजांच्या मनात वेदोक्त विचार येण्यासाठी कारणीभूत ठरलेली पहिली घटना होती. तसेच शिवदत्त नावाचे मारवाडी जोशी राजवाड्यातील देवघरातील पुराणोक्त पद्धतीने होणाऱ्या धर्मविधीविषयी महाराजांना लिहितात. रजपुतांमधील वेदोक्त विधीप्रमाणे धार्मिक

ISSN No. 2394-5990

विधी का होत नाहीत, हे प्रत्यक्ष पाहिल्यानंतर महाराजांनी वेदोक्त पद्धतीने धर्मविधी सुरू करण्याचा निर्णय घेतला. याप्रकरणी बडोदेतील ब्राह्मणांनी महाराजाच्या विरोधात प्रचार सुरू केला. त्यांच्यावर बहिष्कार टाकला. परंतु महाराजांचा निर्धार पक्का असल्यामुळे त्यांनी मे १८९६ मध्ये पुढील दसऱ्यापासून राजवाड्यातील सर्व धर्मविधी वेदोक्त पद्धतीने करायचा हुकूम दिला. वेदोक्तचा परिणाम म्हणून ब्राह्मण मंडळींनी राजवाड्यातील भोजनावर बहिष्कार टाकला. परंतु सयाजीरावांनी त्यावर पर्याय महाराष्ट्रीयन, गुजराती ब्राह्मण व इतर जाती, अनाथ, अपंग यांना भोजन देऊन काढला व त्यातून मिळणारे पुण्य जास्त आहे, अशी भूमिका घेतली. कालांतराने बडोद्यातून वेदोक्त विषय कायम हद्दपार झालेला आढळतो.

**११) धार्मिक शिक्षण:**

**अ) पुरोहित पाठशाळा :**

रामजी संतूजी आवटे या सत्यशोधकी विचारवंताने बडोदामध्ये 'बडोदा वत्सल' हे वर्तमानपत्र काढून सामाजिक प्रश्नांची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच आवटे आणि रामचंद्र विठोबा धामणस्कर यांनी मिळून १८९६ मध्ये बडोद्यात माधवराव पवार यांच्या घरी मराठा जातीचे पुजारी तयार करण्यासाठी पुरोहित वर्ग सुरू केला. या वर्गातून धर्मातील मूलतत्त्वाचा प्रसार करण्याचे कार्य त्यांच्यावर सोपविण्यात आले. पुढे २३ वर्षांनी याच धरतीवर १९१९ मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी वैदिक स्कूलची स्थापना भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली झाली

**ब) गरोडा पाठशाला :**

गुजरातमधील अंत्यज आपली धार्मिक गृहकृत्ते आपल्या जातीतील पुरोहिताकडून करून घेते त्या पुरोहितांना गरोडा म्हणत, त्यांच्यासाठी १९१३ मध्ये गरोडा पाठशाळेची सुरुवात केली. त्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात आली.

**क) संस्कृत पाठशाळा :**

हिंदू धर्मातील सर्व जातींतील लीकांना संस्कृत शिक्षण देण्याच्या उद्देशाने ७ मार्च १९१५ रोजी बडोद्यात संस्कृत पाठशाला या नावाची संस्था उभारण्यात आली. अस्पृश्यांना शिक्षण घेण्यास मनाई असली तरी त्यांना संस्कृत शिक्षण देण्याची दृष्टी महाराजांनी दाखवली हा निर्णय ऐतिहासिक व क्रांतिकारक होता. संस्कृत बरोबरच इंग्रजीचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच रुपयाच्या दहा शिष्यवृत्ती दिले जात होत्या.

**१२) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद: १९३३**

सयाजीरावांच्या धर्मविषयक विचारांमुळे व कार्यामुळे त्यांना शिकागो येथे २७ व २८ ऑगस्ट १९३३ रोजी भरलेल्या दुसऱ्या जागतिक सर्वधर्मपरिषदेचे अध्यक्षपद स्वीकारण्याचे निमंत्रण देण्यात आले होते. त्याप्रसंगी त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांप्रतकाळी सर्व धर्मामध्ये परिवर्तन करण्याची गरज बोलून दाखविली. जीवनात धर्माची गरज आहे, पण त्याचवेळी धर्म सुलभ न होता अडगळ ठरत असेल तर त्या धर्माची पुनर्घटना केली पाहिजे, याचा साधार व जोरदार पुरस्कार या भाषणात केला.

**१३) आंतरजातीय विवाह विषयक योगदान :**

महाराष्ट्राला परिचित असणाऱ्या आंतरजातीय विवाहापैकी शाहू महाराजांच्या चुलत बहिणीचा इंदूरच्या होळकरांबरोबर १९२४ मध्ये झालेला मराठा-धनगर आंतरजातीय विवाह माहित आहे. परंतु त्याच्या अगोदरच आकरा वर्ष्यापुर्वी १९१३ मध्ये पहिला मराठा-आदिवासी अंतरजमाती विवाह सयाजीराव यांची कन्या इंदिराराजे यांनी कुचबिहार या आदिवासी संस्थानातील राजकुमार जितेंद्र नारायण यांच्याशी स्वतःच ठरवून विवाह केला होता. विशेष म्हणजे सयाजीरावांनी ग्वाल्हेरच्या माधवराव शिंदे यांच्याशी त्यांचा विवाह ठरवला होता. असे असतानाही सयाजीराव स्वतःची प्रतिष्ठा आडवी न येऊ देता खंबीरपणे आपल्या मुलीच्या पाठीशी उभे राहिले.

**निष्कर्ष:**

धर्माच्या आश्रयाने माणूस उभा राहतो, राज्याच्या आश्रायाने धर्म उभा राहतो. त्यामुळे धर्मामध्ये कालानुरूप बदल करणे, धर्म संस्थेचे व राजसत्तेचे कर्तव्य असते. अन्यथा तो धर्म अधोगतीस लागतो. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनीही अनेक धार्मिक सुधारणा करून धर्म प्रभोधानाचे मोलाचे कार्य केले. सर्व धर्मातील चांगला सार एकत्र करून मानवधर्माची स्थापना होणे काळाची गरज आहे. राष्ट्र व समाज दोहोंनाही मानवधर्म मदत करेल असे सयाजीराजे म्हणत. सायाजीराजांच्या याच विचारामुळे व धर्म सुधारणेतील अतुल्य योगदानामुळे ते जागतिक धर्म प्रबोधन परंपरेतसुद्धा पथदर्शक व क्रांतिकारक ठरतात.

**संदर्भ ग्रंथ:**

१) बाबा भांड, (२०२१), सयाजीराव गायकवाड यांचे धार्मिक विचार, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद.

२) बाबा भांड, (२०२२) महाराजा सयाजीराव- गाथा युगपुरुषाची, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

३) देवदत्त कदम (२०२१), महाराजा सायाजीराव तुलनात्मक धर्मचिंतन, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद.
४) सुरक्षा घोंगडे, (२०२१), महाराजा सयाजीराव आणि स्वतंत्र धर्म खाते, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
५) सौरभ गायकवाड,(२०२१), महाराजा सायाजीराई आणि बौद्ध धर्म, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
६) डॉ. राजेंद्र मगर, (२०२१), महाराजा सयाजीराव आणि दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
७) देवदत्त कदम (२०२१), महाराजा सायाजीराव आणि हिंदू पुरोहित करडा, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद.
८) व्ही. के. चावडा (अनुवाद स.ग. मालशे) (२०१८), सयाजीराव गायकवाड, राष्ट्रीय पुस्तक न्यास, नवी दिल्ली.
९) वेबसाईट- https://www.dnaindia.com/analysis/column-maharaja-sayajirao-gaekwad-iii-maker-of-modern-baroda-2368502

■■■

ISSN No. 2394-5990

# बौद्ध धर्माच्या प्रसारात सयाजीराव गायकवाड यांचे योगदान

**डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड**
प्राध्यापक व विभाग प्रमुख इतिहास विभाग
रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
जि.सोलापूर पिनकोड ४१३२०९
मेल आयडी - gaikwadp1675@gmail.com
मो.९९२२४५२४२७/७९७२९८३४०२

**सारांश :**

आधुनिक भारताला बौद्ध धर्माची ओळख डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला नव्याने करून दिली हे सर्वश्रुत आहेत. परंतु, बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या आधीच सयाजीराव गायकवाड यांनी बौद्ध धर्माच्या प्रसारकरीता जे कार्य केले ते फारसे समाजापुढे आले नाही. सयाजीराव गायकवाड हे केवळ भारतातील सगळ्यात प्रगतीक असे संस्थानिक होते असे नव्हे तर भारतातील बहुसंस्कृतिक समाजाचे नेतृत्व सुद्धा करीत होते.. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सयाजीराव गायकवाड नेहमीच अग्रेसर होते. हिंदू धर्मातील ग्रंथांना प्रमाण मानून जीवनाची कालक्रमाना करणारे परंपरावादी हिंदू नव्हते. सयाजीरावांच्या धर्मसंबंधी भाषणामध्ये गौतम बुद्धांचे संदर्भ मिळतात. आधुनिक भारतात बौद्ध धर्माला राजश्री देणारे ते एकमेव प्रशासक होते. ते विविध कलांचे सुद्धा आश्रयदाते होते. पाली भाषेच्या संवर्धनासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. त्यांच्या कारकीर्दीत बडोदा हे संस्थान कलाकार आणि विद्वानांचे एक प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास आले. प्रस्तुत लेखाद्वारे सयाजीराव गायकवाड यांचे बौद्ध धर्माच्या प्रसारात कला आणि पाली भाषेच्या संवर्धनात काय योगदान होते याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे १८७५ ते १९३९ या कालखंडात बडोद्याचे संस्थानिक होते. या कालखंडात त्यांनी बडोदे संस्थानात जातीय विषमता निर्मूलनासाठी उल्लेखनीय असे कार्य केले. समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला अनेक योजना धोरणे अमलात आणली. ६४वर्षाच्या राज्यकारभाराच्या कालखंडात केवळ जनकल्याणाचा ध्यास घेतलेले सयाजीराव गायकवाड हे विचारवंत संस्थानिक होते. उदारमतवादी दृष्टिकोनातून त्यांनी अनेक प्रकाराने जातिभेद दूर करण्याचा प्रयत्न केला. जातीभेदामुळे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजातील लोकांच्या हक्कावर अनेक बंधने होती. त्यांना आपल्या हक्कांबाबत जाणीवही नव्हती या समाजातील लोकांच्या प्रगती झाल्याशिवाय राज्याची प्रगती होणार नाही हे त्यांनी जाणले म्हणून त्यांनी या समाजातील लोकांचे प्रबोधन केले. त्यांच्यासाठी मोफत शिक्षण सुविधा, वसतीग्रहे, आरोग्य सुविधा, राजकीय सहभाग, सामाजिक समता इत्यादी बाबत अनेक कायदे अमलात आणले. सयाजीराव गायकवाड यांनी हिंदू, ख्रिस्ती, इस्लाम, बौद्ध अनेक धर्मांचा अभ्यास केला. या विविध धर्मातील तत्त्वांचा अभ्यास केल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, समाजात अस्पृश्यता निर्माण होणे किंवा अस्पृश्यांना कमी दर्जाचे लेखणे हा केवळ एक लोक भ्रम आहे. या सर्व धर्मामध्ये त्यांनी बौद्ध धर्माचा विशेष करून अभ्यास केला आणि बौद्ध धर्माच्या प्रसारास सुरुवात केली. प्रस्तुत लेखाद्वारे सयाजीराव गायकवाड यांनी बौद्ध धर्माच्या प्रसारात आणि पालीभाषा आणि कला संवर्धनासाठी कोणते प्रयत्न केले त्याचे योगदान काय होते याबाबत चर्चा केली आहे.

**सयाजीराव गायकवाड यांचे बौद्ध धर्माच्या प्रसारातील योगदान:**

सयाजीरावांच्या धर्मविषयक भाषणामध्ये गौतम बुद्धांचे संदर्भ सातत्याने सापडतात. आधुनिक काळात बौद्ध धर्माला राजाश्रय देणारे सयाजीराव गायकवाड हे एकमेव प्रशासक होते. बौद्ध धर्माच्या प्रसाराच्या उद्देशाने सयाजीरावांनी बडोद्यातील जुबिली बागेत गौतम बुद्धाचा पुतळा जपानहुन मागवून स्थापन केला होता. डॉक्टर बाबासाहेबांना बुद्धाचा सर्वप्रथम परिचय करून देणारे केळुस्करे लिखित बुद्ध चरित्र सयाजीराव आणि प्रकाशित केले होते. सर्वसामान्य जनतेला गौतम बुद्धाच्या विचारांची माहिती व्हावी हा ग्रंथ प्रकाशनाचा उद्देश होता. या ग्रंथाचे बाबासाहेबांच्या जीवनातील आणि धर्मांतराच्या निर्णयातील स्थान महत्त्वाचे ठरले. सयाजीरावांनी त्यांच्या अभ्यासिकेत गौतम बुद्धाच्या मूर्तीची स्थापना केली होती. वैज्ञानिक दृष्टिकोनातून

बौद्ध धर्माचा आणि गौतम बुद्धाच्या शिकवणीचा विचार करणारे सयाजीराव गौतम बुद्धाचे केवळ प्रशंसकच नव्हते तर पूजक ही होते. बडोद्यात स्थापन केलेल्या गौतम बुद्धाच्या पुतळाच्या अनावरण प्रसंगी जे भाषण केले होते त्यात आपल्याला गौतम बुद्धाच्या विचारांची गरज का आहे याबाबत समाजाचे प्रबोधन केले होते. त्यांच्या मते बुद्धाच्या उपदेशाचे सार एवढे आहे की मानवाला उत्तम स्थिती प्राप्त होणे हे त्याच्या नशिबावर अथवा दैव योगावर अवलंबून नसते तर त्या मनुष्याच्या कर्तबदारीवर आणि त्याच्या पुरुषार्थावर अवलंबून आहे; आणि आपण जसे कर्म करतो जसे प्रयत्न करतो त्याप्रमाणे लहान मोठे होत असतो. बौद्ध सिद्धांताप्रमाणे ब्राह्मण क्षेत्रीय दिवर्ण, गुणकर्मावर समजला जातो जन्मावरून नाही हे त्यांनी सर्वसामान्य जनतेला समजावून सांगितले. यावरून सयाजीराव गायकवाड बौद्ध धर्माच्या प्रसाराबाबत किती कृतीशील होते याचे प्रत्यंतर येते.

धर्मानंद कोसंबी आणि सयाजीराव यांच्या नात्यातील दुवा बौद्ध धर्मच होता. बौद्ध धर्माविषयी ग्रंथ लेखन करण्यासाठी आणि महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी सयाजीरावांनी धर्मानंद कोशिंबीना दरमहा पन्नास रुपयांची शिष्यवृत्ती दिली होती. आधुनिक भारतातील बौद्ध धर्माच्या प्रसारातीत सयाजीराव गायकवाड यांच्या योगदान याबाबत असे म्हणता येईल की, त्यांनी केवळ स्वतः प्रसारासाठी प्रयत्न केले नाही तर बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी बौद्ध धर्माची खरी तत्वे सर्वसामान्य जनतेला समजवण्यासाठी त्यांनी प्रचारकांना सुद्धा शक्य तेवढी मदत करून त्यांना प्रोत्साहित केले. सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात अधिकृतपणे बुद्ध जयंती साजरी करण्याचा पायंडा पाडला. धर्मानंद कोसंबी यांनी बौद्ध धर्माबाबत जी भाषणे दिली होती त्या भाषणांचे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी सयाजीराव गायकवाड यांनी त्याकाळी पाचशे रुपयांची मदत केली होती. धर्मानंद कोसंबी ज्या ज्या वेळेला बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी अमेरिकेला गेले होते त्या त्यावेळेस सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना सर्वतोपरी सहाय्य केले होते. हिंदू धर्माला पर्याय म्हणून बौद्ध धर्म असा संकुचित विचार त्यांनी केला नाही आणि कोणत्याही धर्माबद्दल टोकाचा विदेशही केला नाही आणि फारसे प्रेमही व्यक्त केले नाही अशी अत्यंत संतुलित भूमिका घेत सयाजीराव गायकवाड यांनी बौद्ध धर्माच्या प्रसारात स्वतःला झोकून दिले. त्यांनी वैयक्तिक जीवनाबरोबरच प्रशासकीय धोरणातही कोणत्याही एका धर्माचा पुरस्कार केला नाही तर धर्मपालना बाबतच्या आणि धर्म स्वातंत्र्य बाबतचा प्रत्येक व्यक्तीचा आणि त्याच्या विवेकदृष्टीचा आदरच केला. आजच्या धार्मिक द्वेष जनक वातावरणात आणि प्रत्येक धर्माच्या स्व केंद्रीत संकुचित विचारसरणीवर मात करण्याच्या दृष्टीने सयाजीराव गायकवाड यांच्या बुद्धवादी विचारांचा अवलंब करणे गरजेचे आहे आणि त्याचे कृतिशील अनुयायी होण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. सयाजीराव गायकवाड यांच्या मते जर हिंदूंना त्यांच्या धर्माच्या इतिहासाची ओळख करून दिली आणि हिंदू धर्माचा इतर धर्माची तुलना करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण केली तर ते अतिशय योग्य ठरेल. त्यामुळे सर्वसामान्य लोकांची धर्माप्रती असलेली संकुचित मनोवृत्ती अधिक व्यापक होऊन त्यांच्या धर्मविषयक विचारांमध्ये अधिक उतरता येईल असे महाराजांचे मत होते. त्यांच्या या भूमिकेवरून असे दिसून येते की, त्यांचा बौद्ध धर्माबरोबरच इतर धर्माबाबतचा दृष्टिकोन किती व्यापक आणि प्रगल्भ होता. बौद्ध धर्माच्या प्रसारा बरोबरच सयाजीराव गायकवाड यांनी पाली भाषेच्या प्रसारासाठी आणि संवर्धनासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी बडोदा कॉलेज आणि बडोदा हायस्कूल येथे पाली भाषेत शिकण्याची सोय केली. औपचारिक शिक्षणात पाली भाषेचा समावेश करतानाच सयाजीरावांनी बौद्ध धर्म विषयक वैविध्यपूर्ण ग्रंथाचे प्रकाशन करून सर्वसामान्य लोकांचे धर्मविषयक आकलन वाढवण्यावर भर दिला. महाराष्ट्रातील बौद्ध धर्म प्रसारक आणि पाली भाषेच्या संवर्धनात प्रसारात धर्मानंद कोसंबी यांचे योगदान अनन्यसाधारण असेच होते. कोसंबीच्या विनंतीवरून सयाजीराव गायकवाड यांनी १९१२ मध्ये पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधील पाली भाषेच्या विद्यार्थ्यांना दरमहा पंधरा रुपयांच्या दोन आणि दहा रुपयांच्या दोन अशा चार शिष्यवृत्ती सुरू केल्या. त्यामुळे फर्ग्युसन कॉलेजमध्ये पाली भाषेच्या अध्यापनास आणि अध्ययना सुरुवात झाली. पाली भाषेचा अभ्यासक्रम चालवणारे फरगुशन हे तत्कालीन मुंबई प्रांतातील एकमेव कॉलेज होते.. सयाजीरावांनी पाली भाषेतील बौद्ध ग्रंथाचे मराठी अनुवाद अग्रक्रमाने प्रकाशित केली. त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार करताना प्रामुख्याने बुद्धोत्तर महायान तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला होता. सयाजीराव गायकवाड हे बौद्ध धर्माचे केवळ आश्रय दाते नव्हते तर बुद्धाला अपेक्षित असणारी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी बुद्धाच्या महायानी अनुयायाच्या योगदानाला बौद्धिक पाठबळ व उत्तेजन देऊन ते समाजापुढे आणण्याचे कार्य सुद्धा केली आणि हे कार्य त्यांनी समाज परिवर्तनाचे उद्दिष्ट ठेवूनच केले होते. सयाजीराव गायकवाड यांच्या बौद्ध धर्म विषयक विचारातूनच बौद्ध धर्माचे तत्वे समजून येतात. बौद्ध धर्मातील तत्त्वे सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी सयाजीरावांनी मराठी भाषेतील ०६ आणि इंग्रजी भाषेतील १३ ग्रंथ प्रकाशित केले. त्यांच्या या प्रयत्नामुळे ते धार्मिक साक्षरतेचे प्रणेते म्हणून ओळखले जाऊ लागले.

**सयाजीराव गायकवाड यांचे कला संवर्धन कार्यातील योगदान :**

प्रजेचा पालन करता म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात अनेक पायाभूत सुधारणा केल्या. या सुधारणा करण्याबरोबरच त्यांनी कलेच्या प्रांतातही आपले योगदान दिले आहे. त्यांच्या दरबारी आठ गवयांची नेमणूक करण्यात आली होती. कलेची जोपासना करण्यासाठी खास कालावंत खात्याची स्थापना केली होती. या खात्यासंबंधी विविध नियम करण्यात आले होते. या कलावंतांत गवया बरोबरच वादकांचाही समावेश करण्यात आला होता.. सयाजीरावांनी रंगभूमीवरील नृत्य, गायन, वादन, नाटक यासारख्या प्रत्येक घटकांचा बारकाईने विचार करून सर्वसामावेशक धोरणे राबवली होती. बालगंधर्वाच्या गंधर्व नाटक कंपनीला त्यांनी राजाश्रय दिला होता. चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनाही सयाजीराव गायकवाड यांनी प्रोत्साहन दिले होते. त्यांची कलाभीरुची फारच विलक्षण होती. आपल्या मुलांसाठी त्यांनी खास गायन वादनाच्या शिकवण्या सुरू केल्या होत्या. सयाजीरावांकडून कलाक्षेत्रांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्यामुळे मदतीमुळे अनेक मराठी कलावंत भविष्यात आपापल्या क्षेत्रात विशिष्ट स्थान प्राप्त करून शकले.

बौद्ध धर्म प्रसारक पाली भाषेचे संवर्धन आणि कलाक्षेत्राचे संवर्धन करण्यात महाराजांनी दिलेले योगदान असे महत्त्वाचे आहे तसेच सयाजीरावांनी स्वतः व्यक्तिशः झोकून दिलेले घटना देखील अधोरेखित होते. त्यांनी कोणत्याही एका धर्माच्या तत्त्वांचा अभ्यास न करता सर्व धर्मातील तत्त्वांचा अभ्यास करून ती तत्वे समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला जात त्यांना बौद्ध धर्मातील तत्त्वांनी अधिक आकर्षित केले म्हणून विशेष करून त्यांनी बौद्ध धर्माच्या प्रसारात स्वतःला झोकून दिले.

**समारोप :**

बौद्ध धर्माचा प्रसार आणि पुनर्विचार कोणत्याही संकुचित विचाराने न करता आणि बौद्ध धर्मातील वर्ण जात विरोधी तत्वज्ञान हे विज्ञानवादी दृष्टिकोनातून पाहणारे सयाजीराव गायकवाड हे पहिले भारतीय संस्थानिक होते. ही बाब भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीने फारशी गंभीरपणे घेतली नाही. याचा परिणाम असा झाला की जातीअंताची दिशा दाखवणारा बौद्ध धर्म हा बाबासाहेबांच्या महार मांग समाज निगडित राहिला किंबहुना भारतातील बौद्ध धर्म संकुचित जातीवादी होत गेला हे वास्तव आज नाकारता येत नाही. सयाजीराव गायकवाड हे हिंदू धर्माला पर्याय म्हणून बौद्ध धर्माचा प्रसार करीत नव्हते तर हिंदू धर्मातील जातीय गुंतागुंतीच्या व्यवस्थेला पर्याय म्हणून बौद्ध धर्माला राजाश्रय देत होते. त्यांच्या धर्मविषयक विचारांचे अवलोकन केल्यास असे समजून येते की, त्यांनी बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी का प्रयत्न केले होते. सयाजीराव गायकवाड सारख्या बौद्ध धर्माबाबत व्यापक विचार करणारा हिंदू प्रशासक भारती इतिहासात सापडणार नाही. म्हणूनच, त्यांचे बौद्ध धर्मा विषयक विचार भारतीय समाजाने वेळीच अंमलात आणले असते तर बौद्ध धर्माची आज जी एका विशिष्ट जाती-जमातीपुरती संकुचित अशी ओळख आहे ती झाली नसती आणि बौद्ध धर्माचा पाया आणि या धर्माबाबतचे विचार अधिक व्यापक झाले असते.

**संदर्भ :**

१. पगार एकनाथ (२०१८) - महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई.
२. गायकवाड सौरभ (२०१८) - महाराजा सयाजीराव आणि बौद्ध धर्म महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था प्रकाशित.
३. भांड बाबा (२०२०) - युगदृष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड साकेत प्रकाशन, पुणे.
४. बेलसरे चंद्रलेखा (२०२०) - लोकनायक महाराजा सयाजीराव गायकवाड चपराक पुस्तकालय.
५. लाड उदयकुमार (२०१७) - समाज उद्धारक महाराजा सयाजी गायकवाड नवज्योत, अंक ४, क्रमांक.१
६. नेने द.वी (२०१०) - श्रीमंत सयाजीराव गायकवाड श्री गंधर्व वेद प्रकाशन, पुणे.
७. भांड बाबा (२०१७) - सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड-२, साकीत प्रकाशन, पुणे.
८. गायकवाड फत्तेसिंगराव (१९८९) - सयाजीराव ऑफ बडोदा पॉपुलर प्रकाशन, मुंबई.
९. पाटील दिनेश (२०२२) - महाराजा सयाजीराव आणि गौतम बुद्ध रिपब्लिकन जनता, जानेवारी २०२२.

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सहकार क्षेत्रातील योगदान

**कदम अमर विलास**
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर (स्वायत्त)
Email ID:amarkadam1990@gmail.com
मो.९८६०९०९१५२

**प्रस्तावना :**

सहकाराचा मुळ अर्थ परस्पर सहकार्य करून ऐक्याने एकत्र येऊन कार्य करणे होय. बिना सहकार नाही उद्धार या उक्ती प्रमाणे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सहकार क्षेत्राचे महत्व ओळखून आपल्या जनतेचे प्रश्न लक्षात घेऊन सहकार क्षेत्राला चालना दिली. आपल्या जनते समोर असलेले दोन प्रश्न म्हणजे दुष्काळ आणि आर्थिक परस्थिती, याची जाणीव महाराजा सयाजीराव गायकवाड यांना झाली. जनतेच्या गरीबीसाठी सावकारी हे एक म्हत्वाचे कारण असल्याचे महाराजांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी सावकारी असणारा फास कमी करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले आणि सहकाराला चालना दिली. त्यांनी केलेल्या सहकार क्षेत्रातील कार्याचा आढावा आपणाला पुढील प्रमाणे घेता येईल.

**उद्दिष्टे :**

१) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीचा अभ्यास करणे.

२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या मतानुसार सहकार या संकल्पनेची माहिती घेणे.

३) महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सुरु केलेल्या सहकारी चळवळीचा अभ्यास करणे.

४) महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सुरु केलेल्या सहकारी संस्थांची माहिती घेणे.

५) उर्वरित भारत आणि बाडोद्यातील सहकार याचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

कोणतेही संशोदाहन व्यवस्थित होण्यासाठी ठराविक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जातो त्याचप्रमाणे या संशोधपर लेखासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धत्तीचा वापर करण्यात आलेला आहे.त्याचप्रमाणे विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे .



महाराजा सयाजीराव गायकवाड

**सयाजीराव गायकवाड यांचे सहकार क्षेत्रातील योगदान :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या जनतेला सावकारी पाश्यातून बाहेर काढण्यासाठी १९०४-०५ साली शेतकऱ्यांची सहकारी मंडळी ही संस्था सुरु केली .शेतकर्यांनी एकमेकांना मदत करणे हा या सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश होता .महाराजांनी शेती आणि ग्रामीण सुधारणा करण्यासठी सहकार चळवळीला महत्व दिले .ब्रिटीश भारतात लागू केलेल्या १९०४ च्या सहकार कायद्याच्या धर्तीवर बडोदा संस्थानात १९०५ साली ङ्मसहकार कायदाफ पारित करून घेतला.[१] या कायद्याने बडोद्यामध्ये नव्या युगाला सुरवात झाली. या विषयी सयाजीराव गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले होते की, नगर जीवन व ग्रामजीवन यांच्या संबंधीचे जे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आपल्याला कधीच सोडवता येत नाहीत ते आता सहकाराच्या तत्वामुळे सुटू लागतील असे मला वाटते.[२] सयाजीराव यांचे असे मत होते की, ग्रामीण भागाच्या सर्वांगीण

ISSN No. 2394-5990

विकासाठी सहकार चळवळ उपयुक्त ठरेल. १९२० ते १९२१ पर्यंत कोल्हापूर संस्थनाच्या तुलनेत बडोद्यामध्ये सहकारी संस्थांची संख्या ही जवळ जवळ १४ पट इतकी झाली होती.

**बँक ऑफ बडोदा स्थापना आणि बडोद्यातील सहकार चळवळ :**

बडोद्यातील सहकारी चळवळीला आर्थिक पाठबळ देण्याची गरज सयाजीराव गायकवाड यांनी ओळखली आणि त्यासाठी त्यांनी १९०६ मध्ये अमेरिकन अर्थतज्ञ व्हाईट नॅक यांची आर्थिक सल्लागार पदी नियुक्ती केली.त्यांनी काही शिफारशी सयाजीराव यांना केल्या त्यामध्ये प्रामुख्याने महत्वाची शिफारस म्हणजे बडोदा सरकार आपले भांडवल हे बँक ऑफ मुंबई मध्ये गुंतवत होते परंतु ही बँक कार्यक्षेत्राबाहेर असल्यामुळे त्याचा फायदा संस्थानाला होत नव्हता त्यामुळे बँक ऑफ बडोदा स्थापन करण्याची शिफारस व्हाईट नॅक यांनी केली. व्हाईट नॅक यांच्या मार्गदर्शनाखाली ९ जुलै १९०८ रोजी बँक ऑफ बडोदाची स्थापना करण्यात आली.[३] या बँकेच्या उदघाटन सामारंभामध्ये सयाजीराव आपल्या भाषणात म्हणतात कि, स्वतः सहकारी तत्वावर चालून नवीन संस्थानाही त्याच तत्वाचा वस्तुपाठ या बँकेने दिला पाहिजे आणि व्यापारविषयक व्यवहाराच्या आधुनिक पद्धती लोकांना शिकविण्याचे कामही या बँकेने सतत केले पाहिजे .मुंबईमध्ये स्वदेशी भांडवलावर नुकत्याच स्थापना झालेल्या दोन बँकांनी जे संपूर्ण यश संपादन केले आहे .त्यावरून निर्विवाद सिद्ध झाले आहे की, कोणत्याही देशातील हुशार बुद्धिवंतांशी हिंदी अर्थशास्त्रज्ञ टक्कर देऊ शकतात. हिंदी लोकातील काही जाती तर फार जुन्या काळापासून विविध सराफी व्यवहारांना एक उच्च कला म्हणून ओळखत आहेत.[४]

बँक ऑफ बडोदाच्या व्यवस्थित कारभारामुळे बँकेचे भागभांडवल १९२९मध्ये ३० लाख रुपया पर्यंत पोहचले आणि बँकेचा राखीव निधी हा २३ लाख ५० हजार इतका होता. बडोदा संस्थानामध्ये सर्व प्रथम धनादेशाची सुविधा सुरु करण्यात आली.आज आपण पहिले असता स्टेट बँक ऑफ इंडिया नंतर दुसऱ्या क्रमांकाची बँक ऑफ बडोदा ही बँक गणली जाते. अशा प्रकारे बँक ऑफ बडोदा स्थापन करण्यामध्ये सयाजीराव यांचे योगदान हे म्हत्वाचे होते.

**बडोदा संस्थानामध्ये असलेल्या विविध सहकारी संस्थांची माहिती :**

बडोदा संस्थानामध्ये सहकार कायद्याची निर्मिती झाल्यानंतर १९०५ ते १९०६च्या दरम्यान २२ ग्रामीण सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. या संस्थांसाठी सयाजीराव यांनी विकेंद्रीकरणाचे धोरण स्विकारले होते. यावेळी दोन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची नोंद करण्यात आली होती.त्याचप्रमाणे बडोदा तालुक्यामध्ये तीन ग्रामीण पतपुरवठा संस्था कार्यरत होत्या.पाद्रा या ठिकाणी दोन ग्रामीण पतपुरवठा संस्था कार्यरत होत्या.त्याचप्रमाणे कोडीनार तालुक्यात १५ ग्रामीण पतपुरवठा संस्था कार्यरत होत्या. या संस्थांमार्फत शेतकऱ्यांना पेरणी काळात पतपुरवठा करण्यात येत असे.तसेच शेती साठी आवश्यक असलेले बी–बियाणे, बैलगाडी अशा शेतीउपयोगी वस्तूंचा पुरवठा देखील केला जात होता. त्याचा फायदा शेतकरी वर्गाला होत होता. त्याच बरोबर खेड्यात अनेक प्रकारच्या सहकारी मंडळ्या तसेच सहकारी मध्यवर्ती पेढ्यां व्यतिरिक्त सकल सहकारी संस्थांच्या केंद्र स्थानी बडोद्यात ‘श्री सयाजी सहकार सेवा संघ’ ही संस्था त्यांनी स्थापन केली.[५] त्याचबरोबर सयाजीराव यांनी विविध प्रकारच्या कृषी संस्था देखील स्थापन केल्या.यामधून शेतकऱ्यांना शेती कामासाठी पतपुरवठा अल्प व्याजदरात केला जात असे. नव्याने वाढलेल्या संस्थांचे कामकाज पाहण्यासाठी शिक्षित लोक अपुरे पडू लागल्याने सयाजीराव यांनी ग्रामीण भागातील काही शिक्षकांना ग्रामीण बँकामध्ये लिपिक म्हणून निवडले. अश्या प्रकारे आपणाला महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी विविध सहकारी संस्था स्थापन केल्या.

**निष्कर्ष :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानामध्ये सहकार क्षेत्राला राजाश्रय दिलेला दिसून येतो. त्याचबरोबर सर्वसामान्य जनतेला सावकारी त्रासातून मुक्त करण्यासाठी केलेले प्रयत्न दिसून येतात. बँक ऑफ बडोदा ही सयाजीराव गायकवाड यांनी सुरु केलेलं रोपटे आज आपल्याला मोठा वटवृक्ष झालेला दिसून येतो.

**समारोप :**

थोडक्यात सांगायचे झाले असता आपणाला असे म्हणता येईल कि सयाजीराव गायकवाड यांनी सहकारी क्षेत्राला मोठ्या प्रमाणामध्ये त्यांच्या संस्थानामध्ये चालना देलेली दिसून येते. अशा प्रकारे आपणाला महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सहकार विषयक धोरणाबद्दल माहिती मिळते .

**तळ टीपा :**


१) राहुल वणवे, ‘महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा – सहकार’, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, आवृत्ती पाहिली, २०२० पृ.क्र.मनोगत २४.

२) सयाजीराव ,भाषणसंग्रह, खंड –१,भाग–१ ,२०१७ , पृ.क्र ३१० .

३) राहुल वणवे, 'महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा – सहकार',महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती,महाराष्ट्र शासन ,आवृत्ती पाहिली,२०२० पृ.क्र.५६ .

४) सयाजीराव, भाषणसंग्रह, खंड –१,भाग–१ ,२०१७ , पृ.क्र १७७

५) यमाजी मालकर, राजेंद्र मगर, महाराजा सयाजीराव गायकवाड चारीत्रासंग्रह भाग १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, पृ.क्र २६०

**संदर्भसूची :**


१) वणवे राहुल, ‌‌ङ्गमहाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा – सहकार,महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती,महाराष्ट्र शासन ,आवृत्ती पाहिली,२०२०

२) वरखेडे ,रमेश , 'महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह', खंड –१,भाग–१ ,२०१७

३) भांड, बाबा , 'लोकपाल राजा सयाजीराव' औरंगाबाद, साकेत प्रकाशन ,२०१३

४) यमाजी मालकर,राजेंद्र मगर ,महाराजा सयाजीराव गायकवाड चारीत्रासंग्रह भाग १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ,२०१८

५) दीक्षित, डॉ राजा, 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र : मध्यमवर्गाचा उदय', डायमंड पब्लिकेशन पुणे ,२००९

६) गोत्री वा.ना, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे संक्षिप्त चरित्र, इंदू प्रकाशन मुबई ,१९१०

७) चावडा व्ही.के.,सयाजीराव गायकवाड नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली ,१९८७


■■■

ISSN No. 2394-5990

# भारतीय ग्रंथालय चळवळीचे आद्य प्रणेते महाराजा सयाजीराव गायकवाड

**१) श्री. संजू लक्ष्मण चव्हाण**
संशोधक विद्यार्थी
श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनि. कॉलेज वाटंबरे,
ता. सांगोला. जि. सोलापूर
मो. नं. ९४२३५६०८४८
ई-मेल- sanjulchavangmail.com

**२) प्रा. डॉ. दादासाहेब ना. पाटोळे**
संशोधक मार्गदर्शक
इतिहास विभाग प्रमुख
बाबुराव पाटील कॉलेज ऑफ आर्टस् ण्ड सायन्स
अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर

**प्रस्तावना :**

'वाचाल तर वाचाल' असे आज आपल्याला डिजिटल क्रांतीच्या युगात सर्वांना आवर्जुन म्हणावे लागते. कारण आज वाचन संस्कृती लोप पावते की काय अशी शंका निर्माण झालेली आहे. परंतु भारतावर ब्रिटीशांचे एकछत्री अंमल असताना प्रत्येक संस्थानिक इंग्रजांची मर्जी राखण्यात धन्य मानत असताना सर्व संस्थानिकांपेक्षा वेगळे, राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा बाळगणारे संस्थानिक म्हणजे बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड हे होय. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे मुळ नाव गोपाळराव काशीराव गायकवाड त्यांचा जन्म कवळाणे, ता. मालेगाव, जि. नाशिक येथे दि. ११ मार्च, १८६३ रोजी झाला. सन १८७५ ते सन १९३९ पर्यंत ते बडोदा संस्थानचे महाराज म्हणून केलेल्या कामामुळे त्यांना एक धाडसी, कर्तृत्ववान, दानशूर, जनतेची काळजी घेणारा असा प्रजाहितदक्ष राजा म्हणून भारतभर प्रचिती होती.

भारतात ब्रिटीश राजवटीलाही जे शक्य झाले नाही ते महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात करुन दाखविले. महाराजांनी 'जनशिक्षणातून जनविकासाचे ध्येय' समोर ठेऊन दि. १६ मार्च, १८९३ साली प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे देशातील पहिले राज्य म्हणून बहुमान पटकावला.[१] त्याचप्रमाणे शिक्षणासोबत ग्रंथालयाची जोड देऊन महाराजांनी ग्रंथालय चळवळीची भारतात मुहुर्तमेढ रोवली. सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून त्यांनी मबहुजन हिताय बहुजन सुखायफ हे तत्व अवलंबिले. आपल्या युरोप व अमेरिकेच्या प्रवासातून जगात जे-जे नाविण्य असेल ते बडोद्यातील प्रजेला आणण्यासाठी महाराजांनी आपल्या ६४ वर्षाच्या कारकिर्दीत २६ वेळा परदेश गमन करुन विविध माहिती, ग्रंथ, आधुनिकीकरणासाठी लागणाऱ्या यंत्रांचा तसेच तज्ञ व्यक्तींना बडोद्यात आणून सर्वसामान्य जनतेला बहुश्रुत करण्याचा प्रयत्न शेवटपर्यंत केला.[२] त्यांनी भारतात ग्रंथालयाचे जाळे निर्माण करण्यासाठी अमेरिकेतील तज्ञ विल्यम बॉर्डन यांना आमंत्रीत केले. श्री. विल्यम बॉर्डन यांच्या नेतृत्वाखाली जगातील दुसरे व भारतातील पहिले फिरते वाचनालय (सयाजी वैभव) सुरु केले. त्यातून सर्वसामान्य जनतेला शिक्षणातून परिवर्तनाचा मार्ग निर्माण करण्यासाठी आणि त्यांची बौध्दिक भुक भागविण्यासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी ग्रंथालय निर्मितीचे चळवळीत रुपांतर करुन भारतीय ग्रंथालय चळवळीचा पाया रचला.

**भारतीय ग्रंथालय चळवळीचा पूर्व इतिहास :**

प्राचीन कालखंडापासून भारतीय संस्कृतीत ज्ञानाला फार महत्त्व आहे. आपल्या धर्मग्रंथातून शिक्षण, संस्कृती, राजकारण एकुण समाजजीवनाचे विविधांगी दर्शन आपल्याला पुराण ग्रंथामूधन दिसते. उदा. रामायण महाभारतातील गुरुकुल पध्दत. तसेच हडप्पा, मोहेनजोदडो येथील उत्खननामधील सापडलेले पुरातन अवशेष, मुद्रा यावरुन प्राचीन कालखंडातील चित्रलिपी समजते. भारतातील प्राचीन कालखंडातील तक्षशीला, नालंदा विद्यापीठांचा उल्लेख व ग्रंथ वैभवांचे पुरावे आपल्याला प्राचीन ग्रंथात आढळते. त्यानंतरच्या कालखंडामध्ये राजेमहाराजांच्या काळात राजाश्रयांचा आधार घेऊन वैयक्तिक ग्रंथालयाची जोपासना दिसते. भारतीय राजेमहाराजांच्या राज्यावर मुघल साम्राज्याने आक्रमण केले व अनेक बदल घडले. तरीसुध्दा मुघलांच्या काळात काही राजांनी स्वत:चे ग्रंथालय जपले होते. त्यापैकी बादशहा अकबरांची एंपोरिअल लायब्ररी प्रसिध्द होती. त्यांच्याच समकालीन गुजरातचे तत्कालिन गव्हर्नर अब्दुल रहिम खान-ई-खान यांच्याकडे असलेली वैयक्तिक ग्रंथालय अत्यंत दर्जेदार व प्रशस्थ होती. त्यांच्या ग्रंथालयाच्या देखरेखीसाठी ९५ कर्मचारी होते.[३] त्याच ग्रंथालयात सुप्रसिध्द

बायंडर मोहम्मद खुशाहिन हा त्या ग्रंथालयात ३५ वर्षे काम करत होता. यावरुनच त्या ग्रंथालयाचा प्रशस्थपणा लक्षात येतो.

ब्रिटीशांनी भारतावर वसाहतवादाच्या माध्यमातून साम्राज्य निर्माण केले आणि आपल्या राज्यकारभारासाठी भारतीय व्यक्तींना इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून प्रशासन चालविण्यास मदतीस घेतले. त्यासाठी खऱ्या अर्थाने ब्रिटीशांनी शिक्षणाचा प्रसार केला. ब्रिटीशांनी मुद्रण कलेचा वापर करुन अनेक ग्रंथ निर्मितीच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळीची पार्श्वभूमी तयार केली. त्याचवेळी भारतातील काही संस्थानिकांनी स्वत:चा छंद म्हणून ग्रंथालय निर्माण केले. पण त्या ग्रंथालयाचा आणि ज्ञानाचा सामान्य जनतेला काहीच उपयोग होत नव्हता. अशा विविध समस्येतून, ब्रिटीशांच्या बंधनाला झुगारुन सामाजिक कल्याणासाठी सर्वात जास्त निधी वापरणारे बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांनी शिक्षणाला ग्रंथालयाची जोड देऊन भारतीय ग्रंथालय चळवळीला शिखरावर नेले.

**भारतीय ग्रंथालय चळवळीतील महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे बहुमुल्य कार्य :**

शिक्षण हाच मानवाच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा मार्ग आहे हे ओळखुन बडोदा नेरेश सयाजीराव गायकवाड यांनी सन १८९३ साली प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे अमरेली विभागात प्रायोगिक तत्त्वावर सुरु केले. त्यानंतर सन १९०६ ला संपूर्ण बडोदा राज्यात कायदा लागू केला आणि जनसामान्यांना शिक्षणाचे द्वार खुले केले. महाराजा सयाजीराव गायकवाड गादीवर येण्याअगोदर सन १८७१ मध्ये शिक्षणाचे चित्र असमाधानकारक होते. त्यावेळी शिक्षण विभागच अस्तीत्वात नव्हते.[४] बहुतांश शाळा खाजगी होत्या. महाराजांच्या क्रांतीकारक निर्णयामुळे राज्यात प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या वाढली. तसेच लिहिणाऱ्या, वाचणाऱ्या विद्यार्थ्यांची व वाचकांची संख्या मोठ्याप्रमाणात वाढली. म्हणून वाचनासाठी पुस्तकांची संख्या कमी पडू नये म्हणून महाराजांनी गाव तेथे ग्रंथालय चळवळ राबविली. आपल्या सन १९०५-०६ च्या युरोप व अमेरिकेतील दौऱ्यानंतर महाराजांनी अमेरिकेतील ग्रंथालय तज्ञ श्री. विल्यम बॉर्डन यांना आपल्या बडोद्यात निमंत्रीत करुन ग्रंथालयाचे जाळे निर्माण केले. श्री. विल्यम बॉर्डन यांनी पहिले राज्य ग्रंथालय संचालक म्हणून संपूर्ण राज्यात ग्रंथालयाचे जाळे पसरविण्याचे काम सुरु केले. त्यानुसार राज्यातील सर्व ग्रंथालयात सर्व जातीधर्मातील लोकांसाठी प्रवेश मोफत करण्यात आला. श्री. विल्यम बॉर्डन यांनी ग्रंथालय चळवळीसाठी खालीलप्रमाणे ग्रंथालयाची रचना करुन अनेक ग्रंथालयाचे जाळे निर्माण केले.

| अ.क्र. | ग्रंथालयाचे प्रकार | ग्रंथालयाची संख्या |
|---|---|---|
| १. | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | ०१ |
| २. | जिल्हा ग्रंथालय | ०४ |
| ३. | शहर ग्रंथालय | ४५ |
| ४. | ग्रामीण ग्रंथालय | १००० |

**(माहिती स्त्रोत– महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा भाग– ४ ग्रंथालय डॉ. जी. ए. बुवा पान नं. ३६)**

सन १९३६ च्या अखेर तत्कालीन लोकसंख्येच्या ८४% लोकांना ग्रंथालय सेवा उपलब्ध होत होती यावरुनच ग्रंथालयाचा उपयोग लक्षात येतो. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी पहिल्या २० वर्षांत बडोदा सरकारकडून रु. २,००,०५०/- इतकी रक्कम ग्रंथालयासाठी खर्च केली होती.५ बडोदा संस्थानात ९८२ ग्रंथालय सुरु करण्यात आले होते. महाराजांनी बडोद्यात शिशुग्रंथालय, महिला ग्रंथालय, भाषांतर व संस्कृत विभाग अशा विविध योजना राबवुन ग्रंथालयाची चळवळ यशस्वी केली.

**सेन्ट्रल लायब्ररी :**

One of the best organized library in the world[६] अशा शब्दात लंडन लायब्ररी जनरल मध्ये सेन्ट्रल लायब्ररीचे कौतुक करण्यात आले होते. सन १९०६ साली महाराजांनी ग्रंथालय तज्ज्ञ श्री. विल्यम बॉर्डन यांच्या नेतृत्वाखाली सेन्ट्रल लायब्ररी बडोदाची स्थापना आपल्या लक्ष्मीविलास पॅलेसमधूनच केली. सन १९१० ला महाराजांनी आपल्याकडील २०००० पुस्तके देऊन संग्रह वाढविले. सन १९११ पर्यंत श्री. विल्यम बॉर्डन यांच्या मार्गदर्शनाखाली ३०२ सार्वजनिक ग्रंथालयांची निर्मिती झालेली होती. सन १९३३-३४ पर्यंत ११२००० ग्रंथ संख्या होती. त्याचप्रमाणे कडी, नवसारी, अमरेली या तिन्ही शहरात ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. सेन्ट्रल लायब्ररीच्या खालील विविध विभागांमार्फत कामकाज चालत असे. काही नवीन विभागाची कालांतराने निर्मिती करण्यात आली. ते विभाग पुढीलप्रमाणे :

१) बातमीपत्र विभाग
२) वाचनालय विभाग (इंग्रजी/मराठी/गुजराती)
३) वाचन ग्रंथसंग्रह विभाग
४) संदर्भ विभाग
५) बालपुस्तकालय
६) महिला पुस्तकालय

ISSN No. 2394-5990

७) गायकवाड ओरीएन्टल विभाग
८) दुर्मिळ हस्तलिखिते, पत्रे
९) भाषा विभाग
१०) कॅटलॉग विभाग
११) विज्ञान अभ्यास विभाग
१२) संस्कृती विभाग

वरील विभागानुसार सेन्ट्रल लायब्ररीचे कामकाज पार पाडले जात असे. या ग्रंथालयात आधुनिक वर्गिकरणाची पध्दत वापरली जात आहे. डॉ. रंगनाथ यांच्या पंचसुत्री प्रमाणेच महाराजांनी ग्रंथालयाच्या व्यवस्थापनामध्ये बदल केला होता. येथे मुक्तद्वार पध्तीचा वापर केला असून ३६५ दिवस हे विभाग चालू होते.

एकुणच सेन्ट्रल लायब्ररी ही आशिया खंडातील सर्वात मोठी व भारतातील एकमेव आदर्श लायब्ररी होती. त्यामुळे देशभर ग्रंथालय व ग्रंथालय चळवळीला बळ मिळाले. सन २००१ साली भुकंपाचे धक्के आले होते. परंतु त्यावेळी ग्रंथालयातील एकही पुस्तक रॅकमधून खाली पडले नाही. तसेच इमारतीचे नुकसान देखील झाले नाही. यावरुन इमारतीची मजबुती व प्रशस्थपणा समजतो व सर्वसामान्यांची बौधिक भुक भागविण्याचे महत्त्वपूर्ण ठिकाण म्हणून आजही संबोधले जाते.

आजमितीला सेन्ट्रल लायब्ररीमध्ये एकुण पुस्तकांची संख्या २,८९,९६६ एवढी आहे. सदस्य संख्या २,२५७ एवढी आहे. तसेच लायब्ररीचा आत्मा म्हणजेच स्टॉक असतो. तेथे एकुण ३५२ स्टॉक आहेत. सेन्ट्रल लायब्ररीमध्ये दररोजचे देवघेव व्यवहाराची नोंद १,१५७ एवढी आहे. सन १९१० मध्ये या लायब्ररीची स्थापना करताना बांधकामासाठी रु. ४,००,०००/- आणि इतर बाबींसह रु. २,००,०००/- खर्चून बांधण्यात आले होते. आजही ९० फिरते वाचनालय असून १५०० पेक्षा जास्त ग्रंथालयाचे जाळे बडोद्यात कार्यरत आहे.

**फिरते वाचनालय (सयाजी वैभव) :**

शिक्षणाची ज्ञानगंगा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी गाव तेथे ग्रंथालयाची संकल्पना उदयास आल्याने महाराजांनी फिरते वाचनालय सुरु केले. त्यावेळी फिरते वाचनालयात १,५०,००० पुस्तकांचा संग्रह करण्यात आला होता. शहरी व तालुका स्तरीय भागात ग्रंथालय निर्माण करण्यात यश मिळाले. परंतु ज्या ठिकाणी कमी लोकसंख्या असणाऱ्या व दूरवरच्या दुर्गम भागात सुसज्ज ग्रंथालय निर्माण करु न शकल्याने त्याठिकाणी फिरते वाचनालयाची सुरुवात करण्यात आली. त्याला महाराजांनी नावाप्रमाणेच मसयाजी वैभवफ हे नाव देऊन ते ग्रंथालय राज्याचे वैभव असल्याचे मानत असे.[७]

खेडेगावातील, आदिवासी भागातील तसेच दुर्गम भागातील लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी फिरते वाचनालय महत्त्वपूर्ण ठरले. या फिरते वाचनालयात एका पेटीत २५-३० पुस्तके बसतील एवढी पुस्तके ठेवण्यात येत असे. अशा १०-१५ पेट्या घेऊन बैलगाडीतून फिरते वाचनालय चालत असे. एका गावात एक पेटी १५ दिवस ठेऊन पुन्हा ती पेटी दुसऱ्या गावामध्ये व दुसऱ्या गावातील पेटी तिसऱ्या गावामध्ये अशापध्दतीने बदल करुन फिरते वाचनालय लोकांसाठी मोफत ठेवण्यात येत असे. यामुळे गावोगावी वाचन संस्कृतीला बळ मिळाले. फिरते वाचनालयाचा प्रयोग जगात पहिल्यांदा स्कॉटलँड येथे व दुसऱ्यांदा भारतात करण्यात आला.[८] इतर प्रांतांनी अशा फिरत्या वाचनालयाचा प्रयोग केला पण त्यांना ते यशस्वीपणे राबविता आले नाही.

'गाव तेथे ग्रंथालय' ही कल्पना यशस्वी करण्यासाठी फिरते वाचनालयासाठी सन १९०६ मध्ये रु. ३०,०००/- अनुदानाची तरतूद महाराजांनी केली होती. बडोद्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांना ग्रंथालय दाखविण्याचा आग्रह महाराज करीत असत. सन १९३० ला व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन भारत भेटीला आले असताना त्यांनी अनेक ग्रंथालय पाहिले.[९] त्यापैकी त्यांना महिला ग्रंथालय व फिरते ग्रंथालय खुप आवडले होते. आजही गुजरात राज्यातील नर्मदा, सावली, कवंठ, बडोदरा अशा ९० खेडेगावात फिरते वाचनालय कार्यरत आहे. ग्रंथालयास पूरक असणाऱ्या बाबींची पूर्तता करुन विविध अनुदान, बक्षिसे, शिष्युवृत्त्या देऊन ग्रंथालय चळवळीचा विकास केला.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे ग्रंथसंवर्धन व ग्रंथनिर्मितीचे कार्य :**

'धनापेक्षा महाराजांनी ग्रंथांची जपणुक केली' यावरुनच महाराजांचा विद्याव्यासंगपणा लक्षात येतो. साहित्यामुळेच मानवाचे जीवन समृध्द होते. साहित्य हे फक्त मनोरंजनासाठी नसून प्रत्येक व्यक्तीच्या आणि समाजाच्या उन्नतीसाठी असते असे ठाम मत असणारे महाराजांनी भारतीय ग्रंथालय चळवळीला ऊर्जीत अवस्था प्राप्त करुन दिली. तसेच ग्रंथालयाला लागणाऱ्या पूरक बाबी, उपकारक सोयीसाठी महाराजा नेहमीच प्रयत्नशील होते. देशी व विदेशी ग्रंथातील दुर्मिळ व मौल्यवान असणाऱ्या ग्रंथांचे संवर्धन व विविध विषयावरील ग्रंथनिर्मिती करण्यासाठी विविध कथामालेतून प्रयत्न करण्यात आले.

महाराजांना निद्रानाश जडला होता. त्यासाठी बऱ्याचदा त्यांनी युरोप आणि अमेरिकेचा प्रवास केला. त्याप्रवासामध्ये आपल्या वाचनामध्ये खंड पडू नये म्हणून सन १८८८ मध्ये युरोपात स्वत:साठी झिंगारा नावाची आगबोट विकत घेतली होती.[१०]

त्यामध्ये बसून समुद्र किनारी वाचत वाचत फिरता यावे हा मुख्य उद्देश होता. विविध विषयावरील मौल्यवान ग्रंथांचे भाषांतर करुन तो ग्रंथाचा खजिना सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करुन दिला. ग्रंथ निर्मिती व ग्रंथ संवर्धनासाठी महाराजांनी खालील विविध माध्यमांतून उत्तम अशा लाखो ग्रंथांची निर्मिती व भाषांतर केले.

१) प्राच्यविद्यामंदिरची स्थापना सन १९२७- दुर्मिळ संस्कृत ग्रंथांचे जनत व भाषांतर, १८७ पेक्षा अधिक दुर्मिळ पुस्तके प्रकाशित
२) गायकवाड ओरीएंटल सिरीज सन १९१५- जुन्या व दुर्मिळ पोथ्या व ग्रंथांचे प्रकाशन
३) सयाजी साहित्यमाला- ३८० पुस्तके
४) सयाजी बालज्ञानमाला- २९३ पुस्तके
५) सयाजी ग्रामविकासमाला- ३६ पुस्तके
६) मातोश्री जमनाबाई स्मारक ग्रंथमाला- ०८ पुस्तके
७) सेन्ट्रल बुक डेपो- विविध पुस्तकांचे भाषांतर
८) क्रिडा ग्रंथमाला, ९-१० दुर्मिळ खेळावरील पुस्तकांचे प्रकाशन
९) पाकशास्त्र ग्रंथमाला, १०-१५ पाककलेवरील पुस्तकांचे प्रकाशन
१०) विविध परिषदेतून ग्रंथनिर्मितीस प्रोत्साहन म्हणून अनुदान दिले.
११) विविध विषयातील तज्ज्ञांना राजाश्रय देऊन ग्रंथनिर्मिती
१२) शास्त्रीय ग्रंथमाला- सयाजी ग्रंथमाला व लघुमंजुषा ग्रंथमाला
१३) हस्तलिखित विभाग- ३०,००० दुर्मिळ हस्तलिखित व पोथींचा संग्रह आजही ५०,००० हस्तलिखितांचा संग्रह आहे.

वरीलप्रमाणे विविध ग्रंथमालीकेतून दुर्मिळ, जुन्या ग्रंथांची निर्मिती व संवर्धन मोठ्याप्रमाणात करण्यात आले. ग्रंथनिर्मिती व संवर्धनासाठी महाराजांनी रु. २,००,०००/- अनुदान दिले होते. ग्रंथालय चळवळीबद्दल देश-विदेशातील आढावा मिळावा म्हणून मलायब्ररी मिसलीनीफहे तीन भाषेतील (मराठी / इंग्रजी / गुजराती) नियतकालिक महाराजांनी सुरु केले.[११] त्याचप्रमाणे समाजउपयोगी ग्रंथनिर्मितीसाठी विद्वान, लेखक व तज्ज्ञांना देणगी व राजाश्रय देऊन विपूल असे लेखन करुन घेतले. तसेच महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी दक्षिणा फंडातून धर्मशास्त्रीय ग्रंथांच्या खरेदीसाठी दरसाल रु. १०,०००/- खर्च करणारे भारतातील एकमेव राजा होते.[१२] भारतातील या ग्रंथालय चळवळीच्या यशामुळे महाराजांना परदेशात विविध मानसन्मान मिळाले. महाराजांनी आपल्या विविध सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून खऱ्याअर्थाने देशसेवा केलीच पण ग्रंथालय चळवळीला पूरक ठरणाऱ्या सर्व महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण योजना राबवुन भारतीय ग्रंथालय चळवळीला यश प्राप्त करुन दिले. उदा. बुकडेपो, शेतकीवर्ग, ग्रामशाळा, रात्रशाळा, बटॅलियन स्कूल. महाराजांनी प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठीय तसेच तंत्र शिक्षणासाठी सन १८८१ ते सन १९३९-४० पर्यंत करोडो रुपयांच्या विविध शिष्यवृत्त्या देऊन शिक्षणाचे सार्वत्रीकरण केले. तसेच परदेशीय शिक्षणासाठी भारतातील अनेक तत्कालीन नामवंत अशा ८८ व्यक्तींना शिष्यवृत्त्या देऊन समाज सुधारणाचा पाया रचला.[१३] 'सयाजीपदक' व 'वर्षासन' देऊन साहित्यीकांना ग्रंथनिर्मिती व ग्रंथभाषांतरासाठी राजाश्रय देऊन साहित्य संपदेचे जतन व संवर्धन केले. महाराजांनी त्याकाळातील इतर प्रगत देशांपेक्षाही सरस असे साहित्य विषयक कार्य केले होते.[१४] खालील आकडेवारीवरुन आपल्याला त्यांची साहित्याचे कार्य व श्रीमंती कळते.

| अ.क्र. | देश | पुस्तकांची संख्या | ग्रंथालय | एकुण लाभार्थी शेकडेवारी |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्लंड | २,८०,००,००० | ६०० | ९९% |
| २ | अमेरिका | ८,६०,००,००० | ७००० | ७३% |
| ३ | बडोदा | १९,००,००० | १३४७ | ८३% |

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिक्षण, ग्रंथनिर्मिती व ग्रंथसंवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नातून बडोदानगरी-सयाजीनगरी-साहित्यनगरी बनली होती.[१५]

एका शेतकऱ्याचा मुलगा पुढे बडोदा संस्थानाचा राजा होतो आणि आपल्या अधिकाराचा, संपत्तीचा व ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी करतो हे त्याकाळातील समकालीन राजेमहाराजांची परिस्थिती पाहता आश्चर्यच म्हणावे लागेल. कारण त्याकाळात महाराज हे भारतीय विविध समाज सुधारणांचा चालता बोलता इतिहासच म्हणावे लागेल. त्यांनी त्या अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत इंग्रजांच्या बंधनातूनही प्राथमिक शिक्षणाचा

मोफत व सक्तीचा कायदा, स्त्री सुधारणात्मक कायदे व शिक्षणासाठी शाळा आणि विद्यापीठांची स्थापना, अस्पृष्यता निवारण, शेतीच्या आधुनिकीकरणासाठीचे प्रयत्न, विधवा विवाह व मिश्र विवाहास मान्यता, सतीप्रता व केशवपनास बंदी, प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षणाची सोय करणारे, भारतातील अनेक समाज सुधारकांचे आधारवड असणारे भारतातील एकमेव पुरोगामी दूरदृष्टी असणारा प्रजाहितदक्ष राजा आणि महाराजांनी त्या काळात ८९ कोटी रुपये म्हणजे आजघडीला १५० लक्ष कोटीहुन जास्त रुपये सर्वसामान्यांच्या विकासासाठी, उध्दारासाठी खर्च करणारा जगातील एकमेव राजा म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड होय.[१६]

**निष्कर्ष :**

आपल्या राजेशाहीचा त्याग करुन लोकशाही अस्तित्वात आणण्यासाठी व जनतेच्या विकासासाठी अहोरात्र झटणारा राजा म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड हे होय. शिक्षणाचे महत्त्व ओळखून संपूर्ण आयुष्य सर्वसामान्य जनतेला शिक्षण देऊन बहुश्रुत करण्याचे प्रयत्न महाराजांनी तन-मन-धनाने यशस्वी प्रयत्न केले. भारतीय ग्रंथालय चळवळीला सुनियोजित व संघटीत बनवुन इतर प्रांतांना मार्गदर्शक ठरेल असे नेतृत्व संपूर्ण भारताला दिले. बडोदा नरेश सयाजीराजे गायकवाड यांनी देश-विदेशात जाऊन जे-जे चांगले व नाविण्यपूर्ण असेल ते-ते आपल्या संस्थानातील जनतेला आणण्याचे आयुष्यभर प्रयत्न केले. ब्रिटीशांच्या अन्यायापुढे न झुकता राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा दाखवून सामाजिक कल्याणातून खासकरुन शिक्षण व ग्रंथालय निर्मितीच्या माध्यमातून जनतेसाठी अनेक निर्णय घेतले. सुमारे १५० वर्षांपुर्वी महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी घेतलेले अनेक क्रांतीकारक निर्णय हे आजच्या भारतीय संविधानामध्ये आढळून आल्याचे दिसून येते. त्यावरुनच महाराजांच्या दूरदृष्टीची व सामाजिक कल्याणासाठी घेतलेल्या क्रांतीकारक निर्णयाची आपल्याला प्रचिती येते.

महाराजांनी आपल्या शिक्षणाबरोबर व ग्रंथालय निर्मितीच्या माध्यमाने भारतातील ग्रंथालय चळवळीला यशस्वी करुन दाखविले. म्हणूनच महाराजांना भारतातील ग्रंथालय चळवळीचा आद्य जनक म्हणून संबोधणे हे वावगे ठरणार नाही. 'सर्वसामान्य जनतेचा असामान्य राजा' म्हणून त्यांच्या संपूर्ण कार्याचा गौरव करताना पंडित मदनमोहन मालवीय म्हणतात की, 'हिंदूस्तानातील शेवटचा आदर्श राजा' म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड होय.

**संदर्भसूची :**


१) तायडे विशाल : महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा भाग- १ शिक्षण, सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरीत्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०२०, पान नं. ४५.

२) कित्ता- पान नं. २५

३) बुवा जी. ए. : महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा भाग- ४ ग्रंथालय, सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरीत्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद- ४३१००५, आवृत्ती २०२०, पान नं. ३०.

४) कित्ता- पान नं. ४३

५) कित्ता- पान नं. ६२

६) कित्ता- पान नं. ४२

७) न्युटन दत्त, इरीवर रपव ळीी डळलीरी पान नं. ४४

८) उपरोक्त, तायडे विशाल, पान नं. १७१.

९) उपरोक्त, तायडे विशाल, पान नं. १७१.

१०) मालकर यमाजी (संपादक) आणि मगर राजेंद्र (लेखक) : दानशूर महाराजा सयाजीराव, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथम आवृत्ती २०२२, पान नं. ९८.

११) उपरोक्त, बुवा जी. ए., पान नं. ८५.

१२) उपरोक्त, मालकर यमाजी (संपादक) आणि मगर राजेंद्र (लेखक), पान नं. १२४.

१३) कित्ता- पान नं. ९०

१४) कित्ता- पान नं. १३५

१५) कित्ता- पान नं. १३७

१६) मालकर यमाजी (संपादक) आणि मगर राजेंद्र (लेखक), दानशूर महाराजा सयाजीराव पुस्तकाचे मलपृष्ठ.

- मोहिते अनंत, भारतीय संस्कृतीची गंगोत्री- गुजरात, अभिनंदन प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती- जानेवारी २०१९.
- टिकेकर अरुण (संपादक) आणि धनागरे द. ना. आणि इतर
- श्रीमंत सयाजीराव गायकवाड- दादुमिया
- सचिव गंधर्व-वेद प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती- नोव्हेंबर २०१०.
- संशोधक- मगर राजेंद्र सर्जेराव,
सयाजीराव गायकवाड यांच्यावरील चरित्रांचा अभ्यास- पीएच.डी. प्रबंध,

- सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठ, फेब्रुवारी २०१७.
- रंगनाथन यांचे पुस्तक Post War Reconstruction of Libraries in India
- www.baroda.com
- www.historyofvadodara.in
- www.sayajiraogaekwad.com
- www.msubaroda.ac.in


■■■

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्वातंत्र्यपूर्वकाळात सामाजविकासातील योगदान

**प्रा. डॉ.दादासाहेब दामोधर हाके**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय,माढा जि. सोलापूर
dadasahebhake@gmail.com, Mobile - 9850213793

**सारांश :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजरातमधील बडोदा या संस्थानचे राजे होते. तथापि, आपले अधिकार व सत्ता यांचा वापर राज्यातील सामान्य जनतेच्या कल्याणासाठी करणारे जे काही मोजकेच संस्थानिक या देशात होऊन गेले. अशा संस्थानिकांमध्ये सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. आपल्या लोककल्याणकारी भूमिकेद्वारे त्यांनी समाजसुधारणेच्या चळवळीला मोठीच चालना दिली. त्यांच्या एकंदर कार्याचा महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीलाही बराच लाभ झाला होता. महाराष्ट्रात समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना सयाजीराव गायकवाड यांनी सक्रिय मदत केली होती.

११ मार्च, १८६३ रोजी सयाजीरावांचा जन्म झाला. नाशिक जिल्ह्यातील कवळाणे हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे वडील काशीराव गायकवाड हे आपल्या कवळाणे या गावी शेतीचा व्यवसाय करीत होते. काशीरावांना आनंदराव, गोपाळराव व संपतराव असे तीन मुले होती. त्यांच्या घराण्याचा बडोद्याच्या गायकवाड घराण्याशी दूरचा संबंध होता. बडोदा संस्थानचे राजे खंडेराव गायकवाड यांचे १८७० मध्ये निधन झाले. त्यांना औरसपुत्र नसल्याने त्यांच्यामागून त्यांचे बंधू मल्हारराव गायकवाड हे बडोद्याच्या गादीवर आले. परंतु मल्हारराव व बडोद्याचे तत्कालीन रेसिडेंट कर्नल फ्रेयर यांच्यात बेबनाव उत्पन्न झाला. लवकरच इंग्रजांनी मल्हाररावांना दुर्वर्तनाच्या आरोपावरून गादीवरून काढून टाकले आणि बडोदा संस्थानचा कारभार काही काळासाठी आपल्या हाती घेतला. पुढे खंडेराव गायकवाडांच्या विधवा पत्नी जमनाबाई यांनी हिंदुस्थानच्या सरकारकडून दत्तक घेण्याचा अधिकार मिळविला. त्यानुसार जमनाबाईंनी कवळाणेचे काशीराव गायकवाड यांचा मुलगा गोपाळराव यास २७ मे, १८७५ रोजी दत्तक घेतले आणि त्याचे नाव सवाजीराव असे ठेवले, अशा प्रकारे सवाजीराव बडोदा संस्थानचे राजे बनले.

सयाजीरावांचे सर्व बालपण खेडेगावात गेले होते. तेथील वातावरणामुळे आणि घरच्या गरिबीमुळे त्यांना लहान वयात शिक्षणाची संधी मिळाली नव्हती, तेव्हा बडोद्यात आल्यावर त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. अल्पावधीतच त्यांनी मराठी, इंग्रजी, गुजराती व उर्दू भाषांचे शिक्षण पूर्ण केले. तसेच घोडेस्वारी, राजघराण्यातील रीतिरिवाज, राज्यकारभारातील बारकावे इत्यादी गोष्टीही त्यांनी आत्मसात केल्या. बडोदा संस्थानचे त्या वेळचे दिवाण राजा सर टी. माधवराव यांच्याकडून त्यांना राजकारणाचे शिक्षण मिळाले. सयाजीराव गायकवाड यांचा राज्याभिषेक समारंभ २८ डिसेंबर, १८८१ रोजी झाला. त्यांनी एकंदर चौसष्ट वर्षे राज्य केले. पण आपल्या हाती आलेल्या सत्तेचा वापर त्यांनी सदैव प्रजेच्या कल्याणासाठीच केला. आपल्या कारकिर्दीत त्यांनी बडोदा संस्थानात अनेक सुधारणा घडवून आणल्या. अनेक लोकोपयोगी कामे केली. गरजू व लायक व्यक्तींना अनेक प्रकारे साहाय्य केले. आपल्या राज्यातील गोरगरीब प्रजेच्या हिताकडे लक्ष देऊन एक ङ्गप्रजाहितदक्ष राजाङ्घ असा लौकिक त्यांनी संपादन केला.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक योगदान समजून घेणे.
२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकणे.
३) महाराजा सयाजीराव गायकवाड यांची भारतीय समाजाप्रती व देशाप्रतीची भूमिका समजून घेणे.
४) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या विचार व कार्यावर प्रकाश टाकणे

**१) महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलले सामाजिक कार्य व सुधारणा**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक क्षेत्रातही काही क्रांतिकारक सुधारणा केल्या होत्या. ते समाजसुधारणेचे

कट्टर पुरस्कर्ते होते. आपल्या संस्थानात त्यांनी घटस्फोटाचा कायदा लागू केला. असा कायदा करणारे बडोदा संस्थान हे भारतातील पहिलेच राज्य ठरले. अस्पृश्यता निवारण, विधवाविवाह, मिश्रविवाह यांसंबंधीच्या कायद्यांची त्यांनी आपल्या संस्थानात अंमलबजावणी केली होती. तसेच पडदापद्धती बंदी, बालविवाह बंदी, कन्याविक्रय बंदी इत्यादी सुधारणा त्यांनी प्रत्यक्ष अमलात आणल्या होत्या. सयाजीराव महाराजांनी सामाजिक सुधारणेसंबंधी केलेलेल्या कायद्यावरून त्या काळातील त्यांचा दृष्टिकोन पुरोगामी स्वरूपाचा होता याची कल्पना येऊ शकते.

**२) महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणविषयक कार्य :**

आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्यासाठी सयाजीराव गायकवाड सतत प्रयत्नशील राहिले. विशेषतः बहुजन समाज व मागासलेले वर्ग यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यास त्यांनी प्राधान्य दिले. त्याकरिता १८९३ मध्ये त्यांनी बडोदा संस्थानात सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेची सुरुवात केली आणि क्रमाक्रमाने या योजनेची व्याप्ती वाढवीत नेऊन १९०६ मध्ये संपूर्ण संस्थानात ती अमलात आणली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे बडोदा हे भारतातील पहिले राज्य होय. या एकाच गोष्टीवरून सयाजीराव गायकवाड यांच्या या कार्याचे महत्त्व व त्यांचे द्रष्टेपण स्पष्ट होते. स्त्रिया व मागासवर्गीयांच्या शिक्षणाकडेही सयाजीरावांनी विशेष लक्ष पुरविले आणि त्यासाठी स्वतंत्र सोयी उपलब्ध करून दिल्या. मागासवर्गीयांसाठी त्यांनी खास शाळा सुरू केल्या. सन १८९० मध्ये त्यांनी 'कलाभुवन' ही संस्था स्थापन करून तंत्रशिक्षणाला चालना दिली. राज्यातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी वसतिगृहे चालविण्याची व्यवस्थाही त्यांनी केली. याशिवाय संगीत, नृत्य, नाट्य यांसारख्या कलांचे शिक्षण देणारी शाळाही राज्यात उघडण्यात आली. शैक्षणिक संस्था स्थापन करण्याबरोबरच लोकांमध्ये इतर मार्गांनीही ज्ञानाचा प्रसार व्हावा याची काळजी सयाजीरावांनी घेतली होती. त्याकरिता संस्थानात त्यांनी गावोगावी वाचनालये उघडली. याशिवाय आपल्या राज्यातील व राज्याबाहेरील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्त्या देण्याची व्यवस्था त्यांनी केली होती. त्यांच्या या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनी घेतला होता. त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या मान्यवर व्यक्तींचा समावेश होता.

**डॉ. बाबासाहेब यांना शिष्यवृत्ती :**

सयाजीराव यांनी भारताचे महान घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणासाठी तर महा ५० रुपये शिष्यवृत्ती दिली होती. त्याचबरोबर महाराजांनी बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी म्हणजेच पी.एचडी च्या पदवीसाठी अमेरिकेत पाठवले होते. महाराजांनी परदेशात त्यांच्या शिक्षणाचा व राहण्याचा सर्व खर्च केला होता. त्यानंतर परदेशातून पदवी मिळवून आल्यानंतर आंबेडकरांची महाराजांनी बडोद्यास सचिवालयामध्ये उच्च पदावर नेमणूक केली होती.

**स्त्री शिक्षण व बहुजन समाजासाठी शिक्षण क्षेत्रातील कामगिरी:**

महाराज सयाजीराव गायकवाड हे एकमेव असे राजे होते की ज्यांनी सुमारे साडेतीन हजार गावात शाळा सुरू केल्या होत्या महाराज सयाजीराव गायकवाड यांनी स्त्री शिक्षणालाही तितकेच उत्तेजन दिले होते. त्यांनी बडोद्यात स्त्री शिक्षणाची सुरुवात केली त्यांच्या या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद मिळाला शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या पुण्या पेक्षा जास्त मुली बडोद्यात शाळेमध्ये शिक्षणासाठी येत होत्या. महाराष्ट्रातील बहुजन समाजातील जी शिकलेली माणसे दिसतात त्याचे सर्वाधिक श्रेय सयाजीराव महाराजाला जाते. महाराष्ट्रात त्यांच्या प्रेरणेने एक कर्तबगार पिढी निर्माण झाली त्या पिढीने नवा महाराष्ट्र घडविला छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, रावसाहेब थोरात, पंजाबराव देशमुख यांनी सयाजीराव महाराजापासून स्फूर्ती घेऊन उभ्या महाराष्ट्रात शिक्षण प्रसाराच्या प्रचाराचे कार्य केले. त्याचबरोबर इतर समाजामध्ये ही महाराजांनी शिक्षणासाठी श्रम घेतले होते .बनारस विद्यापीठात सर्वधर्मसमभाव या समाज प्रबोधनाचे नेतृत्व विद्यार्थ्यांमध्ये करून त्या विद्यापीठाला दोन लाख रुपयाची शिष्यवृत्ती दिली होती त्याचप्रमाणे वेगवेगळ्या जाती धर्माच्या लोकांसाठी शाळा सुरू केल्या होत्या.

सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्यात शिक्षण प्रसार मोठ्या जोमाने केला. दारिद्र्य, रोगराई, बेकारी यासारख्या समस्यांचे मूळ कारण शिक्षणाचा अभाव असल्याने महाराजांनी शिक्षण प्रसारावर भर दिला होता. शाळा सुरू करून शिक्षण सक्तीचे केले होते. गरीब घरामध्ये शिक्षणासाठी पैशाचा अभाव असल्यामुळे महाराजांनी गरिबांच्या मुलांसाठी कमवा आणि शिका ही योजना अमलात आणली व या योजनेला भरघोस प्रतिसाद मिळाला.

**३) महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या राजकीय व प्रशासकीय सुधारणा :**

बडोदा संस्थानचे दिवाण सर टी. माधवराव यांच्या मदतीने सयाजीराव गायकवाड यांनी प्रथम राज्ययंत्रणेत सुरळीतपणा आणला. त्याकरिता प्रशासकीय जबाबदारीची विभागणी हे तत्त्व राज्यकारभारात लागू केले. आपल्या राज्याची आर्थिक स्थिती

सुधारावी म्हणून अनेक उपाययोजना केल्या. राज्याच्या न्यायव्यवस्थेतही त्यांनी सुधारणा घडवून आणल्या. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी अनेक सुधारणा केल्या. आपल्या राज्यातील जमिनीची योग्य प्रतवारी करण्यासाठी त्यांनी 'लँड सर्व्हे सेटलमेंट' हे खाते सुरू केले. सारावसुलीच्या पूर्वीच्या वेगवेगळ्या पद्धतीत सुधारणा करून सारावसुलीची समान पद्धत राज्यात लागू केली. शेतीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विहीर खोदाईच्या कामास उत्तेजन दिले. आपल्या राज्याच्या न्यायव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याचे कार्यही त्यांनी केले. त्यासाठी त्यांनी सन १९०५ मध्ये ङ्गहिंदू कायदाङ्ग तयार करून तो अमलात आणला. राज्यातील पंचायतींचे पुनरुज्जीवन घडवून आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला. ग्रामपंचायतींची मुहूर्तमेढ भारतात प्रथम बडोदा संस्थानात रोवली गेली, ती सयाजीरावांच्याच कारकिर्दीत. ग्रामपंचायतींच्या जोडीला तालुका पंचायती व नगरपालिका यांचीही स्थापना करण्यात आली. सयाजीरावांनी लोक कल्याणाच्या विविध योजना हाती घेतल्या व त्या यशस्वीरीत्या पार पाडल्या.

**४) महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेली लोक-कल्याणकरी कार्ये :**

सयाजीराव गायकवाड महाराजांनी जगभर प्रवास केला. या प्रवासातही आपल्या राज्याच्या हिताचा विचार डोळ्यांसमोर ठेवून जगातील अनेक चांगल्या गोष्टीचा त्यांनी स्विकार केला. राज्यातील व्यापार व उद्योगधंदे यांना उत्तेजन देण्याकडे महाराजांनी विशेष लक्ष पुरविले. त्यासाठी दळणवळणाच्या सोयी वाढविल्या. बडोदा संस्थानात सयाजीरावांनी अनेक सुंदर वास्तू उभ्या केल्या. लक्ष्मीविलास राजवाडा, मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, वस्तुसंग्रहालय, कलाभुवन, श्रीसयाजी रुग्णालय, खंडेराव मार्केट वगैरे इमारतींची उभारणी त्यांच्याच कारकिर्दीत झाली.

**भारतातील पहिले धरण बांधले :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या संस्थानात लोक कल्याणाची आणि नागरी सोयीची असंख्य कामे केली. त्यांनी नागरी सोयीची सुरुवात त्यांच्या राज्यात पिण्याच्या पाण्यापासून केली १८९० साली महाराजांनी बडोद्यापासून जवळ असणाऱ्या सूर्य नदी आणि वागली नाला हे दोन जलप्रवाह अडवून भारतातील पहिले नाविन्यपूर्ण बांधकाम असलेले धरण बांधले.

**बँक ऑफ बडोदा ची स्थापना :**

शेतीच्या खर्चासाठी स्वतंत्र बँकेची स्थापना केली होती बँक ऑफ बडोदा ही सयाजीराव महाराजांनी स्थापन केलेली बँक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दुष्काळाच्या वेळी आधार मिळत होता. त्याचबरोबर महाराजांनी शेतकरी आणि गरीब लोकांवरील करांचे ओझे रद्द केले होते.

**स्वतंत्र लढ्यात महत्त्वाची कामगिरी :**

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांनी स्वतंत्र लढ्यात महत्त्वाची कामगिरी बजावली होती. त्यांनी सर्व कामे गुप्तपणे पार पाडली कारण त्या काळात सर्व इंग्रजांची सत्ता होती .इंग्रजांनी सर्व संस्थांना आपल्या काबीज केले होते. राजांना नुकतेच नामधारी ठेवले होते . मात्र पाच-सहा संस्थांनीक या परिस्थितीला अपवाद होते बडोदा संस्थांनीक त्यातील एक होते. बरेच संस्थानिक राजे ऐश आरामात जीवन घालवत होते मात्र सयाजीराव गायकवाड यांनी लोककल्यानाची असंख्य कामे केली होती पिण्याच्या पाण्यापासून रस्ते ते सांडपाणी पर्यंतची कामे महाराजांनी केली होती. त्याचबरोबर भारत स्वतंत्र व्हावा यासाठी प्रयत्न केले होते. त्या काळात बरेचसे भारतीय हे निद्रिस्त होते त्यांना स्वतंत्र म्हणजे काय हे ज्ञात नव्हते. शिक्षणाचा अभाव ही खूप मोठी समस्या होती या जुलमी ब्रिटिश शासनाविरोधात जागृती व्हावी म्हणून शिक्षण सुरू केले होते. आपले शासन आदर्श बनवण्याकडे त्यांचा कल होता आणि ते त्यांनी करून दाखवले न्यायमूर्ती दांडे पासून लोकमान्य टिळकांपर्यंत आणि विवेकानंदांपासून अरविंद पर्यंत सर्वांनी त्यांना या कार्यात मदत केली आपल्या देशातील प्रजा सुरक्षित आणि राष्ट्रवादी व्हावी यासाठी महाराज विद्यार्थ्यांना लष्करी व इतर शिक्षणासाठी प्रोत्साहन देत होते.

**उद्योगपती जमशेदजी टाटांना मदत :**

उद्योगपती जमशेदजी टाटा आणि महाराज गायकवाड यांच्या दोघांमध्ये घट्ट मैत्री आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. महाराज नेहमी कामानिमित्त विदेशात विशेषता युरोप देशात जात तेथील अवाढव्य विशाल आकर्षित भव्य वास्तू पाहून आपल्याही देशात अशी वास्तू असावी आणि आपल्या देशातील गरिबांनाही त्याचा उपभोग घेता यावा असे महाराजांना सतत वाटत असायचे ही इच्छा जमशेद टाटाकडे सांगितली होती व टाटांचीही हीच इच्छा होती महाराजांनी त्या वास्तूसाठी खर्च करण्याची जबाबदारी घेतली आणि भव्य ताजमहल हॉटेलची निर्मिती झाली परंतु गरिबांसाठी बनवलेली ही वास्तू आज त्यांना परवडणार नाही फक्त मोठे मोठे उद्योगपती आणि विदेशी लोकच या ठिकाणी जाऊ शकतात.

महाराजांनी जमशेदजी टाटांना त्यांचा टाटा केमिकल्स कारखाना उभा राहावा यासाठी भरपूर आर्थिक मदत केली होती. त्याच त्या काळात इंग्रज अधिकारी भारतीय उद्योगपतींना

सुरळीतपणे व्यवसाय करू देत नसत नेहमी या ना त्या कारणाने अडथळा आणत असत. जमशेदजी टाटांना महाराजांनी टाटा आयर्न अँड स्टील कारखाना सुरू करण्यासाठी आर्थिक मदत केली. त्याचबरोबर त्यांचे मनोबल वाढवले एका भारतीय कारखानदाराने आपल्याशी स्पर्धा करावी ही गोष्ट इंग्रजी अधिकाऱ्यांना आणि कारखानदारांना रुचत नव्हती परंतु सयाजीराव टाटांच्या पाठीशी उभे राहिले. महाराज नेहमीच टाटांना पैसे आणि धीर देत. टाटांना महाराजा विषयी खूप कृतज्ञता होती.

**समारोप :**

सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानचे अधिपती म्हणून आपल्या राज्यात केलेल्या वरील सुधारणा पाहिल्या तर ते एक कर्तृत्ववान, प्रजाहितदक्ष व पुरोगामी विचारांचे राजे होते हे दिसून येते. राज्यकर्त्याच्या ठिकाणी आवश्यक असणारा दूरदर्शीपणा त्यांच्याकडे होता. म्हणूनच समाजसुधारणेच्या क्षेत्रात त्यांच्या संस्थानाने आघाडी घेतली होती. अनेक सुधारणा देशात प्रथम अमलात आणण्याचा मान बडोदा संस्थानने मिळविला होता. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान देण्यात आला होता. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यालादेखील त्यांनी अप्रत्यक्षरीत्या साहाय्य केले होते. स्वतंत्र्य लढ्यात महाराज पडद्यामागे उभे राहून स्वातंत्र्यासाठी कामे करत होते . बंगालची फाळणी रद्द करण्यासाठी असो किंवा गांधीजींची दांडी यात्रा इंग्रजांशी मैत्री ठेवून सयाजीराव स्वतंत्र चळवळीला जी मदत करीत त्यातच त्यांची मुसद्देगिरी दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. युगदृष्टा महाराजा, बाबा भांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१२

२. स्वतंत्र लढ्याचे पाठीराखे, सयाजीराव गायकवाड , बाबा भांड ,साकेत प्रकाशन ,औरंगाबाद ,२०१६

३. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड १, सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,२०१३

४. महाराजा सयाजीराव गौरव गाथा युगपुरुषाची, सापा., बाबा भांड ,महाराष्ट्र शासन,२०१७

■■■

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड शैक्षणिक सुधारणा

**प्रा.डॉ.रविराज नामदेव कांबळे**
साह्यक प्राध्यापक
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
मो.नं.९८८१२०७२१०, kraviraj1968@gmail.com

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजराथमधील बडोदा या संस्थानाचे राजे होते. तथापि आपले अधिकार आणि सत्ता यांचा वापर राज्यातील सामान्य जनतेच्या कल्याणासाठी करणारे जे काही मोजकेच संस्थानिक या देशात होऊन गेले. अशा संस्थानिकामध्ये सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. आपल्या लोक कल्याणकारी भूमिकेद्वारे त्यांनी समाजसुधारणेच्या चळवळीला मोठी चालना दिली. महाराष्ट्रात समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना महाराज सयाजीराव गायकवाड यांनी सक्रीय मदत केली होती. म्हणून त्यांच्या कार्यायाच्या ठिकाणी आढावा घेणे आवश्यक ठरते.

**पूर्वपरिचय :**

सयाजीराव गायकवाड यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यातील कवळाणे या गावी झाला. त्यांचे वडील काशीराव गायकवाड हे आपल्या कवळाणे या गावी शेतीचा व्यवसाय करीत होते. काशिरावांना आनंदराव, गोपाळराव आणि संपतराव अशी तीन मुले होती. त्यांच्या घराण्याच्या बडोद्याच्या गायकवाड घराण्याशी दुराचा सबंध होता.

बडोदा संस्थानाचे राजे खंडेराव गायकवाड यांचे १९ नोव्हेंबर १८७० रोजी निधन झाले. त्यांना मुलगा नसल्यामुळे त्यांचे बंधू मल्हारराव गायकवाड हे बडोदा संस्थानाचे राजे झाले परंतु मल्हारराव आणि तत्कालीन लीन रेसिडेंस कर्नल फ्रेअर यांच्यात बेबनाव निर्माण झाला आणि इंग्रजांनी बडोदा संस्थानाचा कारभार काही काळासाठी आपल्या हाती घेतला. पुढे खंडेराव गायकवाड यांच्या विधवा पत्नी जमनाबाई यांनी इंग्रजाकडून दत्तक घेण्याचा अधिकार मिळविला. त्यानुसार जमनाबाईनी नाशिक जिल्यातील कवळाणे गावचे काशिराव गायकवाड यांचा मुलगा गोपाळराव गायकवाड हा अनेक मुलांपैकी सर्वात चाणाक्ष व हुशार होता म्हणून गोपाळराव यांची राजपूत्र म्हणून निवड झाली आणि त्यांचे नाव गोपाळराव ऐवजी सयाजीराव असे ठेवले आणि २७ मे १८७५ रोजी सयाजीराव गायकवाड यांचा दत्तक विधानाचा समारंभ पार पडला आणि सयाजीराव गायकवाड हे बडोदा संस्थानाचे राजे बनले.

**शिक्षण :**

सायाजीरावाचे सर्व बालपण खेडेगावात गेले होते.त्यांची घरची परिस्थिती गरिबीची असल्याने त्यांना लहान वयात शिक्षणाची संधी मिळाली नाही. तेव्हा बडोद्यात आल्यावर त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. बालराजा सयाजीरावच्या शिक्षणाची जबाबदारी ही माधवरावांवर सोपविण्यात आली. सयाजीरावांना मराठी, गुजराती, उर्दू व इंग्रजी शिक्षण देण्यात आले. याच बरोबर राजघराण्यातील रितीरिवाज, राजकारभाराची माहिती, लष्करी शिक्षण देण्यात आले. केशवराव पंडित व व्यंकटेश जोशी या मराठी शिक्षकांवर औपचारिक शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी ही या दोन मराठी शिक्षकांकडे देण्यात आली होती. मराठीबरोबरच गुजराथीचे धडे देण्यासाठी रत्नाराम मास्तर यांची नियुक्ती करण्यात आली होती. सायाजीरावांना उर्दूचे ही शिक्षण देण्यात आले. सर रिचर्ड मीड यांच्यावरही महाराजांच्या शिक्षणाची जबाबदारी होती. दिवाण सर. टी. माधवराव यांनी सायाजीरावांना राजकारभाराचे शिक्षण दिले. इंग्रजी गुरु मि.इलियट यांच्याकडून सयाजीरावांना उत्कृष्ट शिक्षण व मार्गदर्शन मिळाले.[१]

**राज्यारोहण :**

इ.स.१८८९ मध्ये सयाजीरावांचे शिक्षण पूर्ण झाले आणि राज्यकारभार सयाजीरावांना मिळावा म्हणून जमनाबाई यांनी इंग्रजाकडे परवानगी घेतली.आणि २८ डिसेंबर १८८१ रोजी सयाजीराव गायकवाडांच्या बडोद्यात राजवाड्यात राज्यारोहण समारंभ पर पडला आणि सयाजीराव गायकवाड यांनी राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारली आणि त्यांच्या तोंडी दोन महत्वपूर्ण वाक्ये सर्वश्रुत आहेत. मी राजा होण्यासाठी येथे आलो आहे आणि माझ्या प्रजेच्या कल्याणाखेरीज अन्य कोणत्याही कामात मला रूची नाही बडोदा संस्थानाचे राजेपद त्यांनी १८८१ ते १९३९ या कालावधीमध्ये ५७ वर्षे उपभोगले. आपल्या कारकीर्दीत सत्तेचा वापर जनतेच्या कल्याणासाठी करावयाचा आसतो.हे त्यांनी आपल्या कारकीर्दीत दाखवून

दिले.राज्यसत्तेचा वापर सामाजिक कल्याणासाठी करून त्यांनी क्रांतीकारी कार्य केले.आपल्या कारकीर्दीत प्रजाकल्यानासाठी समर्पित भावनेने ते झटत होते.[२]

**शैक्षणिक सुधारणा :**

आधुनिक भारताच्या इतिहासावर ज्या राजांनी आपल्या कार्याची अवीट छाप सोडली त्यात बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत सयाजीराव गायकवाड यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले योगदान दिले आहे. व्यक्तीचा आणि राज्याचा विकास करण्याचा सगळ्यात प्रभावी मार्ग शिक्षण आहे हे त्यांनी ओळखले होते त्यामुळे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी राज्यात पूर्व प्रायमिक स्तरापासून ते विद्यापीठ या स्तरापर्यत अतिशय सक्षम अशी शिक्षण यंत्रणा उभारली.[३]

**प्राथमिक शिक्षण :**

सयाजीराव गायकवाड गादीवर येण्याआधी राज्यातील शिक्षणाची स्थिति फारशी समाधानकारक नव्हती. शिक्षण विभाग नव्हता किंवा शासकीय शैक्षणिक संस्था नव्हत्या शहरे व गावामध्ये खाजगी प्राथमिक शाळा होत्या या शाळाचा फायदा समाजाच्या उच्च वर्गातील ब्राह्मण व बनिया यांनाच होत असे. शिक्षणाच्या माध्यमातूनच व्यक्तीचा सर्वांगीण विकास होवू शकतो हे त्यांना माहित होते त्यामुळे त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच बडोद्यातील शिक्षण व्यवस्था सुदृढ करण्यावर भर दिला आणि इ.स.१८७१ मध्ये पहिल्यांदा संस्थानात चार प्राथमिक शाळा सुरु केल्या. यामध्ये दोन गुजराती व दोन मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु केल्या होत्या. या सर्व चारही शाळा बडोदा शहरात होत्या. पुढील काळात पेतलाड पाटण इतर ठिकाणी आणखी काही शाळा सुरु केल्या. इ.स.१८७६-७७ मधे सरकारने शिक्षण विभागावर १०६९१५ रू तर इ.स.१८७७-७८ मध्ये १०१९९४ रू खर्च केल्याची नोंद आहे.[४]

प्राथमिक ते उच्च शिक्षण या स्तरापर्यंत प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या लोकांचा विचार करूनच शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. बडोद्यातील शिक्षण खात्याची रचना दोन विभागात करण्यात आली होती. इंग्रजी आणि देशी विभाग यातील इंग्रजी आणि अँग्लो व्हनीक्यूलर संस्थावर डायरेक्टर ऑफ इंग्लिश एज्युकेशन यांचे नियंत्रण होते. तर देशी भाषांतील शाळा डायरेक्टर ऑफ व्हर्णाक्युलर एज्युकेशन यांच्या नियंत्रणाखाली होत्या. या दोन्ही विभागाचे कामकाज स्वतत्र्य चालत असे श्री टी. एस. टेट. यांच्याकडे डायरेक्टर ऑफ इंग्लिश एज्युकेशन चे तर डायरेक्टर ऑफ व्हर्णाक्युलर एज्युकेशनची जबाबदारी सोपविण्यात आली होती.[५]

**मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण :**

बडोदा संस्थानातील सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला प्रदिर्घ इतिहास आहे. शिक्षणाशिवाय मानवाचे जीवन व्यर्थ आहे. ही जाणीव महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या मनात ठाम होती. सामाजिक बदलाला कायद्याच्या आधार दिल्यास सुधारणांची गती निश्चीत वाढेल या दृष्टीकोनातून महाराजांनी बडोद्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रयोग राबविला भारतातील बडोदा हे मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत पुढाकार घेणारे पहिले राज्य होते.यावरूनच महाराजांच्या शैक्षणिक दूरदृष्टीची प्रचीती येते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व वेळीच ओळखले होते. त्यांचे शिक्षणविषयक विचार असे होते की प्रजा जर अशिक्षीत राहिली तर ती रोजच्या राजकारणात, कारभारात, प्रशासनात बुद्धीपुर्वक सहयोग देवू शकणार नाही. परिणामतः आपले राज्य प्रगतीशील राज्य होऊ शकणार नाही. समग्र राज्यातील स्त्री-पुरुष साक्षर व्हायलाहवेत. प्रत्येक घरातील व्यक्ती तळागाळातील अस्पृश्य जाती जमातीसह सुशिक्षित असावी ही त्यांची तळमळ होती. महाराजांनी आम जनतेसाठी सुद्धा शिक्षण व्यवस्था निर्माण केली. शिक्षणाचे आमुलाग्र क्रांती घडवून येवू शकते. लोक स्वतंत्र्यासाठी लायक आणि सशक्त होऊ शकतील.[६]

इ.स.१८९३ मध्ये मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात प्रायोगिक तत्वावर बडोदा राज्याच्या अमरोली विभागात सुरु करण्यात आली. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला मिळालेल्या यशानंतर हळूहळू संपूर्ण बडोदा राज्यात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यात आला. इ.स.१९०६ मध्ये बडोद्याच्या शिक्षणाच्या इतिहासात एक नवा क्रांतिकारक मार्ग खुला करणारा मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर करण्यात आला. पुढे या कायद्यामध्ये कालानुरूप अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या. सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याची स्त्रियाच्या शिक्षणा मधील भूमिका अत्यंत महत्वाची आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी करणारे बडोदा हे भारतातील पहिले राज्य होते. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी वेळोवेळी या कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणीचा आढावा घेवून त्या अडचणी दूर करण्याचा व जास्तीत-जास्त परिणामकारकपणे कायदा राबविण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक शिक्षणाची व्याप्ती वाढावी आणि समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शिक्षणाचा प्रवाह पोहचावा यासाठी महाराजांनी अतिशय दूरदर्शी विचार मांडले होते. सक्तीच्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या पालकाकडून दंड वसूल केला जात असे.

ISSN No. 2394-5990

**औद्योगिक प्राथमिक शिक्षण :**

इ.स.१९२० मध्ये सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला. राज्यातील काही प्राथमिक शाळा या औद्योगिक प्राथमिक शाळा म्हणून जाहीर करण्यात आल्या, पाटण, विसनगर, दाभोई आणि पेतलाड येथील प्राथमिक शाळा मधूनही सुरुवात करण्यात आली. त्यासाठी या शाळांना प्रत्येक ८००० रू. चा निधि उपलब्ध करून देण्यात आला. सरकारने हे अतिशय महत्वाचे पाऊल उचलले होते. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरापासून बालकामध्ये त्याच्या वयानुसार औद्योगिक विचारसरणी विकसित व्हावी यासाठी कौशल्याचे शिक्षण त्यांना द्यायला हवे. असा दूरदर्शी विचार समोर ठेवून सरकारने पावले उचलली होती.

**सरदार स्कूल :**

सन १८८१-८२ या शैक्षणिक वर्षात बडोद्यामध्ये सरदार स्कूल सुरु करण्यात आले. सरदार आणि इतर उच्च वर्णीय यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी ही शाळा होती. राज्याच्या वतीने सर्वांसाठी सुरु करण्यात आलेल्या शाळामध्ये आपल्या पाल्यांना पाठवायला सरदार मंडळी तयार होत नसत. महाराजांना हे लक्षात येताच त्यांना ही शिक्षण प्रवाहत सामील करून घेण्यासाठी या शाळेची स्थापना करण्यात आली होती. तर श्री. के. एन. जोगळेकर यांची शाळेच्या मुख्याध्यापकपदी नेमणूक करण्यात आली होती.तर बडोदा कॉलेजचे प्राचार्य टेट यांच्यावर शाळेच्या पर्यवेक्षणाच्या जबाबदारी देण्यात आली होती.या शाळेत गुजराती व मराठी मध्यम होते.प्रत्येक माध्यमाचे प्रत्येकी चार ते आठ वर्ग या शाळेत होते. महाराजांच्या सुरुवातीच्या काळातील या शाळांच्या परिस्थितीचा आढावा घेतला तर असे लक्षात येते कि,१८८२-८३ या वर्षात बडोदा राज्यात शासकीय व देशी भाषा शाळांची संख्या २०३ तर अनुदानातील देशी भाषा शाळांची संख्या २१ होती.या शाळांमध्ये अनुक्रमे २२३९६ व १२५० विध्यार्थी शिकत होते. या २०३ शासकीय शालापेकी १४ शाळा या मुलींच्या होत्या.[७]

**पटेल बोर्डिंग स्कूल :**

समाजामध्ये पटेल व मुखी यांचे स्थान महत्वाचे होते.राज्यातील सामाजिक व्यवस्थेत त्यंचा दबदबा होता. परेल तलाठी महत्वाच्या जबाबदाऱ्या ते पर पडत आसत. परंपरेने त्यांची मुलेही याचक्षेत्रात कार्यरत होती. त्यामुळे त्यांच्या भावी पिढीला हे काम करताना त्या कामाची योग्य ती माहिती व्हावी, यासाठी महाराजांनी अमरेल येथे पटेल व मुखी यांच्या मुलांसाठी पटेल बोर्डिंग स्कूल सुरु केले. ५० मुलांची सोय या ठिकाणी होती.[७]

**माध्यमिक शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणावरही महाराजांचे लक्ष होते. प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाचा पर्याय राहावा यासाठी आवश्यक ती यंत्रणा राज्यात उभी करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने महाराजांनी माध्यमिक शाळा सुरु करण्यावर भर दिला. बडोद्यामध्ये बडोदा हायस्कूल ही एक उत्तम काम करणारी शाळा होती. या शाळेची स्थापना १८७१ मध्ये करण्यात आली होती. या शाळेने स्थापनेपासून समाजांमध्ये आपले एक उत्तम असे स्थान निर्माण केले होते. त्यामुळे सातत्याने या शाळेची विद्यार्थी संख्या वाढत होती. १८७७-७८ मध्ये या शाळेत प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या ३२७ होती श्री टेट यांच्या नेतृत्वाखाली या शाळेची वाटचाल चांगली सुरु होती.[८]

या शाळेत उत्तम शिक्षक वर्ग यावा यासाठी प्रयत्न करण्यात आले. नामांकित शिक्षणतज्ञ श्री.एच लिटल हेड यांची बडोदा हायस्कूलच्या उपप्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली, त्यांच्या काळखंडात या शाळेची खूप भर भराट झाली.

बडोद्यामध्ये सर कोवसजी जहागीर नवसारी झरतोस्ती मदरसा सुरु करण्यात आलेला होता. या शाळेत मॅट्रक्युलेशन पर्यंत शिक्षणाची सोय करण्यात आली होती. सरकारच्या वतीने सुरुवातीला २६०० रू इतके अनुदान या शाळेस मिळत असे. शहरातील पारसी समाज्यातील विध्यार्थी या शाळेत शिकत असत. द पाटण अंगलो व्हर्नाक्युलर स्कूलची स्थापना जुलै १८७९ मध्ये करण्यात आली. १८९५ मध्ये इतहेसिंग इंग्लिश इन्स्टिट्यूट नोदणीकृत संस्था म्हणून सुरु झाली होती.

नवसारी प्रांतातील पलसाना तालुख्यात गंगाधर येथील लोकांनी सरकारकडे विनंती केल्याने त्यांच्या मुलांसाठी निवासी हायस्कूल सुरु करावे अशी विनंती प्रस्ताव स्वीकारत गंगाधर मिस्क्ड स्कूल या नावाने शाळा सुरु करण्यास मान्यता दिली. पुढे ही शाळा हायस्कूलमध्ये रुपांतरीत झाली.[९]

**उच्च शिक्षण :**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबरच महाराजांनी उच्चशिक्षणासाठी आपल्या राज्यामध्ये सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले.१८७९-८० या वर्षातच बडोद्यात व्हर्नाक्युलर कॉलेज ॲड सायन्स सुरु करण्यात आले. सुरुवातीला डॉ.शमसुद्दीन सुलेमान हे संस्थेचे प्राचार्य होते.मेडीसीन इंजिनीअरिंग कायदा इंग्रजी आणि संस्कृत असे विषय या संस्थेत शिकविले जात.त्यासाठी अभ्यासू आणि कार्यक्षम असा शिक्षक वर्ग नियुक्त करण्यात आला. १८८० मध्ये या कॉलेजमध्ये ४८ विद्यार्थी शिकत होते.

**बडोदा कॉलेजची स्थापना :**

बडोदा कॉलेजची स्थापना १८८१ मध्ये करण्यात आली होती.जानेवारी १८८१ मध्ये बडोदा कॉलेजमध्ये दोन शाखा सुरु करण्यात आल्या. त्यात कला शाखा ही पूर्वीप्रमाणे प्रीव्हीयस एक्झामिनेषन पर्यंत (पी.ई.) होती. तर विज्ञान शाखा बी.एसी. प्रथम वर्ष परीक्षेपर्यंत होती. पीई वर्गातील संख्या ३९ इतकी होती.हे कॉलेज बॉम्बे विद्यापीठाच्या कला व विज्ञान आणि कायदा शाखेला जोडण्यात आले होते. महाराजांचे पूर्वीपासूनच या उभारणीवर व्यक्तिगत लक्ष होते. भारतातील एक दर्जेदार कॉलेज म्हणून बडोदा कॉलेजचा नावलौकिक व्हावा यासाठी त्यांनी कसलीही कमतरता पडू दिली नाही. अतिशय भव्य अशी या कॉलेजची इमारत उभारण्यात आली. १८९० मध्ये या कॉलेजला बॉम्बे विद्यापीठाकडून मान्यता देण्यात आली. हे कॉलेज प्रयोगशाळा, ग्रंथालय व इतर शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज होते. कॉलेजच्या परिसरातील भव्य असे मैदान आणि टेनिस कोर्टची सोय केली होती. उच्च शिक्षण घेण्यसाठी बाहेरून आलेल्या विध्यार्थ्यांच्या निवासाचा प्रश्न सोढवण्यासाठी वस्तीगृह बांधण्यात आले होते. समाजप्रबोधनाबरोबरच शिष्यवृत्ती अर्थसहाय्य आणि नोकरीमध्ये त्यांचा प्राधान्याने विचार होईल अशी तरतूद त्यांनी केली होती. कॉलेजमध्ये चांगले प्राध्यपक रजू व्हावेत असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी त्यांनी बडोदा कॉलेजमध्ये अनेक तज्ञ प्राध्यापकाना रजू करून घेतले होते.[१०]

**शेतकी विभाग :**

१८८९ मध्ये महाराजाच्या आदेशाने बडोदा कॉलेजमध्ये स्वतंत्र शेतकी विभाग सुरु करण्यात आला. या विभागासाठी तज्ञ शिक्षकाच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. विध्यार्थ्याना प्रायोगिक शेतीचे धडे मिळावे यासाठी विभागाची स्वतत्र्य शेती होती. बॉम्बे विद्यापीठाची या विभागाच्या कोर्सला मान्यता होती. हा कोर्स पूर्ण करणाऱ्या विध्यार्थांना शेतकी पदविका प्रदान केली जात असे. हा कोर्स तीन वर्षाचा होता. शेतकी अभ्यासाशिवाय रसायनशास्त्र बॉटनी जीऑलॉंजी, फिजीऑलॉंजी, गणित, भूसर्वेक्षण आणि व्हेटननरी असे विषय या कोर्स मध्ये घेतले जात असत. यासाठी उच्च दर्ज्याच्या प्रयोगशाळा स्थापना करण्यात आल्या होत्या. या कॉलेजला ८० एकर शेती होती. इथे मातीची विविध प्रकार उपलब्ध होते. त्यांचा उपयोग प्रायोगिक शेतीसाठी करण्यात येत असे. दोन वर्ष मेहनत करून ही शेती तयार करण्यात आली होती.

**बडोदा विद्यापीठ :**

बडोदा कॉलेज चागल्या रीतीने कार्यरत झाल्यानंतर महाराजांनी बडोद्यात विद्यापीठ स्थापना करण्याचा विचार होता. १९२६ मध्ये प्रो.विडगेरी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केली. १९२६ मध्ये च लॉर्ड रीडिंग यांनीच संस्थेचे भूमिपूजन केले होते. तेव्हापासूनच विद्यापीठ स्थापनेच्या विचारांना अधिक बळकटी मिळाली. बॉम्बे युनिव्हर्सिटी रिफॉर्म कमिटीने गुजरात प्रांतासाठी स्वतत्र विद्यापीठ स्थापण्याची शिफारस करण्यात आली होती.२४ सप्टेंबर १९२६ रोजी बडोद्यात विद्यापीठ स्थापना करण्यासाठी औपचारिक रीतीने विद्यापीठ आयोग स्थापना केल्याची घोषणा केली. मार्च १९२७ मध्ये कच्चा मसुदा तयार केला. मात्र सयाजीराव महाराजांच्या ह्दयातील विद्यापीठ औपचारिकरित्या स्थापना होऊ शकले नाही. महाराजांना त्यांचे नातू श्रीमंत महाराणा सर प्रतापसिंगराव गायकवाड यांनी आपल्या आजोबांच्या इछेप्रमाणे १९४९ मध्ये बडोदा विद्यापीठ स्थापना केले. या विध्यापीठाला सयाजीराव महाराजांचे नाव देण्यात आले.[११]

**कलाभवनाची स्थापना :**

सयाजीराव महाराजांनी आपल्या कारकिर्दीत बडोद्यात उभी केली. ही सर्वात महत्त्वाकांक्षी शैक्षणिक संस्था म्हणावी लागेल. महाराजांची दूरदृष्टी आणि आधुनिक विचारसरणीचे मूर्तीमंद उदाहरण म्हणजे कलाभवन होय. या संस्तेची स्थापना १८९० मध्ये करण्यात आली होती. या संस्थेला हाउस ऑफ आर्ट्स अँड टेक्नोलॉजी असेही म्हणत असत. त्याकाळी कलाभवन ही बडोदा राज्यातील आणि कदाचित भारतातील एकमेव संस्था होती. जि राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यासाठी आवश्यक ते कौशल्यपूर्ण मनुष्यबळ तयार करण्यसाठी उभारलेली संस्था होती.[१२]

**निष्कर्ष :**

- ❖ आधुनिक भारताच्या इतिहासावर ज्या राज्यांनी आपल्या कार्याची आमच्या सोडली त्यात बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.
- ❖ महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राज्यात पूर्व प्राथमिक स्तरापासून ते विद्यापीठ स्तरापर्यंत अतिशय सक्षम अशी शिक्षण यंत्रणा उभारली.
- ❖ शक्तिशाली मोफत शिक्षणाचा कायदा राबविणारे बडोदा हे देशातील पहिले राज्य ठरले.

ISSN No. 2394-5990

- ❖ शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामाचा विचार करता शिक्षणाचा सर्वांगीण विचार करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे शिक्षण तज्ञ होते असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरले.
- ❖ राज्यातील शिक्षण व्यवस्थेची उभारणी करताना महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी समाजातील प्रत्येक प्रत्येक घटकाच्या शिक्षणाचा विचार केला होता.
- ❖ महाराजा सयाजीराव गायकवाड यांची दूरदृष्टी आणि आधुनिक विचारसरणीचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे किंवा महत्वकांशी शैक्षणिक संस्था म्हणजे कलाभवन ही संस्था होय (१९३०).
- ❖ कलाभवनातील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कामाचा अनुभव मिळावा यासाठी नजरपागा वर्कशॉप सुरू करण्यात आले होते.
- ❖ कलाभवनाच्या धरतीवर जिल्हा औद्योगिक शाळा या संस्थेची उभारणी केली.
- ❖ प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाबरोबरच महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी उच्च शिक्षणासाठीही आपल्या राज्यांमध्ये सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले

**संदर्भ ग्रंथ :**


१) हिंगुराव, शेतकऱ्यांचा मुलगा ते राजा, उत्तुंग प्रवास महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण, शाकेत प्रकाशन पृ.क्र.३१.

२) शर्मा, ईप्सित, बडोदरा, विशेषांक पृ-१६.

३) सयाजीराव महाराजांचे शैक्षणिक कार्य पृ-९१.

४) डमिनिस्ट्रेटिव्ह रिपोर्ट १९७७-७८-परि-३६१.

५) डमिनिस्ट्रेटिव्ह रिपोर्ट १८९३-९४-मोहा क्र.२२१

६) देवता निलांवर-बडोदा-संस्कार नगरीचे जनक, ईप्सित ब्रह्मदेश विशेषांक

७) तायडे महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा-शिक्षक - खंड -२५,उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन -२०२०

८) डमिनिस्ट्रेटिव्ह रिपोर्ट १८७७-७८

९) डमिनिस्ट्रेटिव्ह रिपोर्ट १९०१-०२ १९०२-१९०३-पृ-१७७

१०) डमिनिस्ट्रेटिव्ह रिपोर्ट १८७७-७८

११) सायडे विशाल बडोदा संस्कार नगरीचे जनक ईप्सिल बडोदरा -विशेषांक -पृ.३२

१२) शहा-कला भुवन आणि हुन्नर उद्योगाचे शिक्षक-गौरव गाथा-युग पृ.२४४.


■■■

# आदर्शभूत व लोकोत्तर महाराजा : सयाजीराव गायकवाड

**प्रा. डॉ. जवाहर लक्ष्मण मोरे**
संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप.

**प्रस्तावना :**

११ मार्च १८६३ रोजी महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील कवळाणे या गावी झाला. महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजरात मधील बडोदा संस्थानचे राजे होते. वडील काशिराव गायकवाड हे शेती करत होते. त्यांना आनंदराव , गोपाळराव आणि संपतराव अशी तीन मुले होती. पुढे गोपाळराव ऊर्फ सयाजीराव गायकवाड हे संस्थानचे राजे बनले.संस्थानिक म्हणून कार्य करत असताना आपला अधिकार आणि सत्ता यांचा वापर सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी करणारे जे काही मोजके संस्थानिक होऊन गेले. त्या संस्थानिकामध्ये सयाजीराव गायकवाड यांचे नाव घ्यावे लागेल. खरं तर सयाजीराव गायकवाड यांना संस्थानिक हे पद वारसा हक्काने मिळाले नव्हते तर ते दत्तकरुपाने आले होते. इ.स. १८७० मध्ये बडोदा संस्थानचे तत्कालीन राजे खंडेराव गायकवाड यांचे निधन झाल्यानंतर त्यांना पुत्र नसल्याने खंडेरावांचे बंधू मल्हारराव गायकवाड हे बडोद्याच्या गादीवर बसले पुढे इंग्रजांनी मल्हाररावांना राजकारण करून गादीवरून काढून टाकले काही काळ आपला कारभार इंग्रजांनी आपल्या हाती घेतला पुढे खंडेराव गायकवाड यांच्या विधवा पत्नी जमनाबाई यांनी सरकारकडून दत्तक घेण्याचा अधिकार मिळवून त्यांनी काशीराव गायकवाड यांचा मुलगा गोपाळराव यास २७ मे १८७५ रोजी दत्तक घेतले आणि त्याचे नाव सयाजीराव ठेवले. अशाप्रकारे सयाजीराव गायकवाड हे बडोदा संस्थानचे राजे बनले. त्यानंतर त्यांनी विविध क्षेत्रातील रितीरिवाज, राजकारणातील धडे, राज्यकारभारातील बारकावे, यासारख्या अनेक गोष्टी आत्मसात केल्या. त्यांनी आपल्या सत्तेचा वापर प्रजेच्या कल्याणासाठी केला. लोकहिताची कामे केली. अनेक सुधारणा घडवून आणल्या. राज्यातील गोरगरीब प्रजेचे हित जोपासले. एवढेच नव्हे तर महाराजांनी प्रजेचे हित जोपासत असताना आपले व्यक्तिमत्व अनेक पैलूंनी घडवल्याचे दिसून येते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू वाखाणण्याजोगे आहेत. त्याचीच माहिती या लेखाच्या आधारे देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**महाराजांची दिनचर्या :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे व्यक्तिमत्व आणि चरित्र हे आदर्शभूत आणि लोकोत्तर झालेले होते त्यामुळे मला येथे त्यांच्या दिनचर्येची माहिती देणे यथायोग्य वाटते. संपत्ती, संतती, दीर्घायुष्य आणि यशस्वी कर्तृत्व हे त्यांच्या दिनचर्येमुळेच यशस्वी झाले आहे असे म्हणता येईल. जनरल नानासाहेब शिंदे यांच्या मते महाराज हे सकाळी सूर्योदयाबरोबरच ते झोपेतून उठायचे. प्रात: विधी, व्यायाम, बाहेर फेरफटका हे त्यांचे नित्यनेमाने चाललेले असायचे. नऊ वाजता राजवाड्यात आल्यानंतर खाजगी वाचन, अभ्यास वगैरे करायचे.११ वाजता त्यांचे भोजन होत असे. भोजनानंतर आपल्या कामास सुरुवात करीत. लोकांच्या भेटी घेणे.. आश्रीत मंडळींशी चर्चा करणे पुन्हा रात्री भोजनानंतर अकरा पर्यंत वाचन करत.[१] हे सर्व करीत असताना प्रजेचे हित डोळ्यासमोर होते म्हणूनच ते दिनचर्येतील एकही क्षण वाया न घालवता नित्यनेमाने आपापले काम चोख बजावत होते. हीच त्यांची कामाची हातोटी इतरांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

**ज्ञानपिपासूवृत्तीचे महाराजा :**

खरं तर महाराजांचे बौद्धिक शिक्षण पाच वर्षात पूर्ण झाले. मराठी, गुजराती, उर्दू व इंग्रजी या भाषेचा अभ्यासही त्यांनी केला होता. दररोज काही ना काही वाचन केल्याशिवाय त्यांचा दिवस संपत नसे. राज्यकारभार सांभाळत शिक्षण घेणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते . वेगवेगळ्या तज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन करून ते ज्ञान संपादन करीत असत. त्यामुळे त्यांची ज्ञानपिपासूवृत्ती आणि जिज्ञासूवृत्ती वाढली होती. महाराज स्वतःला मी आजन्म विद्यार्थीच आहे असे समजत असत. त्यामुळे ते प्रत्येक विषय जाणून घ्यायचे अगदी शास्त्री विषयातही त्यांनी पारंगतचा दाखवली होती. त्यामुळे त्यांचा व्यासंग वाढला होता. माणसांना ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र ,निवारा या मूलभूत गरजा लागतात त्याप्रमाणे वाचन ही अत्यावश्यक गरज असल्याचे ते कायम बोलून दाखवत. वाचन आणि लेखन ही कौशल्ये आत्मसात केल्यामुळे महाराजांचे अक्षर ही खूप सुंदर आणि

ISSN No. 2394-5990

वळणदार होते. वाचलेल्या पुस्तकावर नोट्स काढणे हाही छंद त्यांना जडला होता. या ज्ञानपीपासू वृत्तीचा उपयोग त्यांनी राज्यकारभार सुरळीत चालवण्यासाठी आणि शैक्षणिक सुधारणा , सामाजिक सुधारणा यासाठी केला. सर्व धर्माच्या धर्मग्रंथांचे आणि प्रत्येक धर्मातील पुस्तकांचे मराठी गुजराती भाषेत भाषांतर करून घेतले होते. त्याचा उपयोग धार्मिक , सामाजिक सुधारणा व चांगल्या प्रशासनाशी सांगड घालण्याचा चांगला प्रयत्न केला होता. संत तुकाराम हे महाराजांचे आवडते संतकवी होते. तुकारामांच्या तुकाराम गाथेचे पारायण त्यांनी अनेक वेळा घातले होते. ही ज्ञानपीपासू वृत्ती सद्यस्थितीत अध्ययन करणाऱ्या पिढीला निश्चितच प्रोत्साहित करणारी आहे असे मला वाटते..

**साधी राहणी उच्च विचारसरणी :**

महाराजा असून देखील सयाजीराव गायकवाड यांनी यांची राहणी अगदी साधी होती आणि विचारसरणी मात्र उच्च दर्जाचे होती. ते अतिशय साधी कपडे घालत असत रेशमी किंवा खादीचे कपडे हे केव्हा तरी घालत असत पण डोक्यावर पागोटे असणे हा त्यांचा नित्य नियम होता. देशी माणसाने आपले शिरस्त्राण नेहमी डोक्यात घालावे , याबद्दल महाराज हे कायम दक्ष असायचे.त्यामुळे स्वतः देखील डोक्यावरून पागोटे हे कधीच विसरत नसत.तसेच त्यांचे जेवण खाणे अगदी साधे असायचे. साधी बाजरीची भाकरी त्यांना आवडत असे. कित्येक वेळा त्यांचा परदेशी दौरा झाला असला तरी त्यांनी परदेशी खाद्यपदार्थास पसंती दिली नाही किंवा कधीही मद्यसेवन केले नाही हे विशेष म्हणावे लागेल. म्हणूनच महाराजा सयाजीराव गायकवाड हे बडोद्यातील एक अजब कर्तृत्ववान विभूती म्हणून सर्व हिंदुस्तानभर त्यांची प्रसिद्धी झाली होती. म्हणून जनरल नानासाहेब शिंदे यांनी त्यांचा उल्लेख विसाव्या शतकातील एक अद्वितीय नररत्न केला आहे हे अगदी बरोबर आहे.

**वक्तशीरपणा आणि कामसू व्यक्तिमत्व :**

जे काम हाती घेतले आहे ते काम अगदी वेळेत करणे यात महाराजांचा हातखंडा होता. त्यामुळे स्वीकारलेले काम तडीस नेणे आणि दिलेल्या निर्धारित वेळेत करणे हा गुण महाराजांकडे होता. त्यामुळे राज्यकारभारातील प्रत्येक कामे ही त्याचदिवशी केली जात असत. कामाच्या निमित्ताने काही प्रश्न , अडचण शंका निर्माण झाल्यास त्याही चुटकीसरशी सोडवल्या जातात. मुळात त्यांच्या दिनचर्येतच नियमित आणि नेमस्तपणा होता. शिवाय महाराजांना शिस्तही तितकीच प्रिय होती. त्यामुळे प्रत्येक काम ठरवून वेळेतच पूर्ण करायचे. रात्री झोपताना एखादं काम आठवले आणि ते उद्या आपल्याला करायचे आहे तेव्हा ते काम रात्री वहीमध्ये लिहून ठेवत आणि सकाळी त्या कामाचा निपटारा करत असत हा ही एक गुण उल्लेखनीय असे म्हणावे लागेल कारण सध्याचे लोक वेळेची कदर न करणारे आणि कायम काम टाळण्यात पटाईत असणारे आहेत त्यांना महाराजांच्या या महत्त्वाच्या गुणांनी दिलेली चपराक आहे असे म्हणावे लागेल.

**समारोप :**

अशाप्रकारे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलघडता येतील. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येक पैलू चा उपयोग प्रशासन चालवण्यासाठी धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक सुधारणांसाठी केला. त्यामुळेच पुरोगामी महाराष्ट्राला महाराजांच्या योगदानाची कदर आहे. कारण शाहू, फुले, आंबेडकर यांच्याप्रमाणेच महाराजा सयाजीराव गायकवाड यांचेही तितकेच योगदान आहे. म्हणून दिनेश पाटील यांचे बडोदा हे महाराजांमुळे महाराष्ट्रातील सर्वांगीण सुधारणांचे ऊर्जा केंद्र आहे हे विधान यथायोग्य असल्याचे वाटते. २ या सर्व गोष्टीवरून महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे विविध क्षेत्रातील सुधारणावादी कार्य हे निश्चितच उल्लेखनीय आहे त्याचे बाळकडू खऱ्या अर्थाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतात. राज्यकारभारात विविध कौशल्य वापरणे, धार्मिक, सामाजिक सुधारणा याकडे प्राधान्यक्रमाने लक्ष देणे. त्याचबरोबर बाबा भांड यांच्या हिंदी लेखात देश आणि परदेशात दौऱ्यानिमित्त फिरत असताना तेथील कला ,साहित्य, संस्कृती पाहिली होती आणि मानवी कल्याणासाठी या गोष्टी आवश्यक आहेत याची त्यांना जाणीव झाली म्हणून त्यांनी बडोदा संस्थांनात देखील साहित्य, शिल्प, संगीत, चित्र ही समृद्धी आणि प्रगतशील जीवनाच्या संवर्धनाची अंगे आहेत हे लक्षात घेऊन त्याचे शिक्षण देणे सुरू केले. अशी माहिती आढळते.[३] अशा या मानव कल्याणकारी महाराजांनी कित्येक कलाकारांना राजाश्रयही दिला होता. हेही नसे थोडके..!

**संदर्भ :**


१) संपादक राजेंद्र मगर : सयाजीरावांचे जागतिक वेगळेपण, भाग तीन, खंड अठरा, सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०२० पृष्ठ क्र. १६२

२) दिनेश पाटील : धर्म आणि सामाजिक, खंड २५, भाग ७ पृष्ठ क्र.२१७

३) संपादक बाबा भांड : महाराजा सयाजीराव युगपुरुष की गौरव गाथा, भाग एक, खंड २२ पृष्ठ क्र.४५

४) संकेतस्थळावरील महाराजा सयाजीराव गायकवाड यांची माहिती


■■■

# 'महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य'

**प्रा.बप्पासाहेब रामलिंग शेजूळ**
सहायक प्राध्यापक
के.एन.भिसे आर्टस्, कॉमर्स अँड-
विनायकराव पाटील सायन्स कॉलेज, विद्यानगर, भोसरे.
Email Id - bappasahebshejul71@.com
Mobile No. 9404250329

**सारांश :**

आधुनिक भारताच्या इतिहासातील एक अग्रगण्य नाव म्हणजे महाराज सयाजीराव गायकवाड होत. त्यांनी बडोदा संस्थानाचे शिक्षणाच्या माध्यमातून रूप पालटवले. संस्थानात शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे बडोदा हे देशातील सर्व क्षेत्रामध्ये आधुनिक असलेले राज्य म्हणून गणले गेले आहे. ते एक दूरदृष्टी असलेले, कर्तृत्ववान, प्रजाहितदक्ष, लोककल्याणकारी, व पुरोगामी विचाराचे राजे होते. तत्कालीन संस्थानाच्या तुलनेत बडोदा संस्थान हे सुधारणाच्या बाबतीत पुढारलेले होते. याचे श्रेय महाराजांच्या शैक्षणिक कार्याला द्यावे लागेल. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून सन १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना देण्यात आला होता. तसेच बडोदा मॅनेजमेंट असोशिएशन ने सन २०१३ मध्ये 'सयाजीरत्न' पुरस्कारची घोषणा केली.

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या इतिहासात १९ वे शतक विशेष महत्वाचे मानले जाते. या काळात पूर्ण भारतभर सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणांचे वारे वाहत होते. इंग्रजांनी भारतात फोडा व झोडा तथा साम, दाम, दंड, भेद, याचा वापर करून आपले बस्तान बसविले. त्यांनी भारतीय संस्कृती, धर्म, भाषा, समाज, रीतीरिवाज, परंपरा, इत्यादींना मागास मानून वर्णद्वेषी भूमिका घेऊन 'काळा व गोरा' अश्या प्रकारचा भेदभाव केला.

इंग्रजांच्या प्रभावामुळे पाश्चात्य शिक्षण घेऊन अनेक भारतीय विचारवंत तथा सुधारकांचे दोन गट निर्माण झाल्याचे दिसते. यातील एका गटाने पाश्चात्य संस्कृती चा उदो-उदो करून भारतीय संस्कृती, धर्म, भाषा, समाज इत्यादींना मागास म्हणून हिणवले तर काहींनी पाश्चात्य शिक्षण घेऊन आपला धर्म, संस्कृती, भाषा, समाज यांच्यामधील दोष दूर करण्यासाठी पाश्चात्य शिक्षणाचे महत्व प्रतिपादन केले. त्याचबरोबर भारतीय संस्कृती, धर्म, भाषा, समाजातील दोष दूर झाल्याशिवाय आपला समाज प्रगत होणार नाही याची त्यांना जाणीव होती. त्यासाठी त्यांनी भारतीय शिक्षणाबरोबरच पाश्चात्य शिक्षण घेण्यासाठी भारतीयान आवाहन केले. त्यामध्ये राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, स्वामी दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, राजर्षी शाहू महाराज, महाराज सयाजीराव गायकवाड इत्यादींचा समावेश होतो. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी गुजरातमधील बडोदा संस्थानात देशात सर्वप्रथम मोफत व सक्तीच्या शिक्षणाची घोषणा करून त्याची योग्य ती अंमलबजावणी केल्याचे दिसते.

**उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचे महत्व प्रतिपादन करणे.
२. सयाजीरावांच्या शिक्षण विषयक कार्याचा आढावा घेणे.
३. बडोदा संस्थानातील तत्कालीन काळातील शैक्षणिक स्थितीचे वर्णन करणे.

**व्याप्ती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक सुधारणांशीच मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती,विश्लेषण व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**गृहितके :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणविषयक विचार महत्वपूर्ण आहेत.
२. मानवी व सामाजिक विकासाच्या दृष्टीकोनातून महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक सुधारणा आजच्या काळातही उपयुक्त आहेत.

ISSN No. 2394-5990

**विषय प्रवेश :**

१९ व्या शतकातील एक महान समाजसुधारक तथा बडोदा संस्थानचे राजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख केला जातो. कुठलीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना त्यांनी आपल्या कार्य-कर्तृत्वाने आधुनिक भारताच्या इतिहासाला दखल घेण्यास भाग पाडले. एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा नामोल्लेख केला जातो. त्यांनी आपल्या संस्थानातील सामान्य माणसाच्या जीवनात शिक्षणाच्या माध्यमातून अमुलाग्र बदल घडवून आणले.

**अ. बालपण व शिक्षण :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक लोककल्याणकारी राजे होते. त्यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी खानदेशातील कवळाणा या ठिकाणी झाला. त्यांचे मूळ नाव गोपाळराव असे होते. श्रीमंत काशीराव भिकाजीराव गायकवाड हे त्यांचे वडील तर उमाबाई ह्या त्यांच्या आई होत्या. काशीरावाना तीन मुले होती. त्यांची आनंदा, गोपाळ व संपत अशी नावे होती. काशीरावांचा संबंध बडोद्याचे तत्कालीन महाराज मल्हारराव गायकवाड यांच्याशी होता. त्या दृष्टीने ते मदतीच्या अपेक्षेने बडोद्याला आले मात्र त्यांना मल्हाररावानी कसलीही मदत केली नाही. त्यामुळे काशीराव हे आपल्या कुटुंबासहित शेती करून आपले पोट भरू लागले. मात्र नियतीला काहीतरी वेगळेच मान्य होते. या काळापर्यंत ब्रिटीशांचे साम्राज्य सर्व भारतभर पसरले होते. त्यांनी वेगवेगळी धोरणे राबवून भारतातील संस्थाने खालसा केली. त्यामुळे भारतीयांनी ब्रिटीशांच्या विरोधात १८५७ रोजी बंड पुकारले होते. तत्कालीन बडोदा संस्थानचे महाराज मल्हारराव गायकवाड यांच्या राज्यात गोंधळ, अव्यवस्था, भ्रष्टाचार यांचे कारणपुढे करून ब्रिटीशांनी मल्हाररावाना अटक केली. त्यामुळे बडोदा संस्थानचे राजपद रिकामे झाल्याने बडोद्याचा पुढील महाराज कोण या दृष्टीने शोध घेण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्या दृष्टीने इंग्रजांनी शोध घेऊन गायकवाड घराण्याचा वारस शोधून काढला. आणि मल्हारराव गायकवाड यांचे उत्तराधिकारी म्हणून महाराणी जमनाबाई यांनी काशीराव यांच्या गोपाळराव या मुलाची निवड केली. त्यानुसार त्यांनी कायदेशीरपणे २७ मे १८७५ दत्तक घेऊन त्याच दिवशी त्यांचा रितसरपणे राज्याभिषेक केला. अवघ्या १३ - १४ व्या वर्षीच सयाजीराव यांच्याकडे बडोदा संस्थान चा राज्यकारभार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. मात्र ते महाराज बनले असतानाही निरक्षर होते. त्यामुळे राज्यकारभाराबरोबरच त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची जबाबदारी संस्थानचे नवनियुक्त दिवाण सर टी. माधवराव यांच्यावर सोपवली. सयाजीराव यांच्या शिक्षणाच्या बाबतीत माधवरावांचे मोठे योगदान असल्याचे दिसून येते. स्वतः माधवरावांना अनेक भाषा अवगत होत्या, तसेच ते मद्रास विद्यापीठात प्राध्यापक होते. आणि त्यांनी चार-पाच संस्थानात काम केल्याने त्यांना कामाचा दांडगा अनुभव होता. अशा अनुभवी व्यक्तिमत्वाच्या मार्गदर्शनाखाली सयाजीरावांच्या विधिवत शिक्षणाला ७ जून १८७५ रोजी सुरुवात झाल्याचे दिसते. त्यांच्या प्राथमिक शिक्षणामध्ये मराठी व गुजराती भाषेचा समावेश होता. कारण राज्यकारभार हा मराठी व गुजराती भाषेमध्ये करावा लागणार होता. म्हणून त्यांचा प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी केशवराव पंडित व व्यंकटेश जोशी यांच्यावर होती. यांनी त्यांना मराठी भाषा शिकवली तर गुजराती भाषेचे ज्ञान त्यांना रात्नाराम मास्तर यांनी दिले.

महाराजांना देशी भाषे बरोबरच पाश्चात्य भाषेचे ज्ञान देण्यासाठी ब्रिटीशांच्या वतीने मि. इलियट या मुत्सद्दी व अनुभवी शिक्षकांची नेमणूक केल्याचे दिसते. त्यांनी महाराजांच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेऊन पाश्चात्य शिक्षांच्या धर्तीवर ङकायदा-सुव्यवस्था, संरक्षण, महसूल, प्रशासन, अर्थ, याबरोबरच इंग्रजी शिक्षण, विवेकनिष्ठ विचारसरणी, वैज्ञानिक दृष्टीकोन, नैतिकता, क्रीडा, कला, साहित्य, सौंदर्यदृष्टीचा विकास इत्यादी विषयावर भर दिल्याचे दिसते. त्यामुळे महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास झाल्याचे दिसते. महाराज हे हुशार, चाणाक्ष, बुद्धिमान व जिज्ञासू होते. त्यांच्या स्मरणशक्तीची प्रशंसा करताना मि. इलियट म्हणतात, ङते एकदा जे शिकतात त्यापैकी बहुतांश भाग विसरण्याचे नाकारतातफ त्यांच्या संपूर्ण शिक्षणाबद्दलच्या अनुभवाविषयी ते म्हणतात, महाराजांनी त्यांची एकही चूक काढण्याची संधी त्यांनी मला दिली नाही, त्यांच्या इतका चांगला आणि प्रेमळ विद्यार्थी दुसरा कोणीही मिळणार नाहीफ

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य :**

**अ. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण :**

आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी संस्थाना तील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेतला असता त्याना कळून आले कि, राज्यात सन १८७१ पर्यंत शैक्षणिक संस्था तर सोडाच शिक्षण विभाग सुद्धा अस्तित्वात नव्हता. महाराजांनी आपल्या ६४ वर्षाच्या कारकिर्दीत बडोदा संस्थानात शिक्षण व्यवस्थेची पायाभरणी करताना समाजातील सर्व घटकांच्या शिक्षणाचा समतापूर्वक विचार केल्याचे दिसते. त्यांनी प्रथमतः सन १८७१ मध्ये चार प्राथमिक शाळा सुरु केल्या. त्यामध्ये दोन मराठी व दोन गुजराती माध्यमाच्या शाळांचा समावेश होता असे दिसून येते. त्याचबरोबर महाराजांनी सन

१८७७-७८ मध्ये शिक्षण विभागावर १,०१,९९४/- रु.एवढा निधी खर्च केल्याची नोंद मिळते. (Administrative report -1877-78,n[a.361) महाराजांच्या या कार्यांमुळे बडोदा संस्थानात सन १८८१ पर्यंत १८० शाळा व ७४६५ विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची नोंद मिळते. (Administrative report - 1925-26) महाराजांना तळागाळातील सर्वसामान्यांना शिक्षण मिळाले पाहिजे याबद्दल मोठी तळमळ होती. आपले शिक्षण विषयक मत व्यक्त करताना ते म्हणतात, ङ्गप्रजा जर अशिक्षित राहिली तर रोजच्या राजकारणात, कारभारात, प्रशासनात, प्रजा बुद्धिपूर्वक सहयोग देवू शकणार नाही. परिणामतः आपले राज्य प्रगतीशील राज्य होऊ शकणार नाही. म्हणूनच समग्र राज्यातील स्त्री-पुरुष साक्षर व्हायला हवेतफ यासाठी त्यांनी इ.स.१८९३ मध्ये आपल्या संस्थानातील अमरेली विभागातील निवडक १० गावांमध्ये ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीच्या शिक्षणाची प्रायोगिक तत्वावर घोषणा केली. त्याचा परिणाम चांगला दिसून आल्यावर संपूर्ण बडोदा संस्थानात सन १९०६ मध्ये मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पारित केला. तत्कालीन काळातील एक महत्वपूर्ण व क्रांतीकारी निर्णय महाराजांनी घेतल्याचे दिसते. आज भारताला स्वातंत्र्याच्या ७० वर्षामध्ये जे करता आले नाही ते महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या बडोदा संस्थानात १०० वर्षापूर्वी केल्याचे दिसते. यावरून आपल्याला महाराजांची शिक्षणाबाबत ची तळमळ दिसते. तत्कालीन काळातील बडोदा संस्थान हे समकालीन ब्रिटीश भारतापेक्षा खूप पुढे असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर बडोदा संस्थान हे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार करणारे भारतातील प्रथम क्रमांकाचे बनल्याचे दिसते. यावरून महाराजांच्या शैक्षणिक दूरदृष्टीची प्रचीती येते. त्यामुळेच महाराजांबद्दल असे म्हटले जायचे कि, “what Baroda does today, India does tomorrow”. बडोदा संस्थान च्या शैक्षणिक प्रगतीमुळे पंडित मदनमोहन मालवीय यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा ‘हिंदुस्थानातील शेवटचा आदर्श राजा’ म्हणून गौरव केला आहे.

महाराज आपल्या संस्थानात एवढेच करून थांबले नाहीत तर प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी २१ शासकीय व २०३ अनुदानित शाळांची स्थापना केल्याचे दिसते. त्यामध्ये खालील शाळांचा समावेश होता - १. सरदार स्कूल २. अँग्लो इंडियन इन्स्टिट्यूट ३. औद्योगिक प्राथमिक शाळा ४. गणदेवी इंग्लिश स्कूल ५. सर कासवजी जहांगीर झारथोशी मदरसा ६. दादाभाई कोवासजी टाटा अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल ७. पटेल बोर्डिंग स्कूल इत्यादी.

वरिल शाळा महाराजांनी सुरु केल्या परंतु आर्थिक अडचणीमुळे होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास अडचण येवू नये म्हणून त्यांनी विविध शिष्यवृत्ती योजना सुरु केल्याचे दिसते. त्यामध्ये- १. सरकारतर्फे वार्षिक प्रत्येकी २८० रुपयाच्या ४२ शिष्यवृत्ती, २. मेरीट शिष्यवृत्ती (प्रत्येकी ४ रुपयाच्या) - ५, ३. जिम्नॅस्टिक्स शिष्यवृत्ती २० (प्रत्येकी ८ रुपये महिना), ४. मागास वर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती ८ (प्रत्येकी ४ व ८ रुपये महिना), ५. बडोदा कॉलेजच्या विविध परीक्षामध्ये यश मिळविल्याबद्दल १४ शिष्यवृत्ती (प्रत्येकी १४ ते २२ रुपये वार्षिक), ६. मेडिसिनचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २ शिष्यवृत्ती (प्रत्येकी २० रुपये वार्षिक), ७. मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर ३ शिष्यवृत्ती (प्रत्येकी २० रुपये वार्षिक), ८. महाराजांच्या व्यक्तिगत फंडातून ९८२८ /- च्या ६२ शिष्यवृत्ती इत्यादी दिल्याची नोंद मिळते.

**ब. उच्च शिक्षण :**

महाराजांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणालाही महत्वाचे मानले आहे. त्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केल्याचे दिसते. सन १८७९-८० ला त्यांनी बडोद्यात ‘व्हर्नाक्युलर कॉलेज ऑफ सायन्स’ सुरु केले. त्याचबरोबर सन १८८१ मध्ये ‘बडोदा कॉलेज’ ची स्थापना करून त्याला सन १८९० मध्ये बॉम्बे विद्यापीठाची मान्यता मिळवली. या महाविद्यालयांमध्ये सर्व सोयी सुविधा उपलब्द्ध करून देण्यावर महाराजांनी भर दिल्याची दिसते. कालांतराने याच ‘बडोदा कॉलेज’ चे रुपांतर बडोदा विद्यापीठात होवून सन १९४९ मध्ये त्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ असे नामकरण करण्यात आले.

महाराजांनी आपल्या कारकिर्दीत उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये निर्माण केलेली आणखी एक महत्वपूर्ण संस्था म्हणजे ‘कलाभवन’. ही संस्था म्हणजे महाराजांच्या दूरदृष्टी व आधुनिक विचारसरणीचे मूर्तिमंत उदाहरण होय. या संस्थेला ‘हाउस ऑफ आर्टस् अँड टेक्नोलॉजी’ असेही म्हटले गेले आहे. याची स्थापना सन १८९० मध्ये बडोदा या ठिकाणी झाली. ही संस्था तत्कालीन काळातील भारतातील एकमेव संस्था होती जी राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी व त्यासाठी कौशल्यपूर्ण मनुष्यबळ तयार करण्यासाठी उभारलेली होती. या संस्थेच्या माध्यमातून महाराजांनी राज्यातील तंत्रशिक्षणाला चालना दिली. यामध्ये खालील शाखा कार्यरत होत्या- १. स्कूल ऑफ आर्ट २. स्कूल ऑफ आर्किटेक्चर ३. स्कूल ऑफ मेकॅनिकल टेक्नोलॉजी ४. स्कूल ऑफ केमिकल ५. स्कूल ऑफ ॲग्रीकल्चर ६. स्कूल ऑफ पेडागॉजी इत्यादी.

 ISSN No. 2394-5990

संस्थानात प्रजेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संगीत, नाटक, नृत्य, कला, तसेच गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु केल्याचे दिसते. त्याचबरोबर राज्यात ज्ञानप्रसारासाठी ग्रंथालय चळवळ आणि फिरते वाचनालय उघडले. महाराजांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरु केलेल्या योजनांचा लाभ महाराष्ट्र राज्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनी घेतल्याचे दिसते. त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश होता.

**समारोप :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे बडोदा संस्थान चे राजे झाल्यानंतर एक राजा म्हणून त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य पहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, ते एक दूरदृष्टी असलेले, कर्तृत्ववान, प्रजाहितदक्ष, लोककल्याणकारी, व पुरोगामी विचाराचे राजे होते. तत्कालीन संस्थानाच्या तुलनेत बडोदा संस्थान हे सुधारणाच्या बाबतीत पुढारलेले होते. याचे श्रेय महाराजांच्या शैक्षणिक कार्याला द्यावे लागेल. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून सन १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना देण्यात आला होता. तसेच बडोदा मॅनेजमेंट असोशिएशन ने सन २०१३ मध्ये ङ्गसयाजीरत्नफ पुरस्कारची घोषणा केली होती.

**संदर्भसूची :**


१. Maharaja Sayajirao Gaikwad wikipediea. org.in
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सुधारणा भाग १ - विशाल तायडे.
३. भारतीय साहित्याचे निर्माते - महाराजा सयाजीराव गायकवाड - बाबा भांड.
४. बडोदा संस्कारनगरीचे जनक, देवता निलांबर, इप्सित वडोदरा विशेषांक.
५. Administrative Report - 1925-26
६. Administrative Report - 1877-78
७. हिंगुराव , शेतकऱ्याचा मुलगा ते राजा : उत्तुंग प्रवास.

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य

**१) डॉ. शिवाजी मारुती वाघमोडे**
इतिहास विभाग प्रमुख,
भारत महाविद्यालय, जेऊर
मो. ८७८८३८८८४७

**२) श्री. हनमंत भिमराव तेलसंग**
संशोधक विद्यार्थी,
पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ,सोलापूर
मो. ९९७५९७८२२४
email-hanumanttelsang@gmail.com

**प्रस्तावना :**

आपल्या भारतामध्ये अनेक संस्थानिक झाले. यांमधील काही संस्थानिक हे सामान्य जनतेच्या कल्याणासाठी प्रयत्न करीत होते, यामध्ये सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमावर येते. त्यांनी आपल्या कार्यामधून लोक कल्याणकारी योजना राबविल्या. सयाजीरावांच्या कालखंडामध्ये महाराष्ट्रात समाज सुधारणा करणे खूपच गरजेचे होते, ती गरज महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी भरून काढली. समाजकार्य आणि शैक्षणिक कार्य करीत असताना अनेकांना मदत करून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शैक्षणिक आणि सामाजिक कार्य केले. त्यामुळे सयाजीराव गायकवाड यांच्या कारकिर्दीमध्ये अनेक लोकांना चांगल्या योजना उपलब्ध झाल्या. सामाजिक कार्याचे भान असणारे तत्काळामध्ये अनेक लोक होते, मात्र यामध्येही शैक्षणिक आणि सामाजिक कार्य करण्यामध्ये सयाजीराव गायकवाड यांनी केलेले कार्य उठून दिसते.

अनेक इतिहासकारांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जीवना विषयी लेखन केलेले आहे. यामध्ये दा.ना. आपटे यांनी म्हटलेले आहे की, गायकवाड यांचे मूळ गाव हे भरे होय. तालुका हवेली आणि जिल्हा पुणे हे होय.[१] लेखक य. रा. दाते यांच्या मते पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यामधील दावडी हे गायकवाड यांचे मूळ गाव होय.[२] गौतम निकम आणि बाबा भांड यांनीही याप्रमाणेच आपले मत व्यक्त केलेले आहे. यावरून सयाजीराव गायकवाड महाराजच्या मूळ गावावरून लेखकांमध्ये अनेक मतभेद आहेत. दा.ना. आपटे यांनी आपले मत मांडत असताना बडोदा येथील राजपत्रामधील ऐतिहासिक वेचे भाग १, पृष्ठ ७ चा आधार दिला आहे. यानुसार भरे हेच गायकवाड यांचे मूळ गाव आहे, असे त्यांनी सांगितलेले आहे. गंगाधर गाडगीळ, का.ना. गोत्री, ब. न. फाटक, दा.वि. नेने, बेलसरे चंद्रलेखा, अग्निहोत्री गणेश, उल्हास पाटील यांनी सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांच्या जीवन कार्य चरित्राची सुरुवात ही खंडेराव गायकवाड महाराजांपासून सुरू केली आहे.

**जन्म :**

नाशिक जिल्ह्यामधील कळावणे या ठिकाणी ११ मार्च, १८६३ रोजी सयाजीरावांचा जन्म झाला. त्यांचे पिता काशिराव गायकवाड हे कळावणे या ठिकाणी शेती व्यवसाय करीत होते. काशीराम गायकवाड यांना तीन मुले होते. आनंदराव, गोपाळराव आणि संपतराव अशी ही तीन मुले होय. मात्र त्यांचा बडोदा या ठिकाणी असणाऱ्या गायकवाड घराण्याबरोबर संबंध होता. खंडेराव गायकवाड हे बडोदा संस्थानचे राजे होते. त्यांचे इ.स.१८७० मध्ये निधन झाले, मात्र त्यांना औरस पुत्र नव्हता. यामुळे त्यांचे बंधू मल्हारराव गायकवाड हे बडोदाच्या गादीवर बसले. मात्र बडोद्याचे त्या काळातील रेसिडेंट असणारे कर्नल फ्रेयर आणि मल्हारराव यांच्यामध्ये कलह झाला. यामुळे मल्हाररावांना दुर्वर्तनाच्या आरोपावरून इंग्रजांनी त्यांना बडोद्याच्या गादीवरून काढले आणि बडोदा संस्थांचा कारभार काही काळासाठी आपल्या हाती घेतला.[३] परंतु संस्थानातील जनतेचे खूप हाल झाले. यामुळे जमनाबाई या खंडेराव गायकवाड यांच्या विधवा पत्नीने हिंदुस्तानच्या सरकारकडून दत्तक पुत्र घेण्याचा अधिकार मिळविला, यानंतर दत्तक पुत्र घेण्यासाठी शोध मोहीम चालू झाली. आपल्या संबंधात असणारे कळावणेचे काशीराव गायकवाड यांचा दुसरा मुलगा गोपाळराव यांना दिनांक २७ मे, १८७५ रोजी बडोद्याच्या गायकवाड घराण्यासाठी दत्तक घेतले आणि त्यांचे नामांतर करून त्यांचे सयाजीराव असे नाव ठेवले. याप्रमाणे सयाजीराव हे बडोदा संस्थानचे गायकवाड घराण्याचे राजे बनले. सयाजीरावांचे सर्व बालपण हे खेडेगावांमध्ये गेले होते.[४] खेडेगावातील शेतीचे वातावरण आणि घरातील हालाखीची परिस्थिती, यामुळे त्यांना शिक्षण मिळाले नाही. मात्र बडोदा संस्थांमध्ये दत्तक गेल्यानंतर त्यांच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली. सयाजीरावांनी वेगवेगळ्या

ISSN No. 2394-5990

भाषांचे ज्ञान घेतले उदा. मराठी, इंग्रजी, गुजराती आणि उर्दू या भाषांचे त्यांनी उत्तम ज्ञान घेतले. राज्यकारभाराचे शिक्षण, घोडेस्वारी, राजघराण्यातील रीतीरीवाज या बाबींना महत्त्व देण्यात आले. सयाजीरावांना राजकारणाचे धडे देण्यासाठी बडोदा संस्थांचे त्यावेळचे दिवाण राजा सर टी. माधवराव यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. २८ डिसेंबर, १८८१ रोजी सयाजीराव गायकवाड यांचा राज्याभिषेक झाला. त्यांच्या ६४ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी सदैव प्रजेच्या कल्याणाचे कार्य केले, वेगवेगळी लोकोपयोगी कामे केली. वेगवेगळ्या सुधारणा केल्या अनेक व्यक्तींना सहाय्य केले. गरीब प्रजेकडे लक्ष देऊन 'प्रजाहितदक्ष' राजा असा त्यांनी लौकिक संपादन केला.[५] बडोदा संस्थानामध्ये त्यांनी राज्य यंत्रणेमध्ये सुरळीतपणा आणला. प्रथम त्यांनी राज्ययंत्रणेमध्ये प्रशासकीय जबाबदारीची विभागणी केली. अनेक उपाययोजना करून आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारली, न्यायव्यवस्था ही सुधारली. अनेक योजना हाती घेऊन सयाजीरावांनी लोककल्याण केले. या सर्व कामांमध्ये बडोद्याचे दिवाण सर टी. माधवराव यांचे मार्गदर्शन घेतले.

**कौटुंबिक स्थिती :**

महाराज सयाजीरावांचे लग्नकार्य थाटामाटात संपन्न झाले. तंजावर येथील मोहिते घराण्यातील लक्ष्मीबाई यांच्याबरोबर विवाह झाल्यानंतर त्यांचे चिमणाबाई असे नामकरण करण्यात आले. महाराणी चिमणाबाईंना दोन मुली नंतर मुलगा झाला. त्यांचे नाव फत्तेसिंहराव असे ठेवले. फत्तेसिंहराव हे सव्वा दोन वर्षांचे असतानाच चिमणाबाईंचे निधन झाले. चिमणाबाईंच्या निधनानंतर ज्येष्ठ व्यक्तींच्या सल्ल्यानुसार महाराज सयाजीरावांनी देवास या ठिकाणी असणाऱ्या घाडगे घराण्यातील गजराबई या राजकन्येबरोबर २८ डिसेंबर,१८८५ रोजी दुसरा विवाह केला. दुसऱ्या लग्नानंतर गजराबाईंचे ही चिमणाबाई (दुसऱ्या) असे नामकरण करण्यात आले. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर १८७७ यावर्षी काशीराव बाबांचे निधन झाले. या दुःखद घटनेनंतर राजमाता जमुनाबाई गायकवाड यांचेही निधन झाले. यानंतर महाराजांच्या जीवनामध्ये आणखी दुःखद घटना घडत गेल्या. महाराजांच्या तीन पुत्रांचे दुःखद निधन झाले. यामध्ये य. रा. दाते यांच्या म्हणण्यानुसार १९०८ यावर्षी फत्तेसिंहरावांचे मज्जातंतूच्या विकाराने अकाली निधन झाले.[६] शिवाजीरावांना १९१९ यावर्षी न्युमोनिया झाला व त्यामध्येच त्यांचा दुर्दैवी अंत झाला.[७] जयसिंहरावांचेही असेच झाले, १९१९ मध्ये जयसिंहरावांची तब्येत बिघडली. त्यामुळे त्यांना औषधोपचारासाठी युरोपात पाठविले, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही, बर्लिनहून २७ ऑगस्ट, १९२३ रोजी हॉलंड येथे जाताना त्यांना वाटेत आगगाडीमध्ये मृत्यूने गाठले.[८]

**सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य :**

बहुजन समाजातील मुलांनी शिक्षण घेऊन चांगले जीवन जगावे, हा विचार करून त्यांनी आपल्या संस्थानामध्ये १८९३ या वर्षी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्या नंतर त्याचे स्वरूप वाढवून त्यांनी १९०६ पर्यंत संपूर्ण आपल्या संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आणि ती अमलात आणली. प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करणारे बडोदा हे भारतातील पहिले राज्य होय.

**मातृभाषेला ज्ञानभाषा करणारे राजे सयाजीराव गायकवाड :**

महाराज सयाजीराव गायकवाड यांचा सर्व भाषा प्रति समतावादी दृष्टिकोन होता. मानवी जीवनाच्या प्रगतीसाठी ज्ञानार्जनाचे माध्यम असणारी कोणतीही भाषा महाराजांनी ज्ञानभाषा म्हणून स्वीकारली. आपल्या प्रजेच्या गुजराती आणि मराठी भाषा या दोन्ही भाषांतून अनुवादित ग्रंथांची निर्मिती करून प्रजेसाठी मातृभाषेला ज्ञानभाषा करण्याचा प्रयत्न केला इ.स. १८८७ पासून इंग्रजी भाषेतील लोकोपयोगी ज्ञान संवर्धन आणि माहिती प्रधान ग्रंथांचे भाषांतर करण्याकडे महाराजांनी लक्ष दिले. त्या काळामध्ये मराठी भाषेमध्ये स्वतंत्र अभ्यास आणि संशोधन करून लेखन करणारे खूपच कमी लोक होते. त्यामुळे जगातील आधुनिक ज्ञान आपल्या प्रजेला मिळवून देण्याचा एकच मार्ग म्हणून महाराज सयाजीराव गायकवाड भाषांतराकडे पाहात होते.[९]

१९०५ च्या हिंदू विवाह कायद्यामध्ये १९२८ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार लग्नविषयक सर्व वैदिक मंत्रांचे मराठी, गुजराती व हिंदी या भाषांमध्ये भाषांतर करून ते सरकार मार्फत प्रसिद्ध करण्यात आले. १९०८ मध्ये विद्याधिकारी खात्याच्या देखरेखी खाली महाराजांनी भाषांतर शाखेची नव्याने सुरुवात केली. प्राच्यविद्या मंदिर, बडोदा हे १ सप्टेंबर, १९२७ रोजी स्थापन करण्यात आले. प्रथम ही संस्था बडोदा येथील मध्यवर्ती वाचनालयाचा एक भाग म्हणून कार्यरत होती. नंतर त्याचा विस्तार करण्यात आला. १९३१ मध्ये शिक्षण खात्यातील भाषांतर विभाग हा या संस्थेस विधिवत जोडण्यात आला. सामान्य प्रजेला ज्ञानाचा भरपूर लाभ मिळावा, म्हणून चांगल्या आणि उत्तम ग्रंथांचे स्थानिक भाषेमध्ये म्हणजेच मराठी आणि गुजराती भाषेमध्ये भाषांतर करण्याचे काम सुरू केले. इ. स.

१९३२ मध्ये महाराजांनी भाषांतर शाखेसाठी दीड लाख रुपये खर्च केले. महाराजांच्या या गुंतवणुकीला आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये तोड नाही. यानंतर १९४९ मध्ये ही संस्था महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठाबरोबर संलग्न करण्यात आली.[१०]

मूळ बौद्ध तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी पाली भाषा किती महत्त्वाची आहे. हे जाणणाऱ्या महाराज सयाजीरावांनी पाली भाषेतील ग्रंथांचे मराठी भाषेमध्ये भाषांतर करविले. महाराजांनी अनेक धर्मातील चांगले ज्ञान लोकापर्यंत पोहोचावे, लोकांनी तुलनात्मक अभ्यास करून चांगल्या वाईट गोष्टींची पारख करावी, खोटा धर्माभिमान सोडून चांगल्या गोष्टी आत्मसात कराव्यात यासाठी धार्मिक ग्रंथांचे स्थानिक भाषेमध्ये भाषांतर करविले.[११] स्त्रिया आणि मागासवर्गीयांकडे ही महाराजांनी विशेष लक्ष दिले. त्यांच्यासाठी स्वतंत्र सोय उपलब्ध करून दिली. मागासवर्गीयांना खास शाळा उपलब्ध करून दिल्या इ.स.१८९० मध्ये महाराजांनी कलाभवन ही संस्था स्थापन करून तंत्रशिक्षणाला चालना दिली. आपल्या राज्यामध्ये गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळावा म्हणून वसतीगृह चालवण्याची व्यवस्था त्यांनी केली. याचबरोबर संगीत, नृत्य, नाट्य या सारख्या कलांचे शिक्षण देणारी शाळा ही राज्यामध्ये सुरू करण्यात आली. अनेक संस्था स्थापन करण्याबरोबरच लोकांत इतर अनेक मार्गाने ही ज्ञानाचा प्रसार व्हावा, याची काळजी महाराजांनी घेतली. उदाहरणार्थ त्यांनी गावोगावी वाचनालय सुरू करण्यासाठी लोकांना सांगितले त्याच्या जोडीला काही फिरती वाचनालये ही सुरू केली. याशिवाय सर्वात महत्वाचे महाराजांनी आपल्या राज्याबरोबरच राज्याच्या बाहेरील देखील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था केली. महाराजांच्या या योजनेचा महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सारख्या मान्यवर व्यक्तींचा समावेश होता.[१२]

**महाराजा सयाजीराव गायकवाड आणि सामाजिक सुधारणा :**

शैक्षणिक सुधारणा करण्याबरोबरच महाराज सयाजीरावांनी सामाजिक सुधारणा करण्याकडेही लक्ष दिले. महाराज सयाजीराव गायकवाड हे समाज सुधारण्याचे कट्टर पुरस्कर्ते होते.[१३] आपल्या बडोदा संस्थांमध्ये सयाजीराव गायकवाड यांनी घटस्फोटाचा कायदा लागू केला. असा कायदा करणारे व तो अमलात आणणारे बडोदा हे संस्थान भारतातील पहिले राज्य ठरले. त्याचबरोबर महाराज सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह, मिश्र विवाह यासंबंधी कायदे आपल्या संस्थानामध्ये अंमलबजावणी केली. याशिवाय पडदा पद्धती, बालविवाह बंदी, कन्या विक्री बंदी या सुधारणा करून त्यांनी प्रत्यक्ष कायदे अमलात आणले. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक सुधारणे संबंधित केलेले कायदे पाहिल्यावर त्या काळात देखील महाराजांचा किती पुरोगामी स्वरूपाचा होता, याची कल्पना येऊ शकते. सुधारण्याच्या शिखरावर आरूढ झालेल्या ब्रिटीश राज्यकर्त्यांना ज्या गोष्टी भारतात इतरत्र करता आल्या नाहीत, त्या सर्व सुधारणा एकट्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राज्यांमध्ये केल्या.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी जगभर प्रवास केला. हा प्रवास करताना आपल्या राज्याच्या हिताचा विचार डोळ्यासमोर ठेवून जगातील निरनिराळ्या गोष्टींचे अवलोकन केले. त्या अवलोकन केलेल्या बाबींचे आपल्या राज्यांमध्ये अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. आपल्या राज्यांमधील व्यापार आणि उद्योगधंदे यांना उत्तेजन देण्यासाठी सयाजीराव आणि विशेष लक्ष दिले. दळण – वळणाच्या सोयी सुविधा वाढविल्या, महसूल वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न केले. अनेक सुंदर वास्तु बडोदा संस्थानामध्ये उभ्या केल्या. उदाहरणार्थ वस्तुसंग्रहालय, कला भुवन, मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, लक्ष्मी विलास राजवाडा, श्री.सयाजी रुग्णालय, खंडेराव मार्केट इत्यादी इमारतींची उभारणी त्यांच्याच कारकीर्दीत झाली.[१४] सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानचे अधिपती म्हणून आपल्या राज्यामध्ये केलेल्या वरील सुधारणा पहिल्या तर ते एक कर्तृत्ववान प्रजाहितदक्ष आणि पुरोगामी विचारांचे महाराजा होते. राज्यकर्त्यांच्या ठिकाणी आवश्यक असणारा दूरदर्शीपणा त्यांच्याकडे पुरेपूर होता. म्हणूनच समाज सुधारण्याच्या क्षेत्रामध्ये बडोदा संस्थानने आघाडी मारली. वेगवेगळ्या प्रकारच्या सुधारणा देशात प्रथम अमलात आणण्याचा मान बडोदा संस्थानने मिळविला होता. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या या कार्याचा मान म्हणून त्यांना १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्ष पदाचा मान देण्यात आला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला देखील त्यांनी अप्रत्यक्षरीत्या मदत केली. पंडित मदन मोहन मालविय यांनी महिंदुस्थानातील शेवटचा आदर्श राजाफ या शब्दात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा यथार्थ गौरव केला होता.[१५]

**प्रशासनातील अनेक सुधारणा :**

आपल्या राज्यामध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांनी अनेक सुधारणा केल्या. अधिकाऱ्यांना शिस्त लावून राज्यकारभार

ISSN No. 2394-5990

सुधारला. वेगवेगळ्या खात्यांचे वेगवेगळे नियम केले, यासाठी ङ्गलॉ कमिटीफ नेमुन नियमांची निर्मिती केली. आपणाकडे असणाऱ्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी महाराजांनी ङ्गधारासभाफ नेमली. गुणवत्तेला प्राधान्य देऊन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. दा. ना. आपटे यांच्या मतानुसार अधिकारी निवड करीत असताना सयाजीराव महाराजांनी स्वत: लक्ष दिले. पंथ, धर्म, देश यांचा विचार न करता पात्र असणाऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावयाची, हे सयाजीराव महाराजांनी धोरण अवलंबिले. उच्च शिक्षण संपादन केलेल्या लोकांना नोकऱ्या द्यावयाच्या, परदेशामध्ये जाऊन शिक्षण घेऊन आलेल्या लोकांना अधिकार पदावर नियुक्त करावयाचे, सर्वसाधारण माहितीचे विषय असणाऱ्या नोकरांकडून राज्यातील कनिष्ठ आणि मध्यम दर्जांच्या अधिकारी पदावर नियुक्ती करणे, या प्रमाणे धोरण ठेवून नोकरशाहीमध्ये शक्य तितकी पात्रता आणण्याचा प्रयत्न केला.[१६] सयाजीराव महाराज वेळेबाबतीत ही खूपच काटेकोर असत. आपल्या राज्यामध्ये असणारी कार्यालये ही वेळच्या वेळी सुरू झाली पाहिजेत, यासाठी काही वेळेला ते कचेरीच्या बाहेर घड्याळ घेऊन थांबत असत. कचेरीतील अधिकाऱ्यांकडून राज्यातील लोकांचे कामकाज व्यवस्थित पार पाडले जाते किंवा नाही, हे ते स्वतः पाहत असत. यासाठी महाराज कधी कधी कचेरीमध्ये फेरफटका ही मारत असत. त्यामुळे कार्यालयांमधील कामांमध्ये गती येत असे. महाराज कार्यालयांत फेरफटका मारताना त्यांना असे आढळले की, काही लोक दुपारच्या जेवणाच्या सुट्टीच्या वेळी डुलकी घेत असतात. या कर्मचाऱ्यांनी डुलकी घेऊ नये, म्हणून त्यांच्यासाठी टेबल आणि खुर्चीची त्यांनी सोय केली.

वरील प्रमाणे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी अनेक सामाजिक सुधारणा केल्या. महाराजांच्या सुधारणांच्या बाबतीत बाबा भांड यांचे असे मत आहे की, हुजूर हुकूम लिहिण्यासाठी, कार्यालयामध्ये, घोड्यावरून रपेट मारताना, प्रवासामध्ये झोपण्याच्या पलंगाशेजारी, कागद पेन्सिल ठेवू लागले.[१७] अनेक सुधारणा करीत असताना महाराज सयाजीराव गायकवाड यांनी न्यायव्यवस्था ही चांगली केली, त्यामध्ये अमुलाग्र बदल केले. महाराजांच्या या अमुलाग्र बदलाबाबत गौतम निकम यांच्या मते, महाराजांच्या ठिकाणी इतकी प्रखर न्यायबुद्धी होती की, राज्यातील इतर लोकांना जे नियम होते, तेच नियम स्वतःला देखील कसोशीने लावत. सर्वच लोकांना त्यांच्या योग्यते प्रमाणे पण न्यायबुद्धीने वागवायचे, असे महाराजांनी राजकीय सूत्रे हाती घेतल्यापासून ठरवले होते.[१८] महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या काळातील काही लोकांचा त्यांच्यावर खूपच प्रभाव होता. लेखक दा. वि. नेने यांनी महाराजांनी लोकांसाठी केलेल्या अन्य सुधारणा सांगितलेल्या आहेत. शिक्षणाच्या अर्ध्या तापामध्ये अधिकृत शिक्षकांच्या व्यतिरिक्त त्यांच्या मनावर आर्य समाजातील दूरदृष्टीच्या अनेक श्रेष्ठ पुढाऱ्यांनी खूपच धार्मिक आणि सामाजिक प्रभाव पाडला.[१९]

**संदर्भ :**


१. आपटे दा.ना., श्री महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र खंड (१,२,३) बडोदे, १९३६.
२. दाते य.रा.,श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र, समाविष्ट, श्री.सयाजीराव गौरव ग्रंथ,माने पाटील रा.शा.(संपादक) वाढदिवस मंडळ,मुंबई व बडोदे,१९३३, पृष्ठ, २.
३. https://aloukikmararathi.com/maharajšsayajiraošgaikwadšinformation
४. तत्रैव, https:aloukikmararathi.com
५. तत्रैव, https:aloukikmararathi.com
६. दाते य.रा., तत्रैव, पृष्ठ, ७७.
७. दाते य.रा., तत्रैव, पृष्ठ, ७८
८. दाते य.रा., तत्रैव, पृष्ठ, ७८
९. निलोफर मुजावर, महाराजा सयाजीराव मातृभाषेला ज्ञानभाषा करणारा राजा, वारणानगर, पृष्ठ - १
१०. तत्रैव, पृष्ठ - २
११. तत्रैव, पृष्ठ - २
१२. https://aloukikmarathi.com/maharajšsayajiraošgaikwadšinformation.
१३. तत्रैव
१४. तत्रैव
१५. तत्रैव
१६. आपटे दा.ना., तत्रैव, पृष्ठ ५९६, ५९७.
१७. भांड बाबा, ‘लोकपाल राजा सयाजीराव’ साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३, पृष्ठ ३४.
१८. निकम गौतम, लोककल्याणकारी राजा सयाजीराव गायकवाड, विमल कीर्ती प्रकाशन, चाळीसगाव, २०१३, पृष्ठ २९.
१९. नेने दा.वि.,श्रीमंत सयाजीराव गायकवाड,गंधर्ववेद प्रकाशन,पुणे,२०१०,पृष्ठ ४८


■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड आणि न्यू इंग्लिश स्कूल, पुणे

**१) डॉ. चंद्रकांत संदीपान चव्हाण**
प्राध्यापक : वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स
अँड सायन्स , सोलापूर
भ्रमणध्वनी क्र. ९८५०३३६३३८
मेल आयडी : Chandrakant678gmail.com

**२) श्री. योगेश ज्ञानदेव पाटील**
संशोधक : पुण्यश्लोक अहिल्यादेवी
होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
भ्रमणध्वनी क्र. ९०२८२५५४०८
मेल आयडी : yogeshpatil5408gmail.com

**प्रास्ताविक :**

भारतीय पारतंत्र्याच्या काळामध्ये भारत देशामध्ये शेकडो संस्थाने म्हणजेच राज्ये होती. या संस्थानांचे स्वतंत्र राजे होते. यातील बहुतांशी राजे ऐश-आराम करण्यात जीवन व्यतीत करत होते. या काळामध्ये खऱ्या अर्थाने ज्यांनी रयतेचे राजे म्हणून कार्य केले अशा काही निवडक राजांमध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड हे नाव प्राधान्याने घ्यावे लागते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म दिनांक ११ मार्च १८६३ रोजी झाला. एका सामान्य घरामध्ये जन्मास आलेल्या बारा वर्षांच्या गोपाळ काशीराव गायकवाड यांनी बडोद्याच्या राजमाता जमनाबाईसाहेब यांसमोर 'मी बडोद्याचा राजा होण्यासाठी इथे आलो आहे!' असे उत्तर दिले आणि राजमाता भारावून गेल्या. त्यांनी २० मे १८७५ रोजी गोपाळला दत्तक घेतले आणि लहानगा गोपाळ आता सयाजीराव म्हणून ओळखला जाऊ लागला. १८७५ ते १८८१ या काळामध्ये सयाजीराव लहान असल्याने 'वयाने अज्ञानी राजे' म्हणून ओळखले जात होते. अखेर २८ डिसेंबर १८८१ रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला. १८८१ ते १९३९ या काळामध्ये सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानाचा राज्यकारभार केला.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राज्यकारभाराची सूत्रे सांभाळली त्याच काळामध्ये दिनांक १ जानेवारी १८८० पासून मराठी भाषेचे शिवाजी विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर व उद्योगधोरणी महादेव बल्लाळ नामजोशी यांनी ङ्गराष्ट्रीय शिक्षणफ देणारी देशातील पहिली शाळा 'न्यू इंग्लिश स्कूल, पुणेफ स्थापन केली.'[१]

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा समाजसंपर्क व सामाजिक कार्य पाहता न्यू इंग्लिश स्कूल, पुणे ही नावाजलेली शाळा, शाळेचे संस्थापक मुखाध्यापक व शिक्षक यांसोबत संबंध येणे अपरिहार्य होते.

**सूचनक शब्द :** केसरी, मराठा, न्यू इंग्लिश स्कूल पुणे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, वामन शिवराम आपटे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले.

**केसरी व मराठा मधील लेख:**

न्यू इंग्लिश स्कूलच्या संस्थापकांनी लोकशिक्षणासाठी दिनांक २ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' हे मराठी साप्ताहिक वर्तमानपत्र आणि दिनांक ४ जानेवारी १८८१ रोजी ङ्गमराठाफ हे इंग्रजी साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू केले. याच काळामध्ये बडोद्याचे महाराज मल्हारराव गायकवाड हे पदच्युत केले गेले होते. त्यांचे दत्तकपुत्र सयाजीराव यांच्या हाती कारभार अजून देण्यात आला नव्हता. त्यामुळे सर्व कारभार दिवाण राजा सर टी. माधवराव यांच्या हाती होता. त्यांच्यावर इंग्रजांचे नियंत्रण होते. हे दिवाण इंग्रज सरकारच्या दृष्टीने योग्य असणारे काम करत असल्याचा संशय त्याकाळी समाजास येत होता. केसरी व मराठामध्ये याबाबत वर्षभर टीका केली गेली मात्र ही टीका विकोपास गेली नाही. पुढील वर्षी केसरी व मराठाने कोल्हापूर संस्थानाबाबत लेखन केले आणि त्याबद्दल संपादक टिळक व आगरकर यांनी तुरूंगवासही भोगला.

वरील घटनेबाबत केसरी व मराठा वर्तमानपत्रांवर टीकेची झोड उठवणाऱ्या पत्रांना उद्देशून एक पत्र लिहिले गेले. दिनांक १३ सप्टेंबर १८८१ रोजी 'पत्रे पाठवणाऱ्यास सूचना' या मथळ्याखाली केसरीमध्ये हा इशारा देण्यात आला. 'बडोद्यासंबंधाने आम्ही चर्चा करितो म्हणून काही लोक मोठी तर्हेवाईक पत्रे आमच्याकडे धाडीत असतात. असे करणाऱ्यांचा मतलब काही असो. पण सर्व बातमीदारांनी इतके लक्षात ठेवावे की खात्रीलायक सह्या देऊन ते लिहितात तो मजकूर खरा आणि साधार अशी आमच्या दिलाची खात्री झाल्याखेरीज आम्ही कोणचेही पत्र छापणार नाही. टवाळ लोकांच्या हुच्चेपनाच्या लेखास केराच्या करंडीतच स्थान मिळावयाचे'.[२]

ISSN No. 2394-5990

एक सामान्य गुराखी मुलगा बडोद्याच्या गादीवर विराजमान होत आहे, हे पाहताना न्यू इंग्लिश स्कूलच्या संस्थापकांना आनंद होत होता आणि त्यामध्ये कोणताही अडसर येऊ नये, यासाठी प्रामाणिकपणे त्यांनी प्रयत्न केले होते.

**न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळेस भेट :**

सप्टेंबर १८८५ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळेस भेट दिली. गद्रे वाडा, पुणे येथे भरणाऱ्या न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भाषण केले. माधवराव रानडे यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आभार मानले.[३]

बडोद्याच्या गादीवर बसल्यानंतर आपल्यासाठी आवाज उठवणाऱ्या शाळेच्या संस्थापकांची भेट घेण्याची इच्छा सयाजीरावांच्या मनामध्ये असेल म्हणूनच महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी पुणे दौऱ्यामध्ये शाळेस भेट देण्यासाठी वेळ काढला, ही घटना महाराजांच्या मोठ्या मनाचे द्योतक आहे.

**न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळेस देणगी :**

१८८० मध्ये स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळेची दिवसेंदिवस भरभराट होत होती. १८८४ मध्ये शाळेच्या संस्थापकांनी काही मान्यवरांच्या उपस्थितीत 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. या संस्थेस महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १८८९ मध्ये रू. १२,०००/- इतकी मोठी देणगी प्रदान केली. सदर देणगी शाळेच्या व संस्थेच्या विकासासाठी सहाय्यक ठरली.[४]

१८८९ च्या सुमारास सोने सरासरी रू. १८ /- प्रति १० ग्रॅम होते. २०२४ मध्ये हेच सोने सरासरी रू. ६५,००० /- प्रति ग्रॅम आहे. या हिशोबाने विचार करता आज ही किंमत रू.४,३३,३३,३३३ /- इतकी प्रचंड आहे. दुसऱ्या बाजूने विचार करता एवढ्या मोठ्या रकमेचे काय झाले, हे सयाजीरावांनी विचारल्याचे पत्र अस्तित्वात नाही. म्हणजेच शाळेच्या व संस्थेच्या संचालकांवर सयाजीरावांचा दृढ विश्वास होता, असे स्पष्ट होते.

**महाराजांच्या मताबाबत टिळक-आगरकरांची भूमिका :**

मे १८९३ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी, 'जातीभेद नाहीसा झाल्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही आणि शिकलेल्या लोकांना जातीभेद मोडण्याचे धैर्य होत नाही' याबद्दल खंत व्यक्त केली.

न्यू इंग्लिश स्कूलचे दोन संस्थापक याबाबत एकमेकांच्या विरोधी मत व्यक्त करत होते. १६ मे १८९३ रोजी लोकमान्य टिळकांनी महाराजांच्या या मतावर टीका करणारा लेख 'केसरी'मध्ये लिहिला. त्यांच्या मते, 'देशोन्नतीसाठी सर्व जाती-धर्मांच्या लोकांचे रोटी-बेटी व्यवहार सुरू करणे आचरटपणाचे ठरेल.'

न्यू इंग्लिश स्कूलचे दुसरे संस्थापक गोपाळ गणेश आगरकर मात्र याबाबत महाराजा सयाजीराव गायकवाड यांना पाठींबा देतात. २२ मे १८९३ रोजी ङ्गनिष्पक्षपातफ या टोपणनावाने ते लिहितात, 'सारखी योग्यता होण्यासाठी रोटीव्यवहार झाला पाहिजे इतकेच नाही तर बेटीव्यवहारही झाला पाहिजे आणि हा रोटी-बेटीव्यवहार होण्यास जातीभेद नाहीसा झाला पाहिजे'.[५]

१८८१ मध्ये सयाजीराव गायकवाड यांच्या बाजूने केसरी व मराठामध्ये लेखन करणाऱ्या लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांची १८९३ मध्ये त्याच महाराजांच्या भूमिकेबाबत वेगवेगळी मते दिसून येतात. आगरकरांनी महाराजांच्या मतास पाठींबा दिलेला आहे त्यामुळे त्याबाबत अधिक विश्लेषणाची गरज नाही मात्र लोकमान्य टिळकांच्या मताचा विचार करता हे स्पष्ट करावे लागेल की, 'लोकमान्य टिळकांचा सामाजिक सुधारणांना विरोध नव्हता. लोकांना विश्वासात घेऊन सामाजिक सुधारणा कराव्यात' अशी टिळकांची भूमिका होती, हे अनेक ऐतिहासिक उदाहरणावरून स्पष्ट होते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये टिळकांची भूमिका मांडण्याचा उद्देश नसल्याने त्याबाबत अधिक लिहित नाही.

**नामदार गोपाळ कृष्ण गोखले :**

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक व मुख्याध्यापक राहिलेले प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे पुरोगामी विचारांचे मवाळ गटाचे भारत देशातील प्रमुख नेते होते. महाराजा सयाजीराव गायकवाड हे ही पुरोगामी व सुधारक होते. त्यामुळे त्यांचा संपर्क येणे अपरिहार्य होते. १९१४ साली महाराजा सयाजीराव गायकवाड यांसोबत नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी जर्मनी, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड या देशांचा एकत्रित दौरा केलेला दिसून येतो.[६] पहिल्या महायुद्धाचे ढग अधिक गडद झाल्याने त्यांनी हे दौरे उरकले आणि भारतात परतले. यानंतर एक वर्षात दिनांक १९ फेब्रुवारी १९१५ रोजी नामदार गोखले यांचे निधन झाले.

महाराज व गोखले हे पुरोगामी होते. देशातील कर्तृत्ववान नेते होते. अर्थशास्त्राची जाण असणारे समाजसुधारक होते. त्यामुळे या त्यांच्या एकत्रित दौऱ्यास विशेष महत्व आहे परंतु यानंतर नामदार गोखले यांच्या अल्पकाळात झालेल्या निधनामुळे या जोडीच्या माध्यमातून होऊ शकणारी काही महत्वाची कामे होऊ शकली नाहीत, असे म्हणता येईल.

**अस्पृश्यता निवारण परिषद :**

मार्च १९१८ मध्ये मुंबई येथे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी ङ्गअस्पृश्यता निवारण परिषदफ घेण्याचे निश्चित केले. अखिल भारतीय स्तरावर एक जाहीरनामा काढून त्यावर देशातील सर्व जातींच्या पुढाऱ्यांच्या सह्या घ्याव्यात, असे महर्षी शिंदे यांना वाटत होते. न्यू इंग्लिश स्कूलचे संस्थापक लोकमान्य टिळक या काळामध्ये इंग्लंडमध्ये जाण्याच्या तयारीमध्ये होते मात्र महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आग्रहास्तव त्यांनी अस्पृश्यता निवारण सभेस येण्यासाठी तयारी दर्शवली.[७]

२४ मार्च १९१८ रोजी ही परिषद झाली. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली लोकमान्य टिळक यांनी भाषण केले, मदेव सर्वांचा आहे. देवाच्या नजरेत मंगल-अमंगल भेदाला स्थान नाही, तर मग आपण ते का द्यावे ? देवाला स्वत:ला कोणी अस्पृश्य वाटत नसता एखाद्याला अस्पृश्य म्हणणे हे पाप होय. देव जर अस्पृश्यता पाळू लागला तर मी त्याला देव म्हणणार नाही. अस्पृश्य यापुढे अस्पृश्य मानले जाऊ नयेत, असे माझे मत आहे. हा फक्त सामाजिक रुढीचा मामला आहे आणि ही सामाजिक रूढी बदलली पाहिजे. कुठल्यातरी जुन्या काळात ब्राह्मणांच्या अधिकारशाहीने ही रूढी निर्माण केली, हे मी नाकारत नाही. तो एक कलंक आहे आणि तो दूर केलाच पाहिजे. याबाबत मी व्यक्तिश: काय करतो असे पुष्कळजण विचारतात. ते माझे काम नाही असे माझे उत्तर आहे. मी अनेक कामे हाती घेऊ शकत नाही. अनेकविध चळवळींचे नेतृत्व करण्याएवढा माझा मेंदू सक्षम नाही. अशा चळवळी व उपक्रमांना माझी पूर्ण सहानुभूती आहे'.

महर्षी शिंदे यांनी एक पत्रक तयार केले होते. ज्या पत्रकामध्ये 'दैनंदिन जीवनात आपण अस्पृश्यता पाळणार नाही' असे लिहिलेले होते ते टिळकांसमोर ठेवण्यात आले. टिळकांनी त्यावर सही केली नाही. भाषणामध्ये अस्पृश्यता नाकारणाऱ्या परमेश्वरास नाकारणारे टिळक त्याच परिषदेमध्ये त्याच विचारांच्या लिखित कागदावर सही करण्यास तयार नव्हते. निमंत्रक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना लोकमान्य टिळकांनी आधीच सांगितले होते की, 'मी एक व्यक्ती म्हणून या परिषदेस हजर राहील'.[८]

लोकमान्य टिळक यांचे स्वत:चे विचार जरी प्रागतिक असले तरीही त्यांना समाजसुधारक न होता राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी लोकमान्य म्हणून स्वत:चे कार्य पुढे न्यायचे होते. या काळामध्ये राष्ट्रीय चळवळींचे नेतृत्व मोठ्या प्रमाणात सवर्ण समाजाकडे होते. तत्कालीन सवर्ण समाजास सहज मान्य होणार नाही, अशी भूमिका घेण्याची टिळकांची तयारी नव्हती. त्यामुळे स्वत: व्यक्ती म्हणून अस्पृश्यता चुकीची वाटत असली तरीही टिळकांनी सार्वजनिकरित्या अशा कागदावर सही करण्यास नकार दिला.

**महाराजांचा सत्कार व न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे**

इ.स. १९३३ साली सयाजीराव गायकवाड यांच्या वयाच्या एक्काहत्तरीनिमित्त पुण्यामध्ये त्यांचा अनेक ठिकाणी सत्कार करण्यात आला. यावेळी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पूर्वी शिक्षक व मुख्याध्यापक राहिलेल्या अनेक व्यक्तींनी विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सयाजीरावांचा सत्कार केला आहे. यामध्ये न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळेचे माजी विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक असलेले प्रि. वै. का. राजवाडे यांनी डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, शाळेचे माजी शिक्षक व मुख्याध्यापक असलेले प्रो. वि. ब. नाईक यांनी वेदशास्त्रोत्तेजक सभा, शाळेचे माजी विद्यार्थी रा. ल. ब. भोपटकर यांनी अस्पृश्यता निवारक मंडळ, शाळेचे माजी विद्यार्थी प्रो. मा. धो. कर्वे यांनी अनाथ बालिकाश्रम, शाळेचे माजी शिक्षक व मुख्याध्यापक, प्रो. धोंडो केशव कर्वे यांनी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठातर्फे तसेच शाळेमधून निर्माण झालेली संस्था 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'तर्फे प्रि. ग. स. महाजनी यांनी सयाजीराव गायकवाड यांचा सत्कार केला आहे.[९]

**न्यू इंग्लिश स्कूलचा हीरक महोत्सव :**

दिनांक १ जानेवारी १९४० रोजी न्यू इंग्लिश स्कूल,पुणे शाळेस साठ वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल शाळेमध्ये हीरक महोत्सवी वर्ष साजरे केले जाणार होते मात्र त्यापूर्वीच दिनांक ६ फेब्रुवारी १९३९ रोजी महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे निधन झालेले होते. न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळेने सयाजीराव यांसोबतच्या आठवणींची व सहकार्याची जाणीव ठेवली. बडोद्याचे राजकुमार धैर्यशीलराव गायकवाड यांना सदर कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. धैर्यशीलराव आजारी असल्यामुळे त्यांना कार्यक्रमास येता येणार नाही, असे त्यांचे सचिव श्री. ठोंबरे यांनी पत्राने कळवले.[१०]

**निष्कर्ष :**

न्यू इंग्लिश स्कूल, पुणे ही शाळा व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीची सुरूवात साधारणपणे एकाच काळामध्ये झाली. शाळेच्या संस्थापकांनी निर्माण केलेल्या 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांसाठी आरंभीच्या काळामध्ये लेखन केले आणि सयाजीराव यांनी राज्याभिषेकानंतरच्या काळामध्ये शाळेसोबत चांगले संबंध ठेवले. कधी शाळेस भेट दिली तर कधी देणगी दिली. सयाजीराव गायकवाड यांच्या विचारांस गोपाळ गणेश आगरकर यांनी

ISSN No. 2394-5990

पाठींबा दिला. नामदार गोखले यांनी त्यांसोबत जागतिक प्रवास केला. शाळेमध्येही गरजवंत मागासवर्गीयांसाठी १९१८ साली मोफत शिक्षणाची व्यवस्था होती.[११]

न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळेचे संस्थापक लोकमान्य टिळकांचे अस्पृश्यतेबाबत असणारे मौलिक विचार त्यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्यासमोर मांडले. राजकीय भूमिका वेगळी असल्यामुळे टिळकांना पत्रकावर सही करता आली नाही तरीही टिळकांचे विचार प्रागतिक होते, सयाजीरावांच्या विचारांशी जुळणारे होते, हे स्पष्ट होते. महाराजा सयाजीराव यांच्या एक्काहत्तराव्या वाढदिवसानिमित्त झालेल्या पुणे दौऱ्यामध्ये शाळेचे माजी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक यांनी पुण्यातील विविध संस्थांच्या माध्यमातून तसेच शाळेतून निर्माण झालेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी संस्थेमार्फत त्यांचा सत्कार करण्यात आला. अशाप्रकारे न्यू इंग्लिश स्कूल, पुणे शाळा व महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे ऐतिहासिक एकमेकांस पूरक संबंध होते, हे सिद्ध होते.

**संदर्भ :**


- न्यू इंग्लिश स्कूल शताब्दी विशेषांक, १८८०, पृष्ठ क्र. ९.
- न. चि. केळकर, लोकमान्य टिळक यांचे चरित्र, प्रकाशक : केळकर, आवृत्ती १९२३, पृष्ठ क्र. १२७, १२९.
- फाटक, न. र., न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, नीलकंठ प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९६६, पृष्ठ क्र. २५०.
- Limaye P.M., The History of The Deccan Education Society (Part 2), 1935, Appendices Page no. 67.
- फडके य. दि., आगरकर, मौज प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती पुनर्मुद्रण डिसेंबर २०१९, पृष्ठ क्र. २१३.
- फाटक न. र., आदर्श भारतसेवक, मौज प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती १९६७, पृष्ठ क्र. २०७.
- प्रधान ग. प्र., लोकमान्य टिळक, नशनल बुक ट्रस्ट इंडिया, नववे पुनर्मुद्रण २०१८, पृष्ठ क्र. ९८.
- कीर धनंजय, लोकमान्य टिळक, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती २०२०, पृष्ठ क्र. ४२८.
- पाटील रा. शा., श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा महाराष्ट्रातील सत्कार, सरकारी छापखाना बडोदे, आवृत्ती १९३३, पृष्ठ क्र. ५५ ते ५७.
- An Account of Diamond Jubilee Celebration Of The New English School, Poona, Edition 1940, Page no. 16.
- मी एस.एम., एस.इसम. जोशी, कॉनटीनेंटल प्रकाशन, आवृत्ती २०१३, पृष्ठ क्र. १५, १६.


■■■

# राष्ट्रसंत तरुणसागरजी महाराज यांच्या सामाजिक व धार्मिक कार्य

**१) प्रा.डॉ. संगीता संदीप शिंदे**
मार्गदर्शक
यशवंत महाविद्यालय, नांदेड

**२) प्रा. प्रमोद कमलाकर नरखडे**
संशोधक
देशभक्त संभाजी गरड महाविद्यालय, मोहोळ
मोबाईल नं. - ९८२२३०३३६६
ई-मेल-pramodknarkhade@gmail.com

**प्रस्तावना :**

जैन धर्माचा सद्यस्थितीचा विचार भारतीय समाजाचा एक केंद्र बनला आहे. जैन धर्माचा प्रसार हा भारतीय परंपरेत महत्त्वाची भर टाकणारा आहे. जैन धर्म हा जनमानसात प्रभाव टाकणारा धर्म म्हणून पुढे आला आहे. जैन धर्म हा तात्विकमिमांसेला सर्व सामान्य समाजात रुजवणारा असा धर्म आहे. जैन धर्म विषय आचार आणि विचारात अनेक मुनींनी भर घालण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. जैन धर्माच्या प्रथा परंपरानुसार जैन धर्म २४ तिर्थकरांच्या माध्यामातून वाढला व भारतीय समाज मनात हिंदू व बौध्द धर्माप्रमाणे आदराने भारतीय जनमानसात आजही एक मानाचे स्थान घेवून आबाधित आहे. जैन परंपरेनुसार कालचक्र हे अनादी अनंत चालत राहत आहे.

**जिवन परिचय :**

संत, ऋषी मुनी, याच्या बाबत भारतीय इतिहास हा नेहमीच गौरवशाली असा राहिलेला आहे. २६ जून १९६७ रोजी राष्ट्रसंत तरुणसागरजी महाराजांचा जन्म मध्यप्रदेशातील दामोह जिल्हयातील गुहंची या गावी झाला. वडीलांचे नाव प्रतापचंद जैन व आई शांतीबाई जैन यांच्या पोटी झाला. लहानपणापासून हा बालक प्रतिभा संपन्न होता. पूर्वायुष्यात मुनीश्रींचे नाव पवन कुमार जैन असे होते. एके दिवशी शाळेत माघारी परतत असताना जैन आचार्य श्री. पुष्पदंत सागर महाराज यांचे त्यांनी प्रवचन ऐकले. त्या प्रवचनाचा त्यांच्या मनावर एवढा मोठा परिणाम झाला की १३ व्या वर्षी किशोरअवस्थेतच त्यांनी आपल्या घराचा त्याग केला.

**दिगंबर जैन दिक्षा :**

१८ जानेवारी १९८२ या दिवशी अकलतारा (छत्तीसगढ) या ठिकाणी वयाच्या १३ व्या वर्षी आचार्य पुष्पदंतसागरजी महाराज यांच्या कडून जैन धर्मातील क्षुल्लक दिक्षा घेवून एक नवीन अध्याय जैन धर्मात लिहला. यात उल्लेखनीय बाब अशी होती की दिगंबर जैन परंपरेत आचार्य कुन्हकुंद व आचार्य जिनसेन यांच्या नंतरच्या २००० वर्षात प्रथमच एवढया लहान वयात दिगंबर मुनींची दिक्षा घेतली होती. मुनीश्रींनी अशा लहान वयातच जैन मुनींच्या भ्रमण जिवनातील कठोर साधना आत्मसात केल्या. मुनी दिक्षेनंतर तरुणसागर महाराजांनी जैन शास्त्रांचा गाढा अभ्यास केला. २० जुलै १९८८ ला राजस्थानधील बागी दौरा या ठिकाणी नग्न दिगंबर जैन धर्माची दिक्षा घेतली.

**राष्ट्रसंत तरुणसागर महाराजांचे समाजास प्रबोधन :**

बुदेलखंडाच्या भुमीवर जन्मलेल्या क्रांतीकारक राष्ट्रसंत तरुणसागरजी महाराज यांनी आपल्या कडव्या प्रवचनातून देश-विदेशातील जनतेला समाजाला योग्य मार्ग दाखवला. त्यांनी जैन समाजाला उद्देशून सांगितलेले की, मी महावीरांना मंदीरातून सर्वसामान्य समाजापर्यंत पोहोचायचे आहेत. भगवान महावीरांचे; विचार हे फक्त् जैन समाजापर्यंत मर्यादित न ठेवता भारतातील सर्व समाजापर्यंत पोहचवणे हे माझे उद्दिष्ट असल्याचे राष्ट्रसंत तरणसागरजी महाराजांनी समाजाला संबोधित करताना आपले विचार सांगितले होते. ज्या दिवशी भगवान महावीरांचे विचार त्या दिवशी या समाजात, राष्ट्रात व विश्वात एक परिवर्तनाची क्रांतीकार लाट या विश्वात आपणास पाहता येईल. संपूर्ण राजकारणातील गलिच्छपणा, जाती-जातीत होणारा संघर्ष होत असलेला सांप्रदायवाद या अशा प्रकारच्या सर्व गोष्टींना या विश्वाला मार्ग दाखवू शकते. भगवान महावीरांचे संदेश हे फक्त जैनांसाठीच नाहीत तर त्यांची चर्चा सर्व जग करेल तो क्षण माझ्यासाठी आनंददायी असेल. राष्ट्रसंत तरुणसागरजी महाराज म्हणतात की महापुरुषांवर कोणत्याही जाती-वर्गाचा अधिकार असू नये. महापुरुषांवर कोणत्याही समाजाने ऐकाधिकार गाजवणे ही त्या महापुरुषांची चेष्टा आहे.

जिवन व मृत्यू यावर ही राष्ट्रसंत तरुणसागरजी महाराज यांनी आपले मत मांडले होते. ते समाजाला उपदेश करताना

 ISSN No. 2394-5990

म्हणायचे की, मृत्यू हे जिवनाचे अंतीम सत्य आहे. परंतू प्रत्येक मानव हा या अंतिम सत्यापासून सतत पळ काढण्याचा प्रयत्न करत असतो. या जिवनातील अंतीम सत्यापर्यंत म्हणजे मृत्यूपर्यंत आपण सर्वचजण जाणार आहोत. तो पर्यंत प्रत्येक मानव हे माझे ते माझे अशा गोष्टी करतो. पण ज्यावेळी आपण आपल्या अंतिम सत्यापर्यंत पोहचताना आपल्या लक्षात येते. या सर्वच गोष्टी आपल्या नाहीत. या सर्व गोष्टी आपण इहलोकीच ठेवून जाणार आहोत. म्हणून कोणत्याही गोष्टींचा हव्यास करु नका.

मुनिश्री राष्ट्रसंत तरुणसागरजी महाराज यांनी आपले जे विचार मांडले. त्यांचे त्यांनी तंतोतंत पालन केले मृत्यू हा त्यांच्या दृष्टीने मुक्तीचा महोत्सव होता. शरीर कावीळ व्याधीग्रस्त झाल्यावर मुनिश्रींना अनेकांनी विनवण्या केल्या. अनेकांनी आग्रह करुन सुध्दा उपचार घेण्यास मुनिश्रींनी नकार दिला. त्यांनी मृत्यूला न घाबरता स्वतः मृत्यूची सोबत करण्याचा निर्णय घेतला. आपले गुरुंची परवानगी घेऊन त्यांनी सर्व प्रकारचे आहार, पाणी वर्ज्य केले. मुनीश्रींनी सर्वांची क्षमा मागितली व यमसल्लेखना धरण केली. १ सप्टेंबर २०१८ रोजी दिल्लीतील दिगंबर जैन मंदीरात सल्लेखनापूर्वक समाधी झाली. विश्वाला प्रकाशीत करणारा तरुणसागर नावाचा तारा या दिवशी आपल्या सर्वांना जागे करुन निघून गेला.

१) कडवे प्रवचन - १
२) कडवे प्रवचन -२
३) मैं सिखाने नही जगाना आया हँ
४) क्रांतीकारी प्रवचन
५) अर्थी सजा के रखना
६) महावीरोदय
७) अहिंसा महाकुंभ ( मासिक)

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे भारताच्या कृषी आणि आर्थिक क्षेत्रातील योगदान

**प्रा.डॉ अनिल कांबळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय,सोलापूर

**प्रस्तावना:**

शेती हा भारतीयांचा प्रमुख व्यवसाय आहे. या व्यवसायाचा आणि या व्यवसायातील शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी महाराजांनी आपल्या राज्यात शेतीसाठी सिंचन व्यवस्था निर्माण केली.१८८६ ते १९३० पर्यंत १२ हजारापेक्षा जास्त विहिरी खोदल्या पाठबंधारे बांधले, धरणे बांधले, कालवे काढले, या आणि अशा उपक्रमांना उत्तेजन देवून अर्थव्यवस्था गतिशील ठेवण्याची त्यांची भूमिका होती. शेती हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. सयाजीराव गायकवाड हे १८७५ ते १९३९ पर्यंत ''बडोदा राज्याचे महाराज'' होते. शेती बरोबरच त्यांनी सहकार क्षेत्रात सुद्धा भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या राजवटीत त्यांच्या राज्यामध्ये शेती आणि सहकारात सुधारणा केल्याबद्दल त्यांना स्मरणात ठेवले जाते.त्यांच्या प्रमुख सुधारणां मध्ये कृषी विभागाची पुनर्रचना ही महत्वाची सुधारणा मानली जाते. त्याकाळी शेतसारा हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत असल्याने वसुलीसाठी अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांवर जबरदस्ती केली जात असे. शेतसारा वसुलीचे ठरावीक आणि पारदर्शी धोरण नसल्याने बऱ्याच वेळा शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असे. सयाजीराव महाराजांनी जेंव्हा राज्यकारभार हाती घेतला त्याच्या दुसऱ्याच वर्षी शेती सुधारणेसाठी त्यांनी 'सर्व्हे-सेटलमेंट' नावाचे नवीन खाते निर्माण केले. या खात्या मार्फत त्यांनी शेतीसंबंधित सुधारणांचा धडाका सुरू केला. पूर्वीच्या शेतसारा पद्धतीत आमूलाग्र बदल केले.महाराजांनी शेतीचे उत्पन्न ठरवताना शेतकऱ्याची मजुरी ते पीक काढण्यापर्यंत अवजारांसाठी लागणारा खर्च आणि याची जमवाजमव करताना शेतकऱ्यांनी कर्ज घेतले तर त्याचे व्याजही खर्चात घ्यावे आणि त्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहील त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक रक्कम कर रूपात घ्यावयाची नाही, असा नियम केला. याचा अर्थ शेतसारा देताना शेतकऱ्यांचे पीक तयार होईपर्यंतचा खर्च विचारात घेतला. अशा प्रकारे शेतसारा ठरवण्याची सोपी आणि सर्वसमावेशक पद्धत सुरू केली.यामुळे शेतकरी समाधानी झाला.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- भारताच्या शेती विकासात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान समजून घेणे.
- महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक आणि कृषि विषयक कामगिरीची माहिती घेणे.
- महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषि विषयक धोरण समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.त्यासाठी प्रकाशित ग्रंथाचा वापर करून संकलित माहितीच्या आधारे प्रस्तुत शोध निबंध तयार करण्यात आला आहे.

**संशोधनाची गृहीतके :**

- भारताच्या शेती विकासात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान महत्वपूर्ण आहे .
- महाराजा सयाजीराव गायकवाड यांची कामगिरी भारताच्या शेती आणि सहकार विकासाला पोषक आहे.
- महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानाचे महाराज असताना भारताच्या विकासासाठी महत्वपूर्ण निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी केली आहे.

आधुनिक भारताच्या विकासात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान समजून घेताना त्यांनी कृषि क्षेत्रात जे महत्वपूर्ण विचार मांडले आहेत ते समजून घेणे आवश्यक आहे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषि विकासातील योगदान**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषि आणि आर्थिक विकासातील योगदान पुढील प्रमाणे होय.

ISSN No. 2394-5990

**संस्थानातील शेतकऱ्यासाठी शेती पतपुरवठ्याची व्यवस्था :**

महाराज दूरदृष्टीचे होते, शेतकऱ्यांना पतपुरवठा केल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही आणि तो पतपुरवठा सुरक्षितपणे केला पाहिजेअसे त्यांना वाटायचे. शेतकरी सावकारांच्या कचाट्यात सापडू नये त्यासाठी त्यांनी शेतीच्या उत्पन्नावर कर्ज देण्यासाठी 'सरकारी शेतकी पेढ्यां'ची स्थापना केली. काही कालावधीत त्यांनी जमीन तारणावर कर्ज देण्यासाठी 'Land Mortgage Bank' स्थापन केली. तर नवसारी प्रांतात सन १९०५ साली 'Agricultural Bank' स्थापना केली. शेतकरी कर्जबाजारी होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली. राज्यकारभार हाती आल्यानंतर कमी कालावधीत त्यांनी संस्थानात 'स्वतंत्र शेतकी खाते' निर्माण केले. त्यामाध्यमातून निरनिराळ्या पद्धतीने शेतकऱ्यांना मदत केली. शेतकऱ्यांना सोप्या पद्धतीने पतपुरवठा कसा करता येईल, यासाठी महाराज नेहमीच प्रयत्नशील होते.

**आधुनिक शेतीचे शिक्षण आणि प्रशिक्षण:**

महाराज जेंव्हा युरोपात जात असत तेंव्हा तेथील आधुनिक शेतीची माहिती करून घेत. तेथील शेतकऱ्यांची समृद्धी आणि आर्थिक स्थैर्य त्यांनी पाहिले होते . युरोपातील शेतकऱ्या प्रमाणे संस्थानातील शेतकरीही स्वावलंबी व्हावा, यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. महाराजांनी त्या काळी आधुनिक शेतीचा ध्यास धरला. महाराजांनी संस्थानात आधुनिक शेतीविषयक शिक्षणाची सोय केली. शेतकऱ्यांच्या मुलांना या शाळांमधून मोफत शिक्षण दिले.

**आधुनिक शेतीचा ध्यास :**

शेतकऱ्यांनी आधुनिक शेती करावी या साठी त्यांनी भरपूर प्रयत्न केले. शेतकऱ्यांनी सुधारित बी-बियाणे वापरावे यासाठी महाराजांनी खेडोपाडी, गावोगावी कार्यशाळा घेतल्या. शेती बाबत प्रयोग, प्रदर्शने, भाषणे या माध्यमांतून त्यांनी जनतेला आधुनिक शेतीचे महत्त्व पटवून दिले. शेतात लागणारी आधुनिक साधने पुरवली.

**शेतीला बारमाही पाणीपुरवठा :**

शेतीसाठी पाणीपुरवठा महत्त्वाचा आहे, याची महाराजांना कल्पना होती. त्यांनी शेतकऱ्यांना सरकारच्या पैशातून विहिरी खोदून दिल्या. नदीचे पाणी अडवण्यासाठी सन १९०० साली ओरसंग नदीवर धरण बांधले. कालवे बांधले. त्यामुळे १४००० एकर जमीन ओलिताखाली आली. शेती बारमाही बागायती केली. इतरही ठिकाणी अशी सोय केली. शेतीचे उत्पन्न जास्तीत जास्त वाढावे यासाठी आवश्यक तेवढी मदत महाराजांनी केली.

**पशुपालन व्यवसायाला उत्तेजन व प्रोत्साहन :**

शेतकऱ्यांनी फक्त शेती अवलंबून नराहता आर्थिक स्थैर्य येण्यासाठी त्यांनी जोडधंदा करावाअसे महाराजांना वाटत असे. यासाठी महाराजांनी तशा उपाययोजना सुद्धा केल्या. त्यांनी जास्त उत्पादन देणाऱ्या गायी, शेळ्या, मेंढ्या परदेशातून मागवून घेतल्या. त्यांचे पालनपोषण व्यवस्थित करता यावे यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले, त्यांनी पशुवैद्यकीय दवाखाने काढले.या बरोबरच शेतीसाठी उपयोगी जनावरांची हत्या करू नये या बाबत कायदा केला.

**कृषि आधारित उद्योगांनाही पाठबळआणि शेतीपूरक उद्योगाला प्रोत्साहन :**

महाराजांनी शेतमालावर आधारित उद्योगधंदे काढले, शेतकरी आर्थिकदृष्ट्या अधिक स्वावलंबी झाला पाहिजे असा विचार ते सतत करत. त्यामुळेच त्यांनी बडोदे येथे सूतगिरणी काढली व गणदेवी येथे सहकारी साखर कारखाना काढला. त्यांनी मोठ्या उद्योगाबरोबरच छोट्या उद्योगांनाही पाठबळ दिले. शेतकऱ्यांनी शेती हंगामाशिवाय घरबसल्या काही कुटिरोद्योग करावेत .यासाठी त्यांनी शेतीपूरक उद्योगाला प्रोत्साहन दिले. त्यामधून महाराजांना शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य द्यायचे होते. महाराजांचा शेतीपूरक उद्योगाला प्रोत्साहन देण्यावर भर होता. हा त्याचा दूरदृष्टीपणा कळून येतो.

**शेतकऱ्यासाठी दुष्काळ निवारण्याचे कार्य :**

महाराजांना हे परिचित होते की, दुष्काळात शेतकऱ्यांचे सर्वांत जास्त हाल होतात. त्यासाठी त्यांनी बडोदा संस्थानातील शेतकऱ्यांना दुष्काळातून सावरण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची मदत केली. दुष्काळात अनाथगृहे उघडणे, लोकांना वस्त्रे पुरवणे, अन्नधान्याचा पुरवठा करणे, गावोगावी विहिरी खोदणे, जनावरांच्या चारा पाण्याची सोय करणे, संपर्कासाठी सोयी करणे, पक्क्या, कच्च्या सडका आणि नवीन रेल्वे मार्ग तयार करणे, पाटबंधाऱ्याची कामे करणे, कालवे काढणे अशा कामाचा समावेश यात होता. महाराजांनी दुष्काळासंबंधी केलेल्या उपाययोजना आजही सध्याच्या सरकारला दिशादर्शक आहेत. महाराजांनी दुष्काळात मनुष्यबळ आणि पशुधन वाचवण्यासाठी संस्थानाचा खजिना रिकामा केला. त्याचबरोबर स्वतःच्या खासगीतील लाखो रुपये खर्च केले.

**शेतकऱ्यांचे स्वावलंबन :**

शेतकरी स्वावलंबी झाला पाहिजे यासाठी महाराजांनी शेतकऱ्यांना मदत केली, पण या मदतीने शेतकरी परावलंबी होणार नाही याकडेही त्यांचे अधिक लक्ष होते. शेतकरी स्वावलंबी

झाला तर त्याच्यावर येणाऱ्या संकटसमयी तो खचणार नाही, याची कल्पना त्यांना होती. आज यादृष्टीने शासनाकडून उपाययोजना केल्या जात असल्या तरी याची सुरुवात सयाजीराव महाराजांनी फार वर्षांपूर्वी केली होती याची जाणीव आपणास असली पाहिजे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आर्थिक शेत्रातील योगदान :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्याच्या संस्थानात आर्थिक विकासाला प्राधान्य दिले ज्यामध्ये रस्ते, बंदरे, धरणे, जलाशय, सिंचन सुविधा आणि बडोद्यातील रेल्वेचे विशाल जाळे यांचा विकास आणि बांधकाम यांचा समावेश होतो . आजवा जलाशय, ज्याला सयाजी सरोवर म्हणूनही ओळखले जाते, हा ताज्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी महाराजांनी सुरू केलेला एक मोठा प्रयत्न होता. या बरोबरच आणखी एक मोठा उपक्रम म्हणजे बडोद्यातील रेल्वेचा विकास होय .बडोद्यातील उद्योग आणि कारखान्यांच्या विकासाचा सुद्धा महाराजांनी विचार केला. राज्य आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातील औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन देण्यात आले. कापड गिरण्या, कापूस गिरण्या, साखर कारखाने, वीट कारखाने, काचेचे कारखाने ते चॉकलेट कारखाने, क्रोम लेदर टॅनिंग कारखाने आणि फर्निचर अशा सरकारी उद्योगांचे स्वरूप होते. खाजगी उद्योगांमध्ये रासायनिक उद्योग, लोखंडी उद्योग, बांधकामे, मीठ उद्योग, सिमेंट कारखाने आणि माचिस उद्योग होते. याचा अर्थ अर्थव्यवस्थेत केवळ सरकारची भूमिका महत्वाची नाही तर खाजगी क्षेत्र सुद्धा महत्वाचे आहे हे महाराज जाणून होते.महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्यात अनेक बँकिंग नवकल्पना आणल्या आणि १९०८ मध्ये बँक ऑफ बडोदाचा पाया घातला.

**सारांश:**

राजा जर डोळस असेल तर राज्यांचा विकास कसा होतो ते महाराजांच्या कृषि आणि आर्थिक कार्यावरून आपणास समजून येते.

**संदर्भ सूची :**

१. सयाजीराव गौरव ग्रंथ ,वैभव प्रेस, गिरगाव मुंबई भालचंद्र चिंतामणी लेले.

२. लोकपाळ राजा सयाजीराव बाबा भांड.

३. आधुनीक भारताचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड बाबा भांड.

■■■

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड (तृतीय) यांनी केलेल्या विविध सुधारणा

**प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
मोबाईल - ९०२१२०७३३६
ईमेल - govardhan.docs@gmail.com

**गोषवारा :**

महाराजा सयाजीराव गायकवाड (तृतीय) यांनी आपल्या बडोदा संस्थानचे राजा म्हणून कार्य करताना संस्थानातील सर्व सामान्य नागरिकांचे जीवन कसे उंचावेल याकडे अधिक लक्ष दिले आहे. त्यांनी बडोदा संस्थान व्यतिरिक्तही संस्थान बाहेरच्या नागरिकांनाही मोठ्या प्रमाणात शैक्षणिक, आर्थिक सहाय्य केले आहे. महाराजांनी बडोदा संस्थानात कृषी व इतर स्वरुपातील जुन्या, रूढी परंपरांचे कायदा मोडीत काढून नवीन कायदे तयार केले तसेच त्यास अनुसरून न्यायालय उभे केले. ग्रंथालय चळवळ सुरू करून नागरिकांना वाचक आणि साक्षर बनविले. कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या. बडोदा शहरात आधुनिक स्वरुपातील ग्रंथालय आणि कृत्रिम तारांगण सह भव्य असे अनेक वैशिष्ट्यपूर्ण इमारती उभे केले. त्यांच्या या सर्व बहुआयामी व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

**सूचनक शब्द (Key-Words)** : अस्पृश्यता निवारण, ग्रंथालय, तारांगण, मोफत व सक्तीचे शिक्षण, कायदे

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड (तृतीय) यांना बडोदा संस्थान दत्तक म्हणून घेतले आहे. ब्रिटीशांनी भारतातील संस्थानिक राज्यकर्ते यांना व त्यांच्या कुटुंबियांच्या माध्यमातून जे दत्तक म्हणून पुढे वारसदार लाभले होते. त्यांच्या शिक्षणासाठी राजकोट येथे प्रिन्सेस कॉलेज स्थापन केले होते. या ठिकाणी संस्थानिक राज्यकर्त्यांना सामाजिक व सर्वांगीण दृष्टीने त्यांचे राज्य सुधारणा होईल असे शिक्षण दिले जायचे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शालेय व उच्च शिक्षण ब्रिटीशांच्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. त्यांनी ब्रिटीशांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेत असताना व नंतर भारतातील आणि परदेशातील विविध ठिकाणी प्रवास केला होता. त्या माध्यमातून त्यांनी आपल्या बडोदा संस्थानात संस्थांनातील नागरिकांचे जीवन उंचावेल असे अनेक योजना राबवून बडोदा शहराचे कायापालट केले. ग्रंथालय, कृत्रिम तारांगण, आधुनिकतेला अनुसरून नवीन कायदे व न्यायालय, कृषी विषयक शाळा व उपाययोजना, प्रशासकीय सुधारणा, मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, माध्यमिक आणि विद्यापीठ स्तरीय सुविधा या त्यांच्या बडोदा शहराच्या कायापालटामुळे भारतातील व परदेशातील अनेक नागरिकांना रोजगार मिळाला. यामुळे बडोदा संस्थानचा मोठ्या प्रमाणात प्रगती झाली.

**महाराजा सयाजीराव गायकवाड (तृतीय) यांनी केलेल्या विविध सुधारणा :**

**१. सार्वजनिक ग्रंथालय चळवळ** :

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या कारकिर्दीत एकदा अमेरिका दौरा करत असताना अमेरिकेचे कॉंग्रेस म्हणजे त्यांच्या संसदेतील ग्रंथालय पाहिले होते. तेव्हा त्यांना लक्षात आले होते की, आपल्या नागरिकांचे शिक्षण घेत असताना आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ व वैयक्तिक वाचन वृद्धीगंत होण्यासाठी आपल्या बडोदा संस्थानात एक भव्य दिव्य असे सार्वजनिक ग्रंथालय असणे आवश्यक आहे. त्यांनी बडोदा येथे आल्यानंतर लगेचच आपल्या संस्थानात अमेरिकेचे कॉंग्रेस मधील ग्रंथालय सारखे हुबेहूब सार्वजनिक ग्रंथालय बांधून घेतले. याशिवाय त्यांनी ग्रंथालय सुस्थितीत राहण्यासाठी ग्रंथालय कर्मचार्यांसाठी प्रशिक्षण वर्ग सुरू केले होते. त्यांचे सार्वजनिक ग्रंथालय चळवळ हे भारतातील नागरिकांचे जीवन मूलगामी परिवर्तन ठरले होते. बडोदा, पाटण, गांधीनगर आणि आनंद या ठिकाणी असे सार्वजनिक ग्रंथालय उभे केले होते. तेथे जवळपास दररोज २०० नागरिक या सार्वजनिक ग्रंथालयाचा उपयोग करत होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी विसाव्या शतकातील पहिल्या व दुसऱ्या दशकात सार्वजनिक

ग्रंथालय चळवळ बाबत केलेले प्रयत्न भारतात इतर संस्थानिकांना प्रेरणास्त्रोत ठरले आहे.[१]

**२. कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणा :**

कृषी क्षेत्रात सुधारणा करताना महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अतिशय सखोल असे मूलगामी विचार करून बडोदा संस्थानात मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. कृषी क्षेत्रातील सुधारणा करताना सर्वप्रथम त्यांनी आपल्या नागरिकांना कृषी शिक्षण व प्रशिक्षणाचा पाया घातला. याद्वारे त्यांनी शेती कसे करायचे याचे शिक्षण दिले याशिवाय त्यांनी कृषी आधारित विविध मार्गदर्शन पुस्तकांची निर्मिती करून घेतली व त्याआधारे विविध कृषी आधारित प्रयोगशील उपक्रम राबवून शेतकर्यांना प्रगतिशील शेतकरी होण्यासाठी सहाय्य केले.

या व्यतिरिक्त बडोदा संस्थानात जेथे जेथे दुष्काळग्रस्त प्रदेश होता. त्या त्या ठिकाणी पाण्याचा स्त्रोत उपलब्ध होईल यासाठी रोजगार हमी योजनासारखे उपक्रम राबवून विहीर, जलाशये बांधून घेतली. तसेच दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांचा सावकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत होती याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांना लक्षात आल्यानंतर त्यांनी संस्थान मार्फत दुष्काळ कर्ज योजना राबविले होते. आणि विविध सहकारी सोसायटी स्थापन करून शेतकर्यांना अधिकाधिक सहाय्य केले होते.[२]

कृषी क्षेत्राशी निगडीत पशुधन बाबतही महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी लक्ष घालून दुग्ध उत्पादन व इतर आनुषंगिक उत्पादन कसे वाढेल याकडे विशेष लक्ष दिले होते. यासाठी त्यांनी अमेरिका देशाचा पशुधन बाबत प्रगतीचा उदाहरण आपल्या समोर आदर्श ठेवला होता. बडोदा संस्थानात उत्तोमोत्तम दुग्ध उत्पादन करणारे पशुधन विकसित केले होते[३] त्यांच्या या प्रयत्नामुळे पुढील काळात आनंद येथे 'अमूल' सारखे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणारे सहकारी तत्त्वावरील दुग्ध उत्पादन करणारी संस्था उभी राहिली.

**३. शिक्षण क्षेत्रात केलेल्या सुधारणा :**

शिक्षण क्षेत्रात सुधारणा करत असताना महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सर्वप्रथम आपल्या संस्थांनातील नागरिकांचे शैक्षणिक दर्जा चौकशी केली असता. त्यांना नागरिकांचे शैक्षणिक दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर अपेक्षित असे नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यांनी तत्काळ आपल्या संस्थानात इंग्रजी शाळा, ग्राम्यशाळा, १८७० मध्ये इंग्लंडने मोफत व सक्तीच्या शैक्षणिक धोरणाचे कायदेशीर अंमलबजावणी केले होते. तसेच या संदर्भात भारतातही मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू होण्याकरीता विविध ठिकाणी चळवळ सुरू झाली होती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या बडोदा संस्थानात सर्वप्रथम एका छोट्याशा ग्रामीण भागात मोफत व सक्तीचे शिक्षण संदर्भात प्रयोग केला होता. त्यानंतर तालुका व जिल्हा स्तरावर मोफत आणि सक्तीचे शिक्षण यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण बडोदा संस्थानात धोरण राबविले.[४]

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्य आणि वंचित समाजातील घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपययोजना केले होते. त्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणात शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना सह आपल्या संस्थानात शिक्षणाच्या दर्जेनुसार नोकरी देण्याचे हमी दिली होती. याशिवाय अस्पृश्य आणि वंचित समाजातील विद्यार्थ्यांना परदेशात त्यांच्या आवडीनुसार पीएचडी आणि इतर अनुषंगिक शिक्षण घेता यावे याकरीता स्वतंत्र शिष्यवृत्ती जाहीर केली होती.[५]

शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचे मुलाखत आणि पात्र विद्यार्थी शिक्षण घेण्याचे हेतु आणि उद्देश खुद्द महाराजा सयाजीराव गायकवाड स्वत: जाणून घ्यायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना याच माध्यमातून त्यांना अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात पीएचडीचे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिली होती.[६]

**४. सार्वजनिक प्रशासकीय व अन्य सुविधांसाठी उत्कृष्ठ स्थापत्य कलेचे इमारती निर्मिती :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपले शालेय व उच्च शिक्षण घेताना देशात व परदेशात विविध ठिकाणी प्रवास केला होता. या प्रवासा दरम्यान त्यांनी अत्यंत उत्कृष्ट असे इमारती पाहिले होते. त्यापैकी एक म्हणजे अमेरिकेतील त्यांच्या काँग्रेस म्हणजे संसदेतील ग्रंथालय इमारत. या ग्रंथालयाच्या इमारतीचे सर्वांगीण वैशिष्ट्य पाहून त्यांनी इसवी सन १९१०-११ मध्ये बडोदा संस्थानात एक मोठी सेंट्रल लायब्ररी बांधून घेतली होती. या सेंट्रल लायब्ररी इमारतीसाठी महाराजांनी अमेरिकेतील त्यांच्या काँग्रेस म्हणजे संसदेतील ग्रंथालय इमारत ज्या स्थापत्य रचनाकार व अभियंत्याने रचना केली आणि बांधली होती. त्यांच्याकडूनच बडोदा येथील सेंट्रल लायब्ररी इमारत बांधून घेतली. या ग्रंथालयाच्या इमारतीपूर्वी त्यांनी इसवी सन १८७६ ला द स्टेट लायब्ररी इमारत उभी केली होती. याशिवाय त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखल्यानंतर आपल्या बडोदा संस्थानात इसवी सन १८८६ साली अँग्लो वर्नाकूलर बॉयज स्कूल, इसवी सन १८८७ मध्ये बडोदा कॉलेज, इसवी सन १८८८ मध्ये गर्ल्स स्कूल/फिमेल ट्रेनिंग स्कूल इमारत सार्वजनिक नागरिकांसाठी बांधून घेतली होती.

बडोदा संस्थांनातील नागरिकांना त्यांच्या जीवनातील अमूल्य असे आनंददायी काही क्षण मनोरंजन म्हणून व्यतीत करण्यासाठी महाराजांनी कामती बाग, जुबली बाग, पार्क्स, संग्रहालय, तारांगण, पिक्चर गॅलरी, विविध क्रीडा स्टेडियम बांधून घेतली होती.

प्रशासकीय इमारतीमध्ये इमारत बांधताना महाराजांनी आपल्या नागरिकांना शासकीय सोयी सुविधा सहजपणे त्यांच्या दैनंदिन जीवनातील भाजी खरेदी करताना उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांनी १९०५ आणि १९१५ मध्ये खंडेराव भाजी मार्केट बांधताना तळ मजल्यावर भाजी मार्केट आणि पहिल्या मजल्यावर मुन्सिपल कार्यालये असे बांधून घेतली होती.

बदलत्या काळाप्रमाणे आपल्या संस्थानात न्याय मंदिर असावे म्हणून त्यांनी कर्नाटकातील विजयपुरा येथील इब्राहीम रोजा प्रमाणे मीनार व छत्री सारखे इमारत न्याय मंदिर म्हणून बांधून घेतले तसेच तुरुंग बांधताना त्यांनी तुरुंगाचे मुख्य इमारत तुरुंगाच्या मध्यवर्ती ठिकाणी बांधून घेतले होते. या मध्यवर्ती ठिकाणाहून तुरुंगातील प्रशासकीय अधिकारी आणि सुरक्षा रक्षकांना तुरुंगातील प्रत्येक खोलीमधील कैदी निदर्शनास यायला पाहिजे तसेच प्रत्येक खोलीत आणि आवारात पुरेपूर हवा खेळती राहायला पाहिजे अशा पद्धतीचे तुरुंग बांधले होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी देश-विदेशातील उत्कृष्ट स्थापत्य रचनाकार यांना आमंत्रित करून उपरोक्त इमारती बांधून घेतले होते. याशिवाय लक्ष्मी-विलास पॅलेस, जमीन महसूल इमारत, अभिलेखागार, महाराजा सयाजीराव विद्यापीठ सारखे भव्य दिव्य असे इमारती बांधून घेऊन बडोदा शहराचे सौंदर्य जागतिक स्तरावर नेले होते.[६]

**संशोधन पद्धती :**

उपरोक्त संशोधन लेखासाठी अभिलेख संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. याकरीता प्राथमिक व दुय्यम साधनांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन आणि चर्चा :**

ब्रिटीशांनी आपल्या भारतावर राज्य करत असताना प्रिन्सली स्टेट म्हणजे संस्थानिक आणि थेट ब्रिटीश अंकित प्रदेश असे विभागणी केली होती. प्रिन्सली स्टेट म्हणजे संस्थानिकांच्या अनेक राज्यांमध्ये दत्तक पुत्र वारसा घेऊन संस्थानिक चालविले जात होते. अशा दत्तक पुत्रांना व इतर राज्यकर्त्यांच्या राजपुत्रांसाठी ब्रिटीशांनी राजकोट येथे प्रिन्स कॉलेज स्थापन केले होते. त्यांनी या कॉलेजच्या माध्यमातून दत्तक पुत्रांना व इतर राज्यकर्त्यांच्या राजपुत्रांसाठी सर्वांगीण शिक्षण दिले होते. हेच राजपुत्र पुढील काळात त्यांनी आपल्या संस्थानात युरोप व अमेरिकेतील तत्कालीन काळातील जे शैक्षणिक, सामाजिक व इतर अनुषंगिक सुधारणा झाल्या होत्या. त्या प्रमाणे आपल्या संस्थानात महाराजा सयाजीराव गायकवाड व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी मोठ्या प्रमाणात सुधारणा करून या देशासमोर खूप मोठे आदर्श ठेवले होते. त्यांच्या या सर्वांगीण सुधारणांच्या संदर्भात प्रकाश टाकणे आवश्यक होते. म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्यावर उपरोक्त प्रमाणे संक्षिप्त लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे संपूर्ण जीवन व कारकिर्द ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली तथा नियंत्रणाखाली व्यतित झाले होते. महाराजांवर ब्रिटीशांचे वर्चस्व असले तरी त्यांना ब्रिटीशांचे कोणत्याही प्रकारचे त्रास झाला नव्हता. त्यांनी ब्रिटीशांच्या मार्गदर्शनखाली आपल्या बडोदा संस्थानात नागरिकांचे दैनंदिन व सर्वांगीण जीवन कसे उंचावेल यावर विशेष भर दिला होता. त्यांनी आपल्या संस्थानात तत्कालीन आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या विविध सुधारणा आपल्याही संस्थानात व्हायला हवेत म्हणून सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय चळवळ, मोफत व सक्तीचे शिक्षण चळवळ, बदलत्या काळानुसार आवश्यक असे महसुली, प्रशासकीय व शांतता-सुव्यस्थेचे कायदे केले, अत्याआधुनिक केंद्रीय ग्रंथालय, न्याय मंदिर, तुरुंग, पॅलेस, संग्रहालय, तारांगण, बाग-बगीचा, क्रीडांगणे, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ आणि अस्पृश्य व वंचित समाजातील नागरिकांना देशी-परदेशी शिष्यवृत्तीसह संस्थानात नोकरीची हमी असे अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी या सर्व सुधारणा केल्यामुळे अनेकांना रोजगार मिळाले तसेच मोठ्या प्रमाणात शिक्षण प्राप्त झाल्यामुळे देशात-परदेशात त्यांना अनेक मोठ्या ठिकाणी संधी उपलब्ध झाले होते. त्यांच्या या कार्यामुळे बडोदा संस्थानचे नाव भारतात व भारताबाहेर मोठ्या आजही गौरवाने घेतले जाते. त्यांच्या सारखा मोठ्या मनाचा दिलदार क्रांतिकारक समाज सुधारक पुन्हा होऊ शकला नाही.

**संदर्भ :**

1) Dr. Manubhai Patel and Meghaben Patel, Contribution of Gaekwad Administration in Library Movement in India, Indian Journal of Applied Research, Vol. 3, Issue 2, Feb. 2013, pp. -165-166
2) A. G. Widgery, Edited, Speeches and Addressees of Maharaja Sayajirao Rao

Gaekwad, 1877-1927, London, 1928, pp. 94-95
3) Jigar Inamdar and Preeti Garg, A Study on Economic Administration during the Period of Sayajirao Gaekwad-III, Pramana Research Journal, Vol. 9, Issue 5, 2019, pp. 56-57.
4) सयाजीराव गायकवाड यांची भाषण खंडे ३, साकेत प्रकाशन, औरंगाबाद २०१३. पृ. क्र.८७.
5) V. P. Dandekar, Sayajirao Gaikwad, 1933, p. 103
6) Dhananjay Keer, Biography of -mbedkar, Popular Prakashan, 1954, p. 22-21
7) Niyati Jigyasu, Alternative Modernity of the Princely states-Evaluation the Architecture of Sayajirao Gaekwad of Baroda, Creative Space Journal, Vol. 5, No. 2, Jan. 2018, pp.59-70

■■■

ISSN No. 2394-5990

# महिला सक्षमीकरणाचे कर्ते सुधारक- महाराजा सयाजीराव गायकवाड

**१) श्री.बालाजी विश्वनाथ हादवे**
संशोधक विद्यार्थी, शिक्षक
समर्थ पार्क, मैंदर्गी रोड, अक्कलकोट
ता-अक्कलकोट जि-सोलापूर

**२) प्रा.डॉ.दादासाहेब ना.पाटोळे**
संशोधक मार्गदर्शक, इतिहास विभागप्रमुख
बाबुराव पाटील कॉलेज ऑफ आर्टस अँड सायन्स
अनगर ता-मोहोळ जि-सोलापूर

**सारांश :**

बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) हे भारतातील आधुनिक विचारसरणीचे राजे म्हणून ओळखले जातात. ब्रिटीश भारतातील संस्थानात बडोदा संस्थानाने आपली वेगळी ओळख निर्माण केली. मराठा शेतकरी कुटुंबात सयाजीराव गायकवाड यांचा जन्म झाला. पुढे बडोदा संस्थानची महाराणी जमनाबाई यांनी त्यांना दत्तक घेतले. वयाच्या अठराव्या वर्षी राज्याभिषेक सोहळा पार पडल्यावर त्यांनी बडोदा संस्थानचा राज्यकारभार करायला सुरुवात केली. आपल्या बौद्धिक नेतृत्वाच्या बळावर त्यांनी त्यांच्या संस्थानात अमुलाग्र बदल घडवला. १८७५ ते १९३९ या ६४ वर्षाच्या कालावधीत बडोदा संस्थानात अनेक आधुनिक व धडाडीचे निर्णय त्यांनी घेतले. महिलांच्या प्रगतीकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. समाजातील सर्वच महिला शिकल्या पाहिजेत, याकडे त्यांचा कटाक्ष होता. महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आधुनिक विचारसरणीचा होता. स्वतंत्र भारतात ज्या सुधारणा होण्यास आजपर्यंत अनेक वर्षी गेली. त्या सुधारणा ब्रिटिश भारतात महाराजांनी अगदी कमी कालावधीत घडून आणल्या. महिलांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नती व्हावी यासाठी विविध उपक्रम राबविले. थोडक्यात महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक उपक्रमशील राजे होते.

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृतीत स्त्री व पुरुष ही समाजरचनेची दोन आधारभूत घटक मानले जातात.भारतीय संस्कृतीत काही वेळा मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती. तदनंतरच्या काळात मात्र मातृसत्ताक कुटुंब पद्धती मोडीत निघून पुरुषसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात आली. स्त्रियांच्या विविध समस्या आहेत. या समस्यांच्या अनुषंगाने भारतीय इतिहासात अनेक थोर समाज सुधारकांनी वेळोवेळी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात केले. स्त्रियांचे आर्थिक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उन्नती व्हावी त्यांची प्रगती व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवली गेले. भारतीय समाजाच्या प्राचीन काळापासून ते आजतागायत महिलांच्या प्रश्नाकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. महिलांची कुचंबना, त्यांची घुसमट याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हती' हे मनुस्मृति मधील वाक्य पुरातन काळापासून बोलले जाते. यानुसार स्त्रीला कसलेही स्वातंत्र्य नाही. तसेच स्त्रीला स्वातंत्र्य नसल्याने स्त्रीने आपले वडील, पती व मुलगा यांच्या आज्ञेत राहिले पाहिजे, अशी धारणा निर्माण झाली. एकूणच स्त्रियांची स्थिती पूर्वीपासून फारशी लाभदायक नव्हती. स्त्रियांना त्यांच्या या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी त्यांचे स्वतंत्र अस्तित्व जपण्यासाठी भारतात अनेक विशेष प्रयत्न केले गेले. स्त्री उद्धाराच्या बाबतीत अग्रक्रमाने महात्मा फुले यांचे नाव घेतले जाते. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्याने स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात भरीव योगदान दिले. १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा उघडून त्यांनी स्त्री शिक्षणाच्या क्रांतीची सुरुवात केली. आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करून आपल्या कार्यात सामील करून घेतले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी सुद्धा स्त्री उद्धाराच्या बाबतीत लक्षणीय काम केले. राजा राम मोहनराय यांनी सतीच्या प्रथेविरुद्ध केलेले काम उल्लेखनीय आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्रियांच्या प्रश्नासंदर्भात जागृती होऊन विविध स्तरावर प्रयत्न झालेले आहेत. युनेस्को यांनी महिलांच्या उन्नतीसाठी, प्रगतीचा भाग म्हणून १८ मार्च हा दिवस महिला दिवस म्हणून साजरा करण्याची जाहीर केली. भारतात सामान्य जनतेतून अनेक समाजसुधारक, विचारवंत पुढे येत असताना राजघराण्यातील एखाद्या व्यक्तीने स्वतः पुढाकार घेऊन महिला उन्नतीचे प्रयत्न करणे हे थोडे विस्मयकारक होते. असे प्रयत्न करणारे राजे म्हणजे बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड होय. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यातील कवळाणे या गावी झाला. त्यांचे मूळ नाव गोपाळराव असे होते. तत्कालीन बडोदा संस्थानचे राजे खंडेराव गायकवाड यांचे १८७० मध्ये निधन झाल्यानंतर त्यांच्या पत्नी जमनाबाई यांनी भारत सरकारकडून दत्त घेण्याचा अधिकार मिळवला. या अधिकारामुळे पुढे जाऊन जमनाबाई यांनी कवळाणे (जि-

नाशिक) येथील काशीराव गायकवाड यांचा मुलगा गोपाळराव याला २७ मे १८७५ रोजी दत्तक घेतले. गोपाळराव याचे नाव बदलून सयाजीराव असे ठेवण्यात आले. १८८१ मध्ये सयाजीराव गायकवाड यांचा राज्याभिषेक सोहळा पार पडला. आता सयाजीराव बडोदा संस्थानचे राजे झाले. सयाजीराव राजघराण्याचा एक भाग बनले होते. पण सयाजीरावांचे लहानपण हे खेडेगावात गेले होते. त्यामुळे आर्थिक परिस्थिती व ग्रामीण भागातील अशिक्षित वातावरणामुळे त्यांना शिक्षण घेता आले नव्हते. बडोदा येथील राजघराण्यात प्रवेश केल्यावर त्यांच्या शिक्षणाची उत्तम सोय करण्यात आली. शिक्षण सुरू केल्यानंतर त्यांच्या बौद्धिक क्षमतेची चुणूक सर्वांना लवकरच समजली. महाराजा सयाजीराव यांनी लवकरच मराठी, इंग्रजी, गुजराती व उर्दू या भाषांचे शिक्षण पूर्ण केले. हे शिक्षण पूर्ण करत असतानाच त्यांनी प्रशासकीय बाबीसुद्धा शिकून घेतल्या. घोडेस्वारी, राजघराण्यातील रितीरिवाज, राज्यकारभारातील बारकावे इ. गोष्टी त्यांनी शिकून घेतल्या. त्यावेळी बडोद्याचे दिवाण असलेले राजा सर टी. माधवराव यांच्याकडून त्यांना राजकारण विषयक शिक्षण मिळाले.

**सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण :**

आज आपण सर्वजण सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेत असलो तरी इंग्रजांच्या काळात ही संकल्पना नवीन होती. स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी नेते दादाभाई नवरोजी यांनी प्रथमतः १८८२ मध्ये सार्वत्रिक शिक्षणाची कल्पना मांडली. बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड हे आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सतत प्रयत्नशील होते. बहुजन समाजातील स्त्रियांची उन्नती व्हावी या उद्देशाने १८९३ मध्ये त्यांनी आपल्या संस्थानातील अमरेली तालुक्यात प्रथमतः सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. महाराजांनी ही योजना प्रथमतः अमरेली तालुका व त्या अंतर्गत येणारी खेडी इथे प्रायोगिक स्तरावर चालू केली. सक्तीच्या व मोफत शिक्षण योजनेचा जास्तीत जास्त लाभ मुलींना झाला. १८९३ मध्ये शाळेच्या एक मैलाच्या परिघात राहणाऱ्या सात ते दहा वर्षे यादरम्यानच्या सर्व मुलींना शाळेत येणे सक्तीचे करण्यात आले. अमरेली तालुक्यात ही योजना चांगलीच यशस्वी ठरली.यामुळे पुढे जाऊन महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी ही योजना संपूर्ण बडोदा संस्थानात लागू केली. त्यावेळी अशी योजना राबवणारे बडोदा हे एकमेव संस्थान होते. या योजनेवरून आपल्या सहज लक्षात येते की महाराजा सयाजीराव गायकवाड हे काळाच्याही पुढे जाऊन विचार करणारे राजे होते.

**मुलींसाठी विविध शिष्यवृत्ती योजना :**

सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा थेट फायदा बडोदा संस्थानातील अनेक मुलींना झाला. याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश प्रत्यक्ष महाराजांनी दिले होते. प्राथमिक शिक्षण मोफत करून एवढ्यावरच जमणार नाही हे महाराजांनी ओळखले होते. मुलींना शिक्षण द्यायचे असेल तर त्यासाठी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली पाहिजे, म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मुलींच्या शिक्षणासाठी विविध शिष्यवृत्ती चालू केल्या. दहा वर्षावरील मुलींचे शाळेकडे अधिक लक्ष जावे. यासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती चालू केली. या शिष्यवृत्तीचा लाभ मुलींना झाला. त्यामुळे अनेक मुलींनी आपले शिक्षण चालूच ठेवले.

**फिमेल ट्रेनिंग कॉलेज :**

स्त्री शिक्षणाचा संकल्प महाराजांनी केलेला असला तरी उत्तम प्रतीचे शिक्षण घेण्यासाठी तेवढ्याच उत्तम प्रतीच्या शिक्षिका असणे गरजेचे आहे, हे महाराजांना माहीत होते. तसेच ग्रामीण भागातून आलेल्या मुलींना महिला शिक्षकाकडून निसंकोचपणे शिकता यावे. या हेतूने महाराजांनी स्त्री शिक्षकांची नियुक्ती करण्यास सुरुवात केली. १८८२ मध्ये महाराजांच्या पुढाकाराने फीमेल  करण्यात आली. या कॉलेजला चांगलाच प्रतिसाद मिळून अनेक उत्तम स्त्रिया महिला शिक्षिका म्हणून बाहेर पडू लागल्या. १९३०-३१ मध्ये फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये जवळपास ५६७ विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. या कॉलेजमधील मुलींना चांगले शिक्षण मिळावे म्हणून मिस राधाबाई पवार यांना १९१४-१५ मध्ये अध्यापनशास्त्र शिकण्यासाठी टीचर्स कॉलेज युनिव्हर्सिटी, अमेरिका येथे पाठवले. त्यांना शिक्षणाच्या दोन वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक १५० रुपये वेतन दिले होते. यावरून महाराजा सयाजीराव हे स्त्री शिक्षणाच्या बाबतीत किती बारकाईने विचार करत होते हे समजून येते. १९३० मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी या कॉलेजसाठी त्यावेळी तीस हजारांचा निधी दिला. या ३० हजाराची आजच्या घडीचे मूल्य जवळपास नऊ कोटी रुपये होतात.

**मुलींसाठी माध्यमिक शिक्षण :**

स्त्री शिक्षणाचा पाया म्हणून प्राथमिक शिक्षणाकडे पाहत असतानाच महाराजांनी मुलींचे माध्यमिक शिक्षण सुद्धा सुलभ व्हावे म्हणून विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलींना संस्थानाच्या वतीने आर्थिक मदत केली जायची. 'महाराणी हायस्कूल' ही बडोदा. या शाळेसोबतच १९४०-४१ च्या दरम्यान इतर चार माध्यमिक

शाळा उघडण्यात आल्या. १९३८-३९ मध्ये महाराणी हायस्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ही ९७२ होती. ही संख्या वाढून पुढील काही वर्षात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुली २९५९ इतक्या झाल्या. ही संख्या वाढण्याचे कारण म्हणजे संस्थानाच्या वतीने मुलींसाठी तयार केलेले पोषक शैक्षणिक वातावरण होय.

**झनाना वर्ग :**

सर्व घटकातील सर्व धर्माच्या मुलींना स्त्रियांना शिक्षण घेता यावे, यासाठी महाराजा सजीराव गायकवाड सतत नवीन काहीतरी करत असत. शिक्षणाची चळवळ सुरू केल्यावर महाराजांच्या लक्षात आले की, समाजातील काही घटकांमध्ये पडदा पद्धत होती. अशा घटकातील स्त्रियांना या पद्धतीमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते. यासाठी दूरदर्शी दृष्टिकोन असणाऱ्या सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानात जागोजागी झनाना वर्ग सुरू केले. या वर्गाची उपयुक्तता काळानुरूप सिद्ध झाली. या वर्गातून पडदानशीन असलेल्या स्त्रियांना, मुलींना बाहेरच्या जगासारखे शिक्षण घेता येऊ लागले. या झनाना वर्गातून लिहिण्या- वाचण्याबरोबरच गृहोपयोगी शिक्षण सुद्धा देण्यात येत होते. तसेच स्त्रियांना दैनंदिन व्यवहारात लागणारी कौशल्य शिकवली जात. सन १८९५-९६ या काळात एकूण आठ झनाना वर्ग चालवले जात असत आणि यात शिक्षण. ४० वर्षावरील स्त्रियांनी सुद्धा या वर्गात प्रवेश घेतला होता.

**अस्पृश्य समाजातील स्त्रियांचे शिक्षण :**

समाजातील सर्वच घटकातील स्त्रियांचे शिक्षण व्हावे यासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी प्रयत्न केले. यामध्ये अस्पृश्य म्हणून गणल्या जाणाऱ्या जातीतील स्त्रियांना त्यांच्या हक्काचे शिक्षण मिळावे यासाठी येथे अस्पृश्य जातीतील मुलीसाठी निवासी शाळा सुरू करण्यात आली'. या शाळेमध्ये आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात आलेल्या होत्या. या निवासी शाळेतील मुलींची संख्या वाढत गेली. या शाळेत पुस्तकी ज्ञानाबरोबरच लेस बनविण्याचे तसेच रेशम उत्पादनाचे प्रशिक्षण दिले जात होते.

**महिलासाठी विशेष ग्रंथालये :**

बडोदा संस्थानात महाराजा सयाजीराव गायकवाडांनी शालेय शिक्षण सक्तीचे केले. गावोगावी शाळा सुरू केल्या. शाळा-विद्यापीठ यामध्ये शिक्षण तर मिळणारच आहे, पण समाज ज्ञानाभिमुख व्हायचं असेल तर त्यासाठी वाचन हवे. ही बाब अचूक हेरून त्यांनी ग्रंथालय चळवळ चालू केली. या ग्रंथालयात महिलांना येताना संकोच वाटू नये, यासाठी महाराजांनी खास महिलांसाठी विशेष  करून या ग्रंथालयाची जबाबदारी सुद्धा त्यांनी महिलावरच दिली. या ग्रंथालयासाठी महिला ग्रंथपालाची नेमणूक करण्यात आली. संपूर्ण भारतातील हा पहिलाच प्रयोग होता. १९१२ पासून महिलांसाठी फिरते ग्रंथालय सुरू करण्यात आले. या ग्रंथालयातील पुस्तकाची देवाण-घेवाण मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. १९१७-१८ मध्ये पुस्तक देवघेव संख्या ९५ वरून ९३०३ पर्यंत वाढलेली होती. यावरून महिलांसाठी विशेष ग्रंथालय किती फायदेशीर ठरली होती हे सिद्ध होते.

**महिला बचत गटाची स्थापना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी महिलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. त्याचबरोबर महिलांची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी सुद्धा खास प्रयत्न केले आहेत. महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी हव्यात. त्यांना बचतीची सवय लागावी, यासाठी महिला बचत गटाची स्थापना करण्यात आली. '१९३१ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी महिला बचत गटांची. या बचत गटामुळे महिलांना आर्थिक सुबत्ता लाभण्यास मदत झाली. १९३८-३९ मध्ये बचत गटांची संख्या ५५ वर गेली.

**मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय :**

बडोदा संस्थान हे देशातील एक आदर्श संस्था बनले होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी संस्थानात हरतऱ्हेचे शिक्षण मुलींना उपलब्ध करून दिले. मुलींना उच्च शिक्षणाची सोय आपल्या संस्थानात उपलब्ध व्हावी, यासाठी १८८२ मध्ये बडोदा कॉलेजची स्थापना करण्यात आली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी इतर लोकांना प्रेरणा मिळावी म्हणून स्वतःची कन्या इंदिराराजे यांना बडोदा कॉलेजमध्ये शिकण्यास पाठविले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी लावलेल्या रोपाचे वटवृक्षात रूपांतर झाले. १९३५ मध्ये बडोदा कॉलेजमध्ये ३३ विद्यार्थिनी पदवी तर ४८ विद्यार्थ्यांनी पदवीचे शिक्षण घेत होत्या.

**महिलांसाठी विशेष आरोग्य धोरण :**

बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक कर्ते सुधारक होते. महिलांच्या सर्वांगीण विकासावर त्यांचा भर होता. महिलांच्या, मुलींच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी त्यांनी योजना आखल्या. बडोदा संस्थानातील श्रीमती मनोरमा दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली १९१५ साली जुम्मादादा व्यायाम मंदिरात 'कन्या आरोग्य मंदिरा'ची स्थापना केली. महिलासाठी स्वतंत्र व्यायाम शाळा सुरू करणारे संपूर्ण

भारतातील पहिले संस्थान म्हणजे बडोदा संस्थान होय. यावरून महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पुरोगामी दृष्टिकोन समजतो. प्रसुती ही महिलांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी गरीब स्त्रियांना प्रसूती वेळी मदत व्हावी यासाठी १९०९ मध्ये पन्नास हजारांची देणगी दिली. आजच्या काळात या देणगीचे मूल्य निश्चितच कित्येक कोटीच्या घरात असणार. गर्भवती स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेता यावी यासाठी १९२३ मध्ये महाराणी चिमणाबाई प्रसुती गृह व शिशुकल्याण संस्थेची स्थापना केली. महिलांना आपले आरोग्य सांभाळता यावे, त्यांची करमणूक व्हावी यासाठी १९३७ मध्ये महिला क्रीडा मंडळ सुरू करण्यात आले. या मंडळाच्या माध्यमातून महिलांना योगा, लाठी व लेझीम यांचे प्रशिक्षण दिले जात होते. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महाराजांनी बडोदा संस्थानात लग्नाची वयोमर्यादा वाढवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अगदी लहान वयातच विवाह केल्यामुळे होणारे दुष्परिणाम टाळता येऊ लागले.

**मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणाची सोय :**

स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसार बडोदा संस्थानात होत असताना समाजातील कोणताही घटक यापासून वंचित राहू नये याची काळजी घेतली जायची. मुस्लिम समाजात मुलींच्या शिक्षणाबद्दल प्रचंड दुर्लक्ष होत असे. मुलींच्या शिक्षणाबद्दल असलेली निरसता व औदासिन्यता दूर करण्यासाठी महाराजांनी काही विशेष उपक्रम आपल्या संस्थानात राबविले. महाराजा सयाजीराव गायकवाडांनी आपल्या संस्थानात अनेक उर्दू शाळा स्थापन केल्या. १८९२-९३ या साला दरम्यान अमरेली तालुक्यात दोन शाळा उघडण्यात आल्या. त्याचबरोबर बडोदा शहरात सुद्धा एक उर्दू शाळा मुलींसाठी काढण्यात आली. १९०४-०५ या दरम्यान ४४७ एवढ्या संख्येने मुली उर्दू शाळेत शिक्षण घेत होत्या. महाराजा सयाजीरावांनी प्रतिसाद पाहून उर्दू शाळांची संख्या वाढवून २८ इतकी केली. १९४१-४२ मध्ये या उर्दू शाळातून शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या २८०० इतकी होती. तसेच मुस्लिम स्त्रियांना या शाळांमधून गृहोपयोगी शिक्षण देण्याची व्यवस्था महाराजा सयाजीरावांनी केली होती.

**स्त्रीविषयक कायद्यांना मंजुरी :**

बडोदा संस्थानातील सर्व घटकातील महिलांना पुस्तकी ज्ञानाबरोबर दैनंदिन जीवनातील व्यवहार्य शिक्षण दिले जात होते. यामुळे स्त्रियांच्या शैक्षणिक गुणवत्तेत कमालीची वाढ झाली. पण याचबरोबर स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुद्धा उंचावला पाहिजे, यासाठी महाराजांनी काही निर्णायक पावले उचलली. स्त्रियांना समाजपरंपरेच्या साखळदंडातून मुक्त करण्यासाठी महाराजांनी कायदेशीर तरतुदींचा मार्ग स्वीकारला.

१) **विधवा पुनर्विवाह कायदा :** १९०१ मध्ये ब्रिटिश भारतातील कायद्याच्या. यामुळे विधवा महिलांच्या जीवनात पुन्हा नवीन प्रकाश आणता आला.

२) **बालविवाह प्रतिबंधक कायदा :** भारतीय समाजात पुरातन काळापासून बालविवाहाची परंपरा रूढ होती. अतिशय लहान वयातच विवाह केले जायचे. या बालविवाहाचा स्त्रियांच्या शारीरिक स्थितीवर आणि मनस्थितीवर वाईट परिणाम व्हायचे. बडोदा संस्थानात सुद्धा असे विवाह होत हे महाराज ओळखून होते. यासाठी महाराजा सयाजीराजांनी १९०४ मध्ये बडोदा संस्थानात बालविवाह प्रतिबंध कायदा लागू केला. या कायद्यांतर्गत बालविवाह करणाऱ्या वर-वधू पक्षाला दंड व शिक्षा करण्याबरोबरच भटजींना सुद्धा या कायद्यांतर्गत दंड व शिक्षेची तरतूद केली. महात्मा फुले यांनी अशा प्रकारच्या बालविवाहात फक्त वर-वधू यांना शिक्षा व दंडाची मागणी केली होती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्याच्याही पुढे जाऊन या कायद्याची परिणामकारकता वाढवली.

३) **हिंदू घटस्फोट कायदा :** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १९३१ साली बडोद्यात हिंदू घटस्फोट कायदा मंजूर केला. हा कायदा महिलांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो; कारण अनेक महिलांची कुचंबना होत असताना त्यांना यापासून सुटका होणे अशक्य होते. या कायद्यामुळे महिलांना घटस्फोटाचा अधिकार प्राप्त झाला. असे असले तरी महाराजांनी या कायद्याचा दुरुपयोग होऊ नये याची सुद्धा काळजी घेतलेली दिसते. कोर्टात नोंदणी केल्यावरच घटस्फोट मान्य केला जात होता. या कायद्यानुसार ज्या स्त्रीचा पती मृत्यू होऊन सात वर्षे झाली आहेत, पती नपुंसक असल्यास, पतीने धर्मांतर केले असल्यास, पती संन्यासी झाला असल्यास स्त्रीला घटस्फोट घ्यायचा अधिकार दिला होता. तसेच घटस्फोटानंतर पत्नीची व मुलांच्या उदरनिर्वाह व संगोपनाची व्यवस्था करण्याचे नियम सुद्धा या कायद्यात समाविष्ट करण्यात आले होते.

४) **हिंदू विवाह कायदा :** आपणास माहीतच आहे की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी दूरदृष्टी ठेवत हिंदू कोड बिलाची रचना केली होती. पुढे या बिलामुळे डॉ. आंबेडकरांना खूप त्रास सहन करावा लागला. त्यांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला. बडोदा नरेश

ISSN No. 2394-5990

सयाजीराव गायकवाड यांनी १९०५ मध्ये बडोदा संस्थानात 'हिंदू विवाह कायदाफ लागू केला. असा कायदा अस्तित्वात आणणारे बडोदा संस्थान हे भारतातील पहिले व एकमेव संस्थान ठरले. महाराजा सयाजीरावांनी हिंदू कोड बिलातील अनेक तरतुदी टप्प्याटप्प्याने आपल्या संस्थानात लागू केल्या. यावरून डॉ. आंबेडकर व महाराजा सयाजीराव यांच्यातील वैचारिक एकजीवपणा लक्षात येतो.

५) **सुईण दाई कायदा :** बडोदा संस्थानात महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १९१९ मध्ये हा कायदा लागू केला. या कायद्यानुसार परिचारिका प्रशिक्षण घेतल्याशिवाय संस्थानात सुईण म्हणून काम करता येणार नाही, असा नियम घातला. प्रशिक्षण झाल्यावरच त्यांना परिचारिकेचा परवाना दिला जायचा.

६) **माता कल्याण कायदा :** १९२९ मध्ये ब्रिटिशांनी भारतात 'बॉम्बे माता कल्याण कायदा' लागू केला होता. हा कायदा महिलांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याकारणाने बडोदा नरेश सयाजीराव महाराज यांनी '१९३२ मध्ये बडोदा संस्थानात हा. कारखान्यात, कंपनीत काम करणाऱ्या महिलांना प्रसूतीच्या वेळी मिळणाऱ्या रजा व सोयी सवलती याबाबत हा कायदा होता. तसेच या कामगार महिलांना प्रसूती दरम्यान आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद या कायद्यात होती.

**निष्कर्ष :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी महिला सक्षमीकरण व सबलीकरणाकडे अधिकचे लक्ष दिले. लोकमताकडे फारसे लक्ष न देता त्यांनी महिला विकासावर काम केले. शिक्षणानेच महिलांचा विकास होईल, असे त्यांचे मत बनले होते. त्याकाळी संपूर्ण भारतात बडोदा संस्थान हे एकमेव सुधारणावादी संस्थान म्हणून ओळखले जाऊ लागले. महिलांच्या प्रत्येक समस्येवर उपाय शोधण्याचे काम महाराजांनी केले. महाराजांची पत्नी चिमणाबाई यांचीसुद्धा या कामात मोलाची साथ मिळाली. महात्मा फुले यांच्या ही पुढे जाऊन त्यांनी काम केले. यासाठीच महात्मा फुले यांच्या घरातील बैठकीत महाराजांचा फोटो लावलेला होता.

**संदर्भ सूची :**

**मराठी पुस्तके**


१) एकनाथ पगार: महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड,महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई पृ.८८

२) कित्ता पृ.८७

३) बाबा भांड: महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची खंड-१२,महाराजा सयाजीराव चरित्र साधने समिति,महाराष्ट्र शासन पृ.८५

४) एकनाथ पगार: महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड,महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई पृ.७७

५) बाबा भांड: महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची खंड-१२,महाराजा सयाजीराव चरित्र साधने समिति,महाराष्ट्र शासन पृ.८८

६) शिवानी घोंगडे: महाराजा सयाजीराव स्त्रीविषयक कार्य,महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,छत्रपती संभाजीनगर,२०२१.पृ.२०

७) मंदा हिंदुराव: महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण,साकेत प्रकाशन,२०१५ पृ.५५

८) शिवानी घोंगडे: महाराजा सयाजीराव स्त्रीविषयक कार्य,महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,छत्रपती संभाजीनगर,२०२१.पृ.२३

९) आपटे दा.ना. : श्री महाराजा सयाजीराव तिसरे यांचे चरित्र VOL १,२,३.१९३६.

१०) भांड बाबा : लोकपाठ राजा सयाजीराव,साकेत प्रकाशन,छत्रपती संभाजीनगर,२०१२


**ऑनलाइन लिंक्स :**


- www.wikipedia.org.com
- www.Aarhat.com
- www.bbc.com
- www.sayajiraogaekwad.com
- www.alaukikmarathi.com


■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचे उच्च शिक्षण क्षेत्रातील योगदान

**प्रा. सुमन केंद्रे**
इतिहास विभाग
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
Mo. No.8275159817

**प्रास्ताविक :**

भारताच्या जडणघडणीत अनेक युगपुरुषांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. या युगपुरुषांनी खरे तर आपल्या अफाट कार्याने एक नवीन युग निर्माण केले. हे युग समतेचे, स्वातंत्र्याचे न्यायाचे व शिक्षण विषयक हक्काचे होते.

भारतातील या महापुरुषांमध्ये बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांचा अग्रक्रमाने समावेश करावा लागेल. या संदर्भात महाराष्ट्रातील थोर अभ्यासक तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी अत्यंत समर्पक असे विधान केले आहे. ते म्हणतात, भारतात आत्तापर्यंत दोनच जनकल्याणाचा ध्यास घेतलेले राजे झालेत.ते आहेत छत्रपती शिवाजी महाराज आणि श्रीमंत सयाजीराव महाराज. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांचे हे विधान अत्यंत समर्पक, सूचक आणि येथे योग्य वाटावे इतके अफाट कार्य कर्तृत्व श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी आपल्या बडोदा संस्थानात केलेले दिसते.

प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून ''श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांचे उच्च शिक्षण क्षेत्रातील योगदान'' या विषयावर अधिक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या संशोधन विषयाची व्याप्ती श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या शिक्षण क्षेत्रातील, त्यातही उच्च शिक्षण क्षेत्रातील योगदानापुरती मर्यादित असून या संशोधनासाठी संशोधकाने दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घेतलेला आहे.

**श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांचे शिक्षण :**

बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे उच्चशिक्षित व सुशिक्षित होते. इ.स १८७५ ते १८८१ हा त्यांच्या जीवनातील जडणघडणीचा अत्यंत महत्त्वाचा काळ होता. राज्य शिष्टाचाराचे प्रशिक्षण, राज्यकारभाराचे प्राथमिक धडे त्यांना याच काळात मिळाले. या काळात त्यांना केशवराव पंडित आणि व्यंकटराव जोशी यांनी शिक्षक म्हणून सर्व प्रकारचे शिक्षण उत्तम पद्धतीने दिले तसेच इंग्रजी शिक्षणासाठी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्यासाठी खास एफ. इलियट या प्रशिक्षित इंग्रज आधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. या सर्वांच्या चोख मार्गदर्शनाखाली श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांचे शिक्षण पूर्ण झाले. त्यामुळे त्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन अत्यंत उदारमतवादी व व्यापक स्वरूपाचा दिसतो.

**श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांचे शिक्षण विषयक कार्य :**

शिक्षण हा श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. महाराज सत्तेवर आल्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्राकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते. शिक्षण म्हणजे केवळ पदव्या घेणे नव्हे तर शहाणपणा अंगी बानविणे, अशी व्यापक व्याख्या महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येते. महाराजांचे दत्तक विधान मंजूर झाल्यानंतर त्यांनी ताबडतोब शिक्षण विषयक कार्याला अधिक प्रेरणा दिली. दत्तक विधान मंजूर होण्यापूर्वी म्हणजे १८७१ पर्यंत बडोदे संस्थानात केवळ दोन गुजराती शाळा आणि दोन मराठी शाळा चालवल्या जात होत्या. (संदर्भ राजेंद्र मगर २००२) श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, तांत्रिक व उच्च शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याचे पुरावे मिळतात.

**श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांचे उच्च शिक्षण क्षेत्रातील योगदान :**

श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी आपल्या संस्थानात उच्च शिक्षणाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले दिसतात. विविध महाविद्यालयांची स्थापना असो, तांत्रिक शिक्षण संस्थांचा प्रचार, तज्ञ प्राध्यापकांच्या नेमणूका, शिक्षण तज्ञांना दिलेला राजाश्रय, उच्च शिक्षण घेणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना खास शिष्यवृत्ती, राज्यातील शिक्षण संस्थांना खास अनुदान, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची

ISSN No. 2394-5990

स्थापना, व्यवसायिक शिक्षण संस्थेला प्रोत्साहन, खास वसतिगृहांची स्थापना, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर बक्षीस, कृषी विषयक अभ्यासक्रमांना मान्यता व शिक्षणासाठीचे विशेष अनुदान अशा विविध बाबतीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी विशेष धोरण अवलंबिलेले दिसते.

या बरोबरच भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्यांसाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्ती अशा विविध प्रकारे श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांचे उच्च शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदान दिसून येते. या संदर्भातील अधिक अभ्यास पुढीलप्रमाणे दिसून येतो.

**महाविद्यालयांची स्थापना :**

१८८१ हे वर्ष बडोदा संस्थानात व भारतात महत्वपूर्ण ठरले. कारण यावर्षी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात एक धाडसी ऐतिहासिक निर्णय घेतला. याच वर्षी बडोदे कॉलेज या उच्च महाविद्यालयाची स्थापना झाली. श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी या महाविद्यालयासाठी भरीव आर्थिक तरतूद केली होती. या महाविद्यालयाच्या इमारतीसाठी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी त्या काळात ६ लक्ष निधी मंजूर केला होता.(संदर्भ आपटे, १९३६ ) हे महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी एक वरदानच ठरले होते. संस्थानातील विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणी या निमित्ताने मिळाली.कला, वाणिज्य व विज्ञान याबरोबरच शेती विकासाचे शिक्षण सुद्धा या महाविद्यालयातून दिले जात होते.

**नामवंत व तज्ञ प्राध्यापक, प्राचार्यांच्या नेमणूका :**

श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज अत्यंत कल्याणकारी व हुशार राजे होते. आपल्या संस्थानातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे हा त्यांचा ध्यास होता. याच उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी महाराजांनी बडोदे महाविद्यालया तज्ञ, नामवंत प्राचार्य व प्राध्यापकांच्या नेमणुका करण्याचे स्पष्ट आदेश दिले. त्यामुळेच या महाविद्यालयाची कीर्ती त्या काळात देशभर पसरलेली दिसून येते. या अनुषंगाने महाराजांचे एक चरित्रकार य.रा. दाते म्हणतात की,बेल, क्लार्क ,मसानी यासारखे विद्वान व नानावलेले गृहस्थ बडोदा कॉलेजचे प्राचार्य होऊन गेले. त्याचप्रमाणे सर मनुबाई मेहता, टी.के. गुजर, अरविंद घोष, मिडलटन, आर्ते, विजेरी यासारखे हिंदुस्थानातच काय जागतिक प्रसिद्धी मिळवलेले गृहस्थ या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. (संदर्भ दाते १९३३)

**औद्योगिक, व्यवसायिक शिक्षणाचा प्रसार :**

ज्या काळामध्ये औद्योगिक व व्यवसाय शिक्षणाला फारसे महत्त्व प्राप्त नव्हते अशा काळात श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच उद्योगधंद्याचे शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाचा प्रचार करण्याचा निर्धार पक्का केला. अशा प्रकारचे अनेक संस्था आपल्या महाविद्यालयात स्थापन केल्या व अनेकांना प्रेरित केले, प्रोत्साहन दिले. अशा पद्धतीचा हा पहिलाच प्रयत्न सायाजीराव गायकवाड महाराज यांनी भारतात केलेला दिसून येतो. केवळ औद्योगिक व व्यवसाय शिक्षण संस्थेसाठी महाराजांनी बडोदे येथे म कलाभवन म या नावाची स्वतंत्र संस्था स्थापन केली होती.या संस्थेचे प्राचार्य म्हणून प्रोफेसर गुजर यांना नेमण्यात आले होते. या महाविद्यालयात रंगशाळा, चित्र शाळा, शिल्प शाळा, यंत्रशाळा, विणकाम शाळा असे विविध विभाग होते. ही संस्था त्या काळामध्ये अतिशय नावारूपाला आली होती. इ. स. १९०४ साली एकूण ६४५ विद्यार्थी या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत होते अशी अधिकृत नोंद मिळते. (राजेंद्र मगर, २००२)

**उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती :**

संस्थानातील हुशार, होतकरू विद्यार्थ्यांसाठी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज नेहमीच आघाडीवर असत. आपल्या राज्यातील सर्व विद्यार्थ्यांनी शिकून मोठे व्हावे, देशसेवा करावी. आपल्या संस्थानाच्या नावलौकिक व्हावा ही त्यांची तळमळ होती. त्यासाठी देशांतर्गत त्यांनी विविध शिष्यवृत्ती जाहीर केल्या होत्या. महाराजांच्या शिष्यवृत्ती देण्याचा हेतू देशहिताचा व राष्ट्रप्रेमाचा होता असे स्पष्ट होते.

१८९२ ते १८१८ या कालावधीत बडोदे संस्थानात दरमहा १६५ रुपये ची शिष्यवृत्ती विविध अभ्यासक्रमासाठी दिली जात होती. यामध्ये बी.ए., इंटरमिजिएट, बीएससी द्वितीय वर्ष, बीएससी प्रथम वर्ष, कृषी अभ्यासक्रम अशा विविध अभ्यासक्रमासाठी दर महा ३० रुपयांची शिष्यवृत्ती एकूण १४ वर्गांसाठी दिली जात होती. असे दरमहा १६५ रुपये केवळ शिष्यवृत्तीसाठी खर्च करणारे त्या काळातील बडोदा हे एकमेव संस्थान होते. त्यातूनच दानशूर अशा प्रकारच्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या उच्च शिक्षणाचा उदार दृष्टिकोन आपल्या लक्षात येतो.( मगर, २०२२.)

**महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मंजूर केलेल्या शिष्यवृत्ती ची रक्कम :**

बडोदे संस्थांच्या वतीने दरवर्षी विविध प्रकारच्या २२ शिष्यवृत्ती दिल्या जात होत्या. त्यापैकी १७ शिष्यवृत्ती संस्था तर्फे तर बाकीच्या विविध दानशूर व्यक्तींच्या मदतीने दिल्या जात होत्या. सर्वसाधारणपणे १९०३-४ ते १९९९ या कालखंडात

बडोदा संस्थांच्या वतीने मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम पुढीलप्रमाणे मिळते. १९०३-४ (९२ २८) १९०४- ५ (११ ३९७ ) १९ ०६-७ (१० १७४) १९०७ -८ (१० ७८१) १९०८ -९ (२९ २०६) १९०९ -१० (२९ २०६) १९१० - ११ (१० २००८) अशा प्रकारच्या स्पष्ट नोंदी विविध कागदपत्रातून मिळतात. (संदर्भ -राजेंद्र मगर २०२२)

**तांत्रिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी तांत्रिक शिक्षणासाठी खास शिष्यवृत्ती जाहीर केली होती. मासिक १०० रुपये दरवर्षी दोन मुलांना देण्यात येत होते. याशिवाय श्रीमंत पिलाजीराव तांत्रिक शिष्यवृत्ती १२ रुपयाची खास बडोदा प्रांतासाठी व सहा प्रांत पंचायत शिष्यवृत्ती त्यात बडोदा, नवसारी या विभागासाठी प्रत्येकी सात रुपयांच्या शिष्यवृत्ती देण्यात येत असत .या सगळ्या शिष्यवृत्ती विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येत असत. त्याबरोबरच सेठ नारायण भाई यांनी सुरू केलेली २५ रुपये रुपयाची प्रोफेसर टिके गुजर शिष्यवृत्ती खास केमिकल टेक्नॉलॉजी विषयातील सर्वोत्तम विद्यार्थ्यांना दिली जात असे. त्याबरोबरच चार रुपये प्रति महिना असलेल्या दोन शिष्यवृती व दिवाण बहादूर धामणस्कर स्मृती शिष्यवृत्ती मेकॅनिकल व केमिकल टेक्नॉलॉजी विषयातील विद्यार्थ्यांना दिली जात असे; तर दहा रुपयांच्या चार शिष्यवृत्ती मेकॅनिकल इंजिनिअर या अभ्यासक्रमासाठी दिल्या जात होत्या. या शिष्यवृत्ती नानावटी मेमोरियल ट्रस्टच्या माध्यमातून दिला जात होत्या.

त्याबरोबर मराठा समाजातील खास विद्यार्थ्यांसाठी मराठा शिष्यवृत्ती फंडातून प्रत्येकी ८ रुपयांच्या सहा शिष्यवृत्ती आणि महाराणी फंडातून प्रत्येकी १० रुपयाच्या ६० शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना दिल्या जात असत. याबरोबरच केमिकल टेक्नॉलॉजी च्या अंतिम परीक्षेत सर्वोत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास खास शिष्यवृत्ती दिली जात असे. अशा प्रकारे सरकारतर्फे संस्थेतील सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी २०० रुपयाची इतरही बक्षीसे दिले जात होती. अशा प्रकारचे अनेक शिष्यवृत्ती महाराजांनी सुरू केल्या होत्या. त्यातून आपल्या संस्थानातील गरीब समाजास शिक्षणाला मदत व्हावी हा त्यांचा उदात्त हेतू होता. याबरोबरच खाली नमूद केलेल्या प्रांताकडून त्या त्या प्रांतातील विद्यार्थ्यांना खास शिष्यवृत्ती देण्याचे आदेश महाराजांनी दिले होते.

३० रुपयाची एक शिष्यवृत्ती सावंतवाडी प्रांत
२५ रुपयाची शिष्यवृत्ती धारणगडा प्रांत
२० रुपयाची एक शिष्यवृत्ती देवास प्रांत
१५ रुपयाची एक शिष्यवृत्ती भावनगर प्रांत
१३ रुपयाच्या दोन शिष्यवृत्ती जामनगर प्रांत
१० रुपयाची एक शिष्यवृत्ती पलटण प्रांत
१० रुपयाची एक शिष्यवृत्ती नांदोद प्रांत.

अशा प्रकारे आपल्या राज्यांतर्गत प्रांतामध्ये सुद्धा विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती देऊन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्याचे धोरण महाराज सयाजीराव गायकवाड महाराजांनी अवलंबलेले दिसून येते. (संदर्भ राजेंद्र मगर, २००२)

**खाजगी सेवकांच्या मुलांना शिष्यवृत्ती :**

श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांच्या खाजगी सेवेत अनेक व्यक्ती पिढी जात काम करत असत. त्यांना पगाराबरोबर इतरही लाभ मिळावेत यासाठी काही उपाययोजना केल्या होत्या. त्यातील एक महत्त्वाची योजना म्हणजे महाराजांच्या खास सेवेत असणाऱ्या व्यक्तींच्या मुलांना शिष्यवृत्ती देऊन त्यांना आर्थिक मदत करणे व राज्यकारभाराच्या सेवेसाठी त्यांच्या शिक्षणाचा उपयोग करून घेणे. महाराजांनी या शिष्यवृत्ती देताना त्या कोणत्या निधीतून दिल्या जात होत्या याचा स्पष्ट उल्लेख केलेला होता. आपल्या भारतात प्राचीन काळापासून राजे महाराजांवरचे संकटे टाळावे म्हणून अनेक लोक द्रव्यरूपाने ओवाळण्या टाकत व त्यांच्या अंगावरून काही वस्तू समर्पितही करत असत. या सर्व वस्तू व रोख रकमा जमा केल्या जात असे. या सर्व निधीला सतका निधी म्हटले जात असे. सतका किंवा सदगा हा अरबी शब्द असून त्याचा मूळ अर्थ समर्पण असा होतो. परंतु ओवळण्याची वस्तू सामान्यतः द्रव्य असल्यामुळे अशी ओवाळणी केलेल्या वस्तू सतका म्हणण्याची पद्धत रूढ झाली. अशा समर्पण केलेल्या वस्तू किंवा ओवाळणी केलेले द्रव्य खाजगीतील सेवक आपापसात वाटून घेत. परंतु पुढे ही रक्कम एका मुख्य रवानगीत जमा करण्यात आली. जास्त रक्कम जमा झाल्यानंतर ते वाटून घेण्याची पद्धत रूढ झाली. परंतु काही वेळा रकमा जमा करणारे ज्यांच्याकडे रकमा जमा केल्या जात त्या परस्पर हडप करत असत यामुळे वाद होऊ लागले. हे वाद कधी कधी महाराजांपर्यंत जाऊ लागले. त्यामुळे महाराजांचा वेळ आणि शक्ती वाया जाऊ लागली. त्यावेळी महाराजांनी नियम तयार केले आणि अशा प्रकारच्या स्वतंत्र निधी तयार करण्याची तरतूद केली. त्या द्रव्याचा योग्य उपयोग व्हावा म्हणून त्यातून खाजगी नोकरांच्या मुलांना शिष्यवृत्तीसाठी रक्कम देण्याचे ठरवण्यात आले. अशा पद्धतीचा योग्य व समर्पक निर्णय श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी घेतल्यामुळे खाजगी सेवकाच्या मुलांच्या शिक्षणाची सुद्धा उत्तम प्रकारचे सोय झाली.

ISSN No. 2394-5990

**महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शिष्यवृत्तीतून उच्च शिक्षण घेतलेले गुणवंत विद्यार्थी :**

बडोदय संस्थांच्या वतीने भारतातील गुणवंत हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना प्रदेशात जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी विशेष शिष्यवृत्ती देण्यात येत असे. श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या उदार मदतीने भारतातील या काळातील सुमारे ८८ विद्यार्थ्यांनी परदेशात उच्च शिक्षण घेतल्याच्या महत्वपूर्ण नोंदी मिळतात. या महत्त्वाच्या योजनेत लाभ घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सूची संक्षिप प्रमाणे पुढील प्रमाणे मिळते.

भीमराव रामजी आंबेडकर, श्रीधर व्यंकटेश केतकर, खासेराव जाधव, कॅप्टन माधवराव जाधव, विठ्ठल रामजी शिंदे, नामदेवराव रामचंद्रराव कदम, अल्लाउद्दीन, श्रीमंत संपतराव गायकवाड, लालसिंगराव गायकवाड, शंकरराव गायकवाड, बाबासाहेब गायकवाड ,भास्कर काशिनाथ भाटे, जनार्दन सखाराम कुडाळकर, ना गो कालेलकर, भानुप्रसाद दवे, वाकणीस, शंकरराव पगार, यशवंतराव पांढरे, विश्वासराव घाटगे, रावजी भाई पटेल ,नानावटी, मालती बेडेकर ,लीलावती भागवत, कृष्णाबाई केळवकर, अमृतराज शास्त्री, राधाबाई पवार, स्नेहलता पगार, पी आर नंदुरबारकर, श्री त्रिवेदी, गजाननराव गणपतराव फुले ,एम एस शितोळे, व्यंकटराव धुळप ,नानासाहेब शिंदे, दादासाहेब शिर्के, दामाजीराव विठ्ठलराव गायकवाड, विजयसिंह अवचितराव गायकवाड, श्री आंबेगावकर ,कुमारी हंसाबेन, कांतीलाल, मनुबाई मेहता, वासुदेव रामचंद्र तळवटकर, वाय टी देसाई ,बी.बी .मोरे, डी आर घाडगे, एच आर राणे, मिस्टर हकीम ,बी.सी लेले ,डॉ. राधा कुमुद मुखर्जी ,हकीम सजा दल्ली, नानक मेहता, गुप्ता, मिसेस सावंत, मिसेस गोखले, पिनाकी प्रसाद देसाई, एमआर घडीयाली, जयराम सावंत, वासुदेव गोखले, एस.टी. पवार, रावजी भाई पटेल, मोतीभाई पटेल , मोतीवाला, अमीन चतुर्भाई ,के जी नाईक, निळकंठराव राणे, रामचंद्रराव नारायण जाधव ,रामचंद्रराव पवार, मल्हारराव साळुंखे, जिजाबा मोहिते, रामचंद्र माने पाटील, आबासाहेब बाळासाहेब मोहिते ,आप्पासाहेब गणपतराव पवार ,जी के पाटील, सिताराम रामजी तावडे ,एचडी निंबाळकर, केशवराव कंसारा ,ना.ग पडते, दिघे ,डॉ.दिवाणजी, शरदचंद्र दिघे, गजानन बाळकृष्ण प्रधान, श्री परमार, प्रोफेसर सोयरेस, आबासाहेब रामचंद्र चव्हाण, कल्याण भाई जोशी, व्ही वाय कशाळकर ,एस आर शिंदे, रमणलाल देसाई ,पी व्ही सामंत अशा एकूण ८८ व्यक्तींची माहिती मिळते. याशिवाय इतरही अनेक अनेकांना श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी प्रेरित केल्याचे दिसून येते.( स्त्रोत दानशूर महाराज सयाजीराव)

**गोषवारा :**

भारतातील थोर समाज सुधारकांमध्ये बडोदा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान ऐतिहासिक म्हणावे लागेल.सामाजिक, शैक्षणिक सुधारणेमध्ये पुढाकार घेणारा खऱ्या अर्थाने लोकराजा म्हणून त्यांचा उल्लेख इतिहासामध्ये अजरामर ठरतो.

प्रस्तुत शोधनिबंधात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शिक्षण विषयक धोरणाची चिकित्सा केलेली असून प्रामुख्याने उच्च शिक्षण क्षेत्रात श्रीमंत सयाजीराव महाराज यांनी दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकलेला आहे.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज हे सुशिक्षित राजे होते. शिक्षण या विषयावर त्यांची विशेष आस्था होती. म्हणूनच त्यांनी आपल्या राज्यकारभारात शैक्षणिक कार्याला विशेष महत्व दिलेले दिसून येते. बडोदे कॉलेज या नावाने स्थापन केलेले महाविद्यालय आणि इतर अनेक संस्था हे त्यांच्या कार्याचे स्मारक म्हणून आज उभे आहेत.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी उच्च शिक्षण क्षेत्राच्या प्रचारासाठी कला, वाणिज्य ,विज्ञान ,तांत्रिक, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा विविध संस्था उभ्या केल्या. म कलाभवन मनावाची त्यांची संस्था या दृष्टीने विशेष महत्त्वाची ठरते.

समाजातील गोरगरीब वंचित, हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती आपल्या संस्थांना जाहीर केलेल्या होत्या. याबरोबरच परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या हुशार व होतकरू विद्यार्थ्याला त्यांनी शिष्यवृत्ती दिली. त्यामुळेच भारतातील त्या काळातील सुमारे ८८ उच्चविद्याविभूषित भारतीय उच्च शिक्षण घेऊ शकले हा इतिहास नव्या पिढीला प्रेरणादायी आहे.बडोदा संस्थान आजही सुप्रसिद्ध आहे त्याची पाळेमुळे श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या शैक्षणिक दूरदृष्टीत होते हे स्पष्टपणे अधोरेखित होते.

**संदर्भ :**

१) मालकर यमाजी (संपादक) (२००२) ,दानशूर महाराज सयाजीराव गायकवाड ,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, प्रभादेवी, मुंबई.

२) आपटे य.ना.( १९३६ ), श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र, खंड १,२, बडोदे.

३) पगार एकनाथ (२००७) (संपादक) महाराज सयाजीराव गायकवाड यांचा पत्रसंग्रह भाग १ ते ३, प्रकाशक महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, छत्रपती संभाजीनगर

४) पवार निंबाजीराव (२००१), जेव्हा गुराखी राजा होतो! राजहंस प्रकाशन, पुणे.

५) राजेंद्र मगर लेखक (२००२,) महाराजा सयाजीराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

६) भांड बाबा( संपादक) (२००३), महाराजा सयाजीराव विचारधन, साकेत प्रकाशन, छत्रपती संभाजी नगर.

■■■

ISSN No. 2394-5990

# अस्पृश्यता निर्मूलन आणि समतावादी विचाराचे प्रवर्तक : महाराजा सयाजीराव गायकवाड

**१) श्री.विकास भुंजग चौधरी**
संशोधक विद्यार्थी
एम.ए.बी.एड सेट (इतिहास) सोलापूर
मो.नं. ९५५२४०७९०९
E-mail-vikaschaudhari0908@gmail.com

**२) श्री.प्रा.डॉ.दादासाहेब ना.पाटोळे**
संशोधक मार्गदर्शक
बाबूराव पाटील कॉलेज ऑफ ऑर्टस न्ड सायन्स
अनगर, ता.मोहोळ, जि. सोलापूर

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुलभुषण, कुळवाडी राजा छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्व जाती धर्माच्या मावळयांना एकत्र करुन जुलमी,हुकमती आणि परदेशी आक्रमकाच्या विरोधात बंड केले.त्यांनी स्वत:चे स्वराज स्थापन केले. या दैदिप्यमान इतिहास आपणा सर्वासमोर आहे. या पराक्रमी मावळयांनी आपले स्वराज्य पार अटकेपर्यंत घेवून गेले. परंतू स्वत:च्या स्वार्थापोटी स्वराजाची पार वाताहत झाली.

१८१८ साली पूर्ण भारत देशावर ब्रिटिशांचे हुकूमत सुरु झाली. त्यावेळी देशामध्ये छोटे मोठे असे संस्थानिकांत राजे राज्य करीत होते. पुढे हेच संस्थानिक ब्रिटिशांचे मांडलिक झाले. व त्यातून ब्रिटिश राज्य करु लागले.

ब्रिटिशांच्या अगोदरपासून भारतामध्ये मोठया प्रमाणवर वर्णव्यवस्था होती. या वर्णव्यवस्थेमध्ये वाईट चाली, रिती व परंपरा रुढ होत्या. परंतू ब्रिटिशांनी या चाली रितीवर कायदे करुन संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला.

१९ व्या शतकापासून नव्या विचारांचा प्रभाव सुरु झाला. त्यामुळे समाजातील विचारवंतानी वाईट चालीरिती विरुध्द बंड करुन विरोध करण्यास सुरुवात केली. त्याच्या कार्यास राजेमहाराजे व ब्रिटिशांनीही मदत केली. बडोदयाचे सयाजीराव गायकवाड हे त्यातील एक राजे होय.

सयाजीराव हे एक दत्तक पुत्र होते. त्यामुळे त्याचे लहानपण खेडेगावात केल्यामुळे त्यांना या गोष्टीची जाणिव होती. त्यामुळे त्यांनी स्वत:चा राज्यअभिषेक झाल्यानंतर आपल्या संस्थानातील वाईट चालीरिती बंद केल्या. त्याची सुरुवात त्यांनी स्वत: पासून केली.

आपल्या संस्थानातील अस्पृश्य निर्मूलनाचे कार्य करताना समाजातील विदवानाची व परदेशी विचारांची देवाण घेवाण करुन समाजामध्ये सामाजिक व शैक्षणिक कार्य केले. या कार्यासाठी समाजातील विचारवंताना आर्थिक मदत केली व त्यांच्या पुस्तके व ग्रंथृ वृत्तपत्रे यांना प्रकाशनासाठी आर्थिक मदत केली.

समतावादी, विचारांची महाराजांच्या मनावर खोलवर रुजली होती. त्यांनी गौतम बुध्दांचे तत्वज्ञान अंगीकारले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या राजवाडयात बुध्दांची मूर्ती प्रतिष्ठापना केली होती. व राज्यात पाली भाषेला राजाश्रय दिला. या समतावादी विचारांचा प्रचार व प्रसारांचे कार्य केले.

आधुनिक भारतातील अस्पृश्यता निर्मूलन चळवळीतील मुळ पुरुष म. फुले यांनी चळवळीची बिजे आपल्या मित्राच्या लग्नाच्या वरातीतून त्यांचा अपमान करुन त्यांना त्या वरातीतून बाहेर काढण्यात आले. हे त्यांच्या आत्मसन्मानाला पोहचलेली फार मोठी ठेच होती. यामुळे म. फुले यांच्या या घटनेचा आघात होऊन त्यांनी आपले जीवन अस्पृश्यांच्या उध्दारासाठी समर्जित केले. यांची सुरुवात लहुजी नावाच्या एका तालीमबाज मांग जातीच्या गृहस्थांच्या आखाडयात शारीरीक शिक्षण घेत असताना रुजली. त्यातूनच जातीच विषमतेच्या महान आंदोनलाची सुरुवात झाली. महाराज यांनी १८७७ साली वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी जाती भेदाची सर्व बंधने झुगारुन सयाजीरावांनी बंड केले. तर १८८२ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी संस्थानातील अस्पृश्यता आणि आदिवासी साठी मोफत शिक्षणाचा कायदा केला. त्यांनी गावकऱ्यांकडून अस्पृश्य बांधवाना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक या बाबीचा परिणांम त्यांच्या व्यक्तिमत्वावर झाला होता. भारतातील धर्मशास्त्राची चर्चा, संस्कृत ग्रंथ ते मध्ययुगीन संत त्याचप्रमाणे आधुनिक काळातील विविध सुधारणावादी चळवळीचा अभ्यास त्यांनी केला होता.

आधुनिक भारतात एक राजकीय व्यवस्था म्हणून राज्याच्या मुख्य कार्यक्रम पत्रिकेवरील मुलभूत कार्यक्रम हा दर्जा अस्पृश्यता निमूर्लन, या प्रश्नांना प्राधान्य देणारा पहिला राजा म्हणून महाराजांच्या कामाची दखल घ्यावी लागेल. याचे महत्वाचे

कारण म्हणजे त्यांची धोरणात्मक कार्यक्रम आणि संस्थात्मक पाठबळ हे अगदी म. फुले पासून ते डॉ.आंबेडकरांपर्यंत कसे होते हे आपणा सर्वांना ठाऊक आहे.

रामजी शिंदे अस्पृश्यता निवारणाचा आधुनिक इतिहास मध्ये लिहतात की अस्पृश्यता निवारण्याच्या भारतीय प्रयत्नाचा इतिहास मांडताना म. फुले, शशिपाद बंडोपाध्याय यांच्या नंतर तिसरा क्रमांक महाराज यांना दिला होता.

शशिकांत बंडोपाध्याय यांनी बंगालमध्ये अस्पृश्यता निवारणाचा पहिला प्रयत्न केला होता. तो त्यांचा प्रयत्न वैयक्तिक पातळीवर मर्यादीत होता. म. फुले अस्पृश्यतेच्या प्रश्नांची धारधार चिकित्सा करुन विचार आणि कृती अशा दोन्ही स्तरावर पायाभूत काम केले. परंतू या दोघांपेक्षाही सयाजीरावांचे काम दुर्लक्षित असले तरी मुलभूत आणि प्रेरणादायी आहे. कारण सयाजीरावांनी संपूर्ण राज्यसत्ता या प्रश्नांमागे उभी केली होती. ज्या धर्मसत्तेमुळे छ.शिवाजी राजांसारख्या वर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याच धर्मसत्तेच्या जोखंडातील एक राजा अत्यंत शांतपणे कल्पकतेने कधी धर्म सत्तेला गोंजारुन तर कधी तात्विक आव्हान देवून आपले ध्येय साध्य करुन घेतात, ही अतिशय असामान्य बाब आहे. महाराजांच्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या योगदानाला ऐतिहासिक महत्व आहे. मला स्वत:ला तुमच्या संबंधाने दलित हा शब्द वापरलेला आवडत नाही. तथापि तुम्ही दलित रहावे किंवा उच्च स्थितीला जावे ही गोष्ट सर्वस्वी तुमच्या परिश्रमावर अवलंबून आहे. निर्वाहाचे साधन प्राप्त करुन घेणे हा जरी तुमच्या साप्रंतच्या शिक्षणाचा हेतू असला तथापी त्या दृष्टिनेही तुम्ही आपली सुधारणा करुन घेतली पाहिजे.[१] (आपटे खंड २ १९३६ पृ.६८६-६८७)

अस्पृश्तेचा सिध्दांत आपल्या देशासाठी व्यक्ती आणि समाज म्हणून ही हानिकारक आहे. कारण आपल्या एकूण लोकसंख्येच्या एका मोठया गटास आपण या सिध्दांतामुळे व्यवस्थेबाहेर ठेवतो. ही बाब व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या विकासाला मारक आहे. हीच त्यांची दृष्टि एकूणच जातीय व्यवस्थेबाबत व्यक्त करते. आपण काल सुसंगत भूमिका घेण्याची गरज व्यक्त करते. संस्थानिक असताना राष्ट्र पुनर्निर्माणाचा विचार करणारा हा राजा खऱ्या अर्थाने भारताचा राष्ट्रीय नायक आहे.

महाजाराजांनी अस्पश्यता निर्मूलनासाठी संस्थानामधील अस्पयांना नोकऱ्या दिल्या. त्याच्या आर्थिक उध्दारासाठी कर्जे दिली. पतपेढया उभारल्या.

महाराजांनी वेगवेगळे रुंढी परंपरा चे विरोधात कायदे करुन त्या नष्ट केल्या. त्यांनी अस्पश्यता निर्मूलनासाठी पगंत पध्दत सुरु केली. अस्पयाच्या शिक्षणांसाठीशाळा, वसतीगृहे, निर्माण करुन शैक्षणिक साहित्य सुध्दा दिले, स्कॉलरशीप दिली. विदेशी शिक्षणासाठी मदत केली. अशा प्रकारे अस्पश्यता निर्मूलनासाठी कार्य आपल्या संस्थानामध्ये मोठया प्रमाणात केले.

**अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याची सुरुवात :**

जातीअंतक क्रांतीचे प्रणेते म.फुले यांनी मांडलेल्या राष्ट्रवादातील एकमय लोक ही संकल्पना जातविरहीत राष्ट्राची मागणी करते.

१९०९ मध्ये अस्पृश्यता निर्मूलनाशिवाय भारत म्हणजे राष्ट्रीय आत्महत्या आहे हा दिलेला इशारा म्हणजे अस्पृश्यता प्रश्नाबाबत मांडलेला समाज शास्त्रीय सिध्दांतच आहे.

१८७७ मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी अहमदाबाद येथे जाती भेदांची सर्व बंधने झुगारुन दिली. १८८२ मध्ये सयाजीरावांनी बडोदा संस्थानातील अस्पृश्य आणि आदिवासीसाठी मोफत शिक्षणाचा कायदा केला. या कायदयांचे वैशिष्ट असे की स्पृश्य-अस्पृश्य सहशिक्षणाचे कलम या कायदयांत घातले होते.

सयाजीरावांच्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याची सुरुवात त्यांनी आपल्या राजवाडयातील देवघरापासूनच केली. १८८३ साली त्यांनी राजवाडयातील खाजगी खंडेरायाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले गेले.

१८८६ सालामध्ये राजवाडयातील अस्पृश्यांसाठी वेग-वेगळया जेवणांच्या पंगतीची पध्दत सयाजीरावांनी स्वत: त्या पंगतीत बसून मोडली, हा पंगतीभेद मोडण्याचा आधुनिक भारतातील पहिलाच प्रयत्न असावा.

१८९१ मध्ये अस्पृश्यांसाठी खास वेगवेगळया १० शाळांची सुरुवात केली. १९०९ रोजी बडोदा संस्थानातील अस्पृश्यांसाठी ३३५ शाळा मध्ये ८२ हजार मुले-मुली शिकत होती. बडोदा संस्थानात अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत होते. वसतीगृह मोफत, कपडे, शैक्षणिक साहित्य हे सुध्दा मोफत होते. सुरुवातीच्या काळात १० ते १२ वर्षात अस्पृश्य वर्गांना शिकविण्यासाठी हिंदू शिक्षक मिळत नसल्यामुळे मुस्लिम शिक्षक नेमावे लागत होते.

पुणे येथील महार समाजाचे प्रमुख पुढारी शिवराम जानबा कांबळे व श्रीपतराव थोरात या दोघांना सयाजीरावांनी बडोदयास खास आमंत्रित केले. त्यांच्याशी विचार विनीमयानंतर त्यांचा योग्य सत्कार करुन राजमहालात आपल्या टेबलावर त्यांच्या बरोबर सहभोजन केले.

२३ जानेवारी १९१० रोजी बडोदयातील सर्व अस्पृश्य विद्यार्थ्यांना राजवाडयात जमवून मोठी मेजवानी दिली. त्यावेळी आपल्या संस्थानातील अस्पृश्य वर्गातील कामगारांची संख्याही शिक्षण खात्यात २००, लष्करातील १९, मुन्सिपालटीत-१०, पोलीसांत-७, सर्व्हे खात्यात-३, इत्यादी असे एकूण २४२

अस्पृश्य नोकरीत होते.[२] (अस्पृश्य जाती बाबा भांड २०१९, पृ.३४)

१९३६ मध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांनी राज्यकारभारांचा हिरक महोत्सव साजरा करताना खाजगी फंडातून अस्पृश्यांच्या उध्दारासाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्याच्या कृतीतून स्पष्ट केले होते.

१९३१मध्ये सयांजीरावानी हुकूम काढून हौद आणि विहार बांधल्यावर किंवा त्याची योजना सादर करताना अस्पृश्यांना त्याचा वापर करुन देणे. हे बंधनकारक केले. अस्पृश्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी आपल्या संस्थानातील २४खेडयांत २४ सहकारी पतपेढया, ३६० अस्पृश्य सभासदांच्या फायदयासाठी काम करत होते. सभासदांना थकविलेले कर्ज फेडीसाठी शेतीचे औजारे घेण्यासाठी आणि हातमाग खरेदीसाठी दरमहा ४४ आणे व्याजदराने कर्ज देण्यात आली होती.

१९३२ मध्ये हुकूम काढून सर्व सरकारी मंदिरे, अस्पृश्यांसाठी खुली केली.

बडोदा, नवसरी, पाटण, आणि सिधपूर नगरपालिकांमधील भंगी कामगारांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. या दलित जातीच्या भारतातील पहिल्या सहकारी संस्था ठराव्यात. दलित सहकारी संस्थाची संख्या १०९ तर सदस्य संख्या २४०८ इतकी होती.

चांभारांना कच्चा माल आणि हत्यारे घेता यावीत. म्हणून प्रत्येकी २०० रु बिनव्याजी आणि कर्ज फेडीच्या सुलभ अटीवर देण्यात येत होते. बडोदा संस्थानातील सर्व दवाखाने कोर्ट व इतर सरकारी कचेऱ्या व ग्रंथालये या सर्व ठिकाणी अस्पृश्यांना यांना मुक्त प्रवेश होता.[३] (शिंदे समग्र वाडमय खंड १ २००९, पृ.४५)

सरकारी काम करत असताना स्पृश-अस्पृश्याचे नियम पाळू नयेत असे स्पष्ट आदेश सयाजीरावांनी शासकीय कार्यालयांना दिला होता.

महाराजांनी विशेष विवाह कायदा करुन आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले. १९१२ साली अस्पृश्यांच्या सर्व मुलांना लक्ष्मीविलास राजवाडयात खाऊ वाटला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या इंदौरचे महाराज तुकोजीराव होळकर यांना हा प्रकार आवडल्यामुळे एक हजार शिष्यवृत्ती दिली. सयाजीरावांनी वेदाभ्यास हा सर्व जातीचा अधिकार आहे ही भूमिका घेवून अस्पृश्य व ब्राम्हणेत्तरांसाठी पहिली संस्कृत वेदशाळा सुरु केली.

स्वातंत्र मिळालेनंतर आपण सामाजिक समतेचा प्रश्न लोकशाही व्यवस्था स्विकारुन कायदयावर सोपवला. परिणामी जातीभेद वाढला, जातीय संघटना वाढल्या, इतिहासात कधी नव्हते इतके आपले सामाजिक जीवन जातीग्रस्त झाले. सयाजीरावांनी कायदयांची निर्मिती आणि अंमलबजावणी यावर अवलंबून न राहता समाजाच्या विविध घटकांना प्रगतीचे सर्व मार्ग आणि आवश्यक त्या सुविधा पुरवाव्या लागतील अशी जी भूमिका घेतली आहे, तिला त्यांच्या स्वत:च्या या संदर्भातील कामाचा आधार आहे कारण बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे इंग्लड, अमेरिकेपेक्षाही प्रगत कायदे सयाजीरावांनी बडोदयात केले.[४] (जनता वृत्तपत्र फेब्रु.१९३९)

**गौतम बुध्दांच्या समतावादी तत्वज्ञानाचे पुरस्कर्ते : सयाजीराव गायकवाड :**

डिसेंबर-१९१२ मध्ये बडोदा येथील जुबली बागेत महाराजांचया हस्ते गौतम बुध्दांची मूर्ती बसविण्यात आली. त्यावेळी ते आपल्या भाषणात म्हणतात की, मनुष्य गरीब असला किंवा खोटया समजुतीने केवळ जन्मावरुन नीच मानण्यात येणाऱ्या हलक्या वर्गात जन्माला असला तरी त्याचे वर्तन सदाचरणी आणि पवित्रता युक्त असेल तर त्यास मोठा आणि उत्तम वर्णाचाच समजले पाहिजे.

गौतम बुध्दांच्या समातवादी तत्वज्ञनाची जोपासना महाराजांनी किती विचारपूर्वक आणि दूरदृष्टीने केली होती याची प्रचीती येते. १८९८ मध्ये गुरुवर्य कृष्णराव अर्जूनराव केळूसकर यांनी लिहलेल्या मराठीतील गौतम बुध्दांचे चरित्र सयाजीरावांनी सयाजी ग्रंथमालेत प्रकाशित केला. महाराजांनी अनेक बौध्द धर्मग्रंथाच्या प्रकाशनाला अर्थसहाय्य केले. पालीभाषेला राजाश्रय देणारा हा आधुनिक भारतातील पहिला राजा होता. धर्मानंद कोसंबी या आधुनिक भारतात बौध्दधर्माचे पुर्नजीवन करणाऱ्या विद्ववानास बडोदयाचा राजाश्रय होता.धर्मानंद कोसंबी जो पर्यंत पुण्याच्या फर्ग्यसन कॉलेजमध्ये शिकत होते. तोपर्यंत पाली भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहिन्याला चार स्कॉलरशीप दिल्या जात होत्या. बडोदयाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या मनावर बौध्द धम्मांचा प्रभाव पडलेला होता. कारण त्या धम्माच्या तत्वज्ञानामध्ये समता, स्वातंत्र, बंधुता, आणि जातीभेद, उच्चनीचता, गरीब, श्रीमंत असे भेदभाव त्यांच्या विचारांत, कृतीत आणि धम्मात नव्हती. म्हणून त्यांच्यावर गौतम बुध्दांच्या धम्माचा प्रभाव पडलेला होता.[५] (सुखठणकर ज.स, धर्मानंद, आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे आत्मचरित्र व चरित्र)

**महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याकडून थोर समाजसुधारकांना मदतीचा हात :**

म.फुलेच्या मृत्यूनंतर सयाजीरावांनी सावित्रीबाईना पेन्शन सुरु केली. त्याच बरोबर महात्मा फुलेचा शेतकऱ्यांचा आसूड

हा ग्रंथ छापण्यासाठी महाराजांनी आर्थिक मदत केली. महाराजांनी ज्योतीरावाचा गौरव हिंदूस्थानाचा वॉशिंग्टन असा केला. अस्पृश्य जातीचे प्रश्न सरकारपर्यंत पोहचावेत आणि या समूदायांच्या हक्काचे संरक्षण व्हावे, यासाठी शिक्षण मंडळ आणि धारा सभेचे प्रथम सदस्य म्हणून पेटलाद येथील अत्यंज व्यापारी शिवरम यांची नेमणूक केली.

सयाजीरावांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील पदवी शिक्षणांसाठी पाच वर्षे व अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील उच्च शिक्षणांसाठी ४ वर्षे अशी सलग ९ वर्षे शिष्यवृत्ती दिली व त्यांनी बाबासाहेबांना अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी स्वत: पाठविले.

दि इव्हॅल्युशन ऑफ प्रोव्हींन्सल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया या नावाने लंडन मधील पी.एस. किंग ण्ड सन्स यांनी प्रकाशित केले. बाबासाहेबांनी हा ग्रंथ श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांना अर्पित केला.

१९३१ च्या गोलमेज परिषदेतील डॉ.आंबेडकरांचे व्दितापूर्ण भाषण आणि दलित व अस्पृश्यांबददलचे विचार ऐकल्यानंतर सयाजीरावांनी खुश होऊन डॉ.आंबेडकरांना लंडन मधील हॅन्स क्रिसेंट हॉटेलमध्ये पार्टी दिली ६(अस्पृश्य जाती बाबा भांड २०१९, पृ.३६) तसेच बाबासाहेबांच्या विनंतीपत्रानुसार अस्पृश्याता निर्मूलनासाठी १५० पौंडचा चेक दिला.

१९३३ साली विठठल रामजी शिंदे यांनी लिहलेल्या भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न हा ग्रंथ सयाजीरावांना अर्पण केला.

१९३७ मध्ये लंडनमधून प्रकाशित झालेल्या आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाने सयाजीराव महाराजांच्या हयतीत प्रकाशित केलेल्या चरित्र ग्रंथाचे लेखन् स्टेनले राईस यांच्या हिंदू कस्टमस आणि देअर ओरीजिन्स या ग्रंथाला लिहलेल्या प्रस्तावनेत सयाजीरावांनी अस्पृश्यतेला आपल्या प्रगतीच्या इतिहासातील डाग असे म्हटले आहे. राईसने हा ग्रंथ सयाजीराव गायकवाडांना अर्पण केला आहे.

अशा प्रकारे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या कारर्किदीत आपल्या संस्थानातील आणि देशातील इतर स्पृश्य अस्पृश्य जातीतील गरजूंना, दलितांना, विद्ववानांना सढळ हाताने मदत केली. या थोर महाराजांना त्रिवार अभिवादन !

**निष्कर्ष :**

बडोदयाचे महाराज सयाजीराव हे पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी आपल्या संस्थानातील अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले. त्याच बरोबर परदेशी विचारांचाही स्विकार केला. हे कार्य करणाऱ्या संस्थांना व हुशार विद्यार्थ्यांना त्यांनी आर्थिक मदत केली. तसेच ग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे यांच्या प्रकाशनासाठी मदत केली. मानवता बौध्द धर्माचा प्रचार व प्रसार केला. त्या धम्माला राजाश्रय दिला. आपल्या संस्थानातील सर्व सरकारी कार्यालये दप्तरे, मंदिरे, विहिरी व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली गेली. संस्थानातील जुन्य रुढी परंपरा मोडीत काढलया. त्याची सुरुवात स्वत:पासून केली.

हा आदर्श सर्वासमोर ठेवला. अशा प्रकारे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे महान कार्य आयुष्यभर केले. या थोर महाराजांस त्रिवार अभिवादन !

**संदर्भ सूची :**


१. आपटे दाजी नागेश, श्री महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र खंड १ ते ३, बडोदे प्रकाशन खुद, १९३६

२. अस्पृश्य जाती : महाराजा सयाजीराव गायकवाड, दुर्मिळ लेख, प्रकाशक-बाबा भांड सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था-२०१९.

३. पवार गो.मा.विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाडमय खंड,१, मुंबई महाराष्ट्र राज्य साहितय आणि संस्कती मंडळ - २००९.

४. डॉ.विशाल तायडे, महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सुधारणा भाग-१ शिक्षण पान नं.१७१ प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड. चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०२०, महाराजा सयाजीराव गायकवाड (The Indian review) अनुवादीत दिनेश पाटील.

५. सुखठणकर ज.स, धर्मानंद, आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे आत्मचरित्र व चरित्र, मुंबई धि गोवा हिंदू असोसिएशन, पुर्न. २०१५ (१९७६).

६. भांड बाबा, लोकपाट राजा सयाजीराव, औरंगाबाद, साकेत प्रकाशन, २०१३.

७. भांड बाबा महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची औरंगाबाद, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, २०१७.

८. कीर धनंजय, गुरुवर्य कृष्णराव अर्जून केळूसकर आत्मचरित्र व चरित्र, औरंगाबाद, साकेत प्रकाशन, २०१४.

- www.wikipedia.org.com
- www.Aarhat.com
- www.bbc.com
- www.sayajiraogaekwad.com
- www.alaukikmarathi.com


■■■

# समाज सुधारक राजा: महाराजा सयाजीराव गायकवाड

**डॉ.संगीता पांडुरंग पैकेकरी**
मराठी विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
९८२२४७०९०३

**प्रास्ताविक :**

भारतावर अनेक धार्मिक सत्ता प्रस्थापित झाल्या.ब्रिटिशांनी तर दीडशे वर्ष राज्य केले.इंग्रजांचे राज्य भारतात येण्यापूर्वी अनेक छोटे छोटे राज्ये व राजे होते. काही राज्यांनी खूप चांगले राज्य केले. शिवाजी महाराजांच्या नंतर राजा हा समाज सुधारक, समाजाचा हिताचे राज्य करणारे होते. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, ताराराणी महाराज,अहिल्यादेवी होळकर महाराज ,शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यासारख्या राजांनी राज्यकारभार करत समाज सुधारणाही केल्या. १९६० पूर्वी महाराष्ट्र व गुजरात एकच राज्य होते. कोल्हापूरच्या गादीवर शाहू महाराज व बडोद्याच्या गादीवर महाराजा सयाजीराव गायकवाड होते. या दोन राजांमध्ये काही समान गोष्ट होत्या.हे दोन्हीही राजे दत्तक आले होते. या दोघांनाही प्रगत शिक्षण दिले गेले. या दोघांनीही समाज सुधारणा केल्या.शाहू महाराजांना आयुष्य कमी मिळाले. मात्र सयाजीराव गायकवाड यांनी समाजात खूप सुधारणा तर केल्याच पण हिंदू धर्मातील जातीपाती व्यवस्थेलाही हादरा दिला व प्रगती केली.

राजे खंडेराव गायकवाड बडोदा गादीवर होते त्यांची पत्नी जमनाबाई होत्या. त्यांना मुलबाळ झाले नाही. अशात राजा खंडेरावांचा मृत्यू झाला. राज्य चालवण्यासाठी गादीला वारस पाहिजे.म्हणून शोधाशोध घेत असताना नाशिक जवळील कवळाना या गावी गायकवाड यांचे एक कुळ राहत होते. तेथील चार मुले बडोद्याला दत्तक घेण्यासाठी आणले राणीसाहेबांनी या सर्व मुलांना एकच प्रश्न विचारला तुम्हाला इथे का आणले आहे? तिघांनीही समर्पक उत्तरे दिले नाही. पण चौथ्या मुलांने मी राजा होण्यासाठी आलो आहे असे उत्तर दिले तोच मुलगा म्हणजे गोपाळ. गोपाळ हा काशीराम व उमाबाई यांचे अपत्य होते.गोपाळचा आत्मविश्वास पाहून जमना बाईंनी त्यांना दत्तक घेतले. २७ मे १८७५ ला राजभिषेक झाला. त्यांच्या नाव ठेवले सयाजीराव. राजमाता केशवराव पंडित आणि भाऊ मास्तरांनी त्यांच्या शिक्षणाचा श्री गणेशा केला. चारच महिन्यात वऱ्हाड चे शिक्षण संचालक ईलियट यांची शिक्षक म्हणून नेमणूक केली गेली. सरांनी त्यांचे सर्वतोपरी शिक्षण सुरू केले १८ व्या वर्षे राज्य कारभार सुरू केला. त्यांनी पहिल्यांदा राज्याचा पूर्ण दौरा केला समाजाचे प्रश्न समजावून घेतले व राज्यकारभार करण्यास सुरुवात केली.समाजात त्याकाळी जातीभेद वर्णभेद होता. तो पहिल्यांदा दूर करून तो मोडला. राजवाड्यात वेगवेगळ्या जातीच्या पंगती पडत असत. त्यांनी पक्तीभेद दूर करून पंक्ती दोनच केल्या एक शाकाहारी व दुसरी मांसाहारी सामाजिक सुधारणांची सुरुवात त्यांनी राजवाड्यापासूनच केली.

**शिक्षणाचे महत्त्व :**

शिक्षणाचे महत्व ओळखून त्यांनी आपल्या राज्यात शिक्षण सक्तीचे केले. १८८२ ला अस्पृश्य आदिवासींसाठी सरकारी खर्चाने सोनगड भागात शाळा सुरू केली. हा परिसर अत्यंत मागासलेला या मागासलेपणावर शिक्षण प्रसार हाच रामबाण उपाय होता म्हणून तेथे शाळा व वस्तीगृह बांधण्याचा आदेश काढला आणि त्या परिसराला सोनगडचे धनवा वस्तीगृह असे नाव देण्यात आले. सहा वर्षाच्या मुलगा किंवा मुलगी शाळेत आलेच पाहिजे.यासाठी कायदा केला विद्यार्थ्यांना पाटी पुस्तके सरकार पुरवू लागले. जो विद्यार्थी येत नाही तर त्याला दंड आकारला यातूनच बडोदा राज्यात गावोगाव शाळा सुरू झाली. तसेच महिलांना शिक्षण मिळावे म्हणून प्रौढ शिक्षण सुरू केले. मुस्लिम महिलांसाठी जनाना वर्ग सुरू केला. राज्यातील कुठलीच व्यक्ती अडाणी राहू नये ही खबरदारी सायाजी राजांनी घेतली होती. राजांना स्वतःला ही शिक्षणाची खूप आवड होती.

**खेळाचे महत्व :**

शिक्षणाबरोबर जीवनात आरोग्य हे महत्त्वाचे आहे. म्हणून त्यांनी प्रत्येक शाळेत क्रीडा शिक्षक आवश्यक आहे म्हणून प्रत्येक शाळेत शिक्षकाची भरती केली. गावोगाव व्यायाम शाळा उघडल्या तालमी उघडल्या. त्याचबरोबर क्रीडामाला नावाचे मराठी खेळाचे पुस्तक छापले.

**फिरते वाचनालय :**

शिक्षण सुरू केल्यानंतर नुसते शिकून उपयोग नाही. त्यांना काहीतरी अजून द्यायला हवं यासंदर्भात सयाजीराव गायकवाड म्हणत मलोकांना आधी शिक्षण तर द्यायचे व नंतर मात्र त्या दृष्टीने कसली साधने उपलब्ध करून द्यायची नाहीत हा घोर अपराध नसला तरी ही उघड उघड विसंगत गोष्ट आहेफ म्हणून त्यांनी ग्रंथालय चळवळ सुरू केली. म्हणून वाचनालयाची व्यवस्था केली. वाचनाने मन व मेंदू तल्लख होतो. म्हणून प्रत्येक गावात वाचनालयाची स्थापना केली. वाड्या वस्तीवर फिरते वाचनालय सुरू केले. वाड्या आणि पाड्यावर पत्र्याच्या पेटीतून तीस पुस्तकांचा संच दिला जाऊ लागला. त्यास सयाजी वैभव असे म्हणत.

**शेतीची व्यवस्था :**

भारत हा शेतीप्रधान देश आहे.शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे शेती आणि शेतकरी अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती व शेतकऱ्यांची अवस्था पाहून वारंवार पडणारा दुष्काळ अवाजवी महसूल वसुली सरकारी पाशातून शेतकऱ्यांची परवड होते. यावर उपाय म्हणून सयाजीराजांनी शेतीसाठी लागणारे पाणी त्या पाण्याचे व्यवस्थापन केले. विहिरी खोदणे, नदी नाल्यांना बांध घालून, पाणी जिरवणे, अडवणे यासारखे कामे केली.तसेच शेतात गुरे घुसून पिकांची नासाडी करत असतात म्हणून महाराजांनी गुरे मोकाट सोडणाऱ्यांना शिक्षा करणारा कायदा केला. सयाजी राजे यांनी शेतीपूरक व्यवसायात प्रगती केली या कामासाठी दरवर्षी शासन साडेसातलाख खर्च करत असे. त्यामुळे शेती व्यवसायात प्रगती झाली. शेती चांगली यावी यासाठी नवनवीन बियाणांचे वाटपही केले.

**नवीन ग्रंथांना प्रोत्साहन :**

भारतातील अमूल्य ठेवा संस्कृत हस्तलिखिते पोथ्यांमध्येच आहे हे ओळखून महाराजांनी भारतातील सर्व भागातून हस्तलिखिते जमा करण्याचे ठरवले. हे काम अनंत कृष्ण शास्त्री यांच्याकडे सोपवले. भारतभर फिरून शास्त्री यांनी हस्तलिखिते गोळा केले. हस्तलिखितांच्या बदल्यात बऱ्याच वेळा त्यांना फार मोठा मोबदला द्यावा लागला. तो महाराजांनी दिला. त्यांनी बडोदा व इतर ठिकाणची मिळून १३००० हस्तलिखिते जमा केली. यासाठी महाराजांनी प्राच्यविद्या नावाची संस्था काढली. ही हस्तलिखिते नष्ट होऊ नयेत म्हणून त्यांच्या संशोधित प्रति तयार करण्यास सांगितल्या व त्या म गायकवाड ओरिएंटल सिरिजफ मधून प्रकाशित करण्यात आल्या. त्यामुळे नष्ट होणारा अमूल्य ठेवा जतन केला गेला. इ. स. १९४३ साली या संस्थेच्या ग्रंथ शाळेत १४ हजार हस्तलिखिते व बारा हजार छापील ग्रंथ होते. यामुळे वाङ्मयात भर पडली. नष्ट होणारे साहित्य जतन झाले. त्यासाठी धडपड करणारा हा जगा वेगळा राजा होता. त्यांनी काही नव ग्रंथ निर्मिती करणाऱ्यास ग्रंथ छापण्यास मदत केली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या मशेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथास महाराजांनी छापाई करण्यासाठी मदत केली. तो ग्रंथ आधी महात्मा फुलेंकडून ऐकून घेतला. त्याचे कौतुक केले व छापाईस पैसे दिले. याचा पुरावा महात्मा फुले यांच्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकाच्या प्रस्तावनेत सापडतो. महाराष्ट्र शब्दकोशकार य.रा.दाते हे शब्दकोश तयार करत होते. हे समजल्यावर महाराजांनी त्यांना दहा हजार रुपयाची मदत केली. व शब्दकोश लवकर पूर्ण करण्यास शुभेच्छा दिल्या. डॉक्टर केतकर यांना ज्ञानकोश तयार करण्यासाठी ज्ञानकोश पूर्ण होण्या अगोदर मदत केली. त्यामध्ये गुजराती ज्ञानकोशासाठी पाच हजार रुपये तर मराठीत कोशासाठी दोन हजार रुपये किंमतीच्या प्रति विकत घेतल्या. रिया सतकार सरदेसाई हे प्रथम पासून बडोद्यात नोकरीला होते महाराजांनी त्यांना लिहिण्याची प्रेरणा दिली रिया सतकार सरदेसाई पेशवे दप्तरातील कागदपत्रे मुंबई सरकारतर्फे प्रकाशित करत होते. त्यासाठीही महाराजांनी ३००० रुपयाची मदत केली. सरदेसाईंनी बडोद्यात असतानाच लेखनाला प्रारंभ केला होता. महाराजांच्या सांगण्यावरून त्यांनी मराज्यधर्मफ हा ग्रंथ भाषांतर केला होता. अशा अनेक अभ्यासकांना नवलेखांना सयाजीराव गायकवाड यांनी मदत केली व साहित्यात मोलाची भर घातली.

सयाजीराव राजाने ६४ वर्ष राज्य केले. एवढा दीर्घकाळ राज्य करणारे भारतातील पहिलेच राजे होते. एवढेच नाही तर एक विद्वान प्रज्ञावंत राजा म्हणून हे त्यांचे वेगळेपण लखलखणारे आहे. दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद शिकागो, पाचवी मानववंश परिषद ऑक्सफर्ड लंडन ,जागतिक प्राच्यविद्या परिषद, अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलन दिल्ली, अखिल भारतीय साहित्य संमेलन कोल्हापूर ,अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद मुंबई, अखिल भारतीय औद्योगिक प्रदर्शन अहमदाबाद ,अखिल भारतीय आर्य समाज संमेलन अखिल भारतीय सामाजिक परिषद ,अखिल भारतीय हिंदी औद्योगिक परिषद कलकत्ता, अखिल भारतीय संस्कृत साहित्य संमेलन , अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद पुणे या संमेलनाचे परिषदाचे अध्यक्ष स्थान सयाजी राजांनी वेळोवेळी भूषवले होते. त्यामुळे त्यांनी केलेली त्यावेळची भाषणे उपलब्ध आहेत ते त्यांच्या विद्वत्तेची आणि या

व्यासंगाची साक्ष देणारी आहेत.बहुजन समाजाला शिक्षणाचे व्दारे उघडणारे कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कार्याकडेही महाराजांचे लक्ष होते. त्यांनी कर्मवीरांनी भरपूर मदत केली होती. प्रत्यक्ष भेटीचा योग लांबला कर्मवीर भाऊराव पाटलांनी सयाजीराव महाराजांना सातारा येथील शाहू छत्रपती बोर्डिंगला भेट देण्यासाठी बोलावले होते. यावेळी महाराज आवर्जून आले आमराईत मुलांच्या कुडाच्या झोपड्या उभ्या होत्या. शंभर मुले महाराजांच्या स्वागतासाठी सज्ज होती.हार तुरे झाले. आंब्याच्या झाडाखाली खुर्च्या टाकल्या होत्या. भाऊराव महाराजांचे स्वागत करत म्हणाले मश्रीमंत महाराज साहेब, माझ्यासारख्या फकीराच्या आमंत्रणास मान देऊन या संन्याशाच्या झोपडीत आलात.१९०६ ला मी आपले वृत्तपत्रातील भाषण वाचले. आपण म्हणालात, या देशात उर्जित अवस्था येण्यासाठी गरिब आणि अस्पृश्य मुलांना शिकवले पाहिजे. तेव्हाच निश्चय केला गरीब अस्पृश्य मुलांना शिकवायचा आणि हे काम सुरू केले. आपली मदत स्वीकारले .आपणच आमचे प्रेरणास्थान आहात .या वक्तव्यावरून असे जाणवते की कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शिक्षणाच्या प्रेरणे पाठीमागे महाराजा सयाजीराव गायकवाडच होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी ६४ वर्ष राज्य केले. साठ वर्षाचा हीरक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.त्या कार्यक्रमात महाराजा सयाजीराव गायकवाड म्हणाले मआम्ही साठ वर्षांपूर्वी कवळाणा जन्म गावाहून बडोद्यास आलो. राजा बनलो. नंतर शिकलो. शिक्षणाने आम्हाला तिसरा डोळा लाभला. ते शिक्षण आम्ही प्रजेला दिलं. अज्ञान आपला शत्रू आहे. शिक्षणाने त्यावर मात करा. प्रजाकल्याणातच आम्ही मोक्ष शोधला. देशासाठी एक हवी. जाती धर्माची भांडण आपण सोडली पाहिजे. देशाचे आणि आपले चरित्र निष्कलंकित हवे. आम्ही आमच्या परीने जपले. नियम मोडले की शिक्षा होते. निसर्गातही असेच घडते. दुष्काळ आणि अवर्षण ही शिक्षाच आहे. पाणी सोन्याहून मौल्यवान आहे. जपून वापरा. संपले तर कशानेही विकत मिळणार नाही.खुळ्या चालीरीती सोडा. शिक्षणाने विज्ञानाची कास धरा. ग्राम विकास हेच राष्ट्र कार्य आहे. शेती उद्योग आमच्या देशाचा प्राण आहे. कारभाऱ्याने ह्याचे ध्यान ठेवावे. आज जग झपाट्याने पुढे जात आहे. आपण मागे राहता कामा नये. विकसित देशांबरोबर येण्यासाठी शिक्षण आणि विज्ञान हाच मार्ग आहे. ह्याची कास धरली नाही, तर आपण जगाच्या पन्नास वर्षे मागे पडू. बलसंपन्न भारताचे माझे स्वप्न आहे.एकेकाळी भारत संपन्न, बलशाली देश होता ते वैभव पुन्हा मिळावे ते आमचे तरुण- तरुणीच पूर्ण करतील ही मुलेच आमचे खरी संपत्ती आहे. त्यांना मी एक यशाचा मंत्र सांगत आहे .जीवनात यशस्वी होण्यासाठी ही चार सूत्रे अंगीकारावी. स्वतःला झोकून देऊन आपल्या आवडीच्या क्षेत्रात कष्ट करा. त्याला प्रामाणिकपणाची जोड द्या. देशप्रेम विसरू देऊ नका आणि शेजाऱ्यांशी बंधू भावाने वागा. यातून उद्याचा बलसंपन्न भारत घडणार आहे. असे मत त्यांनी आपल्या हीरक महोत्सवी भाषणांमध्ये दिले. या त्यांच्या विचारातून असे दिसते की भारत हा संपन्न देश घडला पाहिजे या संपन्न देश घडवण्यासाठी ज्ञानाची व विज्ञानाची कास धरली पाहिजे पण आज आपण पाहतो की असे दिसत नाही

**महत्त्वाच्या प्रमुख सुधारणा :**

१. बडोदे राज्यात म्युनिसिपाल्ट्यांची स्थापना १८९२
२. सक्तीच्या मोफत शिक्षणाचा आरंभ १८९३
३. राजघराण्यात वेदोक्त विधीची सुरुवात १८९६
४. धर्म स्वातंत्र्याचा कायदा मंजूर १९०२
५. स्थानिक पंचायतीचा कायदा मंजूर १९०३
६. स्पेशल मॅरेज क्टमंजूर१९०४
७. बालविवाह प्रतिबंधक कायदा मंजूर १९०४
८. ग्रंथालयाचा प्रसार १९०७
९. मराठी गुजराती व हिंदी ग्रंथ प्रकाशन १९०९
१०. पुरोहित कायदा मंजूर १९१५
११. हिंदू स्त्रियांना घटस्फोटाचा हक्क १९२०
१२. अस्पृश्यांना सरकारी देवालयात प्रवेश १९३२
१३. हिंदू सगोत्र विवाहाचा कायदा १९३२
१४. हिंदू स्त्रियांना वारसा हक्काचा कायदा १९३४

असे कायदे करून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी समाजात सुधारणा केल्या. वंचितांना अस्पृश्यांना सन्मानाने जगण्याचा कायदा करून त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. या थोर राजाला शतशः प्रणाम.

**संदर्भ ग्रंथ :**

१. लोकपाळ राजा- सयाजीराव - लेखक - बाबा भांड, साकेत प्रकाशन
२. जेव्हा गुराखी राजा होतो- लेखक निंबाजीराव पवार
३. जीवनवेध- संपादक डॉ.स्नेहल तावरे डॉ. शिरीष लांडगे

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शेतीविषयक विचार

**प्रा. डॉ. रूपाली गोवर्धन दिकोंडा**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
ता. माढा, जि.सोलापूर.
मोबाईल -९९२२६१५१२०, ईमेल : dikonda.rupali2904@gmail.com

**घोषवारा :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजरात मधील बडोदा या संस्थांनचे राजे होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या सत्तेचा व अधिकाराचा वापर जनतेच्या कल्याणासाठी केला. लोककल्याणकारी भूमिकेद्वारे त्यांनी समाज सुधारणेच्या चळवळीतला चालना दिली. त्यांच्या एकंदर कार्याचा महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या चळवळीलाही बराच लाभ झाला होता. महाराष्ट्रात समाज सुधारण्याचे कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना सयाजीराव गायकवाड यांनी सक्रिय मदत केली. सयाजीराव गायकवाड हे शेतकऱ्याचा मुलगा असल्याने त्यांच्या मनात शेतकऱ्या विषयी आपुलकीची भावना होती. विहिरी खोदणे, जलसिंचनाची सोय करणे, शेतीतील संशोधनासाठी शिष्यवृत्ती देणे . लोकोपयोगी काम सयाजीराव गायकवाड यांनी केले आधुनिक महाराष्ट्राच्या विचारांची दिशा ठरवण्याचे काम केले. महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषाप्रमाणेच बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे देखील कार्य मोठे आहे . सयाजीराव गायकवाड यांचे महाराष्ट्रामध्ये बालपण गेले सयाजीराव गायकवाड यांचे मूळ गाव महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील भरे हे होय. गायकवाड घराण्याचे मूळ पुरुष नंदाजी हे हवेली तालुक्यातील भरे गावचे होते. नंदाजी यांचा मुलगा दमाजीराव पेशव्यांच्या सैन्यात होते. पानिपतच्या लढाईनंतर गायकवाड घराण्यातील एक भाऊ बडोद्यात तर एक भाऊ नाशिक जिल्ह्यात आले त्यांनी जाहीर शाहू महाराजांसाठी अनेक लढाया लढल्या होत्या. महाराज सयाजीराव यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील कवळाणे येथे झाला. सयाजीराव गायकवाड महाराजांनी जगभर प्रवास केला. परंतु या प्रवासातही त्यांनी आपल्या राज्याच्या हिताचा विचार डोळ्यासमोर ठेवून जगातील निरनिराळ्या देशात ज्या चांगल्या गोष्टी त्यांना आढळून आल्या त्यांचे अनुकरण आपल्या राज्यात करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. राज्यातील व्यापार व उद्योगधंदे यांना उत्तेजन देण्याकडे महाराजांनी विशेष लक्ष पुरवले. त्यासाठी दळणवळणाच्या सोयी वाढविल्या. बडोदा संस्थांनात सयाजीरावांनी अनेक सुंदर वास्तू उभ्या केल्या.लक्ष्मी विलास राजवाडा, मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, वस्तू संग्रहालय, कलानुभव, श्री सयाजी रुग्णालय, खंडेराव मार्केट, इत्यादी इमारतीची उभारणी त्यांच्याच कारकिर्दीत झाली. सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थांचे अधिपती म्हणून आपल्या राज्यात केलेल्या वरील सुधारणा पाहिल्यातर ते एक कर्तृत्ववान, प्रजाहितदक्ष व पुरोगामी विचारांचे राजे होते. याशिवाय राज्यकर्त्यांच्या ठिकाणी आवश्यक असणारा दूरदर्शीपणा त्यांच्याकडे होता म्हणूनच समाज सुधारण्याच्या क्षेत्रात त्यांच्या संस्थानाने आघाडी मारली होती. अनेक सुधारणा देशात प्रथम अमलात आणण्याचा मान बडोदा संस्थांनी मिळवला होता. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान देण्यात आला होता. भारताच्या स्वातंत्र लढ्याल्या देखील त्यांनी अप्रत्यक्षरीत्या साहाय्य केले होते. पंडित मदन मोहन मालवीया यांनी हिंदुस्थानातील शेवटचा आदर्श राजा या शब्दात त्यांचा यथार्थ गौरव केला.

**सूचक शब्द :** आदर्श राजा

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजरात मधील बडोदा या संस्थांनचे राजे होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या सत्तेचा व अधिकाराचा वापर जनतेच्या कल्याणासाठी केला.लोककल्याणकारी भूमिकेद्वारे त्यांनी समाज सुधारणेच्या चळवळीतला चालना दिली. त्यांच्या एकंदर कार्याचा महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या चळवळीलाही बराच लाभ झाला होता. महाराष्ट्रात समाज सुधारण्याचे कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना सयाजीराव गायकवाड यांनी सक्रिय मदत केली. सयाजीराव गायकवाड हे शेतकऱ्याचा मुलगा असल्याने

ISSN No. 2394-5990

त्यांच्या मनात शेतकऱ्या विषयी आपुलकीची भावना होती. विहिरी खोदणे जलसिंचनाची सोय करणे शेतीतील संशोधनासाठी शिष्यवृत्ती घेणे लोकोपयोगी काम सयाजीराव गायकवाड यांनी केले आधुनिक महाराष्ट्राच्या विचारांची दिशा ठरवण्याचे काम केले. महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषाप्रमाणेच बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे देखील कार्य मोठे आहे . सयाजीराव गायकवाड यांचे महाराष्ट्रामध्ये बालपण गेले सयाजीराव गायकवाड यांचे मूळ गाव महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील भरे हे होय. गायकवाड घराण्याचे मूळ पुरुष नंदाजी हे हवेली तालुक्यातील भरे गावचे होते. नंदाजी यांचा मुलगा दमाजीराव पेशव्यांच्या सैन्यात होते. पानिपतच्या लढाईनंतर गायकवाड घराण्यातील एक भाऊ बडोद्यात तर एक भाऊ नाशिक जिल्ह्यात आले त्यांनी जाहीर शाहू महाराजांसाठी अनेक लढाया लढल्या होत्या. महाराज सयाजीराव यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील कवळाणे येथे झाला.

**अभ्यासाची उदिष्टे :**

१) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शेती विषयक विचार जाणून घेणे.

२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांची लोककल्याणकारी भूमिका समजून घेणे.

**शेती विषयक ज्ञान :**

सयाजीरावांची प्रारंभीची काही वर्षे खेड्यातच गेली त्यामुळे त्यांना शेती व शेतकरी यांच्या सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीची माहिती होती. बडोदे राज्यात सुमारे ७५ % प्रजा शेतीवर अवलंबून होती. इतर व्यवसाय किंवा पूरक व्यवसाय मर्यादित होते. राज्यकारभार हाती आल्यावर त्यांनी खेडे यांची पाहणी करून जमिनीची प्रत, सिंचन सुविधा, पाऊस, शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती, शेतकऱ्यांमधील शिक्षणाचा अभाव, मोसमी पावसाचा अनियंत्रितपणा या सर्व गोष्टींचा अभ्यास केला. दुष्काळ आणि शेतकरी यांचा अतिशय निकटचा संबंध आहे सततचा दुष्काळ आणि अज्ञान यामुळे कष्ट करूनही शेतकऱ्यांच्या हाती काहीही येत नाही ही गोष्ट सयाजीरावांच्या लक्षात आली म्हणून त्यांनी शेतकीत नवीन ज्ञान येणे आवश्यक असल्याचे ओळखले १८९० साली खासेराव जाधव यांना शेतीतले नवे ज्ञान शिकवण्यासाठी विलायतेला पाठवले. नवे तंत्र, नव्या पद्धती,नव्या शेतीकी प्रक्रिया, शेतीतील यंत्रे साधने, शेतीपूरक व्यवसाय इत्यादीचा अभ्यास खासेरावांनी केला खासेराव जाधव नवीन ज्ञान शिकून आल्यावर सयाजीराव त्यांच्याशी चर्चा संवाद साधत बडोद्यात शेती व शेतकरी विषयी सुधारणा कार्याला चांगलीच गती प्राप्त झाली. त्यामुळे भरघोस उत्पन्न काढून राज्य संपन्न होईल असे सयाजीराव गायकवाड यांना वाटत होते.

**जलसिंचन सुविधा आणि दुष्काळ :**

सन १८९९ मध्ये बडोदा संस्थानावर प्लेग आणि दुष्काळाचे भयंकर संकट आले. परिणामी सयाजीरावांनी दुष्काळ निवारण अधिकारी नेमला. परंतु सयाजीरावांनी स्वतः कडी, अमरेली, बडोदा आणि नवसारी जिल्ह्यांचा दौरा केला. शेतकरी, गुरे, ढोरे, शेती यांची दुर्दशा तातडीने मदत कार्य सुरू केले. नागरिकांचे प्राण वाचविण्याला प्राधान्य दिले. अन्न पाणी पुरवणे उचल म्हणून अल्प रोख रक्कम कर्जाने देणे. धान्य खाद्य,चारा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात ने आण करता येईल.रस्ता रेल्वे यांची आपत्ती व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका असते म्हणून सयाजीरावांनी रस्ता वाहतूक रेल्वे वाहतूक यांची वेगाने उपलब्धता करून दिली. धान्य खाद्य चारा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात ज्ञान करता येईल दुष्काळी परिस्थितीला सामोरे जायचा असेल तर विहिरी खोदणे पाटबंधारे धरणे कालवे इत्यादी काढणे आवश्यक असल्याचे सयाजीराव गायकवाड यांनी नमूद केले. सिंचन सुविधा १८८६ ते १९३० या काळात बारा हजारहून अधिक विहिरी खोदण्यात आल्या शेतकऱ्यांना ऑइल इंजिन, कृषी पंप, ट्रॅक्टर अशी यंत्रे साधने उपलब्ध करून दिली. जल व्यवस्थापनाचे ज्ञान कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून उदबोधन उपक्रम हाती घेतले. राजांनी लक्षावधी रुपये सिंचन सुविधावर आपल्या राज्यात खर्च केले. भूमिगत पाण्याचा वापर पावसाच्या पाण्याचा वापर तलाव पाटबंधारे धरणे यातील पाण्याचा वापर याबाबतची धोरण प्रणाली सयाजीराव गायकवाड यांनी आखली.

**शेतकरी आणि सहकार :**

शेतकरी, कामकरी व्यापारी व अन्य व्यावसायिकांच्या सहकारी संस्था निर्माण करण्यास सयाजीरावांनी उत्तेजन दिले. ग्रामपातळीपर्यंत या सहकारी संस्था असाव्यात असा प्रयत्न केला सहकारी संस्थांसाठी नियम कायदे करून त्यांना कर सवलतही दिल्या सहकार संस्थांचे मोठे जाळे बडोदा राज्यात निर्माण केले. शेतकरी जीवन किंवा ग्रामजीवन यांच्या दृष्टीने सहकार तत्वांना मोठे महत्त्व असल्याचे ओळखून शेतकीतल्या सुधारणा असो सामाजिक, सांस्कृतिक सुधारणा असो सहकारी संस्थामुळे त्या सुधारणा सुरू होतात आणि तळागाळातल्या व्यक्ती समाजांना मदत मिळते. जर्मनी, डेन्मार्क, हॉलंड या देशातील सहकारी संस्थांनी घडवलेल्या सुधारणांचा इतिहास

सयाजीरावांनी अभ्यासला होता. बडोद्याच्या शेतकरी किंवा व्यवसायिक प्रजेच्या जीवनमानात सुख, शांती, समाधान, ज्ञान पोहोचायचे असेल तर सहकाराचा अवलंब व्हावा असे धोरण त्यांनी आखले होते. सयाजीरावांच्या उत्तेजनामुळे शेतकऱ्यांच्या सहकारी पतपेढ्या २३६ जवळपास २३६ अस्तित्वात होत्या. शेतकऱ्यांना परस्परांच्या सहकार्याने कर्ज मिळणे सुलभ झाले. महत्वाचे म्हणजे सावकाराकडून होणारी लुबाडणूक थांबली सहकार्यातून आत्मनिर्भता, नफ्यात सर्वांचा वाटा, सर्वांच्या संकटात सर्वांनी एकी करून संकटातून सोडवणूक करणे वगैरे चांगले दृश्य परिणाम झाले. जातीपाती, विशिष्ट व्यवसाय विशिष्ट जातीनेच करणे, उच्च नीच मानणे. ही भेदमूलक व्यवस्था नष्ट करण्याचे विचार जागृतीचे आणि खेड्यांचे संजीवन म्हणून सहकारी पतपेढ्यांना त्यांनी महत्व दिलेले दिसते. शेती व सहकार यांची उन्नती करण्याची जबाबदारी जिल्ह्याच्या लोकर बोर्डाकडे दिली. 'ग्राम सहकार' ही योजना त्यांनी लागू केली होती. औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रातील सहकारी संस्थांनाही सयाजीरावांनी उत्तेजन दिले. 'गणदेवी' येथे सहकारी तत्त्वावर साखर कारखाना काढण्यात स्वतः पुढाकार घेतला

महाराजांनी राज्यकारभाराच्या अन्य क्षेत्रातही अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी अनेक गोष्टी केल्या आपल्या राज्यातील जमिनीची योग्य प्रतवारी करण्यासाठी त्यांनी लँड सर्वे सेटलमेंट सेटलमेंट हे खाते सुरू केले सारा वसुलीच्या पूर्वीच्या वेगवेगळ्या पद्धतीत सुधारणा करून सारा वसुलीची समान पद्धत राज्यात लागू केली शेतीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विहीर खोदायी कामात उत्तेजन दिले आपल्या राज्याच्या न्यायव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याचे कार्यही त्यांनी केले त्यासाठी त्यांनी सन १९०५ मध्ये हिंदू कायदा तयार करून तो अमलात आणला राज्यातील पंचायतीचे पुनरुज्जीवन घडवून आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला ग्रामपंचायतची मुहूर्त मेळ भारतात प्रथम बडोदा संस्थानात रोवली गेली ती सयाजीरावांच्याच कारकीर्दीत ग्रामपंचायतच्या जोडीला तालुका पंचायती व नगरपालिका यांची ही स्थापना करण्यात आलीप्रारंभी सहकारी पतसंस्था अल्प दराने कर्ज पुरवठा करू लागल्या. पुढे शेतमाल विक्री, कृषी साहित्य खरेदी, धान्य व चारासंग्रह, बागायती शेती, पंप, इंजिन, पाणीपुरवठा जमिनीचे एकत्रीकरण,बचत, ग्राम सुधारणा, समाज सुधारणा अशी कामे सहकारी संस्था करू लागल्या. मध्यवर्ती सहकारी बँकांची स्थापना होऊन या कामांना चांगली चालना मिळाली १९२६ साली ङ्मश्री सयाजी सहकारी सेवा संघफस्थापन झाला. बडोदे राज्यातील सर्व सहकारी संस्थांचे हे महामंडळ होते. ते केंद्रस्थान म्हणून कार्यरत होते. ग्रामजीवन सहकारी आणि शेतीशी निगडीत नियतकालिके संघातर्फे प्रसिद्ध केली जायची. खेड्यांची पुनर्घटना आणि उच्च जीवन मूल्यांचे आचरण सहकारी चळवळीतून झाले. सहकार विषयक प्रगतीशील कायदे सयाजीरावांनी केले. सामूहिक विकासाचे हे तत्व शेतकरी, उद्योजक ,व्यापारींच्या हिताचे ठरले. सहकारी संस्थांची संख्या १०६३ त्यात शेतकरी सहकारी संस्थांची संख्या ८७१ होती. बचत, शेतकऱ्यांना वित्तीय पुरवठा, कापूस विक्री,पेयजल गुरेढोरे पोषण बी बियाणे पुरवठा, गोदाम साठवण, गृहनिर्माण ही कामे केली जात.

**समारोप :**

सयाजीराव गायकवाड महाराजांनी जगभर प्रवास केला. परंतु या प्रवासातही त्यांनी आपल्या राज्याच्या हिताचा विचार डोळ्यासमोर ठेवून जगातील निरनिराळ्या देशात ज्या चांगल्या गोष्टी त्यांना आढळून आल्या त्यांचे अनुकरण आपल्या राज्यात करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. राज्यातील व्यापार व उद्योगधंदे यांना उत्तेजन देण्याकडे महाराजांनी विशेष लक्ष पुरवले. त्यासाठी दळणवळणाच्या सोयी वाढविल्या. बडोदा संस्थानात सयाजीरावांनी अनेक सुंदर वास्तू उभ्या केल्या.लक्ष्मी विलास राजवाडा, मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, वस्तू संग्रहालय, कलानुभव, श्री सयाजी रुग्णालय, खंडेराव मार्केट, इत्यादी इमारतीची उभारणी त्यांच्याच कारकिर्दीत झाली. सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थांचे अधिपती म्हणून आपल्या राज्यात केलेल्या वरील सुधारणा पाहिल्यातर ते एक कर्तृत्ववान, प्रजाहितदक्ष व पुरोगामी विचारांचे राजे होते. याशिवाय राज्यकर्त्यांच्या ठिकाणी आवश्यक असणारा दूरदर्शीपणा त्यांच्याकडे होता म्हणूनच समाज सुधारण्याच्या क्षेत्रात त्यांच्या संस्थानाने आघाडी मारली होती. अनेक सुधारणा देशात प्रथम अमलात आणण्याचा मान बडोदा संस्थांनी मिळवला होता. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान देण्यात आला होता. भारताच्या स्वातंत्र लढ्याल्या देखील त्यांनी अप्रत्यक्षरीत्या साहाय्य केले होते. पंडित मदन मोहन मालवीया यांनी हिंदुस्थानातील शेवटचा आदर्श राजा या शब्दात त्यांचा यथार्थ गौरव केला.

**संदर्भ :**

१) 'महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड' एकनाथ पगार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई

ISSN No. 2394-5990

२) बाबा भांड, युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन ISBN : 9789352202577
३) Shri Sayajirao Gaikwad Maharaja of Boroda. "The prime Promoter of public Librarie murarilal nagar. International Library center Columbai Mo 1992.
४) दाजी नागेश आपटे , श्री सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र खंड १ ला (इ.स. १८६३-१८८७)
५) https://mr.wikipedia.org.
६) https://historyofvadodara.in/maharaja-sayajirao-gaekwad-3/
७) https://indianculture.gov.in/snippets/sayajirao-gaekwad-iii-barodas-adopted-ruler-and-connoisseur-arts
८) https://www.marathisrushti.com/profiles/sayajirav-maharaj-gaikwad/
९) https://vishwakosh.marathi.gov.in/21813/
१०) https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/380233
११) https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/58444
१२) https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/60323?mode=full

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

**प्रा. राजेंद्र रामभाऊ काळे**
संशोधक विद्यार्थी, कर्मवीर भाऊराव पाटील संशोधन केंद्र, पंढरपूर.
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी.
मोबाईल नं. ८२०८९५०७८५, ८८०५५०४१६० ,
ई - मेल आयडी : rajendrakale13683@gmail.com

**सारांश :**

इंग्रजांनी हिंदुस्थानात सत्ता स्थापन करताना येथील बरीच संस्थाने आपल्या साम्राज्यात सामील करून घेतली होती. त्यातील बरीच संस्थाने ही इंग्रजांशी एकनिष्ठ राहिल्याने त्यांनी सत्तेसाठी इंग्रजांशी मिळतेजुळते धोरण अवलंबलेले होते. हिंदुस्थानातील कित्येक संस्थानिक राजे हे आपल्या संस्थानात ऐशारामात आणि चैनीत राहत असताना एकमेव संस्थानिक भारतीय स्वातंत्र्यलढ्याला मदत करत होते ते म्हणजे बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे. त्यांनी उघडपणे इंग्रजांशी वैर अथवा असहकार्याची भूमिका न घेता आपण इंग्रजांशी एकनिष्ठ असल्याचे भासवून क्रांतीकारकांना तसेच भारतीय स्वातंत्र्यलढ्याला मदत केल्याचे दिसून येते. महाराज सयाजीरावांना ब्रिटीशांनी देशद्रोही ठरविण्यासाठी त्यांच्या मागावर गुप्तहेर खाते लावले होते तरीही त्यांनी भारतीय स्वातंत्र्यचळवळीला पुरावे मागे न ठेवता छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे गनिमी काव्याने केलेली मदत ब्रिटीश सरकारला सिद्ध करता आली नाही याचा भक्कम पुरावा म्हणजे लंडन येथील लायब्ररीमध्ये असणाऱ्या A BANDED BOX CASE FILES होय.[१] महाराजांनी इंग्रजांशी केलेल्या याच संघर्षाचे वर्णन त्यांच्याच संस्थानात ३७ वर्षे नोकरी करणाऱ्या रियासतकर गोविंद सखाराम सरदेसाई यांनी लिहून ठेवलेले दिसून येते.[२] तसेच इतिहासकार विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी महाराष्ट्रातील शंभर वर्षातील कर्तृत्ववान व्यक्तीवर शंभर वर्षापूर्वी लेख लिहिले आहेत आणि त्यात पहिले नाव हे महाराज सयाजीरावांचे आहे.[३] एकूणच पाहता महाराजा सयाजीराव यांनी सार्वभौम राहून ब्रिटीशांच्या दबावाला न जुमानता भारतीय क्रांतीकारकांना तसेच क्रांतीकारी संघटनांना मदत केल्यामुळेच भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नव संजीवनी मिळाल्याचे दिसून येते.

**मुख्य संकल्पना :** A BANDED BOX C-SE FILES, भारतीय राष्ट्रीय गंगनाथ विद्यालय, माणिकरावांचा आखाडा, मुक्ती कोन पथे, अखिल भारतीय हिंदी औद्योगिक परिषद, तरुण संघ.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. स्वतंत्र संस्थानिक म्हणून महाराजांच्या राज्यकारभाराचा आढावा घेणे
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला केलेल्या मदतीचा आढावा घेणे
३. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि इंग्रज यांच्यातील संघर्षाचा आढावा घेणे
४. बडोदा संस्थान आणि भारतातील इतर संस्थानांची स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका स्पष्ट करणे
५. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे भारतीय क्रांतीकारक आणि विविध क्रांतिकारी गटांशी असणाऱ्या संबंधांचा आढावा घेणे
६. महाराजांनी भारताबाहेर भारतीय स्वातंत्र्यलढ्याला केलेल्या मदतीचा आढावा घेणे

**संशोधनाची गृहीतके :**

१. बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला मदत केल्याचे दिसून येते.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे आणि इंग्रज यांच्यात बऱ्याच वेळा संघर्ष झालेला दिसून येतो.
३. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी भारतीय क्रांतिकारक तसेच विविध क्रांतिकारी संघटनांना मदत केल्याचे दिसून येते.
४. महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे हे स्वतःला इंग्रजांचे गुलाम अथवा मांडलिक न मानता सार्वभौम राजे म्हणून वावरताना दिसतात.

५. महाराजांनी भारताच्या बाहेर भारतीय स्वातंत्र्यलढ्याला मदत केलेली दिसून येते.

बडोद्याचे महाराज खंडेराव गायकवाड यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी महाराणी जमनाबाईसाहेब या गरोदर असल्याने व त्यांना मुलगी झाल्यामुळे बडोदा संस्थानचा कारभार खंडेराव महाराजांचे भाऊ मल्हारराव गायकवाड यांच्याकडे आला. परंतु त्यांनी आपल्याच प्रजेवर अन्याय, अत्याचार केल्याने आणि इंग्रज अधिकाऱ्यावर विष प्रयोग केल्याने त्यांना पदावरून दूर करण्यात आले. त्यामुळे रिकाम्या असणाऱ्या गादीला दत्तक वारस मंजूर करताना तो अल्पवयीन असावा आणि गायकवाड परिवारातील असावा अशी अट इंग्रजांनी महाराणी जमनाबाई यांच्यापुढे ठेवली. त्यामुळे वारसाचा शोध घेऊन नाशिक जिल्ह्यातील कवळाणा गावी असणाऱ्या काशिनाथ गायकवाड यांच्या चार मुलांपैकी एकाची म्हणजेच गोपाळची बडोद्याचे महाराज म्हणून निवड करण्यात आली. २७ मे १८७५ रोजी दत्तक विधान होऊन महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे नावाने ते बडोद्याचे महाराज झाले.

शालेय शिक्षण आणि राज्य कारभाराचे शिक्षण एकाच वेळी चालू असताना त्यांचे प्रशिक्षक असणाऱ्या एफ.ए.एच. इलियट यांनी त्यांना बडोद्याचे तत्कालीन महाराज आनंदराव गायकवाड आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात ६ जून १८०२ चा झालेला मैत्रीचा करार व १८१८ मध्ये हाच करार कायम ठेवल्याने महाराज हे इंग्रजांचे गुलाम नसून मित्र असल्याने ते एक सार्वभौम राजे आहेत ही भावना त्यांच्या मनात रुजवली.[४] १९११ च्या दिल्ली दरबारामध्ये महाराज सयाजीराव हे ब्रिटीश साम्राज्य प्रमुखांना वाकून नीट मुजरा न करताच माघारी निघून आले. १८०२ आणि १८१८ साली झालेल्या करारानुसार महाराज सयाजीराव गायकवाड हे भारतातील एकमेव सार्वभौम राजे असल्याचे इंग्लंडच्या सुप्रीम कोर्टाने देखील स्टॅथमने केलेल्या चारित्र्यहनन केसचा निकाल देताना मान्य केले.[५] ब्रिटीश सरकारसोबतच्या त्यांच्या एकूणच संशयित व्यवहाराचा अहवाल ब्रिटीश सरकारच्या लंडन लायब्ररीमध्ये असणाऱ्या A BANDED BOX CASE FILES मध्ये सापडतो ज्या त्या तारखेपासून ६० वर्षानंतर उघडल्या गेल्या. त्याच फाईल्स ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांनी मोठ्या प्रयत्नाने मिळवून महाराज सयाजीरावांचा दुर्लक्षित इतिहास जगासमोर आणल्यानेच त्यांचे इतिहासातील अनमोल योगदान भारतीयांना समजण्यास मदत झाली आहे.

**१) महाराजा सयाजीराव गायकवाड आणि भारतीय क्रांतिकारक**

**अ) अरविंद घोष आणि बारीन्द्रकुमार घोष :**

महाराज सयाजीरावांनी इंग्लंडच्या दौऱ्यावर असताना आयसीएस लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सोपी अशी घोडेस्वारीची परीक्षा नाकारणाऱ्या अरविंद घोष यांची गाठ घेऊन त्यांना बडोद्याला बोलावून आपले खाजगी सचिव नेमल्याचे दिसते.[६] बॅ. केशवराव देशपांडे संपादक असलेल्या इंदूप्रकाशच्या इंग्रजी आवृत्तीमध्ये अरविंदांनी 'New Lamps for Old' ही लेखमाला नशी या नावाने लिहून त्यातून भारतीय स्वातंत्र्याची दिशा दाखवून देण्याचे कार्य केल्याचे दिसून येते. आपल्या जहाल विचारसरणीतून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येयघोरणावर ताशेरे ओढल्यानंतर जेंव्हा महाराजांकडे लेखकाविषयी विचारणा झाली तेंव्हा त्यांनी आपल्याला काहीच माहिती नसल्याचे सांगितले. बडोदा कॉलेजचे उपप्राचार्य पद सांभाळल्यानंतर त्यांनी बंगालमध्ये जाऊन आपले कार्य सुरु ठेवले. जतीन बॅनर्जी या बंगाली सैनिकाला बडोद्यात गुप्तपणे बोलवून त्याला बडोद्यातील लष्करात प्रशिक्षण देऊन पुन्हा बंगालमध्ये क्रांती कार्य करण्यासाठी अरविंदांनी पाठवून दिले.[७] अलीपूर बॉम्ब खटल्यामध्ये इंग्रज सरकारने क्रांतीकारकांची धरपकड करताना अरविदांना अटक केल्यावर बडोदा संस्थानातील खासेराव जाधव यांनी त्यांना आर्थिक मदत केल्याचे दिसून येते.

अरविंद घोष यांचे बंधू बारीन्द्रकुमार घोष यांनी भारतीय राष्ट्रीय गंगनाथ विद्यालयात प्रशिक्षण घेतले होते व याच विद्यालयातील पुराणी बंधू हे त्यांच्याकडून बॉम्ब बनविण्यात आणि त्यांचा स्फोट करण्याचे शिकले होते.[८]

**ब) खासेराव जाधव आणि माधवराव जाधव**

महाराणी जमनाबाई साहेब यांच्या नात्यातील आणि बालपणी सोबतच शिक्षण घेणाऱ्या खासेराव जाधवांना महाराजांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात शेतीविषयक शिक्षण घेण्यासाठी पाठवले होते.[९] त्याच दरम्यान लंडनमधील श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या इंडिया हाऊसशी त्यांचा संबंध आला. 'इंडिया हाऊस' हे लंडनमधील भारतीय क्रांतीकाराकांचे आश्रयस्थान असल्याने तेथेच अरविंद घोष, केशवराव देशपांडे यांच्यासह इतर क्रांतीकारकांच्या सहवासात आल्यावर त्यांच्यात देशभक्तीची ज्योत पेटली गेली. हिंदुस्थानला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाशिवाय पर्याय नाही या जहाल विचारांनी ते जहाल बनत गेले. महाराजांबरोबर जपानच्या प्रवासाला गेल्यावर जपानी क्रांतिकारक ओकाकुंराशी भेट झाल्यावर भारतीय तरुणांना जपानी सैनिकांसारखे प्रशिक्षण देऊन राष्ट्रसैनिक तयार करण्यावर चर्चा करण्यात आली होती.[१०] केशवराव मेहसाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असताना नरसिंहभाई पटेल यांनी गावातील शिक्षक प्रेसमध्ये 'मुक्ती कोन पथे' या बंगाली क्रांतिकारी पुस्तकाचा अनुवाद गुजराती भाषेत केला तसेच इटलीचा

स्वातंत्र्यसेनानी गरीबॉल्डीचे चरित्रही छापले. तेथेच वनस्पती नावाने छापलेल्या पुस्तकाच्या आत बॉम्ब तयार करण्याची पद्धत असल्याने इंग्रजांनी छापा घालून त्या पुस्तकाच्या प्रती जप्त केल्या. तेंव्हा केशवरावांनी त्या अधिकाऱ्यांना झापले तसेच महाराजांनी त्यांची तक्रार गव्हर्नरकडे केल्याने त्याने दिलगिरी व्यक्त केल्याचे दिसून येते.[११]

खासेराव जाधव यांचे बंधू माधवराव जाधव हे महाराजांच्या सैन्यात अधिकारी होते. बॉम्ब तयार करणे, शस्त्रास्त्रे गोळा करणे, आर्थिक मदत गोळा करणे यासाठी ते महाराजांच्या मदतीनेच स्विस अकादमीत प्रशिक्षणासाठी गेले होते. परंतु लॉर्ड कर्झन आणि रेसिडेंटच्या विरोधामुळे स्विस अधिकाऱ्यांकडून आपल्या सैन्याला प्रशिक्षण देण्याची ईच्छा महाराजांना पूर्ण करता नाही. माधवराव यांचे मित्र केशवराव देशपांडे हे नवसारीचे कलेक्टर असताना त्यांनी स्वदेशी वस्तूचे प्रदर्शन भरावले होते त्याला बंगाली क्रांतिकारक उपस्थित राहिले होते.[१२]

**क) लोकमान्य टिळक :**

लोकमान्य टिळकांचे मित्र वासुदेव बापट हे महाराज सयाजीराव यांच्या बडोदा संस्थानमध्ये असल्याने तेच टिळकांना माहिती पुरवतात असा आरोप रेसिडेंट बिडुल्फ याने करून बापटांवर केलेल्या केसमुळेच टिळकांचा आणि महाराज सयाजीरावांचा संबंध आला. महाराजांच्या सेवेत असणाऱ्या माधवराव जाधवांना स्विस अकादमीत प्रशिक्षणासाठी पाठविण्यामागे लोकमान्य टिळक आणि अरविंद घोष हे दोघेच होते. तसेच लोकमान्य टिळकांनी श्यामजी कृष्ण वर्मा यांना पत्र लिहून महाराज सयाजीरावांची माधवरावांना मदत असल्याने त्यांना आर्थिक मदत करावी अशा आशयाचे पत्र लिहिले होते.[१३] महाराजांना पुण्यातील गायकवाडवाडा हा लोकमान्य टिळकांच्या केसरी व मराठा या वृत्तपत्रांसाठी द्यायचा होता परंतु त्याला ब्रिटीश सरकारचा विरोध असल्याने कागदोपत्री व्यवहार दाखवून पुन्हा त्यांनाच देण्यात आला. लोकमान्य टिळकांच्याच प्रभावामुळे क्रांतिकारक मंडळींनी बडोद्यात शिवजयंती आणि गणेशोत्सव सुरु केला होता.[१४]

**२) महाराज सयाजीराव आणि क्रांतिकारी संघटना :**

**अ) भारतीय राष्ट्रीय गंगनाथ विद्यालय :**

हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठी कडवा संघर्ष तरुणच करू शकतात म्हणून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अरविंद घोष यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या गंगनाथ राष्ट्रीय विद्यालयात केशवराव देशपांडे, माधवराव जाधव, बारीन्द्रकुमार घोष इत्यादी मंडळी सामील झाली होती. चांदोदपासून जवळच्या टेकडीवरच म्हणजे मांडव्याच्या राज्याच्या हद्दीतील टेकडीवर सुरक्षित, निर्जन तसेच तिन्ही बाजूंनी ओढे आणि घनदाट जंगलांनी वेढलेल्या जागेमध्ये गंगनाथ आश्रम होता. महाराजा सयाजीरावांनी २५०००/- रुपयांची मदत देऊन पाठिंबा दिलेल्या या सैनिकी विद्यालयाचे नाव भारतीय गंगनाथ राष्ट्रीय विद्यालय असे ठेवण्यात आले१५. गंगनाथ विद्यालयाच्या संचालक मंडळावर नेमलेली मंडळी ही बडोदा सरकारच्या सेवेतील होती. बडोदा सैन्यातील निवृत्त हवालदार क्रांतिकारकांना शस्त्र हाताळणे, कवायत घेणे इ. प्रकारचे सैनिकी शिक्षण देत असे. विठ्ठल बाळकृष्ण जोशी, विठ्ठल लक्ष्मण फडके, वामन केशव दातार इ. क्रांतिकारी संघटनांचे कार्यकर्ते होते. त्पुढे ब्रिटिशांच्या दबावामुळे विद्यालय तेथून बडोद्यात स्थलांतरित करण्यात आले. गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग्जने ब्रिटिश गुप्तचर खात्याचा अहवाल भारतमंत्र्यास पाठवून महाराज सयाजीरावांविरोधात आरोपपत्र पाठविल्याने महाराजांनी समजदारीची भूमिका घेऊन भारतीय गंगनाथ विद्यालय बंद केले.[१६]

**ब) माणिकरावांचा आखाडा :**

मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तरुण सशक्त असणे गरजेचे असल्याचे ओळखून महाराज सयाजीरावांनी गावोगावी व्यायामशाळा उभारण्याचा ध्यास घेतल्यानेच बडोद्यातील जुम्मादादांचा आखाडा हा स्वातंत्र्यप्रेमी मंडळींचा अड्डा बनला होता. येथे तरुणांना कुस्ती करणे, काठी फिरवणे, घोडेस्वारी करणे, शिकार करणे, दांडपट्टा चालवणे यामध्ये तरबेज केले जाई. माणिकरावांच्या अंगातील चपळाई पाहून महाराजांनी त्यांना बक्षीस देऊन स्वातंत्र्य कार्यासाठी प्रेरित केल्यानेच पुढे हाच आखाडा माणिकरावांचा आखाडा म्हणून ओळखला जाऊ लागला. या आखाड्यातील राष्ट्रवादी विचारांचे तरुण सयाजीरावांचे अत्यंत विश्वासू होते. राष्ट्रप्रेम, क्रांतीची भावना, पुस्तिका छापून वितरित करणे, भित्तिपत्रकांमधून असंतोष संदेश देणे इ. कामे या आखाड्यातून चालत. माणिकराव हे महाराजा सयाजीराव आणि देशभरातील क्रांतिकारकांमधील दुवा होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत या संघटनेच्या बडोदा शाखेचे माणिकराव आणि त्यांचे मित्र हे सक्रिय सभासद होते.[१७] क्रांतिकारकांना इंग्रजांपासून लपवण्याचे खात्रीशीर ठिकाण म्हणजेच हा आखाडा असल्याने माणिकरावांनी खुदीराम बोस, पृथ्वी सिंह आझाद, भगतसिंह, राजगुरू, सुखदेव, सुरेंद्र पांडे यांना इंग्रजांचा धोका पत्करून आखाड्यात आश्रय दिला होता.[१८] माणिकरावांचा आखाडा हा क्रांतिकारी चळवळीचे केंद्र असून तो बडोद्यातच असल्याचे ब्रिटिशांना माहिती असल्यामुळेच द प्रिन्स ऑफ वेल्सचा बडोदा भेटीचा कार्यक्रम

ठरल्यावर देशभरातील चळवळी करणाऱ्या मंडळीकडून बडोद्यात निदर्शने किंवा घातपात होण्याची भीती ब्रिटीश सरकारला वाटत होती.[१९]

**बडोद्यातील भारतीय तरुण संघ :**

तरुणांमध्ये देशप्रेम निर्माण करणे, राष्ट्रभक्ती वाढीस लावणे, त्यांना स्वसंरक्षणासाठी शस्त्र हाताळण्याचे प्रशिक्षण देणे अशा अनेक उद्देशाने बडोद्यामध्ये 'भारतीय तरुण संघा'ची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये माणिकराव, दाजी नागेश आपटे, दत्तू केतकर, मेजर माधवराव जाधव, आबासाहेब मुजुमदार, केशवराव देशपांडे व डॉ. आठवले या प्रमुख मंडळीबरोबरच खासेराव जाधव यांचाही यामध्ये समावेश होता. खासेराव जाधव यांच्या घरीच या क्रांतीकारी संघटनेचे केंद्र होते. बापट केस निमित्ताने लोकमान्य टिळक बडोद्याला आल्यावर अरविंद घोष आणि सयाजीराव महाराज वेषांतर करून त्यांना भेटले होते. याच लोकमान्य टिळकांविरुद्धाचा राजद्रोहाचा खटला ब्रिटीश सरकारने भरवला असताना त्यांचे वकीलपत्र घेणारे केशवराव देशपांडे यांना सयाजीरावांनी कलेक्टर नेमल्याने ब्रिटीश सरकारसाठी ही धोकादायक घटना होती. लॉर्ड कर्झनची दिल्ली दरबारच्या आदल्या दिवशी हत्तीवरून मिरवणूक चालू झाल्यावर त्याच्यावर बॉम्ब फेकून त्याची हत्या करण्यासाठी पुण्याहून दामू अण्णा जोशींना अरविंद घोष आणि लोकमान्य टिळकांनी पाठवल्याची कल्पना महाराज सयाजीरावांना असल्यानेच त्यांनी मिरवणुकीला जाणे टाळल्याचे दिसून येते.[२०]

**३) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि सयाजीराव :**

राष्ट्रीय काँग्रेसचे दादाभाई नौरोजी यांना इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ कॉमन्सच्या निवडणुकीसाठी ३०,०००/- रु. मदत सयाजीराव यांनी केली. पुण्यातील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला महाराजांनी २०००/- रु मदत दिली होती. लंडनच्या वेल्बी कमिशनसमोर भारताची बाजू मांडण्यासाठी गेलेल्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांना प्रवास खर्चाची २५००/- रुपयांची मदत महाराजांनी केली. तसेच काँग्रेसच्या अहमदाबाद आणि कलकत्ता येथील अधिवेशनाचे अध्यक्षपद महाराजा सयाजीराव यांनी भूषवले होते. अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या १९०२ साली भरलेल्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. आर. सी. दत्त हे बडोद्यात सयाजीरावांचे दिवाण होते.[२१] कलकत्ता येथे भरलेल्या अखिल भारतीय हिंदी औद्योगिक परिषदेचे उद्घाटन महाराज सयाजीरावांच्या हस्ते झाले होते. महात्मा गांधीनी रौलेट कायद्याविरोधात केलेल्या आंदोलनात बडोदा संस्थानातील अमरेलीतील ३०० लोकांनी सहभाग घेतलेला होता.[२२] राष्ट्रीय सभेला असलेली सयाजीराव महाराजांची मदत ही ब्रिटीश सरकारला सहन होत नसल्यानेच त्यांनी सयाजीरावांवर आरोप केलेले दिसून येतात.

**४) ब्रिटीश आणि सयाजीराव संबंध :**

बडोद्यामध्ये राहणाऱ्या सर्व युरोपीयनांचे दिवाणी आणि फौजदारी न्यायदानाच्या सर्व अधिकारांबरोबरच युरोपीय व अमेरिकन नागरिकांना बडोदा संस्थानात स्थावर मालमत्ता खरेदीस प्रतिबंध करण्याचा अधिकार महाराजांनी ब्रिटीशांकडे मागितला होता. लॉर्ड मिंटो आणि लेडी मिंटो यांच्यावर अहमदाबाद दौऱ्यावर असताना बॉम्ब फेकणारा मोहनलाल पंड्या हा बडोदा संस्थानात डेअरी सुपरीटेंडेंट पदावर असल्याचा पोलिसांचा संशय होता.[२३] बडोदा दिवाणाच्या नेमणुकीवर व्हाईसरॉयने त्याचा नकाराधिकार वापरू नये म्हणून ब्रिटीश सरकारशी जवळीक असलेल्या रोमेश चंद्र दत्तांना सयाजीवांनी आपले दिवाण नेमले होते. लॉर्ड कर्झनने केलेल्या कोणत्याच गोष्टीला महाराज सयाजीरावांनी प्रतिसाद न दिल्याने तो त्यांच्याबद्दल म्हणतो कि, तो महाराज सगळ्यात चांगली गोष्ट कोणती करू शकणार नसेल तर ती म्हणजे मरून जाणे.[२४] हिंदुस्थानात असलेल्या ५६२ संस्थानांपैकी पहिल्या दर्जाची असणाऱ्या १०८ संस्थानामध्ये बडोदा संस्थान होते. ब्रिटीशांच्या बरोबरीचा दर्जा नसल्याने इतर संस्थानिकांनी ब्रिटीशांची मर्जी राखण्यासाठी स्थापन केलेल्या संस्थानिकांच्या नरेंद्र मंडळात महाराज सयाजीराव सामील झाले नव्हते.[२५]

**सीआयडीचा गुप्त अहवाल आणि महाराज सयाजीराव :**

महाराजा सयाजीराव हे हिंदुस्थानातील एकमेव राजे आहे जे सरकारला जुमानत नसून त्यांच्यापासून ब्रिटीश सरकारला धोका तर आहेच परंतु बडोदा हे राजद्रोही मंडळींचे केंद्र बनले असून त्याला सयाजीरावांचे पाठबळ असल्याची व्हॉईसरायची खात्री झाली होती. त्यामुळे ब्रिटिशांनी लवकर पावले उचलली नाही तर गंभीर परिणाम ब्रिटिश सरकारला भोगावे लागतील असा सीआयडीच्या आरोपपत्रांचा सविस्तर अहवाल गव्हर्नर जनरल हार्डिंग्ज यांनी लंडन येथील भारतमंत्र्याला पाठवला होता.[२६] बडोदा संस्थानातील सैनिकांची संख्या निश्चित करण्याचे अधिकार इंग्रज सरकारचे असताना सयाजीराव महाराजांनी त्यास विरोध केला. ते बराच काळ परदेशात राहिल्याने स्वत:ला मराठ्यांचे नेता समजतात. बडोदा संस्थानामध्ये ब्रिटिशांची सेना ठेवण्यास त्यांचा विरोध आहे. महाराजांचे क्रांतिकारकांशी वैयक्तिक संबंध असून त्यांनी ब्रिटिश विरोधकांना आपल्या संस्थांनातील सेवेत घेतले असून ब्रिटीश सरकारविरोधी प्रक्षोभक

साहित्य छापण्याची क्रांतीकारकांना परवानगी दिली जाते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला त्यांचा पाठींबा असून काँग्रेसला ते आर्थिक मदत देखील करतात. ब्रिटीश राजवटीविरुद्ध लिहिलेले लेख असणारे कित्येक वर्तमानपत्रे बंद करण्यात आली असे सांगून प्रत्यक्ष मात्र काहीच करत नाही. संत निहालसिंग यांना ब्रिटिश विरोधी भाषण करणारे लेखन केल्याने त्यांच्यावर बंदी घातलेली असताना त्यांना सयाजीरावांनी पाहुणा म्हणून बडोद्याला बोलावले होते. मुंबई गव्हर्नर जनरल आणि बडोदा रेसिडेंट यांच्या पत्रव्यवहारातून बडोद्यातून ब्रिटिश विरोधी साहित्य प्रकाशित होत असल्याचे दिसून येते. सरकारने माधवराव नावाच्या लॉटरीवाल्याला अटक केल्यावर बडोदा संस्थानातील नवसारीचे जिल्हादंडाधिकारी केशवराव देशपांडे यांच्याशी त्यांचा संबंध असून ते गंगनाथ विद्यालयाला मदत करतात तसेच ब्रिटिश विरोधातील बंदी घातलेल्या १६७ पैकी १७ पुस्तके ही बडोदाच्या छापखान्यात छापली असून रेसिडेंटनी नजरेस आणून दिली तरीही त्यांच्यावर काहीच कारवाईकरीत नाहीत.[२७] बडोदा सरकारचे प्रतिनिधी कोणालाही न सांगता राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशनात भाग घेतात परंतु दिवाण मात्र सरकारला त्यांची चुकीची माहिती देतात. यावरून ब्रिटीश आणि सयाजीराव यांच्यात कायम संघर्ष झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अनेक क्रांतीकारकांना बडोद्याला बोलावून महाराज सयाजीरावांनी मार्गदर्शन केलेले दिसते. स्वामी विवेकानंदांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांना अरविंद घोष आणि खासेराव जाधव यांच्या मार्फत बडोद्याला बोलवून महाराज सयाजीरावांनी बडोद्यामध्ये त्यांची देशभक्तीची भाषणे द्यायला लावली होती. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या राष्ट्रीय नेत्यांशी महाराजांची जवळचे संबंध होते.[२८] केशवराव देशपांडे आणि खासेराव जाधव हे सयाजीरावांचे दोन्ही कलेक्टर राष्ट्रीय चळवळीतील लोकांना संरक्षण देतात त्यामुळे त्यांचेविरुद्ध महाराजांनी चौकशी लावावी तसेच त्यांना संस्थांनाच्या सेवेतून काढून टाकावे यासाठी ब्रिटीश सरकारने महाराजांवर दबाव आणला होता. बॉम्ब बनवण्यात तरबेज असणारे क्रांतिकारक सेनापती बापट हे महाराजांना लंडनला भेटल्यावर बडोद्याला येऊन गंगनाथ विद्यालयाला भेट देऊन गेले होते[२९] बाबू तारकनाथ, मादाम कामा, श्यामजी कृष्ण वर्मा, बिपीनचंद्र पाल या हिदुस्थानाबाहेर राहणाऱ्यांशी महाराजांचे जवळचे संबंध असल्याचे दिसून येते. ब्रिटीश भारतातून गेल्यावर भारताचे काय होणार हा प्रश्न आगाखान यांनी विचारल्यावर त्यावर तात्काळ उत्तर देताना सयाजीराव महाराजांनी म्हटले होते कि एकछत्री हिंदुस्थान होण्यासाठी कुत्र्याच्या छत्रीसारखी वेगवेगळी संस्थाने विसर्जित करून एकसंघ राष्ट्र करणे हा एकच पर्याय आहे आणि यात बडोदा पहिले असेल.[३०] महाराजांच्या अशा या संदिग्ध वागण्यामुळे ब्रिटीश सरकारने सी. आर. क्लीव्हलँड या भारतीय गुप्तहेर खात्याच्या प्रमुखाला त्यांच्या भारतातील सरकारविरोधी देशद्रोही कारवाया शोधण्यासाठी नेमलेले होते.[३१] तरीही महाराज सयाजीरावांनी पुरावे मागे न ठेवता भारतीय स्वातंत्र्यलढ्याला मदत करून आपले अनमोल असे योगदान दिलेले दिसून येते. म्हणूनच महाराज सयाजीरावांचा गौरव करताना स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय गव्हर्नर सी. राजगोपालचारी यांनी म्हटले आहे कि हिंदुस्थानात दोनच कल्याणकारी राजे झालेत. पहिले आहेत छत्रपती शिवराय आणि दुसरे म्हणजे बडोद्याचे सयाजीराव गायकवाड.[३२]

**तळटीपा :**

१. वणवे, राहुल. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि भारतीय स्वातंत्र्यलढा, प्रकाशक भांड बाबा, प्रथम आवृत्ती २०२१, पृष्ठ क्रमांक ३९, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.

२. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक १०, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

३. भांड, बाबा. (संपादक)महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, प्रथम आवृत्ती २०१७, पृष्ठ क्रमांक ३६४, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रे साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.

४. भांड, बाबा. सयाजीराव चारित्र्यवान निर्व्यसनी सार्वभौम राजा, प्रथम आवृत्ती २०२१, पृष्ठ क्रमांक १०, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.

५. भांड, बाबा. महाराजा सयाजीराव आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रथम आवृत्ती २०२१, पृष्ठ क्रमांक ३८, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.

६. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक ३१, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

७. डॉ. मगर, राजेंद्र. महाराजा सयाजीराव आणि योगी अरविंद घोष, प्रथम आवृत्ती २०२१, पृष्ठ क्रमांक १४, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.

ISSN No. 2394-5990


८. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक ८९, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
९. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ९३.
१०. तत्रैव, पृष्ठ क्रमांक २६.
११. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ९७.
१२. भांड, बाबा. (संपादक) महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, प्रथम आवृत्ती २०१७, पृष्ठ क्रमांक ३६४, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रे साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.
१३. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक ७६, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
१४. वणवे, राहुल. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि भारतीय स्वातंत्र्यलढा, प्रकाशक भांड बाबा, प्रथम आवृत्ती २०२१, पृष्ठ क्रमांक ७, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.
१५. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक ७१, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
१६. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ७७.
१७. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ८०.
१८. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ८१.
१९. भांड, बाबा. लोकपाळ राजा सयाजीराव, चौथी आवृत्ती डिसेंबर २०१६, पृष्ठ क्रमांक १३५, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
२०. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक ४५, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
२१. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ४०.
२२. वणवे, राहुल. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि भारतीय स्वातंत्र्यलढा, प्रकाशक भांड बाबा, प्रथम आवृत्ती २०२१, पृष्ठ क्रमांक ७, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.
२३. भांड, बाबा. (संपादक)महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, प्रथम आवृत्ती २०१७, पृष्ठ क्रमांक ३६४, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रे साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.
२४. एस, गोपाल. ब्रिटीशांची भारतातील राजनीती (१८५८-१९०५), अनुवाद श्रीमती देशपांडे, पृष्ठ क्रमांक ३४२-४३, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
२५. फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र ( राजकीय इतिहास १९२१-१९२९), पृष्ठ क्रमांक २०४, श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.
२६. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक १०१, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
२७. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ११४.
२८. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ४५.
२९. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ४६.
३०. भांड, बाबा. लोकपाळ राजा सयाजीराव, चौथी आवृत्ती डिसेंबर २०१६, पृष्ठ क्रमांक १३५, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
३१. भांड, बाबा. स्वातंत्र्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, प्रथम आवृत्ती २०१६, पृष्ठ क्रमांक ५५, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
३२. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ९.


■■■

# सुशासित राज्यकारभाराचा आदर्श : महाराजा सयाजीराव गायकवाड

**प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम**
प्राचार्य
श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने महाविद्यालय
म्हसवड ता. माण, जि. सातारा
मो. नं. ८२७५८९१८६०, Email : stkadam75@gmail.com

**प्रस्तावीक :**

आधुनिक भारताच्या इतिहासात बडोदा संस्थान हे एक प्रगतिशील राज्य म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात या राज्याने 'महाराजा सयाजीराव गायकवाड' यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याणकारी राज्याचा आदर्श निर्माण केला. अशिक्षित शेतकरी कुटंबातून आलेल्या सयाजीरावांनी आपल्या ६४ वर्षाच्या कारकिर्दीत सुधारणावादी राज्यव्यवस्था निर्माण करुन सुशासनाचा आदर्श निर्माण केला. ब्रिटिशांच्याकडून मिळालेल्या मर्यादीत अधिकारांचा वापर करुन महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राज्यात शिक्षण, प्रशासन, उद्योगधंदे, साहित्य, कला, संस्कृतीच्या क्षेत्रात विविध सुधारणा करुन उत्कृष्ट दर्जाचे काम केले. साहित्य, शिल्पकला, चित्रकला, संगीत हे समाज संस्कृतीचे आधारस्तंभ आहेत. एवढेच नाही तर कला आणि विज्ञानाचा विकास हे लोकांच्या सर्वागीण समृद्धीची आणि प्रगतीची शिडी आहे. असे राजांचे मत होते. सर्व क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला त्यांचे विचार व कार्य भारतीयांसाठी दिशादर्शक आहेत. विशेषत: प्रशासकीय सुधारणांच्याद्वारे सुशासन निर्माण करण्याचे कार्य भारतातील प्रशासकीय सेवकांना मार्गदर्शक स्वरुपाचे आहे. प्रस्तुत शोध-निबंधात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सुशासित राज्यकारभारावर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**अल्पपरिचय :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म दि. ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यातील कवळाणे या गावी झाला. त्यांचे वडील काशीराव गायकवाड हे शेतीचा व्यवसाय करीत होते. त्यांच्या घराण्याचा बडोद्याच्या गायकवाड घराण्याशी दुरचा संबंध होता. बडोदा संस्थानचे राजे खंडेराव गायकवाड यांचे १८७० साली निधन झाले. त्याना औरसपुत्र नसल्याने त्यांच्यामागून त्यांचे बंधू मल्हारराव गायकवाड हे बडोद्याच्या गादीवर आले. परंतु मल्हारराव व बडोद्याचे तत्कालीन रेसिडेंट कर्नल फ्रेयर यांच्यात बेबनाव उत्पन्न झाला. लवकरच इंग्रजांनी मल्हारावांना दुर्वर्तनाच्या आरोपावरुन गादीवरुन काढून टाकले आणि बडोदा संस्थानचा कारभार काही काळासाठी आपल्या हाती घेतला. पुढे खंडेराव गायकवाडांच्या विधवा पत्नी जमनाबाई यांनी हिंदुस्थानच्या सरकारकडून दत्तक घेण्याचा अधिकार मिळविला. त्यानुसार जमनाबाईंनी कवळाणेचे काशीराव गायकवाड यांचा मुलगा गोपाळराव यास दत्तक घेतले दि. २७ मे १८७५ रोजी दत्तकविधान झाले आणि गोपाळरावांचे नाव 'सयाजीराव तिसरे' असे ठेवण्यात आले.

बडोदा संस्थानचे दिवाण राजा सर टी. माधवराव हे कुशल प्रशासक होते. त्यांनी त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. अल्पावधीतच त्यांनी मराठी, इंग्रजी, गुजराती व उर्दु भाषांचे शिक्षण पुर्ण केले. तसेच अश्वारोहण राजघराण्यातील रीतीरिवाज, राज्यकारभारातील बारकावे इत्यादी गोष्टी आत्मसात केल्या.

सयाजीराव गायकवाड यांच्या राज्यारोहण समारंभ २८ डिसेंबर, १८८१ रोजी झाला. त्यांनी एकंदर चौसष्ट वर्षे राज्य केले. पण आपल्या कारकिर्दीत त्यांनी बडोदा संस्थानात अनेक सुधारणा घडवून आणल्या. अनेक लोकोपयोगी कामे केली. गरजू व लायक व्यक्तींना अनेक प्रकारे साहाय्य केले. आपल्या राज्यातील गोरगरीब प्रजेच्या हिताकडे लक्ष देऊन एक 'प्रजाहितदक्ष राजा' असा लौकिक त्यांनी संपादन केला.

**राज्यकारभाराचा उद्देश व राज्यकर्त्याचे कर्तव्य :**

महाराजा सयाजीरावांना २८ डिसेंबर १८८१ रोजी राज्याधिकार प्राप्त झाले. त्या निमित्ताने पुण्याचा सार्वजनिक सभेने महाराजांचा मानपत्र देऊन सत्कार केला. त्या प्रसंगी सयाजीराव म्हणाले की, ''माझ्या प्रिय प्रजाननांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करणे हाच माझ्या जीवनाचा पहिला व प्रबळ असा उद्देश आहे.'' सयाजीरावांनी या उद्देशाला अनुसरुनच आपला राज्यकारभार केला होता. प्रजेचे कल्याण हेच त्यांनी अंतिम ध्येय मानले होते. प्रशासकीय कामाचा परिचय झाल्यानंतर १८८२ साली बडोदा सरकारी कचेऱ्यांना भेटी देऊन त्यांचे प्रश्न

ISSN No. 2394-5990

समजून घेणे हा या दौऱ्यामागचा उद्देश होता. सयाजीरावांच्या मते राजा आणि प्रजा या दोघांचे कल्याण एकच आहे. प्रजेच्या हितासाठी राज्यकर्त्याने सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. प्रजेचे कल्याण हेच माझे कर्तव्य आणि तोच माझा मोक्ष हा सयाजीरावांचा सिद्धांत होता.

**राज्यकर्त्यांकडून जनतेच्या अपेक्षा :**

राज्यातील सामान्य जनतेला सुप्रशासन आणि सुराज्य हवे असते. ते निर्माण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची व अधिकाऱ्यांची असते. त्यासाठी पुढील गोष्टी कराव्यात असे महाराज म्हणतात. ''सुराज्यात प्रजेच्या तीन अपेक्षा असतात (१) हलका कारभार (२) राजा व प्रजा यांच्यामध्ये कमीत कमी मध्यस्थ अथवा अंमलदार असावेत (३) कमी खर्चाची पण शिघ्र न्याय मिळण्याची पद्धत असावी या तीन गोष्टी साध्य झाल्या म्हणजे राज्ययंत्र रयतेस सुखावह वाटते.'' सयाजीरावांनी आपल्या राज्यात सुप्रशासनाच्या माध्यमातून सुराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या भाषेत राज्यकारभार करणे, मध्यस्थांची संख्या कमी करणे व जनतेला जलद न्याय मिळाला तर राज्याची प्रगती जलद गतीने होऊन प्रजेच्या गरजा पूर्ण होवून स्वराज्य निर्माण होईल असे सयाजीरावांचे मत होते.

**परस्पर सहकार्य व सहसंघटना :**

सयाजीराव वेळोवेळी आपल्या राज्यातील सर्व खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, परिषदा घेऊन एकत्र चर्चा, विचारविनिमय करुन त्यांना स्वत: मार्गदर्शन करत असत. ''शरीराचे सर्व अवयव व ज्याप्रमाणे एकमेकांना पूरक व हितकारक बनून शरीराला पूर्णत: आणतात. त्याप्रमाणे सर्व खात्यांनी परस्पर पूरक होऊन राज्यकारभाराला संपूर्णत्व प्राप्त करुन दिले पाहिजे.'' सहकार्याशिवाय कोणतेही कार्य पूर्णत्वास जात नाही असे सयाजीरावांचे मत होते. याबरोबरच सर्व खात्यांमध्ये कामाची वाटणी करुन दिल्यास सर्व व्यवहार सुरळीत चालतील तसेच काही अडचणी आल्यास त्या दूर करुन हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास जाण्यासाठी प्रयत्न करणे यास सयाजीराव सहसंघटन म्हणतात.

**आत्मपरिक्षण आणि शिक्षण :**

सयाजीराव म्हणतात की, ''मी नेहमी अंतनिरीक्षण किंवा आत्मपरिक्षण करतो. त्यामुळे मला माझ्यात जे दोष आहेत, उणिवा आहेत त्या निदर्शनास येतात व त्या दूर करण्याचा प्रयत्न करतो.'' थोडक्यात स्वत: विषयी कोणताही भ्रम न ठेवता स्वयंमूल्यमापन केल्यास राज्यकारभार सुधारतो व हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास जाते. याबरोबरच राजा हा सुविद्य आणि ज्ञानी असला पाहिजे. तसेच प्रजाही तितकीच शहाणी व समंजस असली पाहिजे हे गुण शिक्षणाने मानसामध्ये येतात म्हणून ते शिक्षण हे सर्व सुधारणांचा पाया आहे. असे मानतात. राज्य चालविणे हे एक शास्त्र आहे. राज्यकर्त्यांच्या ठायी काही विचार व तत्वांची बैठक असावी लागते तरच ते प्रजेच्या हिताचा राज्यकारभार करतील.

**चांगल्या सेवकांचे आवश्यक गुण :**

राज्याच्या सेवेमध्ये असणाऱ्या नोकरांजवळ काही गुण असावे लागातात. मनुष्याची प्रगती अथवा अवनती त्याच्या गुणांवर आवलंबून असते. सेवकांना आपल्या कामात प्रगती करण्यासाठी पुढील गुणांची आवश्यकता असते.

लक्षपुर्वक काम करणे, चौकस दृष्टी ठेवणे, आत्मविश्वास, नैतिक धैर्य, खऱ्या खोटयाचे ज्ञान, महत्वकांक्षा, स्वयंस्फूर्ती, आत्मसंयमन, आशावादीपणा, प्रसंगावधान, इच्छाशक्ती, स्मरणशक्ती, निश्चितपणा, संभाषणशक्ती, संघटनशक्ती इ.

वरील गुण सेवकांनी आत्मसात केले तर ते आपले काम उत्तमरितीने करु शकतील याबरोबरच सेवकांनी आपल्यातील अवगुणांची हकालपट्टी केली पाहिजे. प्रगतीस अडथळा ठरणारे अवगुण पुढीलप्रमाणे आहेत.

विसराळूपणा, निराश होणे, मनाचा कमकुवतपणा, निरुत्साह, कल्पना शक्तीचा अभाव, अनिश्चितपणा, पद्धतशीरपणा किंवा शिस्त नसणे, स्वत:स हलके समजणे इ.

**अधिकाऱ्यांची निवड :**

राज्यकारभार चालविण्यासाठी राजाचा केवळ क्षात्रधर्म पुरेसा नसतो. राज्याचे खरे काम वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चालते, त्यामुळे हुषार व पात्र अधिकारी निवडण्याची कला राजाकडे असावी लागते. सर्व भेदभाव विसरुन केवळ सेवाभावाने काम करणाऱ्या सेवकांचा संच तयार केला पाहिजे. विविध क्षेत्रातील गुणीजनांचा सातत्याने शोध घेतला पाहिजे. प्रशासनाची गुणवत्ता शासकवर्गाच्या कर्तव्यपरायणतेवर व कौशल्यांच्या नैपुण्यावर अवलंबून असते. यासाठी सयाजीराव सेवकांच्या शिक्षणात व प्रशिक्षणात स्वत:लक्ष घालीत असत. आपल्या आस्थापनातील सेवकांना सयाजीराव नोकर न मानता साधक मानतात. साध्यानुसार कामाची पद्धती ठरविणे, गरजेनुसार साधनांची उपलब्धी करुन देणे, गरजेनुसार साधने विकसित करणे आणि कामाचे शास्त्र बनवून कार्यसिद्धीस पोहोचवणे ही प्रशासकीय व्यवस्थापनाची चतु:सूत्री सांगितली आहे.

**कर्तव्यदक्ष व कार्यक्षम सेवक :**

सयाजीराव महाराजांनी कर्तव्यदक्ष सेवक कसे असावेत त्यांनी

कोणत्या गोष्टी आत्मसात कराव्यात तसेच सेवकांची निवड करताना कोणत्या तत्वांचे पपालन करावे याविषयी मार्गदर्शन केले आहे.

१) अंमलदारांनी आपले ज्ञान लिहून ठेवावे. हाताखालील नोकरास समजून सांगावे, नवीन माहिती दुसऱ्याकडून घेण्यास लाजू नये.

२) अंमलदारांनी स्वयंस्फूर्तीने, विवेकाने व पूर्वाकलन करुन काम करावे. प्रत्येक कामाचे धोरण व उद्देश समजून घेतले पाहिजे.

३) वरिष्ठ अंमलदारांनी विविध खात्यांमध्ये परस्पर सहयोगासाठी सहसंघटकाची भूमिका पार पाडावी, श्रमविभगाणीचे तत्व पाळावे.

४) अंमलदारांनी दुसऱ्यांची अनुसरावे असे शिष्टाचार पाळावेत, मानापमान व दिखावू गोष्टींचे स्तोम माजवू नये.

५) सेवकांनी निर्व्यसनी असावे, कामाचे ठिकाण स्वच्छ व सुशोभित असावे, कारभारात समंजस व काटकसर वृत्ती ठेवावी.

६) सेवकांनी नियम व निर्बंधाचे काटेकोर पालन करावे, नियमांमुळे कर्तव्यात स्पष्टता येते व निर्बंधामुळे दुर्वतनाचे नियंत्रण होते. अर्थात निर्बंध हे कुंठितगती नसून प्रगतीपप असावेत.

७) शिक्षा हे साध्य नसून अनेकांचे हित साधण्याचे साधन असावे, गुन्ह्याप्रमाणे शिक्षा, अपराधाचे परिमार्जन व भावी अपायांचा प्रतिकार हे शिक्षेचे तत्व असावे.

८) चांगल्या व नि:स्वार्थ सेवेसाठी उत्तेजनाची तरतूद असावी. त्यामुळे प्रशासनाची गुणवत्ता वाढते.

९) जुने ते सर्व कालबाह्य अशी भूमिका न घेता जुन्यातील चांगल्याचा स्विकार करावा, समाजहित साधणारे रिवाज चालू ठेवावे.

१०) राज्यातील साधन सामुग्रीची माहिती सतत तयार ठेवावी तीचा वापर किसयोजना व राज्याचे अंदाजपत्रक तयार कर ताना होतो.

११) भावी सुधारणांची किंवा योजनांची प्रथम धारणा ठरवून त्या जशा पूर्ण होतील तशी त्यांची नोंद ठेवावी.

१२) आर्थिक स्वावलंबनासाठी पडीक जमीन लागवडीखाली आणणे, पाटबंधारे प्रकल्प बांधणे, विहीरी, तलावांची दुरुस्ती, उद्योग व्यापाराला उत्तेजन इ. उपायांमुळे बडोदा राज्याचा आर्थिक पाया भक्कम झाला.

१३) सेवक भरती करताना पात्र लायक व राजनिष्ठ नोकर मिळविण्याचा प्रयत्न केला. जवळचे लोक ज्ञानी व कार्यक्षम, विद्वान, व्यवहारी नसतील तर राज्याचे नुकसान होते. म्हणून त्यांना दूर ठेवले. सेवकांना विशेष कौशल्य संपादन करण्यासाठी विदेशात प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे धोरण ठेवले.

१४) सेवक भरती करताना समतेच्या तत्वाचा अवलंब केला. जात, धर्म, भाषा, वंश , रंग असा भेदभाव केला नाही. सरकारी सेवेत स्त्रियांनाही दाखल केले व त्यांच्याशी सभ्यतेचा व्यवहार ठेवण्याची दक्षता बाळगण्याचे निर्देश दिले.

१५) न्यायदान पायरी पायरीने करण्याची पद्धत विकसित केली. तपास व तथ्य शोधनावर भर दिला, शासन मंजूरीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची साधक बाधकता तपासूनच र्णिय प्रक्रियेत दाखल करण्याची पद्धत स्विकारली. तसेच लेखी हुजूर हुकूम काढण्याची पद्धत स्विकारली.

१६) राजघराण्यातील व्यक्तींना विशेषाधिकार दिले नव्हते. राजपुत्रांच्या मनात स्वत:विषयी फाजील कल्पना येऊ देणे घातक असल्याने अधिकाऱ्यांना हुजूर हुकूमांद्वारे खास सूचना देण्यात आल्या होत्या.

वरीलप्रमाणे सयाजीराव महाराजांच्या व्यक्तिनिरपेक्ष व वस्तुनिष्ठ सुशासनप्रणालीचे रहस्य होते असे म्हणावे लागेल.

**निष्कर्ष :**

बडोदा संस्थानच्या राज्यकारभार पद्धतीचा व सुशासनप्रणालीचा आढावा घेतल्यानंतर पुढील निष्कर्ष काढता येतील.

१) महाराजा सयाजीरावांच्या राज्यकारभाराचा प्रमुख उद्देश हा प्रजेच्या सर्व प्रकारच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करणे हा होता.

२) सयाजीरावांनी अधिकाऱ्यांच्या सांगण्यावर विसंबून न राहता प्रत्यक्ष जनतेला भेटून त्यांच्या अडीअडचणी व प्रश्न समजून घेण्यावर भर दिला.

३) हुशार, कार्यक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करताना गुणवत्तेला प्राधान्य दिले व प्रशासनाचा दर्जा उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

४) सयाजीरावांनी सुशासनाच्या माध्यमातून सुराज्य निर्माण केले.

५) सयाजीरावांनी राज्यातील सर्व खात्यांमध्ये सहकार्य व सहसंघटन निर्माण करण्यावर भर दिला.

६) सयाजीरावांनी नेहमी आत्मपरिक्षणावर भर दिला. त्यामुळे उणीवा दूर होवून राज्यकारभार सुधारला व हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास गेले.

ISSN No. 2394-5990

७) सयाजीरावांनी सेवकांचे गुण-दोष सांगून सेवकांनी स्वत:मध्ये चांगल्या गुणांचा परिपोष करण्यास सुचविले आहे.

८) सयाजीरावांनी सेवकांच्या प्रशिक्षणांवरन व प्रजेच्या शिक्षणावर भर दिला आहे. करण सर्व सुधारणांचा पाया शिक्षण हा आहे असे त्यांचे तम होते.

९) सयाजीरावांनी कर्तव्यदक्ष सेवकांनी कसे वर्तन करावे याचे मार्गदर्शन केले आहे. तसेच राज्यप्रशासन चालवताना कोणत्या तत्वांचा आवलंब करावा याचे मार्गदर्शन केले आहे.

वरील निष्कर्षावरुन दिसून येते की, कार्यक्षम प्रशासन व निष्ठावंत, कर्तव्यदक्ष सेवकवर्गाच्या माध्यमातून सयाजीरावांनी आपल्या राज्यात सुशासनाचे पर्व निर्माण केले.

**समारोप :**

सयाजीराव महाराजांनी कोणतेही औपचारीक शिक्षण न घेता राज्यकारभाराचे शिक्षण व अनुभव, व्यासंगीवृत्ती, वाचन, मनन, चिंतन, तज्ज्ञांचा सहवास व मार्गदर्शन, परदेश प्रवास पाहून त्यांनी स्वत:ला विकसित केले. त्याबरोबरच आपल्या संस्थानातील प्रजेलाही आधुनिक शिक्षण देवून त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात आपल्या कार्याचा नागरिकांच्या हिताचे रक्षण करुन एक आदर्श राज्य निर्माण केले. राज्यकारभार करताना त्यांनी सुप्रशासनाची अनेक तत्वे आचरणात आणली. आज २१ व्या शतकात सुप्रशासनाची चांगल्या राज्यकारभाराची सर्वत्र अपेक्षा केली जाते. सयाजीरावांनी १०० वर्षापूर्वीच आपल्या राज्यात सुप्रशान निर्माझा केले होते. राज्य ही जनतेची राजाकडे असलेली ठेव आहे. राजा तिचा प्रमुख विश्वस्त आहे. असे समजून सत्ता जनहितार्थ राबविणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे कुशल प्रशासक होते. पंडीत मदन मोहन मालवीय यांनी 'हिंदुस्थानातील शेवटचा आदर्श राजा' या शब्दात त्यांचा यथार्थ गौरव केला होता. त्यांच्या कार्याची व विचारांची आपल्या देशाच्या सर्वागीण प्रगतीसाठी आजही तितकीच प्रस्तुतता आहे. म्हणूनच त्यांना युग प्रवर्तक राजा म्हणून ओळखले जाते.

**संदर्भ :**


१) भांड बाबा, संपादित - महाराजा सयाजीराव - गौरवगाथा युग पुरुषाची, खंड १,२, सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७.

२) डॉ. वरखेडे रमेश, संपादित, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणासंग्रह भाग - १,२ सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७.

३) पाटणे यशवंत, चैतन्याचे चांदणे, संस्कृती प्रकाशन, पुणे २००४.

४) क्षीरसागर शोभादेवी, महाराष्ट्रातील समाजसुधारक, के सागर पब्लिकेशन, पुणे, २००५.

५) सप्ताहिक, साधना दि. ३ फेब्रुवारी २०२४ पुणे.

६) दै. लोकमत दि. ५ फेब्रुवारी २०२४ पान. ५.

७) निकम गौतम, लोक कल्याणकारी राजा सयाजीराव गायकवाड, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव (जळगाव), २०२०.

८) खडसे बोरडे सुनिता, महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा भाग - ८, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद - २०२०.

९) मगर राजेंद्र, सयाजीरावांचे जागतिक वेगळेपण भाग - ३, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद - २०२०.


■■■

# ग्रंथ आणि ग्रंथालय चळवळ : महाराज सयाजीराव गायकवाड यांचे योगदान

**१) प्रा.नीलिमा नामदेव हेमाडे**
आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज नागठाणे,
ता. जि. सातारा

**२) प्रा. साळुंके नंदकुमार लक्ष्मन**
शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद,
ता. खंडाळा, जि. सातारा

**सारांश :**

आपल्या देशामध्ये पूर्वापार परंपरेचा विचार करता ज्ञान क्षेत्राविषयी अस्ता असल्याचे पुरावे आजही आढळतात. त्यामुळे या ज्ञान साग्रहन परंपरेतून ग्रंथालयांचा उदय झाला. ग्रंथ-ग्रंथालये, फिरते ग्रंथालये, ग्रंथालयाचे शास्त्रीय शिक्षण आणि वाचन चळवळ हे या लेखाचे मुळ असणार आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी २५६० सार्वजनिक ग्रंथालये सुरु केली. त्यामधील सुमारे २०० ग्रंथालये हे त्यांच्या राज्याच्या बाहेर होती. या काळात त्यांनी सर्वाना वाचन साहित्य उपलब्ध व्हावे म्हणून सुमारे ५०० फिरते ग्रंथालये सुरु केली. भारतात सर्वप्रथम ग्रंथालय शास्त्रीय शिक्षण सुरु केले. सयाजीराव गायकवाड महाराजांनी समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. शेती, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक सुधारणा अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी गुणवंतांना प्रोस्ताहन दिले. या लेखामध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानातील कालखंडा मध्ये ग्रंथ आणि ग्रंथालये यांच्या माध्यमातून जी वाचन चळवळ उभी केली त्यावरती प्रकाश टाकणार आहोत.

**कि वर्ड :** सार्वजनिक ग्रंथालये, फिरते ग्रंथालये, सार्वजनिक ग्रंथालय चळवळ, वाचन संस्कृती.

**प्रस्तावना :**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ग्रंथ आणि ग्रंथालयाच्या अनुशंगाने केलेले कार्य हे भारतातील ग्रंथालय चळवळीचा पाया आहे. ग्रंथ हे समाज प्रगतीचे आणि परिवर्तनाचे साधन आहे हे त्यांनी ओळखले होते. आपल्या राज्यभर खेडो-पाडी ग्रंथालयांची साखळीच त्यांनी निर्माण केली. त्यांना याचीही जनी होती कि केवळ ग्रंथालये सुरु करून भागणार नाही, तर र्यासाठी त्यांना उत्तम दर्ज्याचे ग्रंथ साहित्य देखील उपलब्ध व्हावे म्हणून हे काम शिक्षण विभागाकडे सोपविले. यांनी २५६० सार्वजनिक ग्रंथालये सुरु केली, त्यामधील सुमारे २०० ग्रंथालये हे त्यांच्या राज्याच्या बाहेर होती. या काळात त्यांनी सर्वाना वाचन साहित्य उपलब्ध व्हावे म्हणून सुमारे ५०० फिरते ग्रंथालये सुरु केली. भारतात सर्वप्रथम ग्रंथालय शास्त्रीय शिक्षण सुरु केले. सयाजीराव गायकवाड महाराजांनी समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. शेती, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक सुधारणा अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी गुणवंतांना प्रोस्ताहन दिले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणींना त्यांनी केलेली मदत हि त्यांच्या राष्ट्र प्रेमाचे व सामाजिक सुधारनेवरील निष्ठेचे उदाहरण आहे. महाराजांचे पुरोगामी महाराष्ट्रासाठी मोठे योगदान आहे. त्यांनी म.फुले, न्या. रानडे, गोपाल गणेश आगरकर, लो. टिळक, दो. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भावूरव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे अशा अनेक समाजधुरीणांना मदत केली आहे.

अधिक चांगल्या प्रकारचे साहित्य निर्माण व्हावे यासाठी लोकांना प्रोस्ताहन देवून पुस्तके लिहून घेतली. अनेक पुस्तके मराठी, गुजराती व हिंदीमध्ये भाषांतरित करून घेतेली. मुलांमध्ये शिक्षणातील रुची वाढावी यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न करून गोष्टी, चित्रमय साहित्य, मनोरंजनात्मक साहित्य अशा प्रकारच्या साहित्याची निर्मिती करून घेतली ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचन कलेवरती त्याचा फार चांगला सकारात्मक परिणाम झाला आणि एक वाचन चळवळ उभा राहिली.

**विषय मांडणी:**

बडोदा संस्थानातीलाच नव्हे तर अवघ्या देशातील ग्रंथालय चळवळीचे प्रणेते म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो ते महाराजा सयाजीराव गायकवाड खखख जन्म श्रीमंत गोपाळराव गायकवाड; ११ मार्च १८६३ - ६ फेब्रुवारी १९३९ हे १८७५ ते १९३९ पर्यंत बडोदा राज्याचे महाराज होते. त्यांच्या राजवटीत त्यांच्या राज्याच्या बऱ्याच सुधारणेसाठी त्यांची आठवण केली जाते, ज्यामध्ये शेती, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक सुधारणा अशा सर्वच बाबींचा प्रामुख्याने समावेश होतो. ते मराठ्यांच्या राजेशाही गायकवाड घराण्यातील होते.

 ISSN No. 2394-5990

महाराजा सयाजीराव गायकवाड यांची विद्याभिरुची आणि ग्रंथ वाचनाची आवड इतकी व्यापक होती कि, त्यांनी विद्या प्रसाराच्या सत्कार्यात आपले तन, मन, धन खर्च केले. शिक्षणाला व वाचानालायाना चांगले वाचन साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी अनेक प्रयोग केले त्यामध्ये आर्थिक सहाय्य करणे, सरकारी खर्चाने ग्रंथ छापणे, खर्च इतक्या रकमेच्या ग्रंथ प्रती खरेदी करणे, देणग्या देने इ. त्यातील त्यांनी राबविलेले काही प्रयोग पुढील प्रमाणे.

१. पारितोषिक देऊन ग्रंथ तयार करावयाचा व मग सरकारी खर्चाने तो छापावयाचा.
२. राज्यातील नोकर वर्गाकडून स्वतःचे काम म्हणून ग्रंथ तयार करावयाचा व मग तो सरकारी खर्चाने तो छापावयाचा. शं. मो. रानडे, सरदेसाई, गोविंदभाई देसाई यांनी याच प्रकारे ग्रंथ तयार केले.
३. पगारी ग्रंथकार ठेवून खास देखरेखीखाली ग्रंथ तयार करावयाचा. उदा. सयाजी ज्ञानमंजुषेतील ग्रंथ, संस्कृत संशोधक खाते, स्थापून काही ग्रंथांची भाषांतरे करविली.
४. ग्रंथकाराला पारितोषिक देऊन ग्रंथ तयार करावयाचे व त्यांच्याकडून तो छापून घेऊन त्यांच्या काही (५० प्रती) सरकारने घ्यावयाच्या. ज्ञानमंजूषा बंद पडल्यावर पदार्थविज्ञान, कृषिकर्म इत्यादी ग्रंथ असे छापवले.
५. ग्रंथकाराकडून ग्रंथ तयार करवून छापावयाचा व त्याच्या एक - दोन प्रती पारितोषिक म्हणून त्या ग्रंथकारास द्यावयाच्या. उदा. 'अबलोन्नती लेखमाला', 'संसार मार्गोपदेशिका' इत्यादी.
६. ग्रंथकाराकडून ग्रंथ करवून त्यांच्याकडूनच तो छापवयाचा व छपाईचा जेवढा खर्च झाला असेल तितक्या किमतीच्या प्रती सरकारने विकत घ्यावयाच्या. 'श्री भूषण', 'कन्या भूषण', 'उपनयन विद्यासागर' इत्यादी ग्रंथ असे तयार झाले आहेत.
७. ग्रंथ तयार करून छापण्यासाठी उचलून रक्कम द्यावयाची व टी बद्दल काही ठराविक प्रती सरकारने घ्यावयाच्या. 'गुजराती काव्यमाला ग्रंथ' (३५) अशारीतीने तयार झाले. यासाठी १६,०००/- रुपये मंजूर झाले होते.
८. विशिष्ट विषयांची पुस्तके सरकारी खर्चाने छापवून त्याच्या काही प्रती ठेवून बाकीच्या ग्रंथकारास द्यावयाच्या. प्रा.मौलाबक्ष, मूर्तुजाखां, मनोहर यांची गायनावरील पुस्तके 'संगीत पारिजात' व 'संगीत रत्नाकर' यांची भाषांतरे या प्रकारे निघाली.
९. ग्रंथाच्या उत्तेजनासाठी देणग्या द्यावयाच्या, 'महाराष्ट्र शब्दकोश', 'पेशवे दप्तर', 'वादांच्या रोजनिशा' इत्यादी
१०. महाराजांना नजर केलेल्या ग्रंथांना बक्षिसे द्यावयाची. (बुवा जी.ए. १२९-१३०)

या माध्यमातून निर्माण झालेले साहित्य सार्वजनिक ग्रंथालयामध्ये संग्रहित करून लोकांना मोफत वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले.

**सार्वजनिक वाचनालय :**

सामाज्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, प्रगल्भता यावी यासाठी गुजरातच्या प्रत्येक गावात एक वाचनालय असावे हे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे ध्येय होते आणि त्यासाठी त्यांनी गावो गावी, खेडो पाडी २५६० ग्रंथालये सुरू केली, त्यापैकी २०० ग्रंथालये त्यांच्या राज्याबाहेर होती. या ग्रंथालयांमध्ये मिळून अडीच लाखांहून अधिक पुस्तकांचा संग्रह होता. यावरून त्या काळात महाराजांकडे किती दूरदृष्टी होती हे लक्षात येते. या सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये बाल विभाग, महिला विभाग, पाक शास्त्र असे अनेक विभाग करण्यात आले. अनेक सार्वजनिक ग्रंथालयांचे आणि त्या इमारतींचे उद्धाटन स्वतः महाराज सयाजीराव याकावाद यांनी केले. महाराजांनी १९१० मध्ये अद्यावत इमारतीत सेन्ट्रल लायब्ररीची स्थापना केली. हे ग्रंथालय आशिया खंडातील सर्वात मोठे ग्रंथालय म्हणून सर्वश्रुत होते. ग्रंथालय कायदा अस्तित्वात नसताना ग्रंथालय नियम तयार केले. हे नियम दोनच होते.

१. अनुदान प्राप्त करणाऱ्या वाचानालयानी वाचकांमध्ये मतभेद करायचा नाही.
२. एका गावी केवळ एकाच ग्रंथालयास अनुदान मिळेल.

**जेथे शाळा तेथे ग्रंथालय:**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी १९०७ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून जेथे शाळा तेथे ग्रंथालय या नव्या उपक्रमाचे अभियान सुरु केले.

**मोबाईल लायब्ररी/फिरते ग्रंथालय :**

महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी १८८५ साली बडोदा राज्यात पहिले फिरते वाचनालय उघडले. त्यांनी गुजरातमध्ये अशी ५०० फिरती लायब्ररी सुरू केली. एका वाहन किंवा पेटी ज्यामध्ये अनेक ग्रंथालय पुस्तके ठेवलेली असत. ते वाहन किवा पेटी वेगवेगळ्या ठिकाणी किंवा गावोगावी नेवून वाचकांना मोफत पुस्तके देत. यामधील पुस्तके दर पंधरा दिवसांनी बदलली जात असे. ही फिरती वाचनालये हत्ती, उंट, घोडे, बैल आणि अगदी गाढवांनी खेचली जात असे. अशा स्वरूपाच्या फिरत्या ग्रंथालयाचा प्रयोग जगात सर्वप्रथम स्कॉटलंड येथे झाला, तर दुसरा प्रयोग महाराजा

सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी १८८५ साली आपल्या बडोदा राज्यात केला.

**ग्रंथालय शिक्षण :**

समाज परिवर्तनासाठी वाचन महत्वाचे आहे तर वाचनासाठी उत्तम साहित्याची उपलब्धता आणि समृद्ध ग्रंथालये आवश्यक आहेत. ग्रंथालयाच्या उत्तम व्यवस्थापनासाठी चांगले ग्रंथालय ज्ञान असणारा शिक्षित व कुशल वर्ग हवा असतो. यासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी अमेरिकेचे ग्रंथालय विषयतज्ञ मिस्टर बॉर्डन यांना अतिशय सन्मानाने बोलावून ग्रंथालय व्यवस्थापन जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. मिस्टर बॉर्डन यांनी बडोदा येथे भारतातील पहिली ग्रंथालय शाळा देखील स्थापन केली ज्यामध्ये संपूर्ण भारतातून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. बडोदा ग्रंथालय शाळा अनेक वर्षे सुरू राहिली. त्यानंतर दुसरी ग्रंथालय शाळा पंजाब युनिव्हर्सिटी, लाहोर (आता पाकिस्तानमध्ये) येथे स्थापन करण्यात आली, श्री आसा डॉन डिकिन्सन, दुसरे अमेरिकन ग्रंथपाल, हे जागतिक ग्रंथालय शास्त्राचे जनक मेलविल ड्यूईचे समकालीन होते.

**निष्कर्ष :**

महाराज महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये ग्रंथालयांच्या अनुषंगाने केलेल्या विविध कामामुळे त्यांना भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक मानले जाते. महाराजांनी १९१० मध्ये सेन्ट्रल लायब्ररीची स्थापना केली जे आशिया खंडातील सर्वात मोठे ग्रंथालय म्हणून सर्वश्रुत होते. ग्रंथालय कायदा अस्तित्वात नसताना ग्रंथालय नियम तयार केले. गाव तेथे ग्रंथालय, फिरते ग्रंथालय आणि देशात सर्वप्रथम शास्त्रीय ग्रंथालय शिक्षण या सर्वांमधून महाराजांची वाचानालाया बाबतची दूरदृष्टी स्पष्ट दिसून येते. आधुनिक भारतामध्ये आपण जे ग्रंथालयांचे बदललेले स्वरूप बगतो त्याचे बीज महाराज महाराज सयाजीराव गायकवाड यांनी लावलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. बुवा जी.ए: (२०२०) महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, गांधीनगर, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती
२. भांड, बाबा: (२०१३) लोकपाळराजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, पुणे. द्वितीय, आवृत्ती.
३. भागवत, अनंत नारायण: (१९०६) श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे चरित्र, सरकारी छापखाना, बडोदा.
४. पवार, निंबाजीराव: (१९८६) जेंव्हा गुराखी राजा होतो, सयाजी प्रकाशन, नाशिक.
५. https://en.wikipedia.org/wiki/SayajiraošGaekwadšIII 12/02/2024


■■■

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य

**डॉ. रामचंद्र वसंत कुंभार**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
घटक महाविद्यालय,
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा
ई.मेल : kumbhar.ramchandra@gmail.com
मोबाईल नं. - ९५५०३१३८४८

**गोषवारा :**

ब्रिटीशकालीन भारतातील मोजक्याच समाजोद्धारक संस्थांनी राज्यकर्त्यांमध्ये बडोदा संस्थानाचे श्री महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांचा समावेश होतो. महाराजा सयाजीरावांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. अस्पृश्योद्धाराबरोबर महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये केलेले शैक्षणिक कार्य खूप महत्त्वाचे आहे. शिक्षण हा सामाजिक सुधारणेला चालना देणारा महत्वपूर्ण घटक आहे. भारतातील बहुजन समाजाच्या अधोगतीचे प्रमुख कारण अविद्या हे होते. महात्मा फुले यांचे हे विचार महाराजांच्या मनावर चांगल्याप्रकारे बिंबलेले होते. परिणामी महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग करून बडोदा संस्थानात मोठी शैक्षणिक क्रांती घडवून आणली. प्राथमिक शिक्षणापासून स्त्रीशिक्षण, उच्चशिक्षिण, शिक्षक प्रशिक्षण अशा सर्व घटकांवर महाराजांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले. प्रस्तुतच्या शोधनिबंधात महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांच्या शिक्षणविषयक विचार व कार्याचा समग्र आढावा घेण्यात आला आहे.

तिसरे सयाजीराव महाराज यांच्या शैक्षणिक सुधारणेतील सर्वात महत्त्वाची सुधारणा म्हणजे 'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे धोरण' होय. महाराजांनी 'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना' सर्वप्रथम आपल्या राज्यातील 'अमरेली' महालात इ. स. १८९३ मध्ये लागू केली. अमरेली महालातील हे यश पाहून महाराजांनी सन १९०६ साली मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना आपल्या संपूर्ण बडोदे राज्याला लागू करण्याचे ठरविले, आणि त्याबाबतचा स्वतंत्र कायदा सन १९०७ च्या मे महिन्यात करून त्या कायद्यात गैरहजर राहणाऱ्या मुलांना दंड करणे, विशेष कारणांसाठी हजेरीची माफी देणे वगैरे बद्दलचे विस्तृत नियम करण्यात आले. महाराजांच्या या योजनेमुळे बडोदा राज्यातील प्राथमिक शाळांची संख्या सन १९१०-११ मध्ये २,९३८ इतकी झाली आणि विद्यार्थी संख्या १,७३,८८३ इतकी झाली.

सयाजीराव महाराजांच्या शिक्षणिक विचार-कार्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची उन्नती होणार नाही हे महात्मा फुले यांचे विचार प्रत्यक्षात आणण्याचे महान कार्य सयाजीराव महाराजांनी केले. सयाजीराव महाराजांचे हे शैक्षणिक विचार व कार्य सांप्रत काळातही उपयुक्त आहेत. महाराजांनी त्याकाळानुसार प्राथमिक शिक्षणाला महत्त्व दिले. त्याचबरोबर त्यांनी शेती, व्यापार, व्यवसाय अशा कौशल्याभिमुख शिक्षणालाही तितकेच प्राधान्य दिले. याशिवाय सयाजीराव महाराजांनी आपल्या राज्यातील स्त्रियांच्या शिक्षणाकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले.

**कि-वर्डस :** महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, बडोदा

**प्रस्तावना :**

ब्रिटीशकालीन भारतातील मोजक्याच समाजोद्धारक संस्थांनी राज्यकर्त्यांमध्ये बडोदा संस्थानाचे श्री महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांचा समावेश होतो. महाराजा सयाजीरावांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. अस्पृश्योद्धाराबरोबर महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये केलेले शैक्षणिक कार्य खूप महत्त्वाचे आहे. शिक्षण हा सामाजिक सुधारणेला चालना देणारा महत्वपूर्ण घटक आहे. भारतातील बहुजन समाजाच्या अधोगतीचे प्रमुख कारण अविद्या हे होते. महात्मा फुले यांचे हे विचार महाराजांच्या मनावर चांगल्याप्रकारे बिंबलेले होते. परिणामी महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग करून बडोदा संस्थानात मोठी शैक्षणिक क्रांती घडवून आणली. प्राथमिक शिक्षणापासून स्त्रीशिक्षण, उच्चशिक्षिण, शिक्षक प्रशिक्षण अशा सर्व घटकांवर महाराजांनी

जाणीवपूर्वक लक्ष दिले. प्रस्तुतच्या शोधनिबंधात महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांच्या शिक्षणविषयक विचार व कार्याचा समग्र आढावा घेण्यात आला आहे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांचा अल्पपरिचय :**

बडोदा संस्थानाचे समाज सुधारक राज्यकर्ते महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांची इ.स. १८८१ ते १९३९ ही कारकीर्द होय. बडोदा संस्थानावर पट्टणच्या नबाबाची बेगम लाडबिबी हिची सत्ता होती. पिलाजीराव गायकवाडांनी इ.स. १७२८ मध्ये पहिल्यांदा बडोदा जिंकले. परंतु पिलाजीरावांच्या मृत्यूनंतर इ.स. १७३२ मध्ये लाडबिबीने पुन्हा बडोद्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली. पुढे इ.स. १७३४ मध्ये दुसऱ्या दामाजीराव गायकवाडांनी बडोदे दुसऱ्यांदा जिंकून घेतले. त्यानंतर मात्र स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत बडोदा संस्थानावर गायकवाडांची सत्ता कायम राहिली.[१]

बडोद्याच्या गायकवाड घराण्याचे मूळ पुरुष नंदाजीराव भोर संस्थानात किल्लेदार होते. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील भरें हे त्यांचे मूळ गाव होय. नंदाजीरावांचा नातू पानजीराव ऊर्फ दमाजीराव पहिले यांनी सेनापती खंडेराव दाभाडे यांच्याकडे सैन्यात नोकरी धरली. दमाजीरावांचा दत्तकपुत्र पिलाजीराव यांनी मोठा पराक्रम केल्यामुळे त्यांना पहिले बाजीराव पेशवे यांनी दि. ३ मे, १७२८ च्या आज्ञापत्राद्वारे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील दावडी गावाची पाटीलकी दिली.[२] तेव्हापासून पुढील कालखंडात दावडीचे गायकवाड म्हणून गायकवाड घराणे ओळखू लागले.

खंडेराव दाभाडे यांनी गुजरात – काठेवाड परिसरात मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली होती. त्यांच्या पदरी नंदाजीरावांचे नातू दमाजीराव पहिले यांनी नोकरी धरली होती. दमाजीरावांना त्यांच्या पराक्रमाबद्दल साताऱ्याच्या छत्रपती शाहू महाराजांनी ‘समशेर बहादूर’ हा किताब दिला. पहिल्या बाजीरावाच्या काळात गुजरातमधील दाभाड्यांचे वर्चस्व संपुष्टात आले आणि गायकवाड पेशव्यांच्या थेट अधिपत्याखाली आले. पेशव्यांच्या अधिपत्याखालून मुक्त होण्यासाठी गायकवाडांनी महाराणी ताराबाईंचा पक्ष घेऊन साताऱ्यावर आक्रमण केले होते, मात्र त्यांना पराभव पत्करावा लागला. पुढे पेशवा दुसरा बाजीराव इंग्रजांकडून पराभूत झाल्यानंतर इ.स. १८०३ मध्ये बडोद्याचे गायकवाड भारतातील ब्रिटीश सत्तेच्या अधिपत्याखाली आले ते १९४७ पर्यंत ब्रिटिशांच्याच अधिपत्याखाली राहिले.[३]

महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी बडोद्याची सत्तासूत्रे इ.स. १८८१ मध्ये आपल्या हाती घेतली. सयाजीरावांपूर्वी अनेक कर्तबगार सत्ताधीश बडोद्याच्या गायकवाड घराण्यात होऊन गेले. बडोद्याच्या गायकवाड घराण्याचे मूळ पुरुष नंदाजीराव यांचे नातू दमाजीराव पहिले यांच्यापासून या घराण्याच्या पराक्रमी सत्ताधीशाची परंपरा सुरु होते. पिलाजीराव पहिले हे बडोद्याच्या गायकवाड घराण्यातील दुसरे सत्ताधीश ज्यांनी सर्वप्रथम बडोदा आपल्या अधिपत्याखाली आणले. पुढे दमाजीराव दुसरे, गोविंदराव, सयाजीराव पहिले, फत्तेसिंगराव, मानाजीराव, आनंदराव, सयाजीराव दुसरे, गणपतराव, खंडेराव, मल्हारराव असे सत्ताधीश बडोद्याच्या गायकवाड घराण्यात होऊन गेले. सयाजीराव तिसरे हे बडोद्याच्या गायकवाड घराण्यातील १३ वे सत्ताधीश होय.[४]

इ.स. १८५६ मध्ये खंडेराव बडोद्याच्या गादीवर आले. खंडेरावांना दोन पत्नी होत्या, परंतु त्यांच्यापासून मूलबाळ नसल्याने त्यांनी रहिमतपूरच्या माने-पाटीलांची कन्या जमनाबाईंशी तिसरा विवाह केला. खंडेरावांना इंग्रजांकडून दत्तक पुत्र घेण्यास परवानगी मिळाली होती. इ.स. १८७० मध्ये खंडेरावांचे निधन झाले, त्यावेळी त्यांच्या पत्नी जमनाबाई गरोदर होत्या. परंतु त्यांना मुलगी झाल्यामुळे इंग्रजांनी खंडेरावांचा लहान भाऊ मल्हाररावास बडोद्याच्या राजगादीवर बसविले. मात्र लवकरच इंग्रजांशी त्याचे खटके उडू लागले. इ.स. १८७५ मध्ये इंग्रजांनी मल्हाररावास राजद्रोहाच्या आरोपाखाली पदच्युत करून मद्रासच्या तुरुंगात डांबले आणि खंडेरावांची पत्नी जमनाबाईंना पुण्यातून सन्मानाने बडोद्याला आणून दत्तकपुत्र घेण्यास सांगितले. बडोद्यात दत्तक घेण्यायोग्य अल्पवयीन वारस नसल्याने महाराष्ट्रात जवळच्या नातेसंबंधातील मुलांचा शोध घेण्यात आला. हा शोध नाशिक जिल्ह्यातील कवळाणे येथे संपला. कवळाणे येथे बडोद्याच्या गायकवाडांची एक शाखा पानिपतच्या तिसऱ्या लढाईनंतर स्थापन झाली होती. पानिपतच्या तिसऱ्या लढाईत बडोद्याच्या गायकवाड घराण्यातील तिसरे सत्ताधीश दमाजीराव दुसरे आपला लहान भाऊ प्रतापराव यांच्यासह सहभागी झाले होते. परंतु या लढाईतील पराभवानंतर दोघा भावांची ताटातूट झाली. दमाजीराव आपला जीव वाचवून बडोद्यास परतले, तर प्रतापराव महाराष्ट्रात आले. नाशिक जिल्ह्यातील गिरणारे येथे प्रतापराव आपल्या मुलांसह शेती करू लागले. इ.स. १८१७ मध्ये प्रतापरावांचा पणतू भिकाजीरावांनी कवळाणे येथील पाटीलकीच्या वतनाचे व इतर हक्क १०१ रु. किमतीस विकत घेतले.[५]

भिकाजीरावांना पाच पुत्र होते, त्यापैकी एक काशिराव होय. काशिरावानांचा पुत्र गोपाळराव यास खंडेरावांची पत्नी जमनाबाई यांनी दत्तक घेतले. २७ मे, १८७५ रोजी दत्तक विधान होऊन गोपाळराव ‘सयाजीराव तिसरे’ म्हणून बडोद्याचे सत्ताधीश बनले. पुढे इंग्रजांच्या देखरेखीखाली सयाजीरावांचे

शिक्षण पूर्ण झाले. सयाजीराव प्रशासकीय जबाबदारी सांभाळण्यास सक्षम बनल्यानंतर त्यांनी २८ डिसेंबर, १८८१ रोजी बडोद्याच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली.[६]

**महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांचे शैक्षणिक विचार व कार्य :**

तिसरे सयाजीराव महाराज यांनी सत्तासूत्रे हाती घेतली त्यावेळी बडोद्याची शैक्षणिक स्थिती अतिशय वाईट होती. महाराजांनी सत्ता हाती घेताच आपल्या राज्यात विविध प्रकारच्या सुधारणा हाती घेत असताना शैक्षणिक सुधारणांकडे जास्त लक्ष दिले. महाराजांच्या सुधारणावादी दृष्टीकोनामागे महात्मा फुले यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. महात्मा फुलेंना महाराज बडोद्याला बोलावून राजवाड्यात त्यांची व्याख्याने आयोजित करत. इ.स. १८८४ मध्ये महात्मा फुले बडोद्यास तीन महिने मुक्कामी होते, त्यावेळी त्यांनी महाराजांना 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाचे चारही भाग वाचून दाखवले. या ग्रंथाच्या प्रस्तावनेतच महात्मा फुलेंनी शूद्रांच्या शिक्षणाचे महत्त्व विशद करण्यासाठीच्या प्रसिद्ध काव्यपंक्ती दिल्या आहेत.[७] महात्मा फुलेंच्या शिक्षणविषयक विचाराने महाराज प्रभावित होऊन त्यांनी आपल्या राज्यात अनेक शैक्षणिक सुधारणा केल्या.

महाराजा सयाजीराव तिसरे यांनी सत्तासूत्रे हाती घेतली त्यावर्षीच म्हणजे इ.स. १८८१ मध्ये बडोदे कॉलेज सुरू करण्यात आले. सुरुवातीला कला शाखा सुरु केली होती, पुढे इ.स. १८८७ साली विज्ञान शाखाही उघडण्यात आली. बडोदा राज्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती खूपच खराब होती, त्यापेक्षाही वाईट स्थिती अस्पृश्यांच्या शिक्षणाची होती. म्हणून महाराजांनी सन १८८२-८३ मध्ये शाळा उघडून अस्पृश्य मुलांना संपूर्ण फी माफी केली आणि त्यांना पाट्या, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य मोफत पुरविण्याचा आदेश काढला. तसेच भिल्ल मुलांसाठी एक स्वतंत्र वसतिगृह स्थापन करण्यात आले. अस्पृश्य लोकांप्रमाणे सर्वात वरच्या स्थानी असलेला सरदार वर्गही शैक्षणिकदृष्ट्या मागासच होता. त्यामुळे महाराजांनी सन १८८२-८३ साली सरदार लोकांच्या मुलांसाठी एक स्वतंत्र शाळा स्थापन केली. या शाळेत मातृभाषेत विविध विषय शिकविले जात, शिवाय लष्करी शिक्षणाचीही सोय केली होती. सन १८८७ मध्ये या शाळेत ५७ विद्यार्थी होते.[८]

सन १९८५ मध्ये बडोदा कॉलेज व हायस्कूलच्या बक्षिस वितरण समारंभाच्या भाषणात सयाजीराव महाराजांनी आपले शिक्षणविषयक धोरण मांडले. या भाषणातून त्यांनी आपला शिक्षणविषयक कार्यक्रमच घोषित केला. यावेळी महाराजांनी आपला शिक्षणविषयक कार्यक्रम जाहीर करताना प्रतिवर्षी ३० नव्या शाळा उघडणे, शाळांच्या इमारतींसाठी दरवर्षी ६०,००० रुपये खर्च करणे, प्रत्येक विभागातील मुख्य शाळेला जोडून अभ्यासक्रमात उल्लेख केलेल्या वस्तूंचे संग्रहालय स्थापन करणे, स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे व मुलींच्या शाळेवर स्त्रीशिक्षिकांच्याच नियुक्त्याची योजना करणे, औद्योगिक शिक्षणाच्या शाळा सुरु करणे, इंग्रजी भाषेतील उत्तमोत्तम ग्रंथांची देशी भाषांत भाषांतरे करणे, समाजातील अगदी शेवटच्या थरापर्यंत शिक्षणाचा प्रसार करण्याची तजवीज करणे इ. उपाययोजना करण्याचे घोषित केले.[९]

तिसरे सयाजीराव महाराज यांच्या शैक्षणिक सुधारणेतील सर्वात महत्त्वाची सुधारणा म्हणजे 'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे धोरण' होय. महाराजांनी 'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना' सर्वप्रथम आपल्या राज्यातील 'अमरेली' महालात इ. स. १८९३ मध्ये लागू केली. याबाबतची हकीकत अशी की, दि. १६ मार्च, १८९३ रोजी महाराज आपले दिवाण मणीभाई जसभाई यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात की, गेल्या पुष्कळ काळपर्यंत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रयोग सर्व बडोदे राज्याला नाही, तरी निदान त्यातील काही भागाला लागू करण्याचा विचार माझ्या मनात घोळत होता.................. या प्रयोगाला लागणारा सर्व खर्च करणे सरकारला परवडेल किंवा नाही हा एक मोठा प्रश्न आहे. हल्लीच उत्पन्नाइतका खर्च आम्ही करत आहोत. ही स्थिती समाधानकारक नाही. तथापि आणखी काही थोडे हजार रुपये खर्च करण्याची जबाबदारी स्वीकारून मी असा हुकुम देतो की, अमरेली महालातील सर्व गावात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापण्यात याव्या. त्याचा खर्च अंदाजे ३१७९०-८-० येईल.१० अशा प्रकारे सयाजीराव महाराज तिसरे यांनी अमरेली महालात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना लागू केली आणि हे धोरण राबविणारे भारतातील पहिलेच संस्थानिक ठरले.

सन १८९३ मध्ये महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी आपल्या राज्यातील फक्त अमरेली महालामध्ये मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना लागू केली असली तरी त्यांना पुढील काळात आपल्या संपूर्ण राज्यामध्ये ही योजना लागू करावयाची होती. त्यासाठी प्रतिवर्षी सुमारे १२ ते १५ लाख खर्च येईल असा त्यांचा अंदाज होता. अमरेली महालात ही योजना लागू केल्यानंतर सन १८९४-९५ च्या अखेरीस शाळेत जाण्यायोग्य मुलांपैकी शेकडा ९७.२ मुले स्वखुशीने शाळेत जाऊ लागली. अमरेली महालातील हे यश पाहून महाराजांनी सन १९०६ साली मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना आपल्या संपूर्ण बडोदे राज्याला लागू करण्याचे ठरविले, आणि त्याबाबतचा स्वतंत्र कायदा सन १९०७ च्या मे

महिन्यात करून त्या कायद्यात गैरहजर राहणाऱ्या मुलांना दंड करणे, विशेष कारणांसाठी हजेरीची माफी देणे वगैरे बद्दलचे विस्तृत नियम करण्यात आले. महाराजांच्या या योजनेमुळे बडोदा राज्यातील प्राथमिक शाळांची संख्या सन १९१०-११ मध्ये २,९३८ इतकी झाली आणि विद्यार्थी संख्या १,७३,८८३ इतकी झाली.[११]

**निष्कर्ष :**

ब्रिटीशकालीन भारतातील मोजक्याच समाजोद्धारक संस्थांनी राज्यकर्त्यांमध्ये बडोदा संस्थानाचे श्री महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांचा समावेश होतो. त्यांनी आपल्या संस्थानी राज्यात अनेक सुधारणा केल्या. सयाजीराव महाराजांनी केलेल्या सुधारणांमध्ये त्यांनी आपल्या राज्यात केलेले शिक्षणिक कार्य अतियश महत्त्वाचे आहे. आपल्या संस्थानात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना लागू करणारे पहिले भारतीय संस्थानिक ठरले. सयाजीराव महाराजांच्या शिक्षणिक विचार-कार्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची उन्नती होणार नाही हे महात्मा फुले यांचे विचार प्रत्यक्षात आणण्याचे महान कार्य सयाजीराव महाराजांनी केले.

सयाजीराव महाराज आपले शैक्षणिक विचार मांडताना म्हणतात की, 'शिक्षण हे मोठे परोपकाराचे कार्य आहे व त्या कार्यात जो यशस्वी होईल, तोच देशाचा खरा उद्धारक समजला जाईल. प्रजेच्या शारीरिक सुखाप्रमाणेच नैतिक व बौद्धिक सुधारणेकडे धर्मपिता या न्यायाने राजाने अवश्य लक्ष दिले पाहिजे. शिक्षण निरनिराळ्या विषयांचे दिले पाहिजे, हे उघड आहे; परंतु त्या सर्वांत प्राथमिक शिक्षणासच सध्या प्राधान्य दिले पाहिजे. हे शिक्षण झाल्यावर शेती, व्यापार, व उद्योगधंदे वगैरे निरनिराळ्या प्रकारचे शिक्षण पुष्कळ देता येईल. हल्ली ज्या पद्धतीने शिक्षण देण्यात येते, ते केवळ पढिक व औपचारिक आहे. तींत तात्त्विक शिक्षणाचा किंवा व्यापाराचा समावेश झालेला नाही. त्या बाबीकडे जास्त लक्ष दिले पाहिले.'[१२] सयाजीराव महाराजांचे हे शैक्षणिक विचार सांप्रत काळातही उपयुक्त आहेत. महाराजांनी त्याकाळानुसार प्राथमिक शिक्षणाला महत्त्व दिले. त्याचबरोबर त्यांनी शेती, व्यापार, व्यवसाय अशा कौशल्याभिमुख शिक्षणालाही तितकेच प्राधान्य दिले. याशिवाय सयाजीराव महाराजांनी आपल्या राज्यातील स्त्रियांच्या शिक्षणाकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले.

**संदर्भ :**


१. आपटे दाजी नागेश श्री. महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र खंड १ ला, दाजी नागेश आपटे रावपुरा, बडोदा १९३६ पान नं. १४.

२. किता पान नं. १०.

३. पगार एकनाथ, महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८ पान नं. १५.

४. आपटे दाजी नागेश उपरोक्त पान नं. १४८.

५. कित्ता पान नं. १४९.

६. मालकर यमाजी (संपा.) महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र संग्रह भाग १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८ पान नं. १००.

७. श्री कीर धनंजय, डॉ. मालशे स. ग. व डॉ. य. दि. फडके (संपा.) महात्मा फुले समग्र वाङ्मय, ६ वी आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६ पान नं. २६३.

८. आपटे दाजी नागेश उपरोक्त पान नं. ३५३ ते ३५६.

९. कित्ता पान नं.३५८ ते ३५९.

१०. आपटे दाजी नागेश श्री. महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र खंड २ रा, दाजी नागेश आपटे रावपुरा, बडोदा १९३६ पान नं. ६३४.

११. कित्ता पान नं. ६३६.

१२. आपटे दाजी नागेश उपरोक्त पान नं. ३६४-३६५.


■■■

ISSN No. 2394-5990

# महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य आणि कर्तृत्व

**डॉ. अनिल शिवाजी टिके**
इतिहास विभाग प्रमुख
मुधोजी महाविद्यालय,फलटण
Email: tikeanil1648@gmail.com, Ph.9421119652

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये अनेक युगपुरुषांचे नेतृत्व समाजाच्या विविध क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे कार्यरत राहिले अशा या युगपुरुषांच्या कार्य आणि कर्तृत्वामुळेच शिक्षण, उद्योग, सामाजिक सुधारणा, शेती, आरोग्य अशा विविध क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राची प्रगती होऊ शकली. याच प्रगतीमध्ये महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव घेतले जाते. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, वाचनालयाची निर्मिती, क्रांतिकारकांना मदत, अस्पृश्य व आदिवासी वस्तीगृहे, उच्च शिक्षण, शेतकी शिक्षण, तौलणिक धर्मशास्त्र, आधुनिक तंत्रविद्या, कलाशिक्षण, सामाजिक शास्त्रातील शिक्षण व संशोधनाची शिष्यवृत्ती, स्त्रियांच्या शिक्षणासाठी विशेष सेवा व सुविधा, सामाजिक सुधारणा, आणि कायदे पद्धत, देशी भाषांना कला कलावंतांना मदत, सहकार चळवळ, शेती शेतकऱ्यांसाठी सहाय्यकारी योजना अशी विविध कार्य सयाजीराव गायकवाड यांनी केल्यानेच तत्कालीन कालखंडात आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण घडवून आणण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.

तत्कालीन समाज जीवनामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सामाजिक न्याय या मूल्यांचा सयाजीरावांच्या कर्तुत्वात मोठा ठसा होता. सयाजीराव महाराज गायकवाड यांनी इसवी सन १८७५ ते इसवी सन १९३९ या कालखंडात आपल्या कार्याचा प्रभाव महाराष्ट्र, गुजरात आणि संपूर्ण भारतावर पडला. त्यांच्या कार्य आणि कर्तुत्वाचा संशोधन रूपाने अभ्यास करण्यासाठीच वरील विषयाला अनुसरून आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य आणि कर्तृत्व यावर प्रकाश टाकलेला आहे.

**१. संशोधनाचे उद्देश :**

१. महाराष्ट्राच्या जडणघडणीत मध्ये अनेक युगपुरुषांचे नेतृत्व स्पष्ट करणे.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्य उद्धाराचे कार्य स्पष्ट करणे.
३. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केकेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.
४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी स्त्रियांच्या स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी केलेले कार्य स्पष्ट करणे.
५. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सहकार चळवळ शेतकऱ्यांसाठी केलेल्या सहकारी योजना यांचा आढावा घेणे.

**२. विषयविवेचन :**

एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील परिवर्तनवादी दृष्टिकोनातून महत्त्वाचे शतक मानले गेले. या शतकामध्ये ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, राजकारण, शिक्षण, धर्म, संस्कृती अशा विविध क्षेत्रांमध्येच अर्थातच सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक सर्व क्षेत्रांमध्ये वैचारिक जागृती घडून आली. तत्कालीन काळात महाराष्ट्रामध्ये समाज सुधारकांनी सर्वप्रथम वैचारिक आणि शैक्षणिक जागृती यांच्याद्वारे सामाजिक अंधश्रद्धा, जातिभेद, गुलामगिरी, विषमता, अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. याच मालिकेमध्ये महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे अशा विविध समाजसुधारकांचा क्रम मानला जातो. याच समाजसुधारकांनी पैकी पुढे जाऊन भक्कम वैचारिक व आर्थिक पाठबळ निर्माण करणारे बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड होते.

शिक्षणाचे महत्त्व ओळखून शैक्षणिक परिवर्तन खेड्यापाड्यातून करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा नामोउल्लेख केला जातो. त्यांच्या कार्यामुळेच पुढे शिक्षण व्यवस्थेचा मोठ्या प्रमाणात प्रचार झाला असे दिसून येते. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दीपस्तंभासारखे दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरते. महाराजा सयाजीराव यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील कवळाने येथे ११ मार्च १८६३ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव काशीराव तर आईचे नाव उमाबाई

होते. त्यांचे मूळनाव गोपाळराव गायकवाड असे होते. २७ मे १८७५ रोजी त्यांचा दत्तक विधान झाला. दिवाण सर टी माधवराव व रेसिडेंट रिचर्ड यांच्या उपस्थितीत हा राज्यरोहन समारंभ पार पाडला.[१]

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण पुढे रेसिडेंट आणि दिवाण यांच्या योजनेनुसार सुरू झाले. केशवराव पंडित आणि व्यंकटराव जोशी यांची सयाजीरावांचे शिक्षक म्हणून नियुक्ती केली. या काळामध्ये मिस्टर एफ. ए. एच. एलियन या तरुण आयसीएस अधिकाऱ्यांनी सयाजीराव यांचे शिक्षक म्हणून काम पाहिले. या काळात त्यांनी महाराजांच्या घडणीवर लक्ष केंद्रित केले. शिक्षण शास्त्र आणि मानसशास्त्र यांची मर्मदृष्टी त्यांनी अंगीकारली होती. नैतिक शिक्षणावर सुद्धा तत्कालीन महाराणी साहेब यांनी देखरेख ठेवली.[२]

प्रजेचे कल्याण करणे प्रजेच्या सुखदुखात सहभागी होणे व सर्वांगीण प्रगतीसाठी राजसत्तेचा विनियोग करणे असे संस्कार या काळात त्यांच्या गुरु व मातोश्री राजमाता जमनाबाई यांनी केले. व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांच्या आदेश पत्राने सयाजीरावांचा प्रत्यक्ष राज्यकारभार हाती घेण्याचा समारंभ झाला. २८ डिसेंबर १८८१ रोजी राज्य अधिकार समारंभ पार पडला. प्रत्यक्ष लोकांच्या भेटीतून लोकसंवादाच्या माध्यमातून लोकांचे प्रश्न जाणून घेण्याचा विचार त्यांनी केला. त्यादृष्टीने ‘कडी’ प्रांताचा पहिला दौरा त्यांनी केला. या पाठीमागे त्यांचा मुख्य उद्देश म्हणजे रयतेच्या प्रश्नांची तोंड ओळख व्हावी, प्रशासनाचे स्वरूप तपासावे, राजा आणि रयत यांच्या सरळ संवाद व्हावा असेच होते..[३]

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक समतावादी विचारांचा अवलंब करण्याची पद्धत अवलंबली. पुरोगामी स्वरूपाचे विचार त्यांनी स्वीकारले. महात्मा फुले यांनी प्रत्यक्ष सयाजीरावांना पत्र लिहून राज्य व्यवहाराला समाजशील सुधारणांचा आधार हवा सामाजिक सुधारणांचा अवलंब करावा असे मत मांडले. याच तत्वास अनुसरून राज्यातील प्रजेला शिक्षणाचे महत्त्व पटवून देत सक्षम नागरिकत्वाचे संस्कार त्यांनी केले राजसत्ता ही प्रजेच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे ही विचारधारा यांनी स्वीकारली व लोकहितवादी धोरण लोक कल्याणासाठीच वापरले. लोककल्याणाची तळमळ हे त्यांचे राज्य व्यवहार सूत्र होते.[४]

पहिल्यांदा शेतीसंबंधी निर्णय महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी घेतला. त्यानुसार शेती भूमापन व पाहणे. सर्वे सेटलमेंट नावाचे खाते सुरू केले. जमिनीची मोजणी करून शेतीच्या उत्पादनानुसार आवश्यक सारा व त्याची प्रतवारी सुधारण्यासाठी त्यांनी लक्ष दिले. सन १८९७ मध्ये बडोदा या ठिकाणी स्वतंत्र कृषी खात्याची स्थापना केली. विविध देशातील शेतीची माहिती घेतल्यानंतर भारतीय शेतीची मूळ समस्या समजावून घेणे त्यांना शक्य झाले. सन १९०४ मध्ये ‘कलकत्ता’ या ठिकाणी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांना शेती आणि उद्योगांचे अंतरशाखीय शिक्षण देण्याची आवश्यकता कशा पद्धतीने आहे हे त्यांनी स्पष्ट केले.

प्रत्यक्ष संस्थानातील विद्यार्थ्यांना इंग्लंडच्या सिनेस्टर येथील ‘रॉयल कॉलेज ऑफ ग्रीकल्चर’ या ठिकाणी शेती विषयक प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवले. शेतीचे शिक्षण व ङ्गशेतीचे सार्वत्रिकरणफयावर त्यांनी भर दिला. कृषी उत्पादन वाढीसाठी त्यांनी सातत्याने नवनवीन प्रयोग केले.[५] आपल्या कार्यातून त्यांनी महाराष्ट्रात स्वातंत्र्यानंतर क्रांतिकारी सहकार चळवळीची व कृषी औद्योगिक धोरणाची पायाभरणी बडोदा या ठिकाणी केली. कृषी औद्योगिक शिक्षणाची क्रांतिकारक सांगड घालणाऱ्या सयाजीरावांनी बडोद्यात कृषी क्षेत्रावर आधारित उद्योगांच्या विकासाचा आदर्शवत आकृतीबंध उभा केला. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्याला खंबीर मदतीचा हात देणाऱ्या सयाजीरावांनीच सहकार चळवळीचे मर्म अचूक जाणले होते यातून शेतकऱ्यांचा उत्कर्ष साधला.[६]

राज्यकारभार हाती घेतल्यानंतर त्यांनी पुढे जल नियोजनाचे सुद्धा भरीव कार्य केले. गावोगावी पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्यासाठी विहिरी खोदल्या. दुष्काळ पडताच इतर दुष्काळी कामावर विहिरी आणि तलाव होण्याची कामे सुरू केली. याचाच परिणाम म्हणजे सण १८८६ पासून बडोदा राज्यात ९० हजार हून अधिक विहिरी खोदण्यात आल्या. पुढे स्थानिक पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्थानिक संस्थावर त्यांनी टाकून दिली. याकरिता आवश्यक तेवढा निधीही जाहीर करून दिला. सन १९३९मध्ये केवळ बडोदराच्या शेतीच्या आणि पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी पक्क्या विहिरी यांची संख्या ७११९५, कच्च्य विहिरी १७०१८, तलाव १०१९५, आणि इतर साधने ५६४ होती.[७]

सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानातील जी प्रजा शेती व शेतीपूरक व्यवसाय सोडून इतर व्यवसायात गुंतली आहे अशा लोकांना आर्थिक अडी-अडचणींवेळी आर्थिक साहाय्य करण्यासाठी बिगर कृषी पतपुरवठा संस्थांची निर्मिती केली.[८] सहकारी संस्थांचे विकेंद्रीकरण करताना त्यांनी इतर संस्थांच्या तुलनेत समाजातील प्रत्येक घटक सहकार चळवळीत कशाप्रमाणे समाविष्ट होतील याचा त्यांनी बारकाईने विचार केला. सहकारातील अनेक नावीन्यपूर्ण संस्थांची निर्मिती केली.

समाजातील मूलभूत प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी पुढे अन्योन्य सहकार मंडळी, पूर निवारण संस्था, सहकारी समाजसुधार

ISSN No. 2394-5990

संस्था, सफाई कामगारांसाठी भंगी सहकारी संस्था, दुभत्या जनावरांसाठी सहकारी संस्था, शेत जमिनीचे एकत्रिकरण करणाऱ्या संस्था, सहकारी भांडारे, ग्रामीण सहकारी भांडारे, सहकारी गृहनिर्माण संस्था, बचत गट संस्था, सहकारी चारा पुरवठा संस्था इत्यादींची निर्मिती केली. सहकार चळवळीची ध्येयधोरणे जनसामान्य पर्यंत पोहोचवावीत यासाठी सहकार खात्याचे अधिकृत मूक पत्र 'ग्रामजीवन' सुरू केले. 'शेती आणि सहकार्य' या मासिकातून सहकाराची माहिती त्यांनी प्रसारित केली.[९] यातूनच पुढे मध्यवर्ती सहकारी प्रशिक्षण संस्थेची स्थापना १९२३ मध्ये करण्यात आली.

संस्थानात सहकार चळवळीचा प्रसार करणे, सहकारासंदर्भात विषयांच्या अभ्यासाला उत्तेजन देणे, सहकार परिषदा, प्रशिक्षण वर्ग यांचे आयोजन करणे अशी कामे मध्यवर्ती सहकारी प्रशिक्षण या संस्थेला ठरवून दिली. त्याचेच नामकरण सन १९२६ मध्ये ङ्गश्री सयाजी सहकार सेवा संघफ असे करण्यात आले. पुढे महाराजांच्या आदेशावरूनच तीन जिल्हास्तरीय सहकार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले गेले यातून सहकार चळवळीचे महत्त्व गावोगावच्या लोकांना देण्यात आले.[१०] सयाजीरावांच्या सहकार चळवळीची प्रेरणा ही युरोपातील डेन्मार्क, जर्मनी, हॉलंड, इटली या देशातील सहकार चळवळीची होती. सयाजीरावांचे ठाम मत होते की, 'सामाजिक व आर्थिक सुधारणा ग्रामीण भागातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत जर पोहोचविण्यासाठी सहकारी चळवळीचे माध्यम सर्वात प्रभावी आहे.'[११]

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणातील योगदान तितकेच प्रभावीपणे होते त्यांच्या सामाजिक सुधारणांचा गौरव करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात, 'महाराष्ट्रातील एक विभूती', 'सामाजिक सुधारणांचा पुढारी', 'अस्पृश्यांचा एकमेव कैवारी', 'संस्थानिकातील दृष्टा' या शब्दात त्यांचे वर्णन केलेले आहे. सामाजिक सुधारणेमध्ये अस्पृश्यता निवारण हे धोरण हाती घेतले. २३ मार्च १९१८ च्या भाषणात या संदर्भात असे म्हणतात, 'उच्च जातींना ज्या शैक्षणिक सोयी सवलती आहेत त्याच अस्पृश्यांना मिळाव्यात म्हणून आपण नेटाने प्रयत्न करू व उदारमत्वाचा पुरस्कार करून लोक जागृती करू.[१२]

अस्पृश्यता निवारणासाठी सन १८८२ मध्ये १८ शाळा अस्पृश्यांसाठी काढल्या तर १८९१-९२ मध्ये बडोदे, अमरेली, पटना, नवसारी येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह काढली. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समता निर्मित कार्यातही सहभाग घेतला. याशिवाय मुंबईत १९०४ साली 'सामाजिक परिषद' आयोजित केली त्याच्या अध्यक्षस्थानी महाराजा सयाजीराव गायकवाड होते.[१३] कोर्ट, दवाखाने, सरकारी कचऱ्या, ग्रंथालय, अस्पृश्यांना खुली करण्यात यावीत तसे हुकुमही त्यांनी काढले. सार्वजनिक विहीर व गाव विहीर बांधल्यावर त्या विहिरीचा वापर अस्पृश्य सर्वांना करता यावा यासाठी १९३१ मध्ये तसा आदेश सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आला. थोडक्यात समता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुता यांची प्रतिष्ठापना व्हावी म्हणूनच समता धारित मानवी हक्क संरक्षणाचे कायदे सयाजीरावांनी केली. तर प्रत्यक्ष स्त्रियांसाठी रुग्णालय, स्त्री स्वास्थ्यासाठी आर्थिक मदत, निधी, शिशु सप्ताह प्रदर्शन, प्रशिक्षण शाळा निर्माण केल्या. बालविवाह प्रतिबंधक कायदा त्यांनी आपल्या संस्थानात केला.[१४]

थोडक्यात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य आणि कर्तृत्व महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक, आर्थिक, राजकीय, सहकार, सांस्कृतिक, धार्मिक सर्वच क्षेत्रांमध्ये अत्यंत प्रेरणादायी आणि प्रभावी ठरले. त्यांच्या या कार्य आणि कृतीमुळेच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा स्वातंत्र्यउत्तर काळात विकास होत गेला दिसून येते. त्यामुळेच आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचे योगदान हे स्पष्ट होते. जात, धर्म, शिक्षण, तत्त्वज्ञान, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इत्यादी मानवी समाजाच्या सर्व क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले कार्य खऱ्या अर्थाने आदर्शवत ठरले.

**निष्कर्ष :**

१. सयाजीराव गायकवाड यांनी केल्यानेच तत्कालीन कालखंडात आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण घडवून आणण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.

२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक समतावादी विचारांचा अवलंब करण्याची पद्धत अवलंबली.

३. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य आणि कर्तृत्व महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक, आर्थिक, राजकीय, सहकार, सांस्कृतिक, धार्मिक सर्वच क्षेत्रांमध्ये अत्यंत प्रेरणादायी आणि प्रभावी ठरले.

४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणातील योगदान तितकेच प्रभावीपणे होते.

५. जात, धर्म, शिक्षण, तत्त्वज्ञान, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इत्यादी मानवी समाजाच्या सर्व क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले कार्य खऱ्या अर्थाने आदर्शवत ठरले.

**संदर्भ :**


१. पवार एकनाथ, महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आ.२०१८,पृ.क्र.२१.

२. कित्ता, महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, पृ.क्र.३०.

३. कित्ता, पृ.क्र.३७.

४. कित्ता, पृ.क्र.६०

५. कदम देवदत्त, महाराजा सयाजीराव आणि शेती विकास, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था औरंगाबाद, पहिली आवृत्ती २०२१, पृ.क्र.१०.

६. कित्ता. पृ.क्र.४०.

७. डॉ. मगर राजेंद्र, महाराजा सयाजीराव आणि जल नियोजन, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था औरंगाबाद, पहिली आवृत्ती २०२१, पृ.क्र.१६.

८. वनवे राहुल, महाराजा सयाजीराव आणि सहकार चळवळ, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था औरंगाबाद, पहिली आवृत्ती २०२१, पृ.क्र.११.

९. कित्ता. पृ.क्र.२५.

१०. कित्ता. पृ.क्र.३४.

११. कित्ता, पृ.क्र.४४.

१२. पुर्वाक्त, महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, पृ.क्र.६०.

१३. कित्ता, पृ.क्र.६५.

१४. कित्ता, पृ.क्र.६८.


■■■

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीविषयक कार्यातील योगदान

**प्रा.डॉ.उध्दव मनोहर घोडके**
सहाय्यक प्रध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय,शिरवळ
ईमेल: uddhavmghodake@gmail.com
मो.नं.: ९९२१९८५६३१

**प्रस्ताविक :**

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणुन ओळखले जाते.कारण विचारपरिवर्तनाच्या चळवळीची परंपरा याच महाराष्ट्रात सुरू झालेली आहे. संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराजा आधुनिक भारतातामध्ये महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्ये विचार महाराष्ट्राला लाभलेले आहेत याच विचाराचे पाईक समाजसुधारक म्हणजे बदोडा संस्थानाचे महाराजा सयाजीराव गायकवाड होय. समाजसुधारणेशिवाय भारतीय समाजाचा विकास होणे शक्य नाही हे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ओळखले होते. प्रजेचे कल्याण करणे, प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होणे, प्रजेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राजत्तेचा उपयोग करणे, आणि ङ्गराजाफ म्हणुन असलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांना होती. काळानुसार समाज,धर्म, बदलला पाहिजे, जुन्या रूढि - परंपरा नवीन युगासोबत बदलल्या पाहिजे असे त्यांचे मत होते. समाजसुधारणा करतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल किंवा अनेक जणांचा विरोध पत्करावा लागेल यांची महाराजांना जाणीव होती.

**संशोधनाचे उदिष्टे :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीविषयक विचार अभ्यासणे.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी स्त्रीविषयक केलेल्या कायदयाचा अभ्यास करणे.
३. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीशिक्षण क्षेत्रातील विचार अभ्यासणे
४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीशिक्षणातील योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी संशोधन पध्दती म्हणुन ऐतिहासिक लेखनपध्दतीनुसार मांडणी केली आहे. तसेच सदर शोध निबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. शोधनिबंधाचा विषय व्यक्तीविषयक असल्यामुळे यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आत्मचरित्रात्क ग्रंथ,तसेच त्यांच्याविषय लेखन केलेल्या संदर्भग्रंथाचा वापर केलेला आहे.

**संशोधानाची मांडणी:**

**स्त्रीविषयक सुधारणा कायदे:**

**विधवा पुर्निविवाह कायदा (१९०१):**

विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार देणारी सुधारणावादी निर्णय त्यावेळचा विचार करता खुपच क्रांतीकारक निर्णय होता. धर्मप्रथांच्या नावाखाली स्त्रियांच्या पुनर्विवाह - प्रतिबंधास मिळालेली मान्यता, महाराजांनी दूर केली. पुरूषांना अनेक लग्ने करू देणे आणि स्त्रियांना वैधव्य किंवा घटस्फोट यामुळे पुनर्विवाह न करू देणे हे स्त्रियांवर अन्याय करणारे आहे. महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये पुनर्विवाहचा घडवून आणलेला प्रसंग या कायदयाला चालना देणारे होते हे दिसनू येते. इंग्लंडमध्ये उच्चशिक्षण घेतलेले गणेश सदाशिव भाटे हे १९०८ मध्ये महाराजांच्या सेवेत दाखल झाले. त्यांची पहिली पत्नी निधव पावलेली होती. भाटे हे तरूण होते. त्यांनी वीस वर्षे असलेल्या विधवाशी पुनर्विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतू भाटेच्या आई-वडिलांना हे पसंत नव्हते. बडोदयातील सनातनी उपाध्यांनी पुनर्विवाहास नकार दिला होता. महाराजांनी हा पुनर्विवाह घडुन आणण्याचे ठरविले. त्यांनी स्वतः सरकारी पातळीवर सर्वांना निमंत्रणे देवून चिमणबागेमध्ये आश्रित अपाध्यांना सांगुन सर्वाच्या उपस्थित हा पुनर्विवाह पार पाडला.[१] हा प्रसंग विधवा पुनर्विवाहा चालना देणारा ठरला. सुधारणांचे अग्रणी म्हणुन या घटनेकडे पाहावे लागेल.

**धार्मिक स्वातंन्याचा कायदा (१९०२):**

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला भारतामध्ये जातिसंस्थेचे

व धर्मसंस्थेचे सावट खुप गडद होते. धर्म हा त्याकाळचा सर्वात मोठा अभिमानाची बाब असलेला घटक होता. त्या काळात धर्मांतर करणे म्हणजे खूप मोठे पाप मानले जात होते. महाराजांनी या गोष्टीचा अभ्यास केला. आणि व्यक्तिस्वातंन्त्य म्हणजे काय आणि धर्माबाबत व्यक्ति कितीपत स्वातंत्र आहे या सखोल अभ्यास केला. आणि १९०२ मध्ये धार्मिक स्वातंन्त्याताचा कायदा पारित केला. या कायदयान्वये व्यक्तीचा धर्मातंर करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. धर्मांतर केल्यावर त्या व्यक्तीचे कायदेशीर हक्क, सांपत्तिक हक्क तसेच सुरक्षित राहतील आणि त्यास जातिबहिष्कृत करता येणार नाही,याची कायदयाने हमी दिली.[२] अशा प्रकारे आजच्या संविधानातील धार्मिक स्वातंन्त्याचा अधिकार महाराजांनी अगोरच आपल्या संस्थानातातील जनतेला बहाल केल्याचे दिसते.

**बालविवाह प्रतिबंधक कायदा (१९०४):**

बालविवाह प्रतिबंधक कायदा आपल्या संस्थानात लागु करणारे महाराजा समयाजीराव गायकवाड हे दूरदृष्टीचे व्यक्तीमत्व होते. विवाहाच्या प्रसंगी मुलीचे वय १६ वर्षे असावे, असे त्यांचे वैयक्तीक मत होते, प्रस्तावित वय मुलीचे १४ वर्षे मांडले गेले, सामाजिक इच्छा,लोकमत पाहून हे वर्षे १२ वर्षे ठरविण्यात आले. याबाबत १६ सप्टेबंर १९०७ रोजी भोर येथील शाळेच्या बक्षीस समारंभाच्या भाषणामध्ये महाराज म्हणतात की, ....''तुम्हाला सुखी व्हायचे असेल आणि बालविवाहाचे परिणाम अनिष्ट होणे शक्य आहे असे तुम्हास वाटत असेल,तर बालविवाहाची चाल बंद करा..फक्त बालविवाह बंद केले तर त्यामुळे पुष्कळच फायदे होणार आहेत. मुलींच्या शरीरप्रकृतीत इष्ट सुधारणा होईल आणि पुढची पिढी सुदृढ व निकोप प्रकृतीची होईल.तुमची पिढी धैर्यशील,शीलसंपन्न आणि सशक्त व्हावी अशी तुमची इच्छा असेल तर बालविवाहाची प्रथा कोणत्याही दृष्टीने इष्ट नाही.''[३]

**वारसा हक्क कायदा:**

हिंदू स्त्रियांना मिळकतीत वाटा मिळण्यासंबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. यामध्ये दोन स्त्री सदस्यांची निवड केली. हिंदू कायदा सुधारणा समितीने १९३० साली अभ्यास करून बदल सुचविले आणि १६ नोव्हेंबर १९३३ च्या अज्ञापत्रिकेत कायदा मंजूर करण्यात आला. या कायदयानुसार संयुक्त कुटुंबातील समान वारसाहक्क असणाया व्यक्तीची विधवा त्या व्यक्तीची वारस ठरते, कुटुंबाच्या संपत्तीची भागीदार ठरते. रू. १२००० हजार पर्यतच्या मिळालेल्या मालमत्तेची वारसाहक्कानुसार संपूर्ण मालक ठरते,फक्त पतीच्या असलेल्या मालमत्तेत तिला वारस हक्काने तिच्या मुलांबरोबर त्यांच्याइतकाच समान अधिकार प्राप्त होतो. अविवाहित मुलगी कुटुंबाच्या मालमत्तेत समानपणे मुलाच्या हिश्श्याच्या चैथा भागाइतका हक्क मागू शकते. विधवा सुनेला वारसा हक्काच्या यादीत मृत सासायाच्या आईखालोखालचे स्थान देण्यात यावे,मृत झालेल्या मुलीचे मुले जिवंत मुलीबरोबरचा वारसाहक्क सांगू शकतात. इ. महत्वाचे निर्णय या कायदयानुसार घेण्यात आले.[४]

अशा तरतुदीमुळे स्त्रियांच्या वडिलोपर्जित आणि पतीकडील संपत्तीत वारसाहक्क मिळवून देणारे महाराज सयाजीराव गायकवाड यांचा निर्णय क्रांतीकारकच म्हणावा लागेल. स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचे बळकटीकरण होण्यास मदत झाली.

**लग्नविच्छेदनाचा कायदा (१९३१):**

आधुनिक भारतामध्ये या कायदयाला ङ्घटस्फोटाचा कायदाफ असेही म्हणुन शकतो. त्याकाळात महाराजांनी अमंलात आणलेला सर्वात वेगळा कायदा होता. या कायदयाविषयी बाबा भांड लिहिताता, ''पती -पत्नीचे वैवाहिक जीवन सुरळीत नसेल. तर त्यांना परस्परांपासुन कायदयाने विभक्त होता आले पाहिजे,ही नैसर्गिक गरज आहे. अमूक एका परिस्थितीत पीडित स्त्रीला आपल्या नवायापासुन विभक्त होता यावे,याकरिता महाराजांनी 'लग्नविच्छेद कायदा' केला.'' बडोदयातील हा कायदा म्हणजे त्या काळातला हिंदुस्थानातील सामाजिक निर्णयाचे धाडसी पाऊल म्हणता येईल.

सामाजिक सुधारणा करतांना महाराज सयाजीराव गायकवाड यांना अनेक क्रांतीकारी निर्णय घ्यावे लागले. महाराज म्हणतात, ''रूढिच्या श्रृंखला सैल करण्याच्या प्रयत्नांना थोडेसे जरी यश आले,तरी ते श्रेयस्कर आहे. तथापि या दृष्टिने प्रयत्नाला सुरूवात कोठे आणि कशी करावी याबद्दल मात्र सावधगिरी ठेवली पाहिजे. समाजातील एक दोष घालवितांना त्याच्या जागी दुसरा दोष न येता काही तरी चांगले व्हावे, अशी अशा बाळगली पाहिजे'' कुठलाही सामाजिक प्रश्न हा समाजाच्या धार्मिक, आर्थिक व राजकीय जीवनाशी निगडिती असतो. आर्य समाजाच्या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवितांना केलेल्या भाषणात ते म्हणतात, ''कोणत्याही समाजाची राजकीय प्रगती ही त्याच्या सामाजिक व धार्मिक आचरणावर अवलंबून असते. ज्या समाजात आपापसांत द्वेष, झगडे चालू आहेत. त्याची राजकीयदृष्ट्या उन्नती होण्याची अशा नको.''[५]

**स्त्रीशिक्षणातील कार्य :**

स्त्रियांना समतेचे आणि बौध्दिक विकासाचे मार्ग मोकळे करण्यासाठी शिक्षणाचा आधार आवश्यक आहे. पुरूष शिक्षणाबरोबरच स्त्री शिक्षणाची ही तितकीच गरज आहे, स्त्रीयांना

ISSN No. 2394-5990

शिक्षणाचा हक्क मान्य केलाच पाहिजे यासाठी महाराज सयाजीराव गायकवाड कायमच आग्रही राहिले होते.

१९१३ च्या व्हरनॅक्युलर एज्युकेशन अॅक्ट नुसार महाराजांनी स्त्री शिक्षणासंबंधीच्या केलेल्या कायदयातील काही तरतूदी अत्यंत स्तुत्ययोग्य आहेत. उदा. मुलींची प्रकृती उत्तम रहावी म्हणून शारीरिक शिक्षणावर विशेष लक्ष ठेवावे, खेळामध्ये मुलींनी प्राविण्य मिळवावे, तसेच ९-१० वर्षापर्यतच्या मुलींना शिवणकामाचे शिक्षण सक्तीचे आहे, दैनिदिंन उपयोगाचे शिवणकाम,भरतकाम आलेच पाहिजे.इ. होय. १९१३ मध्ये शाळेत प्रवेश घेण्याचे मुलींचे वय सात ते बारा करण्यात आले. तसेच १९०६ साली शिक्षणाचा कायदा केल्यानंतर शाळांची संख्या वाढली आणि यामध्ये मुलींची संख्या मोठया प्रमाणात होती. इ.स. १९१५ मध्ये मुला - मुलींच्या शाळा वेगळया करण्यात आल्या. त्यापाठीमगो मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे हेच होते. महाराणी गर्ल्स हायस्कूल ही बडोद्यातील पहिली मुलींची माध्यमिक शाळा होय. याशाळेमध्ये इ.स. १९१७ मध्ये मिस निडहम यांची मुख्याध्यापिका म्हणुन नेमणूक केली. १८८२ मध्ये बडोदा कॉलेज च्या स्थापनेनंतर उच्चशिक्षणाच्या क्षेत्रातही मुलींच्या उच्चशिक्षणाची तरतूद करण्यात आली. १८९० मध्ये हे कॉलेज मुंबई विद्यापीठाशी संलग्णीकरण करण्यात आले. इ.स.१८८२ मध्येच स्त्री शिक्षिकांसाठी फीमेल टेऱ्निंग कॉलेज काढले होते. विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना, शिक्षण उत्तेजननिधी, तसेच होतकरू स्त्रियांना अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात प्रोत्साहन दिले. उदा. मिस राधाबाई पोवार यांना अध्यापनशास्त्राच्या शिक्षणासाठी अमेरिकेच्या टीचर्स कॉलेज युनिव्हर्सिटीत पाठवण्यात आले. तसेच १९१७-१८ मध्ये मिसेस स्नेहलता पगार यांना बालसंगोपन शास्त्रातील प्रशिक्षणासाठी अमेरिकेत पाठविले गेले होते.[६]

स्त्रियांना प्रौढ शिक्षणवर्गाची सोय करण्यात आलेली होती. वय,सामाजिक बंधने यामुळे शिक्षण न घेवू शकलेल्या स्त्रियांसाठी झनाना वर्ग म्हणजेच प्रौढ शिक्षण स्त्रियांचे वर्ग काढले गेले. वाचन, लेखन, जमाखर्च, विणकाम, भरतकाम, यांचे शिक्षण दिले जाई. तसेच स्त्रियांची मंडळे, क्लब, सहविचारसभा, व्याख्यानमाला अशा विविध कुतीद्वारे महाराजांनी राज्यातील स्त्रियांचा शैक्षणिक विकास घडवून आणला होता.

**निष्कर्ष :**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी समतावादी आणि प्रगतशिल विचारांनी स्त्रिविषयक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. जातीय विषमतेला सातत्याने नाकारले. बालविवाहबंदी, पुनर्विवाह प्रोत्साहन,घटस्फोट चा अधिकार, स्त्रियांचे शिक्षण, पडदा पध्दत, स्त्रियांचे आरोग्य, स्त्रियांना वारसाहक्क इ. क्षेत्रात स्त्रियांना अधिकार व कायदे करून सामजिक सुधारणा केल्या. धर्म,जात, रूढी,परंपरा यावरून स्त्रियांवर होणारा अन्याय व भेदाभेद त्यांनी मान्य केलेले नव्हते. किंबहूना अन्याय संपवणारा विशाल मानतावाद त्यांनी स्वीकारला होता. यामुळेच महाराज सयाजीराव गायकवाड हे सर्व संस्थानिकामध्ये आपल्या वेगळेपणामुळे संस्मरणीय ठरतात.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. आपटे दा.ना., ( १९३६) श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र खंड- १ पृ.क. २६
२. फाटक ब.न., ( १९६३) 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे,पृ. क्र. ५१
३. दांडेकर वि.पा., (१९३६), श्रीमंत सयाजीराव गायकवाड, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे पृ.क्र. २४
४. भांड बाबा, (२०१३) 'लोकपाळ राजा सयाजीराव', साकेत प्रकाशन,पुणे,पृ.क्र. १८८
५. उपरोक्त पृ. क्र. १९५
६. सरदेसाई गो.स. (१९५६) 'श्री सयाजीराव यांचे सहवासात' एस. जगन्नाथ अॅन्ड कंपनी पुणे,पृ.क्र. ४०

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य

**प्रा.देबडे सतिश मारोतिराव**
सहायक प्राध्यापक(राज्यशास्त्र)
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ
ईमेल : satishdebde2011@gmail.com

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यामधील कवनाने या गावा मध्ये ११ मार्च १८६३ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे मूळ नाव गोपाळराव काशीनाथ गायकवाड होते. बडोदा संस्थांनचे अधिपति खंडेराव गायकवाड यांना वारस नसल्यामुळे गोपाळराव यांना बडोदा संस्थानाने पुढील वारसदार म्हणून दत्तक घेतले. आणि हेच गोपाळराव पुढे बडोदा संस्थांनचे महाराजा सयाजीराव खंडेराव गायकवाड बनले. सयाजीराव गायकवाड हयानि बडोदा संस्थांनचे महाराजा बनल्यानंतर त्यांनी सर्वच क्षेत्रात चिरकालीन ठरतील असे अनेक अमुलाग्र कार्य त्यांनी केले. भारतात ब्रिटिश राजवटि आधी समाजातील विविध घटका मध्ये शैक्षणिक दृष्ट्या प्रचंड विषमता होती. ही विषमता दूर करून सर्व सामान्य जनतेत शिक्षण प्रसारासाठी झटणाऱ्या समाज सुधारकाना राजाश्रय देण्याचे काम ब्रिटिश भारतातिल ५६५ संस्थानापैकी मोजक्याच राज्य कर्त्यांनी केले. या राज्य कर्त्या मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने येते .

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) बडोदा संस्थानातील शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासने
२) बडोदा संस्थानातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास करणे
३) बडोदा संस्थानातील व्यावसायीक शिक्षणाचा अभ्यास करणे
४) बडोदा संस्थानातील शेतकी शिक्षणाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी संशोधन पध्दती म्हणुन ऐतिहासिक लेखनपध्दती वापरलेली आहे. तसेच सदर शोध निबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. शोधनिबंधाचा विषय व्यक्तीविषयक असल्यामुळे यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आत्मचरित्रात्क ग्रंथ,तसेच त्यांच्याविषय लेखन केलेल्या संदर्भग्रंथाचा वापर केलेला आहे.

**संशोधनाची मांडणी :**

सयाजीराव यांनी शैक्षणिक कार्य करत असताना सर्वप्रथम त्यांनी संपूर्ण बडोदा संस्थानात सर्व जाती धर्माच्या मुला मुलीसाठी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला.हा कायदा लागू करणारे बडोदा संस्थान हे भारतातिल पहिले संस्थान होते. सयाजीरावांनी जनतेच्या माध्यमिक शिक्षणाकरिता बडोदा हायस्कूल १८७१, द पाटण अँग्लो व्हर्नक्युलर स्कूल १८७९, फतेहसिंग इंग्लिश इंस्टीट्यूट १८९५, गंगाधर मिक्सड स्कूल १९२३, या सह संस्थानातील विविध ठिकाणी गुणवत्ता पूर्ण शाळांची स्थापना केली. प्राथमिक माध्यमिक शिक्षणाने साक्षर झालेल्या जनतेला उच्च शिक्षनासाठी १८८१ साली बडोदा कॉलेजची स्थापना केली. कृषिप्रधान सर्व सामान्य विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानबरोबरच शेतीचे अत्याधुनिक ज्ञान मिळावे या उद्देश्याने १८८९ मध्ये बडोदा कॉलेज मध्ये स्वतंत्र शेतकी विभागाची स्थापना केली. या विभागाशी संलग्न शेतजमिनीत विविध पिकांचे प्रयोगशील उत्पादन घेतले जात होते. याच बरोबर विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्र शिक्षण देण्यासाठी सयाजीरावानि १८९० मेड कला भवन ची स्थापना केली. कला भवन मध्ये सहा विद्या शाखांचे सैद्धांतिक आणि प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण दिले जात होते. संस्थानातील प्रतेक विद्यार्थाला बडोद्यात येउन कला भवन मध्ये शिक्षण घेणे शक्य नव्हते. त्यामुळे संस्थानच्या औद्योगिक प्रगतीसाठी आवश्यक कुशल मनुष्य बळ निर्माण करण्याच्या सयाजीरावानि जिल्हा औद्योगिक शाळांची स्थापना केली.[१]

स्त्रिया साठी शिक्षणाची दारे खुली करून सयाजीरावांनी स्त्री उद्धारच्या कार्यास सुरुवात केली. बडोदा संस्थानात १८७५ ला दोन तर १९२६ पर्यन्त ३७५ मुलींच्या शाळा होत्या. महिलाना औद्योगिक शिक्षण देण्याच्या उद्देशयाने संपूर्ण संस्थानात तिन औद्योगिक शाळा उभारल्या त्याच बरोबर पडदा पद्धत पाळनाऱ्या स्त्रीयांच्या शिक्षणसाठी झनाना वर्गाची स्थपणा केली.

समाजातील दलित वर्गासाठी ज्याना आजपर्यंत शिक्षणाचा अधिकार देण्यात आला नव्हता अश्या वर्गासाठी सयाजीरावानि

१८८२ साली सोनगड येथे पहिली प्रत्येकी एक मोफत निवासी शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करत असतानाच महाराजानि दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत केली. १८८२ च्या कायद्यानुसार महाराजानि आदिवासीसाठी प्राथमिक शाळा सुरू करून शैक्षणिक साहित्य आणि निवासाची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली. आदिवासी विद्यार्थ्यांना शेतीचे आधुनिक प्रशिक्षण देण्यासाठी या शाळा संस्थानातील प्रायोगिक शेतीशी संलग्न केल्या. १८९६ ला सोनगड येथे आदिवासी मुलीसाठी पहिली स्वतंत्र निवासी शाळा स्थापना केली. या समाजातील मूल मुलीना बडोद्यातील १८८२ मध्ये सुरू झालेल्या ट्रेनिंग कॉलेज मध्ये शिक्षकी पेक्षाचे प्रशिक्षण दिले जात होते.[२]

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व शाळामद्धे मुला मुली साठी शारीरिक शिक्षण हा विषय सक्तीचा करण्यात आला. १८९३ मध्ये नेटिव्ह गेम्स इलयूस्ट्रेटेड या स्थानिक खेळांचे विस्तृत वर्णन असणाऱ्या इंग्रजी पुस्तकाचे महाराजानि गुजराती भाषांतर प्रसिद्ध केले. महाराजा नि १९२० साली सर्व हायस्कूल आणि उच्च प्राथमिक शाळामद्ये शिक्षकांची नियुक्ती केली. १९३१ पासून बडोदा कॉलेज मध्ये शारीरिक शिक्षण हे प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करण्यात आले. राज्यातील शारीरिक शिक्षण विभागाला स्काउट चळवळ जोडून महाराजानि व्यक्तिमत्व विकास प्रक्रियेला चालना दिली. उत्तम दर्जाच्या शैक्षणिक संस्था उभारताना या संस्थांनची प्रशिक्षित शिक्षकांची गरज भागवण्यासाठी सयाजीरावानि १८८२ मध्ये फीमेल ट्रेनिंग कॉलेज आणि १८८५ मध्ये पुरुष प्रशिक्षण महाविदयालयसुरू केले. १९३० मध्ये महाराजानी फिमेल ट्रेनिंग कॉलेजला ३०००० रु, व मेल ट्रेनिंग कॉलेज ला २६००० रु निधी मंजूर केला. पारंपरिक पुरोहितांची मक्तेदारी नष्ट करण्याच्या हेतूने मराठा जातीतील पुरोहित तयार करण्यासाठी १८९६ मध्ये पुरोहित शाळा सुरू केली. अत्यंज मुलाना धार्मिक शिक्षण देण्याच्या उद्देशयाने १९९३ साली बडोद्यात गरोडा पाठशाळा करण्यात आली. ब्राम्हणेतरानाही धार्मिक शिक्षण देऊन पुरोहिताचा व्यवसाय करण्यास पत्र बनविले. आणि पुरोहितासाठी परवाना पद्धत सुरू केली.[३]

महाराजानी शिक्षणशास्त्र,संशोधन, सेनीटरि इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, धातुशास्त्र, आणि खाणी, शिल्पकला, तालिम, औषधी, व्यापार, अर्थशास्त्र, राजकीय तंत्र, ई विशयांचे उच्च शिक्षण घेण्यासाठी तरुणांना परदेश्यात पाठवले. परदेशातिल ज्ञान, अनुभव, आणि त्याद्वारे बडोद्याचा विकास हे त्रीसूत्र सयाजिरावांच्या विचारांची सखोलता आणि व्यापकता स्पष्ट करणारे आहे. सयाजीरावांच्या एक लाख पुस्तके असणारे आशिया खंडातील सर्वात मोठे ग्रंथालय उभारले. याच बरोबर गाव तेथे ग्रंथालय , शिशु ग्रंथालय , यांच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळीचे मॉडेल उभारले.[४]

सयाजीरावांनी शेतकी वर्ग, चित्रकला वर्ग, मुलासाठी पाककला विद्यालय, संस्कृत विद्यालय, बूक डेपो, जेल स्कूल, कींडर गार्डन शिक्षण पद्धती, ग्रामशाला, हस्तकला वर्ग, कारागिरासाठी संध्याकाळची शाळा, आयुर्वेदिक महाविद्यालय, बडोदा सुधागृह, मुकबाधिर विद्यालय, बडोदा सेवा मंडल, लेखक विदवांनाची परिषद, पुरातत्व विभाग, राज्य स्तरीय, शिक्षण परिषद , शिक्षण आयोग , संगीत विद्यालय , प्राच्यविद्या मंदिर , असे अनेक नवनवीन शिक्षण संदर्भातील उपक्रम सयाजिरावानी यशस्वीरीत्या राबविले.[५] सयाजिरावांच्या कारकिर्दीत उभ्या राहिलेल्या बडोद्यातील विविध शिक्षण संस्थाचा लेखाजोखा हा सायाजी रावांच्या शैक्षणिक क्रांतीचा आरसा आहे.

**निष्कर्ष :**

प्रजेचे हित शिक्षणातून साधता येते,हे ओळखून शिक्षणक्षेत्रात मूलभूत कार्य महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केले.सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा, आदिवासी व अस्पृश्य विद्याथ्र्यांयासाठी शाळा, वसतिगृहे, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती,शिक्षक प्रशिक्षण, खेडयांसाठी पेटी वाचनालय, जाती-भेद ,धर्मभेद न मानता सर्वच प्रजेच्या शिक्षणाच्या उन्नतीचे कार्य त्यांनी केले तसेच केवळ पारंपारिक शिक्षण न देता व्यावसायिक शिक्षणावर ही त्यांनी भर दिला. ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन व शेवटी प्रजेसाठी या शिक्षणांचा उपयोग ही महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक कार्याची त्रिसूची असल्यचे दिसते. त्यांनी संस्थानामध्ये नवे शैक्षणिक धोरण सुस्थापित केले.

**संदर्भ :**

१) बाबा भांड , सयाजीराव गायकवाड , म फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर, साकेत प्रकाशन .
२) डॉ. विशाल तायडे, महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा, शिक्षण ,भाग ०१
३) दांडेकर वि.पा., (१९३६), श्रीमंत सयाजीराव गायकवाड, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे पृ.क्र. ४२
४) सरदेसाई गो.स. (१९५६) ‘श्री सयाजीराव यांचे सहवासात’ एस. जगन्नाथ ॲन्ड कंपनी पुणे,पृ.क्र. ३६
५) उपरोक्त पृ. क्र. ५३

■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यतेविषयक कार्य व विचार

**१) डॉ. मोरे बजरंग वामन**
सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग
श्रीपतराव कदम महाविद्यालय,शिरवळ

**२) सौ.भोसले अर्चना महादेव**
संशोधक विद्यार्थिनी
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर
(स्वायत्त)

**प्रस्तावना:**

महाराज सयाजीराव गायकवाड हे त्यांच्या कार्यशैलीमुळे इतिहासात अजरामर झालेले नाव आहे.महाराज सयाजीराव गायकवाड यांना युगद्रष्टा म्हटले जाते कारण महाराजाचा ध्यास, परिर्तन, तसेच महाराजांनी केलेल्या सुधारणा आजही प्रासंगिक आणि काळजी पाऊले ओळखणारे होते. ब्रिटिश काळात जातिसंस्थेमुळे सामाजिक विषमता, अन्याय, मानवी हक्क यांच्यावर आघात होत होते. यामुळे समाजामध्ये दुफळी निर्माण होवून गुलामगिरीच्या गर्तेत एका वर्गाला रहावे लागत होते. अशा स्थितीमध्ये महाराज.सयाजीराव गायकवाड अस्पृश्यांना मनुष्यासारखे जीवन जगता यावे यासाठी कायम आग्रही राहिले त्यासाठी त्यांनी अस्पृश्यांनी शिक्षणाची कास धरावी यासाठी ते कायम प्रयत्नशील होते. त्यासाठी त्यांनी अनेक अस्पृश्य शाळा सुरू केल्या आणि अस्पृश्य वर्गाना अनेक सवलती दिल्या होत्या. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या दृष्टीने राष्ट्र म्हणुन जर आम्हाला उंच मान करावयाची असेल तर समाजातील सर्व घटकांना सोबत घ्यावे लागेल तसेच पद्दलित लोकांच्या कार्याला स्वतःहून वाहून घ्यावे लागेल. त्यामुळे त्यांनी त्यांच्या भाषणांतून गरीब व अस्पृश्यांच्या उन्नती विषयी, शिक्षणाविषयी वेळोवेळी विचार व्यक्त केले होते एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीतून अस्पृश्यांविषयी योगदान दिले आहे.

**संशोधनाचे उदिष्टे :**

१. महाराज सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्य विषयक विचार अभ्यासणे

२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यक कार्यांचा अभ्यास करणे.

३. महाराज सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यांसाठी केलेल्या कायदयाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी संशोधन पध्दती म्हणुन ऐतिहासिक लेखनपध्दतीनुसार मांडणी केली आहे. तसेच सदर शोध निबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. शोधनिबंधाचा विषय व्यक्तीविषयक असल्यामुळे यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आत्मचरित्रात्क ग्रंथ,तसेच त्यांच्याविषय लेखन केलेल्या संदर्भग्रंथाचा वापर केलेला आहे.

**संशोधनाची मांडणी:**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे कर्ते सुधारक होते. त्यांनी आपल्या संस्थानामध्ये अस्पृश्यांना प्रत्येक ठिकाणी हक्क देण्याचा प्रयत्न केला. दवाखाने, कोर्ट, सरकारी कचोया,ग्रंथालये, अस्पृश्यांना खुली केली होती. तसेच त्यांनी खंडेरावाचे मंदिर अस्पृश्यास खुले केले आणि हुकूम काढला की , ''सर्व हिंदू धर्मीयांना जातपात मनात न आणता सरकारी देवळात प्रवेश करू द्यावा, तसे करण्यास खाजगी देवळात प्रेवश करू दयावा, तसे करण्यास खासगी देवळाच्या मालकांची मने वळवावी,कारण परमेश्वर सर्वांवर सारखेच प्रेम करतो.'' सार्वजनिक विहीर किंवा गावविहीर बांधल्यावर त्या विहिरीचा वापर अस्पृश्यांसह सर्वांना करता यावा असा हुकूम इ.स. १९३१ साली काढण्यात आला होता.राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारती, हौद, विहिरी, वापरण्याचा हक्क सर्वांप्रमाणे अस्पृश्यांना असल्याचे प्रकटन १९३८ मध्ये काढलेले होते.१८ ऑक्टोबर इ.स. १९०३ रोजी लाहोर येथील भाषणात ते म्हणतात, ''जर मला सत्ता व शक्ती प्राप्त होईल तर, उच्च म्हणविल्या जाणााया जातीच्या या जुलुमाविरूध्द बंड करण्याची पहिली संधी मी साधेन.''[१]

**महाराज सयाजीराव यांचे अस्पृश्यविषयक सामाजिक कार्य व विचार :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात इ.स. १८८२ साली अस्पृश्यासाठी १८ शाळा सुरू करून आपल्या सुधारणावादी कार्याला सुरूवात केली. २६ सप्टेंबर इ.स. १९०९ रोजी पुणे येथील भाषणात महाराजा सयाजीराव

गायकवाड अस्पृश्य वर्गाविषयी म्हणतात, ''हे अस्पृश्य लोक जर शिकले तर ते कसचे आपल्या फारसे उपयोगी पडतात, अशी उगीचच लोकांची समजूत होवून बसणे स्वाभाविक आहे. ही समजूत अर्थात चुकीचीच आहे. तुम्हाला जितके शिकता येईल तितके शिकण्यासाठी तुम्ही झटलेच पाहिजे. माझे मत या प्रकारचे असल्यामुळे तुम्हाला सांगताना मला आनंद वाटतो की, माझ्या राज्यात सध्या ३३५ शाळा आहेत त्यात ८२ हजार मुले व मुली शिकत आहेत व ही संख्या दिवसेदिवस वाढत आहे. याखेरीज विद्याथ्र्यांसाठी वस्तीगृहे मी करविली आहेतच. एक गोष्ट कळवितांना मला खेद होतो तो हा की, अस्पृश्य विद्याथ्र्यांच्या वर्गावरील शिक्षकांचे काम करणे ज्यांना रूचत नाही,असे पुष्कळच हिंदू लोक आजदेखील आहेत. तुम्हाला 'डिस्प्रेस्ड' म्हणजे 'दलित' असे जे म्हणतात ते मला स्वतःला आवडत नाही, पण तुम्हाला खरोखर असे दलित अवस्थेतच राहावयाचे आहे की,काही वर डोके करावयाचे आहे. हे सर्वस्वी तुमच्या प्रयत्नावर अवलंबून आहे.''[२] महाराजाच्या या भाषणातून अस्पृश्य लोकांविषयीची तळमळ स्पष्टपणे जाणवते.

अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संमलेन २३ मार्च १९१८ रोजी झाले होते यावेळी त्यांनी अध्यक्षीय भाषाणाते म्हणतात, ''उच्च जातींना ज्या शैक्षणिक सोई-सवलती आहेत त्याच अस्पृश्यांनाही मिळाव्यात म्हणुन आपण नेटाने प्रयत्न करू व उदारमतवादाचा पुरस्कार करून लोकजागृती करू'' जातीयता- वर्णभेद हे सारे मनुष्यनिर्मित आहेत.भौतिक - सामाजिक परिस्थिती अशा कुप्रथांना जन्माला घालतात,असे त्यांनी स्पष्ट शब्दात मांडले. मनुस्मृतीतील अस्पृश्यतेसंबंधीचा नियमही ते नाकारतात. धर्माच्या नावाखाली अज्ञानाचा आणि कुबुध्दीचा गोधंळ त्यांना जातीभेदांमध्ये दिसतो. जन्मावरूनच जात-वर्ण ठरविणे आणि माणसांच्या गुणकर्मांना नाकारणे हे सारेच थोतांड आहे. स्पर्श - अस्पर्शाची कल्पना समूळ नष्ट व्हावी, असे त्यांना वाटत होते.

अस्पृश्यता निवारणासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १८८२ साली १८ शाळा काढल्या. १९३२ अखेर अस्पृश्यांच्या शाळांच्या आणि विद्याथ्र्यांच्या संख्येत वाढत होत राहिली. १९३२ मध्ये अस्पृश्य विद्याथ्र्यांना वेगळया शाळा नको म्हणुन संमिश्र शिक्षण व्यवस्थेत त्यांना बरोबरीचे स्थान दिले गेले. सुरूवातीला अस्पृश्य शाळांना हिंदू शिक्षक मिळत नव्हते, परंतू १९३२ अखेर अत्यंज वर्गातलेच १६६ शिक्षक अध्यापनाच्या क्षेत्रात आले. त्याच बरोबर इ.स. १९३२ पर्यत महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी स्थापन केलेल्या २४ सहकारी पतपेढयामधुन ३६० अस्पृश्य वर्गीय सभासदांना लाभ देत होत्या.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १८९१-९२ मध्ये बडोदा, अमरेली,पाटणा व नवसारी येथे अस्पृश्य विद्याथ्र्यांसाठी वसतीगृहे काढली,त्यांच्या जेवणा व राहण्याची सोय केली, कपडे,लेखन साहित्य, व अभ्यास पुस्तके पुरविली, या चार वसतिगृहामुळे पाच-सहा वर्षात अस्पृश्य विद्याथ्र्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढली. महाराज सयाजीराव गायकवाड हे बडोदयातील अस्पृश्य विद्याथ्र्यांच्या गुरूकुल धर्तीवरच्या आश्रमास वारंवार भेट देत असत, विद्याथ्र्यांशी संवाद साधत, प्रसंगी या विद्याथ्र्यांना राजवाडयात बोलावून त्यांच्यासमवेत मेजवानी, सहभोजन असे उपक्रम ते करीत.[३] अस्पृश्य विद्याथ्र्यांना त्यांनी शिष्यवृत्या सुरू केल्या. महर्षी वि.रा.शिंदे यांच्या समतानिर्मिती कार्यातही सक्रिय सहभाग घेतला. तसेच सर्वेस्टर ऑफ इंडिया सोसायटी, सोशल सव्हिस लीग, सेवासदन, डिस्प्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया अशा पुरोगामी, सामाजिक कार्य करणाया संस्थाना त्यांनी कायम प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ दिले.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मुंबई ३० डिसेंबर इ.स. १९०४ साली १८ व्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे उद्घाटन करतांना ते म्हणतात, ''जातिसंस्थेच्या अर्थशुन्य असलेल्या कर्मठ नियमांनी मानवी आयुष्य जखडलेले गेले आहे. जातीनुसार व्यवसाय निश्चित होस असल्याने माणसाच्या कर्तृत्वाचा परिघ संकुचित झाला आहे. व्यवसाय बदल करता येत नाही. परदेशगमन करून पाश्चात्य विद्या शिकता येत नाही. जातीजातीत सुसंवाद नाही. जात स्थानिक द्वेष वाढविते,देशात दुही माजविते, बुद्धिची वाढ खुंटविते,राष्ट्रीय शक्तीचा ाहास घडवून आणते.या दुःस्थितीवर मात करण्यासाठी सर्व जातीत रोटीबेटी व्यवहार सुरू करावेत व कटू भेदाभेद नष्ट करावेत.''

**शैक्षणिक कार्य व विचार :**

खालील तक्तावरून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यांसाठी सुरू केलेल्या मुलांच्या शाळा,मुलींच्या शाळा,व शाळेतील प्रवेशीत विद्यार्थी संख्या याची नोंद दिसुन येईल.

**अस्पृश्य शाळांची प्रगती :**

डिस्प्रेस्ड क्लास मिशनची अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद २३ मार्च १९९८ साली मुंबई या ठिकाणी भरली या परिषदेचे अध्यक्ष म्हणुन महाराजा सयाजीराव गायकवाड यांची निवड करण्यात आली होती. या अध्यक्षीय भाषणात ते अस्पृष्यविषयक विचार व्यक्त करताना म्हणतात की, ''अस्पृश्यता निवारण हा माझा जिव्हाळयाचा विषय असल्याने बडोदयात अनेक उपाय केले आहेत. इ.स. १८७७ साली मी अहमदाबाद

| वर्ष | मुलांच्या शाळा | मुलींच्या शाळा | एकूण शाळा | विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १९८३ | | | २ | |
| १९८४ | | | ९ | |
| १८९१ | | | १० | ७८४ |
| १९०० | | | २२ | १७२३ |
| १९१०-११ | | ०४ | २८८ | १५५४१ |
| १९२०-२१ | २२२ | २५ | २२६ | १२०९५ |
| १९२५-२६ | २२० | ०५ | २२५ | १५४०३ |
| १९३०-३१ | १९९ | २ | २०१ | १८३८८ |
| १९३१-३२ | ९० | १ | ९१ | २०९०३ |

**स्त्रोत** - भांड बाबा, महाराज सयाजीराव - गौरवगाथा युगपुरूषाची[४]

मुक्कामी जातीभेदाची बंधन झुगारून दिली.त्यावेळी आम्ही चैदा वर्षाचे होतो. हिंदुस्थानात अस्पृश्यतेचा प्रश्न जटील आहे. कायदे करूनही हा प्रश्न सुटणार नाही. शिक्षण व लोकजागृतीचे सावकाश प्रयत्न करावे लागतील'' असे विचार व्यक्त केले. २३ मार्च इ.स. १९१८ रोजी मुंबई येथील अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संमेलनाच्या आपल्या भाषणात त्यांनी ''जन्मावरूनच वर्ण किंवा जात ठरवा, त्या माणसाच्या गुणकर्माची किंमत नाही, जन्म हेच निर्णायक आहे'' असे शास्त्रवचन कुठेही नाही. ही भगवद्गीतेतील उदात्त शिकवण आपल्याला या बाबतीत स्फर्तिपद होण्यासारखी आहे. त्या शिकवणीकडे आपण लक्ष दयावे असे मी आग्रहपूर्वक सांगतो.''[५]

**निष्कर्ष :**

समतेचा विचार मांडणे,जातीभेदांना नकार देणे हे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी प्रत्यक्षात आणले होते. ते खऱ्या अर्थाने 'कर्ते सुधारक' होते.सामाजिक व आर्थिक घडामोडीमध्ये अस्पृश्यांनी सहभाग वाढवावा हे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे धोरण होते. सामाजिक व धार्मिक रूढी,परंपरामधील टाकावू भाग, निरूपयोगी समाजकर्मकांड त्यांनी नाकारले होते. अस्पृश्यांसाठी शाळा, वसतिगृहे, यांची निर्मिती केली. अस्पृश्यांचे मागासलेपण दूर करण्यासाठी समता, सामाजिक न्याय, स्वातंत्र, बंधुता याची प्रतिष्ठापना तसेच मानवी हक्क संरक्षणाचे कायदे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केले. समता हे तत्व त्यांनी आपल्या वर्तनातून व राज्यकाराभातून अंगीकारलेले होते.

**संदर्भ ग्रंथसूची:**


१. सरदेसाई गो.स.( १९५६) श्री सयाजीराव यांचे सहवासातफएस. जगन्नाथ ॲन्ड कंपनी पुणे,पृ.क्र. ४२
२. उपरोक्त पृ. क्र. ५०
३. दांडेकर वि.पा., (१९३६), श्रीमंत सयाजीराव गायकवाड, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे पृ.क्र. ३७
४. भांड बाबा, महाराज सयाजीराव - गौरवगाथा युगपुरूषाची, महाराष्ट्र शासन.२०१७
५. भांड बाबा, (२०१३) 'लोकपाळ राजा सयाजीराव,' साकेत प्रकाशन, पुणे, पृ.क्र. १०३

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा संस्थानातील सामाजिक सुधारणा

**प्रा.डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे**
(इतिहासविभाग)
कृष्णा महाविध्यालय, रेठरे बु ।। (शिवनगर)
ता. कराड जि. सातारा- ४१५१०८
मो - ९८५०४४३०२०, email- vishwanaths1234@gmail.com

**गोषवारा :**

अखंड भारतातील एक आदर्श प्रजाहितदक्ष संस्थानिक व प्रगतीशिल विचारांचे थोर अधिपती सयाजीराव खंडेराव गायकवाड यांचे नाव अखंड भारतातील संस्मरणीय झाल्यापासून राहणार नाही. ज्या काळात भारतातील संस्थानिक हे अत्यंत मागासलेले स्वार्थापलीकडे न पाहणारे व प्रजेवर अनियंत्रित सत्ता गाजविणारे असे होते त्या काळात बडोदा, मैसूर आणि कोल्हापूर ही तीनच संस्थाने सर्वात प्रगती पर अशी समजली जात होती आणि त्यात सयाजीराव गायकवाड यांचे नाव त्यांच्या कर्तृत्वामुळे संपूर्ण भारतात विख्यात झाले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या मते कोणत्याही समाजाचा विकासाचा अंदाज हा त्या समाजातील लोकांची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती कशी आहे यावरून काढता येतो. प्रगत समाजाने मागासलेल्यानांही सोबत घेऊन उभयतांची प्रगती साधावी अशी महाराजांची आग्रही भूमिका होती. या कार्य यज्ञात एक राजा म्हणून आपली कर्तव्य विकार विलासात ऐश्वर्य भोगण्यापेक्षा लोकराज्य स्थापन करण्यात आपले आयुष्य खर्च करून चांगल्या गोष्टीचा अवलंब स्वीकारू शकतो याचे ज्वलंत उदाहरण हे आपल्या कर्मातून समोर महाराजा सयाजीराव गायकवाड ठेवतात. एका शेतकरी कुटुंबातून आलेला मुलगा पुढे राजा बनतो व पुढे आपल्या देशात अग्रगण्य शासक बनतो ही गोष्टच मुळात विलक्षण वाटते. त्यांचा भारताच्या राष्ट्रीय जीवनातील कार्याचा उल्लेख करणे म्हणजे त्यांना अर्पण केलेली ही मानवंदनाच होय.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानातील प्रजेच्या विकाससंबंधीत घडामोडींचा अभ्यास करणे, राष्ट्र उभारणीच्या कार्यातील महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे, महिला विकास यासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे अशा विविध क्षेत्रात समाज विकासाच्या दृष्टीने केलेल्या कार्याचे योगदान अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून यासाठी उपलब्ध असणारे संदर्भ ग्रंथ, साहित्य, वर्तमानपत्रे, मासिके या साधनांचा वापर करून इंटरनेटवरील माहिती याचाही वापर करण्यात आला आहे.

**बडोदा संस्थान :**

बडोदा राज्य हे भारतातील पाच सुभ्यात उभारले होते त्यात कडी, बडोदा, नवसारी, अमरेली, आणि ओखामंडल हे पाच जिल्हे होते. याच राज्यात एका शेतकऱ्याचा मुलगा म्हणून त्याची खरी ओळख होती. ही वस्तूस्थिती, राजवाड्याची भव्यता व गायकवाड यांच्या अफाट संपत्तीमुळे कधीच अस्पष्ट झाली नाही. महाराज सयाजीरावांना आधुनिक बडोदा संस्थानचे निर्माते म्हणता येईल त्यांच्या कार्याची प्रचिती येण्यासाठी हे वर्गीकृत संशोधन मांडणे सोयीचे ठरेल.

**गायकवाड घराण्याचा उदय :**

पेशवाईच्या पूर्वाधात बाजीराव प्रथम यांच्या आक्रमक व विस्तारवादी धोरणामुळे मराठा सरदाराने मोगल साम्राज्यात जसे ग्वाल्हेर येथे शिंदे, इंदोर येथे होळकर, धार येथे पवार, नागपूर येथे भोसले आणि गुजरात प्रांतात सेनापती खंडेराव दाभाडे यांनी आपले वर्चस्व निर्माण केले होते. सेनापती खंडेराव दाभाडे व उमाबाई दाभाडे यांना तीन पुत्र होते पैकी त्र्यंबकराव अत्यंत शूर व कर्तबगार होते. गुजरातच्या चौथाई वसुलीचा मोकासा छत्रपती शाहू महाराज यांनी सेनापती खंडेराव दाभाडेला दिला होता. इ.स. १७२९ मध्ये सेनापती खंडेराव दाभाडे यांचे निधन

झाले. वडिलांच्या निधनानंतर त्र्यंबकराव दाभाडे हे सेनापती झाले. पेशवे बाजीराव यांनी दाभाडेच्या प्रांतातून जबरदस्तीने चौथाई वसूल करण्यास सुरवात केली. मुलूखगिरीचे प्रांत प्रत्येकी सरदाराला खुद छत्रपती शाहू महाराज यांनी वाटून दिले होते. पण पेशव्यांना असे वाटत होते की मी मुख्यप्रधान असल्याने माझ्या आदेशाचे पालन सर्व सरदारांनी करावे. यातून पेशवे आणि दाभाडे यांच्यात गुजारातवरील वर्चस्ववादातून संघर्ष पेटला. इ.स. १७३१ मध्ये डबोई घनघोर युद्ध झाले. त्र्यंबकराव दाभाडे यांचा सावत्र मामा भाउसिंग ठोके पेशव्याना फितूर झाला. संधी साधून त्र्यंबकराव दाभाडे यांची गुप्त माहिती पेशव्याला दिली. पेशव्याच्या एका बारगीराने त्र्यंबकराव दाभाडे यांच्यावर गोळी झाडली त्यातच त्र्यंबकरावचा अंत झाला. त्र्यंबकराव दाभाडे यांना ठार करण्याची चूक आपल्या हातून घडले आहे याची जाणीव, पेशवा बाजीराव यानाही झाली होती. त्र्यंबकरावाची आई उमाबाई यांनी बाजीरावाची तक्रार छत्रपती शाहू महाराजांकडे केली. त्यानंतर बाजीरावाने छत्रपती शाहू महाराज व त्र्यंबकरावाची आई उमाबाई यांची माफी मागितली. छत्रपती शाहू महाराजांनी बडोदा संस्थानचे मुतालिक म्हणून पिलाजीराव गायकवाड यांची नेमणूक केली. त्यांनीच पुढे बडोदा संस्थानवर आपले अधिराज्य प्रस्थापित केले. गायकवाड हे घराणे बडोदा येथील मराठा राजघराणे होते. त्यांचे मुळ गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालूक्यातील दावडी-निमगाव होते. बडोद्याचे महाराज खंडेराव यांचे अकाली निधन झाले. त्यामुळे बडोदा संस्थानच्या गादीचा वारसा चालविण्यासाठी महाराणी जमनाबाई यांनी आपल्या नात्यातील काशिराव यांचा मुलगा गोपाळ यास दत्तक घ्यायचे ठरले. गोपाळराव यांचा जन्म ११ मार्च- १८६३ रोजी झाला. त्यांचे मूळगाव खानदेशातील कवळाणे होय. हे घराणे बडोद्याच्या राजघराण्याशी संबंधित असल्याने महाराणी जमनाबाई गायकवाड यांनी दिनांक २७.०५.१९७५ रोजी गोपळरावास दत्तक घेतले आणि त्यांचे नाव सयाजीराव असे ठेवले. दत्तक जाण्यापूर्वी गोपाळराव कवळाणे या खेडेगावात निरक्षर गुराखी म्हणून वावरत होते. बडोदा संस्थानचे दिवान राजा सर टी माधवराव यांनी सयाजीरावाच्या शिक्षणाची सोय केली. शिक्षणानंतर १८ .११.१९८१ रोजी बडोदा संस्थानच्या गादीवर त्यांना बसविण्यात आले व तेच पुढे थोर देशभक्त, समाजसुधारक महाराज सयाजीराव खंडेराव गायकवाड झाले. त्यांचे निधन ६ फेबुवारी- १९३९ मध्ये झाले.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक सुधारणा:**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिक्षण हे समाज परिवर्तनाचे माध्यम आहे हे महत्व त्यांनी ओळखून १६ मार्च १८९३ पासून आपल्या बडोदा संस्थानात अम्रेलीतून मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. इ.स. १९०६ पर्यंत त्यांनी पूर्ण संस्थान व्यापले. अशा धाडसी मिशनला सुरुवात करणारे ते पहिले स्वतंत्रपूर्व भारतीय शासक होते. जे लक्ष स्वतंत्र भारताला पूर्ण करण्यासाठी २००९ साल उजाडले. त्याची अंमलबजावणी १९ व्या शतकातच बडोदा संस्थान मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केली होती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अमरवेली येथील मंदिरांचे दरवाजे दलितांसाठी खुले केले. त्यांनी खिचडी दानाची पद्धत राज्यात बंद करून तो खर्च कालीप्रजा अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाकडे वळवला. बडोदा संस्थानामध्ये जातिभेदाला आणि पंक्तिभेदाला मूठमाती देण्याच्या हेतूने महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राजवाड्यातील भोजन कक्षात आपल्या शेजारी महार समाजाचे पुढारी शिवराम जांबा कांबळे व श्रीपतराव थोरात यांना बसविले होते.

**विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहान व बालविवाहास प्रतिबंध:**

गणेश सदाशिव भाटे हे नुकतेच इंग्लंडहून अभ्यासक्रम पूर्ण करून आले होते. दुर्दैवाने त्यांची तरुण पत्नी काही वर्षापूर्वी वारली होती. गणेश भाटे हे पुरोगामी आणि सुधारणावादी विचारांचे होते. त्यांनी द्वितीय विवाहासाठी वीस वर्षाची लीलाबाई नावाची विधवा पसंद केली. भाटेचे आई वडील आणि बडोध्यातील सनातन मंडळी या विवाहास विघ्न आणू पाहत होती. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी पुढाकार घेवून गणेश भाटे यांचा विवाह विधवा लीलाबाईशी बडोदा संस्थानात लावून दिला. ही घटना समाजपरीवर्तनाची एक नांदी ठरणार होती. त्यांनी समाजासमोर एक आदर्श उदाहरण ठेवण्याचे काम केले. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात बालविवाह प्रतिबंधक कायदा पास केला होता (१९०४). विवाहाच्या वेळी वधु-वराचे वय १२ आणि १६ वर्षे ठरविण्यात आले. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. महाराज फक्त कायदे करूनच थांबले नाहीत तर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतूनही सामाजिक सुधारणा घडवून आणल्या होत्या.

**सामाजिक समता स्थापन करण्याचे कार्य :**

पंडित मदन मोहन मालवीय (बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू, आलाबाद) यांनी महाराज सयाजीराव गायकवाड यांचेकडे आर्थिक मदतीसाठी अर्ज केल्यावर महाराज सयाजीरावांनी टाकलेली अट विचार करण्यायोग्य आहे. ते म्हणतात आम्ही एक लक्ष नाही तर पाच लक्ष रुपये देऊ पण हिंदू विद्यार्थ्यांनी इस्लाम धर्माचा, मुस्लिम विद्यार्थ्यांनी चार वेदांचा, जैनेतरांनी जैन धर्माचा आणि इतरांनी ख्रिश्चन व बौद्ध

ISSN No. 2394-5990

धर्माचा अभ्यास करावा. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सामाजिक परिषदेचे अध्यक्ष पद भूषविले होते तसेच लंडन युनिव्हर्सिटीतील जागतिक मानववंश परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष पद ही त्यांनी भूषविले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदेच्या राष्ट्रीय पातळीवरील अस्पृश्यता निवारक परिषदेचे मुंबईचे अध्यक्षपदी त्यांनी भूषविले होते. कोल्हापूर संस्थाना मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या काळातील वेदोक्त प्रकरण खूप गाजले होते, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी बडोदा संस्थानात ब्राम्हणेंतरांसाठी वेदोक्त पाठशाळा काढल्या. महाराज सयाजीराव हे खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्षता मानणारे होते, हे त्यांच्या पुढील कृतीवरून दिसून येते- रोम सहलीच्यावेळी त्यांनी सर्व व्यवस्थापनाचे काम अब्बास तय्यबजी या मुस्लीम व्यक्तीवर सोपविले होते.

**फुले, भीमराव, शिंदे व इतरांना आर्थिक मदत :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गरजूंना उदारहस्ते मदत करीत असत. महात्मा फुलेंच्या पक्षघाताच्या पहिल्या आजारपणात त्यांना आर्थिक मदत केली होती. महात्मा फुलेंच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट कोसळले होते. सावित्रीबाई फुले यांनी बडोदा संस्थांनाकडे आर्थिक मदतीची विनंती अर्ज केल्यावर १० फेब्रुवारी १९९२ रोजी धामणस्करांच्या हस्ते त्यांना एक हजार रुपयाचा चेक देण्याची सोय केली. या शिवाय महात्मा फुले यांना ङ्गमहात्माफ ही पदवी सयाजीराव गायकवाड यांच्या सूचनेवरून ११ मे १८८८ रोजी समारंभपूर्वक देण्यात आली होती. भीमराव रामजी आंबेडकर मॅट्रिक पास झाल्यानंतर पुढच्या शिक्षणासाठी स्पेशल केस म्हणून दरमहा पन्नास रुपये शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. बी.ए. पास झाल्यानंतर संस्थानाचा नियम मोडून एकूण तीन वेळेस शिष्यवृत्ती मंजूर करून त्यांना पुढील शिक्षणासाठी परदेशात पाठविले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे आपले शिक्षण पूर्ण करू शकले आणि भविष्यात राष्ट्रीय जीवनात मोठे भरीव कार्य करू शकले. विठ्ठल रामजी शिंदे हा मुंबईचा तरुण धर्म शिक्षणासाठी विलायतेला जात आहे, आपणाकडून त्यास शिष्यवृत्ती मिळत असूनही त्यांना उच्च शिक्षणासाठी पैशाची गरज असल्याने त्याची फाईल तात्काळ मागवून घेतली आणि शिंदे यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर केली. कलकत्त्याचे डॉ. कुशल सर्जन- कृष्णधन घोष यांचे पुत्र अरविंद घोष हे आयसीएस लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊनही घोडेस्वारांची परीक्षा न दिल्याने त्यांना अपात्र ठरण्यात आले होते. त्यांची प्रगल्भता ओळखून महाराज म्हणाले मुलगा धगधगता निखारा आहे. आज पासूनच त्याची सेवा सुरु करा असा आदेश काढला. संस्थानात अरविंद घोष यांना २०० रुपये वेतनावर नोकरी दिली. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डीप्रेस्ड क्लास मिशनच्या भटकर नावाचा महार विद्यार्थी मॅट्रिक पास झाला होता. त्याच्या उच्च शिक्षणासाठी प्रतीमाह २५ रुपये शिष्यवृत्ती देण्यात आली.

**इतर सामाजिक सुधारणा :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृशांसाठी स्वतंत्र शाळा सुरु करून त्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. असाच प्रयोग भिल्ल मुलांसाठीही करण्यात आला. या शाळांमध्ये ब्राम्हण व उच्च वर्गातील शिक्षक मिळेनात म्हणून जास्त पगार देवून मुस्लीम शिक्षक नेमले. पण हे शैक्षणिक कार्य चालू ठेवले. बडोदा संस्थांनातील नवसारी भागातील आदिवासी कालीप्रजा तरुणांना संस्थांनाच्या पोलीस विभागात पोलीस शिपायांच्या नोकरीत सामावून घेवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. कायद्याने बडोदा संस्थांनातील वेठबिगारी बंद केली. बडोदा संस्थानात १२ वर्षाखालील कोणत्याही बालकास गिरणी / कारखान्यात कामास न ठेवण्याचा आदेश काढला. बडोदा संस्थानात गरीब व वयस्क लोकांसाठी पिलाजी महाराजांच्या नावे अनाथाश्रम सुरु केले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचेकडून ङ्गबारखळी खाते सुरुफबारखळी खाते म्हणजे बडोदा संस्थांनातील वतनदार, इनामदार देवस्थान यांच्याकडील थकीत महसुलाबाबत आणि ताब्यातील अधिक जमिनीसंबंधीचे नोंदी खाते. बडोदा संस्थानात प्रस्तुतीगृहांच्या इमारती बांधल्या व प्रशिक्षित सुईनिना मानधन देण्याची सोय केली. हिंदू विधवा मुलीना माहेरच्या मिळकतीतला हिस्सा देण्याचा आदेश काढला. दुसऱ्या विवाहास बंदी आणणारे बडोदा संस्थान हे भारतातील पहिले प्रगत राज्य ठरले. बडोदा संस्थानात १६ वर्षाच्या आतील मुलास कोणीही बिडी, सिगारेट, तंबाकूजन्या पदार्थ विकू नये असा कडक शब्दात आदेश काढला. पुस्तके हीच शिक्षण प्रसाराचे प्रमुख साधन असल्याने राज्यात सार्वजनिक पुस्तकालय सुरु केले. बडोदा संस्थानात वाचनालयाचे स्वतंत्र खाते सुरु केले. यासाठी लोकवर्गणीतून जेवढा निधी जमा होईल त्याच्या दुप्पट सरकार देईल या योजनेस प्रचंड प्रतिसाद मिळाला. छोट्या गावात, वाड्यां, वस्त्यांवर ङ्गसयाजी वैभवफही फिरती पुस्तक पेढ्याची व्यवस्था करण्यात आली. बडोदा संस्थानात आशियातील सर्वात मोठी व अद्ययावत सेन्ट्रल लायब्ररी सुरु केली.

**निष्कर्ष :**

दानात पुण्य लाभतं असं लाभार्थी म्हणतात पण यातून कर्तुत्व मारल जात हे कोणीच सांगत नाही. या वाक्याद्वारे महाराज सयाजीरावांनी मार्मिक पण कठोर शब्दांत त्या काळच्या आळशी, फुकट खाणाऱ्या कर्मशुन्य बहाद्दरांना बजावले होते. महाराज नेहमी म्हणायचे मी जगात कुठेही असो २४ तास मी बडोदा आणि तेथील प्रजेच्या विकासाचा विचार करत असतो. महाराज सयाजीराव गायकवाड हे भारताच्या इतिहासातील पुरोगामी नेतृत्वाचे दीपस्तंभ म्हणून ओळखले जातात. इ.स. १८७५ ते १९३९ पर्यंतच्या त्यांच्या दूरदर्शी कारकिर्दीने बडोद्याला नवकल्पना, शिक्षण आणि सामाजिक सुधारण्याचे केंद्र बनवले. महिलांच्या हक्कांचे समर्थन करून कला-गुणांना प्रोत्साहन दिले. अकॅदमी ऑफ इंडियन म्युझिकसारख्या अग्रगण्य उपक्रमांना पाठिंबा देऊन त्यांनी अमिट छाप सोडली त्याच्या दुरगामी विचारांचा वारसा शिक्षणापासून शासनापर्यंत पसरलेला आहे. तो वारसा पिढ्यानपिढ्यांना प्रेरणा देत राहतो, त्याला एक अग्रेषित-विचार करणारा राजा म्हणून चित्रित करतो ज्याने आपल्या जनतेचे उज्ज्वल भविष्य घडविले. आचार्य अत्रे यांनी लिहिले आहे की, ङ्गसुधारणेच्या शिखरावर आरूढ झालेल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना ज्या गोष्टी भारतात इतरत्र करता आल्या नाहीत, त्या सर्व सुधारणा एकट्या सयाजीरावांनी आपल्या राज्यात करून त्यांना लाजेने माना खाली घालावयाला लावल्या.फ

**संदर्भग्रंथ सूची :**


१. Gense, J. H.; Banaji, D. R. Ed. The Gaikwads of Baroda: English Document, Vol. I, Bombay, 1936.
२. Menon, V. P. The Story of the Integration of the Indian States, Madras, 1961.
३. Chavda, V. K. Gaekwads and the British, A Study of Their Problems, 1875-1920, Delhi, 1961.
४. राजवाडे वि.कां.; बडोद्यातील सुधारणा समग्र राजवाडे साहित्यखंड८,- १९८८
५. माटे श्री.म.- अस्पृशांचा प्रश्न, पुणे प्रकाशक- १९३३
६. मोरे सदानंद- लोकमान्य ते महात्माखंड- १ राजहंस प्रकाशन, पुणे- २००७
७. आपटे दाजी नागेश 'श्री महाराजा सयाजीराव गायकवाड', (तिसरे) यांचे चरित्र खंड- १,२,३ (१९३६) प्रकाशक लेखक खुद्द बडोडे
८. भांड बाबा, 'महाराजा सयाजीराव गायकवाड गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, (२०१७) चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.
९. नेने द.वि. (दादुमिया), 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड', (२०१०) श्री गंधर्ववेध प्रकाशन, पुणे.
१०. भांड बाबा, 'आधुनिक भारताचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड', (२०१९) साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
११. घाटे विठ्ठल दत्तात्रय, 'असे दिवस होत' (१९६१) मौज प्रकाशन, मुंबई.
१२. गायकवाड फत्तेसिंहराव, 'सयाजीराव ऑफ बरोडा' (१९८९) पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे
१३. खैरमोडे चांगदेव, 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर'. (१९५२) सुगावा प्रकाशन, पुणे.
१४. पवार निंबाजीराव, 'जेव्हा गुराखी राजा होतो' (१९८८) सयाजी प्रकाशन, महात्मा गांधी रोड नाशिक.
१५. भांड बाबा, 'सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड २', (२०१७) साकेत प्रकाशन, स्टेशन रोड औरंगाबाद.
१६. वरखेडे रमेश, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह भाग १ व २, महाराष्ट्र शासन- २०१७
१७. पगार एकनाथ, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पत्र संग्रह भाग १, २ व ३ महाराष्ट्र शासन- २०१७
१८. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड ४ मुंबई. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
१९. भांड बाबा, 'युगदृष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड', (२०१०) साकेत प्रकाशन, स्टेशन रोड औरंगाबाद.
२०. कानिटकर रा.प्र., एकशेएक श्रेष्ठ मानव, उत्कर्ष प्रकाशन.
२१. Textbook.com/mpsc-preparation/maharaja-sayajiraogaikwad-3
२२. Newsgram.com/maharaja-Sayajirao-

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) आणि बडोदे संस्थानातील ग्रंथालय चळवळ

(Maharaja Sayajirao Gaikwad (3rd) and Library Movement of Baroda State)

**डॉ. अजितकुमार दादासो जाधव**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख
आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे, ता.जि.सातारा.
(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सलंग्न)
Email ID- jadhavajitkumar@gmail.com
Mob. No. 9922821726

**बीजशब्द (Keywords)** – रेसिडेंट, दत्तक विधान, फिरती ग्रंथालय, विलायत

**प्रस्तावना** (Introduction) :

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्माण केले. पराक्रम, लोककल्याणकारी राज्य, सर्वसमावेशक राजनीती, उदारमतवादी दृष्टिकोन, सर्वधर्मसमभाव, स्वाभिमान हा स्वराज्याचा पाया होता. या आधारेच शिवशाही आणि पेशवाईत मराठ्यांचे राज्य हिंदुस्तानच्या बहुतांश प्रदेशात विस्तारले. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात १७२० साली निजामाबरोबर झालेल्या राक्षस भुवनच्या लढाईत दामाजी गायकवाड यांनी पराक्रम केला, मराठ्यांना विजय मिळाला आणि शाहू महाराजांनी त्यांना समशेरबहाद्दर हा किताब दिला. दामाजींचा मुलगा पिलाजीराव यांनी गुजरातमधील काठेवाड येथून मुघल फौजांबरोबर संघर्ष करत त्यांना तेथून हाकलून दिले. परिणामत सातारा राज्याच्या नेतृत्वात गुजरातमध्ये गायकवाड घराण्याची सत्ता सुरू झाली. गायकवाड घराण्यातील सरदारांनी आपल्या कर्तुत्वांनी गुजरातमध्ये सर्वदूर राज्य पसरविले. पुढे बडोद्याचे महाराज खंडेराव गायकवाड राज्यकारभार करत असताना त्यांचे धाकटे बंधू मल्हाररावानी घातपात करून त्यांना ठार केले. यावेळी खंडेरावांच्या पत्नी जमनाबाई गरोदर होत्या. त्यांना पुढे मुलगी झाली. मल्हारराव बडोद्याच्या गादीवर बसले. परंतु त्यांच्याकडे कोणतेही राज्यकारभाराचे गुण नव्हते. त्यांनी ब्रिटिश रेसिडेंट कर्नल फेअर याच्यावर विष प्रयोग करण्याचा प्रयत्न केल्याने ब्रिटिशांनी त्यांना पदच्युत केले व खंडेरावांच्या पत्नी महाराणी जमनाबाई यांना गायकवाड वंशातील अल्पवयीन मुलगा दत्तक घेण्यास परवानगी दिली. परिणाम स्वरूप मालेगाव जवळील ङ्गकळवणफगावातील प्रतापराव गायकवाड यांचे वंशज काशीराव व त्यांच्या भावाची चार अल्पवयीन मुलांपैकी गोपाळ नावाच्या मुलाची बडोदा संस्थांनच्या गादीसाठी २७ मे १८७५रोजी दत्तक पुत्र म्हणून निवड केली. त्यावेळी ते बारा वर्षाचे होते.[१] वयाच्या बारा वर्षापर्यंत स्वतःची सही न येणाऱ्या या मुलाचे अक्षर, अंक ज्ञानाचे आणि राज्यकारभाराचे शिक्षण एकाच वेळी सुरू झाले. हेच गोपाळ पुढे बडोदा संस्थांनचे महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे म्हणून ओळखले गेले. स्वातंत्र्यपूर्वकाळात हिंदुस्थानात लोकशाही राज्यकारभार करणारा राजा म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड यांची ओळख आहे. कुशल, प्रजाहितदक्ष, बुद्धिमान आणि दूरदृष्टी असणारा राज्यकर्ता म्हणून त्यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. ब्रिटिश राजवटीत देशाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक जडणघडणीत त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. या पार्श्वभूमीवर महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे आणि बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळ या विषयावर सदर मांडणी केली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे (Objective of the studies)** :

१. महाराजा सयाजीराव गायकवाड तृतीय यांचे बडोदा राज्यातील ग्रंथालय चळवळीतील योगदानाचे मूल्यमापन करणे.
२. ग्रंथालय सेवा सुरू करण्यासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड यांना मिळालेल्या प्रेरणांचा अभ्यास करणे.
३. गाव तेथे वाचनालय मोहीम या मोहिमेची माहिती अभ्यासणे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड :**

सयाजीराव गायकवाड २८ डिसेंबर १८८१ रोजी बडोद्याच्या गादीवर विराजमान झाले. दत्तक विधानानंतर त्यांना साधारण सहा वर्षे अक्षर ओळख, गणित, इतिहास, शास्त्र यांचे शिक्षण

दिले गेले. प्रारंभी त्यांच्या वयाची १२ वर्ष त्यांचा कसलाही शिक्षणाशी संबंध नव्हता. परंतु त्यांचे गुरु एलियट, सर टी माधवराव, मातोश्री जमनाबाई यांनी केलेल्या मार्गदर्शनातून सयाजीराव यांचे व्यक्तिमत्व घडले, विद्याव्यासंग वाढला.[२] सन १८८१ ते १९३९ पर्यंत सलग साठ वर्षे सयाजीरावांनी राज्यकारभार करताना जो व्यापक आणि सर्वंकष दृष्टिकोन ठेवला त्यांनी त्या वेळेला दाखविलेला द्रष्टेपणा, त्याचे झालेले परिणाम आजही देश आणि बडोदा परिसर अनुभवत आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक सुधारणा, प्रशासन, उद्योग, अर्थकारण, स्थापत्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये सयाजीरावांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला होता. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, रेल्वेचे जाळे, बँकाचा प्रारंभ, सुधारकांना पाठबळ, स्वातंत्र्य चळवळीत कार्य करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना मदत, परदेशात जाऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या अशा अनेक मार्गांच्या माध्यमातून मोलाची मदत सयाजीराव गायकवाड यांनी केली.[३] म्हणूनच एक द्रष्टा व बहुआयामी नेतृत्व असणारा राज्यकर्ता अशी त्यांची ओळख होती.

**शिक्षण प्रसार :**

ब्रिटिश राजवटीत हिंदुस्थानवर अनेक संस्थानिक राज्य करीत होते. परंतु संस्थानांमध्ये शिक्षण प्रसाराबाबत खूप उदासीनता होती. शिक्षणाची सुविधा निर्माण करावी, त्यातून लोकांची प्रगती व्हावी अशा प्रकारची धारणा खूप कमी संस्थानिकांची होती. बडोदा संस्थांमध्येही यापेक्षा वेगळी परिस्थिती नव्हती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राज्यकारभार हाती घेतल्यावर बडोदा संस्थांनचा दौरा केला. या दौऱ्यात सर्वसामान्य जनतेचे अज्ञान, विकास न होण्याची कारणे, अस्पृश्यता, दुख: पाहून सयाजीरावांचे मन हेलावले. त्यांनी यावर उपाय म्हणून सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे तरच समाज सुधारणा होईल यासाठी चंग बांधला. सन १८८२ मध्ये शिक्षणासंबंधी पहिला क्रांतिकारी वटहुकूम काढला. सोनगड नवसारी या ठिकाणी अस्पृश्य व आदिवासी मुलांसाठी शाळा आणि वस्तीगृहाचा प्रारंभ केला.[४] १९०६-०७ साली बडोदा संस्थानात तिसऱ्या इयत्तेपर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. वाड्या - पाड्यांवर व गावांमध्ये शाळा सुरू झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी त्यांनी मदत केली यावरून त्यांची शिक्षण प्रचार आणि प्रसारविषयीची तळमळ दिसून येते. मुलांसाठी खास पुस्तके तयार करून घेतली. यामुळे गावागावात शिक्षणासंबंधी जागृती होऊन लिहिण्या वाचणाऱ्यांची संख्या वाढू लागली. लोक साक्षर होऊन त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना नवीन ज्ञान मिळावे, या हेतूने गावागावात सोपी असणारी पुस्तके पुरवणे गरजेचे आहे असे सयाजीरावांना वाटू लागले. यातूनच वाचनालयाची कल्पना पुढे आली.[५] शाळा, कॉलेज, विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण मिळेलच. परंतु शिक्षण हे समाज व ज्ञानाभिमुख व्हायला पाहिजे. यासाठी वाचन संस्कृती वाढवली पाहिजेत. वाचन संस्कृती वाढवायची असेल तर जिथे सर्वसामान्य लोक येऊन पुस्तके वाचतील अशी ग्रंथालये उभी केली पाहिजेत. या अनुषंगाने ग्रंथालये सुरू करण्याच्या दृष्टीने धोरणे आखली. पुढील काळात याचेच भव्यरूप ग्रंथालय चळवळीने घेतल्याचे दिसते.

**साहित्य निर्मिती :**

जनतेची आत्मिक आणि भौतिक प्रगती ही साहित्य शिक्षणाच्या माध्यमातूनच होते यावर महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा विश्वास होता. इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, संत साहित्य, पौराणिक साहित्य, संस्कृतीशास्त्र प्राच्यविद्या जोपासून त्याचा प्रचार-प्रसार करणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटत होते. याचे प्रमुख कारण म्हणजे योगी अरविंद, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, रीडर गोविंद सखाराम सरदेसाई, आर. सी. दत्त अशा अनेक विचारवंतांचा सहवास त्यांना लाभला होता.[६] राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सभा व परिषदांमध्ये त्यांनी कधी व्याख्याता म्हणून, कधी अध्यक्ष म्हणून तर कधी उपस्थित राहून आपल्या जिज्ञासू आणि ज्ञानी वृत्तीचा परिचय करून दिला होता. ज्या कालखंडात भारतातील राजे-राजवाडे, संस्थानिक चैनी - विलासी जीवनाचा आनंद घेण्यासाठी परदेशात जात होते. अशावेळी सयाजीरावांनी परदेशी प्रवास करीत तेथील उत्तम साहित्य, नवे तंत्रज्ञान, उद्योग धंद्यांमधील बदल आत्मसात करून ते आपल्या संस्थानात राबविण्याचा प्रयत्न केला. जगभरातील लेखक, साहित्यिक, विद्वान, विचारवंत, कलावंत, तंत्रज्ञ यांना संस्थानात बोलवून यथोचित सन्मान केला. त्यांच्या ज्ञानाचा वापर संस्थानाच्या प्रगतीसाठी केला. सयाजीरावांनी अनेक ठिकाणी विद्वत्त पूर्ण भाषणे दिली. हिंदुस्थानातील मागासलेल्या वर्गाचे शिक्षण, हिंदुस्थानातील राजपुत्रांचे शिक्षण यासारख्या अनेक विषयांवर लेख लिहिले.[७] लोकांना उपयोगी असणारे लोकोपयोगी व व्यवहारोपयोगी साहित्य देशी भाषांमध्ये तयार करून घेतले. ज्याचा फायदा संस्थानातील ग्रंथालय चळवळीच्या प्रचार व प्रसाराला झाला.

**विलायतेचा प्रवास (युरोप, अमेरिका) आणि ग्रंथालय चळवळ :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १९०५ ते १९०७ या कालखंडात इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, अमेरिका या देशांचा दौरा केला. ५ मे १९६० रोजी ते अमेरिकेला रवाना झाले.

अमेरिकन लोकांचे राहणीमान तेथील जीवन पद्धती, संस्कृती, शिक्षण पद्धती इत्यादी पैलूचा अभ्यास केला. अमेरिकेतील औद्योगिक विकास, शेती, कामगार संघटना, बाल संगोपन, वाचनालये व त्यांच्या प्रचार-प्रसाराचे कार्य याबाबत सखोल माहिती घेतली.[८] १८८७ साली महाराज तब्येतीच्या कारणावरून प्रथमच युरोपच्या प्रवासाला गेले. त्यानंतर जवळपास २६ वेळा विलायतेला जाऊन आल्याचा उल्लेख मिळतो.

अमेरिकेतील न्यूयॉर्क टाइम्सने आपल्या २१ मे १९०६ रोजीच्या वृत्तपत्रात पृष्ठ क्रमांक १८ वर 'बडोद्यांच्या महाराजांची न्यूयॉर्क भेट' अशा शीर्षकाखाली बातमी छापली होती. त्यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे केलेल्या स्वागत समारंभामध्ये भारतातील ५० मूळ भारतीय रहिवाशांनी प्रातिनिधिक स्वरूपात केलेले भाषण आणि सदर कार्यक्रमास ५०० लोक उपस्थित असलेल्याचा पुरावा वृत्तपत्रांने दिलेला आहे. याप्रसंगी देशाच्या आणि संस्थांनाच्या सुधारणासाठी आपले मत व्यक्त करताना महाराज म्हणाले होते की, I am trying to educate my people and have established more schools than exist in any other principality in India. But the problems in my country are many and grave. One of the great evils that I have tried to remedy is the custom of infant marriage. So far I have only succeeded in restricting the age limit to 12 years, but to those familiar with past conditions that will be seen to be a vast improvement. I have learned already a great deal during my stay here that I think will be of profit to me in the government of my people, and I hope to learn a great deal more.[९] एकंदरीत अनेक वेळा सुधारलेल्या देशांचा केलेला प्रवास, समाजसुधारणेविषयीची असणारी तळमळ यामुळे अमेरिकन शिक्षण पद्धतीप्रमाणे भारतातही आपल्या संस्थानात चांगली शिक्षण प्रणाली निर्माण करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिल्याचे दिसून येते.

भारतात बडोदा संस्थानात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा उगम झाला. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी इंग्लंड आणि अमेरिकासारख्या राष्ट्राचे दौरे करून तेथील ग्रंथालयविषयक दृष्टिकोन किती प्रगत आहे आणि ग्रंथालयाचे मूळ त्या ठिकाणी कसे रुजले आहे हे पाहिले. सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करणे, ग्रंथ, सेवक, वाचक या घटकांमध्ये संवाद निर्माण करून ग्रंथालय समृद्ध करणे, ती चिरकाल टिकवणे हे ध्येय समोर ठेवून आपल्या संस्थानात अशा प्रकारची ग्रंथालये उभारण्याची संकल्पना त्यांनी मांडली. यामागे लोकांना वाचनाची आवड लागावी हा हेतू होता. वाचनाच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांना जगातील नवनवीन आधुनिक गोष्टी समजतील. युरोप आणि अमेरिकेत सार्वजनिक मोफत ग्रंथालयानी केलेले कार्य पाहून आपल्या संस्थानातील जनतेला असे सुविद्य, सुसंस्कृत व ज्ञानसंपन्न नागरिक बनविण्यासाठी मोफत ग्रंथालयाची स्थापना करावी. पाश्चात्य देशाप्रमाणे आपल्या संस्थानातही ग्रंथालयाचे जाळे तयार करावे आणि राज्यभर ग्रंथालय व्यवस्था निर्माण करावी. ग्रंथालयाचा प्रचार आणि प्रसार करावा असे मनोमन ठरविले. याची कारवाई त्वरित व्हावी म्हणून सयाजीरावानी अमेरिकेतील ग्रंथालयशास्त्रातील निपुण विद्वान डॉ. विल्यम लन्सन बोर्डन यांना १९१० साली आपल्या संस्थानातील ग्रंथालयाचे संचालक म्हणून नेमणूक दिली. त्यावेळी जे. एस. कुडाळकर यांची सहाय्यक संचालक पदावर नियुक्ती केली. अमेरिकेत ग्रंथालय चळवळ उभी करणाऱ्या मेलव्हिल ड्यूई[१०] यांच्या नेतृत्वाखाली सन १८८७ मध्ये कोलंबिया विद्यापीठाच्या लायब्ररी स्कूलमध्ये व्याख्याता म्हणून बोर्डन यांची नियुक्ती झाली होती त्यामुळे बोर्डन यांना मेलव्हिल ड्यूई यांचे सहकारी म्हणून कार्य करत असताना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या होत्या. बोर्डन भारतात आले त्यावेळी ते ५७ वर्षाचे होते. बडोदा संस्थानात ग्रंथालय उभारण्यामध्ये बोर्डन यांना संस्थानातील त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी खूप मोलाची मदत केली. बडोदा संस्थानात सार्वजनिक वाचनालयाची अतिशय उत्तम यंत्रणा उभी करण्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले. सयाजीरावांसारखा महान आश्रयदाता, बोर्डन यांच्यासारखा हुशार सल्लागार, ग्रंथालय व्यवस्थापन तज्ञ आणि कुडाळकर यांच्यासारखा हुशार बौद्धिक क्षमता आणि प्रशासकीय कौशल्य असणारा सहकारी या माध्यमातून बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळीला गती मिळाली. बोर्डन १९१० ते १९१३ असे तीन वर्ष बडोदा संस्थानात राहिले. या तीन वर्षात ग्रंथालय चळवळीची 'ब्ल्यू प्रिंट' त्यांनी तयार केली.बडोद्यातील गावागावांमध्ये ग्रंथालयाचे जाळे उभे केले. जिथे छोटे गाव असेल तेथे पंचवीस तीस पुस्तके बसणाऱ्या पत्र्याच्या पेट्या तयार केल्या. प्रत्येक गावामध्ये ही पेटी ठेवली जात असे आणि दर पंधरा दिवसांनी अशा पेट्या बदलल्या जात असत. अशा फिरत्या पुस्तकांच्या पेट्यांचा प्रयोग बडोदा संस्थानापूर्वी स्कॉटलंड या ठिकाणी केला होता.[११] अशाप्रकारे संस्थानात शहरापासून खेडेगावापर्यंत सार्वजनिक ग्रंथालये सुनियोजित चालावीत म्हणून पाश्चात्य ग्रंथालयाच्या धर्तीवर यंत्रणा उभी केली. मि. बोर्डन यांनी केलेल्या कार्याचे कौतुक करताना महाराजा सयाजीराव गायकवाड म्हणतात, ची. Borden realizes the importance of this phase of the work with children as well as I do, and I

have no doubt that his idea will be carried out by his staff.[१२]

बडोदा संस्थानातील नेमणूक संपल्यानंतर सन १९१३ साली अमेरिकन ग्रंथालय संघटनेच्या वार्षिक परिषदेत बोर्डन यांनी सादर केलेल्या Baroda and its Public Libraries या शीर्षकाखाली तयार केलेल्या लेखामध्ये ते म्हणतात, If the East be appreciated in sympathy she responds fervently and with her best. Whatever measure of success my mission in India has achieved has been largely due to the sympathetic help of his Highness, the Maharaja Gaekwad, and of principal officers, and to the enthusiastic co-operation of my staff of assistants that gathered around me. Now that my mission here is completed it seems to me that an account of that mission is due to my confreres of the American Library -ssociation. I Would like much to have been able to deliver that account in person, but my contract with the state does not expire until the middle of June and Baroda is ten thousand miles from the Catskills, with no airships running. As I expect to pass the rest of my life in God's country, provided some library work be forthcoming, I shall probably meet many of you during Library Weeks, or at the future Conventions of the A.L.A.[१३]

डब्ल्यू.ए.बोर्डन (१९१०-१३) यांच्यानंतर मुंबईतील एका गरीब सोनार कुटुंबात जन्माला आलेले जनार्दन सखाराम कुडाळकर, (१९१५-२१) हे बडोदा सेंट्रल लायब्ररीचे क्युरेटर झाले. कुडाळकर यांनी आपल्या प्रशासकीय कौशल्याने ग्रंथालय चळवळीला खूप मोठी गती दिली यावर खुश होऊन महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना संस्थानाच्या खर्चाने युरोप, अमेरिका आणि जपान मधील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी पाठविले. आपल्या संस्थानात ग्रंथालय विकासासाठी एखाद्या अधिकाऱ्याला परदेशात पाठविणारा राजा अपवादात्मकच म्हणावा लागेल. कुडाळकर यांनी आपला परदेश दौरा करताना तेथील ग्रंथालय प्रणालीचा सखोल अभ्यास केला आणि त्याचा फायदा पुढील काळात बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळीला झालेला पाहायला मिळतो. कुडाळ प्रदेशात गेले तेव्हा एक्टिंग क्युरेटर म्हणून श्री मोतीभाई अमीन यांची नेमणूक केली होती. त्यांनी ग्रंथालय वाढविणे आणि त्याची सुव्यवस्था राखण्यासाठी खूप मोलाची कामगिरी केली. १९२१ मध्ये कुडाळकरांच्या दुःखद निधनानंतर त्यांच्या जागी न्यूटन मोहन दत्त यांची नेमणूक झाली. त्यांनीही संस्थानात ग्रंथालय चळवळीचा प्रचार आणि प्रसार केला.[१४]

**मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा शहर हे आधुनिक पद्धतीने तयार केले. तेथील प्रत्येक इमारतीची स्थापत्य रचना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण अशी निर्माण केली होती. त्यांनी डॉ. विल्यम लन्सन बोर्डन यांच्या मार्गदर्शनाखाली १९१० साली बडोदा शहराच्या मध्यभागी एका जुन्या इमारतीमध्ये 'बडोदा सेंट्रल लायब्ररी' हे ग्रंथालय सुरू केले. पुढे याच ग्रंथालयास 'मध्यवर्ती ग्रंथालय' (central library) म्हणून ओळखले जाऊ लागले. बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळीचे केंद्रस्थान म्हणून या ग्रंथालयाची ओळख निर्माण झाली. प्रारंभी हे ग्रंथालय सरकारवाड्यात होते. पुढे सन १९१० साली ग्रंथालयाच्या नवीन बांधकामात सुरुवात होऊन १९३० साली पूर्णत्वास गेले. या ग्रंथालयाची रचना भरपूर प्रकाश येईल आणि दिवसा दिवे लावावे लागणार नाहीत अशी केली होती. महाराजांनी १९११ साली आपल्या खाजगी लायब्ररीतून विविध विषयावरील निवडक २० हजार पुस्तके या ग्रंथालयाला दिली. यामुळे ग्रंथालय सर्वात मोठे ग्रंथालय म्हणून ओळखले गेले. प्रारंभी ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते १०.३० व दुपारी ४.३० ते ७.०० असे तर उन्हाळ्यात संध्याकाळी ५.०० ते ७.३० अशी वेळ असे. रविवार सुट्टीचा दिवस असे.[१५] एकंदरीत बडोदा सेंट्रल लायब्ररी ही हिंदुस्थानातील एक आदर्श लायब्ररी म्हणून नावारूपाला येण्याचे श्रेय हे महाराजा सयाजीराव गायकवाड यांना जाते. स्वतंत्र भारतात बडोदा संस्थानाचे विलीनीकरण झाल्यानंतर आज गुजरात सरकारच्या ग्रंथालय संचालनालयातर्फे हे ग्रंथालय आणि महाराजांनी उभारलेली इतर ग्रंथालय चालवली जात आहेत हे त्यांनी केलेल्या कार्याचे फलितच मानावे लागेल.

**ग्रंथालय उघडण्यासाठी आर्थिक मदत :**

विलायतेला जाऊन आल्यानंतर महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सन १९०६ सालापासून गावागावात ग्रंथालय सुरू करण्यासाठी देणग्या दिल्या. पुढे बोर्डन यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथालय उत्तम रीतीने चालावीत यासाठी नियम तयार केले. त्या नियमानुसार गावातील लोकांनी ग्रंथालय उभे करण्यासाठी जेवढी वर्गणी जमा केली. तितकी रक्कम बडोदा संस्थान आणि म्युनिसिपल बोर्डाकडून मिळेल अशी तरतूद केली. याचबरोबर ज्या ठिकाणी ग्रंथालयाकरिता इमारत बांधावयाची आहे, त्या ठिकाणाच्या ग्रंथालय चालकानी १/३ रक्कम जमा करावी व

बाकीचे रक्कम संस्थान व डिस्ट्रिक्ट बोर्ड यांच्याकडून मिळेल अशी ही तरतूद करण्यात आली. छोट्या गावांमध्ये ग्रंथालय स्थापन करायचे असल्यास तेथील लोकांसाठी शंभर रुपयांची गुजराती पुस्तके २५ रुपयांना विकत देण्याची व्यवस्था संस्थानाने केली होती. बाकीचे ७५ रुपये संस्थानाकडून दिले जात असत. सयाजीरावांनी ग्रंथालय स्थापनेसाठी आणि त्यातील पुस्तकासाठी लागणारा निधी उभा करण्यासाठी विशिष्ट पद्धतीने रचना केली. त्यामुळे सन १९३३ सालापर्यंत ४५ शहरे आणि १८१८ खेडेगावात मोफत ग्रंथालये सुमारे ७ लाख ग्रंथ आणि साधारणपणे ८० हजार वाचकासह तयार होती.[१६] ग्रंथालय धोरणामध्ये महाराजांनी नमूद केले आहे की, संस्थानभर ग्रंथालय चळवळ राबवली जावी अशी माझी इच्छा आहे. परंतु गावागावात ग्रंथालय सुरू करण्याचे धोरणासाठी राज्याच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडेल की नाही? या बाबी विचारात घ्याव्यात. यासाठी लागणारी रक्कम लहान वाटत असली तरी एकत्रित रक्कम मोठी होईल. तरीही हे काम आपणाला पूर्णत्वाला घेऊन जाणार आहोत. कारण खेड्यापाड्यात प्राथमिक शिक्षणाद्वारे दिले जाणारे ज्ञान टिकवून ठेवण्यासाठी अशी ग्रंथालये महत्त्वाची भूमिका पार पाडतील.[१७] एकंदरीत ग्रंथालय सुरू करण्यासाठी त्याच्या खर्चाचे नियोजन अतिशय व्यवस्थित करून ग्रंथालय चळवळ संस्थानात पद्धतशीरपणे रुजवली.

**गावोगावी सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना :**

खेडोपाड्यात झालेल्या प्राथमिक शिक्षण प्रसारामुळे मुले मुली शाळेत जाऊ लागल्या होत्या. गावागावात लिहिणं वाचणारांची संख्या वाढू लागली म्हणून सार्वजनिक ग्रंथालय गावोगावी स्थापन केली. ङगाव तिथे वाचनालयफ अशी मोहीम राबविली. एखाद्या गावाची लोकसंख्या, तिथे राहत असलेली कुटुंबे याची माहिती घेऊन त्या त्या ठिकाणी ग्रंथालय स्थापन केली. दुर्गम भागातील गावांमध्ये ङफिरती ग्रंथालयफ अशी संकल्पना आणली. फिरती ग्रंथालय योजना म्हणजे १५ ते ३० पुस्तके बसतील असा लाकडी बॉक्स तयार केला जात असे. कठीण परिस्थितीत हाताळता यावा म्हणून मजबूत केला जात असे. दुर्गम भागातील खेडेपाड्यात पुस्तके प्रसारित करण्यास तयार असलेल्या एखाद्या विश्वासू सुशिक्षित व्यक्तीकडे साधारणपणे एक – दोन महिन्यासाठी हे पुस्तकांचे बॉक्स दिले जात असत. पुस्तके कशी वितरित करावी याबाबत मार्गदर्शनपर सूचना व छापील फॉर्म बॉक्स वर जोडलेले असत. पुस्तके वाचण्याचे कोणतेही शुल्क घेतले जात नसे. अशा बॉक्सची ने – आण सरकार स्वतःच्या खर्चाने करत असे. फिरत्या ग्रंथालयाची योजना व्यवस्थित चालावी म्हणून अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन चर्चा केली जात असे.[१८] ज्या खेडेगावातील लोकांना पुस्तके वाचता येत नसत, त्यांच्यासाठी व्हिडिओ विज्युअल सिस्टीम किंवा प्रोजेक्टचा वापर केला जात असे अशा प्रोजेक्टर वरून चित्रपट दाखवले जात. चित्रपटांच्या मदतीने लोकांचे मनोरंजन करून इतर प्रदेश आणि विदेशातील नवनवीन माहिती चित्रपटातून लोकांच्या पर्यंत पोहोचवण्याचे काम केले जात असे.[१९] एकंदरीत याचा चांगला परिणाम जनतेवर पहायला मिळाला कारण असे चित्रपट प्रौढ लोक लहान मुले आवडीने पाहत असत.

**महिला व शिशु ग्रंथालय योजना :**

सन १९०७ साली बडोद्यातील महिला ट्रेनिंग कॉलेजमध्ये स्त्रियांसाठी ग्रंथालय स्थापन करण्यात आले पुढे हे या ग्रंथालयाचा समावेश बडोद्याच्या सेंटर लायब्ररीमध्ये करण्यात आला आणि त्यामध्ये सुधारणा करून स्त्रियांना उपयुक्त पुस्तके व मासिके त्यामध्ये ठेवण्यात आली. या ग्रंथालयाच्या माध्यमातून स्त्रियांना घरी वाचण्यास पुस्तके ही दिली जाऊ लागली.[२०] लहान मुलांना शालेय अभ्यासाबरोबरच गोष्टीच्या व इतर पुस्तकांच्या वाचनाची गोडी लागावी. मुलांची चौकस बुद्धी वाढावी म्हणून महाराजांनी सन १९१३ सालापासून बडोद्यात शिशु ग्रंथालय सुरु केली. अशा शिशु ग्रंथालयात सचित्र व मनोरंजक अशा पुस्तकांचा समावेश करण्यात आला होता. स्थानिक भाषा गुजराती आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकांचा जास्तीत जास्त भरणा होता. यासाठी सुशिक्षित बाईंची नेमणूक करून त्यांच्याकडून मुलांना गोष्टी सांगणे त्यांचे खेळ घेणे महापुरुषांची सोपी चरित्र वाचण्यास देणे अशी कामे करून घेतली जात. खेळता खेळता पुस्तक वाचनाची गोडी मुलांमध्ये निर्माण व्हावी म्हणून या ग्रंथालय योजनेच्या माध्यमातून विविध खेळांच्या योजना राबविल्या. काही वेळा शाळा व शाळेतील मुलांना आमंत्रित करून अशा मुलांना ग्रंथालयातून काही कथा सांगितल्या जात असत किंवा सिनेमे दाखवले जात असत. लहान मुलांसाठी जवळपास तीन हजार पुस्तके या शिशु ग्रंथालय योजनेअंतर्गत जमवली गेल्याचे उल्लेख मिळतात.[२१]

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अनेक ग्रंथ भाषांतरित करून सर्वसामान्य लोकांना उपलब्ध करून दिले. साहित्य ग्रंथासोबत शास्त्रीय ग्रंथ ही देशी भाषेत यावीं म्हणून प्रयत्न केले.यासाठी स्वतंत्र भाषांतर विभागाची सुरुवात केली. तसेच अमूल्य आणि दुर्मिळ अशा हस्तलिखित पोत्यांचे जतन संवर्धन व्हावे यासाठी १९२६ साली 'प्राच्य विद्यामंदिर' (Oriental institute) ची स्थापना केली. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या ग्रंथालय चळवळीबाबत कृष्णमाचारी म्हणतात, His

Highness soon realized that universal education required as an essential supplement to it a network of free public libraries which would keep literacy alive and enable men and women in rural areas to have access to sources of knowledge not hitherto open to them. He insisted that 'libraries should not limit their benefits to the English knowing readers but should see to it that their good work permeated through to the many' and that 'vernacular libraries should be encouraged' so that every citizen of the State 'may enrol himself as a pupil in the peoples university the library.[२२]

**निष्कर्ष (Conclusion) :**

एकंदरीतच महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या विद्याव्यासंगी व्यक्तिमत्त्वामुळे राज्यकारभार करताना विविध अंगी सकारात्मक बदल घडवून आणले. त्यांनी संस्थानात ज्ञान संकलन व ज्ञान प्रसार करताना ग्रंथलेखनास उत्तेजन, ग्रंथनिर्मिती, ग्रंथालयाची स्थापना, ग्रामीण वाचनालय, फिरती वाचनालय, पेटी वाचनालय, बडोदा सेंट्रल लायब्ररीची निर्मिती यासारखे अनेक प्रयोग यशस्वी केले. मुले आणि महिलांसाठी वाचनालय सुरू करून त्यांच्या आवडीनिवडी विषयीची पुस्तके वाचनालयात उपलब्ध केली. प्राथमिक शिक्षण सर्व दूर पोहोचायचे आणि चिरकाल टिकायचे असेल तर गावोगाव वाचनालय सुरू झाली पाहिजेत आणि या वाचनालयामध्ये लोकांनी पुस्तके वाचली पाहिजेत असा अट्टाहास त्यांचा होता. ग्रंथालयाच्या प्रचारासाठी अमेरिकेतील ग्रंथालय तज्ञ बोर्डन यांची केलेली नियुक्ती यावरून महाराजांची ग्रंथालय चळवळीविषयी असणारी दूरदृष्टी दिसून येते. वाचनालयाच्या प्रसारासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करताना ज्या गावांमध्ये वाचनालय सुरू होणार आहेत त्या गावातील लोकांना सहभागी करून घेण्याचे कौशल्य महाराजांच्याकडे होते हे या ग्रंथालय चळवळीतून दिसून येते. देश-विदेशातील माहिती मिळवायची असेल तर ग्रंथ वाचले पाहिजेत आणि म्हणून आपल्या संस्थानातील जनतेने ग्रंथ वाचून सजग झाले पाहिजे असे महाराजांना वाटत होते म्हणून त्यांनी ग्रंथालय चळवळीला उत्तेजन दिले. त्यांनी बडोदा संस्थानात राबवलेल्या ग्रंथालय चळवळीचे पडसाद स्वातंत्र्यपूर्व कालखंडात इतरत्रही उमटल्याचे दिसते. विशेषतः मद्रास, बंगाल, पंजाब, मुंबई या प्रांतात ग्रंथालय क्षेत्रात मोठी प्रगती झाली. ग्रंथालयीन कार्य करणारे समाजसेवक, राजकीय नेते, देणगीदार यांची मदत घेऊन ग्रंथालय उभी केली याची प्रेरणा बडोदा संस्थानातून मिळाली हे वैशिष्ट्य आहे. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत बडोदा संस्थानातील ग्रंथालय चळवळ एक आदर्शवत म्हणून मानली जाते याचे सर्व श्रेय महाराजा सयाजीराव गायकवाड यांना जाते. बडोदा सेंट्रल लायब्ररी ही हिंदुस्थानातील एक आदर्श लायब्ररी म्हणून नावारूपाला येण्याचे श्रेय हे सयाजीरावांना जाते. स्वतंत्र भारतात बडोदा संस्थानाचे विलीनीकरण झाल्यानंतरही आज गुजरात सरकारच्या ग्रंथालय संचालनालयातर्फे हे ग्रंथालय आणि महाराजांनी उभारलेली इतर ग्रंथालय चालवली जात आहेत हे त्यांनी ग्रंथालय चळवळीसाठी केलेल्या कार्याचे फलितच मानावे लागेल.

**संदर्भ (Reference) :**


१. मालकर यामाजी (संपादक), महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र संग्रह, भाग एक,पहिली आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई २०१८, पान नं.२२.

२. कित्ता, पान नं. ३८.

३. भांड बाबा, भारतीय साहित्याचे निर्माते महाराजा सयाजीराव गायकवाड, साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, २०१९, पान नं. ३.

४. पगार एकनाथ, महाराष्ट्राची शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई. २०१८, पान नं. ७७.

५. भांड बाबा, भारतीय साहित्याचे निर्माते महाराजा सयाजीराव गायकवाड, उपरोक्त, पान नं. ५९-६०.

६. पगार एकनाथ, उपरोक्त, पान नं. ९७.

७. भांड बाबा, भारतीय साहित्याचे निर्माते महाराजा सयाजीराव गायकवाड, उपरोक्त, पान नं. ५९-६०.

८. Nagar Murari Lal, Shri sayajirao Gaikwad Maharaja of Baroda, The Prime Promoters of Public Libraries, International Library Centre, Columbia, 1992, page No.12.

९. Ibid, page No.13.

१०. मेलव्हिल ड्यूई हे एक प्रभावशाली अमेरिकन ग्रंथपाल आणि शिक्षक होते. आधुनिक ग्रंथालय वर्गीकरणाचे जनक म्हणूनही त्यांना संबोधले जाते. ग्रंथालय कॅटलॉगिंगसाठी त्यांनी 'ड्यूई दशांश प्रणाली' शोधली, सामुदायिक ग्रंथालय चळवळ, खाजगी व्यक्तींना प्रवासी ग्रंथालय उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले.

ISSN No. 2394-5990

एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका , खंड ८, १९११, ड्यूई मेलविल
https://en.m.wikisource.org/wiki/1911šEncyclop%C3%-6diašBritannica/Dewey,šMelvi

११. भांड बाबा, भारतीय साहित्याचे निर्माते महाराजा सयाजीराव गायकवाड, उपरोक्त, पान नं. ५९-६०.

१२. Sayajirao III, Maharaja of Baroda, Speeches and Addresses, London, Macmillan, 1928.520p. and Nagar Murari Lal, Op.Cit, page No.35.

१३. https://ebooks.inflibnet.ac.in/lisp13/chapter/pioneers-of-public-library-movement-in-india-part-1/

१४. भांड बाबा, (संपादक) महाराजा सयाजीराव गौरव गाथा युगपुरुषाची, खंड १२ वा, पहिली आवृत्ती, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७, पान नं.११७,११८.

१५. Dutt Newton Mohun, The Library System of The Baroda State, Third Edition, Central Library, Baroda, 1924,Page No.4.

१६. भांड बाबा (संपादक), महाराजा सयाजीराव गौरव गाथा युगपुरुषाची, उपरोक्त, पान नं.१२१, १४४.

१७. Nagar Murari Lal, Op.Cit, Page No.42.

१८. Dutt Newton Mohun, Op.Cit, Page No.20.

१९. पगार एकनाथ, उपरोक्त, पान नं.१००.

२०. भांड बाबा (संपादक), महाराजा सयाजीराव गौरव गाथा युगपुरुषाची, उपरोक्त, पान नं.१२०.

२१. Dutt Newton Mohun, Op.Cit, Page No.14.

२२. Ibid,191 pp. xxi. and Nagar Murari Lal, Op.Cit, Page No.36.

■■■

# महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणाविषयक विचार

**डॉ. उर्मिला महेश चव्हाण**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
मिरज महाविद्यालय मिरज.
drumchavangmail.com, Mob No.9420791944

**सारांश :**

प्रस्तुत शोध निबंध महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणा विषयक विचार असा असून प्रस्तुत शोधनिबंधात बडोदा संस्थानात महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे. बडोदा संस्थानातील सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक कृषी विषयक याबाबत कोणकोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे हे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी जाणून घेतले आणि त्यावर उपाययोजना कशा केल्या आहेत याविषयी संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे . प्रस्तुत शोधनिबंधात संशोधन विषयाचा उद्देश, संशोधन पद्धती, संशोधन समस्या स्पष्ट केलेली आहे. संशोधन करताना प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा बडोदा संस्थानावरच नव्हे तर त्याचा परिणाम हिंदुस्तान वर झालेला होता. या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करता असे म्हणता येईल की, महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आयुष्यभर लोककल्याणाचा जनसेवेचा ध्यास घेतला होता. ते गरीब, दलित, वंचित जनतेचा आधार होते. महाराज शेतकऱ्यांचे , स्त्रियांचे उद्धार कर्ते होते. बडोदा येथील राजा व प्रजा यांच्यातील अंतर नाहीसे करून त्यांनी प्रजेशी एकरूप होण्याचा प्रयत्न केलेला होता.

**प्रस्तावना :**

आयुष्यभर लोकसेवेचा आणि जनकल्याणाचा ध्यास घेऊन सुप्रशासन निर्माण करण्यासाठी झटणारा आदर्श राजा म्हणजे महाराज सयाजीराव गायकवाड होय. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणाविषयक विचार असा आहे प्रस्तुत शोधनिबंधात सयाजीराव गायकवाड महाराज यांनी बडोदा संस्थानात कोणकोणत्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सुधारणा केल्या आणि प्रजेचा जनकल्याणार्थ करण्यात आलेल्या सामाजिक कार्याचा संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल

१. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा संस्थानाचा अभ्यास करणे
२. बडोदा संस्थानातील तत्कालीन सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे
३. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे
४. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या आरोग्य विषयक शैक्षणिक विषयक सुधारणांचा अभ्यास करणे
५. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या राजकीय सुधारणांचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे त्याचबरोबर वर्णनात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे.

महाराज सयाजीराव गायकवाड हे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला बडोदा संस्थानचे राजे होऊन गेले. त्यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील काळवान गावात १८६३ साली झाला. त्यांनी १० एप्रिल १८७५ रोजी बडोदा राज्याची सूत्रे हाती घेतली. ६ फेब्रुवारी १९३९ पर्यंत ते राजपदावर होते. सयाजीराव महाराज यांनी ६४ वर्षे राज्य केले.

बडोदा संस्थांन च्या राजगादीवर आल्यानंतर १८७५ ते १८८१ पर्यंत महाराजांचे शिक्षण झाले. या काळात टी माधवराव बडोदा संस्थानचे दिवाण होते. ते राज्यकारभार पाहत होते. त्यांच्या लक्षात आले की बडोदा संस्थानाची घडी विस्कटलेली आहे. बडोद्यात ७७ लक्ष इतक्या रुपयांची लूट आढळली.

 ISSN No. 2394-5990

संस्थानाच्या हिशेबात अनेक त्रुटी होत्या. संस्थानाच्या मालमत्तेच्या सुवर्ण अलंकारांच्या नोंदी नव्हत्या. संस्थानाने सावकाराचे घेतलेले कर्ज वेळोवेळी परत केलेले नव्हते. बडोदा संस्थानात जनतेच्या अनेक समस्या होत्या. यात जनतेचे आरोग्य, पिण्याचे पाणी, गरिबांना वेठीस धरणे, महसुलीच्या अयोग्य पद्धतीने वसुली करणे, निरक्षरता अशा अनेक समस्या बडोदा संस्थानात होत्या. टी माधवराव यांनी १९७५ ते १९८१ पर्यंत बडोद्याचा राज्यकारभार पाहिला दरम्यान या काळात महाराज सयाजीरावांना शिकविण्यासाठी इंग्रज अधिकारी सर एलियट यांची शिक्षक म्हणून नियुक्ती केली महाराज सयाजीराव अत्यंत हुशार व चाणाक्ष होते. त्यांनी शिक्षण ग्रहण करण्यास सुरुवात केली. शिक्षणात त्यांनी चांगली प्रगती केली. सर इलियट आणि महाराज सयाजीराव गायकवाड यांच्यात गुरु शिष्याचे जिव्हाळ्याचे नाते तयार झाले होते. महाराज सयाजीराव यांना चार भाषा अवगत केल्या त्याचबरोबर राजशिष्टाचार ,घोड्यावर रपेट, व्यायाम इत्यादी गोष्टी महाराज शिकत होते. बडोद्याचे सयाजीराव महाराज बारा वर्षाचे असताना बडोद्याच्या राजगादीवर १८७५साली बसले. पुढे ६४ वर्षे बडोद्याचा राज्यकारभार केला. राज्य कारभार करताना त्यांनी सतत जनकल्याणाचा ध्यास घेतला. १८७१ पर्यंत सहा वर्षे राज्य प्रशासनाचे शिक्षण घेतले, १८८१ साली प्रत्यक्षात राज्यकारभार त्यांच्या हातात आला. बडोद्याचा राज्यकारभार हातात येताच महाराजांनी राजा आणि रयतेच्या संवादासाठी पहिला दौरा कडी प्रांताचा केला. शाळा कचऱ्या तपासल्या. शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्यानंतर नवसारी, अमरेली, बडोदा भागाचे दौरे केले. बडोद्यात त्याकाळी रस्ते नव्हते. घोड्यावर व हत्तीवर बसून महाराजांनी दौरे केले. बडोदा संस्थानातील जनतेच्या समस्या जाणून घेतल्या त्याच्या नोंदी त्यांनी वहीत घेतल्या.[१] बडोदे शहरात जनतेच्या पाण्याचा प्रश्न, शेती, उद्योगा बाबतीतील प्रश्न, शिक्षण, आरोग्य, स्त्रियांचे प्रश्न अशा अनेक समस्या होत्या.

सयाजीराव गायकवाड महाराजांनी शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे हे ओळखले होते कारण महाराज स्वतः कवळण्यासारख्या छोट्या खेडेगावातून आले होते. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळले होते. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी राज्यसत्तेवर येताच जनतेला शिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. इसवी सन १८८२ साली अस्पृश्य आदिवासी लोकांसाठी सरकारी खर्चाने शिक्षण देण्याचा हुकूम काढला. मागासवर्गीय वंचित समाजाच्या विकासासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय होता. त्यानंतर त्यांनी स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न सुरू केले. त्यासाठी त्यांनी आपल्या घरापासून सुरुवात केली. महाराणी चिमणाबाई (दुसऱ्या) यांना शिक्षणाचे धडे दिले. स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी मुलींसाठी बडोदा येथे शाळा स्थापन केल्या. बडोद्यामधील जनतेस शिक्षण देण्याचे उच्च ध्येय त्यांनी उराशी बाळगले. बडोदा येथे १८८० साली शाळांची संख्या १८० होती परंतु महाराजांनी स्वतः शिक्षणातील प्रगतीसाठी लक्ष घातले. १८८९-९० साली ही संख्या ४४४ इतकी झाली. यातील ३५ शाळा मुलींसाठी होत्या यात ४०६१९ मुले ३१४५ मुली शिक्षण घेत होत्या.[२] ग्रामीण भागातील जनतेमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी १८९१ साली प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले महाराजांच्या आदेशाने प्राथमिक शिक्षणासाठीचा कायदा तयार करण्यात आला. हा कायदा प्रथम अमरेली प्रांतात फक्त अमरेली शहर व अमरेली तालुक्यातील नऊ गावांना लागू करण्यात आला. त्याचबरोबर मुलींच्या शाळेतील स्त्री शिक्षकांचा प्रश्न निर्माण झाला होता. तेव्हा महाराजांनी १८८२ साली Training College for women स्थापन केले होते.

बडोदे संस्थांच्या महाराणी चिमणाबाईंनी स्त्री उन्नतीसाठी सतत प्रयत्न केला. १८७५ साली दोन कन्या शाळा स्थापन केल्या. बडोद्याच्या महाराज सयाजीराव गायकवाड यांची ज्ञान लालसा खूप मोठी होती. मराठी साहित्याबद्दल त्यांना प्रचंड अभिरुची होती. त्यांनी १९०९ व १९२१ साली दोन वेळा साहित्य संमेलने भरवली. १८९० साली त्यांनी मो.रो. रानडे, दि. बा. समर्थ, खासेराव जाधव यांच्या मदतीने सहविचारानी सभा स्थापन केली. आज ही संख्या महत्त्वाच्या वाङ्मय संस्थात अग्रेसर मानली जाते.[३] सयाजीराव गायकवाड महाराजांनी दलित आदिवासी मुलांसाठी मोफत शिक्षणाची सोय केली शिष्यवृत्ती शैक्षणिक साहित्य गणवेश विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वस्तीगृहाची सोय इत्यादी सोयी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिल्या देशाची आर्थिक उन्नती होण्यासाठी आधुनिक अभ्यासक्रमाची सुरुवात केली यात त्यांनी औद्योगिक व शास्त्रीय अभ्यासक्रमाचे महत्त्व ओळखून त्या पद्धतीने ज्ञान देण्याची व्यवस्था केली. त्यासाठी १८९०साली कला भवन या संस्थेची स्थापना करून मेकॅनिकल सिव्हिल इंजीनियरिंग तसेच टेक्सटाईल आर्किटेक्चर कृषी हे विषय शिकविले जाण्याची सोय केली शिक्षण व सुधारणा यांचा अतूट संबंध आहे हे स्पष्ट करताना महाराज सयाजीराव गायकवाड महाराज म्हणतात, Education is the basis of reforms and is the only way to salvation from our present problems. यापुढे ते म्हणतात, ''जोपर्यंत प्रत्येक खेड्यात शाळा स्थापन केली जात नाही आणि लोकांच्या घराच्या उंबरठ्यापर्यंत शिक्षण नेले जात नाही तोपर्यंत आपल्या कोणत्याही प्रश्नाची सोडवणूक होणार नाही.''[४] महाराज सयाजीराव गायकवाड यांनी १८८१ साली बडोदा कॉलेज ऑफ

सायन्स ची स्थापना केली होती पुढे इसवी सन १९४९ साली त्याला विद्यापीठाचा दर्जा मिळाला आणि ते महाराज सयाजीराव गायकवाड विद्यापीठ म्हणून नावारूपास आले.[५] पुढे या विद्यापीठातून अनेक कलाकार, शास्त्रज्ञ, राजकीय तत्वज्ञ नेते म्हणून नावारूपास आले आहेत उदाहरणार्थ विनोबा भावे, सॅम पित्रोदा, न्यायमूर्ती मोहित शहा, न्यायमूर्ती बेला त्रिवेदी ,(सर्वोच्च न्यायालय), चिमणभाई पटेल, दादासाहेब फाळके भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक इ. विभूतींनी या विद्यापीठातून शिक्षण घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सयाजीराव गायकवाड महाराज यांनी स्कॉलरशिप देऊन कॉन्स्टिट्यूशन लॉ च्या अभ्यासासाठी परदेशी पाठविले होते. अमेरिकेत त्यांनी अभ्यास करून पीएच.डी ची पदवी प्राप्त केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सयाजीराव गायकवाड महाराजांनी सातत्याने आर्थिक मदत केली होती. बाबासाहेब आंबेडकरांनी बडोदा संस्थानात काही काळ नोकरी केली. महाराजांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना उच्चशिक्षणासाठी चार वेळा स्कॉलरशिप दिलेली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि सयाजीराव गायकवाड महाराज यांचे संबंध घनिष्ठ होते. विठ्ठल रामजी शिंदे यांनी महाराज सयाजीराव गायकवाड यांना २६ सप्टेंबर १९०९ रोजी पुणे येथील शाळेच्या बक्षीस समारंभात बोलावले होते. अस्पृश्य मुलांच्या शिक्षणासाठी विठ्ठल रामजी शिंदे जे काम करीत होते त्याचे पुण्यातील कार्यक्रमात महाराज सयाजीराव गायकवाड यांनी कौतुक केले. त्यांनी बडोदा संस्थानातील शालेय परिस्थितीचे वर्णन करताना सांगितले बडोदा संस्थानात अस्पृश्यांसाठी सध्या ३३५ शाळा आहेत आणि यात हजारो मुले शिक्षण घेत आहेत. त्यांच्या मते सर्व जाती समान दर्जाच्या आहेत आणि मला अस्पृश्य लोकांसाठी दलित शब्द म्हणणे आवडत नाही.[७]

२३ मार्च १९१८ रोजी अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद भरली होती. या परिषदेचे आयोजन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व नारायण चंदावलकर यांनी केले होते. या परिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याकडे होती. या परिषदेत अनेक मान्यवर उपस्थित होते. उदाहरणार्थ ॲनी बेझंट, दादासाहेब खापर्डे, सर भांडारकर बॅरिस्टर, मुकुंदराव जयकर इत्यादी. अध्यक्षीय भाषणात महाराज सयाजीराव गायकवाड म्हणाले, अस्पृश्यता निवारण हा माझ्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे याबाबत बडोदे येथे मी अनेक उपाययोजना केल्या आहेत. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी ज्या शाळा बडोदा येथे सुरू केल्या आहेत यात हिंदू सवर्ण शिक्षक चांगले वेतन देऊनही शिकविण्यास तयार नाहीत. मुस्लिम व ख्रिश्चन शिक्षकांची नेमणूक केली आहे. माझ्या प्रयत्नांना यश येण्यासाठी प्रजेचे सहकार्य आवश्यक आहे.[८] अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी बडोदा संस्थानात बडोदा, पाटणा, अमरेली, महुआ याठिकाणी महाराजांनी वस्तीगृह सुरू केली या वस्तीगृहात विद्यार्थ्यांना भगवद्गीतेचे पाठ दिले जात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना स्वावलंबन समाजसेवा स्वच्छता यांचेही धडे दिले जात होते.सयाजीराव महाराजांवर महात्मा ज्योतिबा फुले यांचा प्रभाव होता. महात्मा ज्योतिबा फुले व महाराज सयाजीराव गायकवाड हे वर्षातून १०-१५ दिवस एकत्र येत असत. महात्मा फुले बडोद्यास वरचेवर जात असत. महाराजांनी १९८२-८३ झाली ग्रंथालय, दवाखाने अस्पृश्यांसाठी खुली केली. खाजगी खंडोबाचे मंदिर खुले केले. महात्मा फुले यांच्या अस्पृशोद्धाराच्या कार्याबाबत महाराज सयाजीराव गायकवाड म्हणतात, ''अमेरिकेत निग्रो लोकांच्या उद्धारासाठी बुकर टी वॉशिंग्टन ज्याप्रमाणे प्रयत्न करत होते त्याचप्रमाणे हिंदुस्तानात महात्मा ज्योतिबा फुले कार्य करीत आहेत.''

सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानात अनेक सामाजिक सुधारणा केल्या घोषा बंदी, घटस्फोटांचा कायदा, दत्तक घेण्याविषयी चा कायदा, मुलींच्या वडिलांच्या संपत्तीत हक्क मिळवण्याचा कायदा, बालसंरक्षक कायदा, १९१५ चा जैन धर्मियांसाठीचा दीक्षा कायदा, मुस्लिमांसाठी वक्फ कायदा असे अनेक कायदे सयाजीराव महाराजांनी केले.[९] त्याच बरोबर महाराजांनी चार महत्त्वपूर्ण कायदे केले. जाती अस्पृश्यता निवारण कायदा १८५०, हिंदु पुनर्विवाह कायदा १८५६, विशेष विवाह कायदा १८७२, बालविवाह प्रतिबंधक कायदा,१९२९. इत्यादी.

महाराज सयाजीराव गायकवाड शेतकऱ्याचा मुलगा असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांबद्दल आस्था होती. त्यांनी शेतीमध्ये नवनवीन सुधारणा करण्यासाठी सतत प्रयत्न केले. महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतल्यानंतर शेत सारा ठरविण्याची पद्धत पूर्णपणे बदलली. शेत साऱ्याच्या अन्यायकारक वसुली पद्धतीत बदल करून शेतसारा वसुलीसाठी तज्ञ व्यक्तींची नेमणूक केली. १९०९ साली आपल्या राज्यात स्वतंत्र कृषी खाते निर्माण केले.

कृषी शिक्षण संस्था निर्माण केल्या. दुष्काळात शेतकऱ्यांचे हाल होतात यासाठी दुष्काळ निवारण यंत्रणा उभी केली शेतीपूरक उद्योगांना प्राधान्य दिले. १९०० साली बडोदा संस्थानात मोठा दुष्काळ पडला होता. त्यांनी त्यावेळी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अनेक उपाययोजना केल्या शेतकऱ्यांचा शेतसारा माफ केला. कृषी खात्याचे प्रमुख खासेराव जाधव दुष्काळ निवारण अधिकारी रामचंद्र धामणकर यांच्यासोबत महाराजांनी घोड्यावरून आणि

बैलगाडीने आपल्या संस्थानाचा दौरा केला लोकांचे नुसते हाडाचे सापळे आणि दैन्यवस्था पाहून महाराजांनी दुष्काळ निवारणाचा आदेश दिला. गावो गावी नव्या विहिरी खोदल्या, तलावाची कामे केली, ओढ्यावर मातीचे बांध टाकून पाणी अडवण्याची व्यवस्था केली. तीन महिन्यात ४७ लाख रुपयांची कामे मंजूर केली या दुष्काळाचे संकट एवढे भीषण होते की चार लाख साठ हजार माणसे आणि आठ लाख ५० हजार गुरे ढोरे मृत्युमुखी पडली होती. याचा मुकाबला महाराजांनी धिराने केला.

महाराजांनी १८८४ साली बडोद्या जवळ 'आजवा' येथे तलाव बांधण्याचे काम सुरू केले होते. १८८१ साली बडोदा शहरास नळाने पाणीपुरवठा सुरू केला. त्याचबरोबर पाटण, सोनगड, भाद्रण, हिराणारा कादरपूर, जामगीर, घाटवड येथे टप्प्याटप्प्याने पाण्याच्या योजना पूर्ण केल्या.१९०० साली ओरसांग पाटबंधारे चे काम करून घेतले.[१०]

महाराज सयाजीराव गायकवाड एखाधिकारशाही कडून लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करीत होते. प्रजासत्ताक लोकशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण या विचारांचे महाराज होते. ज्या शासनात लोकांचा सहभाग असतो तेच शासन सर्वश्रेष्ठ असते असे त्यांचे स्पष्ट मत होते. गावातील लोकांच्या गरजा आपल्या जरुरीप्रमाणे पूर्ण करता याव्यात यासाठी पंचायत राज्याची स्थापना करण्यात आली होती महाराजांच्या मते यामध्ये लोकांनी लक्ष दिले पाहिजे कारण लोकांच्या हितासाठीच या पंचायतींची स्थापना केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था विषयी महाराजांनी हुजूर हुकूम काढले. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी त्यांची कार्यपद्धती, स्थानिक स्वराज्य संस्थांची कामे याविषयीची तरतूद केलेली होती. त्यांच्या मते राज्यातील लोकांशिवाय रयतेतील चांगल्या लोकांची नेमणूक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकार पदावर केली पाहिजे.[११] स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधी तज्ज्ञ व प्रशिक्षित लोकांचे हित जपणारे असावेत. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी १९०२ साली आपल्या राज्यात ग्रामपंचायतीचा कायदा केला होता. यामध्ये ग्रामपंचायतींना लोकशाहीचे अधिकार दिले होते. पंचायतीत ९ ते १२ सदस्य असतील. पंचायतीचा उमेदवार किमान चौथी पर्यंत शिकलेला असेल, ग्रामपंचायत मार्फत गावाचा कर ठरविला जाईल, गावातील तंटे तसेच दिवाणी फौजदारी गुन्हे पाहणे, आरोग्य, पाणीपुरवठा याबाबतीत व्यवस्थापन इत्यादी कामे ग्रामपंचायत करीत होती. एकंदरीत स्वातंत्र्यपूर्व काळातच खऱ्या प्रजासत्ताक पद्धतीची पायाभरणी महाराष्ट्र सयाजीराव गायकवाड यांनी केलेली होती.

बडोदा संस्थानाची विस्कटलेली आर्थिक घडी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी व्यवस्थित बसविली. संस्थानाचा राज्यकारभार करताना त्यांनी उत्पन्न वाढीसाठी काही मार्ग सुचविले. यात व्यापारास उत्तेजन देणे, शेतीचे उत्पन्न वाढविणे, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणे, जंगल संपत्तीत वाढ करणे, जनतेसाठी पतपेढी निर्माण करणे, व्यवस्थित कर आकारणी करणे, हिशोब व्यवस्था ठेवणे, बचत बँकांची निर्मिती करणे इत्यादी.

महाराजांच्या ठायी कमालीची आर्थिक शिस्त, काटकसर, बचतीची सवय होती. राज्याचा खर्च लक्षात घेता वार्षिक १५ लाखाची बचत त्यांना अपेक्षित असायची. महाराजांनी ङ्गबँक ऑफ बडोदाफची स्थापना १९०८ साली केली होती. त्यांची दुसरी शाखा १९१० साली अहमदाबाद येथे सुरू केली. आज बँकेच्या भारतात आणि भारताबाहेर युगांडा ,युनायटेड किंगडम, लंडन येथे विविध शाखा यशस्वी रित्या कार्यरत असलेल्या दिसतात.[१२]

हिंदुस्थानात उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी महाराज सयाजीराव सतत प्रयत्नशील असायचे. महाराजांनी उद्योग उभारणीसाठी जमशेदजी टाटांना वेळोवेळी मदत केली होती. जमशेदजी टाटा यांनी आयर्न अँड स्टील कारखाना सुरू केला तेव्हा महाराजांनी त्यांना अनेक प्रकारे मदत केली. त्यावेळी टाटांना ब्रिटिशांनी अनेक प्रकारे त्रास दिला होता. तेव्हा सयाजीराव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. कारखानदारी वाढू लागली तेव्हा उद्योगपतींच्या वास्तव्यासाठी तारांकित हॉटेलची गरज आहे हे महाराजांनी जाणले आणि जमशेदजी टाटांना मुंबईमध्ये तारांकित हॉटेल सुरू करण्यास सांगितले. तेव्हा जमशेदजी टाटांनी आशिया खंडातील उच्च सुख सोयींनी युक्त असे एक दर्जेदार हॉटेल १९०४ मध्ये सुरू केले ते म्हणजे हॉटेल 'ताजमहल' होय.

महाराज सयाजीराव गायकवाड व कोल्हापूर संस्थानाचे शाहू महाराज या दोन्ही राजांनी समाज सुधारण्याचे कार्य केले होते या दोघींनीही ब्रिटिश सरकारशी संयमाने वागून सतत आपल्या जनतेच्या कल्याणाचाच विचार केला होता. एकंदरीत महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात सामाजिक सुधारणांच्या चळवळीला गती दिली. त्यांनी शिक्षण, जाती संस्था, अस्पृश्यता ,धार्मिक विधी इत्यादी बाबत कायदे करून सामाजिक सुधारणा केल्या.

सयाजीराव गायकवाड महाराजांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त मानपत्राच्या उत्तरा दाखल महाराजांनी पुढील संदेश दिला, माझ्या दीर्घ कारकिर्दीत मी अनुभवाने कोणती गोष्ट शिकलो असेल तर समाजसेवा हेच माझे ध्येय आहे. हे ध्येय दुष्कर आहे. याची मला पूर्ण जाणीव आहे. किंबहुना संपूर्णपणे कोणत्याही व्यक्तीस आज पर्यंत ते साध्य झाले आहे

असे क्वचितच म्हणता येईल. तथापि त्याच्या इतके उदात्त असे दुसरे ध्येय नाही

**निष्कर्ष :**

महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक शैक्षणिक आर्थिक राजकीय कार्याचा संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास केला असता असे म्हणता येईल की, महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या बडोदे संस्थानातील जनतेसाठी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, कृषी विषयक सुधारणा केल्या. महाराजांनी दुष्काळा निमित्त जेव्हा बडोदे संस्थान चा दौरा केला आणि त्यावेळी महाराज आणि बडोदा संस्थानातील प्रज्ञा यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. सयाजीराव महाराजांनी तेव्हापासून शैक्षणिक सुधारणांची सुरुवात केली त्यामुळे बडोदा संस्थानच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. सयाजीराव गायकवाड महाराजांनी दलित उद्धाराचे कार्य केले व सामाजिक संस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी त्याच बरोबर स्त्रियांसाठी शाळा सुरू करून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबर शिक्षण तर दिलेच परंतु त्याचबरोबर बालविवाह बंदीचा कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, पडदा पद्धती बंदी, वडिलांच्या संपत्तीत मुलींना हक्क मिळणे, जैन धर्मि यांसाठी दीक्षा कायदा असे अनेक सामाजिक सुधारणा विषयक कायदे केले. बडोदा संस्थानातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा अभ्यास करून पाण्याच्या विविध योजना सुरू केल्या. अजवासारखे धरण बांधले, दुष्काळ निवारणासाठी उपाय योजना केल्या. आर्थिक व उद्योग धंद्याबाबत प्रगती केली.

महाराज सयाजीराव गायकवाड यांच्यावर विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिष्यवृत्ती देऊन परदेशी उच्च शिक्षणासाठी पाठविले होते. त्याचबरोबर खासेराव जाधव यांनाही कृषी खात्याचा अभ्यास करण्यासाठी परदेशी पाठवले होते. महाराजांना मनापासून शिक्षणाविषयी आच होती.

एकंदरीत महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास केला असता असे म्हणता येईल की, आजही भारतात जनतेचे अनेक प्रश्न आहेत शेतकऱ्यांचे, स्त्रियांचे, राज्यातील सुविधा बाबतचे त्याच बरोबर गरिबी ,बेकारी इत्यादी. यासाठी महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या कृतीचा आणि विचारांचा प्रभाव आजच्या राज्यकर्त्यांवर पडणे गरजेचे आहे तत्कालीन परिस्थितीत राजेशाही असतानाही महाराज सयाजीरावांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यांना चांगली गती दिली होती. ते खऱ्या अर्थाने लोकशाहीचे समर्थक होते. महाराज सयाजीराव गायकवाड एकाधिकारशाहीकडून लोकशाहीकडे वाटचाल करीत होते.

**संदर्भ :**


१. भांड बाबा-काळापुढे दृष्टी असलेला लोकशाही राजा सयाजीराव गायकवाड, संपादक बाबा भांड, महाराज सयाजीराव गौरव गाथा युगपुरुषाची, चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद., प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक, ३६.

२. लेले भालचंद्र-बडोदे राज्यातील प्राथमिक शिक्षण, संपादक बाबा भांड, महाराज सयाजीराव गायकवाड चरित्र साधने, प्रकाशन समिती, औरंगाबाद. पृष्ठ क्र.७१

३. कर्वे चिंतामण-सयाजीराव गायकवाड महाराज आणि ग्रंथोत्तेजन, पृष्ठ क्र.११५

४. भांड बाबा-काळापुढे दृष्टी असलेला लोकशाही राजा सयाजीराव गायकवाड, संपादक बाबा भांड, महाराज सयाजीराव गौरव गाथा युगपुरुषाची, चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद., प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक, १७७.

५. https://msubaroda.ac.in

६. https:en.wikipedia.org/wiki/list of msub

७. श्री सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड दुसरा, दामोदर यंदे आणि मंडळ, मुंबई, १९३७.

८. महाराज सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह भाग दोन, संपादक-रमेश वरखेडे, पहिली आवृत्ती, २०१७, पृष्ठ क्रमांक, २८.

९. https://www.tv9matathi.com

१०. भांड बाबा-महाराज सयाजीराव गायकवाड आणि त्यांनी दुष्काळ निवारणासाठी केलेली कामे, संपादक, बाबा भांड, महाराज सयाजीराव गायकवाड चरित्रे साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद. पृष्ठ क्र २८८

११. हुजूर हुकूम-सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, २०१३, पृष्ठ क्रमांक ५४,५५

१२. https://www.bankofbaroda.in

१३. https://www.loksatta.com/novneet/sayajirao gaekwadšinspiredšjamsetji-tata.


■■■

 ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड: सामाजिक जबाबदारीचे दीपस्तंभ

**प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख,
आर्टस् अंड कॉमर्स कॉलेज, आष्टा,
ता.- वाळवा, जि. सांगली. ४१६३०१
मोबाईल नंबर : ९९६०१६२६७४

**Abstract (गोषवारा) :**

ब्रिटीश भारतातील बडोदा संस्थानाचे तत्कालीन शासक महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक जबाबदारीच्या अतूट बांधिलकीतून भारतीय इतिहासावर अमिट छाप सोडली. १८७५ ते १९३९ पर्यंतची त्यांचा कारकीर्द जात, पंथ किंवा धर्माचा विचार न करता त्यांच्या प्रजेच्या कल्याणासाठी आणि उन्नतीसाठी अटल वचनबद्धतेने चिन्हांकित होते. हा संशोधन लेख १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शिक्षण, आरोग्यसेवा, महिलांचे हक्क आणि सामाजिक सुधारणांमध्ये त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानावर प्रकाश टाकणारा, त्यांच्या जीवनाचा आणि वारशाचा अभ्यास करतो. ऐतिहासिक नोंदी, अधिकृत दस्तऐवज आणि अभ्यासपूर्ण कामांच्या व्यापक परीक्षणाद्वारे, या लेखाचा उद्देश महाराजा सयाजीरावांच्या परोपकार, शासन आणि पुरोगामी धोरणांच्या बहुआयामी आयामांवर प्रकाश टाकणे आहे, ज्याने त्यांना भारतीय समाजात सामाजिक जबाबदारीचे दीपस्तंभ म्हणून स्थान दिले.

**प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड १८७५ मध्ये बडोद्याच्या सिंहासनावर आरूढ झाले जेव्हा भारतामध्ये ब्रिटीश वसाहतवादी राजवटीत गंभीर सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बदल होत होते. औपनिवेशिक काळातील आव्हाने असतानाही, महाराजा सयाजीराव यांनी समाजातील उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी परिवर्तनाचा प्रवास सुरू केला. त्यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि सामाजिक जबाबदारीची अटल बांधिलकी यामुळे त्यांच्या प्रजेचे जीवन सुधारण्याच्या उद्देशाने अनेक सुधारणा आणि उपक्रमांचा मार्ग मोकळा झाला. ज्याने लोकांच्या कल्याणासाठी खोलवर पायाभूत गुंतवणूक केली होती. महाराजा सयाजीराव यांची सामाजिक उत्तरदायित्वाची बांधिलकी ही केवळ परोपकारी भूमिका नव्हती तर त्यांच्या शासन आणि निर्णय प्रक्रियेला मार्गदर्शन करणारे एक मुलभूत रुजलेले तत्व होते.

**शिक्षण:**

महाराजा सयाजीरावांचा सर्वात चिरस्थायी वारसा म्हणजे त्यांचे शिक्षणातील योगदान. त्यांनी अनेक शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालये स्थापन करून समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. स्त्री शिक्षणावर त्यांचा भर विशेषतः क्रांतिकारक होता, प्रचलित नियमांना आव्हान देत आणि स्त्रियांना जीवनात स्वतःचा मार्ग तयार करण्यासाठी सक्षम बनवणारा होता.

**शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याचे काही प्रमुख पैलू असे आहेत:**

१. **शैक्षणिक संस्थांची स्थापना:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्यात असंख्य शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात मोलाची भूमिका बजावली. १८८१ मध्ये बडोदाच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाची (पूर्वी बडोदा कॉलेज म्हणून ओळखले जाणारे) स्थापना हे त्यांच्या सर्वात महत्त्वपूर्ण योगदानांपैकी एक होते. या संस्थेने विविध क्षेत्रातील उच्च शिक्षण आणि संशोधनाचे केंद्र म्हणून त्वरीत महत्त्व प्राप्त केले.

२. **मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा प्रचार:** सामाजिक प्रगती आणि वैयक्तिक सक्षमीकरणासाठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या राज्यात मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपक्रम सुरू केले. प्रत्येक मुलाला, त्यांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी काहीही असो, त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी धोरणे राबवली.

३. **तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करा:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये सुसज्ज करण्यासाठी तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या महत्त्वावर भर दिला ज्यामुळे ते अर्थव्यवस्थेत प्रभावीपणे योगदान देऊ शकतील. त्यांनी ललित कलांच्या प्रशिक्षणासाठी कलाभवन आणि वैज्ञानिक शिक्षणासाठी बडोदा कॉलेज ऑफ सायन्स सारख्या संस्था स्थापन केल्या.

४. **स्त्री शिक्षणाला पाठिंबा:** महाराजा सयाजीराव गायकवाड हे स्त्री शिक्षणाचे एक भक्कम पुरस्कर्ते होते ज्या काळात अनेकदा दुर्लक्ष होत असे. हुशार मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यासाठी त्यांनी कन्या कुबचंद प्रतिभा निधीची स्थापना केली. याव्यतिरिक्त, त्यांनी मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी १८८७ मध्ये महाराणी गर्ल्स हायस्कूलची स्थापना केली.

५. **स्थानिक भाषा आणि संस्कृतीला प्रोत्साहन:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्याचे महत्त्व ओळखले. त्यांनी स्थानिक भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा अभ्यास आणि संवर्धनासाठी संस्था स्थापन करण्यास पाठिंबा दिला, ज्यामुळे त्यांच्या राज्यातील लोकांमध्ये अभिमान आणि ओळख निर्माण झाली.

६. **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाला पाठिंबा:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाला पाठिंबा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. १९०८ मध्ये, महाराजा सयाजीराव यांनी तरुण भीमराव रामजी आंबेडकर यांना न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली. आंबेडकरांसाठी ही शिष्यवृत्ती एक महत्त्वाची संधी होती, कारण यामुळे त्यांना अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी आणि डॉक्टरेट मिळवता आली, ज्यामुळे भारतीय समाजासाठी त्यांच्या भविष्यातील योगदानाचा पाया घातला गेला.महाराजा सयाजीराव यांनी आंबेडकरांच्या शिक्षणाला दिलेला पाठिंबा हे एक प्रगतीशील पाऊल म्हणून पाहिले जाते, विशेषत: त्या काळात दलित समाजासमोरील सामाजिक आणि आर्थिक आव्हानांचा विचार करता. त्यांच्या पाठिंब्यामुळे आंबेडकरांना शिक्षण आणि संधी मिळण्यास मदत झाली जी त्यांच्या पार्श्वभूमीतील एखाद्या व्यक्तीला मिळणे कठीण होते.

एकूणच, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणातील योगदान हे त्यांची दूरदृष्टी, सामाजिक समतेची बांधिलकी आणि सर्वांगीण विकासावर भर देणारे वैशिष्ट्य होते. त्यांच्या पुढाकाराने भारतातील आधुनिक शिक्षण पद्धतीचा पाया घातला गेला आणि आजही शैक्षणिक सुधारणांना प्रेरणा देत आहे.

**आरोग्य सेवा:**

महाराजा सयाजीरावांच्या आरोग्यसेवेसाठीच्या वचनबद्धतेचे उदाहरण त्यांच्या संपूर्ण राज्यात रुग्णालये, दवाखाने आणि स्वच्छता सुविधांच्या स्थापनेद्वारे दिसून आले. त्यांनी महामारीचा सामना करण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी सक्रिय उपाययोजना केल्या, निरोगी आणि अधिक लवचिक समाजाचा पाया घातला. सार्वजनिक आरोग्यावरील त्यांच्या कार्याचे काही प्रमुख पैलू येथे आहेत:

१. **आरोग्यसेवा संस्थांची स्थापना:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्यातील लोकांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी आरोग्य सेवा संस्था स्थापन करण्यासाठी सक्रिय पावले उचलली. १९०८ मध्ये बडोदा मेडिकल कॉलेजची स्थापना हा एक उल्लेखनीय उपक्रम होता, जो नंतर सर सयाजीराव जनरल हॉस्पिटलमध्ये विकसित झाला. हे रुग्णालय आरोग्य सेवा आणि वैद्यकीय शिक्षण देणारी पश्चिम भारतातील एक प्रमुख वैद्यकीय संस्था बनले.

२. **स्वच्छता आणि स्वच्छता सुधारणे :** रोग टाळण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याला चालना देण्यासाठी स्वच्छता आणि स्वच्छतेचे महत्त्व ओळखून, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्यात स्वच्छता पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी उपाययोजना लागू केल्या. त्यांनी रहिवाशांना सुरक्षित पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्वच्छ पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी विल्हेवाट सुविधा आणि सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी मोहिमा सुरू केल्या.

३. **वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनासाठी समर्थन:** महाराजा सयाजीराव गायकवाड हे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाचे जोरदार समर्थक होते. त्यांनी १९०२ मध्ये बडोदा वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना केली, जी नंतर बडोदाच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठात औषधी विद्याशाखा बनली. वैद्यकीय महाविद्यालयाने आरोग्यसेवा व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्यात आणि आरोग्य सेवा पद्धती सुधारण्यासाठी संशोधन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

ISSN No. 2394-5990

४. **प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचा प्रचार:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा उपायांच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी लसीकरण कार्यक्रम, सार्वजनिक आरोग्य जागरुकता मोहिमा आणि कॉलरा, चेचक आणि प्लेग यांसारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रसार नियंत्रित करण्यासाठी उपक्रमांना पाठिंबा दिला. या प्रयत्नांनी सार्वजनिक आरोग्य परिणाम सुधारण्यात आणि बडोद्यातील मृत्युदर कमी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

५. **पारंपारिक औषधांसाठी समर्थन:** आधुनिक वैद्यकीय पद्धतींना चालना देण्यासोबतच, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आयुर्वेद आणि युनानी यांसारख्या पारंपारिक औषधांना देखील समर्थन दिले. त्यांनी पारंपारिक औषधांचा अभ्यास आणि सरावासाठी संस्था स्थापन करण्यास तसेच आरोग्य सेवा प्रणालीमध्ये पारंपारिक उपचार पद्धतींचे एकत्रीकरण करण्यास प्रोत्साहित केले.

६. **आरोग्य सेवा प्रवेशाचा विस्तार:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी विशेषतः ग्रामीण भागात आरोग्य सेवांचा विस्तार करण्यासाठी कार्य केले. वंचित समुदायांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी त्यांनी दवाखाने, प्रसूती केंद्रे आणि मोबाईल हेल्थकेअर युनिट्सची स्थापना केली. याव्यतिरिक्त, त्यांनी प्रदेशातील वैद्यकीय कर्मचा-यांची कमतरता दूर करण्यासाठी आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या प्रशिक्षणास प्रोत्साहन दिले.

हे उपक्रम महाराजा सयाजीराव गायकवाड यांची त्यांच्या संस्थानातील सार्वजनिक आरोग्य आणि कल्याण सुधारण्याची वचनबद्धता दर्शवतात. त्यांच्या प्रयत्नांनी बडोद्यातील लोकांना लाभ देणाऱ्या सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रणालीच्या विकासाचा पाया घातला आणि भारतातील सार्वजनिक आरोग्य हस्तक्षेपांसाठी एक मॉडेल म्हणून काम केले.

**जमीन सुधारणा आणि कृषी विकास :**

महाराजा सयाजीराव यांनी अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेतीचे महत्त्व ओळखले आणि शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी प्रगतीशील जमीन सुधारणा लागू केल्या. सिंचन प्रणाली सुधारणे, शास्त्रोक्त शेती पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशाने त्यांच्या पुढाकाराने ग्रामीण भागातील दारिद्र्य दूर करण्यात आणि बडोद्यातील कृषी परिदृश्य बदलण्यास मदत झाली. या संदर्भात त्यांच्या कार्याचे काही प्रमुख पैलू येथे आहेत:

१. **जमीन कार्यकाळ सुधारणा:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी भाडेकरू शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि जमीन मालकी पद्धती सुधारण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण जमीन कार्यकाळ सुधारणा सादर केल्या. त्यांनी मध्यस्थ आणि जमीनदारांची व्यवस्था संपुष्टात आणण्यासाठी उपाययोजना अंमलात आणल्या आणि त्याद्वारे थेट मालकी हक्क शेतकऱ्यांना दिले. या हालचालीमुळे भाडेकरू शेतकऱ्यांचे शोषण कमी होण्यास मदत झाली आणि जमिनीचे अधिक न्याय्य वितरण होण्यास मदत झाली.

२. **सहकारी शेतीला प्रोत्साहन:** कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सहकारी शेतीची क्षमता ओळखून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्यात कृषी सहकारी संस्थांच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले. या सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना कर्ज, निविष्ठा आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून दिले, ज्यामुळे ते आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करू शकतील आणि त्यांचे कृषी उत्पन्न सुधारू शकतील.

३. **कृषी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी कृषी क्षेत्राच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी कृषी पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणूक केली. त्यांनी सिंचन सुविधा सुधारण्यासाठी प्रकल्प सुरू केले, धरणे आणि जलाशय बांधले आणि शेती उत्पादनांची वाहतूक सुलभ करण्यासाठी रस्ते नेटवर्क विकसित केले. या पायाभूत सुविधा प्रकल्पांनी कृषी उत्पादकता वाढविण्यात आणि ग्रामीण जीवनमान वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

४. **वैज्ञानिक शेती पद्धतींचा परिचय:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शेतीचे आधुनिकीकरण आणि पीक उत्पादन वाढविण्यासाठी वैज्ञानिक शेती पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन दिले. सुधारित पीक वाण, मृदा संवर्धन तंत्र आणि कीड व्यवस्थापन धोरणांवर संशोधन करण्यासाठी त्यांनी कृषी संशोधन संस्था आणि प्रायोगिक फार्म्सची स्थापना केली. शेतकऱ्यांपर्यंत ज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रसार करून त्यांनी त्यांची कृषी उत्पादकता आणि उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न केला.

५. **ग्रामीण विकासासाठी समर्थन:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी ग्रामीण समुदायांची सामाजिक-आर्थिक

परिस्थिती सुधारण्याच्या उद्देशाने ग्रामीण विकास उपक्रमांना प्राधान्य दिले. त्यांनी ग्रामीण शिक्षण, आरोग्यसेवा आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रम राबवले, ज्यामुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावले. याव्यतिरिक्त, त्यांनी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आणि ग्रामीण उत्पन्नाला चालना देण्यासाठी कुटीर उद्योग आणि कारागीर कलाकुसरीच्या विकासास प्रोत्साहन दिले.

हे उपक्रम सामाजिक-आर्थिक प्रगतीचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून भूमी सुधारणा आणि कृषी विकासासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड यांची वचनबद्धता अधोरेखित करतात. त्यांच्या दूरदर्शी धोरणांनी बडोद्यात अधिक न्याय्य आणि समृद्ध कृषी क्षेत्राचा पाया घातला, ज्यामुळे शेतकरी आणि ग्रामीण समुदायांच्या अनेक पिढ्यांचा फायदा झाला.

**सामाजिक सुधारणा :**

महाराजा सयाजीराव हे समाजसुधारणेचे कट्टर पुरस्कर्ते होते, त्यांनी अस्पृश्यता आणि बालविवाह यांसारख्या सामाजिक दुष्कृत्यांचे उच्चाटन करण्यासाठी अथक परिश्रम घेतले होते. त्यांनी आंतरजातीय सलोखा आणि धार्मिक सहिष्णुतेला प्रोत्साहन दिले, त्यांच्या प्रजेमध्ये सर्वसमावेशकता आणि एकतेची भावना वाढवली. सामाजिक न्यायावरील त्यांच्या कार्याचे काही पैलू येथे आहेत:

१. **अस्पृश्यता निर्मूलन:** महाराजा सयाजीराव गायकवाड हे जातिव्यवस्थेचे कट्टर विरोधक होते आणि त्यांनी आपल्या संस्थानातील अस्पृश्यता नष्ट करण्याचे काम केले. सर्व जाती आणि समुदायातील लोकांना कायद्यानुसार समान वागणूक मिळावी आणि त्यांना सामाजिक आणि आर्थिक संधी मिळतील याची खात्री करण्यासाठी त्यांनी धोरणे अंमलात आणली.

२. **उपेक्षित गटांसाठी शिक्षणाचा प्रसार:** महाराजा सयाजीराव गायकवाड हे सक्षमीकरणाचे साधन म्हणून शिक्षणाचे जोरदार समर्थक होते. त्यांनी दलित आणि महिलांसह उपेक्षित समुदायांमध्ये त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालये स्थापन करून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी पावले उचलली. त्यांच्या प्रयत्नांमुळे या समुदायांच्या उत्थानाला हातभार लागला आणि त्यांच्या शैक्षणिक संधींचा विस्तार झाला.

३. **महिला सक्षमीकरण:** महाराजा सयाजीराव गायकवाड हे महिलांचे हक्क आणि लैंगिक समानतेचा प्रचार करण्यात त्यांच्या काळाच्या पुढे होते. त्यांनी महिलांना शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या संधी देऊन समाजातील त्यांची स्थिती सुधारण्याच्या उपक्रमांना पाठिंबा दिला. त्यांनी बालविवाह आणि हुंडा यांसारख्या समस्यांवर उपाय योजले, महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कायदेशीर सुधारणांचा सल्ला दिला.

४. **गरिबांसाठी कल्याणकारी कार्यक्रम:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी गरिबी दूर करण्यासाठी आणि गरिबांचे जीवनमान सुधारण्यासाठी विविध कल्याणकारी कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमांमध्ये गरजूंना आर्थिक सहाय्य, अन्न मदत आणि आरोग्य सेवा प्रदान करणे समाविष्ट होते. त्यांनी समाजातील वंचित घटकांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आणि आर्थिक स्वयंपूर्णतेला चालना देण्याच्या उपक्रमांनाही पाठिंबा दिला.

५. **सामाजिक समरसता वाढवणे:** महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी विविध समुदायांमध्ये सामाजिक एकोपा आणि एकतेच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी आंतर-समुदाय संवाद आणि सहकार्याला प्रोत्साहन दिले, धार्मिक सहिष्णुतेला चालना दिली आणि जातीय तणाव आणि संघर्ष टाळण्यासाठी पावले उचलली. त्यांच्या शासनाच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळे बडोद्यातील लोकांमध्ये एकता आणि आपुलकीची भावना निर्माण झाली.

**मूल्यमापन :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे जीवन आणि राज्यकारभार हा सामाजिक जबाबदारीच्या परिवर्तनवादी शक्तीचा दाखला आहे. त्यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि पुरोगामी धोरणे पिढ्यान्पिढ्यांना प्रेरणा देत राहतात, आणि एक समर्पित आणि दयाळू शासक समाजावर पडणाऱ्या शाश्वत प्रभावाची आठवण करून देतात. शिक्षण, आरोग्यसेवा, कृषी आणि सामाजिक न्याय या क्षेत्रातील त्यांचे अग्रगण्य प्रयत्न भारताच्या इतिहासात सतत प्रतिध्वनित होत आहेत, आम्हाला अधिक न्याय्य समाजाच्या निर्मितीमध्ये करुणा, सहानुभूती आणि सामाजिक जबाबदारीच्या चिरस्थायी प्रभावाची आठवण करून देतात. आपण त्याच्या वारशावर विचार करत असताना, आम्हाला सहानुभूती, सर्वसमावेशकता आणि सर्वांसाठी एक चांगले भविष्य घडवण्यासाठी सामान्य भल्यासाठी वचनबद्धतेचे महत्त्व लक्षात येते.

**संदर्भ :**


१. Baroda, the cultural capital of Gujrat by Raghubir Sinh, published by Somaliya Publications.

२. “Maharaja Sayajirao Gaekwad III: A profile in phi;anthropy by Raghu Vira, published in Indian Historical Review.

३. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड २, साकेत प्रकाशन, ISSN -9788177868104

४. महाराजा सयाजीराव गायकवाड: विचारधन, संपादन – बाबा भांड, ISBN 9788177868715

५. समाजशिल्पशास्त्रज्ञ सयाजीरावांची ओळख:, संपादन राजा भांड, राजेंद्र मगर, ISBN - 9789352202591

६. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखक बाबा भांड, ISBN - 9789352203079


■■■

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषी आणि औद्योगिक क्षेत्रातील योगदान: अभ्यास

**प्रा. डॉ. पौर्णिमा दिपक चव्हाण** (उडपी)
एम. कॉम., एल एल. बी., एम.फिल., पी एच. डी.
साहाय्यक प्राध्यापक,
आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज आष्टा
manishadchavan17@gmail.com, 7350017878

**सारांश:**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांची राजवट पारतंत्र्यात १८७५ ते १९३९ या काळातील होती. ब्रिटीश सरकारचे राज्य होते परंतु बडोदे संस्थानाची राजेशाही मात्र त्यांनी लोकशाही पद्धतीने चालवली असे त्यांच्या अभ्यासातून दिसून येते. प्रजाहितदक्ष राजा कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड. महाराजांनी शेती, उद्योग व्यवसाय, व्यापार, पर्यावरण रक्षण, सामाजिक कायदे, शिक्षण, सहकारी धोरण, आर्थिक धोरण ते न्याय, कलासंवर्धन, संस्कृती रक्षण, आरोग्यसुविधा, अशा प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. राज्याच्या आर्थिक विकासाचा पाया भक्कम करण्यासाठी त्यांनी शेती आणि शेतीपूरक उद्योग, व्यवसाय यांच्या स्थापनेसाठी त्यांच्या संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. आज २१ व्या शतकात स्वतंत्र भारताची ७५ वर्षे पूर्ण होत असताना विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात देशाच्या कृषी आणि औद्योगिक प्रगतीचा आढावा घेताना महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केलेले कार्य दिपस्तंभाप्रमाणे वाटते. कृषीविषयक आणि औद्योगिक विकासासाठी त्यांनी घेतल्याला परिश्रमाचा अभ्यास करणे उचित आहे.

**प्रास्ताविक:**

आज जगात चौथी औद्योगिक क्रांती घडत आहे. देशात माहिती, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर सर्वत्र वाढला आहे आणि यातून औद्योगिक व्यापार क्षेत्राची प्रगती उल्लेखनीय अशी होत आहे असे असून सुद्धा देशातील बेरोजगारी कुपोषण, स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार अशा अनेक घटनांतून सामाजिक प्रश्न तीव्र होत आहेत. अशावेळी पारतंत्र्यात असणाऱ्या भारत देशातील बडोदे संस्थानातील प्रजाहितदक्ष महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केलेले कृषी आणि औद्यागिक कार्य अभ्यासणे संयुक्तीक आहे असे अभ्यासकाला वाटते.

**संशोधन पद्धती:**

या अभ्यासासाठी संशोधकाने दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे.

**संशोधन उद्दिष्टे :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा कृषी क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या औद्योगिक धोरणाचा आणि उद्योगविषयक कार्याचा अभ्यास करणे.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदे संस्थानात त्यांनी २७ मे १८७५ ला राजपद स्विकारल्यानंतर १९३९ या ६४ वर्षांच्या कारकिर्दीचा अभ्यास हा वेगळा ठरतो कारण देशात पारतंत्र्य होते, अशिक्षित जनता, अनेक आर्थिक, सामाजिक प्रश्न होते. अशा काळात त्यांनी वाणिज्य विषयक घेतलेले निर्णय, त्यांची व्यवस्थापन पद्धती, न्यायविषयक सुधारणा, राज्यकारभार चालविण्याची पद्धती या सर्वांबरोबरच त्यांनी राज्याचा आर्थिक पाया भक्कम करण्यासाठी राबविलेले औद्योगिक शिक्षण, प्रशिक्षण यासाठी केलेले प्रयत्न त्यांना प्राधान्याने दिलेल्या शासकीय सवलती, कला हस्तकला यांना दिलेले प्रोत्साहन आणि सर्वात महत्वाचे ग्रामीण कारगीर आणि छोटे-मोठे व्यावसायिक यांना अर्थपुरवठा करणाऱ्या बडोदा बँकेची स्थापना हे सर्व अभ्यासले असता त्यांनी भारताच्या औद्योगिक विकासासाठी सयाजी मॉडेल तयार केले हे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते.

**कृषी आणि कृषीपूरक उपक्रमांना प्राधान्य :**

बडोदे राज्य हे अनेक खेड्यांचे होते. बडोद्यात ३५००० खेडी होती. ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे शेतीवर अवलंबून होती. परंतू भारतातील शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड देत शेतकरी शेती करीत होता. अशा वेळी आर्थिक विकासातील शेतीचे महत्व ओळखून

त्यांनी बडोदा संस्थानात कृषी आणि कृषीपूरक उपक्रमांना प्राधान्य दिले.

महाराजांनी २८ डिसेंबर १८८१ ला प्रत्यक्ष राज्यकारभार स्विकारल्यानंतर संपूर्ण राज्याचा प्रत्यक्ष पाहणी दौरा केला त्यावेळी एकूण जमिनी ४९ लक्ष ६० हजार एकरांपैकी ४१ लक्ष एकर शेती योग्य होती व त्यापैकी ३३ लक्ष एकरात शेती केली जाई.[१] बाजरी, कापूस, ज्वारी, भात, कडधान्ये, तेलबीया, भूईमूग, करडी अशी पिके घेतली जात. संपूर्ण शेती निसर्गावर, बेभरवशाच्या पावसावर अवलंबून होती.

त्यांनी १८९५ ला पाटबंधारे व पाणी पुरवठा खाते निर्माण केले. शेती खाते निर्माण केले. शेतकऱ्यांना वृक्षारोपणास प्रोत्साहन दिले. विहीरी खोदणे, दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी नदी-ओढ्यावर मातीचे बांध घालून पाणी आडवणे, पाणलोट क्षेत्र विकास, शेतकऱ्यांना शेती कामासाठी बैलजोडी खरेदीसाठी मदत करणे, दुष्काळामुळे अन्नधान्य न पिकलेल्या शेतकऱ्यांना धान्याची मदत करणे यासारखी दुष्काळी कामे सुरु केली. जनावरांसाठी चारापाण्याची व्यवस्था केली. पाटबंधारे, कालवे काढणे. विहीरी खोदणे अशी रिलीफ कामे केली. सर्वात महत्वाचे त्यांनी ऋाळपश उेवश मध्ये दुरुस्ती केली आणि सरकारी उत्पन्नातून अशा दुष्काळी कामासाठी तरतूद केली.

महाराजांनी शेतसारा ठरविण्याची पद्धत पूर्णपणे बदलली. स्थानिक श्रीमंत लोकांकडील शेतसारा वसूली पद्धत काढून घेतली. शेतसारा ठरविण्यासाठी तज्ञ लोकांची समिती नेमली. शेतीच्या तुकडे बंदीचा कायदा केला, जमीन एकत्रीकरण कायदा केला. मोकाट जनावरे शेतात न सोडण्याविषयी शिक्षा करणारा कायदा केला. कृषीपतपुरवठा करण्यासाठी कृषी बँक स्थापना १९०५ मध्ये केली. सवलतीने कर्ज उपलब्ध करून दिले. शेतकऱ्यांना बी-बीयाणे पुरविणे, कृषी मार्गदर्शनाची सोय, शेती सुधारणा प्रयोग प्रोत्साहन, प्रदर्शने, कृषी व्याख्याने, भाषणे, पत्रव्यवहार यातून त्यांचे कृषीविषयक सुधारणा कार्य दिसून येते.

महाराजांनी शेतीत आधुनिकता आणण्यासाठी शेतकऱ्यांना, अभ्यासकांना इतर प्रांतात अभ्यासासाठी पाठविले. पारंपारिक पद्धती ऐवजी आधुनिक पद्धतीने शेती करण्यास प्रोत्साहन दिले. कलाभुवन या अभिनव शाळेच्या माध्यमातून त्यांनी शेतीला पूरक असे अभ्यासक्रम सुरु केले. शेतकऱ्यांनी शेतीबरोबर शेतीपूरक व्यवसाय करावेत यासाठी प्रोत्साहन दिले. शेतीपूरक जनावरे पाळावीत यासाठी शेतकऱ्यांना उद्यूक्त केले आणि जनावरांसाठी पशूवैद्यकीय दवाखाने काढले यातून पशूधनाची काळजी दिसून येते. स्वत: महाराजांनी शेती, दुष्काळी शेती याची पाहणी केल्याचे दिसून येते. तसेच राज्यात उद्योगधंदे असल्याशिवाय शेतकऱ्यांची प्रगती होणार नाही हे ओळखून त्यांनी

१. १८८१ साली बडोदे येथे सुताची गिरणी स्थापन केली.
२. १८८१ साली गणदेवी येथे साखर कारखाना काढला.
३. १९०५ साली एरंड तेल कारखाना सुरु केला.
४. १९०७ साली कातडी उद्योग, हातमाग उद्योग इ. सुरु केले.

या बरोबरच १९१७ साली बडोद्यात ११ तांदूळ गिरण्या, १० तेल गिरण्या १७ पीठ गिरण्या असे कृषी निगडीत उद्योग सुरु केले. अशा पद्धतीने महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी कृषी आणि कृषी उद्योग यांना आर्थिक पाठबळ, प्रोत्साहन देऊन कृषी क्षेत्राचा विकास आणि कृषी औद्योगिक विकासाची पायाभरणी केली असे म्हणता येईल.

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे औद्यागिक धोरण आणि उद्योजकता विकास:**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी उद्योग- व्यवसाय स्थापन करुन जनतेला शेतीबरोबरीने इतर उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध करून दिले आणि व्यक्ती विकासाबरोबरच राज्याचा आर्थिक विकास साधणे हे महत्वाचे कार्य केल्याचे पुढील अनेक घटनांतून दिसून येते.

१८७५ च्या दरम्यान, इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा परिणाम भारतातील उद्योगव्यवसायांवर होऊ लागला होता. अशा विपरीत परिस्थितीत महाराजांनी केलेल्या औद्योगिक धोरणांचा आणि उद्योगविषयक कार्याचा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो. उद्योग व्यवसायांची स्थापना करताना त्यांनी कृषीपूरक उद्योगांना प्राधान्य दिले. तसेच सूक्ष्म नियोजनाचा अवलंब केला आणि नवभारताच्या उभारणीचे अनेक प्रयोग केले. त्यासाठी बडोदा संस्थानातील औद्योगिक विकासाचा आढावा घेणे महत्वपूर्ण ठरते. औद्योगिक विकासाचा पहिल्या टप्प्यात महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी पुढील गोष्टींकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते.

२७ मे १८७५ रोजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तेव्हां त्यांचे वय फक्त १८ वर्षे होते त्याप्रसंगी त्यांनी पहिले औद्योगिक प्रदर्शन आयोजित केले होते. यातून त्यांची औद्योगिक प्रगतीची दूरदृष्टी दिसून येते. राज्यात उद्योग व्यवसाय स्थापन होण्यासाठी जनतेला प्रेरणा देणे, नवनविन उद्योग व्यवसायांची कल्पना देणे, उद्योजकीय विचारांना प्रेरणा देणे तसेच व्यापार वृद्धी करणे हा हेतू दिसून येतो.

राज्यात उद्योग- व्यवसाय आले तर राज्याची प्रगती वेगाने होईल. शेती बरोबरीने उद्योग-व्यवसायाची जोड देऊन राज्याचा

आर्थिक पाया भक्कम होईल हे त्यांनी ओळखले होते. काही वेळा सरकारी खर्चाबरोबरच खाजगी भांडवलदारांसोबत त्यांनी भागीदारी केली आणि उद्योग-व्यवसाय स्थापन केले. या उद्योग व्यवसायांसाठी लागणाऱ्या कुशल मनुष्य बळाची गरज ओळखून त्यांनी औद्योगिक शिक्षण प्रशिक्षण शाळा सुरु केली. उद्योग व्यवसायाच्या विकासासाठी अर्थपुरवठा आवश्यक आहे हे ओळखून त्यांनी १८८४ मध्ये बडोदा पेढी काढून कमी व्याजाने कर्ज देण्याची योजना सुरु केली याबरोबरच उद्योग व्यवसाय वाढीबरोबर बँकींग सुविधा आवश्यक आहे हे ओळखून त्यांनी बँक ऑफ बडोदा स्थापन केली. भारतातील संस्थानीकांनी सुरु केलेली ही पहिली बँक होती. ही बँक सहकारी तत्वावर होती हे विशेष आहे. १८९० मध्ये बडोदा येथे कलाभवन स्थापन करुन फक्त बडोद्यालाच नाही तर संपूर्ण देशात आधुनिक तंत्रज्ञान दिले.[२]

उद्योग व्यवसायासाठी असणारी विद्युत गरज ओळखून त्यांनी बडोदा येथे विद्युत निर्मिती प्रकल्प सुरु केला. उद्योग-व्यवसाय विकास हा चांगल्या दळणवळण सुविधावर देखील अवलंबून असतो हे ओळखून त्यांनी बडोदा संस्थानातील मोठी शहरे आणि ग्रामीण भाग रस्त्यांच्या जाळ्यांनी जोडला. रेल्वे मार्ग विकसित केले त्याचबरोबर अत्याधुनिक उपकरणांनीयुक्त जहाज व बंदर बांधणी उपक्रमाला प्राधान्य दिले. त्यांनी उद्योग व्यवसायाच्या विकासासाठी पुढील प्रयत्न जाणिवपूर्वक केले.

१८८४ मध्ये बडोदा संस्थानातील गणदेवी या ठिकाणी सुरु केलेला साखर कारखाना हा आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना जो संयुक्त भांडवलावर सुरु करण्यात आला होता. या बरोबरीनेच कापड गिरण्या, रासायनिक उद्योग, रंगकाम कारखाने, काच उद्योग, तेल गिरण्या, तांदूळ गिरण्या, कातडी उद्योग, सिमेंट कारखाने असे अनेक लहान-मोठे उद्योग व्यवसाय सुरु केले. त्यासाठी काही विशेष प्रयत्न करण्यात आले ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. त्यांनी अनेक औद्योगिक कायदे केले. उदा: कंपनी क्ट १८९७, बॉयलर क्ट १८९८, कस्टम क्ट १९०४, ट्रेड युनियन क्ट १९३८, इ.
२. औद्योगिक विकास सल्ला देण्यासाठी महाराजांनी मि. व्हाईट नॅक या अमेरिकन अर्थतज्ञाची नियुक्ती केली.३
३. आयात-निर्यात कर रद्द करून मुक्त व्यापाराला प्रोत्साहन दिले.
४. खाजगी उद्योजकांना प्रेरणा दिली. उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रवृत्त केले. संस्थानाकडून त्यांना अर्थपुरवठा केला.
५. औद्योगिक धोरण जाहिर केले.
६. स्त्रियांच्या आर्थिक सक्षमतेसाठी विशेष प्रयत्न केले. १९१७ साली श्री. महाराणी चिमणाबाई स्त्री उद्योगालयाची स्थापना केली. भारतातील स्त्री उद्योजकतेसाठीचा पहिला आनंदमेळा १९३९ मध्ये घेतला.
७. उद्योग व्यवसाय स्थापन करण्यापूर्वी त्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी तज्ञ व्यक्तींची नेमणूक केली.
८. विकेंद्रीकरण करण्यावर भर दिला.
९. उद्योग व्यवसाय उभारणीसाठी काही अटी शर्तीवर शासकीय सवलती दिल्या.
१०. घरगुती उद्योगांना पाठबळ दिले.
११. व्यापार आणि उद्योगांच्या विकासासाठी नियमावली तयार केली.

**निष्कर्ष:**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांना बडोदे संस्थानाच्या विकासाचा ध्यास होता. प्रजा सुखी होण्यासाठी त्यांच्या गरजा ओळखून त्यांनी कृषी आणि उद्योग, व्यापार क्षेत्रात केलेले कार्य, त्यासाठी केलेले कायदे, सुक्ष्म नियोजन आणि व्यवस्थापन हे आज २१ व्या शतकातील भारतासाठी दिपस्तंभाप्रमाणे आहे.

**संदर्भ :**

१. गायकवाड, सौरभ. महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा भाग १० औद्योगिक, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, २०२०. (पृष्ठ क्र. २८३)
२. भांड, बाबा. महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची खंड १२, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २०१७. (पृष्ठ क्र. ४८)
३. पवार, निंबाजीराव. जेंव्हा गुराखी राजा होतो, नाशिक, सयाजी प्रकाशन, १९८८. (पृष्ठ क्र. ५४)
४. नाडगोंडे, गुरुनाथ. औद्योगिक समाजशास्त्र पुणे, कॉन्टिनेन्टल, २०००.
५. मालकर, यमाजी; व मगर, राजेंद्र. महाराजा सयाजीराव चरित्रसंग्रह भाग १, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, २०१८.

■■■

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक २७ – मार्च २०२४ (त्रैमासिक)


- शके १९४५
- वर्ष : ९२
- पुरवणी अंक : २७



**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. सुनील हेळकर
- प्रो. डॉ. प्रेमचंद गायकवाड
- प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा



**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.


टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

४८. **सुशासित राज्यकारभाराचा आदर्श : महाराजा सयाजीराव गायकवाड**

- प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम --------------------------------------------------- २१६

४९. **ग्रंथ आणि ग्रंथालय चळवळ : महाराज सयाजीराव गायकवाड यांचे योगदान**

- १) प्रा.नीलिमा नामदेव हेमाडे, २) प्रा. साळुंके नंदकुमार लक्ष्मन ---------------------- २२०

५०. **महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य**

-डॉ. रामचंद्र वसंत कुंभार ---------------------------------------------------------- २२३

५१. **महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य आणि कर्तृत्व**

– डॉ. अनिल शिवाजी टिके ------------------------------------------------------- २२७

५२. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीविषयक कार्यातील योगदान**

– प्रा.डॉ.उध्दव मनोहर घोडके --------------------------------------------------- २३१

५३. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य**

- प्रा.देबडे सतिश मारोतिराव ------------------------------------------------------ २३४

५४. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यतेविषयक कार्य व विचार**

- १) डॉ. मोरे बजरंग वामन, २) सौ.भोसले अर्चना महादेव ----------------------------- २३६

५५. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा संस्थानातील सामाजिक सुधारणा**

-प्रा.डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे ------------------------------------------------ २३९

५६. **महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) आणि बडोदे संस्थानातील ग्रंथालय चळवळ**

(Maharaja Sayajirao Gaikwad (3rd) and Library Movement of Baroda State)

-डॉ. अजितकुमार दादासो जाधव ------------------------------------------------- २४३

५७. **महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणाविषयक विचार**

-डॉ. उर्मिला महेश चव्हाण -------------------------------------------------------- २५०

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीविषयक कार्यातील योगदान

**प्रा.डॉ.उध्दव मनोहर घोडके**
सहाय्यक प्रध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय,शिरवळ
ईमेल: uddhavmghodake@gmail.com
मो.नं.: ९९२१९८५६३१

**प्रस्ताविक :**

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणुन ओळखले जाते.कारण विचारपरिवर्तनाच्या चळवळीची परंपरा याच महाराष्ट्रात सुरू झालेली आहे. संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराजा आधुनिक भारतातामध्ये महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्ये विचार महाराष्ट्राला लाभलेले आहेत याच विचाराचे पाईक समाजसुधारक म्हणजे बदोडा संस्थानाचे महाराजा सयाजीराव गायकवाड होय. समाजसुधारणेशिवाय भारतीय समाजाचा विकास होणे शक्य नाही हे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ओळखले होते. प्रजेचे कल्याण करणे, प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होणे, प्रजेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राजत्तेचा उपयोग करणे, आणि ङ्गराजाफ म्हणुन असलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांना होती. काळानुसार समाज,धर्म, बदलला पाहिजे, जुन्या रूढि - परंपरा नवीन युगासोबत बदलल्या पाहिजे असे त्यांचे मत होते. समाजसुधारणा करतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल किंवा अनेक जणांचा विरोध पत्करावा लागेल यांची महाराजांना जाणीव होती.

**संशोधनाचे उदिष्टे :**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीविषयक विचार अभ्यासणे.
२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी स्त्रीविषयक केलेल्या कायदयाचा अभ्यास करणे.
३. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीशिक्षण क्षेत्रातील विचार अभ्यासणे
४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्रीशिक्षणातील योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी संशोधन पध्दती म्हणुन ऐतिहासिक लेखनपध्दतीनुसार मांडणी केली आहे. तसेच सदर शोध निबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. शोधनिबंधाचा विषय व्यक्तीविषयक असल्यामुळे यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आत्मचरित्रात्क ग्रंथ,तसेच त्यांच्याविषय लेखन केलेल्या संदर्भग्रंथाचा वापर केलेला आहे.

**संशोधानाची मांडणी:**

**स्त्रीविषयक सुधारणा कायदे:**

**विधवा पुर्निविवाह कायदा (१९०१):**

विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार देणारी सुधारणावादी निर्णय त्यावेळचा विचार करता खुपच क्रांतीकारक निर्णय होता. धर्मप्रथांच्या नावाखाली स्त्रियांच्या पुनर्विवाह - प्रतिबंधास मिळालेली मान्यता, महाराजांनी दूर केली. पुरूषांना अनेक लग्ने करू देणे आणि स्त्रियांना वैधव्य किंवा घटस्फोट यामुळे पुनर्विवाह न करू देणे हे स्त्रियांवर अन्याय करणारे आहे. महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये पुनर्विवाहचा घडवून आणलेला प्रसंग या कायदयाला चालना देणारे होते हे दिसनू येते. इंग्लंडमध्ये उच्चशिक्षण घेतलेले गणेश सदाशिव भाटे हे १९०८ मध्ये महाराजांच्या सेवेत दाखल झाले. त्यांची पहिली पत्नी निधव पावलेली होती. भाटे हे तरूण होते. त्यांनी वीस वर्षे असलेल्या विधवाशी पुनर्विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतू भाटेच्या आई-वडिलांना हे पसंत नव्हते. बडोदयातील सनातनी उपाध्यांनी पुनर्विवाहास नकार दिला होता. महाराजांनी हा पुनर्विवाह घडुन आणण्याचे ठरविले. त्यांनी स्वतः सरकारी पातळीवर सर्वांना निमंत्रणे देवून चिमणबागेमध्ये आश्रित अपाध्यांना सांगुन सर्वाच्या उपस्थित हा पुनर्विवाह पार पाडला.[१] हा प्रसंग विधवा पुनर्विवाहा चालना देणारा ठरला. सुधारणांचे अग्रणी म्हणुन या घटनेकडे पाहावे लागेल.

**धार्मिक स्वातंन्याचा कायदा (१९०२):**

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला भारतामध्ये जातिसंस्थेचे

व धर्मसंस्थेचे सावट खुप गडद होते. धर्म हा त्याकाळचा सर्वात मोठा अभिमानाची बाब असलेला घटक होता. त्या काळात धर्मांतर करणे म्हणजे खूप मोठे पाप मानले जात होते. महाराजांनी या गोष्टीचा अभ्यास केला. आणि व्यक्तिस्वातंन्त्य म्हणजे काय आणि धर्माबाबत व्यक्ति कितीपत स्वातंत्र आहे या सखोल अभ्यास केला. आणि १९०२ मध्ये धार्मिक स्वातंन्त्याताचा कायदा पारित केला. या कायदयान्वये व्यक्तीचा धर्मातंर करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. धर्मांतर केल्यावर त्या व्यक्तीचे कायदेशीर हक्क, सांपत्तिक हक्क तसेच सुरक्षित राहतील आणि त्यास जातिबहिष्कृत करता येणार नाही,याची कायदयाने हमी दिली.[२] अशा प्रकारे आजच्या संविधानातील धार्मिक स्वातंन्त्याचा अधिकार महाराजांनी अगोरच आपल्या संस्थानातातील जनतेला बहाल केल्याचे दिसते.

**बालविवाह प्रतिबंधक कायदा (१९०४):**

बालविवाह प्रतिबंधक कायदा आपल्या संस्थानात लागु करणारे महाराजा समयाजीराव गायकवाड हे दूरदृष्टीचे व्यक्तीमत्व होते. विवाहाच्या प्रसंगी मुलीचे वय १६ वर्षे असावे, असे त्यांचे वैयक्तीक मत होते, प्रस्तावित वय मुलीचे १४ वर्षे मांडले गेले, सामाजिक इच्छा,लोकमत पाहून हे वर्षे १२ वर्षे ठरविण्यात आले. याबाबत १६ सप्टेबंर १९०७ रोजी भोर येथील शाळेच्या बक्षीस समारंभाच्या भाषणामध्ये महाराज म्हणतात की, ....''तुम्हाला सुखी व्हायचे असेल आणि बालविवाहाचे परिणाम अनिष्ट होणे शक्य आहे असे तुम्हास वाटत असेल,तर बालविवाहाची चाल बंद करा..फक्र बालविवाह बंद केले तर त्यामुळे पुष्कळच फायदे होणार आहेत. मुलींच्या शरीरप्रकृतीत इष्ट सुधारणा होईल आणि पुढची पिढी सुदृढ व निकोप प्रकृतीची होईल.तुमची पिढी धैर्यशील,शीलसंपन्न आणि सशक्त व्हावी अशी तुमची इच्छा असेल तर बालविवाहाची प्रथा कोणत्याही दृष्टीने इष्ट नाही.''[३]

**वारसा हक्क कायदा:**

हिंदू स्त्रियांना मिळकतीत वाटा मिळण्यासंबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. यामध्ये दोन स्त्री सदस्यांची निवड केली. हिंदू कायदा सुधारणा समितीने १९३० साली अभ्यास करून बदल सुचविले आणि १६ नोव्हेंबर १९३३ च्या अज्ञापत्रिकेत कायदा मंजूर करण्यात आला. या कायदयानुसार संयुक्त कुटुंबातील समान वारसाहक्क असणाया व्यक्तीची विधवा त्या व्यक्तीची वारस ठरते, कुटुंबाच्या संपत्तीची भागीदार ठरते. रू. १२००० हजार पर्यतच्या मिळालेल्या मालमत्तेची वारसाहक्कानुसार संपूर्ण मालक ठरते,फक्त पतीच्या असलेल्या मालमत्तेत तिला वारस हक्काने तिच्या मुलांबरोबर त्यांच्याइतकाच समान अधिकार प्राप्त होतो. अविवाहित मुलगी कुटुंबाच्या मालमत्तेत समानपणे मुलाच्या हिश्श्याच्या चैथा भागाइतका हक्क मागू शकते. विधवा सुनेला वारसा हक्काच्या यादीत मृत सासायाच्या आईखालोखालचे स्थान देण्यात यावे,मृत झालेल्या मुलीचे मुले जिवंत मुलीबरोबरचा वारसाहक्क सांगू शकतात. इ. महत्वाचे निर्णय या कायदयानुसार घेण्यात आले.[४]

अशा तरतुदीमुळे स्त्रियांच्या वडिलोपर्जित आणि पतीकडील संपत्तीत वारसाहक्क मिळवून देणारे महाराज सयाजीराव गायकवाड यांचा निर्णय क्रांतीकारकच म्हणावा लागेल. स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचे बळकटीकरण होण्यास मदत झाली.

**लग्नविच्छेदनाचा कायदा (१९३१):**

आधुनिक भारतामध्ये या कायदयाला ङ्घटस्फोटाचा कायदाफ असेही म्हणुन शकतो. त्याकाळात महाराजांनी अमंलात आणलेला सर्वात वेगळा कायदा होता. या कायदयाविषयी बाबा भांड लिहिताता, ''पती -पत्नीचे वैवाहिक जीवन सुरळीत नसेल. तर त्यांना परस्परांपासुन कायदयाने विभक्त होता आले पाहिजे,ही नैसर्गिक गरज आहे. अमूक एका परिस्थितीत पीडित स्त्रीला आपल्या नवायापासुन विभक्त होता यावे,याकरिता महाराजांनी 'लग्नविच्छेद कायदा' केला.'' बडोदयातील हा कायदा म्हणजे त्या काळातला हिंदुस्थानातील सामाजिक निर्णयाचे धाडसी पाऊल म्हणता येईल.

सामाजिक सुधारणा करतांना महाराज सयाजीराव गायकवाड यांना अनेक क्रांतीकारी निर्णय घ्यावे लागले. महाराज म्हणतात, ''रूढिच्या श्रृंखला सैल करण्याच्या प्रयत्नांना थोडेसे जरी यश आले,तरी ते श्रेयस्कर आहे. तथापि या दृष्टिने प्रयत्नाला सुरूवात कोठे आणि कशी करावी याबद्दल मात्र सावधगिरी ठेवली पाहिजे. समाजातील एक दोष घालवितांना त्याच्या जागी दुसरा दोष न येता काही तरी चांगले व्हावे, अशी अशा बाळगली पाहिजे'' कुठलाही सामाजिक प्रश्न हा समाजाच्या धार्मिक, आर्थिक व राजकीय जीवनाशी निगडिती असतो. आर्य समाजाच्या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवितांना केलेल्या भाषणात ते म्हणतात, ''कोणत्याही समाजाची राजकीय प्रगती ही त्याच्या सामाजिक व धार्मिक आचरणावर अवलंबून असते. ज्या समाजात आपापसांत द्वेष, झगडे चालू आहेत. त्याची राजकीयदृष्ट्या उन्नती होण्याची अशा नको.''[५]

**स्त्रीशिक्षणातील कार्य :**

स्त्रियांना समतेचे आणि बौध्दिक विकासाचे मार्ग मोकळे करण्यासाठी शिक्षणाचा आधार आवश्यक आहे. पुरूष शिक्षणाबरोबरच स्त्री शिक्षणाची ही तितकीच गरज आहे, स्त्रीयांना

ISSN No. 2394-5990

शिक्षणाचा हक्क मान्य केलाच पाहिजे यासाठी महाराज सयाजीराव गायकवाड कायमच आग्रही राहिले होते.

१९१३ च्या व्हरनॅक्युलर एज्युकेशन अॅक्ट नुसार महाराजांनी स्त्री शिक्षणासंबंधीच्या केलेल्या कायदयातील काही तरतूदी अत्यंत स्तुत्ययोग्य आहेत. उदा. मुलींची प्रकृती उत्तम रहावी म्हणून शारीरिक शिक्षणावर विशेष लक्ष ठेवावे, खेळामध्ये मुलींनी प्राविण्य मिळवावे, तसेच ९-१० वर्षापर्यतच्या मुलींना शिवणकामाचे शिक्षण सक्तीचे आहे, दैनिदिंन उपयोगाचे शिवणकाम,भरतकाम आलेच पाहिजे.इ. होय. १९१३ मध्ये शाळेत प्रवेश घेण्याचे मुलींचे वय सात ते बारा करण्यात आले. तसेच १९०६ साली शिक्षणाचा कायदा केल्यानंतर शाळांची संख्या वाढली आणि यामध्ये मुलींची संख्या मोठया प्रमाणात होती. इ.स. १९१५ मध्ये मुला - मुलींच्या शाळा वेगळया करण्यात आल्या. त्यापाठीमगो मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे हेच होते. महाराणी गर्ल्स हायस्कूल ही बडोद्यातील पहिली मुलींची माध्यमिक शाळा होय. याशाळेमध्ये इ.स. १९१७ मध्ये मिस निडहम यांची मुख्याध्यापिका म्हणुन नेमणूक केली. १८८२ मध्ये बडोदा कॉलेज च्या स्थापनेनंतर उच्चशिक्षणाच्या क्षेत्रातही मुलींच्या उच्चशिक्षणाची तरतूद करण्यात आली. १८९० मध्ये हे कॉलेज मुंबई विद्यापीठाशी संलग्णीकरण करण्यात आले. इ.स.१८८२ मध्येच स्त्री शिक्षिकांसाठी फीमेल टेऋनिंग कॉलेज काढले होते. विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना, शिक्षण उत्तेजननिधी, तसेच होतकरू स्त्रियांना अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात प्रोत्साहन दिले. उदा. मिस राधाबाई पोवार यांना अध्यापनशास्त्राच्या शिक्षणासाठी अमेरिकेच्या टीचर्स कॉलेज युनिव्हर्सिटीत पाठवण्यात आले. तसेच १९१७-१८ मध्ये मिसेस स्नेहलता पगार यांना बालसंगोपन शास्त्रातील प्रशिक्षणासाठी अमेरिकेत पाठविले गेले होते.[६]

स्त्रियांना प्रौढ शिक्षणवर्गाची सोय करण्यात आलेली होती. वय,सामाजिक बंधने यामुळे शिक्षण न घेवू शकलेल्या स्त्रियांसाठी झनाना वर्ग म्हणजेच प्रौढ शिक्षण स्त्रियांचे वर्ग काढले गेले. वाचन, लेखन, जमाखर्च, विणकाम, भरतकाम, यांचे शिक्षण दिले जाई. तसेच स्त्रियांची मंडळे, क्लब, सहविचारसभा, व्याख्यानमाला अशा विविध कुतीद्वारे महाराजांनी राज्यातील स्त्रियांचा शैक्षणिक विकास घडवून आणला होता.

**निष्कर्ष :**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी समतावादी आणि प्रगतशिल विचारांनी स्त्रिविषयक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. जातीय विषमतेला सातत्याने नाकारले. बालविवाहबंदी, पुनर्विवाह प्रोत्साहन,घटस्फोट चा अधिकार, स्त्रियांचे शिक्षण, पडदा पध्दत, स्त्रियांचे आरोग्य, स्त्रियांना वारसाहक्क इ. क्षेत्रात स्त्रियांना अधिकार व कायदे करून सामजिक सुधारणा केल्या. धर्म,जात, रूढी,परंपरा यावरून स्त्रियांवर होणारा अन्याय व भेदाभेद त्यांनी मान्य केलेले नव्हते. किंबहूना अन्याय संपवणारा विशाल मानतावाद त्यांनी स्वीकारला होता. यामुळेच महाराज सयाजीराव गायकवाड हे सर्व संस्थानिकामध्ये आपल्या वेगळेपणामुळे संस्मरणीय ठरतात.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. आपटे दा.ना., ( १९३६) श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र खंड- १ पृ.क. २६
२. फाटक ब.न., ( १९६३) 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे,पृ. क्र. ५१
३. दांडेकर वि.पा., (१९३६), श्रीमंत सयाजीराव गायकवाड, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे पृ.क्र. २४
४. भांड बाबा, (२०१३) 'लोकपाळ राजा सयाजीराव', साकेत प्रकाशन,पुणे,पृ.क्र. १८८
५. उपरोक्त पृ. क्र. १९५
६. सरदेसाई गो.स. (१९५६) 'श्री सयाजीराव यांचे सहवासात' एस. जगन्नाथ अॅन्ड कंपनी पुणे,पृ.क्र. ४०


■■■

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक ०८

G20
भारत 2023 INDIA

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।


**पुरवणी अंक ८ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)**

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणी अंक : ८



**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे

● प्रा. डॉ. मृदुला वर्मा ● प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्रा. डॉ. केशव पवार ● प्रा. डॉ. सुभाष वाघमारे ● प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे



*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No. 2394-5990

27. **An indispensable role of students' Learning Modalities in English language teaching**

- Pratap Nilkantha Bagul ---------- 119

28. **The English Language: Transformations Through the Ages**

- Pooran Chandra & Dr. Pragya Verma ---------- 123

29. **Teaching English Language to the Undergraduates Using TBLT Approach**

- Dr. Sachin Dattatraya Bhandare ---------- 128

30. **Language as a tool of asserting Identity- Post 9/11 Politics of Contested Identities and Asserting Self in Kamila Shamsie's *Home Fire:***

- Shenaz Parween ---------- 133

31. **Eco-Digital Discourse: A Computational Linguistic Analysis of Environmental Narratives in Digital Humanities**

- Sumit S Saragade & G.V. Jadhav ---------- 140

32. **Figurative Language (Idioms and Phrases): A Knowledge System of Mankind, Human Culture and Civilization**

- Mr. Rahul Vasant Ingle & Dr. Uddhav Manohar Ghodake ---------- 145

33. **Contribution of Languages in Infromation Dissemination Process : A Study in Media Perspective**

- Prof. Kh. Kabi & Sri Arjun Das ---------- 148

34. **Road Map to Enhance Communication Skills in the Context of Skill Based Education.**

- Mr. Sachin Namdev Chavan ---------- 153

ISSN No. 2394-5990

# "Figurative Language (Idioms and Phrases): A Knowledge System of Mankind, Human Culture and Civilization."

**Mr. Rahul Vasant Ingle**
Shripatrao Kadam Mahavidyalaya,
Shirwal, Tal. Khandala,
Dist. Satara- 412801 (M.S.)
(Email: rahoolvingle@gmail.com)

**Dr. Uddhav Manohar Ghodake**
Asst. Professor of Economics,
Rayat Shikshan Sanstha's Shripatrao Kadam
Mahavidyalaya, Shirwal, Tal. Khandala,
Dist. Satara-412801(M.S.)
(Email: uddhavmghodake@gmail.com)

***Abstract:***

*Language is the medium of communication. There are two types of communication: Verbal Communication and Non Verbal Communication. Language develops the human being through its richness and human develop the language by various things like: Parts of Speech, Figurative Language, Figures of Speech etc. Idioms and Phrases are the forms of Figurative Language. Idiomatic phrases are used in speaking and writing to express right emotion, thought, feeling or idea on a particular context. It also helps to develop human culture and civilization.*

***Key Words:** Idioms, phrases, language.....*

**Objectives:**

- To introduce the idioms and phrases as a useful tool for developing vocabulary
- To make awareness about the idiomatic phrases in day to day communication
- To establish the importance of idiomatic phrases into our day to day communication

**Methodology:**

This study is based on the secondary data. The data is collected from various sources like Reference Books, internet, academic text books etc.

**Introduction:**

Language is a medium of communication. There are number of languages are used in every corner of the world. Without language there will be no communication. Prominently, there are two types of language: first one is Verbal Language and second one is Non-Verbal language. In non-verbal language, facial expression, body language, or body actions are included on the other hand in former one, oral and written forms are introduced. What we speak can be write or what we write can be speak.

There is no exact information available about the origin of the language, but language has been developing day by day by its own. From number of generations language is been used for getting or sharing emotions, thoughts, ideas and feelings. There are number of languages are speak by the different types of people, communities and countries.

In Britannica Encyclopedia, the definition of language is defined as below:

"Language, a system of conventional spoken, manual (signed), or written symbols by means of which human beings, as members of which human beings, as members of a social group and participants in its culture express themselves."

From this comprehensive definition, we come to know that language is conventional spoken manual. It is a kind of written symbols which are used by human beings to express themselves.

Language not only itself but also develops society, culture, emotions, feelings ideas thoughts accordingly. In short, human being develop the

language and language develop the human being. Language develop the human being socially, culturally, emotionally, intellectually, morally etc. on the other hand, language is been developed by human being as per their own development. As we know language is just a proper arrangement of meaningful sentences, words, and alphabets. But human has been giving shape to it on time to time. Human creates number of synonyms and antonyms to the particular words. In the past the particular word has one or two synonyms but by the time human creates many words therefore this particular word got multiple synonyms and antonyms. And thus language become rich and prosperous.

Human is been trying to develop the language on various facets. Human uses parts of speech, figures of speech, figurative language etc. for understanding and sharing appropriate emotions, thoughts, ideas, and feelings. These things enrich language on multiple level. Apart from these things, human uses idioms and phrases for making language more beautiful, enrich and prosperous.

**Idioms:**

According to 'Oxford English Dictionary':

"Idiom is an expression whose meaning is different from the meanings of the individual words in it."

In short idiom is a proper arrangement of group of words which individual meaning is different and the overall meaning is different.

Ex.: 'Hit the nail on the head'

If we take the meaning of every individual word, we get the different meaning, but the meaning as a whole like: 'to do or say something that is exactly right.' This idiom will be used in the sentence like: 'you hit the nail on the head with this colour of wallpaper for the living room.'

Idioms can imply communication through a message in a way that gains interest in readers to arouse their senses. Idioms should be used in simple situations. Idiom enrich our speaking and upgrade our vocabulary as well. The convention and the vocabulary of the idioms are stable and if we change them, we lose the meaning of idiom. Usages of idioms in speech and writing will help one achieve a higher level of ,mastery and fluency in the language.

**Phrases:**

Phrase is a group of words that works together in sentence but does not contain a subject or a verb. Often phrases are used for description of people, things or events. Phrases are also usages in language to enrich the language by describing a person or event or things. It helps the speaker to express his/her thoughts, emotions, ideas and feelings in a more better way. Like idioms phrases also has a group of words but here is minor difference between them, that the literal meaning is close to comprehensive meaning, but it is also depend on the contextual meaning.

**Difference between Idioms and Phrases:**

An idiom is a phrase that has a figurative meaning, whereas a phrase is a group of words that have a literal meaning.

Ex.: 'Kick the bucket' is an idiom that means to die. Whereas ' The cat sat on the mat' is a phrase that has a literal meaning.

**Uses of Idioms and Phrases:**

There are various uses of idioms and phrases. One common use is to add colour or emphasis to a sentence. Idioms and Phrases can also be used for making a comparison.

Ex.: ' as busy as a bee' is an idiom that compares the business of a bee, to show how busy someone is. Idioms and phrases can also be used to make point more forcefully as in the idiom.

'Beat around the bush' which means to avoid speaking directly about a topic.

Idioms and phrases are also commonly used in everyday speech a a way of adding humour or showing emotions.

ISSN No. 2394-5990

Ex.: Idiom: 'I am pulling your leg', the are jokimng with you.

Phrase: 'That realy grinds my gears', they are angry about something.

**Advantages of Idioms and Phrases:**

- They give a genuine way to express
- They develop a thinking approach in a different direction.
- They allow us to express emotions in a creative manner.
- They help to shorten the long message.
- They boost our confidence in every manner.

**Disadvantages of Idioms and Phrases :**

- Reader or listener are unfamiliar with a certain phrase might take its meaning literally
- Idioms and phrases make the thing difficult to understand.
- Using idiomatic phrases might be distracting for readers or listeners whereas they expect simple tone of language.
- Everyone could not understand the idiomatic phrases.

**Conclusion :**

Idioms and phrases are used in language to express right emotion on a particular context. It helps to develop human culture and civilization. It enriches language to express proper and creative expression in minimum words. Thus, idiomatic phrases have few disadvantages but have more advantages to be used into our day to day communication.

**References:**


- Campbell, J. (1968). A Short Guide to Action Research
- Corelli,I. (2005) Idioms: Piece of Cake or Hard Nut to Crack

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# || संशोधक ||

**पुरवणी अंक ४ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- **शके १९४५**
- **वर्ष : ९१**
- **पुरवणी अंक : ४**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. आर. एस. मोरे
- प्रो. डॉ. ए. के. वावरे
- डॉ. ए. व्ही. पोरे

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. **महाराष्ट्रातील नैसर्गिक वारसा स्थळ – कास पठार**

- डॉ. गावित राजेश शिवाजी, डॉ. वाईकर मृणालिनी सचिन ------------------------------- ७

२. **शेतीमधील पीकपद्धती व पूरक व्यवसायावर कोविडचा झालेला परिणाम**

- प्रा.डॉ.सदाशिव राजाराम बनकर, प्रा.डॉ.उध्दव मनोहर घोडके ---------------------------११

३. **तुळजापूर तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याचे आर्थिक विश्लेषण**

- प्रा. डॉ. अशोक भीमराव भोंग ------------------------------------------------------ १४

४. **ग्रामीण विकासापुढील आव्हानांचे वास्तव**

- प्रा. नवनाथ नाथाराव इप्पर ------------------------------------------------------१७

५. **डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांचे कृषी क्षेत्रातील इनोवेशन्स**

- डॉ.आत्मारम बाबुराव मुळीक ------------------------------------------------------२४

६. **भारतीय अर्थव्यवस्था: स्त्री उद्योजकतेची भूमिका, समस्या आणि उपाययोजना**

- डॉ. ए. एस. नलवडे ---------------------------------------------------------------२८

७. **माण देशी महिला सहकारी बँकेच्या ठेवी व कर्जवाटपामुळे महिला उद्योजकतेचा झालेला विकास**

- सौ.मनिषा सुरेश पवार ------------------------------------------------------------३२

८. **किमान आधारभूत किंमतीचा कृषी उत्पादनावर प्रभाव**

- श्री. निलेशकुमार गुरव ------------------------------------------------------------३७

९. **आभासी चलन :- नव्या संधी आणि भविष्यातील दिशा**

- प्रा. किशोर गजानन सुतार -------------------------------------------------------४४

१०. **हार्ड करंन्सी ते क्रिप्टो करंन्सी : मागोवा करन्सीच्या विकासाचा**

- श्री. मारुती बाबुराव राठोड -------------------------------------------------------५३

११. **'शाश्वत शेतीसाठी संशोधन व समग्र विकासाची आवश्यकता'**

- डॉ. शेडगे डी. बी. ------------------------------------------------------------- ५९

१२. **शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन प्राध्यापकांचा नाविण्यपूर्ण अध्यापन पध्दतीविषयक दृष्टीकोन : एक अभ्यास**

- श्रीमती नांगरे नूतन कृष्णराव, प्राचार्य डॉ.बालाजी जी.गिरगावकर ----------------------- ६५

ISSN No. 2394-5990

# शेतीमधील पीकपद्धती व पूरक व्यवसायावर कोविडचा झालेला परिणाम

**प्रा.डॉ.सदाशिव राजाराम बनकर**
सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ,सातारा,महाराष्ट्र
sadashivbankar@gmail.com

**प्रा.डॉ.उध्दव मनोहर घोडके**
विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ, सातारा,महाराष्ट्र
uddhavmghodake@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे असून एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ३७ टक्के उत्पन्न कृषी क्षेत्रातून मिळते. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६८ टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रात कार्यरत आहे.भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमूख साधन, रोजगार निर्मितीचे प्रमुख स्त्रोत ,औद्योगिक विकास तसेच व्यापाराचे साधन म्हणूनही शेती क्षेत्राकडे पाहिले जाते. परंतु भारतीय कृषी क्षेत्रात अनिश्चित स्वरूपाचा पाऊस ,महापूर, जमीनीची धूप आणि जंगलतोड क्षारयुक्त जमीनी , पिकांवरील किड व रोग इत्यादी नैसर्गिक समस्या आहेत.कोविडमुळे अनेक शेतकऱ्याची आर्थिक परस्थिती कमकुवत झाली आहे . दि.२२ मार्च २०२० पासून कोविड या संसर्गजन्य आजारामुळे देशामध्ये जिल्हा प्रवेशबंदी करायला सुरवात झाली होती याचा परिणाम सर्वच क्षेत्रावर झालेला आहे. कोविड-१९ हा एक अति संसर्गजन्य रोग आहे. डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुंबेई प्रांताची राजधानी वूहानमध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख झालेली होती.त्यानंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला व या आजाराने जागतिक महामारीचे स्वरूप प्राप्त केले.सरकारने कोविड -१९ या रोगाचा प्रसार रोखण्यासाठीचे धोरण म्हणून वारंवार साबणाने हात धुणे, इतर व्यक्तीशी शारीरिक अंतर ठेवणे ,खोकताना किवा शिंकताना रुमालाचा वापर करणे इत्यादी नियमया रोगावर प्रतिबंध घालण्यासाठी घालून दिले होते. या सरकारच्या अंमलबजावणीमुळे शेती व्यवसायावर परिणाम झालेला आहे . प्रस्तुत शोधनिबंधात सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामध्ये कोविडचा काय परिणाम झाला . याची अभ्यास मांडणी केली आहे.

**उद्दिष्टे :**

१. कोविड रोगाची प्रसार व प्रतिबंधात्मक उपाय यांचा अभ्यास करणे.
२. कोविडचा शेतीतील पीकपद्धती व पूरक व्यवसाय यावर झालेला परिणाम याचा अभ्यास करणे .

**संशोधन पद्धती :**

सदर शोधनिबंध तयार करत असताना प्राथमिक व दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केला आहे . प्राथमिक सामग्रीमध्ये शेतकऱ्याच्या मुलाखती घेतल्या आहेत. द्वितीयक सामग्रीमध्ये इंटरनेट, गॅझेटीयर ,पुस्तके , विश्वकोश, विकिपीडिया याचा वापर केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

खंडाळा हे महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील एक गाव आहे. तसेच तालुक्याचे ठिकाण आहे. नीरा नदी या भागातून वाहते. हे ठिकाण सातारा जिल्ह्याच्या उत्तर दिशेला आहे. या खंडाळा तालुक्यात ६६ गावे आहेत. यातील खंडाळा , शिरवळ व लोणंद ही मोठी गावे आहेत. खंडाळा व लोणंद या दोन ठिकाणी स्वतंत्र नगरपंचायती आहेत. शिरवळ या गावामध्ये दोन टप्यात महाराष्ट्र ओदयेगिक विकास महामंडळ वसलेले आहे. याचबरोबर खंडाळा ओद्योगिक वसाहत ही केसुर्डी या गावच्या हद्दीत वसलेली आहे. खंडाळा तालुक्याचे वाई तालुक्यातून प्रशासकीय कारणासाठी विभाजन करण्यात आले आहे. त्यामुळे खंडाळा व महाबळेश्वर हे तालुके नव्याने आस्तित्वात आले आहेत. खंडाळा तालुक्याचे हवामान थंड व आल्हाददायक आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत नेऋत्य मोसमी वाऱ्यापासून वर्षातील सर्वाधिक पाऊस पडतो. येथे ऑक्टोबर ते मार्च हा हिवाळा ऋतू असतो. जून ते सप्टेंबर हा पावसाळा ऋतू असतो तर एप्रिल ते जून हा उन्हाळा ऋतू असतो.

खंडाळा तालुक्याचे क्षेत्रफळ ५२३.७२ चौ.कि.मी. आहे. सन २०११च्या जणगणनेनुसार खंडाळा तालुक्याची लोकसंख्या १,३७,४१८ इतकी आहे. यामध्ये पुरुष लोकसंख्या ७०५६५ आणि स्त्री लोकसंख्या ही ६६८५३ इतकी आहे. खंडाळा

तालुक्यामध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण हे ९४७ इतके आहे. म्हणजेच हे महाराष्ट्राच्या लिंग गुणोत्तराच्या तुलनेत सकारात्मक आहे. कारण महाराष्ट्राचे लिंग गुणोत्तराचे प्रमाण हे ९२९ इतके आहे. खंडाळा तालुक्यात साक्षरता दर हा ७६.०८% आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता दर हा ८०.९७% तर स्त्री साक्षरता दर हा ७०.९१% आहे. खंडाळा तालुक्याची लोकसंख्या घनता ही २६३ दर चौ.कि.मी. आहे. खंडाळा तालुक्यात लोणंद व शिरवळ येथे कातडी कमावण्याचे काम चालते.

**पीकपद्धतीवर कोविडचा झालेला परिणाम :**

खंडाळा तालुका हा कृषिप्रधान आहे या तालुक्यामध्ये खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामातील पिके घेतली जातात. बाजरी,तांदूळ,भुईमुग व घेवडा ही खरीप हंगामात पिके घेतली जातात.त्याचबरोबर रब्बी हंगामात गहू ,हरभरा व ज्वारीचे पीक घेतले जाते. खंडाळा तालुक्यात कमी पावसाच्या प्रदेशात बाजरीचे पीक घेतले जाते.त्याचप्रमाणे भुईमुग हरभरा व कांद्याचे पीकही येथे घेतात. तसेच या तालुक्यात पाडेगाव येथे ऊस संशोधन केंद्र (स्थापना १९३२) आहे. खंडाळा तालुक्यात कांद्याचे उत्पादन जास्त प्रमाणात घेतात. येथील लोणंदचा कांदा प्रसिद्ध आहे .

कोविड -१९ चा परिणाम हा खंडाळा तालुक्यातील पीक पद्धतीवर झालेला आहे . शेतकरी हा लवकर उत्पन्न मिळणाऱ्या पिकाचे उत्पादन घेऊ लागला आहे . याचाच परिणाम म्हणून खंडाळा तालुक्यामध्ये भाजीपाला पिकाचे उत्पादन वाढले आहे. शेतकरी हा भाज्या स्वतः उत्पादन करून स्वतः विक्री करू लागला आहे. त्यामुळे त्याला किमंत ही काही प्रमाणात जास्त मिळू लागली आहे. कारण व्यापाऱ्याची असणारी मध्यस्थ साखळी कोरोनामुळे काही प्रमाणात कमी झालेली आहे . ऊसाचे उत्पादन हे कोरोना काळापासून काही प्रमाणात कमी झालेले आहे. कारण ऊसाचे पूर्ण पैसे मिळण्यास बराच कालावधी जातो. त्यामुळे शेतकरी हा टोमॅटो , भुईमुग व भाजीपाला अशा जलद उत्पन्न देणाऱ्या पिकाकडे वळला आहे. कोरोनामुळे फुल विक्रेते यांचा व्यवसायही वाढला आहे. कारण कोरोनामुळे देव देवतावरील श्रद्धा वाढली आहे. कोरोनामुळे लवकर उत्पन्न देणारे पीक शेतकरी घेऊ लागले आहेत . शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल स्वतः फिरून त्याचप्रमाणे जाहिरातीद्वारे विक्री करू लागले आहेत. त्यामुळे त्यांची व्यापाऱ्याकडून होणारी लुटमार काही प्रमाणात थांबली आहे.

शेतीपूरक व्यवसायावर झालेला कोविडचा परिणाम :

कोरोनामुळे शेती व शेतीपूरक व्यवसाय अडचणीत सापडला आहे. कोरोनामुळे कुकुटपालन व्यवसायावर परिणाम झाला आहे. कोरोना जेव्हा नवीन होता. त्यावेळी अशी अफवा पसरवण्यात आली होती की, कोरोना हा रोग प्राण्यामुळे होतो. विशेषकरून कोंबडी या प्राण्यामुळे होतो . त्यामुळे लोकांनी मांसाहार हा बंद केला होता. त्यामुळे याचा परिणाम कुकुटपालन व्यवसायावर झाला कारण कोंबडया व कोंबडयापासून मिळणारी अंडी यांची मागणी घटली होती. परिणामी याचा उत्पन्नावर विपरीत परिणाम झाला. आणि कुकुटपालन व्यावसायिक अडचणीत सापडले होते . त्यानंतर संशोधनाने सिद्ध केले की, कोरोना हा रोग प्राणी किंवा कोंबडयापासून होत नाही तेव्हापासून लोकांनी मांसाहार करायला सुरवात केली आणि याचाच परिणाम म्हणून कोंबडयाची मागणी हळूहळू वाढू लागली. तसेच कोरोनाचा या व्यवसायावरील सकारात्मक परिणाम म्हणजे अंडी खाल्यानंतर कोरोना बरा होतो हा समज झाल्यामुळे अंड्याची मागणी वाढली. त्याचप्रमाणे प्रोटीनयुक्त आहार म्हणून अंडी कोविडग्रस्त रुग्णांना त्यावेळी देणे सुरु केले होते त्यामुळे निरोगी लोकांनीही अंडी खाणे सुरु केले होते, कारण आरोग्य सेवकांनी लोकांची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी अंडी खाण्याचे सल्ले दिले होते. यानंतर हा व्यवसाय पूर्वीसारखा तेजीत येऊ लागला.

मेंढीपालन हा व्यवसायही खंडाळा तालुक्यात शेतीला पूरक म्हणून केला जातो. कारण हा व्यवसाय कमी पावसाच्या प्रदेशात केला जातो. शेतीस पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन व दुग्ध व्यवसाय या तालुक्यात केला जातो. त्यामुळे या व्यवसायास येथे महत्व प्राप्त झाले आहे. दुधाच्या उत्पादनात वाढ व्हावी म्हणून येथे संकरित गाई पाळल्या जातात. दुध संकलनासाठी सहकारी संस्थाही खंडाळा तालुक्यामध्ये आहेत.

**शिफारशी :**

१. सर्व शेतकऱ्यांनी एका वेळी एकाच भाजीपाल्याचे उत्पादन घेऊ नये. त्यामध्ये भिन्नता असावी
२. सर्व शेतकऱ्यांनी प्रत्येक गावामध्ये शेतकरी गट स्थापन करावेत.
३. शेतमाल हा जवळच्या बाजारपेठेत न विक्री करता शक्यतो दूर अंतरावरच्या बाजारपेठेत विक्रीसाठी घेऊन जावा म्हणजे जास्त विक्री किमंत मिळू शकते.

**निष्कर्ष :**

कोविडमुळे शेतकरी यांची आर्थिक परस्थिती कमकुवत झाली आहे. शेतकऱ्याच्या पीकपद्धती व पूरक व्यवसायावर परिणाम झाला आहे. भाजीपाला पिकाचे उत्पादन वाढल्यामुळे

ISSN No. 2394-5990

त्याच्या किमती घटल्या आहेत. खंडाळा तालुक्यातील शेतकरी हा उत्पादित केलेला भाजीपाला हा जवळच्या बाजारात विक्रीसाठी घेऊन जातो. त्यामुळे शेतकऱ्याचे शेतीतून मिळणारे उत्पन्न कमी प्रमाणात आहे.

**संदर्भ साधने :**

१. मराठी विश्वकोश, सातारा जिल्हा ,वसंत चौधरी .
२. सातारा जिल्हा, गॅझेटीयर, महाराष्ट्र शासन २०१२ .
३. सातारा जिल्हा, कृषी विभाग , महाराष्ट्र शासन .
४. विकिपीडिया, मुक्त ज्ञानकोश .
५. सकाळ, ८ एप्रिल२०२० www.press information bureau.Govt.of India.

■■■

ISSN : 0975-2382

# SAVASS Journal of Social Sciences

Peer-Reviewed | Volume-XII | Special Issue

27TH TO 29TH DECEMBER 2023

106th ANNUAL CONFERENCE

## Indian Economic Association (IEA)

*on*

Development Perspectives in India : Issues and Challenges

**Natural Resources, Population Growth and Agricultural Development**

***

**Women Empowerment and Gender Inequality**



Organised by

Indian Council of Social Science Research

NABARD

Giri Institute of Development Studies, Lucknow

ISSN-0975-2382

# Savass Journal of Social Sciences

*Peer- Reviewed* *Volume-XII* *Special Issue*

27TH TO 29TH DECEMBER 2023

# 106th ANNUAL CONFERENCE

**THEME 1**

Natural Resources, Population Growth and Agricultural Development

O O O

**THEME 2**

Women Empowerment and Gender Inequality

O O O

## INDIAN ECONOMIC ASSOCIATION

*Organized By*

Giri Institute of Development Studies, Lucknow

SAVASS JOURNAL OF SOCIAL SCIENCES :

106$^{Th}$ Annual Conference, Vol-XII Special Issue, December-2023

# Contents

THEME 1

Natural Resources, Population Growth and Agricultural Developmen

1. **Increase Farmers Income Through Improve Agricultural Production and Productivity: An Analytical Study** 1
*Prof. Jagadish Singh*

2. **Sustainable Agriculture Development in India: Problems and Implications** 10
*Sanjeet Kumar Sah & Prof. Md. Mahmood Alam*

3. **Indian Agriculture: An Econometric Analysis** 18
*Dr. Debesh Bhowmik*

4. **A Clinical Study of Problems in Agricultural Business Management in Nashik District** 35
*Dr. Dhiraj C. Zalte*

5. **The Fuel Economics: A Comparative Study of Fuel Pricing Policy of Coalition Regime and Non Coalition Regime in India** 40
*Dr. Rajeena Syed & Dr. B.B. Tiwari*

6. **Trend and Opportunity of Seaweed Industry for Indian Economy** 57
*Dr. Roopali Srivastava & Dr. Niharika Srivastava*

7. **A Study of Select Aspects of Human Resource in Satara District of Maharashtra** 69
*Dr. Samadhan Dharma Shinde & Dr.Uddhav Manohar Ghodake*

8. **India's G20 Presidency: An Opportunity to Steer the World toward Inclusive and Sustainable Growth** 76
*Dr. Udham Singh & Dr. Pushpraj Singh*

9. **Requirements and Potential for a Portable Social Security System for Agricultural Labourers in India** 81
*Sanghamitra Kar, Dr. Vinod Sen & Sanjeet Kumar*

# A Study of Select Aspects of Human Resource in Satara District of Maharashtra

*Dr. Samadhan Dharma Shinde* & Dr.Uddhav Manohar Ghodake*

## ABSTRACT

*Human resource development is the key to the development of other resources of any region. Human resources development is important because it is an investment in the education and their training of people that will ultimately result in a stronger and more effective workforce which will help to develop many sectors like agriculture, industry and service as well as social development.*

*Population is the main qualitative resource for the regional development by representing manpower. In this context various aspects of population need to study. In this paper investigate population aspects like growth rate, density, sex ratio, literacy of the Satara district which is study area for the year 2011. Satara district is located in the western part of the Maharashtra state. It lies between 17$^0$5′ north to 18$^0$11′ north latitudes and 73$^0$ 33′ east to 74$^0$ 54′ east longitude. For the present study data has been collected from Census Handbooks and Socio-Economic Abstract of Satara District. Population characteristics of the study area are different in the considerable the male-female and rural-urban also. The total and rural growth rate continually decrees but urban growth (26.31%) rate is highly increased. The highest density has been observed in Satara tahsil and the lowest density observed in Mahabaleshwar tahsil. The high sex ratio is found in the urban areas than the rural area during the 1961 to 2011. Satara tahsil has high literacy and Man tahsil low literacy has been observed in the study area. But high literacy rate is found in urban than in the rural part of all tahsils of Satara district.*

**Keywords: -** *Growth Rate, Density, Sex Ratio and Literacy etc.*

## Introduction

Human resource development is the key to the development of other resources of any region. Human resources development is important because it is an investment in the education and their training of people that will ultimately result in a stronger and more effective workforce which will help to develop many sectors like agriculture, industry and service as well as social development. Only if human resources are developed can other resources on earth be developed. This requires sustainable development of human resources (Shinde S. D. & Pore A. V, 2021). Population distribution in the world is unequal and indifferent so population characteristics differ from place to place. Population is the main qualitative resource for the

* Assistant Professor, Department of Geography, Shripatrao Kadam Mahavidyalaya, Shirwal, affiliated to Shivaji University, Kolhapur Maharashtra

** Assistant Professor, Department of Economics, Shripatrao Kadam Mahavidyalaya, Shirwal, affiliated to Shivaji University, Kolhapur Maharashtra

regional development by representing manpower. In this context various aspects of population need to study. The study of growth rate, density, sex ratio, literacy, rural-urban populations is the very important because they are pushing and direction of the human resource development.

Where there is a favorable natural environment for human life, the population density is high and the adverse natural conditions are low.

## Objectives

1. To study the temporal changes of selected population aspects 1961-2011.
2. To study the spatial population aspects of 2011.

## Study Area

Satara district is taken as a study area in the present investigation which is located at the western part of Maharashtra. It lies between $17^0$ 5′ north to $18^0$ 11′ north latitudes and $73^0$ 33′ east to $74^0$ 54′ east longitude. The Satara district surrounded by Pune district to the North, Solapur district to the East, Sangli district to the South, Ratnagiri district to the West and Raigad district to the North-West. It covers an area of 10480.00 sq. km. and has population 3,003,741 as per census 2011. District is administratively divided in to 11 tahsils viz. Mahabaleshwar, Wai, Khandala, Phaltan, Man, Khatav, Koregaon, Satara, Medha, Patan, Karad, (Fig.1).

In the 2011 census, the district has 11 tahsils, 22 towns, and 1745 inhabited villages (including 26 uninhabited villages).




Fig. 1

## Review Summary

As stated earlier the Population geography attracts to several geographers. Few of them have been reviewed here under.

The most significant authors who worked on defining population geography Magar T. R. (2018), Bloom D.E and Canning D (2001), Chi Fang and Wang Deven (2006), Graham R.J and Beeler D (2000), Cropper M. and C. Griffiths (1994), Datta, S. (2000), Malthus, T. R. (1798), Patil, S. Y. (2000), Sengupta, K. (2000) Those authors and their works had the significant influence on the development of population Geography.

## Database and Methodology

For the analysis of existing condition of the various aspects of Population characteristics, related data and information has been collected from secondary sources.

The secondary sources of the data mainly are included Census of India's District Census Handbooks Satara District, 1961-2011 etc. The published reports like Socio-economic Review and District Stastical Abstract, Satara District, 2021, Gazetteer of Satara District and other governmental reports etc. are also the sources of data in the present investigation.

The collected data have been arranged in tabular form and processed by employing various quantitative techniques. The processed data have been depicted in the form of tables, graphs, diagrams, maps etc.

## Result and Discussion

Population aspects like growth rate, density, sex ratio, literacy, rural-urban population, economic classification, occupational structure, etc. need to study. The population/ manpower is the focal resource for the regional development.

